राजनीतिशास्त्रपरिचय.

" भुंक्ष्व राज्यं समृद्धम् ।"

श्रीमद्भगवद्गीता.

लेखक.—शं. द जावडेकर

" सर्वस्य जीवलोकस्य राजधर्मः परायणम् । "

(महाभारत.)

राजनीतिशास्त्र-

परिचय.

(भाग १, २ व ३.)

लेखक.

शंकर दत्तात्रय जावडेकर.

शालिवाहन शक १८४८] [किंमत ३ रुपये.

१९२६

प्रकाशकः— शंकर दत्तात्रेय जावडेकर.

मुद्रकः— व्यंकटेश बलवंत हरोलीकर,

गोवर्धन छापखाना ६ शुक्रवार, पुणें.

प्रस्तावना.

या पुस्तकाचें सबंध नांव "राजनीतिशास्त्रपरिचय" असें ठेविलें आहे, त्यावरून त्याचें उद्दिष्ट कार्य ध्यानांत येईल. राजनीतिशास्त्राचा अभ्यास करावयाचा झाल्यास शासनसंस्थांची उत्पत्ति, उत्क्रान्ति, स्थिति व भवितव्य या दृष्टीनें करावा लागतो. या दृष्टीनेंच या पुस्तकाचे (१) प्राथमिक व ऐतिहासिक (२) वर्णनात्मक आणि (३) औपपत्तिक, असे तीन भाग केलेले आहेत. बी. ए. च्या परीक्षेला या विषयांवर जीं क्रमिक पुस्तकें असतात त्यासारखेंच हें आहे; मात्र यांतील विषयांची निवड व मांडणी ही मराठी वाचकांच्या ग्रहणशक्तीला अनुसरून स्वतंत्र रीतीनें करण्याचा प्रयत्न केला आहे. भारतियांची प्राचीन राजनीति व हल्लींची पाश्चात्य राजनीति यांचा तुलनात्मक विचार करणें हा या पुस्तकाचा विशेष आहे. तसेंच राज्ययंत्राच्या बाह्य घटनेपेक्षां तिच्या बुडाशीं असणाऱ्या तत्त्वांना आणि राजनीतिज्ञांच्या ध्येयांना या पुस्तकांत विशेष महत्त्व दिलेलें आढळेल. पाश्चात्य देशांतील प्रातिनिधिक राज्ययंत्राची अनेक दृष्टींनीं पुनर्घटना करणें अवश्य झालें आहे हें या पुस्तकांत दाखवून दिलें असून त्या पुनर्घटनेच्या बुडाशीं कोणतीं तत्त्वें असावींत व तीं आपल्या प्राचीन भारतीय राजनीतिला कितपत परिचित होतीं याचें विवेचन उपसंहाराच्या प्रकरणांत केलें आहे. भारतीयांच्या प्राचीन राजनीतीची वाढ कां खुंटली व त्यांची राज्ययंत्रें कां मोडलीं या संबंधींही चर्चा याच प्रकरणाच्या अखेरीस केली आहे. तसेंच इंग्लिश राज्यघटनेच्या मूलभूत तत्त्वांचें भारतीय राजधर्माशीं विशेष सादृश्य दाखवून दिलेलें असून इंग्लिशांचा मोठेपणा कशांत आहे व आमची चूक कोठें झाली, तें पहिल्या भागांतील 'राजसत्ता व तिचें नियंत्रण' या प्रकरणांत दाखविलें आहे. शिवाय समाजसत्तावादाचीहि सविस्तर माहिती या पुस्तकांत वाचकांस सांपडेल. त्याचप्रमाणें राज-

नीतीशास्त्रांतील तत्त्वें परिस्थितिसापेक्ष असतात हें वाचकांच्या मनांवर बिंब-विण्यासाठीं कोणत्याही तत्वाची माहिती देतांना तें कोणत्या परिस्थितींत निर्माण झालें याचीहि माहिती दिलेली आहे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे सद्यःस्थितींतही लागू पडणारे प्राचीन भारतीय राजनीतीचे बहुतेक सर्व सिद्धांत, पाश्चात्य राजनीतीची सद्यःप्रवृत्ति, आणि भारतीय व युरोपीयन राज्य-यंत्राची उत्पत्ति, उत्क्रान्ति व स्थिति, या संबंधींची सामान्य लोकांस व विद्यार्थ्यांस लागणारी बहुतेक माहिती या पुस्तकांत दिली आहे. विशेष अभ्यास करणारांस इंग्रजी ग्रंथांचाच आश्रय करणें भाग आहे. परंतु या विषयांत प्रवेश होऊन त्यांतील सामान्य सिद्धांतांची माहिती या पुस्तकांवरून मराठी वाचकांस करून घेतां येईल. विद्यार्थ्यांच्या सोयींसाठीं आधारभूत मूळ ग्रंथांचा नुसता उल्लेख न करतां उतारेच दिले आहेत. यामुळें पुस्तकाचा विस्तार थोडा वाढला असला तरी विद्यार्थ्यांची सोय होईल व मूळ ग्रंथ वाचण्याची आवड उत्पन्न होईल अशी आशा आहे.

पुस्तकांत माझें स्वतःचें असें फारच थोडें आहे. विषयांची निवड, त्यांची मांडणी, प्रकरणांची सरणी व निरनिराळ्या मुद्यांना दिलेलें कमीअधिक महत्त्व यांतच लेखकाचें 'स्वत्व' आहे. स्वतंत्र शोध हा या पुस्तकाचा हेतूच नव्हे. तथापि कांहीं कांहीं ठिकाणीं लेखकाचीं मतें स्पष्ट दिलीं आहेत त्यांची चर्चा टीकाकारांकडून होईलच.

या प्रकारचा मराठींत हा जवळ जवळ पहिलाच प्रयत्न आहे; त्यामुळें व लेखकाच्या अज्ञानामुळें पुष्कळ दोष राहिले असण्याचा संभव आहे. तज्ज्ञ टीकाकारांनीं ते दाखवून दिल्यास पुढील आवृत्ति काढणें शक्य झाल्यास तींत सुधारणा करतां येतील. पुस्तकाचा विषय ज्याप्रमाणें मराठी वाचकांस नवा आहे त्याप्रमाणें लेखकहि नवाच आहे. ही सेवा वाचकांस पसंत पड-ल्यास आणखीही असेच प्रयत्न करण्याचा त्याचा विचार आहे.

पुणें शहर;
ता. १३–४–२६

लेखक
शंकर दत्तात्रय जावडेकर

अनुक्रमणिका.

भाग १ ला

(प्राथमिक व ऐतिहासिक.)

भाग २ रा

(वर्णनात्मक.)

भाग ३ रा

(औपपातिक.)

पारिभाषिक शब्द

इंग्रजी	मराठी.
Politics	राजनीतिशास्त्र.
Government	सरकार, राज्ययंत्र.
State	राज्य.
Nation	राष्ट्र
Monarchy	राजसत्ता.
Oligarchy	अल्पजनसत्ता.
Aristocracy	महाजनसत्ता.
Democracy	लोकसत्ता.
Despotism	अनियंत्रित सत्ता किंवा सुलतानशाही
Republic	लोकशाही.
Limited Monarchy	लोकसत्ताक राजशाही.
Legislature	लोकसभा.
Lower Chamber	प्रतिनिधिसभा.
Upper Chamber	महाजनसभा.
Bicameral	द्विदळ.
Executive work	अंमलबजावणी किंवा राज्यशासन.
Judicial work	न्यायदान किंवा धर्मनिर्णय.
Parliamentary Executive	जबाबदारप्रधानमंडळ.
Non-Parliamentary Executive	स्वतंत्रप्रधानमंडळ.
President	राष्ट्राध्यक्ष.
The real executive	सत्ताधारी राजा किंवा स्वामी.

The nominal executive	नामधारी राजा किंवा स्वामी.
Individualism	व्यक्तिस्वातंत्र्य वाद.
Socialism	समाजसत्तावाद.
State-socialism	सरकारनिष्ठ समाजसत्तावाद.
Guild-socialism	संघनिष्ठ समाजसत्तावाद.
Syndicalism	अराजक संघवाद.
Anarchism	अराजकवाद
Communism	राष्ट्रकुटुंबवाद.
Composite state	संमिश्र राज्य.
Unitary state	एकरूप राज्य.
Federal state	संयुक्तराज्य.
Empire	साम्राज्य.
Universal state	सार्वभौम राज्य.

राजनीतिशास्त्रपरिचय.

भाग १ ला

प्राथमिक व ऐतिहासिक.

राजनीतिशास्त्र–भाग पहिला.

प्रकरण १ लें.

विषयप्रवेश.

" सर्वोपजीवकं लोकस्थितिकृन्नीतिशास्त्रकं ।
धर्मार्थकाममूलं हि स्मृतं मोक्षप्रदं यतः ॥ " शुक्रनीति
" सर्वस्य जीवलोकस्य राजधर्मः परायणं ॥
त्रिवर्गो हि समासक्तो राजधर्मेषु कौरव ।
मोक्षधर्मश्च विस्पष्टः सकलोऽत्र समाहितः ॥ " शां. प. म. भा.

सर्व वर्णांतील व आश्रमांतील लोकांचे व्यवहार यथाधर्म चालावेत आणि त्या सर्वांचें यथायोग्य संरक्षण व्हावें, या करितांच राजा निर्माण केला आहे, असें मनु म्हणतो. (मनु अ. ७ श्लो. ३५). महाभारतांतील शांतिपर्वांत युधिष्ठिरानें भीष्मांना राजधर्म कथन करण्याची विनंति केली, त्या वेळीं ' राज्ञां वै परमो धर्मः ' म्हणजे राजांचा धर्म हा सर्व धर्मांत श्रेष्ठ आहे, असें सांगून, घोड्यांना आवरण्यास लगाम किंवा हत्तींना वळविण्यास अंकुश उपयोगी पडतो, त्याप्रमाणें लोकांना सन्मार्गावर ठेवण्यास उपयोगी पडणाऱ्या या राजर्षिसेवित राजधर्मांत प्रमाद झाल्यास ' लोकस्य संस्था न भवेत् सर्वं च व्याकुली भवेत् ' म्हणजे समाजाची संस्था टिकणार नाहीं आणि सर्वत्र अनवस्था होईल, असें राजधर्माचें महत्व वर्णन केलेलें

राजनीतिशास्त्राचें व राजकीय संस्थाचें महत्व.

आहे. चार आश्रमांत गृहस्थाश्रमाची योग्यता एका दृष्टीनें मोठी आहे, कारण इतर सर्व आश्रमांतील लोकांची उपजीविका गृहस्थाश्रमी लोकांवर अवलंबून असते; त्याचप्रमाणें समाजाच्या अस्तित्वाच्या दृष्टीनें सर्व वर्णांपेक्षा क्षत्रियवर्णाची योग्यता जास्त आहे, अशी आपली पूर्वापार समजूत आहे. म्हणूनच या राजनीतिशास्त्राला 'सर्वोपजीवकं' आणि 'लोकस्थितिकृत्' हीं विशेषणें शुक्राचार्यांनीं शिरोभागीं घेतलेल्या अवतरणांत योजिलेलीं आहेत. तसेंच हें शास्त्र 'धर्मार्थकाममूलक' असून शिवाय 'मोक्षप्रद' ही आहे, असें शुक्राचार्य म्हणतात. तसेंच महाभारतांत

राजनीति व चार पुरुषार्थ.

या राजधर्मांत धर्म, अर्थ, काम हा त्रिवर्ग 'समासक्त' असून शिवाय मोक्षधर्मही यांत 'समाहित' झालेला आहे, असें म्हटलेलें आहे. यावरून 'राजा व राज्य' या संस्थांचें किती महत्व आपल्या पूर्वजांना वाटत होतें याची कल्पना येते. राज्य ही संस्था नष्ट झाल्यास समाज ही संस्था टिकणार नाहीं, वर्णाश्रमधर्म टिकणार नाहीं, आणि धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे चार पुरुषार्थही कोणाला प्राप्त होणार नाहींत, अशी त्यांची पूर्ण खात्री असल्याचें दिसून येतें. अलीकडील विद्वानांतही समाजांतील राजकीय संस्थांच्या महत्वाबद्दल पूर्ण मतैक्य दृष्टीस पडतें. सुप्रसिद्ध इंग्लिश राजनीतिज्ञ व्हायकाउंट मोर्ले यांनीं एके ठिकाणीं 'आमच्या राष्ट्राचें वैभव, सामर्थ्य व भवितव्य या सर्वांच्या मुळाशीं राजकीय तत्वेंच आहेत' असें म्हटलें आहे. याच वचनाच्या आधारावर अर्वाचीन हिंदी राष्ट्राचे पितामह दादाभाई नवरोजी यांनीं कलकत्त्याच्या १९०६ सालच्या राष्ट्रीय सभेंत स्वराज्यप्राप्तीचें महत्व लोकांना पटवून दिलें. तात्पर्य, महाभारतकाळापासून आजपर्यंत जे जे विचारी पुरुष होऊन गेले, त्यांनीं एका विशिष्ट दृष्टीनें समाजाच्या राजकीय स्थितीला महत्व दिलेलें आहे.

असें असलें, तरी, राजधर्म हा अनेक धर्मांपैकीं एक धर्म आहे आणि समाजाच्या सुस्थितीला एकट्या राजधर्माचीच आवश्यकता नसून सर्व धर्मांची किंवा व्यापक अर्थानें धर्माची आवश्यकता आहे, हें तत्व केव्हांही विसरून चालणार नाहीं. व्यापक अर्थानें 'अभ्युदय व निःश्रेयस' म्हणजे आधिभौतिक व आध्यात्मिक हित प्राप्त करून देणें

राजनीतिशास्त्र व धर्मशास्त्र.

किंवा चार पुरुषार्थांचा लाभ करून देऊन समाजाचें धारण करणें, हें धर्माचें ध्येय आहे. या व्यापक धर्माचा राजधर्म हा एक भाग आहे. या दृष्टीनें समाजधारणेला आवश्यक व समाजहिताला पोषक अशा सर्व कर्तव्यांचा समावेश धर्मांत होतो आणि धर्मशास्त्राच्या विवेचनांत समाजांतील सर्व संस्थांचा व व्यवहारांचा विचार करावा लागतो. याच कारणास्तव मन्वादि स्मृतिकारांच्या ग्रंथांत समाजाच्या सर्व अंगांचा एकत्र विचार केलेला आढळतो. अर्वाचीन दृष्टीनें पाश्चात्य लोक या ग्रंथांस समाजशास्त्रावरील ग्रंथ म्हणतील. समाज ही एक वस्तू कल्पून त्याच्या सर्व अंगांचा संकलित रीतीनें एकाच वेळीं विचार करणाऱ्या शास्त्रास समाजशास्त्र असें नांव अलीकडे पडलेलें आहे. या

राजनीतिशास्त्र व समाजशास्त्र.

शास्त्रांत समाज कसे व कां बनतात, त्यांची वाढ कशी होते, त्यांत कोणकोणत्या संस्था कां व कशा निर्माण होतात, त्यांचीं रूपान्तरें होण्यास काय कारणें होतात, या व अशा इतर प्रश्नांचा उहापोह केलेला असतो. प्राचीन युरोपांतील ॲरिस्टॉटल व प्लेटो या ग्रीकतत्वज्ञान्यांच्या ग्रंथांत अशाच सारख्या प्रश्नांचा खल केलेला दिसून येतो व म्हणून ॲरिस्टॉटलचा 'पॉलिटिक्स' व प्लेटोचा 'रिपब्लिक' हे दोन्ही ग्रंथ समाजशास्त्रावरचे

आद्य ग्रंथ आहेत असे पुष्कळ युरोपीअन ग्रंथकार मानतात. तोच मान आमच्या स्मृतिग्रंथांना देतां येईल असें आम्हांस वाटतें. अर्वाचीन काळीं युरोपीअन पंडितांनीं इतर भौतिक शास्त्रांप्रमाणें समाजशास्त्रांत व त्याच्या शाखांत बरीच प्रगति केलेली आहे; आणि इतर सर्व बाबींप्रमाणें समाजशास्त्रावरील आमच्या पूर्वजांच्या विचारांत नवी भर टाकण्याचें कार्य आम्हीं अनेक वर्षे सोडून दिल्यामुळें समाजशास्त्राचें आमचें ज्ञान अलीकडे वाढलेलें नाहीं. अर्वाचीन काळीं दळणवळणाचीं

पाश्चात्य समाजशास्त्राचें एकांगी स्वरूप.

साधनें बरींच वाढल्यामुळें मानवी संस्कृतीच्या निरनिराळ्या अवस्थांत असणाऱ्या समाजांची माहिती आज उपलब्ध झालेली आहे. तसेंच निरनिराळ्या समाजांच्या ऐतिहासिक परिस्थितींचेंही बरेंच ज्ञान अलीकडे उपलब्ध झाल्यामुळें समाजशास्त्राच्या प्रगतीला फार मदत झालेली आहे. तथापि पाश्चात्य पंडितांनीं अद्यापि पौरस्त्य समाजांचा, त्यांच्या इतिहासाचा व त्या समाजांतील प्राचीन संस्कृतीचा करावा तितका अभ्यास केला नसल्यामुळें, समाजशास्त्राला बरेंच एकांगी स्वरूप प्राप्त झालेलें आहे. पौरस्त्य लोकांनींच आपल्या इतिहासाचा व आपल्या पूर्वजांनीं स्थापन केलेल्या सामाजिक संस्थांचा शास्त्रीय पद्धतीनें परिश्रमपूर्वक अभ्यास केल्याशिवाय हें वैगुण्य नाहींसें होणार नाहीं. अलीकडे ही उणीव भरून काढण्याचे प्रयत्न भारतीय लोकांकडून होऊं लागले आहेत. अशा विद्वानांत विनयकुमार सरकार, राधाकमल मुकर्जी, नरेंद्रनाथ लॉ, बॅ. जयस्वल, मुजमदार, चिं. वि. वैद्य, वि. का. राजवाडे वगैरे नांवें प्रमुख आहेत.

समाजाचें धारण करणाऱ्या धर्माचें राजधर्म हें एक अंग असल्यामुळें प्रत्येक स्मृतिग्रंथांत राजधर्माचें विवरण केलेलें असून समाजांत राजा

प्रथम कसा निर्माण झाला, राज्याची मुख्य अंगें कोणतीं, त्यांचा परस्पर संबंध काय असतो, त्या प्रत्येक अंगाचा उत्तम स्थिति कोणती, राज्यसंस्थेचें ध्येय काय आहे, वगैरें प्रश्नांची चर्चा केलेली असते. याशिवाय हल्लीं ज्याप्रमाणें समाजशास्त्रांतून राजनीतिशास्त्र हें स्वतंत्र शास्त्र निर्माण होऊन, त्यावर अनेक ग्रंथ झालेले आहेत, त्याचप्रमाणें प्राचीन भरतखंडांत समाजाच्या सर्व अंगांचा विचार करणाऱ्या धर्मशास्त्ररूपी स्मृतिग्रंथाशिवाय अर्थशास्त्र, नीतिशास्त्र किंवा दंडनीतिशास्त्र या नांवानें राजनीतिशास्त्रावर स्वतंत्र ग्रंथ झाले होते. कौटिल्याचे अर्थशास्त्र व शुक्रनीति हे ग्रंथ प्राचीन भारतीयांच्या राजनीतिशास्त्रासंबंधीं व अर्थशास्त्रासबंधीं विचारांची माहिती करून देण्यास आज उपलब्ध आहेत. याशिवाय ऋग्वेद, ब्राह्मणग्रंथ, धर्मसूत्रें, महाभारत, स्मृतिग्रंथ व त्यावरील टीका, यांतूनही प्राचीन भारतीयांच्या आचारविचारांसंबंधीं बरीच माहिती अलीकडे विद्वानांनीं शोधून काढिलेली आहे. एकंदर समाजशास्त्राची हल्लीं बरीच जास्त प्रगति झाली असल्यामुळें आणि हल्लींच्या राजकीय संस्थांना पुष्कळ विविधता प्राप्त झाली असल्यामुळें हल्लीं या शास्त्रांत पूर्वीपेक्षां ब-याच अधिक विषयांचा समावेश होत असतो. समाजांत राजकीय संस्था स्थापन होऊन त्यांना राज्यांचें स्वरूप कसें प्राप्त होतें ? पुढें त्या संस्थांत कोणत्या कारणांमुळें कसकशीं रूपांतरें होत जातात? सध्यांच्या शासनसंस्थांचीं स्वरूपें कशीं आहेत व त्यांचें वर्गीकरण कोणत्या तत्वांवर करावें ? त्या संस्थांतील गुणदोष काय आहेत व त्यांतील दोष कमी होऊन गुणांची वृद्धि कशी होईल? सरकार व प्रजाजन यांचीं परस्पर कर्तव्यें व संबंध काय आहेत? सामान्य प्रजाजन व नागरिक यांच्यांत भेद काय व नागरिकांचे विशेष हक्क कोणते? या व अशा राज्यविषयक सर्व प्रश्नांची शास्त्रशुद्ध चर्चा

राजनीतीचा विषय.

हल्लींच्या राजनीतिशास्त्रांत केली जाते. अर्वाचीन काळीं पाश्चात्य देशांत प्रातिनिधिक लोकसत्तेचा उदय झाल्यापासून या शास्त्रांतील विचारांत मोठीच क्रांति झालेली आहे व त्याची वाढ ही पुष्कळ झालेली आहे. इंग्लिश भाषेंत या शास्त्रांवरील मिल्ल, स्पेन्सर, हेन्रीमेन, सिज्विक, उड्रोविल्सन, लीकॉक, लोवेल, डायसी, ब्राइस, बेजहॉट, मेरिॲट वगैरे विद्वानांचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. अलीकडे समाजसत्तावादी पंथ निघाल्यापासून त्या पंथांतील ग्रंथकारांनीं राजनीतिशास्त्राच्या कांहीं अंगांवर बरेच स्वतंत्र विचाराचे ग्रंथ लिहिलेले आहेत व त्यामुळें या शास्त्रांत आणखी एक नवीच क्रांति होऊं पहात आहे.

राजनीति व अर्थशास्त्र.

राजनीति शास्त्र हें जसें समाजशास्त्रांचें अंग आहे, तसेंच अर्थशास्त्र हें त्याच शास्त्राचें दुसरें एक अंग आहे. यांत समाजांत द्रव्योत्पादन कसें होतें, त्याची वाटणी कशी होते व वस्तूंचा क्रयविक्रय कसा होतो, यासंबंधीं विचार केलेला असतो. याचा व राजनीतिशास्त्राचा फार निकट संबंध आहे, ही गोष्ट या दोन्ही शास्त्रांवरील प्राचीन व अर्वाचीन ग्रंथ वाचणाऱ्यांच्या सहज लक्षांत येणार आहे. शुक्रनीति या ग्रंथांत अर्थशास्त्र या शब्दानें सध्या आपण ज्यांस राजनीति व अर्थशास्त्र हीं नांवें देतों त्या दोन्ही शास्त्रांचा उल्लेख केलेला आहे. तसेंच कौटिल्याचें अर्थशास्त्र व शुक्रनीति या ग्रंथात या दोन्ही शास्त्रांतील विषयांचा समावेश केलेला आढळतो. सध्यादेखील व्यक्तिस्वातंत्र्य व समाजसत्ता, कारखानदार व कामकरी किंवा जमीनदार व शेतकरी यांचें संबंध, दारिद्य्र व आर्थिक विषमता यांचें निवारण, वगैरे प्रश्नांचें विवेचन या दोन्ही शास्त्रांवरील ग्रंथांत करावें लागतें. तसेंच समाजाच्या आर्थिक परिस्थितीचा, त्याच्या राजकीय

संस्थांवर पुष्कळच परिणाम झालेला दिसून येतो. उदाहरणार्थ, केवळ शिकारीवर उदरनिर्वाह करून एकसारखीं स्थलांतरें करीत फिरणाऱ्या रानटी टोळ्यांची राज्यव्यवस्था, एकाच भूप्रदेशावर नुकत्याच स्थिर झालेल्या व मुख्यतः शेतकीनेंच उदरंभरण करणाऱ्या प्राथमिक समाजाची राज्यव्यवस्था, आणि आधुनिक यंत्रसामुग्रीच्या साह्यानें मोठमोठे कारखाने स्थापन करून अवाढव्य व्यापार करणाऱ्या अर्वाचीन पाश्चात्य राष्ट्रांतील राज्यव्यवस्था, यांच्यातील अंतर पाहणाऱ्यास समाजाच्या आर्थिक स्थितीचे त्यांच्या राजकीय स्थितीवर कसे परिणाम होतात, हें सहज समजतें. सारांश, राजनीति व अर्थशास्त्र यांचा फार निकट संबंध असून त्यांतील कांहीं विषय दोहोंना सामान्य असे आहेत. तथापि हीं दोन्हीं शास्त्रें अगदीं भिन्न आहेत, हें विसरतां कामा नये. एकांत समाजांतील राजकीय संस्थांच्या उत्पत्ति, स्थिति, व अभिवृद्धी-संबंधीं विचार केलेला असतो व दुसऱ्यांत त्याच्या आर्थिक संस्थांचा विचार करावा लागतो.

राजनीतिशास्त्रांला ऐतिहासिक ज्ञानाचीही बरीच गरज लागते. कांहीं ग्रंथकारांना असें वाटतें कीं, समाजाच्या प्रस्तत स्थितींत कोणत्या शासनसंस्था त्यास हितावह होण्याचा संभव आहे व कोणत्या संस्थेचे

राजनीति व इतिहास.

काय परिणाम होतात, हें ठरविण्यास ऐतिहासिक ज्ञानाचा फारसा उपयोग नाहीं. नीतिशास्त्राच्या साहाय्यानें मनुष्यमात्राचें ध्येय ठरविलें व मानसशास्त्राच्या अध्ययनानें मनुष्यस्वभावाचें ज्ञान करून घेतलें म्हणजे केवळ तर्कबळानें, सर्वोत्तम शासनसंस्था कशा असाव्यात हें ठरवितां येईल, अशी या लोकांची समजूत आहे. परंतु रसायनादि शास्त्रांत ज्याप्रमाणें तर्काला प्रयोगांचें

साहाय्य घ्यावें लागतें, अगर ज्योतिषशास्त्रांत गणिताला निरीक्षणाची जोड द्यावी लागते, किंवा अध्यात्मशास्त्रांत कोरड्या तत्वज्ञानाला साक्षात्काररुपी विशिष्ट अनुभवांचा आधार घ्यावा लागतो, त्याचप्रमाणें राजनीतिशास्त्राला राजकीय संस्थांच्या इतिहासाचें व उत्क्रांतीचें ज्ञान अवश्य लागतें, असें आतां सर्व विद्वानांनीं ठरविलें आहे. समाजांतील कोणत्याही संस्थांचें प्रस्तुत स्वरूप व त्यांत भविष्यकाळीं होणारें रूपांतर यांचें पूर्ण ज्ञान होण्यास त्या संस्थेची उत्पत्ति व इतिहास हीं समजावीं लागतात; तसेंच मनुष्यस्वभाव समजण्यासही ऐतिहासिक ज्ञानाची जरूरी लागते, व मनुष्यस्वभावाचें ज्ञान झाल्याखेरीज राजनीतीचें एक क्षणभरही चालणार नाहीं. इतिहासाचें अध्ययन म्हणजे मनुष्यमात्रांच्या सामाजिक प्रयोगांचें व अनुभवांचें निरीक्षण आहे, व त्यापासून मानवी स्वभावाचें व कर्तृत्वशक्तीचें जितकें ज्ञान होणें शक्य आहे तितकें इतर कशानेंही होणें शक्य नाहीं. सरजॉन सीले यांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं, राजनीतिशास्त्ररूपी वृक्षाचीं मुळें इतिहासाच्या भूमींत रुजलेलीं आहेत व राजनीतिशास्त्र हें ऐतिहासिक ज्ञानवृक्षाचें फळ आहे, तात्पर्य प्राणिशास्त्रांत ज्याप्रमाणें निरनिराळ्या जीवकोटींच्या उत्क्रांतींचा विचार अलीकडे केला जातो, त्याचप्रमाणें राजनीतिशास्त्रांत राज्यांच्या ऐतिहासिक रुपांतराची परंपरा लावून त्याच्यांतील कार्यकारण भावाचें विवेचन करावयाचा परिपाठ आहे. या पुस्तकाच्या तीन भागापैकीं पहिल्या भागांत याच विषयाची माहिती दिली असल्यामुळें त्या भागांस ऐतिहासिक हें नांव आम्हीं दिलेलें आहे.

ऐतिहासिक पद्धति व राजकीय दैववाद.

राजकीय संस्थांच्या ऐतिहासिक रूपान्तराचा ज्यांनीं अभ्यास केलेला नाहीं त्यांना त्या संस्था त्रिकालाबाधित आहेत किंवा एखाद्या यंत्राप्रमाणं त्या वाटेल त्या सांच्याच्या हव्या तेव्हां नवीन बनवितां येतील, असे भ्रम होण्याचा संभव असतो. असले भ्रम नाहींसे करतांना राजकीय संस्था या एखाद्या वृक्षाप्रमाणें एकसारख्या वाढत असतात, त्यांच्या वाढीचे व रूपांतराचे विशिष्ट नियम आहेत, व त्यांत मनुष्यांनीं वाटेल तशी ढवळाढवळ करणें हितावह

नाहीं, अशी कल्पना निघाली. परंतु ही कल्पनाही पूर्णपणें निर्दोष नाहीं. समाजांतील राजकीय संस्था एखाद्या जमिनींत टाकलेल्या वृक्षाच्या बीजाप्रमाणें आपोआप वाढत जातात, असें समजणें; हें केवळ तर्कवश होऊन राजकीय संस्थांची अगदीं नवी इमारत उठविण्यास उद्युक्त होण्याइतकेंच हास्यास्पद आहे. राजकीय संस्थांची उत्पत्ति व अभिवृद्धि पुष्कळ अंशीं नकळत होत असते आणि त्यांचीं पाळें मुळें त्या समाजांतील लोकांच्या मनोवृत्तींत खोल रुजलेलीं असल्यामुळें त्यांत वाटेल तेव्हां हवेतसे अविचारानें फेरफार करणें इष्ट नाहीं, या गोष्टी खऱ्या असल्या, तरी राजकीय संस्थांत लोक हेतुपुरःसर सुधारणा करीत आलेले आहेत व त्यांना इष्ट वाटेल तें स्वरूप देण्याचें यापुढें ही ते प्रयत्न करीत राहाणार, हें-ही तितकेंच खरें आहे. केवळ बाह्यपरिस्थितीवर अवलंबून राहून कांहीं उद्योग न करतां राजकीय संस्थांच्या उत्क्रांतीची अपेक्षा करणें म्हणजे दैववादाचा आश्रय करण्यासारखेंच विघातक आहे. दैववाद हा धार्मिक उन्नतीप्रमाणेंच राजकीय उन्नतीला विघातक झाल्याशिवाय राहत नाहीं. म्हणूनच महाभारतासारख्या ग्रंथांत राजधर्माचें विवेचन करतांना ' पौरुषं हि परं मन्ये ' म्हणजे दैवापेक्षां पौरुष श्रेष्ठ आहे किंवा परिस्थितीपेक्षा प्रयत्न बलवान आहे असा उपदेश केलेला दिसून येतो. तसेंच " कालो वा कारणं राज्ञः । राजा वा कालकारणं " असा प्रश्न उपस्थित करून "राजा कालस्य कारणं" असा निर्णय दिलेला आहे, त्यांतीलही मर्म हेंच आहे. मात्र कोणत्याही लोकांचें, आपल्या राजकीय संस्थांत सुधारणा करण्याचें सामर्थ्य पुष्कळ मर्यादित असतें परंतु या मर्यादित शक्तिचा सदुपयोग करून ती वाढविणें हें प्रत्येक समाजाचें कर्तव्य आहे.

ऐतिहासिक विचारपद्धतीचा आश्रय करणाऱ्यांनीं आणखी एक मुद्दा ध्यानांत ठेवला पाहिजे. इतिहासावरून आपणास कोणत्या

संस्थेचे काय परिणाम होतात, आणि तिचें रूपान्तर कसकसें होत आलें आहे, हें समजतें, परंतु मनुष्यमात्राच्या हिताच्या दृष्टीनें कोणते परिणाम इष्ट व कोणतें अनिष्ट, हें आपणांस इतिहास सांगूं शकत नाहीं. उदाहरणार्थ एखाद्या सामाजिक संस्थेमुळें लोकांतील आर्थिक विषमता वाढत जाते किंवा एकाद्या संस्थेंमुळें ती कमी होत जाते, एवढेंच फार तर इतिहास सांगू शकेल; परंतु यापैकीं इष्ट सामाजिक स्थिति कोणती हें तर्कानेंच ठरवावें लागतें. मनुष्यमात्राचें ध्येय कोणतें असावें, हें ठरविण्याचें कार्य इतिहास करूं शकत नाहीं. राजकीय संस्थांच्या उत्क्रांतीचें पर्यालोचन करून त्यांना पुढें कसें स्वरूप प्राप्त होईल याची सामान्य रूपरेषा इतिहासज्ञांस आखतां आली, तरी मानवी ध्येयाच्या दृष्टीनें कोणत्याही संस्थेच्या सामाजिक परिणामांची छाननी करून तिची इष्टानिष्टता ठरविणें किंवा तींत इष्ट ते फेरफार सुचविणें हें काम तत्वज्ञांचें आहे. हें काम करतांना धर्म किंवा नीतिशास्त्राच्या ज्ञानाचें साहाय्य घेणें जरूर असतें. यावरून राजनीतीशास्त्राला ऐतिहासिक ज्ञानाबरोबर तात्विक विवेचनशक्तीचीही गरज आहे असें दिसून येईल. किंबहुना प्रचलित शासनसंस्थांचें गुणदोष विवेचन करतांना व त्यांत सुधारणा सुचवितांना ऐतिहासिक ज्ञानापेक्षां तात्विक विवेचनशक्तीचाच अधिक उपयोग करावा लागतो. शिवाय ऐतिहासिक ज्ञानही फार अपुरें व संदिग्ध असें असतें आणि ऐतिहासिक काळांतील परिस्थितींत व प्रस्तुत परिस्थितींत जमीन अस्मानाइतकें अंतर असल्यामुळें ऐतिहासिक ज्ञानाच्या आधारावर राजकीय संस्थांच्या भावी स्थितींसंबंधीं अनुमानें बांधतांना फारच सावधगिरी राखावी लागते. ऐतिहासिक निरीक्षणाच्या साह्यानें राजकीय संस्थांच्या भावी स्वरूपांबद्दल बांधतां येणारीं अनुमानें अगदीं सामान्य व व्यापक स्वरूपाचीं असतात.

ऐतिहासिक ज्ञान व तात्विक विवेचन.

उदाहरणार्थ गेल्या शें दोनशें वर्षांतील जगाच्या राजकीय घडामोडींचा अभ्यास करणाऱ्यास पुढील शेंपन्नास वर्षे तरी सर्व देशांतील राजकीय संस्थांचीं लोकसत्तेकडे प्रवृत्ति राहील असें सामान्य अनुमान करतां येईल. परंतु या लोकसत्ताक संस्थाचे अनेक प्रकार आहेत. निरनिराळ्या देशांत त्यांचीं निरनिराळीं स्वरूपें दृगोचर होतात व बाह्यतः एकाच स्वरूपाच्या संस्थाचे व्यवहारांत प्रत्यक्ष अनुभवास येणारे परिणामही प्रत्येक देशांत भिन्न भिन्न दिसून येत असतात. याकरितां कोणत्याही चालू संस्थेचा सरसनीरसपणा ठरवून त्यांत सुधारणा सुचविण्याचें कार्य केवळ तर्कानेंच करावें लागतें. तथापि या कार्यांतही ऐतिहासिक अनुभवांचा मुळींच उपयोग होत नाहीं, असें समजूं नये. रोमन किंवा ग्रीक लोकांच्या छोट्या लोकसत्ताक राज्यांच्या अनुभवांवरून हल्लींच्या प्रातिनिक लोकसत्ताक संस्थाच्या भवितव्यतेसंबंधींही कांहीं अनुमानें तत्वज्ञ लोक बसवीत असतात. मध्ययुगांतील व्यापारी किंवा औद्योगिक संघाच्या कल्पनेवरून हल्लींच्या काळींही तसल्या संघसंस्थांचें अधिक शुद्ध स्वरूपांत पुनरुज्जीवन करावें असें प्रतिपादन करणारा एक संघनिष्ठ समाजसत्तावादी (Guild Socialists) पंथ अस्तित्वांत आलेला आहे. मात्र ऐतिहासिक अनुभवाचा असा उपयोग करतांना परिस्थितिभेदाकडे पूर्ण लक्ष दिलें पाहिजे, हें विसरतां कामा नये.

येथपर्यंतच्या विवेचनावरून राजनीतिशास्त्र व नीतिशास्त्र यांचाही बराच संबंध येतो, हें वाचकांच्या ध्यानांत आलेंच असेल. मनुष्यमात्राचें ध्येय निश्चित करणें हें नीतिशास्त्राचें कार्य आहे व त्या ध्येयाचा कोणत्याही सामाजिक

राजनीति व नीति शास्त्र.

संस्थेशीं प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संबंध येणार हें उघड आहे. आपल्या इकडे धर्म या शब्दानें सर्व नैतिक कर्तव्यांचा उल्लेख केला जातो. राजधर्म, प्रजाधर्म मानमधर्म, कुलधर्म वगैरे शब्दप्रयोगांत धर्म याचा नैतिक कर्तव्य या अर्थानें उपयोग करण्यां-

त येतो. अथात् राजनीतिशास्त्र हें धर्माचें एक अंग होऊं शकतें. धर्माला राज्याची व राज्याला धर्माची जरूरी आहे ही गोष्ट पूर्वीपासून आपल्या इकडे माहीत आहे. लोकांच्या धार्मिक विचारांचें प्रतिबिंब त्यांच्या राजकीय संस्थांवर पडल्याशिवाय रहात नाहीं. तसेंच राजकीय संस्थांचे परिणाम लोकांच्या धार्मिक विचारावर घडत असतात. धर्मामध्यें अभ्युदय आणि निश्रेयस या दोहोंचाही समावेश होत असतो; यांपैकीं ऐहिक अभ्युदय राजकीय संस्थांवर अवलंबून आहे हें तर उघडच आहे परंतु निश्रेयस प्राप्तीच्या कामींही राजकीय सुस्थितिचा अप्रत्यक्ष उपयोग होत असतो, म्हणून शुक्रनीतींत ‘नीतिशास्त्र’ [म्ह० राजनीति शास्त्र] मोक्षप्रद आहे असेंही म्हटलें आहे. तथापि या म्हणजे निश्रेयसप्राप्तीच्या कामीं राजकीय संस्थांचा केवळ अनुकूल परिस्थिति निर्माण करण्याचा अप्रत्यक्ष उपयोग होत असतो. राजसत्तेची म्हणजे शासनसंस्थाची सर्व मदार दंडशक्तीवर असते व म्हणूनच राजनीतीला दंडनीति असें नांव प्राप्त झालें होतें; परंतु निश्रेयसप्राप्तीच्या कामीं दंडशक्तीचा प्रत्यक्ष कांहींच उपयोग होत नाहीं, इतकेंच नाहीं तर अशा कामीं त्या शक्तीचा फाजील उपयोग केल्यास विपरीत परिणाम होण्याचाच फार संभव असतो. याकरितां राजसत्तेनें केवळ लौकिक अभ्युदयाच्या दृष्टीनें दंडशक्तीच्या जोरावर मनुष्यांच्या बाह्य वर्तनाचें अवश्य तितकें नियमन करावें आणि कोणाच्या निश्रेयसप्राप्तीच्या आड येणाऱ्या दुष्टाचें निर्दालन करावें. व अध्यात्मिक व नैतिक उन्नतीच्या कामीं व्यक्तींना व धर्मपीठांना पूर्ण स्वातंत्र्य द्यावें, हें तत्व आतां सर्वमान्य झालेलें आहे. याच्या उलट धर्मपीठांनींही लोकांच्या आध्यात्मिक उन्नतीच्या आपल्या कार्यांत दंडशक्तीचा उपयोग करूं नये असा निर्णय आतां झालेला आहे. तथापि धर्मसत्ता व राजसत्ता या परस्परावलंबी असतात हें ध्यानांत ठेविलें

पाहिजे. दुराचारी लोकांचें नियमन करण्यास राजदंड नेहमीं सज्ज नसेल, किंवा " आर्तत्राणाय वः शस्त्रं न प्रहर्तुं अनागासि " हा दुष्यंत राजाला केलेला धर्मोपदेश राजसत्तेकडून उपेक्षिला जाईल, तर धर्मसत्ता निरुपयोगी होऊन लोकांना मोक्षधर्माचेंही अनुसरण करतां येणार नाहीं. तसेंच धार्मिक किंवा नैतिक बंधनांकडे दुर्लक्ष करून लोक स्वैर वर्तन करूं लागल्यास एकट्या दंडशक्तीच्या जोरावर देशांत शांतता व सुव्यवस्था राखणें राजसत्तेला अशक्य होईल. त्याचप्रमाणें देशांतील शासनसंस्थांचें स्वरूपही लोकांच्या धार्मिक व नैतिक विचारांतील फरकाबरोबर बदलत जातें.

धर्म किंवा नीति यांच्या प्रमाणेंच मानसशास्त्राचा राजनीतीशीं व इतर सामाजिक शास्त्रांशीं संबंध येतो. मानसशास्त्राच्या ज्या भागाचा सामाजिक शास्त्रांशीं संबंध येतो, त्याला सामाजिक मानसशास्त्र हें नांव देऊन त्यावर कांहीं युरोपिअन ग्रंथकारांनीं स्वतंत्र ग्रंथ लिहिलेले आहेत. या विषयांवर मॅक्डूगल यांचा " सोशल सायकॉलजी " हा ग्रंथ प्रसिद्ध आहे. राज्य ही मानवी संस्था असल्यामुळें मनुष्यस्वभावाच्या ज्ञानाखेरीज तिचें शास्त्रीय विवेचन करणें शक्य नाहीं. पुराणांत वर्णन केलेल्या कृतयुगांतील समाजाप्रमाणें सर्व लोक स्वभावतः साधुवृत्तीचे असतील तर राजदंडाच्या संस्थेची आवश्यकताच उरणार नाहीं; किंवा मनुष्यमात्राला स्वातंत्र्याची मुळीच आवड नसती आणि पाळीव जनावरांप्रमाणें दुसऱ्यांच्या गुलामगिरींत निरंतर राहण्यास सर्व लोक तयार असते तर लोकसत्ताक राज्यपद्धतीचा उद्भव झालाच नसता व राष्ट्रीय स्वातंत्र्यार्थ घनघोर युद्धप्रसंग घडून आले नसते. या दृष्टीनें थोडा विचार केला असतां

राजनीति व मानसशास्त्र.

राजकीय संस्थांचा विचार करितांना मनुष्यस्वभावाचें ज्ञान कसें अवश्य असतें, हें दिसून येईल.

मनुष्य स्वभाव हा अत्यंत गूढ विषय आहे. इतिहास, मानसशास्त्र आणि व्यवहारानिरीक्षण यांत कितीही प्रगति झाली तरी मनुष्यस्वभावाचा पूर्णपणें थांग लागणें शक्य नाहीं. हें जरी खरें असलें तरी

राजनीति व भौतिकशास्त्रें.

त्यासंबंधीं जेवढें ज्ञान होणें शक्य आहे तितकें करून घेऊन मनुष्यांनीं आपले व्यवहार चालू ठेविले पाहिजेत. भौतिकशास्त्रांत जडसृष्टि, प्राणी व वनस्पति यांच्या गुणधर्मांचा विचार करावा लागतो; तसा राजनीति, अर्थशास्त्र वगैरे सामाजिक शास्त्रांत मनुष्यांच्या स्वभावधर्मांचा विचार करावा लागतो. परंतु जड पदार्थांच्या गुणधर्मासंबंधीं जशीं निश्चित विधानेंच व व्यापक सिद्धांत बसवितां येतात, तसे निश्चित व व्यापक सिद्धांत मानवी व्यवहारासंबंधीं कधींच करतां येणार नाहींत. पहिल्या सिद्धांतासंबंधीं मतभेदास जितका अवकाश असतो त्याहून अधिक अवकाश मानवी स्वभावासंबंधींच्या सिद्धांतांत मिळूं शकतो. यामुळें भौतिकशास्त्रांइतकें निश्चित स्वरूप कोणत्याही सामाजिक शास्त्राला प्राप्त होणें शक्य नाहीं. तसेंच भौतिकशास्त्रांप्रमाणें सामाजिक शास्त्रांत प्रयोग करून पाहण्याची संधी मिळूं शकत नाहीं. प्रयागापासुन प्राप्त होणाऱ्या ज्ञानाची तृष्णा ऐतिहासिक घडामोडीच्या सूक्ष्म निरीक्षणानें भागवून घ्यावी लागते. इतकें करूनही जडपदार्थांप्रमाणें सर्व समाज सारख्या परिस्थितींत सारखेंच वर्तन करतील असें निश्चयानें कोणासही सांगतां येत नाहीं. या सर्व गोष्टी खऱ्या असल्या आणि ‘ व्यक्ति तितक्या प्रकृति ’ या म्हणींत सूचित केल्याप्रमाणें मनुष्यस्वभावांत कितीही विविधता असली तरी चाणाक्ष व दीर्घोद्योगी मनुष्यांना व्यवहाराला अवश्य तितकें मनुष्य-

स्वभावाचें ज्ञान करून घेणें अगदींच अशक्य नाहीं. तसें असतें तर आपलें कोणतेंच कार्य तडीस गेलें नसतें व कोणताच व्यवहार करणें आपणास शक्य झालें नसतें. त्यांतून अर्थशास्त्र किंवा राजनीति यांना व्यक्तिश: मनुष्यांच्या स्वभावाचा विचार करावयाचा नसून मोठमोठ्या समुदायांचें स्थूलमानानें कसें वर्तन होतें याचाच त्यांना विचार लागतो. वैयक्तिक स्वभावांत जितकी विविधता दृष्टीस पडते तितकी समूहांच्या वर्तनांत दिसून येत नाहीं शिवाय वरवर पाहणारांस मनुष्या-मनुष्याच्या वर्तनांत जितकें अंतर भासतें तितकें सूक्ष्म दृष्टीनें विचार करणाऱ्याच्या अनुभवास येत नाहीं. तात्पर्य, सामाजिक शास्त्रांतील सिद्धांतांना भौतिकशास्त्रांतील सिद्धांताइतकें निश्चित स्वरूप येणें शक्य नसलें तरी त्या विषयांतील ज्ञान शास्त्र या पदवीस पात्र होण्याइतकें निश्चित खास आहे. इतर शास्त्रांप्रमाणें या शास्त्रांतही तज्ज्ञ लोकांत पुष्कळ मतभेत आहेत, तरी सव तज्ज्ञांना मान्य असलेल्या अशा सिद्धांतांची संख्याही या शास्त्रांत कांहीं कमी नाहीं, व त्यांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. ज्यांना आपल्या देशांतील राजकीय संस्थांचे गुणदोषविवेचन करून त्यांत सुधारणा घडवून आणाव्या असें वाटत असेल त्यांनीं या विषयांतील तज्ज्ञांच्या मताचा अभ्यास अवश्य केला पाहिजे.

राजनीतीच्या अध्ययनाची अवश्यकता.

एकेकाळीं राजनीतिशास्त्राचा अभ्यास सामान्य लोकांनीं करण्याची कांहीं गरज नाहीं अशी आपल्याइकडे व पाश्चात्य राष्ट्रांतही कल्पना होती. त्या वेळीं राजसत्ता लोकांच्या हातीं नसून एकाद्या व्यक्तिच्या किंवा वर्गाच्या हातीं असे; परंतु आतां ही स्थिति उरलेली नाहीं. प्राचीन काळीं युरोपांत व भरतखंडांतही निरनिराळ्या प्रमाणांत लोकसत्ता नांदत होती; परंतु भरतखंडात मौर्य साम्राज्य झाल्यापासून व युरोपांत मॅसिडोनियन व रोमन साम्राज्य

झाल्या पासून अगदीं अर्वाचीन काळापर्यंत लोकसत्तेचा पूर्ण लोप झाला होता. त्यानें या वेळीं राजनीतिशास्त्र फक्त राजाच्याच उपयोगाचें आहे व त्यानेंच किंवा त्याच्या मंत्र्यांनींच त्याचें अध्ययन करावें असें लोकांना वाटत असे. आतां फिरून लोकसत्तेचा काळ आलेला आहे व लोकसत्ताक संस्था उत्तम प्रकारें चालण्यास प्रत्येक सुशिक्षित नागरिकानें राजकीय संस्थावर एक सारखी देखरेख ठेवण्याची तसदी घेतलीच पाहिजे. लोकसत्ताक संस्था चांगल्या प्रकारें चालाव्यात असें वाटत असल्यास त्याबद्दल प्रामाणिक नागरिकांनीं आपल्या दक्षतेची किंमत दिली पाहिजे, अशा अर्थाचें एक डायसी याचें वाक्य आहे. (Perpetual watchfulness on the part of all honest citizens is the unavoidable price to be paid for the maintenance of sound popular government. (Introduction to the study of the Law of the Constitution. XCIX)

येथें राजनीतिशास्त्रावर एक आरोप घेण्यांत येतो त्याचें निवारण करण्यास हरकत नाहीं. कांहीं लोकांचें असें मत आहे कीं, देशांतील राजकीय संस्था कोणत्याही स्वरूपाच्या असल्या तरी, खरी राजसत्ता समाजांतील प्रबल वर्गाच्याच हातीं नेहेमीं असते; मग उगीच राजकीय संस्थांच्या सुधारणांचा उपद्व्याप करण्यापासून काय फायदा ? हा युक्तिवाद म्हणजे मागें एके ठिकाणीं वर्णन केलेल्या राजकीय दैववादाचाच एक प्रकार आहे. या मतांत अगदींच तथ्य नाहीं किंवा या मतापासून राजनीतिशास्त्रज्ञांस कांहींच बोध घेतां येणार नाहीं, असें आम्ही म्हणत नाहीं; तथापि तें मत प्रथमदर्शनीं वाटलें तितकें बरोबर नाहीं. प्रथमतः ही गोष्ट ध्यानांत घेतली पाहिजे कीं, समाजांत कोणता वर्ग प्रबल असावयाचा हें पुष्कळ वेळां देशाच्या राज्यघटनेवरही अवलंबून असतें. आज जो वर्ग

राजनीतिशास्त्रावरील एक आक्षेप व त्याला उत्तर.

दुर्बल दिसतो त्यालाच राजसत्ता मिळाल्यास तोच उद्या प्रबल होऊं शकतो. तसेंच देशांतील प्रबल वर्ग म्हणजे तरी काय, याचाही निर्णय करूं गेल्यास बरोबर लागत नाहीं. केवळ संपत्तीनें किंवा केवळ लोकसंख्येनें कोणताही वर्ग प्रबल होऊं शकत नाहीं.

संपत्ति व बुद्धिमत्ता या दोहोंचा संयोग झाल्यास एखादा वर्ग प्रबल होऊं शकतो, हें खरें आहे, परंतु असा संयोग नेहमींच दृष्टोत्पत्तीस येतो असें नाहीं. शिवाय समाजांतील नीतिमान् व परोपकारी लोकांचाही वर्ग दुर्बल असतो असें म्हणतां येत नाहीं. असामान्य नैतिक धैर्याच्या महात्म्यांनीं दुर्बल व भेकड गणलेल्या सामान्य लोकांत अलौकिक सामर्थ्य उत्पन्न करून मोठमोठ्या प्रबल राजांचीं सिंहासनें हादरून सोडल्याचीं उदाहरणें जगाच्या इतिहासांत कांहीं थोडीं नाहींत. रशियन राज्यक्रांति होण्याच्या पूर्वीं रशियांत लेनिनच्या अनुयायांचा वर्ग प्रबल आहे असें कोणी तरी म्हटलें असतें काय ? असो. हें खरें असलें तरी असले सामाजिक किंवा राजकीय क्रांतीचे प्रसंग सोडून दिल्यास सामान्य प्रसंगीं समाजांतील एखादा वर्ग बुद्धिबळानें व द्रव्यबळानें इतरांपेक्षां फार प्रबल झाल्यास कोणत्याही राजकीय संस्थांखालीं तो वर्ग एक प्रकारची राजसत्ता उपभोगूं शकतो, हें मत बहुतांशीं खरें आहे. परंतु यावरून लोकांनीं राजकीय संस्था सुधारण्याचे प्रयत्न करूं नयेत असें अनुमान निघत नसून समाजांतील वर्गांत बौद्धिक व आर्थिक वैष्यम्य फार वाढूं न देण्यासाठीं त्यांच्या राजकीय सुधारणेबरोबर इतर अंगांचीही सुधारणा झाली पाहिजे असें अनुमान निघतें. पाश्चात्य राष्ट्रांत आज कारखानदारांचा व जमीनदारांचा वर्ग फारच प्रबल झाल्यामुळें त्या देशांतील लोकांना राजकीय लोकसत्तेचा खरा लाभ मिळत नाहीं अशी ओरड सर्वत्र ऐकूं येत आहे. या आपत्तीचें निवारण करण्यासाठीं कोणकोणत्या राजकीय सुधारणा अमलांत आणल्या पाहिजेत याची चर्चा पुढें योग्य स्थलीं करण्यांत येईलच; परंतु यासंबंधीं येथें एवढें सांगून ठेवतां येईल कीं, या ओरडीवरून राजकीय सुधारणा निष्फल आहेत असा निष्कर्ष न काढतां, राजकीय सुधारणांना इतर सामाजिक सुधारणांची जोड देणें अवश्य आहे,

एवढाच निष्कर्ष काढणें सयुक्तिक आहे. ज्या तत्वांवर समाजांतील राजकीय संस्थांची उभारणी करावयाची असेल त्या तत्वांचा प्रवेश समाजाच्या इतर सर्व व्यवहारांत झाला असेल तरच त्या संस्था त्या समाजांत दृढमूल होतील हा सिद्धांत प्रत्येकानें ध्यानांत घेतला पाहिजे. विषयप्रतिपादनाच्या किंवा अध्ययनाच्या सोयीकरितां समाजाच्या निरनिराळ्या अंगाचा पृथकपणें विचार केला तरी एका पुरुषाच्या अवयवांप्रमाणें त्यांच्या स्थितीचा परिणाम एकमेकांच्या स्थितीवर झाल्याशिवाय कधींही रहात नाहीं.

आतां या शास्त्राच्या किंवा पुस्तकाच्या नांवासंबंधीं दोन शब्द लिहून हे प्रकरण संपवूं. राजनीतिशास्त्रास प्राचीन संस्कृत वाङ्मयांत ‘ नीतिशास्त्र ’ ‘ दंडनीति ’ व ‘ अर्थशास्त्र ’ असे शब्द योजिलेले असतात.

राजनीति या शब्दाची सयुक्तता

त्यांपैकीं नीतिशास्त्र व अर्थशास्त्र हे शब्द हल्लीं इंग्रजींत ज्यांना Ethics व Economics असें म्हणतात, त्याअर्थीं योजिण्याचा प्रघात पडलेला आहे. ‘ दंडनीति ’ हा शब्द अगदींच उपयोगांतून गेलेला आहे. याकरितां अलीकडे मराठींत रूढ असलेला राजनीतिशास्त्र हाच शब्द आम्हीं कायम केलेला आहे. यावर एकच आक्षेप येण्यासारखा आहे. तो म्हणजे ‘ राजनीति ’ या शब्दावरून केवळ राजसत्താक राज्यपद्धतीचाच बोध होतो, परंतु हल्लीं या शास्त्रांत प्रामुख्यानें लोकसत्ताक संस्थांचाच विचार करावा लागतो. या आक्षेपास दोन किंवा तीन प्रकारें उडवून लावतां येईल. पहीली गोष्ट अशी कीं, अशा कामीं शब्दाच्या धात्वर्थापेक्षां किंवा व्युत्पत्तीपेक्षां रूढार्थाकडेच जास्त लक्ष देण्याचा सार्वत्रिक प्रघात आहे. याच शास्त्राचें इंग्रजी नांव ‘ पॉलिटिक्स ’ असें आहे व तो शब्द ‘ पोलिस ’

म्हणजे नगर या शद्बापासून झाला आहे. प्राचीन काळीं ग्रीक राज्यें एकेका नगराचींच झालेलीं होतीं, त्या वेळचा हा शद्ब आहे. पण आज ह्या शास्त्रांत ब्रिटिश साम्राज्यासारख्या जगडव्याळ राज्याचाही विचार करण्यास कोणी मागें पुढें पहात नाहीं. शिवाय राजनीति हा शद्ब कायम करण्यास आणखी एक कारण देतां येईल या शास्त्रांत ' राज्य ' ' राजकीय ' ' राजसत्ता ' ' राजदंड ' ' राजकारण ' वगैरें जे अनेक शब्द येतात, तेही ' राजा ' या शद्बापासूनच झालेले आहेत. राजनीति या ऐवजीं ' शासनशास्त्र ' किंवा दुसरा एखादा प्रतिशब्द योजिला तरी वरील सर्व शद्बांना असले प्रतिशद्ब शोधून काढणें अशक्य नसलें, तरी सुलभ प्रतिपादनाच्या दृष्टीनें अनिष्ट आहे. तेव्हां ' राजा ' शब्दापासून झालेले इतर शद्ब जर कायम ठेवावयाचे तर ' राजनीतिशास्त्र ' हा शद्ब तरी कां वगळावा ? परंतु हा शब्द कायम ठेवण्यास आणखीही एक बलवत्तर कारण देतां येण्याजोगें आहे. तें म्हणजे "राजा" हा शद्ब प्राचीन वाङ्मयांत केवळ आनुवंशिक राष्ट्राधिपतीसच लावलेला नसून तोच शब्द लोकनियुक्त राष्ट्राधिपास किंवा राष्ट्राध्यक्षासही लावलेला आहे, असें अर्वाचीन विद्वानांचें मत आहे. हें मत जेव्हां प्रस्तुत लेखकाच्या वाचनांत आलें, तेव्हां " राजनीति " हा शब्द कायम करण्याचा त्याचा निश्चयही कायम झाला.

---

१ शाक्यमुनि गौतम बुद्ध ज्या राज्यांत जन्मला तें राज्य लोकशाहीचें असून तेथील राष्ट्राध्यक्षाला ' राजा ' असें म्हणत असत. तसेंच यौधेयांच्या राज्यातील " महाराजा " हा देखील लोकनियुक्तच होता.

(See the Political institution and theories of the Hindus. P. 140, 146. by B. K. Sarkar.)

प्रकरण २ रें.

राज्य म्हणजे काय ?

असतां प्रतिषेधश्च सतां च परिपालनम् ।
एष राज्ञां परो धर्मः समरे चापलायनम् ॥

शांतिपर्व म. भा.

मागच्या प्रकरणांत राजनीतिशास्त्र हें राज्यासंबंधीं शास्त्र आहे, असें सांगितलें. आतां राज्य कशाला म्हणावें, त्याचें मुख्य कार्य कोणतें, त्याचीं अवश्य लक्षणें कोणतीं व त्याचे प्रकार किती, या प्रश्नांचा विचार करावयाचा आहे. राज्य ही एक मानवी संस्था असून ती एका विशिष्ट प्रकारें एक विशिष्ट कार्य करीत असते. या संस्थेची व्याख्या करतांना तिच्या विशिष्ट कार्याकडे व विशिष्ट साधनाकडे लक्ष्य देणें अवश्य आहे. असतांचा प्रतिषेध, सतांचा प्रतिपाल आणि युद्धांतून पळून न जाणें, हा राजांचा मुख्य धर्म आहे, असें महाभारतांत सांगितलें आहे, आणि त्यावरून राज्याची व्याख्या तयार करण्यास आपणांस पुष्कळ मदत मिळूं शकते. धर्म्ययुद्ध हें एक क्षत्रियाचें श्रेयःसाधन आहे असें गीतेंत भगवान् श्रीकृष्णांनीं सांगितलेलें आहे. (धर्म्याद्धि युद्धात् श्रेयोऽन्यत् क्षत्रियस्य न विद्यते) क्षत्रियधर्म किंवा राजधर्म यासंबंधींचे आपल्या प्राचीन लोकांचे विचार पाहिल्यास दंडशक्तीच्या साहायानें दुष्टांचें निवारण करून सज्जनाचा प्रतिपाल करणें, हें राजांचें मुख्य कर्तव्य आहे, असें आपणांस म्हणतां येतें. अर्वाचीन पाश्चात्य विद्वान् न्यायदान आणि युद्ध हीं राज्याचीं आद्य कर्तव्यें समजतात. न्यायदान किंवा युद्ध या दोन्हीं कार्यांत सतांचा

प्रतिपाल व असतांचा प्रतिषेध हाच हेतु असतो व दोन्ही कार्यांत दंडशक्तीचा उपयोग केलेला असतो. मात्र न्यायदानाच्या कार्यात दंडशक्तीचा उपयोग न्यायासनाच्या आडून व कायद्यांना अनुसरून केलेला असतो. तशी युद्धांत स्थिति नसते. तथापि राज्यांचें युद्ध हें अवश्य कर्तव्य मानतात, तेव्हां तें युद्ध ' धर्म्य ' असलें पाहिजे असें गृहित धरलेलें असतें. तसेंच युद्ध हेंच क्षत्रियाचें परम श्रेय आहे असें सांगतांना श्रीकृष्णांनींही ' धर्म्य ' हें विशेषण लावलेलें आहे. यावरून दंडशक्तीच्या साहाय्यानें अंतर्गत व बाह्य शत्रूंचें निवारण करून लोकांचें संरक्षण करणारी मानवी संस्था म्हणजे राज्य, आणि धर्मयुद्ध व न्यायदान हीं दोन त्या संस्थेचीं आद्य कर्तव्यें आहेत असें म्हणतां येईल. हीं आद्य कर्तव्यें पार पाडण्यासाठीं सरकार या नांवाची संस्था प्रत्येक राज्यांत दिसून येते व या संस्थेमार्फत किंवा राज्ययंत्रामार्फत न्यायदान व

राज्यांचीं आद्य कर्तव्यें.

धर्मयुद्ध याखेरीज अनेक लोकोपयोगी कार्यें होत असलेलीं आपण पाहतों; परंतु तीं इतर कार्यें राज्याचीं आद्य कर्तव्यें होऊं शकत नाहींत. तीं सर्व कार्यें करण्याचें एखाद्या राज्यानें सोडून दिलें तरी त्याचें राज्य हें नांव कायम राहील, परंतु न्यायदानाचें किंवा धर्मयुद्धाचें कार्य करण्यास निरूपयोगी ठरलेल्या संस्थेस राज्य ही पदवी देतां येणारनाहीं.

वरील विवेचनावरून प्रत्येक राज्यांत सरकार व प्रजा किंवा शासित व शास्ते अशीं दोन अंगें असतात असें दिसून येईल. राज्याचें कोणतेंही कार्य करण्याकरितां एखाद्या व्यक्तीच्या किंवा व्यक्तिगणाच्या हातीं दिलेल्या सत्तेस राजसत्ता (Civil power) असें म्हणतात व हा राजसत्ता उपभोगणाऱ्या सर्व व्यक्तींना समुच्चयरूपानें सरकार अशी संज्ञा दिली जाते या सरकारमार्फतच राज्याचे

राजसत्ता, सरकार व प्रजा.

सर्व व्यवहार चाललेले असतात. हें सरकार ज्या लोकांवर राज्य करतें म्हणजे राजसत्ता गाजावितें, ते त्या राज्यांतील प्रजाजन होत.

आतां सरकार व प्रजा यांशिवाय राज्याला आणखी कोणत्या

गोष्टीची आवश्यकता आहे तें पाहूं. सध्यां पृथ्वीवर जीं जीं प्रमुख राज्यें आहेत, त्यांच्याकडे दृष्टी फेंकल्यास प्रत्येक राज्याच्या मालकीचा असा एखादा भूप्रदेश आहे असें दिसून येतें. समाजाच्या अगदीं प्राथमिक अवस्थेंत स्वतःच्या मालकीच्या प्रदेशाची लोकांना गरज भासत नाहीं.

राज्य व देश.

कोणत्याही प्रदेशावर कायमची वसति न करणारे असे रानटी फिरते समाज अद्यापीही पृथ्वीच्या पाठीवर कोठें कोठें दृष्टीस पडतात व असल्या फिरत्या समाजांची किंवा टोळ्यांची संख्या प्राचीन काळीं फारच मोठी होती. रानांतील कंदमुळें व पशुपक्षी यांच्यावर उपजीविका करणारे व पारध करण्याशिवाय इतर कोणताही धंदा न जाणणारे असे लोक एकाच ठिकाणीं फार वेळ राहण्याची इच्छा करीत नसले तर त्यांत नवल वाटण्याचे कांहीं कारण नाहीं. पुढें दुधदुभत्याकरितां किंवा ओझीं वाहण्याकरितां गोधनाचा संचय करून गोपालवृत्तीचा किंवा धनगरवृत्तीचा अवलंब केला तरी सुद्धां स्वतःच्या देशाची कल्पना लोकांना सुचत नाहीं. कृषिविद्येचा शोध लागून मनुष्यें धनधान्यावर उपजीविका करूं लागलीं म्हणजेच त्यांना आपल्या नित्य प्रवासाचा कंटाळा येतो व ते चिरकाल एकाच प्रदेशावर राहूं लागतात धनधान्याचें महत्व व उपयोग कळूं लागला म्हणजे राज्यांना मालकीचा देश असावा असें वाटूं लागतें. शेतीच्या कलेंत बरीच प्रगति होऊन धनधान्याची समृध्दी होऊं लागली, घरें दारें, गुरें-ढोरें यांचा व्याप वाढूं लागला म्हणजे देशप्रेम, देशभक्ति, देशसेवा, देशसंरक्षण, वगैरेचा उद्भव होतो. वर वर्णन केलेल्या फिरत्या टोळ्यांना राज्य ही पदवी द्यावी किंवा नाहीं आणि त्या समाजांत शासनसंस्थांचा उद्भव झालेला असतो किंवा नाहीं, यासंबंधीं तज्ञ लोकांत अद्यापि पुष्कळ मतभेद आहे. याकरितां अर्वाचीन राजनीतिज्ञांनीं राज्याला

स्वतंत्र प्रदेश असलाच पाहिजे असें गृहित धरून वरील प्रकारच्या फिरत्या समाजांना राजनीतिशास्त्राच्या क्षेत्रांतून वगळण्याचें ठरविलें आहे. या अनुरोधानें व पाश्चात्य विद्वानांनीं राज्याच्या व्याख्या बनविलेल्या आहेत. “ कायद्यानें राहण्यासाठीं संघटित झालेले व एका विशिष्ट प्रदेशांत राहणारे, लोक म्हणजे राज्य ” अशी राज्याची व्याख्या वुड्रो विल्सन यांनीं केलेली आहे. “ एका ठराविक प्रदेशांत दंडशक्तीच्या सहाय्यानें न्याय व शांतता प्रस्थापित करण्यासाठीं स्थापत केलेला मनुष्यांचा समाज म्हणजे राज्य ” अशी सर जॉन सालमंड यांनीं राज्याची व्याख्या केली आहे. प्रसिद्ध कायदेशास्त्रज्ञ हॉलंड यानें मात्र राज्याच्या व्याख्येंत राज्याला प्रदेशाची आवश्यकता मानलेली नाहीं.

राज्याचीं अवश्य लक्षणें सांगतांना स्वातंत्र किंवा स्वतंत्र्यप्रभुत्व (Sovereignty) हें एक लक्षण सांगण्यांत येत असतें. जेथील सरकारावर दुसऱ्याचा अंमल चालूं शकतो, त्यास राज्य ही संज्ञाच देऊं नये असें बऱ्याच राजनीतिज्ञांचें मत आहे. कारण तसें केल्यास राज्याच्याच एका विभागाला राज्य हेंच नांव द्यावें लागतें. सर्व वस्तूला नांव द्यावयाचें तेंच नांव तिच्या एखाद्या विभागाला देणें सयुक्तिक नाहीं असें या लोकांना वाटतें. उदाहरणार्थ ब्रिटिश साम्राज्याला जर आपण राज्य हें नांव दिलें तर त्यांतील कानडा,

स्वतंत्र व परतंत्र राज्यें.

1 “ A state is a people organised for law within a definite territory. ,, The state P. 8 (New edition.)

2 “ It is with the territorial state that we are alone concerned, and with reference to it we may accordingly define a state as a society of men established for the maintanance of peace and justice within a determined territory by way of force. ,,

Jurisprudence by Salmond. P. 99.

आस्ट्रेलिया यासारख्या पोटविभागांना पुनः राज्य हेंच नांव देणें बरोबर नाहीं, असें हें मत आहे. सालमंड यांनीं आपल्या कायदेशास्त्रावरील पुस्तकांत हें मत खोडून काढलेलें आहे. त्यांचें म्हणणें असें कीं, सर्व वस्तूला आपण ज्या गुणधर्मामुळें एखादें नांव देतों, तेच गुणधर्म जर तिच्या विभागांत दृग्गोचर होत असले तर आपण त्या विभागासही तेंच नांव देतों. उदाहरणार्थ, दोरीच्या तुकड्याला आपण दोरी असेंच नांव देतों पण मातीच्या घटाच्या तुकड्याला घट ही संज्ञा कोणी देत नाहीं. घटाचा तुकडा घटाचे गुण दाखवित नाहीं किंवा घटाचें कार्य करीत नाहीं म्हणून आपण त्याला घट असें म्हणत नाहीं. तेंच दोरीचा तुकडा दोरीचें कार्य करतो म्हणून त्याला आपण दोरी हें नांव देतों. याच न्यायानें एखादें राज्य स्वतंत्रप्रभुत्व उपभोगित नसलें, परंतु दंडशक्तीच्या साहाय्यानें न्याय व शांतता स्थापन करण्याचें कार्य करीत असलें, तर त्यास राज्य अशी संज्ञा देण्यास कांहीं हरकत नाहीं. व्यवहाराकडे पाहिलें तरी ‘ परतंत्र राज्य ’ असा शब्दप्रयोग आपण नेहेमीं योजित असतों. बहुतेक राजनीतिज्ञ राज्यांचीं चार अवश्य लक्षणें देत असतात; तीं

स्वतंत्र राज्यांचीं चार अवश्य लक्षणें.

अशीं (१) लोक (२) देश (३)सरकार (४) स्वतंत्रप्रभुत्व. यापैकीं चौथें लक्षण अवश्य आहे असें सालमंड यांस वाटत नाहीं व तें मत बरोबर दिसतें. या मताप्रमाणें राज्यांचे स्वतंत्र राज्यें व परतंत्र राज्यें असे दोन वर्ग होतात; त्यांपैकीं फक्त पहिल्या वर्गांतील राज्यांनाच स्वतंत्रप्रभुत्व हें लक्षण लागूं पडतें.

स्वतंत्र राज्यांचे किंवा परतंत्र राज्याचे एकरूप व सांमिश्र असे पुनः दोन वर्ग करतां येतात. ज्या राज्यांचे विभाग स्वतः राज्य या पदवीस

पात्र होऊं शकतील, त्या राज्यांस संमिश्र राज्यें असें म्हणतां येईल.

राज्यांचें वर्गीकरण.(सालमंड यांच्या मताप्रमाणे)

ब्रिटिश साम्राज्य किंवा अमेरिका (अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें) हीं संमिश्र राज्यांचीं उदाहरणें आहेत; कारण कानडा, आस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका वगैरे ब्रिटिश साम्राच्याचे घटकावयव राज्यें आहेत, तशींच अमेरिकेचेही संस्थानें हे विभाग राज्येंच आहेत. या संमिश्र राज्यांचेही फिरून दोन वर्ग करतां येतात. (१) साम्राज्यें व (२) संयुक्त राज्यें. साम्राज्यांमध्यें त्यांतील एका पोटराज्याचा अंमल इतर सर्व पोटराज्यांवर चालू असतो, पण संयुक्त राज्यांत सर्व पोटराज्यांवर अंमल करणारें जें संयुक्त सरकार असतें, त्यांत सर्व पोटराज्यें भाग घेतात. ब्रिटिश साम्राज्यांतील ग्रेटब्रिटनचें सरकार स्वतःवर अंमल चालवून शिवाय साम्राज्यांतील इतर पोट राज्यावरही अंमल चालवितें, म्हणून ब्रिटिश साम्राज्य हें "साम्राज्य" आहे. अमेरिकेंतील सर्व संस्थानांवर अंमल चालविणारें संयुक्त सरकार हें कोणत्याही एका पोटविभागाचें सरकार नसून त्या सरकारांत सर्व पोटराज्यें भाग घेतात. साम्राज्यांत ज्याप्रमाणें एक विभाग दुसऱ्यांवर राज्य करतो, तसा दुसऱ्या विभागांवर राज्य करणारा एक ही विभाग संयुक्तराज्यांत असत नाहीं. हें वर्गीकरण पुढील प्रमाणें दाखवितां येईल.

- राज्यें (States)
  - एकरूप (Unitary)
  - संमिश्र (Composite)
    - साम्राज्यें (Imperial)
    - संयुक्तराज्यें (Federal)

आतां स्वतंत्र राज्यांचीं जीं चार अवश्य लक्षणें-देश, लोक,

सरकार व स्वतंत्रप्रभुत्व - यांचें थोडें सविस्तर विवेचन करूं. यांपैकीं सरकार व स्वतंत्रप्रभुत्व यांचें विवेचन या पुस्तकाच्या पुढील भागांत बरेंच येणार असल्यामुळें त्यांचा या प्रकरणांत फार विस्तार करण्याचें कारण नाहीं.

देशः— कोणत्याही राज्याचा विस्तार किती असावा यासंबंधीं कांहींच नियम सांगतां येणार नाहींत. प्राचीन ग्रीक तत्ववेत्त्यांच्या मतानें राज्यांचा विस्तार फार मोठा असू नये असें होतें; कारण मोठ्या राज्यांची व्यवस्था नीट होत नाहीं, असें त्यांना वाटे. ग्रीक लोकांच्या राज्यांचा विस्तार एकेका शहराहून फारसा मोठा नव्हता. आपल्या इकडे कौरवपांडवांच्या काळीं अशींच छोटेखानीं राज्यें असावींत. त्यांची व्याप्ती हल्लींच्या एखाद्या तालुक्यापेक्षां किंवा जिल्ह्यापेक्षां जास्त नसावी असा विद्वानांचा तर्क आहे. हल्लीं सुद्धां युरोपांत स्विट्झर्लंड, बेल्जियम, पोलंड या सारखीं अनेक छोटीं राज्यें आहेत. याच्या उलट अमेरिका, राशिया, चीन, ब्रि. साम्राज्य यां-सारखीं जगडव्याळ राज्येंही बरीच दृष्टीस पडतात. हल्लींच्या काळीं भौतिकशास्त्राच्या ज्ञानांत पुष्कळ प्रगति होऊन दळणवळणाचीं अनेक साधनें उपलब्ध झाल्यामुळें ब्रिटिश साम्राज्यासारख्या अवाढव्य राज्याची व्यवस्था उत्तम रितीनें ठेवणें शक्य झालेलें आहे. तसेंच राजनीतिशास्त्रांतील प्रगतीमुळेंही हें कार्य सुलभ झालेलें आहे.

देशाचा विस्तार

सध्याच्या काळीं लहान राज्यें अंतर्गत व्यवस्थेच्या दृष्टीनें सोयीचीं असलीं, तरी संरक्षणाच्या दृष्टीनें त्यांची फार शोचनीय अवस्था असते असा अनुभव आहे. आपलें संरक्षण करण्यास तीं असमर्थ असल्यामुळें कोणत्यातरी मोठ्या राज्याच्या कृपाछत्राखालीं त्यांना नेहेमीं राहावें लागतें. शिवाय तेथील प्रजेला पुरेशी जड संपत्तीही तेथें प्राप्त होणें शक्य नसल्यामुळें त्यांना आपल्या अस्तित्वासाठीं परकीय

छोटीं व मोठीं राज्यें.

व्यापाराची गरज लागते. यामुळें अशा छोट्या राज्यांतील लोकाचा कल इतर देश जिंकण्याकडे किंवा इतर देशांत वसाहती करण्याकडे साहजिकच होतो. अशाप्रकारें इतर देश जिंकण्यांत किंवा वसाहती करण्यांत ज्यांना यश येत नाहीं, त्यांना परराज्यांतून येणाऱ्या वस्तूंवर नित्याचे व्यवहार करावे लागून एक प्रकारचें परावलंबन प्राप्त होतें आणि परकीय व्यापारांत ते गरजू असल्यामुळें त्यांचा व्हावा तसा नफा होत नाहीं. याच्या उलट मोठ्या राज्यांना आपल्या देशांत वाटेल तो माल उत्पन्न करणें शक्य असल्यानें त्यांन आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण बनतां येतें. कच्चा माल व पक्का माल हे दोन्हीही आपल्याच देशांत निपजत असल्यानें त्यांना परकीय व्यापाराचें विशेष महत्व वाटत नाहीं. तसेंच लोकसंख्या व संपत्ति यांच्या वैपुल्यामुळें स्वसंरक्षणाची त्यांना फारशी अडचण पडत नाहीं.

नैसर्गिक संपत्ति

देशांतील खनिजद्रव्यें, सुपीक जमीन, वनस्पति व प्राणि, इत्यादि नैसर्गिक संपत्तीचा तेथील राज्यावर पुष्कळ परिणाम होतो. प्राचीन मानवी संस्कृतीचे प्रस्तरयुग, ताम्रयुग व लोहयुग असे विभाग समाजशास्त्रवेत्ते करीत असतात. प्रस्तरयुगांत लोक दगडाचीं हत्यारें वापरीत असत व पुढें त्यांना तांबें व लोखंड या धातूंचा, हत्यारांच्या व इतर कामीं, उपयोग करतां येऊं लागला. अर्थात या काळीं ज्यांच्या देशांत तांबें व लोखंड मुबलक असेल त्यांची सुधारणा लवकर होऊन राजकीय दृष्ट्याही त्यांना महत्व प्राप्त झालें असेल असें मानण्यास हरकत नाहीं. हिंदुस्थान देश हा नैसर्गिक संपत्तीचें आगर असल्यामुळें त्याच्या संस्कृतीची भरभराट सर्वांआधीं होऊन तेथील राज्यांची कीर्ति दिगंत पसरली यांत आश्चर्य मानण्याचें कारण नाहीं. युरोपांतील

अर्वाचिन राज्यांच्या भरभराटीला अमेरिकेंतून पंधराव्या व सोळाव्या शतकांत लुटून आणलेल्या सोन्याचांदीचा पुष्कळ उपयोग झालेला आहे, हें इतिहासज्ञास विश्रुत आहे. हिंदुस्थानांतील लोकांना सोन्याचांदीकरतां इतर देश धुंडाळावे न लागल्यामुळें त्यांचा कल हिंदुस्थानाबाहेर जाण्याकडे फारसा दिसत नाहीं; तरी बौद्धधर्माच्या काळांत व्यापार करण्याच्या, धर्मप्रसाराच्या किंवा वसाहती करण्याच्या मिषानें अनेक हिंदी रहिवासी परदेशीं जात असत. यंत्रकलेचें युग सुरू झाल्यापासून इंग्लिश लोकांना त्यांच्या कोळशाच्या खाणींचा अत्यंत उपयोग झालेला आहे. हिंदुस्थानांत कोळशाच्या खाणी विपूल नसल्या तरी मोठमोठे पर्वत व नद्या यांचे वैपुल्य असल्यामुळें पाण्याच्या धबधब्यावर वीज उत्पन्न करून त्या शक्तीचा कारखाने चालविण्यास व धनोत्पादनास उपयोग करून घेतां येईल.

हवामान

हवामानाचेहि परिणाम लोकांच्या स्वभावावर व मनावर होऊन तद्नुसार त्यांच्या संस्कृतीला वळण लागत जातें. उत्तर ध्रुवासारख्या अत्यंत थंड प्रदेशांत किंवा भूमध्य रेषेच्या आसपास सदैव उन्हांत तळपणाऱ्या लोकांत मानवी सुधारणेचा उत्कर्ष होणें फार कठीण आहे. मानवी संस्कृतिवृक्षाची जोमानें वाढ होण्यास समशीतोष्ण हवामान अत्यंत अनुकूल आहे, असें अनुभवावरून दिसून येतें. नैसर्गिक संपत्तीप्रमाणेंच हवामान व नियमित ऋतूमान यात हिंदुस्थान देश अत्यंत सुखी आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं या देशांतील हवा बरीच उष्ण असल्यामुळें येथील लोक निरुद्योगी होतात असा कांहीं युरोपियन ग्रंथकारांचा अभिप्राय आहे परंतु तो साधार दिसत नाहीं. या उष्ण हवेमुळें शरीरकष्टाच्या कामांत किंचित कंटाळा येथील लोकांनीं दाखविला, तरी त्यांच्या बौद्धिक व अध्यात्मिक उन्नतीच्या आड येथील

हवामान येतें असें कोणासही म्हणतां येणार नाहीं. केवळ राजकीय गोष्टींचाच विचार केला तरी राजनीति शास्त्रांतील विचार किंवा राजकीय संस्था या बाबतींत मध्ययुगाच्या अखेरीपर्यंतच्या काळांत हिंदी लोकांनीं आपलें पाऊल मागें ठेविल्याचें दिसून येत नाहीं. अलीकडील दोन तीनशें वर्षांत त्यांचें कर्तृत्व लयास गेलें आहे. पण हा त्यांच्या देशांतील हवामानाचा परिणाम आहे असें मानण्यास कोणताही आधार नाहीं.

देशाच्या नैसर्गिक मर्यादा व भूगोलिक स्थान यांचाही राज्यावर पुष्कळ परिणाम होतो. राज्याचे परराष्ट्रीय संबंध, लष्करी किंवा आरमारी धोरण व अंतर्गत राजकीय व सामाजिक सुधारणा, या सर्वांवर

नैसर्गिक मर्यादा व भूगोलिकस्थान.

देशाच्या नैसर्गिक मर्यादा व भूगोलिक स्थान यांचे इष्टानिष्ट परिणाम घडतात. ज्या देशांतील लोकांना एकसारखें इतर राष्ट्रांशीं लढावें लागतें किंवा परचक्राची सारखीं भीति बाळगावी लागते, त्यांना अंतर्गत सुधारणांपेक्षां आरमारी किंवा लष्करी सामर्थ्याविषयीं जास्त दक्षता ठेवावी लागते व प्रजाजनांस फार स्वातंत्र्यही देतां येत नाहीं. इंग्लंडांत लोकनियंत्रित राजसत्ता लवकर अस्तित्वांत येऊन प्रजास्वातंत्र्याचा उदय होण्यास तो देश युरोपखंडापासून अलग आहे, हें एक मुख्य कारण आहे, असें पुष्कळ विद्वानांचें मत आहे ! अमेरिकेच्या राज्यघटनेंतही पुष्कळ दोष असतांना तिकडे दुर्लक्ष करून त्यांचें चालतें, याचें एक कारण आशिया व युरोप यांच्यापासून त्यांचा देश दूर असल्यामुळें त्यांना बलाढ्य शत्रूची फारशी भीति नाहीं, हें आहे. कानडा किंवा दक्षिण अमेरिकेंतील एखादें राज्य बलाढ्य होऊन अमेरिकेशीं वैर करूं लागलें, तर त्यांच्या राज्ययंत्रांतील दोष त्यांना जाचक झाल्याशिवाय राहणार नाहींत. युरोप खंडांतील इंग्लंडाव्यतिरिक्त राष्ट्रें आपल्या राज्यांच्या मर्यादा कायम कर-

ण्याकरितां एकसारखी आपापसांत भांडत राहिल्यामुळें त्यांना साम्राज्य-वृद्धि, व्यापारवृद्धि किंवा प्रजास्वातंत्र्य व राष्ट्रीय संघटना या कामांत इंग्लंडाइतकें किंवा अमेरिकेइतकें यश येत नाहीं. हिंदुस्थानांतील राज्यांचीही अशीच स्थिती इतिहासांत झालेली दिसून येते. **या देशांतील कोणताही भाग नैसर्गिक मर्यादांनीं अगदीं अलग झालेला नसल्यामुळें त्याच्या कोणत्याही भागांत एखादें राष्ट्र निर्माण झालें कीं तें सर्व हिंदुस्तान पादाक्रांत करण्याच्या उद्योगास लागत असे किंबहुना तसें करण्याशिवाय त्याला गत्यंतरच नसे.** हिंदुस्थानच्या नैसर्गिक मर्यादांकडे पाहिल्यास तो देश एकाच राज्याखालीं नांदण्यास योग्य आहे असें दिसून येईल. अर्थात् तशी स्थिती प्राप्त होईपर्यंत त्याची अंतरगत घटना चांगल्याप्रकारें होणें शक्य नव्हतें.

कोणत्याही देशाची नैसर्गिक परिस्थिती व तेथील लोक यांच्यामध्यें एक प्रकारचा झगडा नित्य चाललेला असतो. निसर्ग आणि मनुष्य यांच्यातील हा कलह उद्योगी व बुद्धिमान लोकांना विशेष

निसर्ग व मानव.

जाचक होत नाहीं किंवा तसे लोक लवकरच निसर्गावर आपला पगडा बसवितात. वेदान्ताच्या भाषेंत बोलावयाचें म्हणजे मनुष्य हा सृष्टीचेंच अपत्य असल्यामुळें त्यांच्यातील द्वैत अभासात्मक, मिथ्या किंवा अनित्य आहे. उद्योगी, ज्ञानी व नीतिमान् मनुष्यावर सृष्टीची प्रेमपूर्ण कृपादृष्टि असते. अशा लोकांना कोणत्याही नैसर्गिक परिस्थितींत आपली उन्नति करून घेतां येते. असे लोक आपल्या देशांतील लोखंडाचें सोनें करतात, उष्ण हवेंत असले तरी रानावनांतील पर्णकुटिकेंत राहून आपल्या आध्यात्मिक तपोबलावर जगताचे मार्गदर्शक बनतात, नैसर्गिक मर्यादांच्या अभावीं आपल्या छातीचा कोट करून, देशाचें संरक्षण करतात, व भौतिक

विद्येच्या साहाय्यानें मोठमोठे पर्वत व महासागर यांचें उल्लंघन करून आपला व्यापार व संस्कृति सर्व दिशांस पसरावितात. अर्थात् कोणत्याही राज्यातील देशाच्या नैसर्गिक परिस्थितिपेक्षां तेथाल लोकांच्या गुणांवरच राज्याची भरभराट अवलंबून असते.

लोकः- कोणत्याही राज्यांतील लोकांचे परकीय रहिवासी व नागरिक असे दोन वर्ग करता येतात. नागरिकांचा आपल्या राज्याशीं अधिक निकट संबंध असतो व ते इतर देशांत गेले तरी त्यांचा तो संबंध कायम असतो. परकीय रहिवासी जितका काळ देशांत असतील तितका काळच त्यांचे तेथील सरकाराशीं प्रजाजनाचें नातें कायम असतें; परंतु नागरीकांचें प्रजाजनत्व त्यांनीं कांहीं काल देशत्याग केला तरी कायम असतें. राज्य ही संस्था नागरिक प्रजाजनांच्या हितासाठीं प्रामुख्यानें झटत असते. नागरिकांना विशिष्ट कायदेशीर हक्क दिलेले असून त्यांच्यावर विशिष्ट जबाबदाऱ्याही लादलेल्या असतात. एका राज्यांतील नागरिक कोठेंही दुसऱ्या राज्यांत असला तरी त्यांचे संरक्षण करणें हें त्याच्या राज्यांतील सरकारचें कर्तव्य असून तो कोठेंही असला तरी आपल्या

परकीय रहिवासी व नागरिक

राज्यांतील सरकारचा द्रोह न करणें हें त्यांचें कर्तव्य आहे. परकीय लोकांनाही कांहीं विशिष्ट अटीवर एखाद्या राज्यांचें नागरिक बनतां येतें. या अटी निरनिराळ्या राज्यांतील सरकारनीं निरनिराळ्या ठरविलेल्या आहेत.

राज्यांतील लोकांचे 'पौर' आणि 'जानपद' म्हणजे शहरवासी व ग्रामवासी असे वर्ग करण्याचा पूर्वीपासून प्रघात आहे. शहरवासी लोक विद्येंत पुढारलेले, कलाकौशल्यांत प्रवीण, व धनिक असे असा-

वयाचे व ग्रामवासी प्रजा विद्येंत मागसलेली, केवळ शेतीवर उपजीविका करणारी व तुलनात्मक दृष्टीनें पाहिल्यास निर्धन अशी असावयाची, असा पूर्वापार अनुभव आहे. पाश्चात्य देशांत अलीकडे यांत्रीक युगाला प्रारंभ झाल्यापासून शहरांत राहणाऱ्या लोकांची संख्या अतोनात वाढलेली आहे. इंग्लंडसारख्या औद्योगिक देशांत निम्याहून अधिक लोक शहरांत राहूं लागले आहेत. तेथील खेड्यांतील उद्योग-धंदे शहरांतलि मोठमोठ्या कारखान्यांशीं सुरू झालेल्या झगड्यांत सर्वस्वी मरून गेले यामुळें सर्व खेडीं ओसाड पडलीं. शेतीकडे दुर्लक्ष होऊन गेलें, शहरांत कंगाल लोकांचा वर्ग अतोनात वाढला व देशांतील सर्व उद्योगधंदे, कारखाने व जमिनी, एका लहानशा वर्गाच्या हातीं एक-वटल्या. यामुळें देशांत आर्थिक विषमता वाढली, शहरांतलि कंगाल लोकात कोंदट हवा व दुर्व्यसनें यांच्यामुळें रोगराई वाढूं लागली व देशांतील बहुतेक लोकांचे स्वातंत्र्य नष्ट होऊन ते दारिद्यामुळें धनिक वर्गाचे गुलाम बनले. याचा परिणाम राजकीय स्थितीवरही होऊन लोकसत्ताक संस्थांना धनिकसत्तेचें विकृत स्वरूप प्राप्त झालें. हे अनर्थ टाळण्यासाठीं पुन: लोकांनीं खेड्यांत राहून शेतीकडे लक्ष द्यावें व खेड्यांतील लहान लहान धंद्याचे पुनरुज्जीवन होऊन उद्योगधंद्यांचें व संपत्तीचें केंद्रीकरण कमी व्हावें याबद्दल पाश्चात्य देशांतील समाजसुधारकांचे प्रयत्न चालू आहेत. आपल्या देशांतही युरोपांतल्याप्रमाणें भांडवलशाहीचें प्रस्थ माजूं नये, याकरितां मोठमोठीं औद्योगिक शहरें निर्माण न होतां खेड्यांतच लहान प्रमाणावर उद्योगधंदे वाढवावेत, असे विचार प्रसार पावूं लागले आहेत. कांहीं लोकांच्या मतानें सध्या आपल्या देशांत शहरांतल्या मानानें खेड्यांत फारच वसति असल्यामुळें

पौर व जानपद

शहरें व खेडीं.

लोक कांहीं काळ शहरांत जाऊन राहतील व नवीं औद्योगिक शहरें निर्माण होतील, तर आपलें फारसें नुकसान न होतां औद्योगिक प्रगतीला मदत होईल असें आहे.

आतां राज्यांतील लोकसंख्येचा विचार केला तर कोणत्याही राज्यांत लोकांची संख्या किती असावी यासंबंधीं कांहीं नियम सांगतां येणार नाहीं. सध्यां कांहीं राज्यें इतकीं लहान आहेत कीं, त्यांच्या लोकसंख्येची गणना करण्यास हजारांच्या वर जावें लागत नाहीं; तर कांहीं राज्यांतील लोकसंख्येची गणना करण्यास कोटि दशकोटीचा उपयोग करावा लागतो.

लोकसंख्या.

ॲरिस्टॉटलचें मत राज्यांतील लोकसंख्या दहा हजारापासून एक लक्षापर्यंत असावी असें होतें. रूसो हा अठराव्या शतकांतील फ्रेंच तत्ववेत्ता कोणत्याही राज्यांत दहा हजारांपेक्षां जास्त लोक असूं नयते असें प्रतिपादन करीत असे. ॲरिस्टॉटलनें मोठीं राज्यें पाहिलींच नव्हतीं परंतु रूसोनें मोठीं राज्यें पाहूनही छोटीं राज्यें उत्तम असा शेरा दिला आहे; याचें कारण राज्यांत लोकसंख्या फार असली म्हणजे राज्यकारभाराचे प्रश्न जास्त संकीर्ण व बिकट होतात व त्यामुळें राज्यव्यवस्था नीट न चालतां सामान्य लोकांना स्वातंत्र्य उपभोगितां येत नाहीं, अशी रूसोला भीति वाटत होती. परंतु हें मत आतां कोणासही मान्य होणें शक्य नाहीं. सध्या राज्यांचा विस्तार व मनुष्यबळ वाढण्याकडेच जगांतील राज्यांचा कल आहे. संरक्षणाच्या व सांपत्तिक प्रगतीच्या दृष्टीनें मोठ्या लोकसंख्येचा राज्यांना चांगला उपयोग होतो. तसेंच प्रतिनिधिक लोकसत्ता, स्थानिक स्वराज्य, अधिकारविभागणी, संयुक्त राज्यपद्धति वगैरे संस्थांच्या योगानें मोठ्या राज्यांतही सामान्य लोकांना स्वातंत्र्य उपभोगितां येईल अशी आशा वाटूं लागली आहे. अर्थात् लहान राज्यांचें महत्व आतां उरलेलें नाहीं. हल्लीं कोणत्याही राज्यांतील

लोकसंख्या कमी होणें ही शोचनीय स्थिती समजली जाते. फ्रेंच लोकांच्या पुढें देशांतील लोकसंख्या प्रमाणाबाहेर कमी होऊं लागल्यामुळें एक मोठाच काळजीचा प्रश्न येऊन उभा राहिलेला आहे. इंग्लंड, जर्मनी, अमेरिका वगैरे पाश्चात्य देशांत लोकसंख्येची वाढ फार जोरानें होत आहे.

राज्यांतील लोकसंख्या तेथील जन्ममृत्यूच्या प्रमाणांवर अवलंबून असते. पाश्चात्य देशांतील लोकांची जननसंख्या आमच्या देशांतल्यापेक्षां कमी असतांही त्या देशांतील लोकांनीं व सरकारांनीं अनेक उपाय योजून मृत्युसंख्या फार मर्यादित केली असल्यामुळें तेथील एकंदर लोकसंख्या कमी न होतां वाढत आहे. दरसाल दर हजारीं किती मुलें जन्मास येतात व किती मृत्यु पावतात, यांचे कांहीं प्रमुख देशांतील आंकडे पुढें दिले आहेत. हे आंकडे महायुद्धापूर्वींचे आहेत.

जन्ममृत्यूचें प्रमाण.

देश	जन्म	मृत्यु		वाढ
अमेरिका	३३	१८	+	१५
ऑस्ट्रिया	३२	२२	+	१०
राशिया	४४	३१	+	१३
जपान	३४	२१	+	१३
इंग्लंड	२५	१६	+	९
जर्मनी	३०	१८	+	१२
हंगेरी	३५	२५	+	१०
इटली	३०	२२	+	८
स्पेन	३५	२४	+	९
स्वित्झर्लंड	२५	१६	+	९
फ्रान्स	१९	१९		०
ब्रि० हिंदुस्थान	३८	३२	+	६

हिंदुस्थानांतील लोकसंख्येच्या वाढीचें प्रमाण फ्रान्सखेरीज इतर कोण-त्याही प्रमुख देशांपेक्षां कमी आहे. फ्रान्समध्यें जननसंख्या अगदीं कमी आहे, हें तेथील लोकसंख्येंत वाढ न होण्याचें कारण आहे, परंतु हिंदुस्थानांतलि जननसंख्येचा दर हजारीं आंकडा फ्रान्सच्या दुप्पट असू-नही येथें व्हावी तितकी लोकसंख्येची वाढ न होण्याचें कारण येथील सर्वांत मोठीं मृत्युसंख्या हेंच होय. या देशांत मृत्युसंख्या जास्त अस-ण्याचीं अनेक कारणें असूं शकतील, त्यांत दारिद्र्य, अज्ञान, अनारोग्य व बालविवाह हीं चार प्रमुख आहेत. हीं सर्व कारणें परकीय सर-कार असल्यामुळें लवकर नष्ट होण्याचीं चिन्हें दिसत नाहींत.

केवळ लोकसंख्येच्या आंकड्यापेक्षां देशाचें क्षेत्रफळ आणि लोक-संख्या यांचें प्रमाण जास्त महत्त्वाचें असतें. कांहीं देशांत लोकवसति पातळ असते तर कांहीं देशांत ती दाट असते. ज्या राज्यांत देशाच्या मानानें लोकसंख्या जास्त असते त्यांतील लोक दुसरीकडे वसाहती करण्यास किंवा देश जिंकण्यास जाऊं लागतात. एखाद्या देशांत लोकवसति फार दाट असूनही तेथील लोकांस दुसरीकडे वसाहती करतां येत नसतील किंवा दुसऱ्या देशांत चांगली वागणूक मिळत नसेल तर, त्यांना आपल्याच देशांत कुचंबत राहावें लागून त्यांना अन्नाच्या अभावीं मृत्युमुखीं पडावें लागतें. औद्योगिक उन्नत्तीमुळें थोड्या क्षेत्रफळावर जास्त लोक राहूं शकतात. ज्या देशांतील लोकांना आपली उपजीविका केवळ शेतीवरच करावी लागते, त्यांना मोठा देश असला तरी सुखानें राहतां येत नाहीं. जगांतील प्रमुख राज्यांत दर चौरस मैलावर किती लोकवसति आहे त्याचे आंकडे खालीं दिले आहेत.

दाट व पातळ लोकवसति.

इंग्लंड	६१८	ऑस्ट्रिया	२४७
बेल्जियम	३५२	स्विटझर्लंड	२३४
नेदर्लंड	४७५	फ्रान्स	१८९
जपान	३३६	स्पेन	१००
इटली	३१३	राशिया	६९
जर्मनी	३१०	अमेरिका	३१
चीन	२६६	ब्रि० हिंदुस्थान	२२३

हिंदुस्थानापेक्षां पुष्कळ युरोपियन देशांत अधिक दाट वसति आहे; परंतु हिंदुस्थानांतील लोकांना शेतीशिवाय दुसरे फारसे धंदे उरले नसल्यामुळें तेवढ्या लोकांनाही या अफाट व सुपीक देशांत अन्नवस्त्राची मारामार पडत आहे.

राज्यांतील लोक कोणत्या मानववंशाचे व त्यांतील कोणत्या शाखेचे आहेत, यावर त्याची सांस्कृतिक व राजकीय स्थिति अवलंबून असते अशी कांहीं विद्वानांची कल्पना आहे. अर्वाचीन काळीं ट्युटानिक वंशांतील अँग्लोसॅक्शन लोकांनीं राजकीय संस्थांच्या बाबतींत पुष्कळ प्रगति केलेली आहे व तिचें अनुकरण इतर युरोपियन व आशियामधील लोक करीत आहेत. अर्वाचीन काळीं लोकसत्तेची स्थापना करण्याचें श्रेय या लोकांना दिलें पाहिजे. तसेंच लोकसत्तेचें प्रातिनिधिक स्वरूप, जबाबदार मंत्रिमंडळाची व्यवस्था, वसाहतींचें स्वराज्य, संयुक्त राज्यव्यवस्था वगैरे बऱ्याच अर्वाचीन राजकीय शोधाचें श्रेय अँग्लो-सॅक्सन लोकांनीं मिळविलेलें आहे. यामुळें जगांतील इतर लोकांना राजनीतिशास्त्राचें धडे देण्याचा मान केवळ आपणांसच आहे अशी त्यांपैकीं कांहीं लोकांची समजूत आहे. परंतु ही त्यांची कल्पना ऐतिहासिक पुराव्यानें सिद्ध होऊं शकत नाहीं. आज

मानव वंश व मानवी संस्कृति.

जरी टयुटॉनिक लोकांचे किंवा इतर युरोपियन लोकांचे राजकीय विचार इतरांपेक्षां बरेच परिणत झालेले आहेत तरी ते नेहमीं तसेच होते किंवा पुढेंही तसेच राहतील असें मानण्यास कांहीं पुरावा नाहीं. जबाबदार मंत्रिमंडळ, प्रातिनिधिक लोकसत्ता वगैरे संस्था आजच पुष्कळ अपुऱ्या आणि सदोष वाटूं लागल्या आहेत. त्यांचें योग्य रूपांतर करण्याचें श्रेय कोणत्या मानववंशांतील लोकांना मिळेल हें सांगणें शक्य दिसत नाहीं. जगाला मानवी संस्कृतीचे धडे घालून देण्याचा मान निरंतर कोणत्याच मानववंशाला मिळालेला नाहीं. प्राचीन काळीं इजिप्त, हिंदुस्थान, चीन वगैरे राष्ट्रांतील लोक अत्यंत सुधारलेले असून युरोपियन संस्कृतीचे आद्य प्रस्थापक जे ग्रीक लोक त्यांना इजिप्त व हिंदुस्थान या देशांतील लोकांनीं पुष्कळ गोष्टी शिकविल्या आहेत. इजिप्तमधील सुधारलेले प्राचीन लोक कोणत्या वंशाचे असतील यासंबंधीं निश्चित माहिती आज मिळणें जरी दुरापास्त असलें तरी व्हॉल्ने, प्रिचर्ड व रोलिन्स, इत्यादि कांहीं युरोपियन पंडितांच्या मतानें प्राचीन इजिप्शियन लोक हे हल्लींच्या नीग्रो लोकांचे पूर्वज असावेत असें आहे. हें खरें ठरल्यास हल्लीं ज्यांना युरोपियन व अमेरिकन लोक अगदीं तुच्छ लेखतात त्यांच्यांच पूर्वजांनीं ग्रीक लोकांना सुसंस्कृत करून युरोपियन संस्कृतीचा पाया घातला असें सिद्ध होईल. प्राचीन काळीं जर चीन, हिंदुस्थान, इजिप्त, मेक्सिको, पेरू व मुसलमानी राज्यें येथें युरोपियनांच्या सहाय्यावांचून उत्तम प्रकारच्या संस्कृति निर्माण झाल्या तर पुनः तसें होण्यास काय हरकत आहे? सामान्य मानवी संस्कृतीला जे विचार लागूं आहेत तेच राजकीय संस्थांच्या उत्क्रांतीसही लागूं आहेत. राजकिय संस्थांच्या व विचारांच्या उत्क्रांतीच्या बाबतींत

---

1 See "Towards Home--Rule" Part II p. 41. edited by Ramanand Chatterjee.

पाश्चात्य युरोपियन देश व पौरस्य आशियांतील देश यांच्यांत जमीन अस्मानाचें अंतर आहे असें जें युरोपियन लोकांचें मत आहे तेंही ऐतिहासिक पुराव्यानें सिद्ध होणें शक्य नाहीं. कांहीं ज्ञात व अज्ञात कारणांमुळें अर्वाचीन काळीं लोकसत्ताक राज्यपद्धति आशियांतील देशांत प्रथम उगम पावली नाहीं हें खरें असलें, तरी प्राचीन काळीं या लोकांतही लोकसत्ताक संस्था होत्या हें विसरतां कामा नये. पुढें मोठमोठीं साम्राज्यें अस्तित्वांत आलीं तेव्हां ग्रीस देशांत उदय पावलेलें लोकसत्तेचें तत्त्व युरोपांतून नष्ट झालें. त्याचप्रमाणें इकडेही मौर्य साम्राज्याच्या उदयापासून लोकसत्ता जवळ जवळ नामशेष झाली. तथापि राजा हा प्रजेचा संरक्षण करणारा नोकर आहे, त्याला द्यावयाचे कर हें त्याचें वेतन आहे,(स्वभागभृत्या दास्यत्वे प्रजानां च नृपः कृतः) आपलें कर्तव्य त्यानें योग्य प्रकारें बजावलें नाहीं तर त्यास पदच्युत करून त्याचें जागीं दुसरा राजा नेमावा, किंवा, प्रसंगविशेषीं त्यास देहांत प्रायश्चित्तही द्यावें असली अमोलिक, राजनैतिक तत्वरत्नें प्राचीन भारतीयांनीं शोधून काढलीं होतीं हें विसरून चालणार नाहीं. युरोपांतही अलीकडील दोन अडीच शतकें सोडून दिल्यास ग्रीक राष्ट्रें नष्ट झाल्यापासून अनियंत्रित राजसत्ता, सरदारसत्ता, अगर सुलतानशाहीच नांदत होती असें दिसून येतें. विसाव्या शतकांत पुनः आशियांतही जपान, चीन, तुर्कस्थान, इराण व हिंदुस्थान या देशांत लोकसत्तेचें वारें संचारू लागलें आहे. कोठें ती प्रस्थापित झाली आहे, तर कोठें होण्याच्या बेतांत आली आहे. यावरून कोणत्याही लोकांतील राजकीय संस्था केवळ त्यांच्या वंशावर अवलंबून असतात. असें म्हणणें बरोबर दिसत नाहीं. राजकीय संस्थांच्या सुधारणांत नवी भर घालण्याची संधि सुद्धां आशियांतील लोकांना लवकरच प्राप्त होईल अशीं चिन्हें दिसत आहेत. कारण युरोपियन देशांतील राज्ययंत्रें असावीं तितकीं कार्यक्षम नाहींत अशी ओरड चोहोंकडून होऊं लागली आहे.

मानवी संस्कृतींत नवी भर घालण्याचा मान जरी कोणत्याही एका वंशांतील लोकांनाच मिळणें शक्य नसलें, तरी निरनिराळ्या वंशांतील लोकांनीं मानवी संस्कृतीला लावलेली दिशा भिन्नभिन्न असते असें कांहीं लोक म्हणूं शकतील. त्यांच्या मतानें वंश-भेदाप्रमाणें मनुष्यांत स्वभावभेद होत असतो, व तदनुसार निरनिराळ्या वंशाचें कार्य निरनिराळें होत जातें. अमुक एक वंश श्रेष्ठ व अमुक कनिष्ठ असें हे लोक म्हणत नाहींत. परंतु अमुक वंशांतील लोक सामान्यतः अमुक प्रवृत्तीचे आहेत, ते भरभराटीस आले तरी त्या प्रवृत्तीमुळेंच येतील व त्यांनीं स्थापिलेल्या सर्व संस्थांत ती प्रवृत्तीच दृग्गोचर होईल असें या लोकांचें मत आहे. उदाहरणार्थ, अँग्लो-सॅक्सन लोकांचा कायदेबाजपणा आणि व्यवहारनैपुण्य, फ्रेंच लोकांची तार्किक वृत्ति आणि चंचल स्वभाव, हिंदू लोकांची अध्यात्मिक वृत्ति व धर्मनिष्ठा, हे गुण त्या त्या लोकांच्या हाडामासांत खिळून गेलेले असल्यामुळें त्यांच्यातून ते कधींही नष्ट होणार नाहींत, असा बऱ्याच विद्वान लोकांचा सिद्धांत आहे. या बाबतींत निर्णायक असा प्रत्यक्ष पुरावा सांपडणें फार कठीण आहे. तरी या प्रश्नासंबंधीं पुढील एक दोन मुद्दे विचार करण्यासारखे आहेत. प्राचीन काळीं एकाच वंशांतील लोक प्रायः एका देशांत रहात असत, त्यांचाच एका राज्यांत समावेश होई व त्यांचाच परस्परांशीं विशेष संबंध येई. यामुळें एका वंशांतील लोकांत एक भाषा, एक धर्म व एक संस्कृति निर्माण होणें हेंच साहजिक होतें. सध्यां निरनिराळ्या वंशांतील व धर्मांतील लोक एकत्र राहूं लागले असून एका राज्यांतही सुखानें नांदत आहेत. यामुळें एका राष्ट्रांतील सर्व वंशाच्या व धर्माच्या लोकांत सामान्य आचारविचार व संस्कृति यांचा उद्भव होऊं लागला आहे. अलीकडे वंशभेदानुसार

वंशभेद व संस्कृति-भेद.

होणाऱ्या संस्कृतिभेदापेक्षां राष्ट्रभेदानुसार अनुभवास येणारा संस्कृतिभेद अधिकअधिक स्पष्ट होऊं लागला आहे. शिवाय बहुतेक ठिकाणीं निरनिराळ्या मानववंशांच्या रक्तांची भेसळ झाल्यामुळें कोणते लोक कोणत्या वंशांतील आहेत हें सांगणें देखील जवळजवळ अशक्य आहे. वंश, देश, धर्म, जात वगैरे सर्व गोष्टींचा परिणाम मनुष्याच्या मनावर होत असतो यांत शंका नाहीं. परंतु वंशाचा परिणाम त्याच्या अंगांत खेळत असणाऱ्या रक्तामुळें किती होतो आणि त्या वंशातील संस्कृतीच्या जन्मानंतर झालेल्या संस्काराचा परिणाम किती, हें ठरविणें जवळ जवळ अशक्य आहे. सामान्यतः एवढें

वंश व पौरुष.

मात्र खात्रीनें सांगतां येईल कीं, मनुष्य आनुवंशिक संस्कार व जन्मानंतरचे संस्कार यांनीं पूर्णपणें बांधलेला नाहीं. " दैवायत्तं कुले जन्म मदायत्तं तु पौरुषम् " हा नियम जितका व्यक्तींना लागू आहे तितकाच तो व्यक्तिसमुदायांनाही लागू आहे.

सरकार:— या संस्थेमार्फत राज्यांचा सर्व कारभार चाललेला असतो, म्हणून तिला राज्ययंत्र अशी संज्ञा आहे. लोकांचे अंतःशत्रूंपासून व बाह्यशत्रूपासून संरक्षण करणें हें या संस्थेचें आद्य कर्तव्य आहे, आणि तें पार पाडण्यासाठीं ती संस्था दंडशक्तीचा उपयोग करीत असते. लोकांना अंतःशत्रू दोन प्रकारचे असतात; एक सामान्य लोकांतील

अंतःशत्रूचे वर्ग व राज्याचें त्रिविध आद्य कर्तव्य.

दुष्ट लोक व दुसरे उन्मत्त अधिकारी. लोकांना पीडा करणाऱ्या अधिकाऱ्यांचें योग्य प्रकारें नियमन करणें हा राजाचा धर्म सांगितलेला आहे. या बाबतींत शुक्रनीति म्हणते " न भृत्यपक्षपाती स्यात् प्रजापक्षं समाश्रयेत् ॥ " म्हणजे राजानें आपल्या अधिकाऱ्यांचा पक्ष न घेतां प्रजेचा

पक्ष घ्यावा; इतकेंच नाहीं तर " प्रजाशतेन संद्विष्टं संत्यजेत् अधिकारिणम् " म्हणजे शेकडो प्रजाजनांचा ज्याच्यावर रोष आहे अशा अधिकाऱ्याला राजानें टाकून द्यावा (कामावरून दूर करावा). राज्याचीं आद्य कर्तव्यें सांगतांना डॉ० डायसन यांनीं तीन मुख्य कर्तव्यांचा उल्लेख केला आहे. तें म्हणतात, " संरक्षक संस्था या दृष्टीनें राज्याचें कर्तव्य त्रिविध आहे. (१) बाह्य शत्रूंपासून संरक्षण (२) अंतःशत्रूंपासून संरक्षण आणि (३) संरक्षकापासून संरक्षण " संरक्षकापासून म्हणजे राजा व त्याचे अधिकारी, यांच्यापासून प्रजेचें संरक्षण झालें पाहिजे किंबहुना प्रजेनें केलें पाहिजे, ही राजनीतीशास्त्रांतील अत्यंत महत्वाची कल्पना आपल्याइकडे महाभारतकाळापासून परिचित आहे. राजानें जुलमी अधिकाऱ्यांचें नियमन करावें यासंबंधीं शुक्रनीतिचें मत वर दिलें आहेच. महाभारतांत तर जुलमी राजाचा लोकांनीं वध करावा असा स्पष्ट उपदेश केलेला आहे. शुक्रनीतींत जुलमी राजाला काढून त्याच्या जागीं त्याच कुळांतील दुसरा पुरुष बसवावा असें म्हटलें आहे. परतंत्र देशांतील परकीय सरकाराकडून तिसरें कर्तव्य कधीहीं चांगल्या प्रकारें

---

1 "The task of the state as a protective institution is three fold. (1) protection from without (2) protection from within and (3) protection from the protector." Elenents of Metaphysics, by Deussen. P. 274.

२ अरक्षितारं हर्तारं विलोप्तारमनायकम् ।
तं वै राजकलिं हन्युः प्रजाः संनह्य निर्घृणम् ॥ ३४ ॥
अहं वो रक्षितेत्युक्त्वा यो न रक्षति भूमिपः ।
स संहत्य निहन्तव्यः श्वेव सोन्माद आतुरः ॥ ३५ ॥ अनु० अ० ६६.

३ अध्याय २. श्लोक २७६. शुक्रनीति.

होणें शक्य नाहीं, म्हणूनच " पारतंत्र्यात् परं दुःखं न स्वातंत्र्यात् परं सुखम् " म्हणजे पारतंत्र्यापेक्षां मोठें दुःख नाहीं व स्वातंत्र्यापेक्षां मोठें सुख नाहीं, असें शुक्रनीतींत म्हटलें आहे. परकीय

परकीय सरकार.

सरकार हें सरकार या पदवीलाही पात्र नाहीं, असें जॉन स्टयुअर्ट मिल्ल याचें मत आहे. ("The Government of a people by itself has a meaning and a reality ; but such a thing as government of one people by another does not and cannot exist." Representative Government by J. S. Mill. everyman's Library. P. 384)

लोकांचें संरक्षण करणें हें जरी राज्यांचें आद्य कर्तव्य असलें तरी हें कर्तव्य पार पाडण्यास करग्रहण व कायदे करणें, हीं दुय्यम कार्यें प्रत्येक सुधारलेल्या सरकारला आज अंगीकृत करणें अवश्य आहे. सरकारचा खर्च चालविण्यासाठीं करग्रहणाचें व न्यायदानाचीं तत्वें ठरविण्यासाठीं कायदे करण्याचें कार्य सरकारला अंगीकृत

सरकारचीं दुय्यम कर्तव्यें.

करणें अवश्य असतें. याशिवाय सरकार हें राज्यांतील दंडशक्तीचें मूर्त स्वरूप व सर्व प्रजाजनांचा हिताहिताचा निःपक्षपातानें विचार करणारी संस्था असून तिचें सामर्थ्य व द्रव्यबल कोणत्याही व्यक्तींपेक्षां किंवा राज्यांतील इतर संस्थांपेक्षां जास्त असल्यामुळें आणखींही जीं जीं कार्यें सरकारकडून व्हावींत असें लोकांना वाटतें, तीं अंगीकारणें सरकारचें एक कर्तव्यच होतें. अशा दुय्यम कर्तव्यांची संख्या व स्वरूप हीं स्थलकालपरत्वें बदलत असतात.

राज्यांचा कारभार करण्यासाठीं कोणत्याही व्यक्तीच्या किंवा संस्थेच्या हातीं दिलेल्या सत्तेस राजसत्ता असें म्हणतात हें मागें सांगितलें

आहे. या राजसत्तेचीं, विषयानुरोधानें कायदे करणें, अंमलबजावणी-

राजसत्तेचीं तीन अंगें.

करणें व न्याय देणें, अशीं तीन स्वरूपें किंवा अंगें आहेत. याच अनुरोधानें प्रत्येक सुधारलेल्या सरकारास हीं तीन अंगें असतात. कायदे करण्याचें कार्य लोकांच्या प्रतिनिधि-सभेकडे प्रायः दिलेलें असतें. हल्लीं ज्याप्रमाणें कायद्यांचें बंधन सरकारी अधिकाऱ्यांना व लोकांना सारखेंच असावें अशी इंग्लिश लोकांची समजूत आहे, त्याचप्रमाणें प्रजाजनांप्रमाणेंच राजा व त्याचे अधिकारी यांना धर्मशास्त्रांचे बंधन आहे अशी प्राचीन भारतीयांची कल्पना होती. असो. सरकाररूपी राज्ययंत्राच्या घटनेसंबंधीं पुढें पुष्कळ चर्चा येणार असल्यामुळें त्यासंबंधीं येथें फार विस्तार करण्याचें कारण नाहीं.

स्वतंत्रप्रभुत्वः— हा शब्द मराठींत अगदीं अलीकडे प्रचारांत आलेला असून त्यानें राज्यांच्या स्वातंत्र्याचा व प्रभुत्वाचा बोध होत असतो. राज्याच्या स्वातंत्र्याचा विचार करीत असतां परराष्ट्रीय संबंध

स्वतंत्रप्रभुत्व.

व आंतरराष्ट्रीय कायदा, या संबंधींचे प्रश्न उद्भवतात; तसेंच राज्यांच्या प्रभुत्वाचा विचार करितांना सरकारचें कार्यक्षेत्र सरकार व प्रजा यांचे संबंध, व्यक्तिस्वातंत्र्य, संघस्वातंत्र्य, स्थानिक स्वातंत्र्य, वगैरे अनेक प्रश्न उद्भवतात. स्वातंत्र्य या लक्षणानें त्या राज्यांवर इतर कोणत्याही राज्यांतील सरकारची हुकमत चालूं शकत नाहीं असा बोध होत असून प्रभुत्व या लक्षणानें अंतर्गत अप्रतिहत हुकमतीचा बोध होतो. अर्थात् स्वतंत्रप्रभुत्व हें लक्षण केवळ स्वतंत्र राज्यांच्या ठिकाणींच असणार हें उघड आहे. आंतरराष्ट्रीय संबंधांत किंवा आंतरराष्ट्रीय कायद्यांत केवळ स्वतंत्रप्रभुत्वमंडित राज्यांचाच विचार करावा लागतो.

प्रकरण ३ रें.

राज्य व राष्ट्र.

" पारतंत्र्यात् परं दुःखं न स्वातंत्र्यात् परं सुखम् "

शु० नी० अ. ३ श्लो० ३२३.

मागच्या प्रकरणांत राज्यासंबंधीं विवेचन केलें परंतु राजनीतिशास्त्रांतील ' राष्ट्र ' या अत्यंत महत्वाच्या कल्पनेंसंबंधीं विवेचन करण्यास त्यांत स्थळ मिळालें नाहीं. जगांतील ऐतिहासिक घडामोडींचा एक अत्यंत महत्वाचा व बोधप्रद भाग म्हणजे राष्ट्रीय स्वातंत्र्याकरितां उभारलेलीं युद्धें, हा होऊन बसला आहे. कोणत्याही

राज्य व राष्ट्र यांतील भेद.

राज्याला स्वतःच्या मालकीचा देश असला पाहिजे हें मागल्या प्रकरणांत सांगितलें, परंतु कोणत्या राज्यांत कोणत्या देशाचा व कोणत्या लोकांचा समावेश व्हावा या प्रश्नाची चर्चा त्या प्रकरणांत केली नाहीं. ती चर्चा करितांना ' राज्य व राष्ट्र ' हा प्रश्न उद्भवतो. राष्ट्र या शब्दानें मनांत उद्भवणारी कल्पना ' देश ' व ' राज्य ' या कल्पनांहून भिन्न आहे. एखादा भूप्रदेश, त्यावर राहणारे कांहीं लोक, आणि त्यांच्यांत कोणत्यातरी स्वरूपाच्या शासनसंस्था, एवढ्या गोष्टीं असल्या म्हणजे राज्य सिद्ध होतें. परंतु तेवढ्यानें राष्ट्राची सिद्धता होत नाहीं. कोणत्याही राज्याला राष्ट्र ही संज्ञा प्राप्त होण्यास तेथील लोकांत ' राष्ट्रीयत्व ' या नावानें संबोधिली जाणारी एक विशिष्ट भावना जागृत असली पाहिजे. राष्ट्रीयत्व हा राज्यांचा आत्मा आहे. राष्ट्रें हीं सजीव राज्यें आहेत व राष्ट्रीयत्वविहीन राज्यें हीं निर्जीव राज्यें होत. प्रत्येक राष्ट्राला

आत्मा असतो, त्याला अहंकार असतो, त्याला भावना असतात व त्याचा विशिष्ट स्वभाव असतो. राज्याला यांपैकीं कोणत्याही गोष्टीची आवश्यकता नाहीं. जगांतील सर्वच राज्यें सजीव किंवा एकजीव असतात असा नियम नाहीं. उदाहरणार्थ ब्रिटिशसाम्राज्य हें राज्य आहे, परंतु तें राष्ट्र नाहीं. यामुळें त्याची गणना एकजीव राज्यांत (organic states) होऊं शकत नाहीं. तें निर्जीव किंवा कृत्रिम राज्य आहे. जें राज्य राष्ट्र नाहीं, त्याची उभारणी केवळ दंडशक्तीवर झालेली असते; राष्ट्राची उभारणी देशभक्तीवर किंवा राष्ट्रभक्तीवर झालेली असते. एका राष्ट्रांतील सर्व व्यक्तींचीं अंतःकरणें स्नेहरज्जूंनीं बद्ध झालेलीं असतात व आपलें स्वतंत्र राज्य असून त्यामार्फत आपलें वैशिष्ट्य कायम रहावें अशीं त्यांची अकांक्षा असते.

राष्ट्रीयत्व ही मानवी अंत:करणांतील अदृश्य अशी स्नेहभावना आहे. " व्यतिषजति पदार्थान् आंतरःकोऽपि हेतु र्नखलु बहिरुपाधीन् प्रीतयः संश्रयते " हा नियम राष्ट्रीयत्व या नावानें व्यक्त होणाऱ्या आत्मीय भावनेसही बऱ्याच अंशीं लागू असल्यामुळें ती अमुक एका किंवा अनेक कारणामुळें कोणत्याही लोकांत खात्रीनें निर्माण होईल असें कोणासही सांगता येणार नाहीं. पुष्कळ शतकें एकत्र वसति, एकवंश, एकधर्म, एकसंस्कृति, एक भाषा, या कारणांमुळें पुष्कळ लोकांत एकराष्ट्रीयत्व उत्पन्न झालेलें आहे. याशिवायही अनेक कारणांमुळें तें

राष्ट्रीय भावनेचीं अनेक कारणें.

उत्पन्न झालेलें आहे. " एखाद्या कुलांतील व्यक्तीबद्दल वाटणाऱ्या स्वामिभक्तीमुळें किंवा एखाद्या तत्वांवरील अढळ निष्ठेमुळें राष्ट्रें निर्माण झालीं आहेत. तसेंच आपल्या जन्मभूमीवरील स्वाभाविक प्रेमभावनेंमुळेंही राष्ट्रें निर्माण झालीं आहेत व कदाचित अशांचीच संख्या सर्वांत अधिक भरेल." असें व्हायकाउंड

मोर्ले हे म्हणतात. अर्थात् कोणत्याही लोकांत ही भावना जागृत आहे किंवा नाहीं, हें केवळ वरवर पाहणारांस सांगतां येणार नाहीं. पुष्कळ प्रसंगीं या प्रश्नाचा निकाल इतिहासच लावीत असतो, परंतु भावी इतिहासाचें भविष्य कसें वर्तवावें हा मोठा बिकट प्रश्न आहे.

प्राचीन काळीं एकवंशीयतत्वाच्या भावनेमुळेंच राष्ट्रीयत्व निर्माण झालेलें आढळतें. प्राचीन भारतवर्षांत पांचाळ, भरत, ऐक्ष्वाक, अंग, वंग, कालिंग वगैरें जीं राज्यें होतीं त्यांच्यांत राष्ट्रीय भावना असून ती एकवंशीयत्वामुळें उद्भूत झाली होती. युरोपांतही प्राचीनकाळीं अँगल, सॅक्सन, केल्ट, स्कॉट, वगैर लोकांत एकराष्ट्रीयत्व उत्पन्न होण्यास एकवंशीय भावनाच कारण झाली होती. तथापि सध्या जीं राष्ट्रें जगांत नांदत आहेत, त्यापैकीं फारच थोड्या राष्ट्रांना एकवंशीयत्वाची कसोटी लागूं पडेल. इंग्लिश लोक आपणांस अँग्लो-सॅक्सन असें म्हणवीत असतात, यावरूनच त्यांच्या अंगांत अँग्ल व सॅक्सन लोकांचें रक्त खेळत आहे हें सिद्ध होतें. शिवाय नॉर्मन लोकही इंग्लिश लोकांत बेमालूम रीतीनें मिसळून गेलेले आहेत, याची साक्ष इतिहास देत आहे. फ्रेंच लोकांचें राष्ट्र जर्मन, केल्टिक व रोमन रक्तांच्या मेसळीनें निर्माण झालेलें आहे. अमेरिका हें एक राष्ट्र आहे, याबद्दल कोणालाही शंका येणार नाहीं. पण तेथील लोकांत युरोपांतील प्रत्येक मानववंशाचे लोक सांपडतात, इतकेंच नाहीं तर आफ्रीकेंतील नीग्रोही त्या राष्ट्रांत सामील झालेले आहेत. तात्पर्य मानववंशापैकीं

राष्ट्रीय भावना व एकवंशीय भावना.

1. "Devotion to dynasty has made nations. So has passion for a creed. So perhaps, most of all, ...the natural fondness for the land where we are born." Notes on politics and History. P. 79.

एकाच शाखेचे लोक असतील तरच त्यांच्यांत एक राष्ट्रीयत्व निर्माण होतें हा सिद्धांत प्रस्तुत वस्तुस्थितीशीं अगदीं विसंगत असा आहे.

येथें आणखीं एक महत्वाचा प्रश्न या बाबतींत उत्पन्न होतो; त्याचें थोडें सविस्तर विवेचन करणें भाग आहे. वर जीं भिन्नभिन्न मानववंशाचीं राष्ट्रें दिलीं आहेत, त्यांच्यांतील वंशभेद संकरविवाहामुळें आतां नष्ट झाले आहेत. फक्त अमेरिकेंतील नीग्रोचे तेथील गोऱ्यांशीं सरर्हा मिश्रविवाह होत नाहींत. असा वंशसंकर न होतांही राष्ट्रीय भावना निर्माण होणें शक्य आहे किंवा नाहीं असा एक प्रश्न या ठिकाणीं उत्पन्न होतो. या प्रश्नाला हिंदुस्थान, आफ्रिकेंतील व ऑस्ट्रेलियांतील युरोपियन वसाहति व अमेरिका या ठिकाणीं बरेंच महत्व प्राप्त झालेलें आहे. युरोपांत, ट्यूटॉनिक, लॅटिन, स्लॉव्ह वगैरें जे निरानिराळे मानववंश एकत्र झाले, त्यांच्या शरीररचनेंत, वर्णांत व एकंदर स्वरूपांत पुष्कळच साम्य असल्यामुळें त्यांच्यांत वंशसंकर लवकर होऊं शकला; परंतु अमेरिका, आफ्रिका, आस्ट्रेलिया व आशिया या खंडांत युरोपियन लोक येऊन राहूं लागल्यापासून या गोऱ्या लोकांस काळ्या, तांबड्या किंवा पिवळ्या अगर सावळ्या लोकांशीं आपला शरीरसंबंध होऊं नये, आपल्या राष्ट्रांत इतर वर्णीयांनीं रहावयाचें झाल्यास आपले गुलाम होऊन राहिलें पाहिजे, आणि सर्व जगांत आपलें अनिर्बंध वर्चस्व राहिलें पाहिजे असें वाटूं लागलें आहे. अमेरिकेंतील रक्तवर्णीय व आफ्रिकेंतील कृष्णवर्णीय बऱ्याच जातींचा यांनीं संहार केला असून इतरांना त्यांनीं आपले गुलाम बनविलें आहे. आशियांतील व विशेषतः हिंदुस्थानांतील जे लोक गोऱ्यांच्या वसाहतींत जाऊन राहिले आहेत, त्यांनाही हे गोरे वसाहतवाले समतेनें वागविण्यास तयार नाहींत. यामुळें ज्यांची शरीररचना व वर्णादि बाह्यस्वरूप अत्यंत भिन्न आहेत

वंशसंकर व एकराष्ट्रीयत्व.

अशा अनेक वंशांच्या लोकांचे एक राष्ट्र बनणें शक्य आहे किंवा नाहीं,या प्रश्नाला दिवसेंदिवस अधिकाधिक महत्व येत जाणार हें उघड दिसत आहे.

युरोपियन लोकांपुढें अलीकडे एक दोन शतकें उभा राहिलेला हा प्रश्न भारतीय आर्यांच्या पुढें हजारों वर्षें एकसारखा उभा आहे. हिंदुस्थानांत आर्य लोक आल्यापासून भिन्नभिन्न जातींच्या लोकांत एकराष्ट्रीयत्वाची भावना किंवा सहकार्य व स्नेहभाव कसा निर्माण करावा, या प्रश्नाकडे त्यांचें लक्ष लागलेलें आहे; व हा प्रश्न पूर्णपणें नसला तरी अंशतः तरी त्यांनीं सोडवून दाखविला होता असें म्हणण्यास हरकत नाहीं. आज हा प्रश्न सर्व जगापुढें उभा राहिला असल्यामुळें भारतीय आर्यांनीं तो कसा सोडविला होता, इकडे लक्ष देणें गैरवाजवी होणार नाहीं.

वंशभेदामुळें उद्भवणाऱ्या प्रश्नांचा निकाल भारतीय आर्य लावूं शकतील.

हल्लीं मानवी समतेचें तत्व पूर्वीपेक्षांही जास्त जोरांत पुढें आल्यामुळें प्राचीन भारतीयांच्याही पुढचा पल्ला हल्लींचे भारतीय गांठतील व आपल्या पूर्वजांप्रमाणेंच या बाबतींत जगाला धडा घालून देतील, अशी आशा बाळगण्यास पुष्कळ जागा आहे.; कारण देहाच्या पडद्याआड असणाऱ्या परब्रम्हस्वरूपाची ज्यांनीं ओळख करून घेतली, त्यांनींच वर्ण किंवा जाति या देहभावांतील द्वैत बाजूला सारून राष्ट्रैक्याची स्थापना करावी हें साहजिक आहे.

भारतीय आर्यांची चातुर्वर्ण्य व्यवस्था व ग्रामसंस्था यांचें सूक्ष्म दृष्टीनें निरीक्षण करणारांस त्यांनीं श्रमविभागाच्या तत्वाचा अवलंब करून भिन्न जातींच्या लोकांत परस्पर स्नेहभावना व राष्ट्रैक्यभावना निर्माण करण्यांत पुष्कळच यश मिळविलें होतें असें दिसून येतें. जातिभेद आणि भारतीय वर्णव्यवस्था यांत एक असा महत्वाचा भेद आहे कीं, जातिभेदामुळें व्यक्तीला आपल्या जातीच्याच हिताचा विचार करावा असें वाटतें; व वर्णव्यवस्थेमुळें

वर्णव्यवस्था व राष्ट्रीय भावना.

प्रत्येक वर्णांतील लोकांना आपण सर्व वर्णांची सेवा केली पाहिजे या कर्तव्याची जाणीव रहाते. अर्थात् पहिल्या भावनेमुळें व्यक्तीच्या कर्तव्याचें व सहानुभूतीचें क्षेत्र संकुचित होऊन राष्ट्रभक्तीचा परिपोष होत नाहीं; तर दुसऱ्या भावनेमुळें राष्ट्रांतील सर्व लोकांचा व आपला संबंध असून त्यांची आपण सेवा केली पाहिजे अशी जाणीव प्रत्येक व्यक्तीच्या अंतःकरणांत जागृत रहाते. पहिली भावना राष्ट्रीयत्वाला विनाशक होते तर दुसरी भावना राष्ट्रीयत्वाला पोषक होते. यामुळें ज्या ज्या वेळीं हिंदू लोकांत राष्ट्रीय भावना जागृत झाली होती, त्या त्या वेळीं लोकांचें चित्त जातिभेदापेक्षां वर्णाश्रमधर्माकडे अधिक वेधलेलें दिसून येतें. परंतु वर्णव्यवस्थेंतही मनुष्याचें कर्तव्य व योग्यता केवळ जन्मावरून ठरली जाणें व समाजोपयोगी धंद्यांत उच्चनीचभाव उत्पन्न होणें असले एकदोन दोष वाढत जाण्याचा संभव असतो. हे दोषही नाहींसे करण्याबद्दल भगवान् श्रीकृष्णापासून चालत आलेल्या भागवत-धर्माभिमानी लोकांनीं अनेक प्रयत्न केलेले आहेत. " स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः " या वचनानुसार समाजोपयोगी कोणतेंही कर्म मनुष्यानें निष्काम बुद्धीनें केलें तर तो सिद्धावस्थेस पोहचूं शकेल असें सांगून समाजोपयोगी सर्व कर्मांची योग्यता आध्यात्मिक दृष्टीनें सारखीच ठरवून दिली आहे. तसेंच " चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः " या श्लोकानें वर्णव्यवस्था केवळ जन्मावर अवलंबून नसून ती मनुष्याच्या गुणकर्मावरही अवलंबून असते असें सांगून ठेवलें आहे. या वेदांतांतील तत्वांचें प्रतिबिंब राजनीतिशास्त्राचा विचार करणाऱ्या पंडितांच्या ग्रंथांतही पडलेलें स्पष्ट दिसून येतें. शुक्रनीतींत सेनापतीची निवड करण्याविषयीं विवेचन चालूं असतां

सेनापति श्शूर एव योज्यस्सर्वासु जातिषु ।
ससंकरचतुर्वर्णधर्मोऽयं नैव पावनः ॥ अ० २ श्लो० ४३४

म्हणजे, सेनापति सर्व जातींतून जो कोणी शूर असेल

तो नेमावा, कारण चातुर्वर्ण्य शुद्ध नसून त्याचा संकर झालेला आहे, असें म्हटलें आहे. त्याचप्रमाणें अमात्यादि अधिकाऱ्यांचें लक्षण सांगत असतांना " नैव जातिर्न च कुलं केवलं लक्षयेदपि " म्हणजे, केवळ जात किंवा कुलच पाहूं नये असें सांगून " कर्मशीलगुणा: पूज्या: " म्हणजे मनुष्यांना त्यांचें कर्म (धंदा), शील व गुण पाहून मान द्यावा असें स्पष्ट सांगितलें आहे. त्याच्याच पुढें केवळ जातीनें किंवा कुलानें श्रेष्ठत्व मिळत नसतें असें म्हणून फक्त रोटीबेटीव्यवहाराच्या वेळीं कुलाचा व जातीचा विचार करावा (विवाहे भोजने नित्यं कुलजातिविवेचनम्) असा उपदेश केलेला आहे. असो. वरील विवेचनावरून भारतीय आर्यांनीं निरनिराळ्या जातींच्या लोकांत एकराष्ट्रीयत्वाची भावना पुढील तीन पायऱ्यांनीं निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचें दिसून येईल. (१) अनेक अलग जातींची भावना नष्ट करून चातुर्वर्ण्याची भावना जागृत करणें, (२) समाजांतील कोणतेंही कर्म हीन न मानणें, (३) मनुष्याचें श्रेष्ठत्व केवळ जन्मावरून न ठरवितां गुण, कर्म व शील यांवरून ठरविणें. या सर्व गोष्टी घडवून आणतांना त्यांनीं रोटीबेटीव्यवहारांतील जातिभेद नष्ट करण्यावर विशेष भर दिलेला दिसून येत नाहीं. त्याच बरोबर त्यांचे राष्ट्रैक्याचे प्रयत्न पूर्णपणें यशस्वी झाले नाहींत हीही गोष्ट लक्षांत घेणें अवश्य आहे.

जातिभेद नष्ट करून निरनिराळ्या जातींचें एक राष्ट्र बनविण्याच्या कामीं हिंदूंनीं उपयोगांत आणिलेलीं वर जीं तीन तत्वें सांगितलीं तीं बराच काळ सर्व लोकांच्या आंगीं पूर्णपणें भिनून गेल्यास जातीजातींत रोटीबेटीव्यवहारही सुरू होईल असें मानण्यास हरकत नाहीं. या भावनामुळेंच एकनाथासारखा सत्वशील ब्राह्मण संत, एका महाराच्या घरीं जेवावयास गेला होता ही गोष्ट इतिहासप्रसिद्ध आहे. तथापि तर्कदृष्टीनें सुसंगत दिसणारी ही अखेरची पायरी हिंदू लोकांकडून कधींही गाठली गेली नव्हती व बौद्ध, जैन वगैरे

जातिसंकर व राष्ट्रीय भावना

ज्या धर्मपंथांनीं पूर्वी ती पायरी गांठली किंवा ब्रह्मसमाज, आर्यसमाज वगैरे अलीकडील जे पंथ ती पायरी गाठूं इच्छितात, त्यांना सनातनी हिंदुधर्मीयांनीं आपणांपासून दूर केलें आहे हेंही खरें आहे. हल्लीं सनातनी हिंदु व बौद्ध, जैन, आर्यसमाज, ब्रम्हसमाज वगैरे पंथांच्या लोकांत पुनः ऐक्य होण्याचीं चिन्हें दिसत आहेत. या व हल्लीच्या इतर परिस्थितीचा विचार करितां हिंदूंतील जातिभेद आतां फार काळ कायम टिकेल असें वाटत नाहीं. तथापि निरनिराळ्या जातींचा पूर्ण संकर झाल्याखेरीज देशांत राष्ट्रीय भावना निर्माण होऊं शकत नाहीं हें मत मात्र हिंदु लोकांच्या ऐतिहासिक स्थितीवरून व हल्लींच्या स्थितीवरूनही निराधार ठरतें. राष्ट्रीय भावनेला जातिजातींतील स्नेहाची आवश्यकता आहे परंतु या स्नेहाच्या परिणाम संकरविवाहांत झालाच पाहिजे असें नाहीं. स्नेहामुळें विवाह होतील हें संभवनीय आहे, परंतु विवाहाच्या अभावीं स्नेह असूं शकत नाहीं. असें नाहीं, " ज्या लोकांना रक्ताची भेसळ करण्याची सदर परवानगी नाहीं, असे लोक सक्तीखेरीज किंवा केवळ द्रव्यलोभाखेरीज एकमेकांकरितां आपलें रक्त सांडण्यास तयार होत असल्याचें एक तरी उदाहरण सर्व जगांत सापडेल काय? आणि आपल्या जातिसंकराच्या आड येणारीं नैतिक बंधनें राष्ट्रीय ऐक्याच्या मार्गांत अडथळा करणार नाहींत अशी आपणांस आशा करतां येईल काय?" असें रवींद्रनाथ टागोर यांचे उद्गार आहेत; परंतु ते केवळ मराठे

---

1. " Have we an instance in the whole world where a people who are not allowed to mingle their blood, shed their blood for one another except by coercion or mercenary purposes ? And can we ever hope that these moral barriors against our race-amalgamation will not stand in the way of our political unity ? " Nationalism P. 124.

लोकांच्या इतिहासावरूनही निराधार ठरतील असें आम्हास वाटतें. राष्ट्रीयत्वाच्या बाबतींत लाला लजपतराय यांचे पुढील विचार जास्त सयुक्तिक दिसतात, "राष्ट्राच्या धार्मिक, सामाजिक, आर्थिक, व राजकीय जीवनांत पूर्णपणें एकरूपता असणें, किंवा त्यांतील जातिजातींतील किंवा धर्माधर्मांतील तंट किंवा मत्सर, यांचा अत्यंत लोप होणें, राष्ट्रीय भावनेला अगदीं अवश्य आहे,असें मानणें बरोबर नाहीं. असें होण्याची अपेक्षा करणें म्हणजे मनुष्यस्वभाव मुळींच लक्षांत न घेतां अशक्य गोष्टींची अपेक्षां करण्यासारखें आहे. राष्ट्रांतील भिन्न आचारविचारांच्या वर्गांत सामान्य संकटकाळीं, सामान्य शत्रूंविरुद्ध एक होण्याची जाणीव असली म्हणजे राष्ट्रीत्वाच्या परिपोषास पुरे आहे, असें माझें नम्र मत आहे. "

आतां एक धर्म आणि एक राष्ट्रीयत्व यांचा विचार केला तरी वरच्यासारखीच स्थिति दिसून येते राज्यांतील सर्व लोक एका धर्माचे असले, तर राष्ट्रीय भावना निर्माण होण्यास मदत होते, व धर्मभेदांमुळें राष्ट्रीय भावनेच्या वृद्धीला अडथळा होतो, हें खरें आहे; तथापि मतसाहिष्णुतेच्या तत्वाचा प्रसार झाल्यास भिन्न धर्मीय लोकांत एक राष्ट्रीयत्व निर्माण होऊं शकतें. धर्माभिमानामुळें राष्ट्राभिमान प्रज्वलित झाल्याचीं अनेक उदाहरणें इतिहासांत सांपडतात.

धर्म व राष्ट्रीय भावना.

मराठे लोकांनीं हिंदुस्थानांत हिंदुपदपादशाही स्थापन करण्याचा जो प्रयत्न केला, त्याच्या मुळाशीं धर्माभिमान होता ही गोष्ट सर्वश्रुत आहे. त्याचप्रमाणें एलिझाबेथ राणीच्या कारकीर्दींत स्पेनच्या फिलिपनें इंग्लंड

---

1. " It is wrong to suppose that the idea of nationalism or nationality requires a complete union in all details of religious, social, economical or political life, or that it requires a complete freedom from secterian quarrels or

जिंकण्यासाठीं आपलें अजिंक्य आरमार जेव्हां पाठविलें होतें, तेव्हां इंग्लिश लोकांत एकराष्ट्रीयत्व उत्पन्न करून त्या देशाचा बचाव करण्याचें कार्य त्यांनीं नुकत्याच स्वीकारलेल्या प्रोटेस्टंट धर्मपंथानें केलें हेंही सर्व इतिहासज्ञांस माहित आहे. युरोपांत प्रोटेस्टंट धर्मपंथ निघाल्यापासून कांहीं काळपर्यंत प्रत्येक राष्ट्रांत कॅथॉलिक व प्रोटेस्टंट असे दोन तट पडून एकसारखी यादवी माजली होती व राष्ट्रैक्याचा भंग झालेला होता. तथापि अखेरीला मतसहिष्णुतेच्या तत्वाचा प्रसार होऊन हे तंटे थांबले. हे तंटे इतके विकोपाला जाण्याचें एक मुख्य कारण, तत्काधीश राजेराण्यांनीं आपल्या मतांचा प्रसार दंडशक्तीच्या जोरावर सर्व प्रजाजनांत करण्याचा प्रयत्न केला, हें होय; परंतु धर्माच्या बाबतींत सरकारनें तटस्थ वृत्ति स्वीकारून प्रजेला धर्ममतांचें व आचारांचें पूर्ण स्वातंत्र्य द्यावें, हें तत्व भारतीय लोकांस फार प्राचीन काळापासून परिचयाचें झालेलें आहे. अशोक, अकबर, व शिवाजी यांसारख्या थोर राज्यकर्त्यांनीं कोणाच्याही धर्मस्वातंत्र्याचा अपहार न करतां, आपल्या राज्यांत निरनिराळया धर्माचे लोक सुखानें नांदावेत याबद्दल खबरदारी घेतलेली दिसून येते. हें तत्व आतां युरोपियन राष्ट्रांनींही स्वीकारल्यापासून जर्मनी, इटाली वगैरें राष्ट्रांत कॅथॉलिक व प्रोटेस्टंट पंथांचे लोक राष्ट्रसेवेच्या कार्यांत एक होऊं लागले आहेत. निरनिराळ्या

---

disputes or jealousies. In my humble opinion it is sufficient for the growth of nationality, that the differrent parts that claim the shelter of its ways, should have a sense of unity which is sufficient to make them combine against a common enemy or a common danger" Lala Lajpatrai. "The man in his word." P. 63.

धर्मांचे लोक एका राष्ट्रांत असल्यामुळें लोकांत एक प्रकारची उदारबुद्धि व मतसहिष्णुता दिसून येतात व त्यामुळें राष्ट्रैक्याला किंवा राष्ट्रसामर्थ्याला कमतरता न येतां उलट बळकटी येते असेंही कांहीं लोकांचें मत आहे. हें मत हिंदुस्थान, चीन व जपान या राष्ट्रांतील लोकांच्या इतिहासावरून साधार आहे, असें दाखवितां येतें. वुटिंगफँग या नांवाचें एक चिनी मुत्सद्दी, प्रो० विनय कुमार सरकार यांच्या " Chinese Religion through Hindu eyes. " या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत म्हणतात.

"धर्मभावनांविषयीं सहिष्णुता आणि तीन धर्मांचें अस्तित्व, यांचा चीनच्या ऐक्याला व आस्तित्वाला फार उपयोग झालेला आहे. हें मत विसंगत दिसेल, परंतु जगाच्या इतिहासासंबंधींचें माझें मत बरोबर असेल, तर एकाच धर्माला जागा देणारें व दुसऱ्या सर्व धर्मांना मज्जाव करणारें राष्ट्र-मग तो धर्म कितीही उत्तम असला तरी-चिरकाल टिकेल असा संभव नाहीं.

राष्ट्रांतील धर्मभेदाचे सुपरिणाम.

असल्या राष्ट्रांतील लोक साहाजिकपणेंच संकुचित वृत्तीचे व दुराग्रही असतात. आपला धर्मच सर्वांत श्रेष्ठ असा त्यांचा विश्वास असल्यामुळें, ते कूपमंडूकवृत्तीचे व असहिष्णु असे बनतात व इतर धर्मांतील सरस तत्वें समजून घेऊन त्यांचा अंगिकार करण्यांत त्यांना कमीपणा वाटतो. अशा स्थितींतील लोकांची विवेकबुद्धि जागृत रहात नाहीं, त्यांच्या विचारांचा प्रवाह साचून राहतो व त्यांची प्रगति होण्याऐवजीं त्यांची अधोगति होते. अशा राष्ट्राचा अधःपात होणें अगदीं स्वाभाविक आहे "

---

1. " Toleration of religious beliefs and the embracing of three religions have done much to keep China coherent

जपानी राष्ट्रांतही शिंटोधर्मी, बुद्धधर्मी व ख्रिस्ती लोक एक भावानें राष्ट्रसेवा करीत आहेत, असें दिसतें. भारतीय आर्य लोकांत अगदीं प्राचीन काळापासून सर्व धर्म व पंथ अखेरीस एकाच ठिकाणीं नेऊन पोहचवितात, हें उदात्त धर्मतत्व रूढ आहे. राम व रहिम, किंवा अल्ला व परमेश्वर हे एकच आहेत, असे मानणारे अनेक साधुसंत या देशांत होऊन गेलेले आहेत. तत्वज्ञानी लोकांत गौतमबुद्धाच्या नास्तिक मतांबद्दल कितीही अनादर असला तरी सामान्य हिंदू लोक त्याला परमेश्वराचाच अवतार समजतात. कबीर, मलिकदास, दादू, चैतन्य, तुकाराम, एकनाथ, नानक, रामकृष्ण परमहंस, विवेकानंद, रामतीर्थ वगैरे सर्व प्राचीन अर्वाचीन महतांनीं सर्व धर्म तत्वतः एकच आहेत किंवा एकाच समुद्राला पोहोचणारे ते निरनिराळे प्रवाह आहेत, हें तत्व हिंदी लोकांना उपदेशिलेलें आहे. हें मतसहिष्णुतेचें तत्व " एकं सद्विप्रा बहुधा वदंति " या वैदिक सिद्धांतावरून चार पांच हजार वर्षें भारतीयांच्या परिचयाचें असलेलें स्पष्ट दिसत आहे. भारतीयांच्या अर्वाचीन राष्टीय चळवळीचा तर तो एक आधारस्तंभच होऊन बसलेला आहे.

---

and intact. This may appear to be paradoxical, but if I read the history of the world aright, a nation embracing one solitary religion, however excellent it may be, and prohibiting all others, is not likely to exist permanantly. The people of such a nation are naturally narrow-minded and begoted, and believing thht their religion is the best in the world, they are self-sufficient and intolerant and will not condescend to hear or learn better religious truths when the people are in such condition, their mental activity lies dormant and their minds are stag-

आतां एक भाषा व एक वाङ्मय यासंबंधीं विचार केला तरी यांपैकीं कोणतीही एक गोष्ट राष्ट्रीयत्वाला अगदीं अवश्य आहे, असें म्हणतां यावयाचें नाहीं. एक भाषा असली म्हणजे सामान्यतः एक संस्कृति व एक वाङ्मय दृष्टीस पडतात, परंतु प्रचलित भाषा एक नसली म्हणजे एक संस्कृति असणार नाहीं असें नाहीं. उदाहरणार्थ मराठी, गुजराथी, बंगाली, हिंदी, सिंधी वगैरे अनेक भाषा बोलणाऱ्या हिंदु लोकांची संस्कृति एक नाहीं असें कोण म्हणेल ? वरील सर्व भाषा एकाच संस्कृत भाषेपासून निघालेल्या असून त्या भाषेंतील वाङ्मयासंबंधीं व सांस्कृतिक विचारांसंबंधीं त्या भाषा बोलणाऱ्या सर्व हिंदु लोकांस सारखाच अभिमान व आदर वाटत असतो. भाषा ही मनुष्यांच्या सर्व व्यवहारांना अवश्य असणाऱ्या विचारविनिमयाचें साधन आहे. हें खरें असलें तरी त्यावरून एका राष्ट्रांतील सर्व लोकांची मातृभाषा एकच असली पाहिजे असें सिद्ध होत नाहीं. विचारविनिमयाचें कार्य भागविण्यास दुसरी एखादी भाषा उपयोगी पडणें शक्य आहे. हिंदुस्थानाचेंच उदाहरण घेतल्यास निरनिराळ्या भाषा बोलणाऱ्या अनेक लोकांत विचारविनिमयास साधनीभूत होऊन इंग्लिश भाषेनें त्यांच्यांत राष्ट्रीय भावना निर्माण करण्यास बरीच मदत केलेली दिसून येते. यापुढें हें कार्य हिंदीभाषेमार्फत व्हावें, याबद्दल देशभक्त पुढाऱ्यांचे प्रयत्न चालू आहेत. हिंदी राष्ट्रीय भावनेस केवळ इंग्लिश भाषेचाच आधार आहे असें मानणें मात्र चुकीचें आहे. या भावनेला

राष्ट्रीय भावना व भाषा.

---

nant and instead of progressing they will degenerate; hence the downfall of the nation is natural „ Quoted in " Towards Home Rule " Part I.P. 160. by R. V. Chatterjee.

खरा आधार संस्कृत व आरबी भाषांचा आहे. सर्व प्रांतांना सामान्य अशा हिंदू व मुसलमानी संस्कृतीच्या आधारावरच हिंदी राष्ट्रीयत्वाची उभारणी झालेली आहे. इंग्रजी भाषा व तिच्या वाङ्मयांतील कांहीं सांस्कृतिक विचार यांच्या योगानें अर्वाचीन हिंदी राष्ट्रीय भावनेला पुष्कळ मदत केलेली असली, तरी ती भाषा व तिच्यांतील सांस्कृतिक विचार अगदीं परकीय असल्यामुळें ती एका दृष्टीनें राष्ट्रीय भावनेला मारकही झालेली आहे. देशांतील सर्व मुलांचें शिक्षण इंग्रजी भाषेंतून होत असल्यामुळें निरनिराळ्या प्रांतांतील सुशिक्षित लोकांत विचारविनिमय होण्यास मदत झाली तरी त्यामुळें एकाच प्रांतांतील सुशिक्षित व अशिक्षित लोकांतील विचारांत फार अंतर पडत गेलें. सुशिक्षित लोकांचें सर्व शिक्षण परकीय भाषेंतून होत असल्यामुळें राष्ट्रीय संस्कृतीशीं त्यांचा परिचय राहात नाहीं व त्यांच्या सर्व विषयांवरील विचारांना परकीय वळण लागत जातें. या दृष्टीनें विचार केल्यास देशांतील शिक्षणक्रमांत इंग्रजी भाषेला वाजवीपेक्षां फाजील महत्व दिल्यानें ती भाषा राष्ट्रीयत्वाला मारकही झालेली आहे, हें कबूल करावें लागेल. असो. आपणांस येथें एवढेंच दाखवावयाचें आहे कीं, निरनिराळ्या भाषा बोलणाऱ्या लोकांत विचारविनिमयापुरती एखादी भाषा मिळाल्यास राष्ट्रीय भावनेची वाढ होऊं शकते. येथपर्यंत हिंदुस्थानाचेंच उदाहरण घेऊन चर्चा केली. युरोपांतील उदाहरण हवें असल्यास स्विट्झर्लंडचें देतां येईल. या राष्ट्रांत एकंदर तीन भाषा चालू आहेत, तरी तेथील लोकांची राष्ट्रीय भावना जोरांत आहे.

राष्ट्रिय भावनेला राष्ट्रांतील सर्व लोकांची भाषा वाङ्मय किंवा संस्कृति एकच असली पाहिजे, असें जरी अवश्य नाहीं तरी त्या

राष्ट्रांत जे लोक राहतात त्यांच्या भाषेहून किंवा वाङ्मयाहून इतर भाषेचा अगर वाङ्मयाच्या विशेष पगडा तेथील लोकांवर बसणें राष्ट्रीय भावनेला मारक होतें. परतंत्र राष्ट्रांत असें घडण्याची नेहमीं भीति असते. वर इंग्रजी भाषेचें उदाहरण देऊन ती हिंदी राष्ट्रीयत्वाला मारक कशी झाली हे दाखविलेंच आहे. आयर्लंडच्या उदाहरणावरूनही ती गोष्ट दिसून येते. तेथें राष्ट्रीय चळवळ सुरू होतांच ' गेलिक लीग ' नांवाची संस्था स्थापन होऊन " गेलिक " भाषेचा अभ्यास करून राष्ट्रीय संस्कृतीकडे लोकांचें चित्त वेधून घेण्याचे प्रयत्न तेथील विचारी लोकांनीं सुरू केले. यावरून राष्ट्रीय वाङ्मयाचा अभ्यास व राष्ट्रीय भावना यांचा कसा निकट संबंध आहे, हे दिसून येतें. तसेंच आयरिश तरुणांवरही इंग्रजी भाषेचा वाजवीपेक्षां फाजील पगडा बसला होता, तो आपल्या राष्ट्रीयत्वाला मारक झाला असें आयरिश राष्ट्रभक्तांचें मत आहे.

राष्ट्रीय भाषा व राष्ट्रीय भावना.

राष्ट्रीय भावना जागृत होण्यास बराच काळ एका राज्यांत राहण्याचा फार उपयोग होतो. हिंदुस्थानात अर्वाचीन राष्ट्रीय भावना निर्माण होण्यास ब्रिटिश अमलाचा अप्रत्यक्षपणें पुष्कळ उपयोग झालेला आहे, हें कबूल केलें पाहिजे. तथापि सर्व हिंदुस्थान एकछत्री अमलाखालीं असावें व तें राष्ट्र आहे, हीं कल्पना केवळ इंग्लिश अमलामुळेंच उद्भूत झाली आहे, असें समजणें योग्य होणार नाहीं. हिंदुस्थान हें एक राष्ट्र असून तें एकाच राज्याखालीं असावें, या भावनेचें बीजारोपण फार प्राचीन काळापासून हिंदूंच्या अंतःकरणभूमिकेंत झालेलें आहे. या कल्पनेला पहिल्यानें मूर्त स्वरूप देण्याचें कार्य श्रीरामचंद्रांनीं लंका जिंकून परत आल्यावर अश्वमेध यज्ञ करून केलें, अशी येथील लोकांची पूर्वापार समजूत आहे. श्री रामचन्द्राच्या अभिषेक-

एक राष्ट्र व एक राज्य.

प्रसंगीं हिंदुस्थानांतील सर्व आर्य व अनार्य राजे हजर असून त्यांनीं श्री रामचन्द्राचें मांडलिकत्व मान्य केलें. यावेळपासूनच आर्यसंस्कृतीची पत्ताका सर्व हिंदुस्थानांत रोविली गेली व आर्य व अनार्य यांच्यांतलि तंटा मिटला. यानंतर कोणताही पराक्रमी पुरुष राजपदावर आला तरी सर्व हिंदुस्थान एक छत्राखालीं आणणें, ही त्याची महत्वकांक्षा असे.बुद्धधर्मी सम्राट अशोक व त्यानंतर समुद्रगुप्त यांनीं जवळजवळ सर्व भरतखंड आपल्या ताब्यांत आणिलें होतें. मोगल बादशहांचीही तीच महत्वाकांक्षा असून तिला औरंगजेबाच्या कारकीर्दींत बरेंच मूर्तस्वरूप प्राप्त झालें होतें. पुढें मराठेशाहीचे प्रस्थापक शिवछत्रपती यांनींही तीच महत्वाकांक्षा धरून हिंदु-पदपातशाहीची मुहूर्तमेढ रोविली व तें कार्य जवळजवळ तडीस जाण्याचा प्रसंग आलाही होता. इतक्यांत इंग्लिशांनीं मध्येंच शिरून मराठ्यांचा पराभव केला व हिंदुपदपातशाहीच्या ऐवजीं आपला अंमल सर्व हिंदुस्थानांत प्रस्थापित केला. ज्या वेळीं इंग्लीश राज्य येथें स्थापन झालें, त्याच वेळीं सर्व हिंदुस्थानांत कोणती तरी एकच सार्वभौम सत्ता नांदू शकेल, अशी परिस्थिती निर्माण झाली होती; पण ती परिस्थिति निर्माण करण्याचें श्रेय इंग्लिशांना मिळू शकत नाहीं. उलट त्या परि-स्थितीमुळेंच त्यांनीं सर्व हिंदुस्थान जिंकला, असें त्यांचें म्हणणें आहे. इंग्लिश राज्य होण्यापूर्वीं हिंदू लोकांची हिंदुराष्ट्रासंबंधीं काय कल्पना होती, हें गोविंदराव काळे यांनीं निजामच्या राजधानींतून नाना फडनवी-सांस लिहिलेल्या पत्रांतील पुढील उताऱ्यावरून सहज ध्यानांत येईल.

" पत्र पाहतांच रोमांच उभे राहिले. अति संतोष झाला. (नाना व महादजी यांच्यांतील वैमनस्य कमी झाल्याबद्दल). अटक नदीचे अली-कडे दक्षिण समुद्रापावेतों हिंदूंचें स्थान, तुरकस्थान नव्हे. हे आपली सीमा पांडवापासून विक्रमाजित पावेतो. त्यांनीं राखून उपभोग घेतला.

त्यामागें राज्यकर्ते नादान निघाले......झालया गोष्टी यांत केवळ मुलुख राज्य प्राप्त इतकेंच नाहीं तरी वेदशास्त्ररक्षण, गोब्राह्मणप्रतिपालन, **सार्वभौमत्व हातीं लागणें**, कीर्ति यश यांचे नगारें वाजणें इतक्या गोष्टी आहेत. " Quoted in Hindutva by a marattha " P. 58 to 60.

भविष्य पुराणांत शालिवाहान राजाविषयीं म्हटलें आहे ' सिंधुस्थानमितिज्ञेयं राष्ट्रमार्यस्य चोत्तमम्। म्लेच्छस्थानं परं सिंधोः कृतं तेन महात्मना॥" यावरूनही हिंदुस्थान हें आर्य लोकांचें राष्ट्र आहे, अशी पूर्वीपासून कल्पना असलेली दिसून येते. तसेंच या राष्ट्राचें ध्येय आर्यसंकृतीचें संरक्षण व संवर्धन असेंही ठरून गेलेलें आहे.

या ठिकाणीं राष्ट्रीय भावना व राष्ट्रीय ध्येय, यांच्या संबंधांचा विचार केला पाहिजे. राष्ट्रीय भावना निर्माण करण्याच्या कामीं एक ध्येयाचा जितका उपयोग होतो तितका कोणत्याही एका कारणाचा होऊं शकत नाहीं. कोणत्याही लोकांच्या अंतःकरणांत कांहीं कारणामुळें राष्ट्रीय ध्येयाचा उदय झाला म्हणजे त्यांच्या राष्ट्रीय भावनेचा जोम झपाट्यानें वृद्धिंगत होऊं लागतो. इटालियन देशभक्त मॅझिनी यानें गेल्या शतकांत युरोपांत राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या तत्वाचा पुष्कळ प्रसार केला, व राष्ट्रधर्माची कल्पना लोकांना आणून दिली. राष्ट्रीयत्वाच्या भावनेला आध्यात्मिक किंवा धार्मिक स्वरूप देण्याचें कार्य यानें उत्तम प्रकारें बजाविलें आहे. लोकसत्तेच्या तत्वाचा प्रसार करून फ्रेंच राज्यक्रांति घडवून आणण्यांत रूसो या तत्वज्ञान्याचा जितका भाग आहे, त्याहूनही राष्ट्रीय स्वातंत्र्याचा पुरस्कार करून इटालियन स्वातंत्र्य स्थापन करण्यांत मॅझिनचा अधिक भाग आहे. ऑस्ट्रिया, प्रशिया व राशिया या तिघांनीं पोलंडचे तुकडे पाडून ते वाटून घेण्याचा जो अश्लाघ्य प्रयत्न चालविला होता, त्याच्या

राष्ट्रीय भावना
व
राष्ट्रीय ध्येय.

प्रतिक्रियेंतून राष्ट्रीय भावनेचा अंकुर प्रथम युरोपांत उभ्दवला. त्यानंतर फ्रेंच राज्यक्रांतीच्या प्रसंगीं लोकसत्तेचें व लोकस्वातंत्र्याचें जें तत्व सर्व युरोपांत पसरलें, त्यामुळें या अंकुरास चांगलाच जोम आला. या राष्ट्रीय भावनेच्या सहाय्यानेंच नेपोलियन बादशहानें सर्व युरोपांत प्रस्थापित केलेलें साम्राज्य युरोपियन राजांनीं व त्यांच्या पदरच्या मुत्सद्यांनीं उलथून पाडलें, परंतु नेपोलियनच्या पराभवानंतर व्हिएन्नाच्या कॉंग्रेसमध्यें जेव्हां युरोपची नवी रचना करण्यासाठीं हे राजे व मुत्सद्दी जमले तेव्हां त्यांनीं या राष्ट्रीय भावनेची पूर्ण गळेचेपी केली. हा इतिहास पाहून मॅझिनीच्या सात्विक मनोवृत्ति उचंबळून गेल्या व राष्ट्रीय स्वातंत्र्य व शुद्ध लोकशाही या दोन तत्वांच्या प्रसारांत त्यानें सर्व आयुष्य वेंचिलें. परतंत्र राष्ट्रां-

मॅझिनीचें कार्य

तील लोक अद्यापि त्याचे ग्रंथ मोठ्या आवडीनें व आदरानें वाचतात. कोणत्याही लोकांना राष्ट्र ही पदवी प्राप्त होण्यापूर्वीं त्यांच्या अंतःकरणांत कांहीं तरी उच्च ध्येयाचा उदय झालेला असला पाहिजे, किंवा जगाच्या संस्कृतींत कांहीं तरी विशिष्ट भर टाकण्याची महत्वाकांक्षा त्या लोकांनीं धरलेली असली पाहिजे, असें मॅझिनीचें मत होतें. जगदुद्धारार्थ एखादें विशिष्ट कार्य करणें हें ज्यांचें ध्येय नाहीं, त्या लोकांना राष्ट्र म्हणतां येणार नाहीं, असें तो म्हणे. राष्ट्र हें एक मानवसेवाधर्माची दीक्षा घेतलेल्या लोकांचें मिशन (धार्मिक संप्रदाय) आहे अशी त्याची समजूत होती.

लोकसत्तेचें तत्त्व आणि राष्ट्रीय भावना यांचा फार निकट संबंध आहे. लोकसत्ताक संस्थांमुळें ही भावना समाजांतील सर्व वर्गांत सतत जागृत राहते व त्यांच्यामुळें तिचें सामर्थ्य फार वाढतें. फ्रेंच राज्य-

लोकसत्ता व राष्ट्रीयत्व

क्रांतीच्या वेळीं लोकसत्तेच्या तत्वाबरोबरच या भावनेची प्राणप्रतिष्ठा युरोपियन राष्ट्रांत झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं. याचा अर्थ त्या काळापूर्वीं लोकांत राष्ट्रीय भावना मुळींच नव्हती असा नाहीं, परंतु तिच्या अंगीं तोंपर्यंत फारसें सामर्थ्य

आलें नव्हतें. राज्यांच्या मर्यादा ठरवितांना लोकांच्या राष्ट्रीय भावनेचा विचार न करितां राजघराण्यांतील पुरुषांच्या वारसाहक्कांप्रमाणें त्या ठरविल्या जात असत. राज्य म्हणजे राजांच्या मालकीची जिंदगी, ती त्यानें वाटेल त्यास विकावी, आंदण द्यावी किंवा तिची आपल्या वारसांत वाटणी करावी, जवळचा वारस नसल्यास दूरच्या एखाद्या राज्यास ती जोडली जावी किंवा जावयाला ती मिळावी, असे प्रकार एकसारखे घडत असत. राष्ट्रावर खरी मालकी तेथील लोकांची असून राजा हा त्यानीं संरक्षणार्थ नेमिलेला अधिकारी आहे, हें तत्त्व पूर्णपणें लुप्त झालें होतें. त्याचें पुनरुज्जीवन लोकसत्तेच्या तत्वाबरोबरच अठराव्या शतकाच्या अखेरीस युरोपांत झालें. या वेळेपासून राज्यांच्या मर्यादा ठरविण्याच्या कामीं प्रजेला स्वयंनिर्णयाचा अधिकार असावा, हें तत्त्व पुढें आलें. युरोपांत अशा प्रकारें लोकसत्तेच्या तत्वाचा नव्या व अधिक शुद्ध व स्पष्ट स्वरूपांत पुनरुद्धार होत असतां त्या तत्वाचा व त्याचबरोबर राष्ट्रीय भावनेचा हिंदुस्थानांतील सामान्य लोकांतून पूर्णपणें लोप होत होता, ही अत्यंत खेदाची गोष्ट आहे. युरोपांतील प्रजा आपल्या अधिकारांच्या प्राप्तीकरितां स्वकीय राजांशीं व सरदारांशीं उघड युद्धें करीत असतां हिंदुस्थानांतील सामान्य लोक मोठ्या आनंदानें स्वतःचें अधिकार परकीय राज्यकर्त्यांच्या हवालीं करीत होते; किंबहुना राजकीय बाबतींत सामान्य लोकांना कांहीं अधिकार असतात याची त्यांची जाणीवही बुजून गेली होती. हिंदुस्थान देश ब्रिटिशांच्या ताब्यांत गेला, याचें कारण ब्रिटिशांच्या अंगचे अलौकिक गुण हे नसून हिंदी लोकांतील राष्ट्रीय भावनेचा अभाव हेंच आहे असें सर जॉन सीले यांनीं आपल्या “ इंग्लंडचा विस्तार ” या पुस्तकांत म्हटलें आहे, तें सर्वस्वीं खरें आहे. आतां फिरून ही भावना हिंदी अंतःकरणांत जागृत झालेली आहे. तिची बीजें

किंवा पाळेंमुळें मात्र अगदीं नवीं नसून ती फार प्राचीन काळापासून अस्तित्वांत आहेत. हिंचा प्रभाव या शतकाच्या प्रारंभापासून दिसूं लागला. इतर सर्व अर्वाचीन राष्ट्रीयत्वांप्रमाणें हिंदी राष्ट्रीयत्वही लोक-सत्ताक स्वरूपाचेंच आहे व असलें पाहिजे. हिंदुस्थान हें एक राष्ट्र आहे तें एकछत्री अमलाखालीं असलें पाहिजे, आणि भारतीय संस्कृतीचें संरक्षण व संवर्धन करणें हें त्यांचें परंपरागत कर्तव्य आहे, या भावना पूर्वीच्याच आहेत. मराठेशाहीच्या प्रस्थापनेपूर्वीं त्या जागृतही झाल्या होत्या, परंतु त्यावेळेपेक्षां आज त्यांचें स्वरूप अधिक शुद्ध व स्पष्ट झालें आहे. भारतीय संस्कृतीची कल्पनाही आज अधिक व्यापक झाली आहे. आजची भारतीय संस्कृति ही केवळ आपणांस सनातनी म्हणवून घेणाऱ्या हिंदूलोकांचचि संस्कृति उरलेली नसून, सनातनी हिंदु, आर्यसमाज, ब्रह्मसमाज, जैनधर्म, बुद्धधर्म, किंबहुना मुसलमान लोकही जिचा अभिमान धरूं शकतील अशी ती बनलेली आहे. आजच्या भारतीय राष्ट्रीयत्वाच्या बुडाशींही धर्माभिमानच आहे, परंतु तो सनातन धर्म व्यावर्तक नसून सर्वव्यापक बनलेला आहे. आजचे राष्ट्रीय पुढारी वेद किंवा भगवद्गीता यांच्या इतकाच बायबल व कुराण यांना मान देतात आणि श्रीकृष्णाच्या नामाइतक्याच प्रेमानें गौतमबुद्ध, येशूख्रिस्त, महंमद पैगंबर, या विभूतींचीं नामें उच्चारितात. " यद्यय-द्विभूतिमत् सत्वं श्रीमदूर्जितमेववा। तत्तदेवावगच्छ त्वं ममतेजोंशसंभवम् ॥ " या गीतोक्तीच्या आधारें भारतमाताच आज हजारों लोकांची इष्ट-देवता झाली आहे, तिची निष्काम बुद्धीनें सेवा करणें हेंच त्यांचें कर्म-कांड झालेलें आहे. तिची शरीरानें कष्टमशागत करणारे ते शूद्र, तिला अलंकारांनीं विभूषित करणारे ते वैश्य, तिच्याकरितां प्राणत्याग करणारे ते क्षत्रिय व आपल्या तपोबलानें तिच्या आध्यात्मिक विचारांत

भर घालणारे ते ब्राम्हण, अशी व्यापक दृष्टी आज लोकांना प्राप्त झाली आहे, होत आहे, व व्हावयास पाहिजे आहे.

राष्ट्रीय स्वातंत्र्याचा हक्क.

राष्ट्रीयत्वविशिष्ट अशा प्रत्येक लोकांना स्वतंत्र राज्य स्थापन करण्याचा नैतिक हक्क असावा किंवा नाहीं, हा एक अर्वाचीन राजकारणांतील वादग्रस्त मुद्दा आहे. या प्रश्नाचें सर्व साधारण असें कांहींच उत्तर देतां येणार नाहीं. एका राज्यांत अनेक राष्ट्रांचा समावेश होत असेल, तर त्यांतील प्रत्येक राष्ट्रानें स्वतंत्र राज्य स्थापून राहणें उत्तम कीं एकाच राज्यांत राहणें उत्तम हें ठरविण्यापूर्वीं एका राज्यांत राहण्यापासून त्यांतील एखाद्या राष्ट्राची संकृति किंवा वैशिष्ट्य अगदीं नष्ट होत आहे किंवा नाहीं, त्याला त्या राज्यांत स्वाभिमानानें व समान दर्जानें राहतां येणें शक्य आहे किंवा नाहीं, व सर्वांच्या उन्नतीला त्या राज्यांत सारखाच अवकाश मिळतो किंवा नाहीं, या प्रश्नाचा विचार झाला पाहिजे. आपल्या न्याय्य हक्कावर गदा येत नसेल, आपणास समानतेचा दर्जा मिळत असेल व आपलें राष्ट्रीयत्व संभाळून एका राज्यांत राहणें शक्य असेल, तर कोणत्याही लोकांनीं आहे तें राज्य मोडून स्वतंत्र राज्य स्थापन करण्याचा प्रयत्न करूं नये, हें मत सकृद्दर्शनीं योग्य दिसतें पण त्यांत व्यावहारिक अडचणी फार आहेत. अनेक राष्ट्रांना समतेनें व स्वाभिमानानें नांदतां येईल अशी राज्यव्यवस्था अद्यापि जगांत अस्तित्वांत आलेली नाहीं. अमेरिकेसारख्या संयुक्त राज्यव्यवस्थेमुळें अनेक राष्ट्रांनां एका राज्यांत राहणें शक्य होईल अशी कांहीं काळ समजूत होती; परंतु संयुक्त राज्यांतील पोटराज्यांत राष्ट्रीयत्वाची भावना पूर्णत्वानें उद्भूत झाल्यास संयुक्तराज्य टिकूं शकणार नाहीं, संयुक्तराज्यव्यवस्था पोटराज्यां-

तलि राष्ट्रीयभावना मारून टाकतें, असे डायसी या ग्रंथकारानें स्पष्ट मत देऊन, ब्रिटिश वसाहतींत राष्ट्रीय भावना वाढत असल्यामुळें ब्रिटिश साम्राज्याला संयुक्तराज्याचें स्वरूप देण्याचा प्रयत्न केल्यास तो अयशस्वी होईल, असा आपला अभिप्राय त्यानें आपल्या " लॉ ऑफ दी कॉन्स्टीट्यूशन " या पुस्तकांत व्यक्त केला आहे. ब्रिटिशसाम्राज्यांतील घटक राष्ट्रांनीं सतत एकत्र रहावें असें मानणाऱ्या लोकांनीं आतां संयुक्तसाम्राज्याची (Imperial Federation) भाषा सोडून देऊन "इंडो-ब्रिटिश कॉमन वेल्थ ऑफ नेशन्स " अशा नावानें नव्या योजना लोकांपुढें मांडण्यास सुरवात केली आहे, यावरूनही अनेक राष्ट्रांना एकत्र नांदविण्यास संयुक्त राज्यव्यवस्था अपुरी आहे, हेंच सिद्ध होतें. आम्हाला येथें एवढेंच सांगावयाचें आहे कीं, विश्वबंधुत्वाच्या किंवा इतर कोणत्यही ध्येयाच्या मागें लागून आपलें राष्ट्रीयत्व न गमावणें यांतच अंतर्गत-राष्ट्रांचें व जगताचें हित आहे. हें न गमावितां इतर राष्ट्राशीं जितकें सख्य व सहकार्य करणें शक्य असेल तितकें अवश्य करावें. येथून पुढें सर्व जगांत एकच संस्कृति नांदणार असली किंवा जगांतलि सर्व द्वंदें नष्ट होऊन सर्व राष्ट्रांचा एकाच राज्यात समावेश होणार असला, तरी त्या संस्कृतींत जितकी जास्त विविधता असेल तितकें तिचें स्वरूप जास्त स्पृहणीय होईल. व त्या जगद्व्याळ राज्यांतील घटक राष्ट्रांना जितकें अधिक स्वातंत्र्य उपभोगितां येईल, तितकें तें राज्य अधिक अधिक चिरस्थायी होईल. वास्तव कोणत्याही कारणामुळें एका राष्ट्रांतील लोकांनीं दुसऱ्या राष्ट्रांतील लोकांचें राष्ट्रीयत्व नष्ट करण्याचा प्रयत्न करणें हें नैतिक दृष्टीनें गर्हणीय समजलें पाहिजे व अशा प्रयत्नांना यश येण्याचाही बहुतेक संभव नसतो, हें व्यावहारिक दृष्टीनें मान्य केलें पाहिजे.

1. See Dicey's Law of the Constitution (New Edition) Introduction xxix.)

राष्ट्रीयभावनेच्या फाजील अतिरेकानें एका राष्ट्राचें दुसऱ्या राष्ट्राशीं असें गर्हणीय वर्तन होत असतें. ज्याप्रमाणें परमेश्वराचीं निरनिराळीं प्रतीकें पुढें ठेवून मूर्ख किंवा मत्सरी लोक आपापसांत भांडत राहतात, त्याचप्रमाणें केवळ आपलें राष्ट्रच ईश्वराची विभूति आहे, असें मानणारे राष्ट्रधर्मप्रचारक पुष्कळ वेळां इतर राष्ट्रांचा द्वेष किंवा तिरस्कार करितात. आपलें राष्ट्र हें परमेश्वराच्या अनेक प्रतीकांपैकीं एक प्रतीक आहे व परमेश्वर सर्वत्र सारखाच भरलेला आहे; अशी अद्वैतदृष्टी कायम ठेऊन, मानवजातीशीं असलेलें आपलें कर्तव्य किंवा आपला मानवधर्म, यांचें विस्मरण न होऊं देतां राष्ट्रदेवतेची उपासना करण्यापासून व्यक्तींची व राष्ट्रांची उन्नति झाल्याखेरीज राहणार नाहीं.

राष्ट्रधर्म व मानवधर्म.

प्रकरण ४ थें.

राज्यांची उत्पत्ति व स्थिति.

(कांहीं भ्रामक उपपत्ति)

" मात्स्यन्यायाभिभूताः प्रजा मनुं वैवस्वतं राजानं चक्रिरे।
धान्यषड्भागं पण्यदशभागं हिरण्यं चास्य भागधेयं प्रकल्पयामासुः"॥
कौटिल्य अर्थशा०

" अराजके हि लोकेऽस्मिन् सर्वतो विद्रुते भयात् ।
रक्षार्थमस्य सर्वस्य राजानमसृजत्प्रभुः " ॥
मनुस्मृति. अ० ७ श्लो० ३

वरील दोन अवतरणें कौटिल्याचें अर्थशास्त्र व मनुस्मृति यांतून घेतलेलीं आहेत. पहिल्या अवतरणांत मात्स्यन्यायानें त्रासलेल्या प्रजांनी वैवस्वत मनूला राजा केलें व त्यावेळीं धान्याचा सहावा भाग, पण्याचा (म्ह० विकावयाच्या वस्तूंचा) दहावा भाग व हिरण्य असें त्याचें भागधेय किंवा वेतन ठरवून दिलें, असें म्हटलें आहे.

राज्यांसंबंधीं

मात्स्यन्याय म्हणजे ज्याप्रमाणें मोठे मासे लहान माशांना खाऊन टाकतात त्याप्रमाणें प्रबल लोकांनीं दुर्बलांवर जुलूम करण्याची अराजक स्थिती, असा अर्थ अभिप्रेत आहे. अर्थात् लोकांनीं अराजक स्थितींतील अनव-

स्थेला कंटाळून प्रथम राजा निर्माण केला, त्याच्याशीं आपल्या संरक्षणार्थ अमुक एक वेतन देण्याचा करार केला, व त्या कराराप्रमाणें राजांनीं व प्रजांनीं परस्परांसंबंधींचीं आपापलीं कर्तव्यें करावींत, अशा प्रकारची राज्यांच्या उत्पत्ति व स्थितिसंबंधीची कराराची उपपत्ति कौटिल्यानें आपल्या अर्थशास्त्रांत लोकांपुढें मांडली आहे. राज्याच्या उत्पत्ति स्थितीसंबंधींची ही कराराची उपपत्ति पाली भाषेंतील बौद्धमताच्या ग्रंथांत जास्त स्पष्ट स्वरूपांत आलेली आहे. या संबंधींची दुसरी उपपत्ति मनुस्मृतींतील वरील अवतरणांत ग्रथित झालेली आहे. मनू म्हणतो अराजक स्थितींतील लोक भयामुळें सर्व दिशांनीं पळत सुटले असतां सर्वांच्या संरक्षणासाठीं प्रभूनें म्हणजे परमेश्वरानें राजा निर्माण केला. पहिल्या उपपत्तीस आपण मानवी कराराची उपपत्ति असें नांव दिल्यास दुसऱ्या उपपत्तीस दैवी उपपत्ति असें नांव देतां येईल. यांशिवाय राज्यांच्या उत्पत्तिस्थितीसंबंधीं तिसरी एक उपपत्ति आहे तिला आपण "आसुरी उपपत्ति" असें नांव देऊं. ही उपपत्ति राज्य या संस्थेच्या टीकाकारांत विशेष प्रचलित असलेली दिसते, व राज्यांच्या जुलमाकडेच दृष्टी देणाऱ्या सामान्य लोकांचे विचार म्हणून तिचा अप्रत्यक्ष उल्लेख अर्थशास्त्रांत सापडतो. या उपपत्तीला अनुसरून राज्याची उत्पत्ति व स्थिति केवळ बाहुबलाच्या आसुरी शक्तीवर अवलंबून असते, असें कांहीं लोक मानितात. अशा प्रकारें राज्यांच्या उत्पत्ति व स्थितीसंबंधानें ऐतिहासिक काळांत तीन उपपत्ति बसाविण्यांत आल्या होत्या. राज्यांची "आसुरी उपपत्ति" आपल्या इकडे फारशी कधींच प्रचलित नसली तरी युरोपांत "फिजिकल फोर्स थिअरी" या नावानें ती बरीच प्रसिद्ध आहे. हल्लीं या तिन्हींही कल्पना चुकीच्या ठरल्या असल्या तरी निरनिराळ्या काळीं लोकांच्या राजकीय आचार विचारांवर या कल्पनांचें पुष्कळ इष्टानिष्ट परिणाम घडलेले आहेत; या

करितां या तीनहि उपपत्तींचा थोडा विस्तारानें विचार करणें अवश्य आहे.

महाभारतांमध्यें मानवी आणि दैवी उपपात्ति या दोन्हीहि संयुक्त-स्वरूपांत आलेल्या आहेत. शांतिपर्व अध्याय ६७ यांत असें वर्णन केलें आहे कीं, "पूर्वी राजा नसल्यामुळें उदकांतील मत्स्याप्रमाणें दुर्बलांना बलिष्ठ भक्षण करूं लागले, तेव्हां सर्वांनीं मिळून असा एक नियम केला कीं, जो कोणी दुसऱ्यास कठोर भाषण करील किंवा मारहाण करील, किंवा दुसऱ्याची स्त्री

महाभारतांतील कथा.

अगर द्रव्य हरण करील त्याचा आम्ही त्याग करूं. हा नियम सर्व वर्णांना सारखाच लागू आहे. परंतु याचीहि अंमलबजावणी होईना. तेव्हां सर्व प्रजा ब्रह्मदेवाकडे गेल्या; व आमचें पालन करणारा कोणी अधिपति द्या, असें म्हणूं लागल्या. तेव्हां मनूला ब्रह्मदेवानें आज्ञा केली. त्यावेळेस मनु म्हणाला, " मला पापकर्माची भीति वाटते. असन्मार्गानें वागणाऱ्या मनुष्यांवर राज्य करणें पातक आहे. " तेव्हां लोक म्हणाले " राज्यांत पातक घडेल तें कर्त्यास लागेल. तूं भिऊं नको. तुला आम्ही पशूंचा एकपन्नासांश व धान्याचा दशमांश अर्पण करूं. कन्यांच्या विवाहसमयीं तुला एक कन्या देऊं. शस्त्रें, अस्त्रें व वाहन यांनीं युक्त असे आमचे लोक तुझ्या रक्षणासाठीं तुझ्याबरोबर राहतील, तूं सुखानें व आनंदानें राज्य कर. आम्ही आपल्या धर्माचरणाचा एक चतुर्थांश तुला देऊं. " मनूनें कबूल केलें व तो राजा झाला. अधर्मी लोकांचें व शत्रूचें पारिपत्य करून त्यानें राज्य केलें. (महाभारताचा उपसंहार पान २८७). वरील कथेंत दोन कल्पना दिसून येतात. एक राजा व प्रजा यांच्यामध्यें परस्पर कर्तव्यासंबंधीं करार झालेला आहे, व दुसरी म्हणजे राजा प्रथम ब्रह्मदेवानें निर्माण केला. तथापि यांत कराराची कल्पना प्रमुख आहे. कारण

लोकांनीं मागणी केली तेव्हांच ब्रह्मदेवानें मनूला राजा नेमलें. शिवाय मनू व प्रजा यांच्यांतील करार परस्परांच्या 'अनुमतीनें स्वतंत्रपणें झालेला आहे. युरोपियन लोकांतहि या दोन्ही कल्पना निरनिराळ्या वेळीं रूढ होत्या व त्यांच्या राजकीय विचारावर त्या कल्पनांचे परिणाम झालेले दिसतात. तेव्हां यापैकीं प्रत्येक कल्पना पृथकपणें घेऊन तिचे काय परिणाम केव्हां केव्हां झाले ते पाहूं.

प्रथमतः वरील कथेंत प्रामुख्यानें येणाऱ्या कराराच्या कल्पनेचें आपल्या लोकांवर व युरोपियन लोकांवर काय काय परिणाम झाले व त्या कल्पनेची कसकशीं रूपांतरें होत गेलीं हें पाहूं. राज्याभिषेकाच्या वेळीं मी धर्मानुसार प्रजेचें पालन करीन अशी राजानें प्रतिज्ञा करण्याची चाल या देशांत रूढ होती. तिचा उगम या कराराच्या कल्पनेंतच आहे. या कल्पनेमुळें राजावर धर्माचें म्हणजे स्मृतिग्रंथांत घालून दिलेल्या नियमांचें बरेंच बंधन असें. राजानें वाटेल ते कायदे करावेत व प्रजेवर हवे तितके कर लादावेत ही कल्पना प्राचीन भारतीयांस मुळींच संमत नव्हती. " राजा चरति चेद्धर्मं देवत्वायैव कल्पते " म्हणजे राजा धर्मानें आचरण-करील तर तो देवाप्रमाणें पूज्य होतो असें महाभारतांत सांगितलेलें आहे. यावरूनहि राजानें धर्मानेंच वागलें पाहिजे; वाटेल तसें वर्तन करून चालणार नाहीं असाच निष्कर्ष निघतो. प्रजेवर बसविल्या जाणाऱ्या करांना देखील या कराराच्या कल्पनेनें बरीच मर्यादा घालून ठेवलेली होती व या मर्यादेचें हिंदू राजे सहसा उल्लंघन करीत नसत असें रा० ब० वैद्य यांचें मत आहे. ते आपल्या महाभारताच्या उपसंहारांत यासंबंधीं लिहितात. " या कराराप्रमाणें प्राचीन काळीं राजा व प्रजा चालत असत व राजे लोक यापेक्षां जास्त कर घेत नसत असें मानण्यास हरकत नाहीं. " या कराराच्या कल्पनेंतूनच अधर्माचरण करून लोकांवर जुलूम करणाऱ्या राजांना प्रजेनें शासन करावें ही कल्पना आपल्याइकडे रूढ झाली होती.

" प्रजेला पीडा दिल्यामुळें उत्पन्न झालेला वणवा राजांचें कुल, संपत्ति व प्राण यांची राखरांगोळी केल्याशिवाय विझत नाहीं " असें याज्ञवल्क्य-स्मृतींत म्हटलें आहे. (आचाराध्याय, राजधर्मप्रकरण श्लो० ३४२) त्याचप्रमाणें महाभारतांतहि जुलमी राजाला प्रजेनें ठार मारावें असें म्हटलें आहे. कौटिल्याच्या अर्थशास्त्रांत जुलमी राजास हद्दपारी होते असें म्हटलें असून, शुक्रनीतींत " गुणनीतिबलद्वेषी. " " अधार्मिक " व "राष्ट्र-विनाशक " अशा राजाला काढून टाकून त्याच्या ऐवजीं त्याच कुलांतील " गुणयुक्त " पुरुषास प्रजेची अनुमति घेऊन पुरोहितानें राजपद द्यावें असें सांगितलें आहे. तात्पर्य, जुलमी राजाविरुद्ध प्रजेनें बंड केल्यास तें योग्य व यथान्याय आहे किंबहुना तें प्रजेचें कर्तव्य आहे अशा अर्थाचें अनेक उल्लेख प्राचीन भारतीयांच्या ग्रंथांत सांपडतात. तसेंच वेन राजाप्रमाणें अविनीत राजांना ऋषींनीं म्हणजे तत्कालीन लोकनायकांनीं मारून टाकून त्यांच्या जागीं दुसऱ्या राजास बसविल्याची उदाहरणेंहि राज-धर्माचें वर्णन करतांना इतर राजास दाखले म्हणून दिलेलीं आहेत. या वरून राजा व प्रजा यांच्यामध्यें प्रारंभीं परस्परांच्या कर्तव्यांसंबंधीं झालेल्या कराराच्या कल्पनेचा प्राचीन भारतीय लोकांच्या राजकीय आचारविचारांवर बराच परिणाम झाला होता हें दिसून येईल.

१ प्रजापीडनसंतापा त्समुद्भूतो हुताशनः ।
राज्ञःकुलं श्रियं प्राणांश्चादग्ध्वा न निवर्तते ॥
२ अरक्षितारं हर्तारं विलोप्तारमनायकम् ।
तं वै राजकालिं हन्युःप्रजाःसंनह्य निर्घृणम् ॥
३ अहं वो रक्षितेत्युक्त्वा यो न रक्षति भूमिपः
ससंहत्य निहंतव्यः श्वेव सोन्माद आतुरः॥ अनुशासनपर्व अ०९६
श्लो० ३४।३५

४ गुणनीतिबलद्वेषी कुलभूतोऽप्यधार्मिकः ।
नृपो यदि भवेत्तं तु त्यजे द्राष्ट्रविनाशकम् ॥
तत्पदे तस्य कुलजं गुणयुक्तं पुरोहितः ।
प्रकृत्यनुमतिं कृत्वा स्थापयेद्राज्यगुप्तये ॥
अ० २ लो० २७५।७६

हॉब्स व कराराची उपपत्ती

युरोपांत ही कराराची कल्पना निरनिराळया काळीं निरनिराळ्या स्वरूपांत लोकांपुढें आलेली होती. अगदीं प्राचीन काळीं ग्रीक लोकांतील सोफिस्ट पंथाच्या लोकांत ही आढळून येते. प्लेटो व ॲरिस्टॉटल या दोन्ही तत्त्वज्ञान्यांच्या ग्रंथांतही तिचा उल्लेख आहे, परंतु त्यांनीं ती निराधार ठरविलेली आहे. यानंतर ख्रिस्ति धर्माच्या पहिल्या पहिल्या धर्मोपदेशकांनीं या उपपत्तीचा स्वीकार केल्याचें दिसून येतें. तथापि अर्वाचीन काळीं या उपपत्तीचा जास्त प्रसार करून तिला अधिक व्यवस्थित व शास्त्रीय स्वरूप देण्याचें कार्य सतराव्या शतकांत इंग्लंडांत होऊन गेलेल्या हॉब्स या तत्त्वज्ञान्यानें केलें. याच्या कराराच्या कल्पनेंत व वरील महाभारतांतील कराराच्या कल्पनेंत पुष्कळ साम्य असलें तरी बरेंच वैषम्यही आहे. महाभारतांत वर्णिलेला करार राजा व प्रजा यांच्या दरम्यान झालेला असून त्या करारांतील अटी दोघांवरही बंधनकारक आहेत अशी कल्पना आहे. हॉब्स याचें मत केवळ प्रजाजनांनींच आपापसांत करार करून आपल्यावरील प्रभुत्व राजाकडे दिलें, असें आहे. ज्यावेळीं लोकांना कोणीही शास्ता नव्हता, त्यावेळी दुर्बल लोकांना प्रबलांचा जुलूम सोसावा लागे, वगैरे जे मात्स्यन्यायाचें वर्णन महाभारतांत आहे, तें हॉब्सनें केलेल्या समाजाच्या निसर्गावस्थेच्या(Natural state) वर्णनाशीं बरेंच जुळतें. ही स्थिति लोकांना दुःसह झाल्यामुळें त्यांनीं स्वसंमतीनें एक राजा नेमून त्याच्या हातीं आपलें नियमन

करण्याची सर्व सत्ता दिली व तो घालून देईल त्या नियमाप्रमाणें चालण्याचें त्यांनीं कबूल केलें, असें हॉब्स यांचें मत आहे. या कल्पनेप्रमाणें राजाला वाटेल तसें नियमन करण्याचा पूर्ण अधिकार आहे असा निष्कर्ष हॉब्स यानें आपल्या " लेव्हिएथन " या पुस्तकांत काढलेला आहे. हें पुस्तक इ० स० १६५१ मध्यें प्रसिद्ध झालेलें आहे. त्यावेळीं इंग्लंडांत राज्यक्रांति चालू असून लोकसत्ताक पक्षानें पहिल्या चार्लस राजाला नुकतेंच (इ० स० १६४९) फाशीं दिलें होतें, व पुढें कोणत्या प्रकारची राज्यव्यवस्था स्थापन होईल याबद्दल अनिश्चितता उत्पन्न झाली होती. अशावेळीं देशांत कोठें तरी सर्व लोकांचें शासन करणारी अमर्याद सत्ता असावी असें वाटणें अगदीं साहजिकच होतें. ही लोकांचे नियमन करण्याची अमर्याद सत्ता किंवा प्रभुत्व आनुवंशिक राजांच्याच हातीं असावी, असा सिद्धांत प्रस्थापित करण्यास हॉब्स याच्या ग्रंथांत कोणताच युक्तिवाद सापडत नाहीं. या वेळच्या युरोपियन राज्यांच्या एकंदर परिस्थितीकडे पाहून त्यानें वरील सिद्धांत न कळत गृहीत धरलेला दिसतो. यावेळीं एकंदर युरोपियन राज्यांची राजकीय स्थिति पाहिल्यास सर्वत्र सरंजामी सरदारांचा पाडाव होऊन राज्यांचें अनियंत्रित प्रभुत्व राजे लोकांच्या हातीं एकवटत होतें असें दिसतें. खुद्द इंग्लंडांतही सोळाव्या शतकांतील टयुडर घराण्यांतील राजाराण्यांनीं राजकीय प्रभुत्वाचा पूर्ण उपभोग घेण्यास सुरवात केली होती असेंच दिसून येतें. या वस्तुस्थितीचा परिणाम हॉब्स याच्या मनावर होऊन राज्यांतील प्रभुत्व तेथील राजांच्याच हातीं असावें व त्यास कोणतीही कायदेशीर मर्यादा असूं नये असें त्यानें प्रतिपादिलें आहे. अशा प्रकारचें राज्यांचें अनियंत्रित प्रभुत्व राजाकडे द्यावें अशी उपपत्ति आपल्या इकडे कोणीही प्रतिपादिलेली नाहीं. राजनीतीचें किंवा राजधर्माचें वर्णन करणाऱ्या सर्व भारतीय तत्त्वज्ञांनीं समाजांतील ब्राह्मणवर्ग हा राजांवर देखरेख करणारा वर्ग म्हणून समाजांत राजापेक्षां

एक श्रेष्ठवर्ग राखून ठेवलेला होता. राजानें धर्मप्रमाणें प्रजेचें नियमन करावें व या धर्माचें विवरण ब्राह्मणानीं करावें असा श्रमविभाग आमच्या इकडे नेहमीं केलेला आहे. कायदे करणें व अंमलबजावणी करणें, या राजसत्तेच्या दोन अंगाच्या पृथकरणाच्या अर्वाचिन तत्त्वाचें बीजरूपानें अस्तित्व वरील श्रमविभागांत आहे.

लॉक व कराराची उपपत्ति

याच शतकांत कांहीं वर्षांनीं इंग्लंडांत लॉक नांवाचा दुसरा राजनीतिज्ञ होऊन गेला. त्यानें याच उपपत्तिच्या आधारानें लोकनियंत्रित राजसत्तेचें मंडण केलेलें आहे. १६८८ मध्यें इंलंडांतील लोकसत्तेनें दुसऱ्या जेम्सराजाला बेसनदशीर वर्तनाबद्दल इंलंडांतून हाकून लाविलें व त्याची मुलगी मेरी व जावई विल्यम यांना सिंहासनावर बसाविलें, लॉक यानें या राज्यक्रांतीचें समर्थन करून लोकनियमित राजसत्ताक-शासनपद्धति श्रेष्ठ ठरविली आहे. याची कराराची कल्पना आणि महाभारतांतील कराराची कल्पना यांत पुष्कळच साम्य आहे. राज्य किंवा राजा निर्माण होण्यापूर्वी मनुष्यमात्राला मुळींच कांहीं अधिकार नव्हते, व सर्व लोक एकमेकांना मात्स्यन्यायानें एकसारखे गांजत होते, ही कल्पनाहि लॉकला सर्वस्वी मान्य नाहीं. राज्य निर्माण होण्यापूर्वीच्या निसर्गावस्थेची त्याची कल्पना महाभारतांत शांतिपर्वांत वर्णिलेल्या कृतयुगाच्या कल्पनेसारखी कांहींशीं आहे. या पर्वाच्या ५८७ व्या अध्यायांत राज्य प्रथम कसें झालें हें युधिष्ठिरास समजावून सांगतांना भीष्म म्हणतात " पूर्वीं कृतयुगांत राजा किंवा राज्य यांपैकीं कांहीं नव्हतें. त्यावेळीं दंडहि नव्हता व दांडिकाहि नव्हता. सर्व प्रजा धर्मानेंच परस्परांचें रक्षण करीत असत. " अशा प्रकारें धर्मानें परस्परांचे रक्षण करीत

---

१ नियतस्त्वं नरव्याघ्र श्रणु सर्वमशेषतः ।

असतां त्यांना मोह उत्पन्न झाला. त्यानंतर त्यांना लोभ काम वगैरे उत्पन्न झाले. यानंतर त्यांनीं धर्म सोडला व मग सर्वत्र अनवस्था माजून लोक एकमेकांच्या जुलमाला कंटाळून ब्रह्मदेवाला शरण गेले व त्याच्याकडून राजा मागून घेतला. तात्पर्य, ज्या धर्माच्या पालनार्थ राजा निर्माण झाला त्याचें अस्तित्व राज्य या संस्थेच्या पूर्वींहि होतें व पालन करण्या-साठीं राजा निर्माण केला आहे अशी महाभारतांतील कराराची कल्पना आहे, लॉक याचीहि बहुतांशीं अशीच कल्पना आहे. निसर्गावस्थेंतील लोक नैसर्गिक किंवा ईश्वरी कायद्याप्रमाणें वागत असत व या ईश्वरी-कायद्याप्रमाणें मनुष्यमात्राला कांहीं जन्मसिद्ध हक्कहि होते. परंतु या निस-र्गावस्थेंत कायद्याचें नियम स्पष्टपणें लोकांपुढें नव्हते; त्या नियमांप्रमाणें निःपक्षपातीपणानें न्याय देण्यास कोणी न्यायाधीश नव्हता, व बेकायदेशीर वर्तनाबद्दल लोकांना शासन करण्यासही कोणी नव्हता. यांतील उणीव भरून काढण्यासाठीं लोकांनीं राज्य ही संस्था स्थापन केली. ही संस्था स्थापन करण्यासाठीं त्यांना आपलें पूर्वींचें स्वातंत्र्य गमवावें लागलें; पण या कार्याला अवश्य तितकेंच स्वातंत्र्य त्यांनीं गमावलें आहे. अर्थात् या कल्पनेप्रमाणें राजाची किंवा सरकारची सत्ता नियंत्रित झालेली आहे. ही राजसत्ता सर्वांना माहित असलेल्या व पूर्वींच केलेल्या कायद्याची अमलबजावणी करण्याकरितांच उपयोगांत आणिली पाहिजे. या कायद्यां प्रमाणें न्यायनिवाडा निःपक्षपाती न्यायाधिशांकडून झाला पाहिजे व सर-कारनें प्रजेच्या संपत्तीला त्यांच्या संमतीशिवाय धक्का लावतां कामा नये.

यथा राज्यं समुत्पन्नं आदौ कृतयुगेऽभवत्॥
नैव राज्यं न राजा ऽसीन्न च दण्डो दाण्डिकः।
धर्मेणैव प्रजा॥ सर्वाः रक्षन्ति स्म परस्परत्॥

अनुशासनपर्व॥ ५८॥

या तीन अटींनीं कोणत्याही सरकारची सत्ता नियंत्रित झालेली असते. अशी लॉकाची कल्पना आहे. तसेंच या सरकारची जी राज्यघटना एकदा ठरून गेली असेल ती बदलण्याची कोणालाही सत्ता नाहीं असें तो म्हणतो. कायदे करणें हें राजसत्तेचें उत्तमांग असल्यामुळें ती सत्ता ज्या संस्थेच्या हातीं असेल तेथून कोणासहि घेतां येणार नाहीं. ही कायदे करण्याची सत्ता राजा व लोकसभा या दोघांच्या हातीं दिलेली आहे. ज्यावेळीं राजा एकटाच लोकसभेनें केलेले कायदे मोडतो किंवा त्यांत बदल करतो त्यावेळीं त्यानें पूर्वीचा करार मोडला असें समजून त्याला काढून टाकण्याचा अधिकार लोकांना आहे. अशा युक्तिवादानें लॉक १६८८ मधील इंग्लंडांतील राज्यक्रांतीचें समर्थन करतो. हे विचार प्राचीन भारतीय राजनैतिक विचारांशीं पुष्कळच जुळते आहेत; मात्र त्यांना लॉकनें बरेंच व्यवस्थित व शास्त्रीय स्वरूप दिलें आहे.

रूसो व कराराची उपपत्ति.

यानंतर याच कराराच्या उपपत्तीच्या पायावर रुसो नांवाच्या फ्रेंच तत्त्वज्ञान्यानें पूर्ण लोकसत्तेच्या तत्त्वाची इमारत उभारली. यावेळीं राजकीय संस्थांच्या वस्तुस्थितिवरून त्यानें आपले विचार ठरविले असें म्हणतां येत नाहीं. हॉब्सनें अनियंत्रित राजसत्तेचें तत्त्व प्रतिपादिलें त्यावेळीं युरोपांत सर्वत्र अनियंत्रित राजसत्ता आविर्भूत होत होती. तसेंच लॉकनें लोकनियंत्रित राजसत्तेचें तत्त्व प्रतिपादिलें तेव्हां त्याच्याच देशांत अनियंत्रित राजसत्ता अयशस्वी ठरून नष्ट झाली होती व तिच्या जागीं लोकनियंत्रित राजसत्ता प्रत्यक्ष प्रस्थापित झाली होती, परंतु रुसोनें ज्यावेळीं लोकसत्तेचें तत्त्व लोकांपुढें मांडिलें त्यावेळीं कोणत्याहि देशांत त्याची अंमलबजावणी झालेली नव्हती. यावरून रुसोची प्रतिभाशक्ति वरील दोन तत्त्वज्ञान्यांपेक्षां फार मोठी ठरते. आपल्या प्रतिभाशक्तीच्या बळावर कल्पनाकाशांत यथेच्छ विहार करून निरनिराळीं

सामाजिक किंवा राजकीय तत्त्वें शोधून काढून त्याची अंमलबजावणी करण्याचें प्रयत्न करणें, हा एक फ्रेंच लोकांचा स्वभावच आहे. रुसोनें ज्यावेळीं लोकसत्तेचे तत्त्व लोकांपुढें मांडिलें त्यावेळीं इंग्लंडाव्यतिरिक्त सर्व युरोपियन देशांत अनियंत्रित राजसत्ता नांदत होती. इंग्लंडांत मात्र लोकनियंत्रित राजसत्ता होती. परंतु तेथेंहि शुद्ध लोकसत्तेच्या तत्त्वाला मुळींच थारा मिळण्याचा संभव नव्हता. अशा परिस्थितींत राजे हे प्रजेनें आपल्या सोयीसाठीं नेमलेले नोकर आहेत व या राजे नांवाच्या नोकरांना वाटेल तेव्हां काढून टाकण्याचा व त्याच्या जागीं दुसऱ्याची नेमणूक करण्याचा पूर्ण अधिकार प्रजेला आहे, असें मत आपल्या " सामाजिक करार " या नांवाच्या पुस्तकांत रुसोनें प्रतिपादिलें. रुसोची एकंदर विचारसरणी तीन मूलभूत सिद्धांतावर उभारलेली आहे, ते सिद्धांत असे. [१] निसर्गतः सर्व मनुष्यें स्वतंत्र व समान दर्जाची आहेत. [२] या स्वतंत्र व समान दर्जाच्या व्यक्तींनीं स्वेच्छेनें केलेल्या करारावर सरकारचे सर्व अधिकार अवलंबून असले पाहिजेत; आणि [३] वैयक्तिक हित व सामाजिक ऐक्य या दोन्ही दृष्टींनीं व्यक्तींनीं आपलें सर्व स्वातंत्र्य समाजाच्या हवालीं करणें इष्ट असलें तरी राज्यघटना ठरविण्याची व कायदे करण्याची सर्व सत्ता सर्व समाजाच्या हातींच नेहमीं राहणें न्यायदृष्टीनें युक्त आहे. (Development of European polity by H. Sidgewick P. 390.) हॉब्सप्रमाणेंच रुसोचें मतहि सामाजिक कराराच्या प्रसंगीं व्यक्तिमात्रांनीं आपले सर्व हक्क समाजाच्या हवालीं केले आहेत असें असून व्यक्तीच्या सामाजिक नियंत्रणाला त्याच्या निसर्गदत्त हक्कांची मर्यादा घालण्याची लॉकची कल्पना त्याला पसंत नाहीं; परंतु व्यक्तींचें नियमन करण्याची ही शक्ति म्हणजे कायदे करण्याचा अधिकार हा नेहमीं लोकांच्याच हातीं असला पाहिजे. हे कायदे सर्वांना सारखेच लागू असले पाहिजेत व इतर लोकांच्या व्यवहारांप्रमाणें सरकारचे व्यवहारहि या

लोकांनीं केलेल्या कायद्यांना अनुसरुनच चालले पाहिजेत, असें रुसोचें मत आहे. कायदे हे लोकांच्या मताप्रमाणें असले पाहिजेत व राज्यांचें प्रभुत्व लोकांच्या हातीं असलें पाहिजे, हे रुसोचे दोन सिद्धांत अलीकडे सर्वमान्य झालेले आहेत व ते अगदीं स्पष्ट स्वरूपांत मांडल्याबद्दल त्याला मान दिला जातो. सध्यां लोकांच्या प्रतिनिधी सभेचें जें मत तेंच सर्व लोकांचें मत असें प्रायः समजलें जातें; परंतु या मताला रुसोच्या ग्रंथांत आधार नाहीं. तसेंच सरकारचें कार्य बहुमतानें चाललें पाहिजे, हें मत त्याला संमत असलें तरी राज्य प्रथम स्थापन होण्याचे वेळीं सर्व लोकाची एकवाक्यताच असली पाहिजे व तें राज्य स्थापन झाल्यानंतर ज्यांना बहुमताप्रमाणें वागावयाचें नसेल त्यांनीं देशत्याग करावा असे तो म्हणतो. रुसोच्या या मतांचा परिणाम फ्रान्समधील क्रांतिकारक लोकांवर व अमेरिकेंतील लोकशाहीच्या प्रस्थापकांवर पुष्कळ झालेला दिसतो. तसेंच एकंदरींत अर्वाचीन युरोपांत लोकसत्तेचें युग सुरू करण्याच्या कामीं त्याला बरेंच श्रेय दिलें पाहिजे. यानें प्राचीन ग्रीक लोकसत्ताक राज्यांकडे लोकांचें चित्त वेधून घेतलें.

कराराच्या उपपत्तीचें खंडण.

आतापर्यंतच्या विवेचनावरून राज्यांची उत्पत्ति मानवी करारानें झालेली आहे, या उपपत्तीचे, प्राचीन काळापासून अर्वाचीन काळापर्यंत लोकांच्या राजकीय आचारविचारांवर कोणकोणते परिणाम झाले आहेत, हें ध्यानांत येईल. एकोणिसाव्या शतकांत झालेल्या समाजशास्त्रांतील प्रगतीमुळें ही कल्पना आतां निराधार व भ्रामक ठरलेली आहे. या उपपत्तीवर पहिला आक्षेप असा आहे कीं, ती कृत्रिम आहे. निसर्गावस्थेंतील रानटी लोक एकदम एकत्र येऊन ते परस्परांशीं करार करून राजा निर्माण करतील किंवा एखाद्या राजाला परस्पर कर्तव्यांचा करार लिहून देतील, अशी कल्पना करणें हें रानटी लोकांच्या मनः-

स्थितींचें पूर्ण अज्ञान दर्शवितें. ज्यांना शासनसंस्था म्हणजे काय हें मुळींच माहित नाहीं, राज्यांतील शांतिसुखाचा ज्यांनीं कधींहि अनुभव घेतलेला नाहीं व कोणतीही शिस्त पाळण्याची ज्यांना कधीही सवय नाहीं, अशा लोकांना एकाएकी राज्याची कल्पना सुचावी व परस्परांशीं करार करून त्यांनीं ती अमलांत आणावी, हें शक्य व संभवनीय नाहीं. ज्यांना राज्य म्हणजे काय, कायदा म्हणजे काय, करार म्हणजे काय, हें माहित आहे व ज्यांनीं राज्यछत्राच्या शांतिछायेंत आपले जन्मापासूनचे दिवस घालविले आहेत, त्यांनीं वसाहतीसाठीं एखाद्या नव्या प्रदेशात जावें व परस्परांशीं करार करून राज्य व सरकार या संस्था स्थापन कराव्यात हें साहजिक आहे व सोळाव्या व सतराव्या शतकांत युरोपियन लोकांनीं अमेरिकेंत जाऊन वसाहती केल्या व जीं नवीं राज्यें स्थापन केलीं त्यांची उत्पत्ति करारानें झाली असें म्हणता येईल. परंतु या सुधारलेल्या राज्यांत वाढलेल्या सुसंस्कृत लोकांचा दाखला रानटी समाजांना मुळींच लागू पडत नाहीं. आज पृथ्वीच्या पाठीवर जे अनेक रानटी समाज आहेत, त्यांतील लोकांना कायदा व करार या कल्पना अगदीं अपरिचित आहेत. करार व कायदा या कल्पना अनेक वर्षें राज्यांत राहिल्यानंतर मनुष्यास सुचलेल्या आहेत. शिवाय समाजांत राजा निर्माण होण्यापूर्वीं लोक कोणत्याच बंधनांनीं बांधलेले नसतात व राजा निर्माण झाल्यावरच ते राजशासनांनीं बद्ध होतात ही कल्पनाहि बरोबर नाहीं. अशा प्राथमिक अवस्थेंतील समाजांत व्यक्तिमात्राला स्वतंत्र अस्तित्वच असत नाहीं असें म्हणण्यास हरकत नाहीं. अशा समाजाचे घटक व्यक्ति नसून कुटुंबें असतात व कुलाचार व रुढी यांनीं व्यक्तीचे सर्व व्यवहार नियंत्रित झालेले असतात. राज्य ही संस्था लोकांनीं बुद्धिपुरःसर निर्माण केलेली नसून ती कौटुंबिक संस्थांतून मनुष्यांना नकळत हळूहळू उत्क्रांत होत आलेली आहे, असा आलिकडील समाजशास्त्रज्ञांचा तर्क आहे. शिवाय या उपपत्तीला इतिहासाचाही मुळींच

आधार नाहीं. राज्याच्या उत्पत्ती संबंधानें ही कराराची उपपत्ति जशी अपुरी पडते, तशीच ती राज्यांच्या प्रस्तुत स्थिति संबंधानेंही अपुरीच पडते. राज्य व त्यांतील व्यक्ति यांचे संबंध करारानें उत्पन्न होणाऱ्या नीरस व कृत्रिम संबंधासारखे असावेत, हें मतही बरोबर नाहीं. आपल्या कुटुंबांतील लोकां-संबंधीं ज्या प्रकारच्या उदात्त व संकीर्ण भावना मनुष्यांच्या अंतःकरणांत उत्पन्न होतात, त्याच प्रकारच्या उदात्त भावना स्वसमाजासंबंधीं, स्वराष्ट्रा-संबंधी व स्वराज्यासंबंधी व्यक्तीच्या अंतःकरणांत उत्पन्न होत असतात. व्यक्तीचें सर्व जीवित समाजावर अवलंबून असतें. त्याची मनोरचना, स्वभाव व आचार-विचार या सर्व गोष्टी समाजाच्या सामाजिक व राज-कीय स्थितीवर अवलंबून असतात. अशा प्रकारें व्यक्तीचें स्वरूप राजकीय परिस्थितीवर अवलंबून असल्यामुळें तो राज्यरूपी पुरुषाचा एक अवयवच बनलेला असतो असें म्हणण्यास हरकत नाहीं. कराराच्या व्यापारी किंवा कायदेशीर भावनेवरच सर्व राजकीय किंवा सामाजिक व्यवहार आणून ठेवणें केव्हांही इष्ट होणार नाहीं. तसें झाल्यास उज्वल देशाभिमान व निर्मळ स्वार्थत्याग यांना राजकीय व्यवहारांत अवकाश उरणार नाहीं. सारांश कराराच्या कल्पनेनें सर्व राजकीय संबंधांचा व व्यवहारांचा योग्य उलगडा होत नाहीं, त्या कल्पनेला इतिहासाचा आधार नाहीं आणि सामा-जिक संस्थाच्या उत्क्रांतीच्या नियमांच्या दृष्टीनें ती कृत्रिम ठरते, या सर्व कारणामुळें ही कल्पना मनुष्यांच्या राजकीय आचारा-विचारांत बऱ्याच उलाढाली करून एकोणिसाव्या शतकांत अंतर्धान पावली व ती कोणत्याही स्वरूपांत पुनः प्रकट होईल असें वाटत नाहीं. मात्र राज्य ही संस्था लोकांच्या हिताला पोषक आहे, व प्रजेचें हित हेंच तिचें कार्य आहे, या गोष्टींची जाणीव या कल्पनेमुळेंच लोकांत सदैव जागृत राहिली, हें विसरून चालणार नाहीं.

आतां राज्यांच्या दैवी उपपत्ति संबंधानें विचार करूं. राजा हा ईश्व-

राचा अंश आहे, दैवी सामर्थ्यानें तो सर्व लोकांवर राज्य करतो, त्याच्या विरुद्ध कोणीही बंड करूं नये व त्याचें शासन सर्वांनीं निमूटपणें मान्य करावें, हे विचारही आपल्या देशांतल्या प्रमाणें युरोपांतही रूढ होते.

दैवी उपपत्ति.

" बालोऽपि नाऽवमन्तव्यो मनुष्य इति भूमिपः ।" " महती देवता ह्येपा नररूपेण तिष्ठति ॥ " म्हणजे राजा हा लहान असला तरी त्याला सामान्य मनुष्य समजून त्याचा अपमान करूं नये, कारण हा मनुष्यरूपधारी असला तरी ती एक मोठी देवता आहे, असें मनुस्मृतींत सांगितलेलें आहे. अशीं इतरही अनेक वचनें आपल्या प्राचीन ग्रंथांत सापडतात, परंतु तीं सर्व धार्मिक राजासंबंधी आहेत हें ध्यानांत घेतलें पाहिजे. मनुस्मृतींत ज्या अध्यायांत वरील वचन आहे, त्याच अध्यायांत " दण्डोहि सुमहत्तेजो दुर्धरश्चाकृतात्मभिः । धर्मा द्विचलितं हन्ति नृपमेव सबान्धवम् ॥ " म्हणजे राज्यांतील दण्डशक्ति हें एक मोठें तेज आहे व ज्यांना आत्मसंयमन करतां येत नाहीं अशांना ते धारण करण्यास फार अवघड आहे. धर्मापासून च्युत झालेल्या राजाला त्याच्या आप्तेष्टासह हा दंडच ठार करतो असें सांगितलें आहे. महाभारतांतही " राजा चरतिचेद्धर्मं देवत्त्वायैव कल्पते " म्हणजे राजा जर धर्मानें आचरण करील तर तो देवाप्रमाणें पूज्य मानावा असें म्हटलें आहे. शुक्रनीतींत राजाचे सात्त्विक राजस व तामस असे तीन भेद करून " देवांशान्सात्त्विको भुंक्ते राक्षसांशांस्तु तामसः । राजसो मानवांशांस्तु सत्त्वेधार्यं मनोयतः ॥ " म्हणजे सात्त्विक राजांच्या अंगीं देवाचे अंश असतात, राजस राजाच्या अंगीं मनुष्यांचे गुण असतात, व तामस राजाच्या अंगीं राक्षसांचे गुण असतात; याकरितां मन नेहमीं सात्त्विक ठेवावें, असें म्हटलें आहे. तात्पर्य केवळ धार्मिक राजांनाच देवांसारखा मान द्यावा असें या उपपत्तीचें खरें स्वरूप आहे व त्या स्वरूपांत तिच्यांत आजच्या विचारी लोकांनाही पुष्कळ सत्यांश

सांपडणें शक्य आहे. बंगालचे वीरेंद्र कुमार घोष आपल्या " The Truth of Life " या पुस्तकांत[1] लिहितात " राजा किंवा लोकशाहीच्या राज्यांत राष्ट्राध्यक्ष होणाऱ्या मनुष्याच्या अंगीं देवाचेच गुण असले पाहिजेत. असली ईश्वरांशीं मनुष्येंच खरोखर राज्य करूं शकतील." असें असलें तरी कालांतरानें या उपपत्तीला विकृत स्वरूप येऊन राजानें वाटेल तसा जुलूम केला तरी तो निमूटपणें सहन करावा, व राज्याचें सर्व प्रभुत्व परमेश्वरानेंच राजाकडे दिलें असल्यामुळें त्याच्या सत्तेला कोणीहि मर्यादित करूं नये अशीं मतें फैलावूं लागलीं. आपल्या प्राचीन ग्रंथांत जुलमी राजांविरुद्ध बंड करण्याचा देखील हक्क प्रजेला दिलेला आहे, याचें पूर्ण विस्मरण आमच्या लोकांना पडलें. अगदीं अलीकडे पाश्चात्य राजकीय विचारांचा परिचय होऊं लागल्यापासून प्रजाजनांच्या हक्कांचें स्मरण पुनः पौरस्त्य लोकांना होऊं लागलें आहे. तसेंच प्राचीन वाङ्मयाचा नव्या दृष्टीनें अभ्यास सुरूं झाल्यापासून प्राचीन भारतीयांच्या राजधर्मांची व राजनैतिक विचारांची योग्य कल्पना आतां येऊं लागली आहे.

दैवी उपपत्तीचे निरनिराळे उपयोग.

युरोपांत " ना विष्णुः पृथिवीपतिः " या तत्त्वांचा उपयोग निरनिराळ्या काळचे लोक निरनिराळ्यां प्रकारें करीत होते. सोळाव्या व सतराव्या शतकांत प्रजाजनांत प्रादुर्भुत होऊं लागलेल्या लोकसत्तेच्या तत्त्वाला कसून विरोध करण्याच्या कामीं राजाच्या देवांशत्वाच्या कल्पनेचा उपयोग राजपक्षाचे लोक करीत असत. मध्ययुगां-

---

1 " To be a King or for the matter of that the president of a real republic one has to be almost a god. Only divine men can rule and rule truely. "

The truth of Life. A. P. 27.

तील पोपचे धर्माधिकारी राजा ईश्वराचा प्रतिनिधि आहे, तेव्हां राजसत्तेपेक्षां पोपच्या धर्मसत्तेची योग्यता मोठी आहे, असें प्रतिपादन करीत असत. राजे लोकांत आपण परमेश्वर नियोजित कार्य करीत आहों याची जाणीव असल्यामुळें त्यांचें शासन बरेंच सौम्य व धर्मानुसारी राहात असे, असें मानण्यास हरकत नाहीं. कांहीं समाजशास्त्रज्ञांचें असें मत आहे कीं, प्राथमिक समाजांत राजा हाच लोकांचा पुरोहित असे; व म्हणून राजाच्या अंगीं कांहीं दैवीशक्ति असावी असें लोकांना वाटत असावें. आपल्याइकडे विष्णूहि जगाचें पालन करणारी देवता आहे, अशा समजुतीनें लोकपालकाला म्हणजे राजाला विष्णूचा अवतार समजण्याचा परिपाठ होता. तथापि राजाला लोकांचा प्रतिपाल करण्यासाठीं निर्माण केला आहे, केवळ त्यांच्यावर अधिकार गाजविण्यासाठीं नाहीं, हें आमच्या कोणत्याहि प्राचीन ग्रंथकारांनीं दृष्टीआड केलेलें नाहीं. तसेंच तो पृथ्वीवरील कोणाहि मनुष्यांस आपल्या कृत्याबद्दल जबाबदार नाहीं किंवा केवळ आनुवंशिक संस्कारानेंच हे गुण त्याचे अंगीं येतात असेंहि कोठें सांगितलेलें नाहीं. तो या लोकांत ब्राह्मणांना जबाबदार असून मेल्यावरही त्याच्या दुष्कृत्याबद्दल त्याला शासन मिळतें अशीच आमच्या लोकांची कल्पना आहे. दुराचारी राजाला शासन करण्याचा उपदेशहि प्रजेला अनेक प्रसंगीं केला आहे.[१]

---

1 "Turning to the other points, it may be remarked that the king in the Hindu theory is not accouytable to God alone for his actions. For much as we may deny the claim of the Hindus to have worked out the idea of popular sovereignty, we might, we think, argue from the allembracing Law (Bharma) that the Brahmas were concieved as qualified to supersive the conduct of the King. Further more, it has been shown that none of the Hindu authors

प्राथमिक समाजांत राजांच्या जुलमापासून होणाऱ्या त्रासापेक्षां अराजकतेपासून उद्भवणाऱ्या अनर्थांची भीति अधिक असते. अशावेळीं "ना विष्णुः पृथिवीपतिः" या तत्त्वाचा बराच चांगला उपयोग होणें किंवा तें तत्त्व लोकांना सुचणें अगर पटणें, हें साहजिक आहे; परंतु आज या तत्त्वावर निदान पूर्वींच्या स्वरूपांत तरी विश्वास बसणें शक्य नाहीं. परमेश्वरानें राजा निर्माण केला याचा अर्थ जर इतकाच समजावयाचा असेल कीं, राजकीय संस्था निर्माण करण्याची बुद्धि मनुष्यांना परमेश्वरानें दिली, तर या उपपत्तीचा कांहीं अर्वाचीन लोक विचार तरी करतील परंतु महाभारतांत म्हटल्याप्रमाणें ब्रह्मदेवानें स्वतः मनूला राजा बनविला ही गोष्ट शब्दशः आज कोणासही विश्वासनीय वाटणें शक्य नाहीं. तसेंच आनुवंशिक अनियंत्रित राजसत्ताक राज्यपद्धतीच परमेश्वरास मान्य आहे, राजा हा ईश्वरी अंश असल्यामुळें त्याला कायद्यांचें बंधन नाहीं, त्याच्या वाटेल त्या आज्ञा लोकांनीं धर्मबुद्धीनें मान्य कराव्यात असलें जें विकृत स्वरूप सोळाव्या व सतराव्या शतकांतील राजपक्षीय लोकांनीं या कल्पनेला दिलें होतें तें तर आज कोणासही मान्य होणें शक्य नाहीं. आज पृथ्वीच्या पाठीवरील

दैवी उपपत्तीवर टीका.

with possible exception of Narad, countenannces the unlimited obedience of the subjects: on the contrary they develop in the course of their argument principles tending to justify the right of deposition and even that of tyrannicide. Finally it may be mentioned that the Hindu theory contains no trace of the doctrine of indefeasible hereditary right which is an essential element of divine right in the western system." A Histary of Hindu political theories by U. Ghosal P. 277

बहुतेक सुधारलेल्या देशांतून आनुवंशीक राजे नष्ट झालेले आहेत, व इंग्लंड किंवा जपान अशा ज्या कांहीं थोड्या देशांत ती संस्था जीव धरून राहिलेली आहे, तेथेंही ती केवळ नामधारीच झालेली आहे. राजकीय संस्था या मनुष्यकृत आहेत, प्रजेचें हित हेंच त्यांचें ध्येय आहे, धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चार पुरुषार्थप्राप्तीला आवश्यक अशा विविध सुधारणा त्या संस्थांत करण्याचा प्रजेला नैतिक हक्क आहे, कोणतेंही सरकार प्रजेलाच जबाबदार असलें पाहिजे, इत्यादि सिद्धांत अर्वाचीन राजनीतिशास्त्रांत गृहीतकृत्यच बनलेलें आहे. सध्याच्या परिस्थितींत राज्यांचें ध्येय नीतीला व धर्माला धरूनच असावें, एवढाच बोध या उपपत्तीपासून घेतां येईल.

दैवी उपपत्तीचें लाक्षणिक स्वरूप

लोकांतील दुराचारांना आळा घालावा आणि लोकांचें आधिभौतिक व आध्यात्मिक हित साध्य व्हावें, अशी जी न्यायबुद्धि तिचें वास्तव्य सर्व मनुष्यांच्या अंतःकरणांत आहे, म्हणूनच राज्य ही संस्था त्यांनीं निर्माण केली व ती त्यांना प्रिय झालेली आहे. लोकांच्या अंतःकरणांतलि न्याय, शांतिप्रियता व प्रेमबुद्धी या भावनाच दैवी आहेत व त्या भावनामुळें ज्या संस्था निर्माण होतात, त्या दैवी संस्था असा वरील राज्यांच्या दैवी उपपत्तीचा लाक्षणिक अर्थ करूं गेलें तरीसुद्धां ती उपपत्ति अपुरी ठरते. लोकांच्या अंतःकरणांतलि न्याय, शांति, दया, परोपकार वगैरे सात्विक दैवी भावनाच राज्यांच्या उत्पत्तीस व स्थितीस कारण झालेल्या आहेत असें म्हणणें इतिहासास धरून होणार नाहीं. लोकांवर प्रभुत्व गाजविण्याची हाव, वैभवास चढण्याची विलक्षण महात्त्वाकांक्षा किंवा स्वार्थातिरेक असल्या आसुरी भावनांचाही राज्यें निर्माण होण्यास कांहींसा उपयोग झालेला आहे. किंबहुना कांहीं लोकांचें तर असेंच मत आहे कीं, राज्यांची उत्पत्ति व स्थिति या केवळ बाहुबलाच्या पाशवी शक्तीवरच अवलंबून असतात. हें मत खरें असल्यास राज्य हें परमेश्वरनिर्मित

नसून तें सैताननिर्मित आहे असेंच म्हणावें लागेल. या उपपत्तीसच आम्ही आसुरी उपपत्ति असें नांव दिलेलें आहे.

आसुरी उपपत्ति व तिचें खंडन

दुर्बलांना प्रबलांनीं जिंकावें व निरुपाय म्हणून पहिल्यांनीं दुसऱ्याचें प्रभुत्व मान्य करावें, अशा प्रकारें राज्यांची उत्पत्ति झालेली आहे, त्यांत शांतिसुखाची आवड किंवा न्यायबुद्धि यांचा कांहीं संबंध नाहीं, असें वरील आसुरी उपपत्तीचा आश्रय करणाऱ्या लोकांचें मत आहे. एका टोळीनें दुसरीला जिंकावें, एका राजानें दुसऱ्या [illegible] मांडलिक करावें व त्या दोघांनीं मिळून पुनः तिसराच एखादा प्रदेश काबीज करावा, याच क्रमानें मोठमोठीं राज्यें व साम्राज्यें अस्तित्वांत आलेलीं आहेत व केवळ शस्त्रबळानेंच तीं दीर्घकाळ टिकतात, असें या लोकांना वाटतें. राजकीय व्यवहारांत केवळ " बळी तो कान पिळी " हाच न्याय सर्वत्र दृष्टीस पडतो व तो तसाच चालू असावा असेंही कांहीं लोक मानतात. या मतांत जरी सत्याचा कांहीं अंश असला तरी तें सर्वस्वी खरें नाहीं. लोकांतील धर्मबुद्धि, शांततेची आवड, स्वामिनिष्ठा, राष्ट्रभक्ति, परोपकार व स्वार्थत्याग इत्यादि प्रशंसनीय मनोवृत्तींची राज्यांच्या सुस्थितीला व उत्पत्तीला जितकी मदत होते व झालेली आहे, तितकी केवळ शस्त्रबलाची होत नाहीं व झालेली नाहीं. मनुष्य हा स्वभावतः समाजप्रिय नसता, परस्परांच्या सहाय्याची व सहकार्याची मनुष्यांना गरज भासली नसती, तर राज्यें निर्माण झालींच नसतीं. प्राथमिक समाजांतील राजांविषयीं लोकांना भीतिपेक्षां प्रेमच अधिक असलें पाहिजे; नाहींतर प्राथमिक समाजांत लोकनियुक्त राजांची संस्थाच अस्तित्वांत आली नसती. पुष्कळ प्राथमिक समाजांत लोकनियुक्त राजांची संस्था असावी असा अलीकडे विद्वानांनीं सिद्धांत बसविलेला आहे. ऋग्वेदकाळीं भरतखंडांतहि

लोकनियुक्त राजांची संस्था असावी असें आतां सिद्ध झालेलें आहे. शिवाय समाजाच्या प्राथमिक अवस्थेंत एका किंवा अगदीं थोड्या व्यक्तींचें केवळ शस्त्रबळानें अनेक लोकांवर प्रभुत्व प्रस्थापित व्हावें, इतकी जुलमाची साधनेंही अवगत झालेलीं नसतात. राज्यांच्या उत्पत्तीला, अभिवृद्धीला व स्थितीला जरी शस्त्रबलाचें पुष्कळ सहाय्य होत असलें किंवा अधार्मिक लोकांचें पारिपत्य करण्यास व परचक्राचें निवारण करण्यास सैन्यबलाची जरी सर्व राज्यांना अत्यंत आवश्यकता भासत असली तरी सामान्य जनतेंत खुषीची राजनिष्ठा नसेल, राज्यांतील दंडशक्तीचा उपयोग धर्माला व नीतीला धरून होत नसेल व त्यांतील प्रजेंत जर अवश्य तितकें नैतिक सामर्थ्य असेल तर कोणत्याही राज्याचा फार टिकाव लागणें शक्य नाहीं. राज्यांच्या अस्तित्वाला सैन्यबलाहून प्रजेच्या नैतिक पाठिंब्याची अधिक जरुरी आहे. राज्यांना आधारभूत अशी जी दंडशक्ति ती केवळ शस्त्रबलाची पाशवी किंवा सैतानी शक्ति नव्हे. दंडस्वरूपाचें वर्णन मनुस्मृतींत पुढीलप्रमाणें केलेलें आहे. " राजाचें प्रयोजन सिद्ध व्हावें म्हणून सर्व प्राण्यांचें रक्षण करणारा धर्मस्वरूपी व ब्रह्मतेजापासून निर्माण झालेला पुत्ररूप दंड ईश्वरानें पूर्वीं निर्माण केला. (मनुस्मृति अ० ७ श्लो० १४). अर्थात् राज्यांतील शस्त्रबल जेव्हां धर्मानुसारी असेल तेव्हांच त्याला दंडस्वरूप प्राप्त होतें. अशा धर्मस्वरूपी दंडशक्तीवरच राज्यांची उत्पत्ति व स्थिति या अवलंबून असल्या पाहिजेत, व बहुतांशीं तसेंच असतें.

राज्यांच्या आसुरी उपपत्तीचाही उपयोग मागील दोन उपपत्तींप्रमाणें निरनिराळे लोक निरनिराळया कामीं करीत असतात. मध्य-युगांतील युरोपियन धर्माधिकारी या उपपत्तीच्या आधारानें पोपची धार्मिकसत्ता राजसत्तेहून श्रेष्ठ आहे असें प्रतिपादन करीत असत. एकोणिसाव्या शतकांत निघालेल्या अराजक पंथांतील लोकांचें मत राज्य ही संस्था केवळ कांहीं लोकांनीं आपल्या स्वार्थासाठीं उत्पन्न केलेली असून तिच्या योगानें लोकांचें

खरें हित केव्हांही साध्य होणार नाहीं असें होतें. अराजक स्थिति ही सर्वांत उत्तम सामाजिक स्थिति असें समजून ती स्थिति प्राप्त करून घेण्यासाठीं व आसुरी राजकीय संस्था कायमच्या मोडून टाकण्यासाठीं क्रांति करण्याचा उपदेश हे लोक इतरांना करीत असत. रशियामध्यें या पंथाचे बरेच लोक होते. निरनिराळ्या राष्ट्रांतील सध्यांची यादवी बंद होण्यास राज्य ही संस्थाच नष्ट झाली पाहिजे अशा मताचे हे लोक होते व अद्यापिही समाजसत्तावादी कांहीं लोकांत अशी मतें प्रचलित आहेत. परंतु अलिकडे हा अराजक पंथ बहुतेक नष्ट झाला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

उत्क्रांतिवादाचें आसुरी स्वरूप.

कांहीं लोक उत्क्रांतिवादाच्या मिषानें राष्ट्राराष्ट्रांतील, समाजासमाजांतील व व्यक्तीव्यक्तीमधील जीवनकलह तीव्रतेनें चालू देणें यांतच मनुष्यमात्राचें हित आहे असें प्रतिपादन करितात. मनुष्यामनुष्यांमधील क्रूर जीवनकलहामुळेंच राज्याची उत्पत्ति झाली; त्यामुळेंच साम्राज्यें अस्तित्वांत आलीं, बलहीन राज्यें लयास गेलीं, लोकांत शौर्यधैर्यादि गुणांचा विकास झाला, परावलंबी कनिष्ठ लोकांचा नाश होऊन स्वावलंबी लोकांची संख्या वाढली, अशा युक्तिवादाचा आश्रय करून दुर्बलांना मदत करणाऱ्या सामाजिक व राजकीय सुधारकांस हे लोक विरोध करितात. तसेंच राजकीय व्यवहारांत नैतिक भावनांचा शिरकाव करणें या लोकांस इष्ट वाटत नाहीं. जीवनकलह हाच सृष्टीचा धर्म आहे. त्याला विरोध करणें म्हणजे परमेश्वरी संकेताला विरोध करणें होय. राज्याराज्यांतील युद्धें कमी झाल्यास लोकांतील शौर्यधैर्यादि गुणांचा ऱ्हास होऊन स्वोन्नतीसाठीं यत्किंचितहि प्रयत्न न करणाऱ्या दुर्बल, भेकड व आळशी लोकांची संख्या जगांत अतिशय वाढेल अशी या लोकांस भीति वाटते. याच दृष्टीनें प्रबल लोकांनीं दुर्बलांवर राज्य करणें इष्ट आहे असें ते म्हणतात. कारण, त्यांच्या दृष्टीनें

" बळी तो कान पिळी " हाच न्याय योग्य आहे.

त्याचें खंडन.

वरील आसुरी उपपत्तीचेंच हें एक किंचित् भिन्न स्वरूप आहे. याला उत्क्रांतिवादाचा शास्त्रीय आधार घेतलेला असला तरी सूक्ष्म विचारांतीं तें निराधार, निदान एकांगीं तरी खास ठरतें. सृष्टींतील मानवेतर प्राणिकोटींचा न्याय मनुष्यसमाजाला लावू पाहाणें अगदीं अयुक्त आहे. शिवाय खालच्या जीवकोटींतहि केवळ स्वार्थी जीवनकलहच सर्वत्र चालू असतो असें समजणें बरोबर नाहीं. क्रूर वाघीण देखील आपल्या पिलांना इजा करण्यास एखादा प्रबल प्राणी आला असतां स्वतःच्या जिवाची पर्वा न करतां त्याच्या अंगावर तुटून पडते. यावरून उत्क्रांतिवादाचा आश्रय करून लोकांना स्वावलंबन शिकविण्याच्या नांवाखालीं सर्व सामाजिक व राजकीय व्यवहारांतील परोपकारबुद्धि नष्ट करण्याचा प्रयत्न करणें किती गर्ह्य आहे हें दिसून येईल. केवळ शरीर सामर्थ्यापेक्षां नैतिक सामर्थ्याला अधिक महत्त्व आहे असें प्रतिपादतांना मनुष्यामनुष्यांत व राज्याराज्यांत चाललेल्या कलहांत नैतिक बल अधिक असणारीं मनुष्यें व राज्यें अखेरीस तगतील अशीच आपली अपेक्षा असते. परंतु असें नेहमींच घडतें असें समजून जो विजयी होईल त्याच्याच बाजूस नैतिक बल जास्त आहे असा निष्कर्ष काढणें बरोबर नाहीं. सृष्टीच्या जीवनकलहाचें उदाहरण देऊन दुर्बल व्यक्ति, व्यक्तिसमुदाय व समाज यांच्यांबद्दल अंतःकरणांत भूतदया अनुकंपा परोपकार वगैरे ज्या स्तुत्य भावना उत्पन्न होतात त्या मनांतल्या मनांतच दाबून टाकणें हें मनुष्यधर्मास साजेसें नाहीं. तात्पर्य कोणत्याही दृष्टीनें विचार केला तरी राजकीय संस्थांची किंवा व्यवहाराची संगति केवळ शस्त्रबलाच्या आसुरी उपपत्तीनें लागू शकत नाहीं असेंच म्हणावें लागतें.

येथपर्यंत मानवी, दैवी व आसुरी या तिन्हीही **राज्याविषयक** उपपत्तींचें

विवेचन केलें, व त्या कशा भ्रामक आहेत हें दाखविलें. तथापि त्या कल्पना सुचण्यास राजकीय संस्थांच्या स्वरूपांत कांहीं-तरी तशींच कारणें असलीं पाहिजेत हें उघड आहे. तीं कारणें पाहूं गेलें म्हणजे प्रत्येक उपपत्तींत कांहीं सत्यांश आहे, असें वाटूं लागतें. मानवी

तिन्ही उपपत्तींपासून घेण्याचा बोध.

कराराच्या उपपत्तींवरून आपणास असा बोध होतो कीं, राजकीय संस्था या मुख्यतः प्रजेच्या हिताकरितां असून त्यांत सुधारणा करण्याचा हक्क मनुष्यांना आहे; त्या संस्था मनुष्यांच्या खुषीविरुद्ध त्यांच्यावर कोणीही केवळ जबरदस्तीनें लादलेल्या नाहींत. सुक्ष्म विचारांतीं राजकीय संस्थांच्या स्वरूपांसंबंधीचें हें वर्णन एकांगीं भासूं लागतें. मनुष्याची त्या संस्थांत सुधारणा करण्याची शक्ति अत्यंत मर्यादित आहे. "मनसा चिंतितं कार्यं दैवमन्यत्र कारयेत्" हा नियम राजकीय संस्थांच्या उत्क्रांतींत पदोपदीं दिसून येतो. राजांनीं प्रजे-कडून पैसा उकळण्यासाठीं स्थापन केलेल्या संस्थाच राजसत्तेचा अपलाप करून प्रजेच्या हक्कांची वृद्धि करण्यास कारणीभूत झालेल्या आहेत. लोक-सभेवर आपलें वर्चस्व स्थापन करण्यासाठीं इंग्लिश राजांनीं लोकसभेंत ज्यांचें बहुमत होईल अशांस मंत्रिपद देण्याचा प्रघात पाडला; पण याच प्रघातामुळें पुढें मंत्रि नेमण्याचा अधिकार त्यांच्या हांतून निसटून जाऊन लोकसभेच्या हातीं आला. अशा प्रकारें प्रथम एका हेतूनें स्थापन केलेल्या संस्था कालान्तरानें दुसऱ्याच प्रकारें लोकांच्या उपयोगी पडतात. हें पाहिलें म्हणजे मानवी बुद्धीपेक्षां निराळीच एखादी शक्ति राजकीय संस्थांचें नियमन करीत आहे असें वाटूं लागतें, व राज्यांच्या दैवी उपपत्तींतील सत्याचा अंश स्पष्टपणें दृग्गोचर होतो. त्याचप्रमाणें राजकीय संस्थांचा तात्त्विक दृष्टीनें विचार करणाऱ्यास राज्यांच्या आसुरी उपपत्तींतही कांहीं सत्याचा भाग आहे, हें मान्य करावें लागतें. राजकीय संस्थांच्या उत्पत्तीला व स्थितीला मनुष्याच्या आसुरी स्वार्थभावना कांहीं अंशीं कारण झालेल्या

आहेत, हें तर खरें आहेच; पण आसुरी भावनांच्या लोकांनीं केलेल्या दुष्कृत्यांचेही कालांतरानें मनुष्यांना इष्ट असे परिणाम घडलेले दिसून येतात. आमच्या देशावर इंग्लिशांचें राज्य आलें तें त्यांच्या आसुरी स्वभावामुळेंच आलें आहे, हें जाणूनही त्यांत परमेश्वराचा कांहीं तरी चांगलाच संकेत आहे, असें मानणारे पुष्कळ सुविचारी लोक आहेत. तसेंच जुलमी राजांच्या आसुरी वृत्तींमुळें लोकसत्तेचें तत्त्व प्रजेंत प्रसार पावतें, व अधिकाऱ्यांच्या निष्ठुर दडपशाहीमुळें लोकांतील स्वातंत्र्यलालसा जोरानें प्रज्वलित होते, हे सिद्धांत तर सर्वमान्य होण्याजोगे आहेत. तसेंच राज्यांना अंतर्गत व बाह्य शत्रूंचें निवारण करण्यासाठीं शस्त्रबलाचें साहाय्य अवश्य आहे, हें विसरून चालणार नाहीं; केवळ नैतिक बलावर राज्यांचा निभाव लागणार नाहीं. तात्पर्य दैवी, मानवी किंवा आसुरी उपपत्ति या कितीही भ्रामक असल्या तरी त्यांच्यापासून राजनीति-शास्त्रज्ञांस पुष्कळ बोध घेण्याजोगा आहे.

प्रकरण ५ वें

भारतीय राज्यांची उत्पत्ति व उत्क्रांति

मागच्या प्रकरणांत राज्यांच्या उत्पत्तिसंबंधीच्या, ऐतिहासिक कालांत प्रचलित असलेल्या, कांहीं भ्रामक कल्पना घेऊन त्यांचा विचार केला.

प्राथमिक समाजांतील संस्थांची नकळत होणारी उत्क्रांति.

आतां राज्यांची उत्पत्ति खरोखर कशी झाली असावी व पुढें त्यांचीं कसकशीं रूपांतरें होत गेलीं, याचा विचार करावयाचा आहे. राज्यांची उत्पत्ति कशी झाली, यासंबंधीं अद्यापिसुद्धां प्रत्यक्ष पुरावा फारसा उपलब्ध झालेला नाहीं व तो होईल असेंहि वाटत नाहीं. तथापि समाज-शास्त्रज्ञांनीं सध्या रानटी स्थितींत असलेल्या समाजांच्या अवलोकनानें व ऋग्वेद किंवा होमरचें ईलियड यासारख्या अति प्राचीन ग्रंथांच्या आधारें, राजकीय संस्थांच्या उत्पत्तीसंबंधीं बरीच सयुक्तिक उपपत्ति बसविलेली आहे. समाजाच्या प्राथमिक अवस्थेंत कोणतीही सामाजिक संस्था हेतुपुरःसर व दूरवर विचार करून स्थापन होत नसून चालू असलेल्या संस्थांतच परिस्थितिभेदानुसार फेरबदल होतां होतां त्यांतूनच लोकांना नकळत एखादी नवी संस्था निर्माण होत असते. प्राथमिक समाजांतील कोणतीही संस्था एकदम अस्तित्वांत येत नसून तिचा जन्म अनेक वर्षें किंवा अनेक पिढ्या चाललेला असतो; यामुळें अमुक एक संस्था एका विशिष्ट प्रसगीं स्थापन झाली व त्यापूर्वीं ती नव्हती असें खात्रीनें सांगतां येत नाहीं. समाजांत राजकीय संस्था नव्हत्या त्यावेळची स्थिति अमुक आणि त्या स्थापन झाल्यानंतरची स्थिति अमुक, असें सांगतां आलें नाहीं, तरी एवढें मात्र खात्रीपूर्वक सांगतां येईल कीं, बरेच लोक एकत्र येऊन राजकीय संस्था-

खालीं नांदूं लागण्यापूर्वीं त्यांना कोणत्या तरी सामाजिक बंधनामुळें आज्ञापालनाची व शिस्तीची संवय लागलेली असावी. अशी संवय नसतां केवळ स्वसंरक्षणाच्या किंवा सांपत्तिक उन्नतीच्या इच्छेनें लोकांनीं एकत्र येऊन शासनसंस्था निर्माण कराव्यात हें अगदीं अस्वाभाविक व असंभवनीय दिसतें.

राज्यांच्या उत्पत्तीची सामान्य रूपरेखा, कुलसंबंध, धर्मबंधनें व सामान्य हितसंबंध.

ही आज्ञापालनाची व शिस्तीची संवय मनुष्यांना प्रथमतः कुटुंबाच्या संस्थेंतच लागली असावी, हें उघड आहे. कारण मनुष्याची संगतिप्रियता प्रथम कुटुंबांतच व्यक्त होणें अगदीं स्वाभाविक आहे. अनेक व्यक्तींना एकत्र आणण्याला प्रथमतः कुलसंबंधच कारण झाला असला पाहिजे. रक्तसंबंधानें बद्ध झालेलीं अनेक कुलें एकत्र राहूं लागलीं म्हणजे एक समाज तयार होतो व त्यांच्या आचारविचारांना एकरूपता प्राप्त होऊं लागते. या आचारविचांतूनच पुढें धर्माची उत्पत्ति होते व कुलसंबंधांप्रमाणेंच धर्मबंधनांनीं त्या समाजांतील व्यक्ती निगडित होऊं लागतात. समाजाच्या प्राथमिक अवस्थेंत कुल आणि धर्म यांचा फार निकट संबंध असतो. या वेळच्या धर्मांत पूर्वजपूजेला अग्रस्थान दिलेलें असल्यामुळें ज्यांचे पूर्वज किंवा मूळ पुरुष एक त्यांचे धार्मिक आचारविचार एकच बनू लागतात. या दोन बंधनांमुळें लोक एकत्र राहू लागले म्हणजे हळू हळू संपत्तीची वाढ होऊ लागते व चोरजारांचें पारिपत्य करण्याची आवश्यकता भासू लागतें. याच वेळीं शेजारच्या समाजाचा उपद्रव आपल्या समाजातील संपत्तीला व कुटुंबसंस्थेला विनाशक होईल असें वाटूं लागतें. इतकी परिस्थिति प्राप्त झाली कीं, समजांत राजकीय संस्थांची उत्क्रांति होण्यास हळुहळू सुरवात होते. प्रथमतः शेजारच्या दुसऱ्या समाजाशीं लढण्याच्या प्रसंगीं एखादा आपल्यांतील शूर सेनानायक निवडण्याची चाल पडूं लागतें व पुढें हळूहळू या सेनानायकाची वारंवार गरज भासू लागली

म्हणजे त्या कार्याकरितां एका मनुष्याची कायमची नेमणूक करण्यात येते, किंवा एखादा मनुष्य आपल्या अंगच्या गुणांनीं तें कार्य आपल्याकडे कायमपणें घेऊं लागतो. हळूहळू याच सेनानायकाकडे अंतःशत्रूचें निवारण करण्याचें काम येऊं लागतें व तें कार्य करण्यांत तो भाग घेऊं लागला कीं त्यालाच राजा ही पदवी प्राप्त होते.

राजकीय संस्थांच्या उत्पत्तीची सामान्य रूपरेखा वरच्याप्रमाणें असली, तरी निरनिराळ्या समाजांच्या इतिहासांत तिचीं अनेक विशिष्ट स्वरूपें व्यक्त झालीं असलीं पाहिजेत, असें आतां समाजशास्त्रज्ञांनीं ठरविलेलें आहे. तेव्हां या सामान्य रूपरेखेपेक्षां ज्यास्त माहिती पाहिजे असल्यास विशिष्ट लोकांच्या इतिहासावरूनच काढिली पाहिजे. राजकीय दृष्टीनें महत्त्वाचें व आमच्याशीं ज्यास्त संबंध असलेले लोक म्हणजे भारतीय व युरोपियन आर्य लोक होत. या दोन लोकांच्या राजकीय संस्थांचा जितका साधार व बोधप्रद इतिहास सांपडूं शकतो तितका इतर कोणत्याही लोकांच्या संस्थांचा सांपडूं शकत नाहीं. याकारितां व या लोकांच्या राजकीय संस्थांच्या उत्क्रांतीचा इतिहास विशेष महत्त्वाचा असल्यामुळें आम्ही या पुस्तकांत केवळ भारतीय व युरोपियन राजकीय संस्थांच्या उत्क्रांतीचीच माहिती देण्याचें योजिलें आहे. त्यांपैकीं या प्रकरणांत भारतीय राज्यांची माहिती देऊन पुढील प्रकरणांत युरोपियन राज्यांच्या उत्क्रांतीची माहिती देऊं.

भारतीय व युरोपियन आर्यांचें राजकीय महत्त्व

समाजाच्या बाल्यावस्थेंत कशा प्रकारची कुटुंबव्यवस्था रूढ असावी याबद्दल तज्ज्ञ लोकांत बराच मतभेद दिसून येतो. कांहीं लोकांचें मत असें आहे कीं, आर्य लोकांच्या सर्व शाखांत दिसून येणारी पितृप्रधान कुटुंबव्यवस्था (Patriarchal) सर्व लोकांस प्रथमपासून चालत आलेली

पितृप्रधान व मातृप्रधान कुटुंबव्यवस्था

असावी. या व्यवस्थेप्रमाणें कुटुंबांतील सर्व व्यवस्था व सत्ता कुटुंबांतील श्रेष्ठ पुरुष व्यक्तीकडे असते. त्याच्या मृत्यूनंतर ही सत्ता त्याच्या ज्येष्ठ मुलाकडे जाते, व इतर सर्व भाऊ व त्यांचीं कुटुंबें या ज्येष्ठ मुलांच्या प्रभुत्वाखालीं वागत असतात. सध्यां आपण ज्याला एकत्र-कुटुंबव्यवस्था असें म्हणतों त्या सारखीच ही व्यवस्था होती. परंतु ज्यावेळीं समाजांत राजा किंवा त्याचे अधिकारी आणि पुरोहित वर्ग यांचें अस्तित्व असत नाहीं, त्यावेळीं कुटुंबांतील कर्त्या पुरुषाकडे पुष्कळच अधिक अधिकार असावेत हें उघड आहे. कुटुंबांतील किंवा कुलांतील व्यक्तींचें व संपत्तीचें संरक्षण करण्याची सर्व जबाबदारी त्याच्यावरच असल्यामुळें त्याला देहांत प्रायश्चित्तापर्यंत वाटेल ती शिक्षा आपल्या कुटुंबांतील व्यक्तींना करतां येत असे. तसेंच कुटुंबांतील सर्व धर्मविधी यथासांग करून कुटुंबाच्या सुस्थितीबद्दल दक्षता ठेवण्याची जबाबदारीहि त्याच्याच अंगावर होती. भारतीय व युरोपियन आर्यांच्या सर्व शाखांत अशाच प्रकारची पितृप्रधान एकत्र कुटुंबव्यवस्था असल्याचें दिसून येतें. त्यांत फरक असला तर इतकाच असेल कीं, युरोपांतलि समाजांत राजकीय संस्थांची स्थापना झाल्यानंतरहि बराच काळपर्यंत कुलपतीला आपल्या कुटुंबीयांवर पूर्वीसारखें सुलतानी अधिकार गाजवितां येत असत, तितके भारतीय आर्यांच्या कुलपतीला गाजवितां येत नसत. याखेरजि ग्रीक, रोमन, व भारतीय आर्य लोक यांच्या कुटुंबव्यवस्थेंत विशेष फरक असेल असें वाटत नाहीं. हीच पद्धति इतर सर्व समाजांत एके काळीं रूढ असावी असा सर हेन्री मेन याचा तर्क होता. परंतु या मतावर आतां आक्षेप घेण्यांत येत असतो. पितृप्रधान कुटुंबव्यवस्था सर्व प्राथमिक समाजांत आढळून न येतां कांहीं कांहीं समाजांत मातृप्रधान कुटुंबव्यवस्था असल्याचें दिसून येतें. या कुटुंबव्यवस्थेंत बापापेक्षां आईला प्राधान्य असतें. व आईचा वारसा मुलीला मिळत असतो. कित्येकांचें तर असें मत आहे कीं, सर्वच समाजांत अगदीं

प्रथम मातृप्रधान कुटुंबव्यवस्था (Matriarchal) अस्तित्वांत येते व मग पितृप्रधान व्यवस्था अस्तित्वांत येते. आम्हांस या वादांत पडण्याचें कारण नाहीं. आर्य लोकांच्या सर्व शाखांत पितृप्रधान कुटुंबव्यवस्था प्रथम अस्तित्वांत होती. तिच्यांतील कुटुंबांतील कर्त्या पुरुषाच्या अधिकारावरून राजाच्या अधिकारांची व आवश्यकतेची कल्पना लोकांना सुचली असावी व त्याचे बरेच अधिकार हळूहळू राजाकडे गेले, या गोष्टी आतां सर्वमान्य झालेल्या आहेत. इतर सर्व समाजांच्या उन्नतीस हाच नियम लागू होईल किंवा नाहीं या प्रश्नांशीं आमचा कांहीं संबंध नाहीं. तथापि हा नियम सर्व समजांना लागू पडत नाहीं व निरनिराळ्या समाजांची उत्क्रांती निरनिराळ्या प्रकारें झाली असावी, हें मत आतां बहुतेक तज्ञांना मान्य झालेलें आहे, एवढें जातां जातां सांगून ठेवण्यास कांहीं हरकत नाहीं.

वेदकालीन प्राथमिक राज्यें

भारतीय राज्यांची अगदीं प्राथमिक अवस्था वेदासंहिता व ब्राह्मणग्रंथ यांत वार्णिलेली आहे. अर्थात् त्यावेळच्या राज्याचें वर्णन करण्याकरितां हे ग्रंथ लिहिलेले नसल्यामुळें त्यांत यासंबंधी आलेल्या अप्रत्यक्ष उल्लेखावरून आज आपणांस त्यावेळच्या राजकीय संस्थेच्या स्वरूपांविषयीं अनुमानें बांधावीं लागतात. ऋग्वेदकाळीं भरत पुरु, त्रित्सु, यदु, गंधार, उशीनर,अनु,द्रह्यु, अशीं नावांचीं आर्य लोकांचीं निरनिराळीं गोत्रें किंवा कुळें हिंदुस्तानांत येऊन वसाहती करूं लागलीं असावी असें दिसतें. हें निरनिराळ्या कुळांतील लोक 'जन' या नावांनें संबोधिलें जात. हे निरनिराळे लोक आपणांस एकाच कुळांतील संतति समजत असल्यामुळें त्यांच्यांतील एकाद्या कुटुंबातील कर्त्या पुरुषाकडे त्यांचें नेतृत्व असावें, हें उघड आहे. प्रथमतः सिंधू नदीच्या कांठीं यांनीं निरनिराळीं गांवें वसवून वसति केलेली असावी. यावेळीं या आर्यजनांना येथें राहणाऱ्या मूळच्या अनार्य जातीच्या लोकांशीं एकसारखीं युद्धें करावीं लागत;

इतकेंच नाहीं तर या निरनिराळ्या आर्यवंशीय लोकांतहि आपापसांत युद्धें होत असावींत. या युद्धामुळें या लोकांत प्रथम राजा निर्माण झाला असावा असा तर्क आहे. ऐतरेय ब्राह्मणांतील एका कथेवरून या तर्काला बराच आधार मिळतो. देव आणि असुर यांच्यामध्यें युद्ध चालू असतां देवांना यश मिळेना, तेव्हां असुरांत राजा असल्यामुळें त्यांना यश मिळतें व आपणांत राजा नसल्यामुळें आपला पराभव होतो असे देवांना वाटून त्यांनीं आपणांपैकीं एकाला राजा निवडलें.[१] यावरून आर्य लोकांत राजाची उत्पत्ति युद्धांमुळें झाली हें उघड होतें. राजांच्या वर्णनांत " पुरां भेत्ता " म्हणजे शहरें काबीज करणारा हेंच वर्णन विशेष प्रामुख्यानें वैदिक वाङ्मयांत येत असतें. यावेळीं कांहीं कांहीं लोकांत राजा नसून त्यांचा राज्य-कारभार त्यांच्यांतील निरनिराळे कुलपति सभेंत जमून करीत असत असाहि कांहीं लोकांचा तर्क आहे. ज्यावेळीं राजे लोक युद्धाला जात त्यावेळीं त्यांच्याबरोबर निरनिराळे व्रजपति व त्यांच्या हाताखालीं अनेक कुलप (कुलपति) जात असत असें वर्णन आहे. व्रजपती हेच शांततेच्या वेळीं ' ग्रामणी 'या नांवानें निरनिराळ्या गावांचीं व्यवस्था तेथील कुलपतींच्या साहाय्यानें व सल्लयानें करीत असावेत. यावेळीं या निरनिराळ्या राज्यांतील राजे अनियंत्रत नसून ते शांततेच्या कामीं न्यायदानाचें वगैरें काम लोकसभे-मार्फत करीत असावेत असें दिसतें. ऋग्वेदांत विदथ, संगति, सभा व समिति अशीं चार नांवें लोकसभेला दिलेलीं आढळतात. हीं नांवें एकाच प्रकारच्या लोकसभेला दिलेलीं असावींत किंवा यानांवानें निरनिराळ्या

---

१. ही कथा प्रथम काशिप्रसाद जयस्वल यांनीं पुढें आणिली त्याचप्रमाणें " Pcsitive Background of Hindu Sociology. Part. 1 Book 2 P. 53. " या पुस्तकांत विनयकुमार सरकार यांनीं ही कथा दिली आहे.

प्रकारच्या सभांचा बोध होत असे, हें निश्चयानें आज कांहींच सांगतां येत नाहीं. तरी, 'विदथ व संगति' हीं धार्मिक सभांचीं नांवें असावींत, 'सभा' ही ब्राह्मण व मघवन म्हणजे देशांतील विद्वान व श्रीमान् लोकांची सभा असावी असा कांहीं लोकांचा तर्क आहे. समिती या सभेला राजा निवडण्याचा अधिकार असावा असें झिमर या युरोपियन पंडिताचें मत आहे. या सर्व गोष्टींसंबंधानें अद्यापि विद्वान् लोकांत पुष्कळ मतभेद आहे, तथापि ऋग्वेदकाळीं राजे अनियंत्रित नसावेत, लोकसभेसारख्या संस्था अस्तित्वांत असाव्यात, कांहीं कांहीं राज्यांत लोकनियुक्त राजे असावेत, कांहीं राज्यांत मुळींच राजे नसून तेथील राज्यकारभार राज्यांतील श्रेष्ठ लोकांच्या हातीं असावा, आणि जुलमी राजांना लोक गादीवरून काढून टाकीत असावेत, एवढे सिद्धांत आज बहुतेक सर्वमान्य झालेले आहेत. होमरच्या ईलीयडमध्यें ज्या प्रकारच्या राजकीय संस्थांचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष उल्लेख आहे, त्या प्रकारच्याच संस्था ऋग्वेदकाळीं भारतीय आर्यांत प्रचलित असाव्यात असा तज्ज्ञ लोकांचा यासंबंधीं सिद्धांत आहे. यावेळीं राजाचें शांततेच्या वेळचें मुख्य कार्य म्हणजे गुन्हेगारांस शिक्षा करणें हेंच होतें.

ऋग्वेद काळानंतरचा भारतीय आर्यांचा इतिहास महाभारत व रामायण या ग्रंथांत वर्णिलेला सापडतो. या काळांत भारतीय युद्धापासून इ. स. पू. चारपांच शतकांपर्यंतच्या भारतीय आर्यांच्या इतिहासाचा समावेश होतो. या काळांत भारतीय राज्यांची उत्क्रांति दुसऱ्या पायरीवर गेली. या काळांत सिंधुनदीपासून पूर्वेस गंगानदीपर्यंत व दक्षिणेस विंध्याचलापर्यंत व त्याच्याही खालीं आर्यलोकांनीं जिकडे तिकडे लहान लहान स्वतंत्र राष्ट्रें स्थापन केलीं. भारत, पांचाल, ऐक्ष्वाक, कुरु वगैरे नावाचे निरनिराळे आर्यलोक एकेका विशिष्ट प्रदेशांत जाऊन कायमचे राहिले तेथें त्यांची विशिष्ट संस्कृतीनें

महाभारत व रामायण. यांत वर्णिलेलीं छोटीं राष्ट्रीय राज्यें

मंडित अशीं स्वतंत्र राष्ट्रें अस्तित्वांत आलीं. हीं राष्ट्रें अगदीं छोटीं असलीं तरी त्यांची राज्यव्यवस्था फारच व्यवस्थित व उच्च दर्जाची असावी असा तर्क आहे. प्राचीन युरोपांतील ग्रीक लोकांच्या लहान लहान नगरराष्ट्रां-सारखींच स्वातंत्र्यप्रिय, सुसंघटित व सुसंस्कृत अशीं हीं भारतरामायण ग्रंथांत वर्णिलेलीं भारतीय राष्ट्रें होतीं. या राष्ट्रीय राज्यछत्राखालीं भारतीयांच्या सनातन संस्कृतीचा व सनातन धर्माचा पाया घातला गेला. वर्णाश्रमधर्माची दिव्य कल्पना याच काळांत परिणतावस्थेस पोहोंचली. राजधर्माचा व राज-नीतिशास्त्राचा विचार याच काळांत वृद्धींगत झाला. श्रीकृष्ण आणि गौतम-बुद्ध यांसारखे थोर महात्मे याच काळांत होऊन गेले. अनियंत्रित राजसत्ते-पासून शुद्ध लोकशाहीपर्यंतच्या अनेकविध राज्यघटनांचे प्रयोग याच काळांत भारतीय आर्यांनीं करून पाहिले. ब्राह्मणांनीं घालून दिलेल्या धर्मानुसार आणि लोकसभा व मंत्रिपरिषद यांच्या अनुमतीनें राज्य करावें, ज्यांच्यावर लोकांचा विश्वास असेल अशा गृहस्थांनाच राजानें मंत्रिपद द्यावें, असे लोकनियंत्रित राजसत्तेचे विचार याचवेळीं उदय पावले आणि ब्राह्मण व राजे धर्मभ्रष्ट झाले तेव्हां ब्राह्मणांचा व राजांचा वरचष्मा झुगारून देऊन सामाजिक समता, धार्मिक स्वातंत्र्य आणि राजकीय लोकशाही यांचा धैर्यानें पुरस्कार करणारा शाक्यसिंह याच काळांत होऊन गेला ![1]

महाभारतांत 'गण' या नांवानें उल्लेखलेलीं राज्यें लोकशाहीचीं किंवा महाजनसत्ताक राज्यें असावींत. वैराज्य हा शब्दहि अशाच प्रकारच्या

1 "The principles of the Sakya republic, nay, the entire philosophy of republicanism, found an able exponent in Sakya, the Budha, who, though he renounced the family ties, remained an active propagandist all his life. And the propaganda embraced lectures as much on constitutional law, trial by

लोकशाहीचीं राष्ट्रें व भारतीयांचें संघटना-कौशल्य.

राज्यांना लावला जात असावा. उत्तरकुरु व उत्तरमद्र हीं राज्यें लोकशाहीचीं असल्यामुळें त्यांना वैराज्यें अशी संज्ञा होती. इ.स. पू सातव्या शतकाच्या सुमारास शाक्य व विज्जयन हीं लोकशाहीचीं प्रसिद्ध राज्यें बंगालच्या बाजूला नांदत होतीं. शाक्यांच्या राज्याची पूर्वपश्चिम लांबी सुमारें पन्नास मैल व दक्षिण उत्तर रुंदी सुमारें तीसचाळीस मैल असावी. विदेहाचें राज्य प्रथम राजसत्ताक होतें; परंतु पुढें तें व वेशालि, आदिकरून इतर सात राष्ट्रें मिळून अमेरिकेच्या संयुक्त राष्ट्रांसारखें एक भलें मोठें लोकशाहीचें संयुक्त राष्ट्र निर्माण झालें. यापैकीं विदेहांचें राज्य फार मोठें होतें. इ. स. पू. ३२६ मध्यें जेव्हां शिकंदर बादशहा हिंदुस्थानांत आला होता, तेव्हां पंजाब व सिंध या प्रांतांत अशीं लोकशाहीचीं अनेक छोटीं परंतु प्रबल राष्ट्रें नांदत होतीं व त्यांच्याबरोबर शिकंदरास लढावें लागलें, असें ग्रीक ग्रंथकारांनीं लिहून ठेविलेलें आहे. अशा राष्ट्रांत अरत्त (अराष्ट्रक) क्षुद्रक, स्वत्तीय व मालव हीं प्रमुख होतीं. सिंधु नदीच्या मुखाजवळील पाटल नगराची राज्यघटना ग्रीक मधील स्पार्टा नांवाच्या नगरराष्ट्रासारखी होती, असें ग्रीक ग्रंथकारांनीं लिहून ठेविलेलें आहे. ज्या राज्यांत राजे होते तेथेंही त्यांची सत्ता लोकसत्तेनें नियंत्रित झालेली होती, हें वर दिलेंच आहे. अर्थात् यावेळीं भारतीय आर्यांची सामाजिक व राजकीय संघटनेच्या कामीं पुष्कळ प्रगति झालेली होती, हें उघड आहे.

---

jury, RES JUDICATA, government by the majority, the importance of public meetings, and all other branches of civic life, as on the pathway to salvation and the elimination of " misery from the world of men " " The Political Institutions and Theories of the Hindus " by B. K. Sarkar P. 149.

या कामीं ते युरोपियन ग्रीक लोकांपेक्षां कोणत्याही प्रकारें कमी दर्जाचें तर ठरत नाहींतच,उलट एका दृष्टीनें यांचें राज्यघटनाकौशल्य जास्त विशद होतें. हीं भारतीय राष्ट्रें छोटीं असलीं तरी त्यांच्या समकालीन ग्रीक नगरराष्ट्रांपेक्षां तीं मोठीं होतीं. ग्रीस देशांतील नगरराष्ट्रांत एक शहर व त्याच्या आसपासचीं थोडीं खेडीं एवढ्यांचाच समावेश होत असे. इकडची तत्कालीन राज्यें सध्यांच्या एकेका जिल्ह्याएवढीं असावींत असें वाटतें.

भारतीय साम्राज्याची त्रोटक माहिती.

इ. स. पू.च्या चौथ्या शतकानंतर या छोट्या राष्ट्रीय राज्यांचें युग संपून मोठमोठीं साम्राज्यें अस्तित्वांत येऊं लागलीं. यापूर्वीं राजे दिग्विजय करीत असत व चक्रवर्ती बनत असत. परंतु त्यावेळची दिग्विजयाची कल्पना इतर राजांना फक्त आपलें प्रभुत्व मान्य करावयास लावणें एवढीच होती. आतां या कल्पनेऐवजीं पूर्वींचीं राष्ट्रीय राज्यें अजिबात मोडून त्यांच्या ऐवजीं एकच मोठें राज्य स्थापन करावयाचें अशी कल्पना पुढें आली. यावेळींच मौर्य साम्राज्य उदयास आलें व त्या घराण्यांतील बुद्धधर्मी सम्राट अशोक यानें सर्व हिंदुस्थान आपल्या एकछत्रीअमलाखालीं आणिला असें म्हणण्यास हरकत नाहीं. फक्त अगदीं दक्षिणेची चोल, पांड्य, केरळ वगैरे कांहीं थोडीं राज्यें या साम्राज्याच्या बाहेर जीव धरून राहिलीं होतीं. सध्याचें अफगाणिस्थान व बलुचिस्थान हे देशही यावेळीं मौर्य साम्राज्या-खालीं आले होते. युरोपांतील रोमन साम्राज्य अगदीं आपल्या वैभवाच्या शिखरास पोहोंचलें असतां त्याच्याखालीं जेवढा प्रदेश होता तेवढा प्रदेश यावेळीं म्हणजे सुमारें पांचशें वर्षें आधीं मौर्य बादशहांनीं आपल्या प्रभुत्वा-खालीं आणिला होता. गंगा नदीच्या काठचें भव्य व सुंदर नगर पाटली-पुत्र ही त्याची राजधानी होती. या साम्राज्याचें पूर्व भाग, पश्चिम भाग, दक्षिण

भाग व उत्तर भाग असे चार विभाग केलेले असून तेथें या बादशहांचा एक एक प्रतिनिधि नेमलेला असे. मौर्य साम्राज्याच्या अमदानींत बुद्ध संस्कृतीची कीर्ति दिगंतास पसरली आणि भारतीयांचें नांव आशिया व युरोप यांत सर्वत्र ऐकूं येऊं लागलें. हें साम्राज्य इ. स. पू. ३२३ पासून १८५ पर्यंत भरभराटींत होतें. यानंतर इ. स. पू. १८३ पासून ६३ पर्यंत सुंग राजे पाटीलपुत्राच्या गादीवर होते; परंतु हिंदुस्थानच्या पूर्वेकडील प्रदेशावर यांचें राज्य केव्हांहि पसरलें नाहीं. या सुंग राजांत पुष्यमित्र हा पराक्रमी राजा होऊन गेला व त्यानें इ. स. पू. १५३ मध्यें हेलेनिक (ग्रीक) राजा मिनॅन्डर हा हिंदुस्थानांत आला असतां त्याचा पराभव केला. याचवेळीं दक्षिणेंत आंध्राचें साम्राज्य पुष्कळ भरभराटीस आलें. या आंध्र बादशहांचे कारकीर्दींत तेथील लोकांचे ग्रीस, रोम, इजित, चीन वगैरे देशांशीं व्यापारी दळणवळण चालू होतें. गौतमीपुत्र आणि यज्ञश्री हे बादशहा या घराण्यांतील राजांत प्रसिद्ध आहेत. उत्तरेस वायव्य सरहद्दीवर याचवेळीं कुशान नांवाचे राजे राज्य करीत असून त्यांचेंहि राज्य बरेंच विस्तृत व वैभवशाली होतें. सारांश मौर्य साम्राज्याच्या अस्तानंतर पूर्वेस सुंग, वायव्येस कुशान व दक्षिणेस आंध्र अशीं तीन बरींच मोठी राज्यें उदयास आलीं. कुशानांचें राज्य इ. स. २२६ पर्यंत भरभराटींत होतें. यानंतर इसवी सनाच्या चौथ्या शतकांत गुप्त सम्राटांचें साम्राज्य पुनः उत्तर हिंदुस्थानांत वैभवास चढलें. हे गुप्त राजे हिंदुधर्माचे असून यांच्या कारकीर्दींत हिंदु संस्कृतीचें पुनरुज्जीवन झालें. हिंदुस्थानचा राष्ट्रीय कवि कालिदास हा या साम्राज्याच्या काळांतच झाला असून त्यानें रघूवंशांत वर्णिलेला रघुराजाचा दिग्विजय हा या गुप्त घराण्यांतील समुद्रगुप्ताचा दिग्विजय असावा, असा इतिहासज्ञांचा अंदाज आहे. " आसमुद्रक्षितीशानां " आणि " आनाकरथवर्त्मनां " या विशेषणांनीं रघू-

वंशांतील राजांचें केलेलें वर्णन गुप्त घराण्यांतील पराक्रमी समुद्रगुप्तास योग्य प्रकारें लागूं पडतें. समुद्रगुप्तानें हिंदुस्थानच्या दक्षिण टोंकापर्यंत दिग्विजय केला होता, परंतु दक्षिण हिंदुस्थान त्याच्या प्रत्यक्ष अमलाखालीं आलें नव्हतें. फक्त तेथील राजे मांडलिक बनले असावेत. सर्व उत्तर हिंदुस्थान मात्र याच्या प्रत्यक्ष अमलाखालीं आलें होतें. हें साम्राज्य इ. स. ३२० पासून ५५० पर्यंत भरभराटींत होतें. याच्या अस्तानंतर उत्तर हिंदुस्तानांतील वर्धन राजांचें राज्य व दक्षिणेंत चालुक्याचें राज्य यांचा वैभव काळ आला. वर्धन राजांची राजधानी कनौज ही असून त्यांच्यापैकीं हर्षवर्धन हा राजा सम्राट या पदवीस पात्र झाला होता. त्याचें साम्राज्य बहुतेक उत्तर हिंदुस्थानांत पसरलें होतें. यानंतर पुनः सातव्या शतकापासून बरींच लहान लहान राज्यें हिंदुस्तानचें सार्वभौमत्व बळकावण्यासाठीं आपापसांत लढत होतीं. यांत (१) बंगालचें पाल व सेन राजे (२) राजपुतान्यांतील प्रतिहारी म्हणजे रजपुत राजे (३) दक्षिणेंतील राष्ट्रकूट व (४) चोळ राजे व (५) काश्मिरचे राजे हे मुख्य असून यावेळीं हिंदुस्थानचें राजकीय दृष्ट्या वरील प्रकारें स्थूलमानानें पांच विभाग झाले होते असें म्हणण्यास हरकत नाहीं. यानंतर हिंदु राजांची अमदानी संपली व पुढें मुसलमानांची अमदानी सुरू झाली. मुसलमानी अमदानींत मोगल साम्राज्य व त्यानंतर मराठ्यांचें साम्राज्य यांनीं जवळ जवळ सर्व हिंदुस्थान पादाक्रांत केलाच होता. मोगल साम्राज्य हें मुसलमानांचें साम्राज्य असलें तरी तें परकीयांचें नव्हतें. कारण मुसलमान व हिंदु हे दोघेहि भारतवासीच होते. मराठ्यांच्या साम्राज्यानंतर मात्र आतां हिंदुस्थानावर परकीयांचा अंमल सुरू झाला आहे. अर्थात् मराठ्यांच्या अस्ताबरोबर भारतीयांच्या राज्यांच्या इतिहासाचा शेवट होतो.

मौर्य साम्राज्यापासून मराठ्यांच्या साम्राज्याचा अंत होईपर्यंत जीं मोठमोठीं साम्राज्यें हिंदुस्थानांत उदय पावलीं व अस्तास गेलीं त्यांची

युरोपियन व भारतीय इतिहासांतील साम्य व अंतर.

अगदीं त्रोटक माहिती वर दिली आहे. त्यावरून हिंदुस्थानचा राजकीय इतिहास किती गुंतागुंतीचा आहे याची कल्पना येईल. खरें पाहूं गेलें असतां युरोपियन देशांतील आर्वाचीन राष्ट्रांच्या मानानें हिंदुस्थान देश हें एक राष्ट्र नसून एक खंड आहे. या दृष्टीनें त्याच्या इतिहासाची तुलना एखाद्या युरोपीयन राष्ट्राशीं न करितां सर्व युरोपखंडाच्या इतिहासाशीं केली पाहिजे; व तशी तुलना करूं गेलें म्हणजे युरोपीयन व भारतीय लोकांच्या इतिहासांत पुष्कळ साम्य दिसून येतें. युरोपांत ज्याप्रमाणें प्रथम छोटीं छोटीं नगरराष्ट्रें असून त्यांत लोकसत्ताक राज्यघटना रूढ होत्या, तशींच भरतखंडांतही प्रथम छोटीं राष्ट्रिय राज्यें स्थापन होऊन त्यांत लोकसत्ताक राज्यघटना उद्भुत झाल्या होत्या, आणि युरोपांत ज्याप्रमाणें मॅसिडोनियन व रोमन साम्राज्यें उदय पावल्यापासून लोकसत्तेचा व राष्ट्रीयत्वाचा अस्त झाला त्याप्रमाणें इकडेहि घडलें. युरोपांत रोमन साम्राज्यानंतर जसे अनेक राजांनीं पुनः सर्व युरोप एका साम्राज्याखालीं आणण्याचे अनेक प्रयत्न चालविले होते, त्याचप्रमाणें इकडेहि मौर्य साम्राज्य नष्ट झाल्यापासून सर्व हिंदुस्थान एकछत्री अंमलाखालीं आणण्याचे अनेक राजांनीं अनेक प्रयत्न केले. यामुळें जसा हिंदुस्थानचा राजकीय इतिहास गुंतागुंतीचा झालेला आहे, तसाच युरोपियन राजकीय इतिहासहि तितकाच गुंतागुंतीचा झालेला आहे. फरक इतकाच आहे कीं, इसवी सनाच्या सोळाव्या शतकापासून युरोपांत पुनः राष्ट्रीय राज्यांच्या कल्पनेचा उदय होऊन सर्व युरोप खंड एकछत्री अमलाखालीं आणण्याचे प्रयत्न मागें पडूं लागलेले दिसतात. यानंतर आर्वाचीन काळीं युरोपांत निरनिराळ्या भाषा बोलणाऱ्या लोकांची निरनिराळीं सुसंघटित राष्ट्रें निर्माण झालीं. तशी स्थिति हिंदुस्थानांत न होतां सर्व हिंदुस्थानचें

एक राज्य व राष्ट्र बनविण्याचें हिंदु राजांचे प्रयत्न इंग्लिश लोक येथें येईपर्यंत सारखे चालू होते. सध्यासुद्धां भारतीय लोकांचें ध्येय, सर्व हिंदुस्थान हें एक राष्ट्र व्हावें, हेंच असल्यामुळें युरोपियन लोक ज्याप्रमाणें, मध्ययुगांतील राजांनीं सर्व युरोप एकछत्री अमलांत आणण्याचें केलेले सर्व प्रयत्न चुकीचें व राष्ट्रीय राज्याच्या उत्पत्तीला व उत्क्रांतीला विघातक झाले असे मानतात, तसें भारतीय लोक मानीत नाहींत. सर्व भरतखंड एका राष्ट्राप्रमाणें संघटित राज्य बनविणें हें ध्येय सध्यांच्या भारतीयांच्या अंतःकरणांत असल्यामुळें, ऐतिहासिक काळांत ज्यांनीं ज्यांनीं भरतखंडांत साम्राज्य स्थापण्याचे प्रयत्न केले, त्यांच्याविषयीं त्यांच्या अंतःकरणांत एक प्रकारची कृतज्ञताबुद्धि वास करीत असते.

साम्राज्यांचीं दोन स्वरूपें.

भरतखंडांत मौर्य साम्राज्यापासून मराठ्यांच्या साम्राज्यापर्यंत जीं निरनिराळीं साम्राज्यें होऊन गेलीं, त्यांचीं स्थूलमानानें दोन स्वरूपें दृष्टीस पडतात, यांपैकीं कांहीं साम्राज्यें सुसंघटित स्वरूपांचीं तर दुसरी साम्राज्यें विस्कळित स्वरूपाचीं असलेलीं दिसतात. किंवा एकाच साम्राज्याचें स्वरूप कधीं सुसंघटित तर कधीं विस्कळित असलेलें दिसून येतें. साम्राज्यवृद्धी फार झालीं व कर्तृत्ववान व पराक्रमी राजे उरले नाहींत म्हणजे त्याच साम्राज्यांतील निरनिराळ्या विभागावरील अधिकारी किंवा मांडलिक राजे हे तेवढ्या प्रदेशापुरती सर्व सत्ता आपल्या हातीं घेऊन व मध्यवर्ती साम्राटांचें केवळ नांवाचें प्रभुत्व मान्य करून स्वतंत्र राजांसारखें वर्तन करूं लागत. यामुळें साम्राज्याचें स्वरूप विस्कळित होऊन त्यांना मध्ययुगांतील युरोपीयन सरंजामी पद्धतीच्या राज्यांचें स्वरूप प्राप्त होत असें. ज्यावेळीं दळणवळणाचीं फारशीं साधनें नव्हतीं, राज्यांतून सैन्यांचीं इकडे तिकडे नेआण करणें फार अवघड होतें व राज्यांतील सरहद्दीवरील प्रदेशांना एकसारखी परचक्राची भीति असे, अशा वेळीं राज्यांतील निरनिराळ्या

विभागांवरील अधिकाऱ्यांना बरेच अधिकार व बरेंच स्वातंत्र्य दिल्याखेरीज राज्यकारभार करणें शक्य नव्हतें. अर्थात् ज्यावेळीं मध्यवर्ति गादीवर पराक्रमी राजे नसत, त्यावेळीं या सर्व विभागांवरील अधिकाऱ्यांना वचकांत ठेवणें शक्य न झाल्यामुळें कांहीं काळानंतर प्रत्येक साम्राज्याला हे विस्कळित व विकृत स्वरूप नियमानें प्राप्त होत असें.तसेंच कोणत्याहि साम्राज्याची वाढ सुरू असतांना त्यांतील जे जे पराक्रमी पुरुष जो जो प्रदेश काबीज करून आपल्या मालकाचें साम्राज्य वाढवीत त्यांना त्यांनीं जिंकलेल्या प्रदेशावरील बरेच अधिकार उपभोगूं देणें, हेंही व्यावहारिक राजनीतीच्या दृष्टीनें त्या काळांत अवश्यच होतें. अशा रीतीनें निरनिराळ्या सरदारांनीं निरनिराळ्या दिशेनें नवीन नवीन प्रदेश काबीज करून बरीच साम्राज्यवृद्धि केली, तर पुढें एकादा पराक्रमी पुरुष मध्यवर्ति गादीवर आला म्हणजे त्या सर्व सरदारांना आपल्या कह्यांत आणून साम्राज्याची योग्य संघटना करीत असे. असे पराक्रमी पुरुष निर्माण होण्यापूर्वीं अगर निर्माण होऊन गेल्यानंतर बहुतेक साम्राज्यें विस्कळीत स्वरूपांतच असत. सवाई माधवरावाच्या मृत्यूनंतरचें मराठ्यांचें साम्राज्य किंवा औरंगजेबाच्या मृत्यूनंतरचें मोगल साम्राज्य हीं अशा विस्कळित साम्राज्याचीं उत्कृष्ट उदाहरणें आहेत.

हिंदुस्थानच्या एकंदर इतिहासांत राज्यांचें एकंदरीत पुढील चार नमुने होऊन गेले, असें येथपर्यंतच्या विवेचनावरून दिसून येईल.

भारतीय राज्यांचे नमुने.	१. वेदकालीन प्राथमिक राज्यें. २. महाभारत किंवा रामायण यांत वर्णिलेलीं छोटीं राष्ट्रीय राज्यें. ३. सार्वभौम संघटित साम्राज्यें. ४. युरोपांतील सरंजामी पद्धतीच्या राज्यासारखीं विस्कळित साम्राज्यें.

याच्या पुढचा पल्ला भरतखंडांतील राजकीय संस्थांनीं गांठला नाहीं. अर्वाचिन युरोपांत मोठीं राष्ट्रीय राज्यें स्थापन होऊन त्यांत प्रातिनिधिक लोकसत्ताक संस्था निर्माण झाल्या.

भारतीय राजकीय इतिहासाचें सामान्य वर्णन व साम्राज्याचे गुणावगुण.

अशा प्रकारें प्राचीन काळच्या राष्ट्रीय स्वातंत्र्य व लोकसत्ता, या दोन ध्येयांचा भिन्न स्वरूपांत पुनः उदय युरोपच्या राजकीय क्षेत्रावर झाला, तसा इकडे झाला नाहीं. एखाद्या पराक्रमी पुरुषानें एखादें राज्य स्थापन करावें, पुढें कांहीं काळ त्याची वाढ व्हावी, त्याचें संघटित स्वरूप कांहीं काळ टिकावें व राज्याच्या केंद्रस्थानीं पराक्रमी पुरुष उरले नाहींत, म्हणजे त्याला विस्कळित स्वरूप प्राप्त होऊन तें नष्ट व्हावें हा चक्रनेमिक्रम हिंदुस्थानांत सुमारें दोन हजार वर्षें चालला आहे. मोठमोठ्या साम्राज्यांच्या संघटनेच्या कामीं लागणारें कौशल्य आणि पराक्रम भरतखंडांतील अनेक राजांनीं दाखविलेले आहेत. त्याचप्रमाणें या साम्राज्यांच्या शांतिछायेखालीं लोकांतील उद्योगधंदे व विद्या, कला यांची पुष्कळ वाढ झाली, तथापि राष्ट्रीय भावना आणि लोकसत्ता यांच्या अस्तित्वामुळें राज्यांत जो एक प्रकारचा जीवंतपणा दृष्टीस पडतो तो आमचीं छोटीं राष्ट्रें नष्ट झालीं तेव्हांपासून हिंदुस्थानांत पुनः दृष्टीस पडला नाहीं, असें म्हणण्यास हरकत नाहीं. ज्यामानानें राज्यांचा विस्तार वाढू लागला त्यामानानें राजसत्ता अनियंत्रित बनूं लागली व सामान्य लोकांत गुलामगिरी व स्वाभिमानशून्यता वाढूं लागली. राष्ट्रभक्तीपेक्षां स्वामिभक्तीचें स्तोम माजूं लागलें आणि राज्यांची सुस्थिति व वैभव हीं केवळ पराक्रमी व बुद्धिमान राजांच्या अस्तित्वांवर अवलंबून राहूं लागलीं. ग्रीक व रोमन नगर राष्ट्रांचा नाश झाल्यापासून सोळाव्या, किंवा सतराव्या किंबहुना अठराव्या शतकापर्यंत युरोपखंड याच स्थितींत होतें, परंतु अलीकडे दोन अडीचशें वर्षांत तिकडे पुन्हाः सजीव राष्ट्रें

निर्माण होऊं लागलीं. तीं कशीं व केव्हां होऊं लागलीं हें समजण्यास युरोपीयन राज्यांची उत्पत्ति व उत्क्रांति यांची माहिती करून घेतली पाहिजे. ती माहिती पुढील प्रकरणांत द्यावयाची आहे.

प्रकरण ६ वें.

युरोपीयन राज्यांची उत्पत्ति व उत्क्रांति

ग्रकि राज्यें व नगरराष्ट्रें

मागच्या प्रकरणांत भारतयि राज्यांच्या उत्क्रांतीची सामान्य रूपरेखा दिली; या प्रकरणांत युरोपीयन राजकीय संस्थांच्या उत्क्रांतीची माहिती द्यावयाची आहे. युरोपांत आशियाखंड व ईजिप्त इकडूनच सुधारणेचा प्रवेश झाला असल्यामुळें या दोहोंना अगदीं निकट अशा युरोपखंडाच्या विभागांत सुधारणेचा प्रथम उदय होणें, हें अगदीं साहजिक आहे. युरोपांतील ग्रीस हा देश आशिया व इजिप्त यांना अगदीं जवळ असल्यामुळें त्या देशांतच प्रथम युरोपीयन सुधारणेस प्रारंभ झाला. ग्रीस देशाची भूगोलिक रचना पाहिल्यास तो अगदीं लहान लहान पण स्वतंत्र राज्यांच्या वाढीला अगदीं अनुरूप आहे, असें दिसून येतें. त्याच्या किनाऱ्याजवळ आंत बऱ्याच लांबवर अनेक खाडया गेलेल्या आहेत, व आंतील भूप्रदेशांतही पुष्कळ डोंगर व दऱ्या खोरीं असल्यामुळें त्या देशाचे निसर्गतः अनेक लहान लहान अलग तुकडे झालेले आहेत. अर्थात् या देशांत येऊन राहिलेल्या हेलेनिक लोकांच्या निरनिराळ्या टोळ्यांनीं प्रथमतः अगदीं लहान लहान राज्यें वसविलीं, हें योग्यच झालें. या देशाला आशिया व इजिप्त या बाजूस भूमध्यसमुद्राचें वेष्टण असल्यामुळें आशियांतील इराणी बादशाहाला त्या देशावर स्वारी करणें कठीण होतें; परंतु तोच समुद्र फार रुंद नसल्यामुळें ग्रकि लोकांना व्यापाराकारितां आशिया व इजिप्त इकडे जाण्यास अडचण पडत नसे. यामुळें या हेलेनिक लोकांचें स्वातंत्र्य कायम राहून त्यांच्या संस्कृतसि लवकर प्रारंभ होऊं शकला. हे हेलेनिक लोक पूर्वी भार-

तीय आर्यांच्या शेजारींच राहात असून त्यांच्यांत पितृप्रधान कुटुंबव्यवस्था व पूर्वजपूजेचा धर्म, हे रूढ होते हें मागें सांगितलेंच आहे. त्यांची प्राथमिक राज्यव्यवस्थाही भारतीयांच्या वेदकालिन राज्यव्यवस्थेसारखीच होती असें एलीयडवरून दिसून येतें. यांच्यांतील निरनिराळे कुलपति व गोत्रपति यांच्यावर एक राजा असून तो एक श्रेष्ठ लोकांचें मंडळ व सामान्य लोकांची वैदिक समिति सारखी सभा यांच्या सल्ल्यानें सर्व कारभार करीत असे. पुढें हे लोक ग्रीसमध्यें जाऊन कायमचे राहिल्यावर व त्यांची बरीच सुधारणा झाल्यावर त्यांच्यांत नगर-राष्ट्रांची उत्पत्ति झाली. हीं नगरराष्ट्रें आमच्या इकडच्या महाभारतांतील छोट्या राष्ट्रीय राज्यांसारखींच संपन्न, संघटित व सुसंकृत अशीं होतीं; परंतु त्यांची व्याप्ति भारतीयांच्या राष्ट्रापेक्षांही कमी असून एक नगर व त्याच्या आसपासचीं कांहीं थोडीं खेडीं यांच्या बाहेर फारसा विस्तार नव्हता. यांत अथेन्स व स्पार्टा हीं पुढें फारच प्रसिद्धीस आलीं. या नगरराष्ट्रांतील लोकांत एक अल्पकालीन परंतु फारच उज्वल स्वरूपाची संस्कृति निर्माण झाली. ही हेलेनिक लोकांची संस्कृतीच भावी युरोपीयन संस्कृतीला आधारभूत झालेली आहे, असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. या नगर राष्ट्रांतील राजकीय संस्थांचा इतिहास सामान्यतः एकाच स्वरूपाचा दिसून येतो. प्रत्येक राज्यांत वर वर्णिलेली लोकनियंत्रित राजसत्तेची व्यवस्था मोडून महाजन सत्ता स्थापन झाली व हीं राज्यें वैराज्यें बनलीं. नंतर या महाजनांपैकीं निरनिराळ्या कुळांत व व्यक्तींत परस्पर वैमनस्यामुळें व सत्ताभिलाषामुळें तंटे लागून देशांत अशांतता व अव्यवस्था माजत असे. या अनवस्थेच्या काळीं एखादा पराक्रमी पुरुष निघून या सर्व महाजनांस स्वस्थ बसवी व राज्यांतील सर्व सत्ता आपल्या हातीं घेऊन देशांत शांतता प्रस्थापित करी. अशा प्रकारें महाजन सत्तेचें सुलतानशाहींत (tyranny) रूपांतर होई. कांहीं काळ या सुलतानशाहींत लोकांनीं सुखानें व शांततेनें नांदलें म्हणजे सर्व

लोकांची सामाजिक, आर्थिक व बौद्धिक सुधारणा होऊन त्यांच्या अंगीं लोकसत्ता स्थापन करण्याचें सामर्थ्य येई. अशा क्रमानें या नगरराज्यांपैकीं बहुतेकांत लोकसत्ता अखेरीस स्थापन झालेली दिसून येते. ही लोकसत्ता हल्लींप्रमाणें प्रातिनिधिक स्वरूपाची नसून प्रत्यक्ष लोकसत्ता (Direct Democracy) होती. सध्या राज्यांतील प्रभुत्व ज्या लोकसभेकडे असतें तींत प्रत्यक्ष सर्व लोक येत नसून केवळ त्यांचे प्रतिनिधी येत असतात. परंतु या ग्रिक नगरराष्ट्रांतील प्रभुत्व ज्या सभेकडे असे तींत सर्व स्वतंत्र नागरिक येत असत. अर्थात् हीं राष्ट्रें फारच छोटीं असल्यामुळें ही गोष्ट शक्य होती. आज तशी राष्ट्रांतील सर्व लोकांची सभा भरविणेंही अशक्य आहे. तसेंच या नगरराष्ट्रांपैकीं प्रत्येक राष्ट्रांत बराच मोठा गुलामांचा वर्ग असून त्या वर्गांतील व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे राजकीय हक्क नसत.

ग्रीक लोकांच्या राजकीय कार्याचें स्वरूप व त्यांतील गुणदोष

ग्रिक लोकांनीं सामाजिक संघटनेच्या कामीं पुष्कळच प्राविण्य मिळविलें होतें यांत शंका नाहीं. युरोपांत प्रथमतः लोकसत्तेची स्थापना यांनींच केली. राजनितिशास्त्राचा पाया घालून युरोपियन राजकीय विचारांना यांनींच प्रथम चालन दिलें. यांच्यामधील ॲरिस्टॉटल व प्लेटो यांसारख्या पंडितांचें समाजशास्त्रावरील विचार अद्यापि बहुमोल गणले जातात, मात्र ॲरिस्टॉटलसारख्या पंडिताच्या विचारांतही गुलामांच्या संस्थेला अवकाश दिलेला पाहून अर्वाचिनांस विस्मय वाटतो. आमचे अर्वाचीन विद्वान् मनुप्रभृति स्मृतिकारांसंबंधी कितीहि आदर व्यक्त करीत असले तरी स्त्रीशूद्रांविषयीं अवहेलनापर अशीं जी वचनें त्यांच्या ग्रंथांत सांपडतात त्यांचा स्वीकार करीत नाहींत, त्याचप्रमाणें गुलामगिरीच्या संस्थेचें समर्थन ॲरिस्टॉटलनें केलें म्हणून त्या संस्थेला कोणीही आज मान्यता देत नाहीं.

ग्रीक लोकांची राष्ट्रीय स्वातंत्र्यावरची अढळ भक्ति आणि प्रजास्वातंत्र्याची त्यांनीं केलेलीं स्थापना, यांबद्दलच त्यांना मान मिळत असतो. हेलेनिक लोकांना मोठ्या प्रमाणावर राज्यघटना करतां आली नाहीं व त्यामुळेंच त्यांचीं नगरराष्ट्रें फार काळ टिकूं शकलीं नाहींत. या छोटेखानी नगरराष्ट्रांत एकसारखे कलह चालत असत व या कलहामुळेंच त्यांच्या वैभवास उतरती कळा लागली. अथीनियन लीग नांवाचें अथेन्समधील लोकांनीं बऱ्याच राष्ट्रांचें एक संयुक्त राज्य स्थापन करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्या संयुक्त राज्यांतील बहुतेक सत्ता केवळ अथेन्सच्याच हातीं असल्यामुळें तें संयुक्त राज्य किंवा राज्यसंघ म्हणजे वस्तुतः अथेन्सचें साम्राज्य झालें होतें. त्याची सर्व लोकसत्ताक राज्यपद्धति मोठ्या राज्यांच्या संघटनेला अनुरूप नव्हती. तसेंच मोठें साम्राज्य स्थापन करून बऱ्याच लोकांना एका राज्याच्या शिस्तींत वागावयास लावण्याचें कौशल्यहि त्यांना दाखवितां आलें नाहीं. इ. स. पू. ३३८ च्या सुमारास मॅसिडोनियाचा राजा फिलिप यानें हीं लोकसत्ताक नगरराष्ट्रें नष्ट केलीं व या वेळेपासून राष्ट्रीय स्वातंत्र्य व लोकसत्ता हीं राजकीय ध्येयें युरोपांत अस्त पावलीं व सार्वभौम साम्राज्यें व अनियंत्रित राजसत्ता या ध्येयांचा उदय झाला. हें सार्वभौम साम्राज्यांचें व अनियंत्रित राजसत्तेचें युग जवळ जवळ १७८९ मधील फ्रेंच राज्यक्रांति होईपर्यंत युरोपांत चालू होतें, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

युरोपच्या प्राचीन इतिहासांतील फार प्रसिद्ध व विस्तृत असें साम्राज्य म्हणजे रोमन साम्राज्य होय. रोमन लोकांतील प्राथमिक राजकीय उत्क्रान्ति-

रोमनचें नगरराष्ट्र व त्यांची राज्यघटना

ग्रीक राज्यांच्या उत्क्रांतिसारखीच होती. या लोकांचे पूर्वजही प्रथमतः कुलसंबंधानें एकत्रित झालेल्या लोकांच्या लहान लहान टोळ्या करून राहात असत. त्यांच्यांतही प्रथमतः एक राजा, एक श्रेष्ठ लोकांचें मंडळ व एक लोकसभा अशा राजकीय

संस्था होत्या. ग्रीक राज्यांप्रमाणें येथील राज्यांचेंही प्रथम महाजनसत्तेंत व अखेरीस लोकसत्तेंत रूपांतर झालें, परंतु ग्रीक राज्यांइतकी रोममध्यें सामान्य लोकांना कधींच सत्ता मिळाली नाहीं. रोममध्यें अखेरपर्यंत दोन लोकसभा असून त्यापैकीं एकींत समाजांतील श्रेष्ठ लोकांचें नेहमीं प्राबल्य असे; व या श्रेष्ठ लोकांच्या सभेच्या हातीं नेहमी बरीच सत्ता असे. या श्रेष्ठ लोकांच्या सभेला सीनेट म्हणत असत. यांत मोठमोठया कुलांतील व मोठमोठया हुद्यांवर काम केलेले सुमारे तीनशे लोक असत. दुसरी सामान्य लोकांची सभा होती. तिच्याकडे राज्यांतलि मोठमोठे अधिकारी निवडण्याची व कायदे करण्याची सत्ता असे. रोमन लोक हे स्वभावतः पुराणप्रिय असल्यामुळें राज्यांतील प्रमुख आधिकारी निवडण्याचा पूर्ण आधिकार लोकसभेला होता तरी सामान्यतः कांहीं विशिष्ट, उच्च व प्रसिद्ध कुलांतील अधिकारीच ते निवडत असत. हेच अधिकारी पुढें सीनेटचे सभासद होत असत व तिच्याच सल्ल्यानें कोणतेहि अधिकारी राज्यांतलि सर्व कारभार करीत असत. इतकेंच नाहीं तर कायदे करण्याचा अधिकार सामान्य लोकांच्या सभेला स्वरूपतः असला तरी सीनेटनें सुचविलेलेच कायदे बहुधा ही लोकसभा पास करीत असे. अशा प्रकारें रोममध्यें लोकसत्तेच्या स्वरूपांत महाजनसत्ताच नांदत होती असें म्हणण्यास हरकत नाहीं. वॉर्ड फौलर हे आपल्या सिटि स्टेट या पुस्तकांत म्हणतात. " ज्याप्रमाणें अथेन्समध्यें नगरराज्यांत शक्य असलेलें लोकसत्तेचें शुद्ध स्वरूप दृष्टीस पडतें, त्याचप्रमाणें रोममध्यें महाजनसत्तेचें पूर्ण शुद्ध स्वरूप दृष्टीस पडतें.[1] "

---

1. " As Athens realised the most perfect form of democracy of which The City State was capable, so did Rome realise the most perfect form of oligarchy "

The City State by W. W. Fowler P. 220.

रोमनच्या साम्राज्याची वाढ व लोकशाहीचा अस्त.

परंतु नगरराज्याची राज्यघटना उत्तम करून दाखविणें, हें रोमचें कार्य नसून मोठें साम्राज्य स्थापन करून बराच मोठा प्रदेश व अनेक प्रकारचे लोक एकछत्री अमलांत गोवून टाकणें हें रोमाचें मुख्य कार्य होतें. रोमच्या आसपास असणाऱ्या सर्व लॅटिन राज्यांतलि लोकांना रोमच्या नागरिकत्वाचे हक्क देऊन व त्यांचें राजकीय नेतृत्व घेऊन या नगरराज्यानें प्रथमतः इटालींतील इतर प्रदेश आपल्या अमलाखालीं आणण्याचें कार्य सुरूं केलें. जो जो नवा प्रदेश या रोमन लोकांच्या ताब्यांत येईल, त्यांतील जमिनींचा कांहीं भाग आपल्या नागरिकांना देऊन त्यांच्या त्या त्या प्रदेशांत वसाहती वसविण्याचा उपक्रम त्यांनीं एकसारखा चालू ठेवल्यामुळें रोमन नागरिकांची वसति हळूहळू सर्व इटली देशांत पसरून राहिली. ज्या ज्या ठिकाणीं रोमन नागरिक जाऊन राहात तेथील जित लोकांतही हळूहळू रोमन संस्कृतीचा प्रसार होऊं लागला. त्यांना रोमन नागरिकत्वाचे हक्क हवेसे वाटूं लागले. इकडे राज्यांतील सर्वसत्ता हळूहळू लोकसत्तेच्या हातून निघून सीनेटच्या हातीं गोळा होऊं लागली. रोमचे नागरिक सर्व देशभर पसरले होते. परंतु त्यांना स्वतः रोममध्यें हजर राहाणें शक्य नसल्यामुळें राजकीय दृष्ट्या त्यांचा कांहीं उपयोग नव्हता. जसजशी साम्राज्याची वाढ होऊं लागली तसतसें लष्करी अधिकाऱ्यांचें प्रस्थ व मोठमोठ्या जमीनदार लोकांचें महत्त्व वाटूं लागलें. सामान्य शेतकरी लोक आपल्या जमिनी श्रीमंतांना विकून लष्करी नोकऱ्या धरून निरनिराळ्या देशांवर जाऊं लागले, इटालींतील बहुतेक जमीन रोमन जमीनदारांच्या मालकीची होऊन तिची लागवड नवीन जिंकलेल्या प्रदेशांतून गुलाम धरून आणून त्यांच्या मार्फत करण्यांत येऊं लागली. तसेंच निरनिराळ्या देशांत मुलुखगिरीवर जाणारे लष्करी अधिकारी व जिंकलेल्या प्रदेशांवर नमेलले

मुलकी अधिकारी, हे त्या त्या प्रदेशांवर अनियंत्रित राजांप्रमाणें राज्य करीत असत. रोममधलि सर्व सत्ता फक्त वर सांगितलेल्या सीनेटच्या म्हणजे कांहीं विशिष्ट कुलांत जन्मलेल्या श्रीमंत आणि धाडसी लोकांच्या हातीं गेलेली पाहून सामान्य जनतेच्या कैवाऱ्यांना विषाद वाटूं लागला. टायबेरियस ग्रॅकस व त्याचा भाऊ गायस ग्रॅकस यांनीं लोकांचा पक्ष घेऊन जमीनदार लोकांच्या जमिनी काढून घेऊन त्या गरीब लोकांना वाटून द्याव्यात, असें म्हणणारा एक प्रश्न उपस्थित केला. सीनेटमधील जमीनदार लोकांनीं हा पक्ष हाणून पाडण्याचे प्रयत्न सुरू केले. या तंट्यांत वरील ग्रॅकस बंधूंना प्राणास मुकावें लागलें; परंतु यावेळेपासून एका बाजूस जमीनदार व सीनेट व दुसऱ्या बाजूस लोकसभा व सामान्य लोक यांच्यांत एकसारखे तंटे सुरू झाले. पुढें सला व मेरिअस यांनीं अनुक्रमें जमनिदार व व सामान्य लोक यांचा पक्ष घेऊन हेंच भांडण सुरूं केलें. यांतही पुनः 'सलाचा' म्हणजे जमनिदार लोकांचाच पक्ष विजयी झाला; परंतु इटालींतून बहुतेक शहरांतील लोकांना रोमन नागरिकत्वाचे हक्क देणें मात्र सीनेटला भाग पडलें; परंतु त्यावेळीं प्रातिनिधिक लोकसत्तेची कोणासच कल्पना नसल्यामुळें या नागरिकत्वाच्या हक्कांचा कांहींच उपयोग रोमच्या बाहेर राहणाऱ्या लोकांना करतां येणें शक्य नव्हतें. याचवेळीं ज्युलीयस सीझर या नांवांचा एक उच्च कुळांतील पराक्रमी व बुद्धिमान पुरुष उदयास आला. यानें प्रथमतः लोकसभेचा पक्ष घेऊन आपणांस गॉल नांवाच्या देशावरचा गव्हर्नर नेमून घेतलें. तिकडे त्यांनीं रोमन साम्राज्याचा बराच विस्तार आपल्या पराक्रमानें केला व थेट इंग्लंडमध्यें रोमचा झेंडा नेऊन रोंविला. यानंतर परत येऊन त्यानें आपल्या लष्करी अंमलदाराच्या सहाय्यानें बहुतेक सर्व सत्ता आपल्या हातीं मिळाविली व बादशहाप्रमाणें वागूं लागला. हें पाहून त्याच्या विरुद्ध पक्षाच्या लोकांनीं, हा रोमची लोकशाही मोडून पुनः बादशाही स्थापन करणार अशी हूल उठवून त्याचा खून कर-

विला. परंतु यावेळीं रोममध्यें लोकशाही टिकणें शक्य नव्हतें व स्वरूपतः ती लोकशाही असली तरी ती लष्करशाही होती, हें वरील विवेचनावरून ध्यानांत आलेंच असेल. एवढया मोठया साम्राज्याचें राज्य एका शहरानें करणें शक्य नव्हतें. रोमची राज्यघटना या कार्याला अपुरी होती. झीसरच्या मृत्यूनंतर त्याचाच वारस ऑक्टेव्हियस हा सीझरच्याच मार्गाचें अवलंबन करून ऑगस्टस या नांवानें रोमचा खरोखरीच बादशहा झाला. अशा प्रकारें रोममधील नांवाची लोकशाही खरी बादशाही झाली. यानंतर सुमारें २०० वर्षें रोमचें साम्राज्य पश्चिम युरोपांत कायम होतें.

रोमन साम्राज्याचें उज्वल स्वरूप.

रोम शहरांतील लोकशाहीची राज्यव्यवस्था जरी एवढया मोठया साम्राज्याची व्यवस्था करण्यास उपयुक्त नव्हती, तरी रोमन बादशहांनीं व त्यांच्या अधिकाऱ्यांनीं त्या साम्राज्याची संघटना उत्तम प्रकारें करून तें इसवी सनाच्या पांचव्या शतकापर्यंत पश्चिम युरोपांत अबाधितपणें कायम राखिलें. या साम्राज्याखालीं असलेल्या सर्व जातींच्या लोकांत आपल्या व ग्रीक नगर राष्ट्रांत जन्मास आलेल्या संस्कृतीचा प्रसार केला. ठिकठिकाणीं रोम शहरासारखीं शहरें स्थापन करून तेथील लोकांना स्थानिक स्वराज्याचे व रोमन नागरिकांचे हक्क दिले, स्थानिक किंवा प्रांतिक गव्हर्नरांवर उत्तम प्रकारची देखरेख राहील व राज्यांत अंदाधुंदी माजणार नाहीं, अशी खबरदारी घेतली आणि या सर्व लोकांना उपयुक्त असे कायदे करून तदनुसार त्यांचें नियमन केलें. त्यांचें साम्राज्य पश्चिम युरोपांत पांचशें वर्षें व पूर्वेकडे सुमारें दीड हजार वर्षें टिकूं शकलें. यावरूनहि त्यांचें संघटनाकौशल्य कोणासहि पटण्यासारखें आहे. ज्यावेळीं त्यांच्या अंमलाखालीं निरनिराळ्या जातीचे, धर्माचे, संस्कृतीचे व आचार–विचाराचे लोक येऊं लागले, त्यावेळीं आपल्या नागरिकांचेच कायदे त्यांनीं सर्वांना लागू केलें व सर्व समाजांना लागूं पडेल अशा

प्रकारचे कायदेशास्त्र त्यांच्या संस्थांतून निर्माण झालें. त्यांनीं कायदेशास्त्राला असें जें व्यापक स्वरूप दिलें व त्यांतील मूलभूत तत्त्वांचा जो त्यांनीं शोध लाविला, त्याबद्दल त्यांची अद्यापि वाखाणणी केली जाते. या साम्राज्याखालीं उत्तम प्रकारचे कायदेपंडित व कार्यक्षम अधिकारी वर्ग हे होऊन गेले. सत्तेचें केंद्रिकरण, सैन्याची शिस्त, मोठमोठ्या शहरांत स्थापिलेल्या स्थानिक स्वराज्याच्या संस्था व त्यांनीं सर्व साम्राज्यांत वसविलेल्या रोमन नागरिकांच्या वसाहती, याबद्दल अद्यापि त्यांची स्तुति केली जाते. पूर्वीं कधींहि स्थापन झालें नव्हतें, एवढें मोठें साम्राज्य स्थापन करून त्यांनीं नगरराष्ट्रांत उत्पन्न झालेल्या संस्कृतीचा फार मोठ्या प्रमाणांवर फैलाव केला. हें खरें असलें तरी या साम्राज्यालाहि दुसरी बाजु आहे हें विसरतां कामा नये.

रोमन साम्राज्यांचें अंतरंग. उलट बाजू.

रोमन साम्राज्याखालीं जे निरनिराळे लोक आले, त्यांच्यांतील मूळच्या सामाजिक व राजकीय संस्था पार मोडून गेल्या व त्याच बरोबर त्यांच्यांतील कर्तृत्व व स्वावलंबन यांचाही पूर्ण लोप झाला. या लोकांवर करांचें ओझें अतोनात वाढलें, त्यांच्या मताला मान उरला नाहीं, व स्वतंत्रतेनें राज्य चालविण्याच्या कलेचा लोप झाल्यामुळें त्यांच्या अंगीं पूर्वींची रग उरली नाहीं. रोमन साम्राज्याचें वैभव कितीहि मोठें असलें तरी त्यांतील परतंत्र लोकांचें जीवित स्पृहणीय असावें असें वाटत नाहीं. अनेक वर्षे पारतंत्र्यांत राहिल्यामुळें रोमन साम्राज्यांतील लोकांची कशी शोचनीय स्थिति झाली होती, याची कल्पना ब्रिटन लोकांच्या इतिहासावरून उत्तम प्रकारें करतां येते. रोमन लोकांनीं ब्रिटनमध्यें मोठमोठे रस्ते बांधले, शहरें वसविलीं, निरनिराळ्या देशांतील चिजा आणून त्यांचा प्रसार ब्रिटन लोकांत केला, थोडीशी विद्यावृद्धि केली; परंतु त्यांची स्वराज्याची कला नष्ट केली, त्यांचें स्वावलंबन लोप पावलें,त्यांच्यांतील सामाजिक व राजकीय संघटनांचा विध्वंस

झाला, नवीन संघटना करण्याची कुवत उरली नाहीं, या सर्व कारणांमुळें रोमचें सैन्य त्यांना सोडून गेलें, तेव्हां आपणांस कोणी त्राता उरला नाहीं, असें वाटून ते कष्टी झाले. चार पांचशें वर्षें रोमन साम्राज्याच्या संस्कृतींत वाढलेल्या या ब्रिटन लोकांचा अँग्लोसॅक्सनांसारख्या आडदांड व रानटी लोकांपुढें टिकाव न लागून त्यांच्या दास्यांत जावें लागलें. या अँग्लोसॅक्सन लोकांनीं असहाय्य व दुर्बल बनलेल्या ब्रिटन लोकांपैकीं बहुतेकांची कत्तल केली व उरलेल्यास आपले गुलाम बनविले. ज्या शूर ब्रिटन लोकांनीं एकेकाळीं रोमन साम्राज्यासारख्या प्रचंड राज्याच्या सैन्याशीं टक्कर दिली, त्यांचीच चारशें वर्षांच्या रोमन अमलानंतर झालेली शोचनीय स्थिति पाहिली म्हणजे पारतंत्र्यांतील वैभव व संस्कृति किती कुचकामाची आहे, हें बरोबर मनाला पटतें. जी स्थिति ब्रिटन लोकांची, तीच त्या साम्राज्यांतील इतर लोकांची झाली होती. या साम्राज्यांत जीवंतपणा मुळींच उरलेला नव्हता. याची सर्व उभारणी केवळ दंड शक्तीवर झालेली होती. रोमन साम्राज्यामुळें अनेक लोकांचें एकीकरण झालें; पण त्यांच्यांतील स्वातंत्र्याचें चैतन्य नष्ट झालें. ग्रीक लोकांनीं स्वातंत्र्य राखिलें परंतु त्यांना एकीकरणाची विद्या अवगत झाली नाहीं. राज्याचें एकीकरण मोठ्या प्रमाणावर करितांना त्यांतील घटकांचें स्वातंत्र्य तेज नष्ट करणें युक्त नाहीं. तात्पर्य रोमन साम्राज्य स्थापन झाल्यापासून युरोपांतून राष्ट्रीयत्व व प्रजास्वातंत्र्य या राजकीय ध्येयांचा लोप झाला व अनियंत्रित राजसत्ता व साम्राज्य हीं ध्येयें पुढें आलीं. रोमन साम्राज्य मोडून गेल्यानंतर सुमारें हजार वर्षेंपर्यंत याच ध्येयांच्या पाठीमागें लागून युरोपीयन लोकांनीं अनेक राज्यें व साम्राज्यें स्थापन केलीं व तीं मोडून गेलीं. या नंतर अर्वाचीन राष्ट्रीय राज्यांचें युग सोळाव्या शतकापासून सुरू झालें. इसवी सनाच्या पाचव्या शतकांत रोमन साम्राज्य मोडल्यापासून सोळाव्या शतकाच्या आरंभापर्यंतच्या काळास युरोपियन इतिहासकारांनीं मध्ययुग असें नांव दिलेलें आहे. या मध्ययु-

गांत सरंजामी पद्धतीची राज्यव्यवस्था निर्माण झाली. तिचा आतां आपण विचार करूं.

रोमन व ट्यूटॉनिक संस्थाचा संयोग व त्यांतून सरंजामी पद्धतचिा उद्भव.

रोमन साम्राज्याच्या सरहद्दीपलीकडे म्हणजे हल्लींच्या जर्मनी देशांत ट्युटॉनिक मानव वंशाच्या अनेक टोळ्या राहात असत. हे लोक असंस्कृत व अडदांड असे असले तरी त्यांच्या अंगीं शौर्य व महात्त्वाकांक्षा हे गुण होते. यांच्या टोळ्या प्राथमिक अवस्थेंतील समाजाप्रमाणें कुलसंबंधानें एकत्रित झालेल्या असून अशा समाजास उचित अशा आपल्या वैदिक काळच्या लोकांप्रमाणेंच त्यांच्यांत प्राथमिक राजकीय संस्था होत्या. अशा लोकांत व्यक्तिमाहात्म्य व व्यक्तिस्वातंत्र्य यांना पुष्कळ अवसर असून त्यांच्यांतील स्वातंत्र्य तेज जीवंत असतें. रोमन साम्राज्यावर या लोकांच्या निरनिराळ्या टोळ्यांनीं निरनिराळ्या दिशांनीं चौथ्या पाचव्या शतकांत हल्ले करण्यास सुरवात केली. चोहोंकडून एकसारखे हल्ले सुरू झाल्यामुळें आंतून आधींच निर्जीव झालेला रोमन साम्राज्याचा डोलारा अगदीं अल्पावधींत ढासळला. खुद्द रोमनच्या बाजूला हल्ले होऊं लागतांच ठिकठिकाणचीं लष्करी ठाणीं उठवून रोमन लोकांनीं निरनिराळ्या प्रांतांतील आपलीं सैन्यें नेलीं आणि अनेक वर्षें पारतंत्र्यांत राहिल्यामुळें हतबल व असहाय झालेलें साम्राज्याचें ठिकठिकाणचे रहिवासी या अडदांड लोकांच्या ताब्यांत सांपडून त्यांचे गुलाम बनले.यानंतर ट्यूटानिक लोकांच्या निरानिराळ्या टोळ्यांनीं साम्राज्याच्या निरनिराळ्या भागांत स्वतंत्र राज्यें स्थापन करण्याचें प्रयत्न चालविले. यावेळीं कांहीं काळ पश्चिम युरोपांत सर्वत्र अंदाधुंदी व अराजक झोटिंग पातशाही माजली होती. हळूहळू या अंदाधुंदींतून सरंजामी पद्धतीची राज्यव्यवस्था उत्पन्न झाली व तिच्या खालीं युरोपियन संस्कृतीला व राजकीय संस्थांना एक नवेंच स्वरूप प्राप्त होऊं लागलें. या अंदाधुंदीनंतर निर्माण झालेल्या

राजकीय व सामाजिक संस्थांत रोमन व ट्यूटॉनिक लोकांतील संस्कृतींचा संयोग झालेला दृष्टीस पडतो. रोमन साम्राज्यांतील राज्यव्यवस्थेंत व्यक्तिवैशिष्ट्य, व्यक्तिमाहात्म्य किंवा व्यक्तिस्वातंत्र्य मुळींच उरलेलें नव्हतें. रोममध्यें बादशहा असला, तरी व्यक्ति या दृष्टीनें त्याची प्रजेला किंवा अधिकाऱ्यांना विशेष माहिती नव्हती. राज्यनिष्ठा, राजसत्तेचा दरारा, किंवा साम्राज्यवैभवाचा अभिमान, या भावनांवर त्या साम्राज्याची उभारणी झालेली असल्यामुळें त्यांत वैयक्तिक निष्ठेचा ओलावा मुळींच नव्हता. याच्या उलट ट्युटॉनिक लोकांच्या प्राथमिक राज्यांची सर्व उभारणी केवळ वैयक्तिक संबंधांवर झालेली होती. स्वामिनिष्ठा, आणि सेवकाच्या हितांविषयीं दक्षता, याच बंधनांनीं ट्यूटॉनिक लोकांचे प्राथमिक समाज निगडित झालेले होते. या टोळ्यांनीं रोमन साम्राज्यांतील निरनिराळे विभाग जिंकून घेतल्यावर त्यांच्यांत जमिनीच्या मालकीमुळें आणखी एक बंधन उत्पन्न झालें. कोणताही प्रदेश जिंकला म्हणजे त्यांतील सर्व जमीन आपल्या मालकीची झाली असें समजून त्या टोळीचा नायक, तिचें निरनिराळे विभाग, आपल्या निरनिराळ्या लष्करी अधिकाऱ्यांत वाटून देई. या जमिनीच्या विभागाबरोबरच त्यांवर राहणाऱ्या लोकांवर राज्यकारभार करण्याचा अधिकारही त्या लष्करी अधिकाऱ्यास मिळत असे. या देणगीबद्दल आपल्या स्वामीची लष्करी नोकरी करणें व त्यांचें सर्व बाबतींत प्रभुत्व मान्य करणें, हें या लष्करी अधिकाऱ्याचें ऊर्फ जहागिरदाराचें किंवा सरंजामदाराचें कर्तव्य असे. याप्रमाणें थोड्याच अवधींत राजकीयदृष्ट्या पश्चिम युरोपचे शतशः तुकडे झाले. यावेळचें युरोपखंड म्हणजे एक लष्करी अधिकाऱ्यांची वसाहत होती, असें म्हणतां येईल; व हे स्थानिक सरंजामदारच खरी राजसत्ता उपभोगू लागले होते. अशा सरदारांची जहागिरी फार मोठी असल्यास तेही त्यांपैकीं कांहीं भाग दुसऱ्या व्यक्तीस देऊन त्यांना आपले सेवक बनवीत असत. निरनिराळ्या ट्यूटॉनिक टोळ्यांनीं रोमन साम्रा-

ज्यांतील जिंकून घेतलेलीं निरनिराळीं राज्यें, त्यांतील राजांनीं आपल्या सरदारांस लष्करी नोकरीच्या अटींवर तोडून दिलेल्या जहागिरी व या जहागिरदारांनीं तसेच निर्माण केलेले दुय्यमप्रतीचें सरदार किंवा सरंजामदार, अशी मध्ययुगीन युरोपखंडाची राजकीय स्थिति होती. यावेळच्या राजांत व सरदारांत एकसारखीं युद्धें चालू असून आपल्या प्रदेशाच्या मर्यादा वाढविण्यासाठीं व इतरांस आपलें प्रभुत्व मान्य करावयास लावण्यासाठीं त्यांचे अविरत परिश्रम चाललेले असत. अशा प्रकारची ही सरंजामी राज्यपद्धति होती.

पोपचें धार्मिक साम्राज्य, व पवित्र रोमन साम्राज्य.

इ. स. ७५२ मध्यें फ्रँकिश लोकांच्या राजांचा मुख्य प्रधान ' पिपिन ' हाच पोपच्या संमतीनें फ्रँकिश लोकांचा राजा बनला. फ्रँकिश राजे दुर्बळ असल्यामुळें त्यांच्या सरदारांनीं ' पिपिन ' यांस राजा केला होता; परंतु तो पोपच्या संमतीनें झाला असल्यामुळें त्याला व त्याच्या वंशजांना धर्मसत्तेचा पाठिंबा मिळूं लागला. रोमन साम्राज्यांतील निरनिराळ्या भागांत जीं धर्मपीठें स्थापन झालीं होतीं, त्यांनीं रोमन साम्राज्य मोडल्यावर कांहीं कांहीं ठिकाणीं लोकसंरक्षणाचें राजकीय कार्य अंगावर घेतलें होतें. पुढें या सर्व धर्मपिठांनीं रोमच्या बिशपला पोप ही संज्ञा देऊन त्याच्या अधिपत्याखालीं सर्वांनीं वागावयाचें ठरविलें. अशा प्रकारें ट्यूटॉनिक लोकांच्या राज्यांबरोबरच पश्चिम युरोपांत एक धार्मिक साम्राज्य तयार होत होतें. पिपीननें रोमच्या पोपची अनुमति आपल्या राज्याभिषेकास घेतल्यापासून राजसत्तेपेक्षां धर्मसत्तेला जास्त महत्त्व आहे, असे विचार लोकांत प्रसार पावूं लागले. पुढें पिपिनच्या वंशांत चार्लस हा पराक्रमी पुरुष निर्माण होऊन त्यानें इ. स. ८०० च्या सुमारास सर्व पश्चिम युरोप आपल्या प्रभुत्वाखालीं आणलें. यावेळीं रोमच्या पोपनें चार्लस यास

सम्राट ही पदवी दिली. चार्लमनच्या साम्राज्याला ' पवित्र रोमन साम्राज्य ' असें नांव प्राप्त झालें होतें. चार्लमनच्या मृत्यूनंतर थोड्याच काळांत या साम्राज्यांतील राजे व त्यांच्या हाताखालचे जहागिरदार स्वतंत्रपणें वागूं लागले. तरी त्या घराण्यांतील वंशज आपणांस सम्राट असें अभिमानानें म्हणवीत असत; परंतु मध्ययुगांतील हे सम्राट व त्यांच्या हाताखालचे राजे यांच्या हातीं फारच क्वचित् प्रसंगीं खरी राजसत्ता असल्याचें दिसून येतें. प्रायः ती स्थानिक सरदारांच्याच हातीं असे, हें मागें सांगितलें आहेच. मात्र मध्ययुगाच्या अखेरपर्यंत ' पवित्र रोमन साम्राज्यांची' कल्पना ध्येय-रूपानें जिवंत होती. त्यावेळचे युरोपियन लोकांचें राजकीय ध्येय सर्व युरोपांत एकच ' पवित्र रोमन साम्राज्य ' अस्तित्वांत असावें आणि त्याच्यावर पोपची व त्याच्या अधिकाऱ्यांची देखरेख चालू असावी हें होतें. पोपचें धार्मिक साम्राज्य ही एक मध्ययुगांत अतिशय महत्त्वाची संस्था होती. ही राजसत्तेची प्रतिस्पर्धी असून हिच्यामुळें सरदारांच्या अंदाधुंदीला कांहीं अंशीं आळा बसत असे व ती पवित्र रोमन साम्राज्याच्या ध्येयाला पोषक होती. पश्चिम युरोपांतील सर्व राज्यांत पोपचे धर्माधिकारी असून ते पोपचें वर्चस्व मान्य करीत. यांचीं स्वतंत्र कोर्टें असत, या कोर्टांत चालू असलेला कायदा स्वतंत्र असे, या कोर्टांनीं शिक्षा दिलेल्या लोकांकरितां स्वतंत्र तुरुंगहि असत. कोणत्याहि धर्माधिकाऱ्यांवर राजांच्या कोर्टापुढें खटला चालत नसे व सामान्य प्रजाजनांचेहि पुष्कळ दावे या कोर्टापुढें चालत असत. उदाहरणार्थ, मृत्युपत्रें, वारसाचे हक्क किंवा लग्नासंबंधीं प्रश्न, हे त्यावेळीं धार्मिक विषय गणले जात. एकाच राज्यांत राजाची राजसत्ता व धर्माधिकाऱ्यांची धर्मसत्ता, या नांदत असल्यामुळें त्यांच्यांत वरचेवर तंटे होणें अपरिहार्य होतें, व तसे ते होतहि असत. पवित्र रोमन साम्राज्य ही राजकीय संस्था जरी फार काळ सबळ स्वरूपांत नव्हती तरी पोपचें धार्मिक साम्राज्य मात्र पंधराव्या, सोळाव्या शतकांपर्यंत पूर्ण जोमांत होतें.

युरोपीयन लोकांच्या तत्कालीन संस्कृतीचा विचार केला असता सरंजामी पद्धतीमुळें युरोपला पुष्कळ फायदे झालेले आहेत, असें कबूल करणें भाग आहे. राजकीय सत्ता व जमिनीची मालकी यांचा संयोग झाल्यामुळें ट्यूटॉनिक लोकांच्या राजकीय संस्थांना स्थैर्य प्राप्त झालें. स्थानिक सरंजामदारांना बरेंच स्वातंत्र्य असल्यामुळें त्या त्या ठिकाणच्या लोकांत त्यांना अनुकूल असे प्रचार व कायदे अस्तित्वांत येऊं शकले. व्यक्तीस्वातंत्र्याला व वैयक्तिक कर्तृत्वाला अवसर मिळाला. रोमन साम्राज्यांतील निर्जीव राज्ययंत्रापेक्षां स्वामिनिष्ठा व स्वजनहितदक्षता या तत्त्वावर उभारलेली ही सरंजामी पद्धति सामान्य लोकांनाहि अधिक प्रिय वाटत असली पाहिजे यांत शंका नाहीं. तथापि राज्याचे विभाग करण्याकडे असलेली या पद्धतीची प्रवृत्ति राष्ट्रीय ऐक्याला विघातक असल्यामुळें ही पद्धति कालांतरानें नष्ट होणें अपरिहार्य होतें. सरदार लोकांच्या युद्धप्रियतेमुळें देशांत वारंवार माजणारी अशांतता, एकाच देशांतील निरनिराळ्या विभागांत उत्पन्न झालेले कायद्यांचें, करांचे व प्रचारांचें वैसदृश्य व सरदार लोकांचें उद्धट व जुलमी वर्तन, यांसारख्या दोषांमुळें यथाकाल ही पद्धति नष्ट होऊन राजे लोकांच्या प्रमुत्वाखालीं राष्ट्रीय राज्याची संघटना होऊं लागली. यावेळपासून युरोपच्या अर्वाचीन इतिहासाला प्रारंभ झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं.

राष्ट्रीय राज्यांच्या संघटनेला मुख्य दोन प्रकारचे अडथळे होते; एक बाहेरचा व एक आंतला. बाहेरच्या अडथळयाचें स्वरूप पुनः द्विविध होतें.

अनियंत्रित राजसत्ताक राष्ट्रीय राज्यांचा उदय.

पवित्र रोमन साम्राज्याचें ध्येय जिवंत असल्यामुळें सर्व युरोपांत एक साम्राज्य स्थापण्यासाठीं निरनिराळ्या राजांचे सारखे प्रयत्न चाललेले असत. यामुळें कोणत्याहि राष्ट्राला स्वस्थता मिळत नसे. तसेंच रोमच्या धार्मिक साम्राज्यामुळेंहि

राजांना आपल्या लोकांची स्वतंत्रपणें हवीतशी संघटना करतां येत नसे. सोळाव्या शतकांपासून या दोन्ही स्वरूपाचा बाहेरचा अडथळा कमी कमी होऊं लागला. युरोपीयन लोकांना अमेरिकेचा शोध लागला व आशियाशींहि दळणवळण सुरू झालें. यामुळें पश्चिम युरोपांतील राजांच्या विजिगीषेला व साम्राज्यवृद्धीला युरोपाबाहेर अवसर मिळाला व युरोपांत साम्राज्य स्थापन करण्याचें ध्येय मागें पडत चाललें. तसेंच ल्यूथरनें रोमच्या पोपवि-रुद्ध बंड उभारून प्रॉटेस्टंट पंथ काढल्यामुळें पोपचें धार्मिक साम्राज्यहि संपुष्टांत येऊन प्रत्येक राष्ट्रांतील धर्माधिकारी तेथील राजांच्या हाताखालीं असावेत, या ध्येयाचा उदय झाला. अशा रीतीनें सर्व राष्ट्रांना एकत्रित करणारीं बंधनें नष्ट होऊन राष्ट्रीय संघटनेचा बाहेरचा अडथळा कमी झाला. राष्ट्रीय संघटनेला आंतील अडथळा म्हणजे सरंजामी सरदारांचा होता. युरोपियन राज्यांचा आशिया व अमेरिका खंडाशीं संबंध येऊं लाग-ल्यापासून समाजांत व्यापारी वर्गाचें व राजकीयदृष्ट्या व्यापारी शह-रांचें महत्त्व वाढत जाऊन सरंजामदारांचें महत्त्व कमी होऊं लागलें. आतां युरोपांतील क्षात्रयुगाचा अंत होऊन वैश्ययुगाचा जन्म होऊ लागला होता. यामुळें राजे लोकांनीं वैश्यवर्गाला हाताशीं धरून क्षात्रवर्गाचा म्हणजे सरदार लोकांचा नाश केला. या झटा-पटींत कांहीं ठिकाणीं वैश्यवर्गानें राजाची सत्ता फार वाढूं न देतां राजस-त्तेचा भाग आपल्या हातीं घेतला व कित्येक ठिकाणीं राजांनीं प्रथम क्षात्र-वर्ग मारून टाकून मग व्यापारी वर्गालाहि धाब्यावर बसविलें व आपल्याच हातीं अनियंत्रित सत्ता मिळविली. पहिल्या प्रकारचें उदाहरण इंग्लंड असून फ्रान्स हें दुसऱ्या प्रकारचें उदाहरण आहे. तथापि सामान्यतः अर्वा-चीन राष्ट्रांचा उदय प्रथम अनियंत्रित राजसत्तेच्या स्वरूपांत झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. कारण इंग्लंडांत सुद्धां क्षात्रवर्गाचा नाश झाल्या-नंतर पुनः व्यापारी वर्गाच्या हातीं सत्ता येईपर्यंतच्या काळांत म्हणजे

सोळाव्या शतकांतील टयूडर राजांच्या अमदानींत स्वरूपतः नसली तरी वस्तुतः अनियंत्रित राजसत्ताच नांदत होती. फ्रान्समध्यें " फ्रान्स " नांवाच्या एका लहानशा जहागिरीवरील कॅपेट घराण्यांतील पुरुषांनीं इतर सर्व जहागिरदारांचा पाडाव करून आपल्या सत्तेखालीं सर्व देश आणला व त्याला आपल्या जहागिरीचेंच ' फ्रान्स ' हें नांव दिलें. या देशांतील चवदाव्या लुईनें राज्यांतील सर्व सरदारांची व व्यापारी शहरांची सत्ता नष्ट करून आपली अनियंत्रित सत्ता सर्व देशभर प्रस्थापित केली. स्पेनमध्यें अशीच अनियंत्रित राजसत्ता पांचव्या चार्लसच्या अमदानींत स्थापन झाली. जर्मनी व इटाली या देशांत मात्र मध्ययुगांतील ' पवित्र रोमन साम्राज्य ' व पोपचें ' धार्मिक साम्राज्य ' हीं ध्येयें बराच काळ जिवंत असल्यामुळें व तेथील सरदार वर्ग पुष्कळच प्रबळ असल्यामुळें, त्यांचें राष्ट्रीय एकीकरण एकोणिसाव्या शतकापर्यंत होऊं शकलें नाहीं.

राष्ट्रीय राज्यांच्या उत्क्रांतींतील दुसरी अवस्था म्हणजे प्रातिनिधिक लोकसत्ताक राज्यें, ही होय. सरंजामी सरदारांचा पाडाव झाल्यानंतर व्यापारीवर्ग राजसत्तेला प्रतिस्पर्धी म्हणून पुढें आला.

अनियंत्रित राजसत्तेचें प्रातिनिधिक लोकसत्तेंत रूपांतर.

अनियंत्रित राजसत्तेच्या काळांत मध्यम वर्गांत ज्ञान व धन यांची वृद्धि झाली व त्यांना हळू हळू आपणास राजकीय हक्क असावेत, असें वाटूं लागलें. प्रातिनिधिक तत्त्वाचा शोध लागल्यामुळें राष्ट्रासारख्या मोठ्या प्रदेशावर लोकसत्तेचें तत्त्व अमलांत आणणें शक्य कोटींत येऊं लागलें. जुन्या ग्रीक विद्येचा व संस्कृतीचा अभ्यास सुरू झाल्यापासून लोकसत्ता, व्यक्तिस्वातंत्र्य वगैरेंची आवड लोकांत पुनः उत्पन्न होऊं लागली. भौतिक शास्त्राचें ज्ञान वाढून धार्मिक विचारांत क्रांति होऊं लागली. धर्मसुधारणेमुळें मतस्वातंत्र्य व व्यक्तिस्वातंत्र्य यांचा जोरानें फैलाव होऊन कोणत्याही जुलमी सत्तेखालीं मान वाकविण्याची प्रवृत्ति

लोकांतून अजिबात मावळूं लागली. या सर्व कारणांचा परिणाम होऊन सर्व देशांत क्रमाक्रमानें लोकसत्ता स्थापन झाली. हें रुपांतर सर्व देशांत एकाच काळीं किंवा एकाच प्रकारें घडून आलें नाहीं. इंग्लंडांत जवळ जवळ तीन शतकें हळू हळू हें रूपांतर होत होतें. (१७ वें १८ वें व १९ वें शतक). फ्रान्सांत हीच गोष्ट एकाच शतकांत चारपांच क्रांत्या होऊन घडून आलें. (१७८९ ते १८७०). फ्रान्समध्यें अठराव्या शतकाच्या अखेरीस झालेल्या भयंकर रक्तपाताच्या राज्यक्रांतीनें सर्व युरोपखंड हादरून गेलें व सर्व युरोपियन राजांनीं लोकसत्तेची ही जोत विझवून टाकण्याचें आटोकाट प्रयत्न केले; परंतु ते सर्व निष्फळ होऊन एकोणिसाव्या शतकांत बहुतेक युरोपिन राष्ट्रांत लोकसत्ताक संस्था स्थापन झाल्या. एकोणिसाव्या शतकांतील युरोपियन राष्ट्राच्या अंतर्गत राजकरणांत "राष्ट्रीय भावना" व "लोकसत्ता" या दोन शक्ति प्रमुखपणें घडामोडी करीत असलेल्या स्पष्टपणें दिसतात. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून कारखानदार व मजूर यांच्यांतील तट्यांना विशेष महत्त्व येत जाऊन आर्थिक समता, व औद्योगिक लोकसत्ता असल्या कल्पनांना जोर चढत चालला. याच कल्पनांच्या आधारांवर रशियांत परवा मोठी राज्यक्रांती होऊन तेथें एक नव्याच धर्तीची सोव्हीएट राज्यपद्धति स्थापन झाली आहे. या राज्य क्रांतीचें एकंदर युरोपांतील राज्ययंत्रावर काय परिणाम होतील, हें आतांच सांगणें शक्य नसलें, तरी त्यामुळें प्रातिनिधिक लोकसत्तेचें प्रस्तुत राज्ययंत्र बरेंच पालटून जाईल असें म्हणण्यास हरकत दिसत नाहीं. प्रातिनिधिक लोकसत्तेचें साद्यंत गुणदोषविवेचन येथें करणें शक्य नाहीं. तें पुढें यथावकाश क्रमाक्रमानें करण्यांत येईलच. येथें एवढेंच सांगावयाचें आहे कीं, त्या पद्धतीमुळें मोठ्या प्रदेशांवर व मोठ्या लोकसमुदायावर लोकसत्तेचे तत्व अमलांत आणणें शक्य झालेलें आहे.

युरोपीयन राज्यांचे नमुने पुढील प्रमाणें इतिहासांत दिसून येतात, हें या प्रकरणांतील माहितीवरून दिसून येईल.

१ ईलीयडमध्यें वर्णिलेलीं प्राथमिक राज्यें.

२ ग्रीक व रोमन नगर राज्यें.

३ (रोमन) सार्वभौम साम्राज्य.

४ मध्ययुगीन सरंजामी पद्धतीचीं विस्कळित राज्यें.

५ आर्वाचीन राष्ट्रीय राज्यें.

(१) अनियंत्रित राजसत्ताक.

(२) प्रातीधिनिक लोकसत्ताक.

मागच्या प्रकरणांतील भारतीय राज्यांची उत्क्रांति व या प्रकरणांतील यरोपियन राज्याची उत्क्रांति यांची तुलना केली असतां आर्वाचीन राष्ट्रीय राज्यांसारखीं राज्यें हिंदुस्थानांत निर्माण झालीं नाहींत व लोकसत्तेचाहि उद्भव इकडे झाला नाहीं, असें दिसून येतें. याकरितां युरोपांत राजसत्तेचा लोप होऊन लोकसत्तेचा उद्भव कोठें, केव्हां व कसा झाला, हें चांगल्या प्रकारें समजण्यासाठीं पुढील दोन प्रकरणांत त्या विषयाची माहिती देण्याचें योजिलें आहे. त्यांत इंग्लंड, अमेरिका व फ्रान्स या देशांच्या राजकीय इतिहासाची व राज्यघटनांतील रूपांतरांची माहिती ध्यावयाची आहे. इतकें झालें म्हणजे आमच्या पुस्तकाचा पहिला ऐतिहासिक भाग संपला.

प्रकरण ७ वें.

राजसत्ता व तिचें नियंत्रण.

तें (दंडं) राजा प्रणयन्सम्यक् त्रिवर्गेणाभिवर्धते ।
कामात्मा विषमः क्षुद्रो दण्डेनैव निहन्यते ॥ २७ ॥
बहवोऽविनयान्नष्टा राजानः सपरिच्छदाः ॥ ४० ॥
वेनो विनष्टोऽविनया न्नहुषश्चैव पार्थिवः ।
सुदासो यवनश्चैव सुमुखो निमिरेव च ॥ ४१ ॥

म. स्मृ० अ० ७.

जुलमी राजे व दंडशक्ति.

राज्यांतील दण्डशक्ति हें एक विलक्षण तेज आहे, त्याचें धारण करणें कामात्मा, विषम व क्षुद्र अशा व्यक्तींकडून होत नाहीं, उलट त्या राजांचाच त्या दंडाच्या योगनें नाश होतो. अविनयामुळें पुष्कळ राजे आपल्या परिच्छेदांसह नष्ट झालेले आहेत. वेन राजा अविनयामुळेंच नाश पावला. नहूषाची तीच स्थिति झाली व सुदास, सुमुख, निमि यांचा नाश असाच झाला, असें मनुस्मृतींत सांगितलेलें आहे. महाभारतांत तर जुलमी राजाला ठार मारावें, असा अनुशासन पर्वाच्या ९६ व्या अध्यांत स्पष्ट उपदेश केलेला आहे. (तैं वं राजकलिं हन्यात् ।) शुक्रनीतींत ' गुणनींनिबलद्वेषी ' आणि " अधार्मिक " असा पुरुष राजकुलांत जन्मला असला, तरी त्याला काढून टाकावा व पुरोहितानें लोकांची अनुमति घेऊन त्याच्या जागीं त्याच कुलांतील गुणयुक्त पुरुषास राज्याचें संरक्षणार्थ बसवावें असें म्हटलेलें आहे; परंतु प्राचीन काळच्या लोकांनीं घालून दिलेल्या राजनीतींतील रहस्य हळूहळू आम्ही विसरूं लागलों आणि या नियमांची अंमलबजावणी कर-

ण्याचें आम्ही सोडून दिलें. याच्या उलट इंग्लिश लोकांतील राजनीतिशास्त्रविषयक विचार आमच्या इतके प्रगल्भ झालेले नसतांनाहि त्यांच्या इतिहासांत अशीं उदाहरणें बरींच सांपडतात. कोणताहि मनुष्य दण्डाच्या भीतिशिवाय स्वधर्माचें आचरण करीलच अशी खात्री नसते. हा नियम राजांसहि लागू आहे व तो इंग्लिश लोकांनीं योग्य प्रकारें लागू केलेला आहे. यामुळेंच त्या देशांत अर्वाचीन काळीं कोणत्याहि राष्ट्राच्या अगोदर लोकनियंत्रित राजसत्तेची स्थापना झाली.

ब्रिटिशांचे राजकीय आचार व आमचे धार्मिक आचार.

ब्रिटिश लोकांच्या राजकीय आचारांची आणि आमच्या धार्मिक आचारांची स्थिति कांहीं अंशीं अगदीं सारखी आहे. आमच्या धार्मिक तत्त्वज्ञानाची मजल जरी निर्गुण परब्रह्मापर्यंत गेलेली आहे, तरी आमचे केवळ बाह्य धार्मिक आचरण अवलोकन करणारांस, आम्ही एखाद्या दगडाची, वृक्षाची किंवा पशूची पूजा करणारें रानटी लोक आहोंत, असा भास होतो. त्याचप्रमाणें इंग्लिश लोकांच्या राजकीय व्यवहारांचें बाह्यतः अवलोकन करणाऱ्यांस ते लोक अजूनहि अनियंत्रित राजसत्तेचे उपासक भासतात. आम्ही ज्याप्रमाणें आपल्यापुढें कोणतेंहि प्रतीक ठेवित असलों, तरी सर्वव्यापी, व सर्वांतर्यामी एका परमात्म्याचीच उपासना करीत असतों; त्याचप्रमाणें इंग्लिश लोक राजाची मूर्ति पुढें ठेऊन राष्ट्राची उपासना करीत असतात व राजसत्तेची महती गातांना राष्ट्रशक्तीची महती गात असतात. आपल्या राष्ट्रनिष्ठेला अद्यापि ते 'राजनिष्ठा' ही प्राचीन संज्ञाच देत असतात, आणि राजाची आज्ञा या नांवानें राष्ट्राची आज्ञा ते पाळीत असतात. इंग्लिश लोकांच्या पुढाऱ्यांनीं आपल्या राजाबरोबर आपल्या हक्काकरितां जे तंटे केले, ते राजसत्ता नष्ट करण्याच्या स्वरूपांत केले नसून राजांनीं आपल्या सत्तेचा उपभोग कांहीं विशिष्ट प्रकारेंच घ्यावा, अशीं बंधनें लाद-

ण्याच्या स्वरूपांत केलें, व ज्या मानानें हीं बंधनें वाढूं लागलीं त्या मानानें राजसत्ता राजांच्या हातून निघून लोकसभेच्या हातीं येऊं लागली. कायदे करणें, राज्यकारभार करणें व न्याय देणें, हीं जीं राजसत्तेची तीन अंगें, त्यांचा उगम राजापासून होतो. ही नॉर्मन अमदानींतील कल्पना स्वरूपतः त्यांनीं अद्यापि कायम ठेविलेली आहे. सध्याही राजाच लोकसभेच्या विचारानें व संमतीनें कायदे करतो. राजाच मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानें राज्यकारभार करतो आणि राजाच न्यायाधीशांच्या मुखानें न्यायदानाचें कार्य करतो. परंतु या तिन्ही बाबींतील खरी सत्ता आज लोकसभा, मंत्रिमंडळ आणि न्यायाधीश यांच्या हातीं आलेली आहे. मंत्रि व न्यायाधीश हे आज लोकसभेचे नोकर झालेले आहेत.

ब्रिटिशांचे " कायद्यांचें राज्य " व आमचें धर्मराज्य.

ही सत्ता राजांच्या हांतून निघून लोकसभेच्या हातीं कशी आली, याचा उलगडा होण्यास त्यांच्या प्रस्तुत राज्यघटनेचें एक प्रमुख लक्षण समजून घेतलें पाहिजे. तें समजण्यासही आमच्या राजधर्माच्या कल्पनेचा बराच उपयोग होण्यासारखा आहे. त्यांनीं ज्या कल्पनांच्या आधारानें आपल्या देशांतील अनियंत्रित राजसत्तेचें लोकनियंत्रित राजसत्तेंत रूपान्तर केलें, त्या सर्व कल्पना आमच्या राजधर्माच्या कल्पनेंत अंतर्भूत होतात. इंग्लिशांच्या प्रस्तुत राज्यव्यवस्थेचें सर्व रहस्य ' लोकसभेचें प्रभुत्व आणि कायद्यांचें राज्य ' (the sovereignty of parliament and the rule of law) या सूत्रांत भरलेलें आहे, असें डायसी यांनीं दाखवून दिलेले आहे. इंग्लिश

1 "if the sovereignty of parliament gives the form, the supremacy of the law of the land determines the substance of our constitution." introduction to the study of the law of the constitution. p. 466.

लोक ज्याला " कायद्यांचें राज्य " (The Rule of the Law) असें म्हणतात त्याला ' धर्मशास्त्रानुसार राज्य ' किंवा थोडक्यांत ' धर्म-राज्य ' असें म्हणता येईल. " धर्माय राजा भवति न कामकरणाय तु " म्हणजे राजा धर्मसंरक्षणाकरितां आहे, वाटेल तसें स्वैर वर्तन करण्याकरितां नाहीं, अशी जशी आमच्या लोकांची समजूत होती, त्याचप्रमाणें आपल्या पूर्वापार चालत आलेल्या रूढी व आचार यांना अनुसरूनच राजानें राज्य केलें पाहिजे, अशी इंग्लिश लोकांची समजूत होती. आम्ही ज्याप्रमाणें देशाचार, ग्रामाचार, जात्याचार किंवा कुलाचार यांना धर्म असें म्हणता, त्याचप्रमाणें असल्या आचारांना इंग्लिश लोक " लॉ ऑफ दी लँड " किंवा " कॉमन लॉ " असें म्हणतात. या ' कॉमन लॉ ' प्रमाणेंच आम्ही तुमच्यावर राज्य करूं, असें नॉर्मन राजांनीं वेळोवेळीं जाहीर करून आपल्या जित इंग्लिश प्रजेची सहानुभूति मिळविलेली आहे. या शिवाय राज्याकार-भाराचें सोयीकरितां जे हुकूम वेळोवेळीं फर्मावावे लागत, ते आमच्या दर-बारी लोकांच्या सल्ल्यानें फर्मावित जाऊं, असें जाहीर करून आपल्या बरो-बर आलेल्या नॉर्मन सरदारांना त्यांनीं खूष ठेवण्याचा प्रयत्न केला होता. एवढ्या दोन गोष्टींचा फायदा घेऊन इंग्लिश लोकांनीं राजांच्या सत्तेला नियंत्रित केलेलें आहे. " इंग्लंडांतील प्रजास्वातंत्र्याच्या लढयाला प्रथम कायद्यांचें वर्चस्व स्थापन करण्याच्या लढ्याचें स्वरूप प्राप्त झालें होतें. म्हणजे राज्यांतील पूर्वापार आचारांना व लोकसभेच्या कायद्यांना मान देणें राजमंत्र्यांना भाग पाडून राजसत्तेचें नियमन करण्याच्या स्वरूपांत तो लढा प्रथम सुरू झाला. ज्या प्रमाणांत राज्यांतील लोकांच्या पूर्वापार रूढींना मान मिळूं लागला व लोकसभेनें केलेल्या कायद्यांची संख्या वाढूं लागली, त्या प्रमाणांत राजा व त्यांचे मंत्रि यांचे अधिकारक्षेत्र संकुचित होत गेलें; त्यांचे जादा अधिकार कमी होत गेले आणि ' कायद्यांचें राज्य ' या नांवानें प्रसिद्ध असलेलें राज्यघटनेचें मूलभूत तत्त्व प्रस्थापित झालें. राज्यांतील

पूर्वापार रूढी व लोकसभेचे कायदे यांना अनुसरून सर्व राज्याकारभार चालावा, राजा व मंत्रि यांच्या स्वैर वर्तनाप्रमाणें चालू नये आणि सर्व अधिकारी त्यांनीं केलेल्या कृत्यांबद्दल इतरांप्रमाणेंच कायदेशीर रीतीनें जबाबदार असावेत, असें ठरून गेलें.[1]" असें लॉर्ड ब्राईस हे आपल्या "दी अमेरिकन कॉमन वेल्थ" या ग्रंथांत ह्मणतात. तात्पर्य आपल्या पूर्वापार

---

1 "The struggle for popular liberties in England took at first the form of a struggle for the supremacy of law; that is to say it was a struggle to restrain the prerogative of the King by compellig his ministers to respcet the ancient customs of the land and the statutes passed in parliament as the customs were always maintained, and the range of the statutes constantly widened, the executive was by degrees hemmed in within narrow limits, its discretionary power restricted, and that characteristci principle of the constitution, which has been called the reign of law was established. It was settled tha the law of the land i. e. the ancient customs and statutes, should always prevail against the discretion of the crown and its ministers and that acts done -by the servants of the crown should be justiciable like the acts of parivate persons"

The American Commonwealth Vol. 1 p. 219

रूढींत किंवा धर्मांत हात घालूं नये, आणि राजानें नवे जे हुकूम सोडावयाचे किंवा कायदे करावयाचे ते आपल्या दरबारला विचारून करावेत. या दोन कल्पनांवर इंग्लिश लोकांनीं आपली राज्यघटनेची भव्य इमारत उभारलेली आहे. कायदे करणें हेंच लोकसभेचें मुख्य कार्य असल्यामुळें तिनें आपली सत्ता वाढवितांना सर्वत्र ' कायद्यांचें राज्य ' स्थापन केलें, राजांच्या मंत्र्यांना देखील आपल्या कचाटींत आणिलें, कोणत्याही राजाधिकाऱ्यानें कोणाच्याहि हुकुमावरून कांहींही कृत्य केलें तरी त्या कृत्याची कायदेशीर जबाबदारी त्या अधिकाऱ्यावर व्यक्तिशः आहे, हें तत्त्व पुढें आणून राजाचा बेकायदेशीर हुकूम कोणीहि अमलांत आणू नये अशी तरतूद करून ठेविली. ही व्यवस्था पूर्णपणें अमलांत येण्यास न्याया-धिशांवर राजाचें अयोग्य दडपण पडूं नये, याबद्दल कांहीं तरी उपाय योजणें अवश्य होतें; म्हणून न्यायाधिशांना वाटेल तेव्हां काढून टाकण्याचा अधिकार राजाकडून काढून लोकसभेनें आपणांकडे घेतला. तसेंच " तस्मै मंत्रः प्रयोक्तव्यो दण्डमाधित्सतानृप । पौरजानपदा यस्मिन् विश्वासं धर्मतो गताः ॥ म्हणजे ज्यानें पौरजान–पदाचा विश्वास धर्मानें संपादन केलेला आहे, त्यालाच मंत्रिपद द्यावें, या महाभारतांतील तत्त्वाला अनुसरून लोक-सभेच्या विश्वासांतील लोकांनाच मंत्रि नेमावें असा प्रघात पाडून हळूं हळूं आपले मंत्रि नेमण्याचाही अधिकार राजाकडून काढून घेण्यांत आला. राजानें आपला सर्व कारभार मंत्र्यामार्फतच केला पाहिजे, हें तत्त्व तर आधींच अमलांत आलें होतें. आम्ही तुमच्या पूर्वापार रुढींना अनुसरून तुमच्यावर राज्य करूं आणि तुमच्यावर सोडण्याचें हुकूम दरबारी मंडळींच्या विचारानें व संमतीनें सोडले जातील, असें जाहीर करणाऱ्या नॉर्मन राजांना या बीजांतून पुढें केवढा वृक्ष निर्माण होईल, लोकांच्या कायद्यांचे (पूर्वापार रूढींचें) जाळें कोठपर्यंत पसरत जाईल आणि त्या जाळ्यांत आपण व आपले

कायद्यांचें राज्य व लोकसभेचें प्रभुत्व.

अधिकारी कितपत सापडूं, याची जर पूर्ण कल्पना असती, तर त्यांनीं असें कधींच जाहीर केलें नसतें.

प्रबल परकीय राजसत्ता व राष्ट्रीय एकीकरण इ०स० १०६६ते ११९९

पारतंत्र्य आणि प्रबल राजसत्ता, यांपासून लोकसत्तेच्या परिपोषास सहाय्य होत असेल, असें जर कोणी म्हटलें तर तें सकृद्दर्शनीं विसंगत भासतें. परंतु इंग्लंडच्या इतिहासांत वरील सिद्धांताचें प्रत्यंतर पाहावयास सापडतें. इ० स०- १०६६ मध्यें नॉर्मंडीचा ड्यूक विल्यम यानें इंग्लंड देश पादाक्रांत करून तेथें आपला अंमल बसविला, आणि इंग्लिश लोकांना गुलाम करून व त्यांच्या जमिनी काढून घेऊन त्या आपल्या बरोबर आलेल्या नॉर्मन सरदारांस वाटून दिल्या. या वेळपासून सुमारें दीड शतकपर्यंत इंग्लिश लोकांना नॉर्मन सरदारांचे गुलाम होऊन राहावें लागलें. या दीड शतकांत त्यांचा असा कांहीं इतिहास नाहीं. त्यांची भाषा व त्यांची संस्कृती यांना देशांत मुळींच मान नसून नॉर्मन सरदारांची फ्रेंच भाषा व फ्रेंच संस्कृति यांचा वरपगडा इंग्लंडांत बसलेला दिसून येतो. विल्यम दी कॉंकरर, पहिला हेन्री किंवा दुसरा हेन्री यांच्या राज्यव्यवस्थेसंबंधानें किंवा त्यांच्या मुत्सद्दीपणासंबंधानें इंग्लिश लोकांनीं आज कितीहि गोडवे गाईले, तरी ते राजे परके होते व त्यांच्या अमदानींत इंग्लिश लोकांना गुलामांपेक्षा फारसा अधिक मान नव्हता, हें विसरून चालणार नाहीं. तथापि या परकीय परंतु प्रबल शास्त्यांच्या अमलाचा इंग्लिशांच्या राष्ट्रीय एकीकरणाला पुष्कळ उपयोग झालेला आहे. या नॉर्मन राजांना आपल्या नॉर्मन सरदारांची एकसारखी भीति वाटत असल्यामुळें त्यांची सत्ता वाढू नये, याबद्दल ते एकसारखे प्रयत्न करीत असत. सामान्यतः इंग्लिश लोकांना खूष ठेऊन व त्यांच्या संस्कृतीला व स्थानिक संस्थांना औपचारिकरीत्या मान देऊन, सरदार लोकांच्या सत्तेला आळा घालावा, असें त्यांचें धोरण

असें. विल्यमनें आपल्या कोणत्याही सरदारास एके ठिकाणीं मोठी जहागीर न देतां देशांतील निरनिराळ्या विभागांत जहागिरी देण्याचा प्रघात ठेविला होता. तसेंच इंग्लिश लोकांना त्यांच्या पूर्वापार चालत आलेल्या कायद्याप्रमाणें पूर्वीच्याच स्थानिक शायरकोर्टामार्फत न्याय मिळावा, याबद्दल दक्षता ठेवण्यांतही या नार्मन राजांचा हेतु सरदार लोकांच्या कोर्टाचें महत्त्व वाढू नये असाच होता. पहिला हेन्री व दुसरा हेन्री यांच्या कारकीर्दींत फिरते न्यायाधीश नेमून या शायर कोर्टांवर देखरेख करण्याचें काम सुरू झालें. हे फिरते न्यायाधीश प्रत्येक शायरमधील वसूल गोळा करण्याचेंही काम करीत असत. अशा प्रकारें न्यायदानाचें काम इंग्लंडांत सरदार लोकांच्या हातांत न उरतां तें राजाच्या कोर्टामार्फत व इंग्लिश लोकांच्या पूर्वापार चालत आलेल्या रूढीप्रमाणें होऊं लागलें; आणि इंग्लिशांच्या मूळच्या स्थानिक स्वराज्याच्या संस्था दृढमूल झाल्या. पहिल्या हेन्रीनें सरंजामी सरदारांनीं कांहीं विशिष्ट नजराणा देऊन लष्करी नोकरीच्या अटींतून मुक्त व्हावें असें ठरवून दिल्यापासून राजे लोक पगारी लष्कर उभारूं लागलें. यामुळेंही हळूंहळूं सरंसामी सरदारांचें बल व महत्त्व हीं कमी होऊं लागलीं. पहिल्या हेन्रीनंतर स्टीफन हा दुर्बल राजा गादीवर आला होता. त्यावेळीं नॉर्मन सरदारांनीं देशांत कांहीं काळ बंडाळी माजविली होती; परंतु लगेच दुसरा हेन्री गादीवर आला व त्यानें देशांत शांतता प्रस्थापित केली. यानें धर्माधिकाऱ्यांवरही आपलें वर्चस्व बसविलें आणि देशांतील राज्यकारभार सुव्यवस्थित केला. याच्या कारकीर्दीपासून आपल्या एकट्याच्या हातून राजांच्या सत्तेला आळा घालण्याचें काम निभत नाहीं अशी सरदार लोकांची खात्री झाली व त्यांनीं लोकांचें पुढारीपण घेऊन राजसत्तेचें नियंत्रण करण्याचे प्रयत्न तेराव्या शतकापासून सुरू केले. यावेळेपासून राजांच्या विरुद्ध पारडें फिरलें व राजसत्तेला खरें नियंत्रण बसूं लागलें. अकराव्या शतकांत नॉर्मन अमदानी सुरू झाल्यापासून बाराव्या शतकाच्या अखेरी

पर्यंत राजे, लोकांचें साहाय्य घेऊन सरदारांच्या सत्तेस आळा घालण्यास प्रवृत्त झालेले दिसतात, तर तेराव्या व चवदाव्या शतकांत लोकांचे पुढारी-पण स्वीकारून सरदार, राजसत्तेला नियंत्रित करण्याचे प्रयत्न करीत असलेले दिसतात. सरदार व लोक यांचें एकीकरण होण्याला दीड शतकाचा प्रबल राजांचा परकीय अंमल कसा उपयोगी पडला हें वरील हकीगतीवरून दिसून येईल.

लोकसभेची उत्पत्ति व घटना. इ. स. ११९९ ते १३०७

इ. स. ११९९ मध्यें जॉन राजा इंग्लंडच्या गादीवर आला व इ. स. १३०७ मध्यें पहिला एडवर्ड राजा मृत्यु पावला. एवढ्या मुदतींत इंग्लं-डांत नॉर्मन अमदानींतील राजदरबाराला लोक-सभेचें स्वरूप प्राप्त झालें व तिची द्विदल स्वरू-पाची घटना कायम झाली. जॉन राजा गादीवर आला त्यावेळीं इंग्लंडांतील नॉर्मन व इंग्लिश हा भेद बहुतेक नष्ट होऊन सर्वांत एकराष्ट्रीय भावना उत्पन्न झाली होती. सरदार लोकांनीं प्रजेचा पक्ष घेऊन राजाशीं भांडण्यास सुरवात केली होती. तशांत जॉन राजाचे जुलमी वर्तन व परकीय अधिकारी नेमून त्यांच्या सल्ल्यानें वागण्याचें त्याचें धोरण पाहून सर्वच लोकांना त्यांच्या विषयीं अप्रीति उत्पन्न झाली होती. ही संधि साधून सरंजामी सरदारांनीं त्याच्या विरुद्ध बंड उभारलें व इ. स. १२१५ मध्यें त्याच्या-कडून हक्कांची एक सनद लिहून घेतली. हीच इंग्लिश इतिहासांत 'मॅग्ना-चार्टा' (म्हणजे मोठी सनद.) या नांवानें प्रसिद्ध आहे. या सनदेंत पुष्कळ कलमें आहेत, परंतु त्यांचें पुढें फार महत्त्व उरलें नाहीं. त्यांपैकीं ३९, १२ व १४ हीं कलमें पुढें बरींच प्रसिद्धीस आलीं. ३९ व्या कलमानें कोणत्याही स्वतंत्र मनुष्याला किंवा त्याच्या मालमत्तेला न्यायकोर्टांत कायद्यानें शिक्षा झाल्याखेरीज आम्ही बेकायदेशीर रीतीनें धक्का लावणार नाहीं, असें राजानें लिहून दिलें असून राजदरबारच्या संमतीशिवाय आम्ही सरदार लोकांकडून जादा पैशाची मागणी करणार नाहीं असें १२ व्या कलमानें राजानें कबूल

केलें आहे. १३ व्या कलमांत राजदरबारला कोणास कसें बोलावलें जाईल, तें लिहिलेलें आहे. ३९ व्या कलमानें राजाच्या व त्याच्या अधिकाऱ्यांच्या वर्तनाला देशांतील कायद्यांचें बंधन घातलें गेलें असल्यामुळें त्यावेळेपासून " कायद्यांचें राज्य " अमलात आणण्याची कल्पना लोकांपुढें येऊं लागली, असें मानतां येईल. १२ व्या कलमानें लोकांच्या संमतीशिवाय त्यांच्यावर कर बसविण्यांत येऊं नयेत, असें राजानें लिहून दिलें असें पुढें समजण्यांत येऊं लागलें; पण तें बरोबर दिसत नाहीं. कारण तें कलम सरंजामी सरदारांनीं राजांना द्यावयाच्या द्रव्यासंबंधींचेंच असून त्यांत सामान्य लोकांच्या हक्कांचा मुळींच उल्लेख नाहीं. तसेंच या सभेंत सरदार लोकांवर सामान्य कोर्टांत खटले न चालतां, ते त्याच्या दर्जाच्या लोकांपुढें चालावेत, या तत्त्वाचा जो उल्लेख आहे, तोही लोकांच्या हक्कांच्या विरुद्ध असून त्यामुळें कायद्याची दृष्टी विषम असावी असा बोध होतो. तात्पर्य या सनदेंतील ३९ व्या कलमांतील एका भागाखेरीज इतर सर्व कलमें लोकांच्या हक्कासंबंधीं मुग्धच आहेत. तरी ती सनद मिळवितांना सरदार लोकांना सामान्य लोकांचें सहाय्य घ्यावें लागलें, ही गोष्ट महत्त्वाची आहे. सनदेंत ज्या राजदरबाराचा उल्लेख आहे, तोही राजाच्या सरंजामदारांचाच दरबार आहे. परंतु पुढें याच दरबारला लोकसभेचें स्वरूप प्राप्त झालें. जॉन नंतर तिसरा हेन्री गादीवर आला व तोही जॉन प्रमाणेंच स्वैर वर्तन करूं लागला व फ्रान्स मधून अधिकारी आणून त्यांना सरदार बनवूं लागला. यावेळीं पुनः इंग्लिश सरदारांनीं सायमन मॉंटफर्ड याच्या नेतृत्वाखालीं बंड केलें व राजाला आपल्या म्हणण्याप्रमाणें वागावयास भाग पाडलें. सायमन मॉंटफर्ड यानें इ. स. १२६५ मध्यें प्रथम खरी लोकसभा (Parliament) बोलावली असें मानतात. या लोकसभेंत मोठे सरदार असून शिवाय प्रत्येक शायरमधून दोन दोन नाईट्स व मोठमोठया शहरांतून दोन दोन नगरप्रतिनिधी बोलाविले होते. नाईट्स हे छोटे सरंजामदारच होते व त्यांना पूर्वीपासून राजदरबारला बोलावणें

येतच असे, परंतु त्यांना व्यक्तिशः निमंत्रण न पाठवितां शायरमधील शेरि-फामार्फत एकदम निमंत्रण जात असे, यामुळें त्यांनीं राजदरबारला जाण्याचें सोडूनच दिलें होतें.आतां ते व्यक्तिमाहात्म्यानें आलें नसून आपल्या शायर-मधील जमीनदारांचे प्रतिनिधी या नात्यानें येऊं लागले. याप्रमाणें १२६५ मध्यें राजदरबारांत प्रथमतः सामान्य लोकांचे व व्यापारी शहरांचे प्रतिनिधी आल्यामुळें तो केवळ बड्या लोकांचा दरबार न राहतां, त्याला लोकसभेचें स्वरूप प्राप्त झालें.पुढें हळूहळू शायरमधील नाईट्स व शहरांतील नगरप्रति-निधी हे बडया सरदारांपासून वेगळे बसूं लागले व या लोकसभेला द्विदळ स्वरूप प्राप्त झालें. बड्या सरदारांच्या सभेला महाजनसभा(House of Lords) आणि नाईट्स व नगरप्रतिनिधी यांच्या सभेला प्रातीनिधि सभा (House of Commons) अशा संज्ञा मिळाल्या. १२६५ पासून १२९५ पर्यं-तच्या काळांत ही लोकसभेची घटना कायम होऊन तींत नाईट्स व नगर-प्रतिनिधी यांना कायमचें स्थळ मिळालें. १२९५ मध्यें पहिल्या एडवर्डनें जी लोकसभा भरविली होती, ती घटनेच्या कामांत नमुनेदार गणली जाते. या लोकसभेला आर्चबिशप, बिशप व ॲबट, हे धर्माधिकारी, अर्ल व बॅरन हे बडे सरदार व प्रत्येक शायरमधून दोन नाईट्स व प्रत्येक शहरांतून दोन नगरप्रतिनिधी, असे सभासद हजर होते.

तेराव्या शतकांत युरोपांतील फ्रान्स, स्पेन वगैरे इतर देशांतही अशा प्रकारच्या लोकसभा भरत असत, परंतु त्यांचें स्वरूप द्विदल नसून त्रिदल

लोकसभेची घटना व राष्ट्रीय एकीकरण.

असे. असें असतां इंग्लंडांतच या मध्ययुगीन लोकसभेला द्विदळ स्वरूप कां प्राप्त झालें हें पाहाणें अवश्य आहे. इतर देशांतील या मध्ययु-गीन त्रिदळ लोकसभा पुढें नष्ट झाल्या व इंग्लंडांतील द्विदळ लोकसभा अखेरपर्यंत टिकली. यामुळें या प्रश्नाला थोडें जास्त महत्त्व प्राप्त झालें आहे. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या सारखेंच

मध्ययुगीन युरोपांत चार सामाजिक वर्ग होते. धर्माधिकारी, सरंजामदार,
व्यापारी आणि सामान्य लोक व कुळे असे चार वर्ग त्यावेळीं प्रत्येक देशांत
असत. यांपैकीं पहिल्या तीन वर्गांनाच राजकीय हक्क असल्यामुळें प्रत्येक
देशांतील लोकसभांना त्रिदळ स्वरूप प्राप्त होणें अगदीं सयुक्तिक होतें. परंतु
इंग्लंडांत तसें न घडण्यास दोन कारणें झालीं. धर्माधिकारी आपल्या कन्व्हे-
न्शन्स नांवाच्या स्वतंत्र सभा भरवून राजाशीं संबंध ठेऊं लागल्यामुळें यांचे
फार लोक लोकसभेला हजर राहात नसत. जे बडे धर्माधिकारी हजर राहात
ते सरंजामदारांबरोबर महाजनसभेंतच बसूं लागले. शायरमधून सर्व स्वतंत्र
जमीनदारांचे प्रतिनिधी म्हणून येणारे नाईट्स हे बड्या सरंजामदारांबरोबर
महाजनसभेंत न बसतां नगरप्रतिनिधींबरोबर प्रतिनिधी-सभेंत बसूं लागले.
यामुळें द्विदल घटना बनून दोन्ही दळांत ऐक्य राहात असे. शायरमधील
नाईट्स हे जमीनदारच असल्यामुळें त्यांचे व महाजनसभेंतील सभासद
यांच्या दर्जांत फारसें अंतर नव्हतें. या विशिष्ट प्रकारच्या द्विदळ घटनेमुळें
व्यापारी वर्ग व जमीनदार वर्ग, असे तट देशांत पडूं शकले नाहींत. शायर-
मधील नाईट्सचा वर्ग हा नेहमीं दोन्ही दळांत ऐक्य व सलोखा राखण्यास
उपयोगी पडे, यामुळें देशांत वर्गद्वेष माजला नाहीं व त्याचा फायदा राजे-
लोकांना घेतां आला नाहीं. फ्रान्स, स्पेन वगैरे देशांत व्यापारी वर्ग व जमीन-
दार वर्ग यांच्यांत फूट पाडून राजानीं दोघांनाही हतबल केलें व अखेरीस
आपल्याच हातीं सर्व सत्ता गोळा केली. इंग्लंडांत लोकसभेच्या विशिष्ट घटने-
मुळें व एकंदर सामाजिक वर्गांत ऐक्यभावना सदैव जागृत असल्यामुळें
राजांना असें करतां आलें नाहीं. लोकसभेंतील कोणतेंही एक दळ केवळ
एकाच वर्गाचें प्रतिनिधि नसून सर्व लोकसभा सर्व राष्ट्राची प्रतिनिधि आहे,
ही भावना इंग्लंडांत नेहमीं जागृत होती. इंग्लंडांतील प्रतिनिधि सभा व
महाजनसभा यांना जोडणारा आणखी एक प्रेमाचा दुवा होता. ते
म्हणजे सरदारपुत्रांपैकीं केवळ ज्येष्ठ पुत्रासच सरदारपदाची प्राप्ति व्हावी,

ही त्यांची रूढी होय. यामुळें सरदारांचे धाकटे मुलगेच पुष्कळ वेळां प्रतिनिधी सभेंत सामान्य लोकांचे प्रतिनिधी म्हणून निवडून येत. यामुळेंच इंग्लंडांतील प्रतिनिधिसभेला प्रथमपासून इतर देशांतील तसल्या सभांपेक्षां जास्त मान मिळत असल्याचें दिसून येतें.

अशाप्रकारें तेराव्या शतकांत नॉर्मन अमदानींतील राजदरबाराचें द्विदल लोकसभेंत रूपान्तर झालें. यापुढें चवदाव्या शतकांत व पंधराव्या शतकाच्या पूर्वार्धांत या दोन्हीं दळांनीं व विशेषतः प्रतिनिधि सभेनें आपली पुष्कळ अधिकारवृधि करून घेतली. प्रतिनिधिसभेची उत्पत्ति खरोखर राजांना लागलेल्याद्रव्याच्या गरजेंत आहे. तेराव्या शतकापर्यंत राजेलोकांचा बहुतेक खर्च सरदार लोकांकडून येणारा नजराणा, कांहीं परंपरागत कर व खाजगी जमिनी व गांवें यांचें उत्पन्न, एवढ्यांत भागत असे; परंतु तेराव्या शतकापासून राज्यकारभाराचा खर्च वाढत चालला व चवदाव्या शतकांत एकसारखीं युद्धें उपस्थित होत गेलीं. यामुळें राजांना अधिक द्रव्याची गरज भासू लागली. इ. स. १३४० पासून १४४० पर्यंत इंग्लिश राजे फ्रान्स देश काबीज करण्याचा उद्देशानें त्या देशांशीं एकसारखे लढत होते. या युद्धासच "शतसांवत्सरिक युद्ध" (Hundred Years war) असें इंग्लंडचें इतिहासकार म्हणत असतात. या काळांत प्रतिनिधिसभेची व त्याच बरोबर एकंदर लोकसभेची सत्ता फारच वाढली. त्यांतून दुसऱ्या रिचर्डच्या राज्यांत राज्यक्रांति होऊन त्याला पदच्युत करून चवथा हेन्री गादीवर आला व त्याला लोकसभेनें पाठिंबा दिला. यामुळें चवथा हेन्री गादीवर असतां लोकसभेला खूष ठेवणें त्याला अवश्यच झालें. चवथा हेन्री व पांचवा हेन्री यांच्या अमदानींत लोकसभेच्या हातीं राज्यांतील बहुतेक कारभार येत चालला होता. चवथा

प्रतिनिधी सभेची व लोकसभेची अधिकारवृद्धि. इ. स. १३०७ ते १४४५

हेन्री आपले मंत्रि लोकसभेच्या अनुमतीनेंच नेमीत असे. पांचव्या हेन्रीच्या मृत्यूनंतर सहावा हेन्री अज्ञान असतां, राज्यकारभार करणारें एक मंडळ लोकसभेनेंच नेमिलें होतें. अशा प्रकारें चवदाव्या शतकांत व पंधराव्या शतकाच्या पूर्वार्धांत लोकसभेचें प्रस्थ बरेंच माजून तिला पुढील हक्क प्राप्त झाले होते. (१) कायदे करणें, (२) करांना संमति देणें, आणि (३) राज्यकारभार करणाऱ्या मंत्र्यांवर ताबा ठेवणें व कित्येक प्रसंगीं त्यांची नेमणूकही करणें. याशिवाय सरकारी जमाखर्च तपासून ज्या कार्यांकरितां खर्च मंजूर केला आहे तिकडेच तो खर्च होतो किंवा नाहीं हें पाहण्याचाही अधिकार लोकसभेला मिळालेला होता. यांपैकीं कायदे करणें व करांना अनुमती देणें, हे अधिकार मुख्यत्वें प्रतिनिधिसभेला प्राप्त झाले होते.

एका दृष्टीनें लोकसभेला इतक्या थोड्या अवधींत इतकी सत्ता प्राप्त झाली, हें अनिष्ट झालें असें म्हणणें भाग आहे. राजकीय दृष्ट्या

देशांतील यादवी आणि क्षात्रयुगाचा अंत १४४५ ते १४८५

लोकसभेची सत्ता वृद्धिंगत होत असतां सामाजिक दृष्ट्या देशांत सरंजामी सरदारांचें वर्चस्व वाजवीपेक्षां फाजील वाढत होतें. त्यांना ताब्यांत ठेवून देशाचा कारभार करण्यास प्रबल राजसत्तेची अत्यंत आवश्यकता होती. लोकसभेच्या हातीं राज्यकारभार आला असतां ही गोष्ट घडून येणार नव्हती. समाजांत एकाच वर्गाचें विशेष प्राबल्य असलें म्हणजे लोकसभा त्याचें पारिपत्य करूं शकत नाहीं, तर उलट तो वर्गच ती बळकावून बसतो. थोड्याच काळांत या सरंजामी सरदारांचें दोन तट पडून त्यांच्यांत उघड युद्ध सुरू झालें व सुमारें तीस वर्षे देशांत अंदाधुंदी माजून राहिली. या यादवीलाच "गुलाबांचें युद्ध" War of the roses असें म्हणतात व या युद्धांत इंग्लंडांतील सरंजामी सरदारांची बहुतेक घराणीं धुळीस मिळालीं. यानंतर सरंजामी सरदारांनीं पुनः कधींच डोकें

वर काढलें नाहीं. १४८५ मध्यें टयूडर घराण्यांतील सातवा हेन्री गादीवर आला व त्यानें देशांतील सर्व सरदारांचा पाडाव करून देशांत पुनः शांतता प्रस्थापित केली.

पंधराव्या शतकाच्या अखेरीपासून सतराव्या शतकाच्या प्रारंभापर्यंतच्या काळांत टयूडर घराण्यांतील लोक इंग्लंडच्या गादीवर होते. स्थूल मानानें याला सोळावें शतक म्हणण्यास हरकत नाहीं. या शतकांत इंलंडला आर्वाचीन स्वरूप प्राप्त झालें. इंग्लिश लोकांनीं व राजांनीं प्रॉटेस्टंट धर्म स्वीकारून आपल्या राज्यांतील धर्माधिकारी व धर्मसंस्था यांच्यावरील पोपचें वर्चस्व काढून टाकून त्यांवर राष्ट्रीय सरकाराचें वर्चस्व प्रस्थापित केलें. देशांतील सरंजामी सरदारांचा वर्ग नामशेष करून टयूडर राजांनी व्यापाऱ्यांच्या मध्यम वर्गाला पुढें आणिलें. युरोपांत राज्यवृद्धि करण्याचें ध्येय कायमचें सोडून देऊन अमेरिका व आशिया, या खंडाशीं व्यापार करून राष्ट्रीय संपत्ति वाढविण्याचें नवें ध्येय त्यांनीं पतकरिलें. तात्पर्य टयूडर अमदानीचा काळ हा राज्यघटनेंत सुधारणा होण्याचा काळ नसून सामाजिक व धार्मिक सुधारणेमुळें राष्ट्राच्या इतर अंगांच्या घटनेंत सुधारणा होण्याचा काळ होता. हें कार्य घडून येत असतां राष्ट्राला प्रबल शास्त्यांची गरज होती व ती गरज सातवा हेन्री, आठवा हेन्री व एलिझाबेथ राणी यांनीं उत्तम प्रकारें भागविली असें म्हणण्यास हरकत नाहीं. या सर्वांनीं अनियंत्रित राजसत्ता उपभोगिली, परंतु त्यांनीं लोकसभेची संस्था उन्मूलन करण्याचे प्रयत्न केले नाहींत, किंवा तिच्या परंपरागत हक्कांचा उघडपणें उच्छेद केला नाहीं. सोळाव्या शतकांत सरंजामदारांचा वर्ग हतबल झालेला असून व्यापारी वर्ग अद्यापी सबळ झालेला नव्हता. अशावेळीं लोक-

टयूडर घराण्याचा अनियंत्रित अमल व सामाजिक आणि धार्मिक सुधारणा इ. स. १४८५ ते १६०३

सभा नष्ट करणें किंवा तिचे महत्त्वाचे हक्क काढून घेणें ट्यूडर राजांना शक्य होतें, परंतु त्यांनीं तसें न करितां लोकसभेमार्फत आपणांस ज्या गोष्टी हव्या होत्या त्या करून घेतल्या. त्या सभेंत आपलें म्हणणें मान्य करतील असे लोक निवडून यावेत याबद्दल त्यांनीं प्रयत्न केले, व्यापारी शहरांच्या प्रतिनिधींची संख्या वाढविली, कर बसविण्याशिवाय इतर उपायांनीं पैसा गोळा केला, आपणास वाटतील तसले जुल्मी कायदे लोकसभेकडून पास करून घेतले, परंतु कर बसविणें व कायदे करणें, या लोकसभेच्या दोन महत्वाच्या हक्कांवर त्यांनीं उघडपणें हल्ला केला नाहीं व ती संस्था जिवंत ठेविली. याबद्दल ट्यूडर राजाराणींचे इंग्लिश लोकांनीं उपकार मानिले पाहिजेत. सामाजिक व धार्मीक संक्रमणाच्या काळांत देशांत प्रबल राजसत्ता राखून परंपरागत संस्था व त्यांचें हक्क, हें स्वरूपतः तरी कायम ठेविले, ही ट्यूडर घराण्यांची कामगिरी काहीं कमी नाहीं. तसेंच सामाजिक व धार्मिक बाबतींत पुरोगामी धोरण स्वीकारून राष्ट्राच्या उत्क्रांतीला मदत केल्याबद्दलही त्या राजकारणाचे आभार इंग्लिशांनीं मानले पाहिजेत. एक शतकाच्या ट्यूडर अमलानंतर इंग्लिश राष्ट्र सुसंघटित व प्रबल बनलें यांत शंका नाहीं.

लोकसभेचा राजांशीं तंटा व लोकसभेचा विजय. लोकनियंत्रित राजसत्तेची स्थापना इ. स. १६०३ ते १६८८

सतराव्या शतकाच्या प्रारंभाला स्टयूअर्ट घराण्यांतील राजे गादीवर आले आणि तेव्हांपासून लोकसभा व राजे यांच्यांत जो तंटा सुरू झाला तो १६८८पर्यंत टिकला. १६८८मध्यें दुसऱ्या जेम्सला गादीवरून काढून त्याची मुलगी मेरी व जावई विल्यम यांस लोकसभेनें गादी दिली व यावेळे-पासून कायदे करणें व कर मंजूर करणें हे दोन हक्क लोकसभेला कायमपणें मिळाले असें म्हणण्यास हरकत नाहीं. ज्यावेळीं स्टयुअर्ट राजे गादीवर आले त्यावेळींही हे हक्क पार्लमेंटला आहेत अशी सर्वांची समजूत होतीच. परंतु या बाबतींत थोडा संदिग्ध-

पणा उरलेला होता. उदाहरणार्थ करांना मंजुरी पार्लमेंटनें दिली पाहिजे, हें राजांनाही मान्य असलें तरी जकाती व युद्धाच्या प्रसंगीं समुद्राकिनाऱ्यावरील शहरांकडून 'शिपमनी' या नांवानें जो पैसा जमा केला जात असे, तो कर या सदरांत येतो किंवा नाहीं व त्याच्या वसुलीला लोकसभेची संमति घेणें अवश्य आहे किंवा नाहीं, याबद्दल शंका होती. इ. स. १६०६ मध्यें 'बेट' नांवाच्या व्यापाऱ्यानें राजानें लोकसभेच्या परवानगीशिवाय वाढविलेल्या जकातीचें पैसे देण्याचें नाकारलें, तेव्हां त्याचा खटला कोर्टात जाऊन बेटच्या विरुद्ध निकाल झाला. तसेंच पहिला चार्लस व लोकसभा यांच्यांत तंटा होऊन लोकसभेनें पैसा मंजूर केला नाहीं, तेव्हां त्यानें "शिपमनी" वसूल करण्यास हुकूम दिला. तो हुकूम जॉन हॅमडन यानें मोडून मी "शिपमनी" देत नाहीं असें सांगितलें. याच्यावरही खटला होऊन त्याच्याविरुद्ध निकाल झाला. हे दोन निकाल न्यायाधिशांनीं राजांना भिऊन दिले असतील असाही संभव आहे. कारण त्यावेळीं त्यांना वाटेल तेव्हां काढून टाकण्याचा राजांना अधिकार होता. तथापि या बाबतींत थोडी संदिग्धता होती हेंही कबूल करणें भाग आहे. तसेंच कायद्यांच्या बाबतींतहीं थोडें संदिग्धत्व होतें. राजेलोक आपल्या "खास अधिकारांत (Prerogative.) जाहीरनामा काढून लोकसभेनें केलेला एखादा कायदा तहकूब करीत असत, किंवा एखाद्या व्यक्तीवरील खटल्यांत तो लागू करूं नये असा हुकूम देत असत. ज्या व्यक्तीकडे राज्यांचा कारभार करण्याची जबाबदारी असते त्यांना असें "खास अधिकार" असलेच पाहिजेत व ते इंग्लंडच्या राज्यघटनेप्रमाणें राजांना आहेत, असें राजपक्षाचें मत होतें. इ. स. १६८९ मध्यें पार्लमेंटनें "बिल ऑफ राइट्स" या नांवाचा जो कायदा तिसऱ्या विल्यमकडून (दुसऱ्या जेम्सचा जावई) करून घेतला, त्यांत या दोन्ही बाबतींत संदिग्धपणा काढून टाकण्यांत आला होता. "लोकसभेच्या मंजुरीशिवाय

लोकसभेनें ज्या मुदतीनें कराची मंजुरी दिली असेल त्या मुदतीनंतर लोकां-
कडून द्रव्य गोळा करणें किंवा ज्या प्रकाराचें द्रव्य गोळा करण्याची मंजुरी दिली असेल, त्या प्रकाराशिवाय अन्य प्रकारानें, द्रव्य गोळा करणें, " असा खास अधिकार राजांना नाहीं असें स्पस्ट ठरावण्यांत आलें. त्याच-प्रमाणें राजानें आपल्या अधिकारांत लोकसभेनें केलेले कायदे तहकूब करणें किंवा ते एखाद्या खटल्यांत अमान्य करणें, हें अन्याय्य आहे असेंहि ठर-विण्यांत आलें. हे हक्क इतक्या निःसंदिग्ध स्वरूपांत प्राप्त होण्यास लोकसभेला राजाशीं एक शतकपर्यंत सारखा तंटा करावा लागला. हें सतारावें शतक याच दृष्टीनें इंग्लंडच्या इतिहासांत अत्यंत महत्त्वाचें गणलें जातें. या शतकांतच इं-ग्लीश लोकांनीं राजसत्तेला खरा व कायमचा आळा घातला.हें करतांना त्यांनीं वाटेल तो स्वार्थत्याग केला व सनदशीर व बेसनदशीर, कायदेशीर व बेका-यदेशीर, शांततेचे व अशांततेचे सर्व उपाय अमलांत आणिले. भिक्षांदेहीच्या दीन मार्गापासून तो सशस्त्र युद्धाच्या उग्र मार्गापर्यंतचे सर्व प्रयोग त्यांनीं करून पाहिले. याकाळांत लोकसभेनें पहिल्या चार्लसला फासावर चढविलें व दुसऱ्या जेम्सला पदच्युत करून देशांतून पिटाळून लाविलें. याकाळांतच शुद्ध लोकशाहीच्या नांवानें इंग्लंडांत कांहीं काळ क्रॉम्वेलचा लष्करी अंमल चालू होता. क्रॉम्वेलच्या मृत्यूनंतर पुनः दुसऱ्या चार्लसला गादीवर बसविण्यांत आलें. यानंतर दुसरा जेम्स गादीवर आला. तोही पुनः गडबड करूं लागला म्हणून इ० स० १६८८ मध्यें त्याला पदच्युत करून त्याच्या मुलीला व जावयाला (तिसरा विल्यम) राजपद देण्यांत आलें. या घडामोडीस इंग्लीश इतिहासकार राज्यक्रांती असें म्हणतात. १६८८।८९ मधील या राज्यक्रांती-नंतर इंग्लंडांत खरी लोकनियंत्रित राजसत्ता प्रस्थापित झाली.

ज्याप्रमाणें कर लादण्याचा व कायदे करण्याचा अधिकार राजांच्या हातांतून काढून घेण्यासाठीं लोकसभा भांडत होती त्याचप्रमाणें राजा व मंत्रि यांचें न्यायासनावरील दडपण कमी करून न्यायाधीशांचें स्वातंत्र्य

स्थापन करण्याचाही लोकसभेचा इरादा होता व सतराव्या शतकाच्या अखेरीस या कामातही तिला पूर्ण यश प्राप्त झालें.

न्यायाधीशांचें स्वातंत्र्य व नागरिकांची सुरक्षितता.

न्यायासनें राजांच्या अयोग्य दडपणाखालीं असलीं म्हणजे राजांविरुद्ध चळवळ करणाऱ्या लोकांना योग्य न्याय मिळत नाहीं, याचा अनुभव त्यावेळीं लोकांच्या वतीनें भांडणाऱ्या लोकसभेच्या सभासदांना अनेक प्रसंगीं आला होता. सध्या इंग्लंडांतील कोणत्याही व्यक्तीला नेहमीच्या कोर्टांत जाहीर-रीतीनें खटला चालून शिक्षा झाल्याखेरीज कैदेंत ठेवण्याचा कोणासही अधिकार नाहीं. अशी स्थिति टयूडर व स्टयुअर्ट अमदानींत नव्हती. स्टार चेंबर, हाय कमशिन, कौन्सिल ऑफ दी वेल्स मार्शीज, कौन्सील ऑफ दी नॉर्थ वगैरे जादा न्यायासनें राजांनीं स्थापन केलेलीं असून त्यांतील गुप्त चौकशींत शिक्षा झाल्यामुळें पुष्कळ लोकांना तुरुंगांत रखडावें लागत असे. तसेंच एखाद्या व्यक्तीला राजांच्या खास हुकुमावरून बंदींत टाकिलें असल्यास आपली उघड चौकशी करवून घेण्याचाही हक्क त्या व्यक्तीला नाहीं, अशी त्यावेळच्या राजांची समजूत होती. शिवाय वाटेल त्या न्यायासनावरील न्यायाधीशाला वाटेल तेव्हां बडतर्फ करण्याचा अधिकार राजांना असल्यामुळें राजा व प्रजा यांच्यामधील तंटयांत न्यायाधीश निःपक्षपातीपणानें न्याय देत नसत. हीं सर्व गाऱ्हाणीं सतराव्या शतकांत नष्ट होऊन अठराव्या शतकापासून नागरिकांचें व्यक्तिस्वातंत्र्य पूर्णपणें सुरक्षित झालें. १६५१ मध्यें भरलेल्या ‘ लाँग पार्लमेंट ’ नांवाच्या लोकसभेनें सर्व जादा न्यायासनें मोडून टाकिलीं. १६८९ च्या ‘ हीबस कॉर्पस ॲक्टानें ’ कोणीही एखाद्या इसमास बंदींत टाकल्यास आरोपीस न्यायासनापुढें लवकर आणून चौकशी करण्याची व्यवस्था झाली, आणि १७०० मधील “ॲक्ट ऑफ सेटलमेंट” च्या एका कलमान्वयें कोणत्याही कोर्टांतील न्यायाधीशांना बडतर्फ करण्याचा अधिकार राजांकडून काढून घेण्यांत आला. लोकसभेच्या दोन्ही सभांकडून

ठरावाच्या रूपानें मागणी झाल्याशिवाय आतां कोणत्याही न्यायाधीशांस बडतर्फ करतां येत नाहीं.

अठराव्या शतकांत ब्रिटिश राज्यघटनेंत म्हणण्यासारखे फेरफार झाले नाहींत; परंतु त्या शतकांत ब्रिटिश लोकांच्या लोकनियंत्रित राजसत्तेचा सर्व युरोपांत बोलबाला झाला. अठराव्या शतकांत मॉँटेस्क्यु नांवांचा फ्रेंच ग्रंथकार झाला. त्यानें "एस्प्रिट डेस लॉइस" या नांवाचा एक ग्रंथ लिहिला होता, त्यांत ब्रिटिश राज्यघटनेची फार स्तुति केली होती. अठराव्या शतकांपर्यंतचा ब्रिटिश राज्यघटनेचा इतिहास पाहिला असतां तो कायदे करणें, राज्यकारभार करणें, न्याय देणें या राजसत्तेच्या तीन अंगांच्या पृथक्करणाचा इतिहास आहे, असें म्हणतां येईल.[1] प्रारंभीं हीं तीन्ही कार्यें राजाच करीत असे. आतां राजाकडे केवळ राज्यकारभार म्हणजे अंमलबजावणी करण्याचेंच कार्य उरलें होतें. कायदे करणें व कर मंजूर करणें, हें लोकसभेचें कार्य ठरून गेलें होतें; तसेंच न्यायदानाचें कार्य न्यायाधीशांकडे असून त्यांची शेंडी राजाच्या हातून काढून घेण्यांत आली होती, मॉँटेस्क्यु यानें राजसत्तेच्या तीन अंगांच्या पृथक्करणाच्या तत्त्वाची फारच स्तुति केलेली आहे. ज्या देशांत यांपैकीं

मॉँटेस्क्यूचीं मतें.

1 "It would indeed be hardly an exaggeration to say that the history of political institutions in England is the history of the differentiatians of the functions of the legislature, the executive and the judiciary," Marriot. "English political Institutions" p. 44 हा सिद्धांत अठराव्या शतकापर्यंतच्या इतिहासासच मुख्यतः लागू आहे.

कोणतींहि दोन अंगें एका व्यक्तीच्या किंवा संस्थेच्या हातीं असतील,तेथील राज्यघटना कशीहि असली, तरी नागरिकांना खरें स्वातंत्र्य मिळणार नाहीं, असें त्याचें मत आहे, तसेंच ब्रिटिश लोकांच्या द्विदळ लोकसभेचीहि त्यानें वाखाणणी केलेली आहे, कायदे करणारी व कर मंजूर करणारी लोकसभा द्विदळ असून त्यांतील एका सभेंत देशांतील सरदार व धनिक लोक असले, म्हणजे दुसऱ्या, सामान्य लोकांच्या प्रतिनिधीसभेवर दाब राहून धनिकांच्या संपत्तीला धक्का पोहोचण्याची भीति नसते, असें तो समजतो. मॅंटेस्क्यूच्या ग्रंथांमुळें आपली राज्यघटना सर्वोत्कृष्ट आहे अशी अठराव्या शतकांतील इंग्लिशांची समजूत झाली होती.

इंग्लिश लोकांनीं आपल्या राज्यघटनेंत वेळोवेळीं ज्या सुधारणा केल्या, त्या कोणत्याही सर्वसामान्य तात्त्विक सिद्धांतावरून केल्या नव्हत्या.

इंग्लिश लोकांचा मोठेपणा.

आपल्या परंपरागत रूढींत फेरफार करून नवे कायदे व कर लादण्याचा राजाला अधिकार नाहीं, आणि राजानें आपल्या रूढींना धरूनच आपणांस न्याय दिला पाहिजे, या राजधर्माच्या कल्पनेवर त्यांचा सर्व भर होता, हें मागें दिलेंच आहे. तसेंच आमच्या राजधर्मांच्या ज्या कल्पना आहेत,त्याहून इंग्लिशानीं कोणत्याही नव्या कल्पना शोधून काढलेल्या नाहींत, हेंही दाखविलें आहेच. इंग्लिशलोकांचें माहात्म्य नवीन तात्त्विक सिद्धांत शोधून काढण्यांत नसून आपल्या परंपरागत कल्पनांना कालानुरूप स्वरूप देऊन त्यांची अंमलबजावणी करण्यांत आहे. त्यांनीं हर प्रयत्न करून आपली राजधर्मांची कल्पना व्यवहारांत आणिली व आमचा राजधर्म पोथ्यापुराणांतच राहिला, यावरून त्यांचें व्यवहारनैपुण्य सिद्ध होतें. त्याचबरोबर इंग्लिश राज्यघटनेची मूलभूत तत्त्वें, विशेषतः त्यांचें "कायद्यांच्या राज्याचें" तत्त्व आम्हास अपरिचित नाहीं, हेंही ध्यानांत ठेविलें पाहिजे. आमची धर्मराज्याची व राजधर्मांची, कल्पना त्यांनीं मूर्त-

स्वरूपांत आणिली असें म्हटलें तर फारशी अतिशयोक्ति होणार नाहीं.

अठराव्या शतकांत लोकसत्तेचें तत्त्व व लोकशाहीची राज्यघटना, यांचा उदय झाला. त्याचें श्रेय अमेरिकन व फ्रेंच लोकांना आहे. लोक-नियंत्रित राजसत्ता स्थापन करण्याचें श्रेय इंग्लिशांना आहे; तसेंच याच घटनेचें पुढें लोकसत्ताक राजशाहींत कसें रूपान्तर करावें हेंही त्यांनीं एकोणिसाव्या शतकांत दाखवून दिलें आहे. पण त्याचा विचार करण्यापूर्वी आर्वाचीन काळांत लोकसत्तेचें पुनरुज्जीवन करणाऱ्या अमेरिकन व फ्रेंच लोकांच्या राजकीय इतिहासाची थोडी माहिती दिली पाहिजे.

प्रकरण ८ वें.

लोकसत्तेचा उद्भव व प्रसार

" The real soveraign is the peple. " Rowsseau.

अठराव्या शतकांतील विचारक्रांति.

सोळाव्या शतकापसून भौतिक शास्त्रांत पाश्चात्य युरोपियनांचें पाऊल पुढें पडत होतें. भौतिकशास्त्रांतील नव्या शोधांमुळें लोकांच्या विचारांत फरक पडूं लागला होता व त्याचीं फळें अठराव्या शतकापासून परिपक्क होऊं लागलीं. तसेंच युरोपियन लोकांचा अनेक प्रकारच्या लोकांशीं व त्यांच्या सामाजिक व धार्मिक आचारांशीं परिचय येऊं लागल्यामुळें सामाजिक व धार्मिक विचारांच्या बाबतींतील त्यांची कूपमंडुक वृत्ति हळूं हळूं पालटूं लागली होती. फ्रान्स देशांत अठराव्या शतकांत बरीच मोठी विचारक्रांति होण्याची स्पष्ट चिन्हें दिसूं लागलीं. व्हाल्टेअर नांवाचा एक स्वतंत्र विचाराचा उत्तम लेखक निघून त्यानें धर्माधिकाऱ्यावर व वेडगळ धर्म समजुतीवर टीका करण्यास सुरवात केली. डिडॅरॉट या नांवाच्या एका विद्वान गृहस्थानें एक मोठा " ज्ञानकोश " प्रसिद्ध करून सामान्य लोकांत नवे विचार प्रसृत करण्याचा उपक्रम आरंभिला. मॉंटेस्क्यू या ग्रंथकारानें राजनीतिशास्त्रावर लिहिलेल्या ग्रंथाचा अभ्यास बऱ्याच लोकांकडून केला जाऊन इंग्लिश राज्यघटनेंतील चांगल्या तत्त्वांची आवड लोकांत उत्पन्न होऊं लागली. रुसो नांवाच्या तत्त्ववेत्यानें " सामाजिक करार " या नांवाचें पुस्तक लिहून सामाजिक समता व लोकसत्ता, या तत्त्वांचा फार जोरांत पुरस्कार केला. फिजिओक्रॅट्स नांवानें एक लेखकसांप्रदाय निघून त्यानें अर्थशास्त्राचा पाया घालण्यास प्रारंभ केला. सारांश अठराव्या शतकांत समाजशास्त्र, अर्थशास्त्र व राजनीतिशास्त्र या विषयांत स्वतंत्र

व नूतन विचार विद्वानांच्या डोक्यांत येऊं लागून त्यांचा जारीनें प्रसार फ्रान्स देशांत होऊं लागला होता.

राजनीतिशास्त्राच्या दृष्टीनें मॉंटेस्क्यु व रूसो या दोन ग्रंथकारांच्या विचारांचाच आपणास विचार करावयाचा आहे. मॉंटेस्क्यूनें राजनीति शास्त्राच्या अभ्यासास ऐतिहासिक पद्धति लागू करून कोणत्याही देशांतील कायदे तेथील राज्यघटनेस अनुरूप असे असले पाहिजेत आणि राज्यघटना त्या देशांतील लोकांच्या इतर परिस्थितीस अनुरूप असली पाहिजे हें तत्त्व पुढें आणिलें. तसेंच लोकसत्ताक राज्यघटना जरी सर्व सामाजिक स्थितींत स्थापन करणें इष्ट नसलें तरी तशा राज्यघटनेमुळें लोकांत सार्वजनिकहितबुद्धि जागृत राहून लोक राष्ट्राभिमानानें इतरांकरितां स्वार्थत्याग करण्यास तयार होतात, म्हणून लोकशाहीची राज्यव्यवस्था ध्येय या दृष्टीनें प्रशंसनीय आहे, असें त्याचें मत दिसून येतें. राज्यांतील कायदे करण्याची सत्ता अंमलबजावणी करणाऱ्या लोकांच्या हातीं असल्यास त्यांचा राज्यकारभार कायद्यांना धरून होत नाहीं, म्हणून ही सत्ता इंग्लंडाप्रमाणें लोकांच्या प्रतिनिधींकडे असून राजांनी लोकप्रतिनिधींनीं केलेल्या कायद्याप्रमाणें राज्यकारभार करावा; तसेंच न्यायखातें अंमलबजावणी खात्याहून स्वतंत्र असेल व त्याला वाटेल तसे कायदे करण्याची सत्ता नसेल, तरच न्यायासनांत योग्य न्याय मिळूं शकेल, वगैरे राजसत्तेच्या तीन अंगांच्या पृथक्करणाचें तत्त्व त्यानें पुष्कळच जोरांत लोकांपुढें मांडिलें. याच्या ग्रंथामुळेंच अठराव्या शतकांतील इंग्लिश राज्यघटनेकडे इतर युरोपियन लोकांचें लक्ष वेधलें. रूसोचें नांव राज्यांतील प्रभुत्व लोकांकडे आहे व सर्व लोक जन्मतः समान दर्जाचे आहेत, या दोन तत्त्वांमुळें प्रसिद्धीस आलें होतें. लोकांच्या प्रभुत्वाचा इतक्या स्पष्ट शब्दांत पुरस्कार रूसोशिवाय इतर कोणत्याही ग्रंथकारानें केलेला नाहीं. देशांतील कायदे राज्यकर्त्यांच्या स्वैर

मॉंटेस्क्यु व रुसो.

इच्छेप्रमाणें केले न जातां, लोकमताला अनुसरून केले जावेत, हा त्याचा सिद्धान्त आज सर्वमान्य झालेला आहे. तसेंच कायदे करण्याची सत्ता नेहमीं लोकांच्याच हातीं असली पाहिजे, हें त्यांचें तत्त्व एका विशिष्ट स्वरूपांत–प्रातिनिधिक स्वरूपांत–सर्वत्र रूढ झालेलें आहे. सर्व सुधारलेल्या व स्वतंत्र देशांत आज लोकांच्या प्रतिनिधींच्याच हातीं देशांतील कायदे करण्याची व कर मंजूर करण्याची सत्ता आहे. तसेंच राज्यकारभार करणारे अधिकारीही लोकाचे नोकर आहेत व त्यांना वाटेल तेव्हां काढून टाकण्याचा अधिकार लोकांना आहे, हें रुसोचें मत निरनिराळ्या राज्यांत निरनिराळ्या स्वरूपांत मान्य करण्यांत आलें आहे. रुसोनें ज्यावेळीं हे विचार लिहून प्रसिद्ध केले, त्यावेळीं एकाहि युरोपियन देशांत लोकशाहीचें अस्तित्व नव्हतें. परंतु त्याच शतकाच्या अखेरीस त्याच्या देशबांधवांनीं लोकशाहीचें निशाण उभारून सर्व युरोपखंड हादरून सोडलें. या फ्रेंच राज्यक्रांतीची माहिती देण्यापूर्वीं आपणास अटलांटिक महासागराच्या पलीकडे जाऊन तेथें अमेरिकेची "संयुक्त संस्थानें" या नांवाचें जें एक लोकशाहीचें नवेंच संयुक्त राज्य अठराव्या शतकाच्या उत्तरार्धांत अस्तित्वांत आलें, त्याची माहिती करून घेतली पाहिजे.

अमेरिकन वसाहतींची राजकीय उत्क्रांति व संयुक्तराज्याची नवी कल्पना.

इंग्लंडांत राजसत्तेचें नियंत्रण करण्याचे प्रयत्न चालले असतांना युरोपियन लोक अमेरिकेंत वसाहती वसवीत होते. अमेरिकेंतील ज्या वसाहतींचा आपणांस विचार करावयाचा आहे, त्या इंग्लिश लोकांनींच वसविलेल्या होत्या. तेथें गेल्यावर त्यांनीं लहान लहान गांवें वसविलीं व त्या गांवांत त्यांनीं इंग्लंडांतील शहरांतल्या स्थानिक स्वराज्याच्या धर्तीवर संस्था स्थापन केल्या. ज्या ठिकाणीं शेतीचा प्रमुख धंदा होता, तेथें लहान लहान खेडीं वसवून इंग्लंडांतील कौंटींतल्यासारख्या संस्थांनीं तीं एकत्रित केलेलीं असत. हळूहळू या शहरांतील

व खेड्यांतील लोकसंख्या वाढून त्यांना लहान लहान राज्यांचें स्वरूप प्राप्त झालें. इंग्लंडांतील ॲंग्लोसॅक्सन लोकांची प्रथम जशीं लहान लहान स्वतंत्र राज्यें असून पुढें तीं एकछत्री राज्यांत समाविष्ट झालीं तशींच हीं अमेरिकेंतील इंग्लिशांनीं स्थापन केलेलीं लहान लहान राज्यें म्हणजे वसाहती कांहीं काळानें एक होऊन त्यांनीं एकछत्री राज्य स्थापन केलें. तथापि इंग्लंडांतील ॲंग्लोसॅक्सन राज्यांच्या एकीकरणांत व अमेरिकेंतील वसाहतींच्या एकीकरणांत एक मोठा फरक आहे. ॲंग्लोसॅक्सन राज्यांचें एकीकरण केवळ शस्त्रबळावर झालेलें होतें,परंतु अमेरिकेंतील इंग्लिश वसाहती इंग्लिशांच्या साम्राज्यांतून फुटून निघाल्यावर स्वेच्छेनें स्वसंरक्षणार्थ एकरूप झाल्या असल्यामुळें त्यांचें एकीकरण संमिश्र स्वरूपाचें झालें. इंग्लंडांत एकछत्री अंमल सुरू झाल्यावर पूर्वींच्या ॲंग्लोसॅक्सन राज्यांचा मागमूसही राहिला नाहीं. तशी स्थिति अमेरिकेंत न होतां अमेरीकेंतील पूर्वींच्या वसाहतींचीं राज्यें अद्यापि “ संयुक्त संस्थानें ” या संयुक्तराज्याची पोटराज्यें म्हणून हयात आहेत. तेथील लोकांनीं ज्यावेळीं “ संयुक्त संस्थानें ” हें राज्य स्थापन केलें तेव्हां एकीकरणास अगदीं अवश्य तेवढेच अधिकार संयुक्त संस्थानच्या संयुक्त सरकारला देऊन बाकीचे सर्व अधिकार संस्थानी सरकारकडे—पूर्वींच्या वसाहतींकडे—पूर्ववत् राखून ठेविले. यामुळें राज्यांतील सर्व प्रभुत्व केवळ संयुक्त सरकारकडे न जातां तें संयुक्त सरकार व संस्थानी सरकारें यांच्यांत विभागलें गेलें. संयुक्त सरकार जसें आपल्या अधिकारक्षेत्रांत स्वातंत्र्य उपभोगितें तसें आपल्या अधिकारक्षेत्रांपुरतें पूर्ण स्वातंत्र्य संस्थानी सरकारासही आहे; त्यांत संयुक्त सरकारास केव्हांही हात घालतां येत नाहीं. या प्रकारच्या राज्यघटनेस “ संयुक्त राज्यघटना ” (Federal Constitution) असें म्हणतात व ही अमेरिकेंतच प्रथम निर्माण झाली. अशा प्रकारची राज्यघटना अलीकडे स्वीट्झर्लंड, जर्मनी, अस्ट्रेलिया, कानडा, दक्षिण आफ्रिका वगैरे ठिकाणीं चालू आहे.

इंग्लिश व अमेरिकन राज्यघटनेंतील दुसरा फरक म्हणजे अमेरिकेची राज्यघटना लेखी आहे, तशी इंग्लंडची नाहीं. अमेरिकेंतील वसाहती इंग्लिश व्यापाऱ्यांनीं वसविल्या होत्या. या व्यापारी लोकांना इंग्लंडच्या राजांकडून मिळालेल्या सनदांत तेथील राज्यव्यवस्थेचे नियम लिहिलेले असत. अशा सनदा कित्येक वेळां व्यापारी कंपन्यांना मिळत असत, तर त्या कित्येक वेळां एखाद्या व्यक्तीलाही मिळत असत. व्यक्तीच्या मालकीच्या

लेखी राज्यघटना. सामान्य कायदे व घटनात्मक कायदे यांतील भेद.

वसाहतींतील लोकांना त्यांचे मालक राजाप्रमाणेंच राज्यव्यवस्थेचे नियम घालून देत असत. यामुळें इतर कायद्यांत ज्याप्रमाणें सुधारणा करण्याचा अधिकार वसाहतींतील लोकांना हळू हळू मिळत गेला, तसा या राज्यव्यवस्थेच्या नियमांत दुरुस्त्या करण्याचा अधिकार त्या लोकांना मिळाला नाहीं. यामुळें राज्यघटनेचे नियम इतर कायद्यांप्रमाणें सहज बदलले जाऊं नयेत व ते सर्व एकत्र लिहिलेले असावेत, हे विचार अमेरिकन लोकांच्या परिचयाचे झालेले होते. पुढें संयुक्त राज्यघटना तयार करतांना त्यांना या विचारांचा पुष्कळ उपयोग झाला. ती राज्यघटना तयार करतांना सामान्य कायदे व घटनात्मक कायदे असा भेद करून त्यांत सुधारणा करण्याच्या पद्धतींतही भेद करून ठेविला. संयुक्त सरकार व संस्थानी सरकारें यांना केवळ सामान्य कायद्यांत फेरफार करतां येतात. परंतु घटनात्मक (coislitutional laws) कायद्यांत सुधारणा करावयाची झाल्यास त्याला निराळी व्यवस्था केलेली आहे. इंग्लंडांत सामान्य कायदे व घटनात्मक कायदे यांच्यात अशा प्रकारचा भेदही नाहीं व घटनात्मक कायदे या शब्दप्रयोगाचा अर्थही इंग्लंडांत निराळा केला जातो.

अठराव्या शतकाच्या उत्तरार्धांत तिसरा जॉर्ज इंग्लंडच्या गादीवर असतां, या वसाहती इंग्लिश अमलांतून स्वतंत्र झाल्या. त्यावेळपर्यंत या

वसाहतींतील पूर्वींची राज्यव्यवस्था.

वसाहतींपैकीं प्रत्येकींत इंग्लंडांतील पार्लमेंटा-सारख्या लोकसभा अस्तित्वांत आलेल्या होत्या. ज्या तेरा वसाहतींनीं प्रथम इंग्लिशांचें प्रभुत्व झुगारून दिलें, त्यांत पुढील स्वरूपाच्या राजकीय संस्था अस्तिवात होत्या. (१) अंमलबजावणी खात्याचा मुख्य अधिकारी गव्हर्नर. याची नेमणूक कांहीं ठिकाणीं राजांकडून होत असे व कांहीं ठिकाणीं त्या त्या वसाहतींच्या खाजगी मालकांकडून होत असे. (२) लोक-नियुक्त प्रतिनिधींचीं कायदेमंडळें. (३) गव्हर्नरानें नेमलेलें अंमलबजावणीचें अधिकारी व न्यायाधीश. (४) या शिवाय स्थानिक स्वराज्याच्या संस्था सर्वत्र होत्या. कायदे करणें, न्याय देणें व राज्यकारभार करणें, हीं कार्यें करणाऱ्या पृथक संस्था होत्या, हें वरील वर्णनावरून दिसून येईल. वसाह-तींतील न्यायासनावर इंग्लंडांत अपीलें जात असत. दोन वसाहतींत गव्ह-र्नर्स लोकनियुक्त असत व त्या संस्थानांना " स्वयंशासित वसाहती" असें म्हणत असत. तथापि त्यांच्यावरही इंग्लिश राजांचें प्रभुत्व होतेंच. खाजगी वैयक्तिक मालकीच्या वसाहती हळू हळू राजांच्या हाताखालींच गेलेल्या होत्या.

यावेळची इंग्लिश राज्यकर्त्यांची वसाहती संबंधीची वृत्ति व हल्लींची वृत्ति यांत जमीनअस्मानाचें अंतर आहे.

इंग्लंडचें वसाहती-संबंधींचें जुनें धोरण व अमेरिकन लोकांच्या स्वातंत्र्याचा जाहीरनामा.

त्यावेळीं इंग्लंडांतील व्यापारी व धंदेवाईक लोकांच्या हितांकडे लक्ष देऊन वसाहतींचें नियमन केलें जात असे. वसाहतींनीं इंग्लंडला कच्चा माल पुरवावा, इंग्लंडचा पक्का माल विकत घ्यावा, आपण उद्योगधंदे काढून पक्का माल बनवूं नये, इतर देशांशीं व्यापार ठेऊं नये, असे त्या वेळचें इंग्लंडचें धोरण होतें. हें धोरण फार काळ टिकणें शक्य नव्हतें. इंग्लिश लोकसभेनें आपणावर कर बसवूं नयेत व आपल्या व्यापाराचें नियमन करूं नये, असे विचार त्या

विचारक्रांतीच्या काळांत अमेरिकन वसाहतवाल्यांच्या डोक्यांत येण्यास फार काळ लागला नाहीं. तिसऱ्या जॉर्जच्या कारकीर्दीत उत्तर अमेरिकेंतून फ्रेंच लोकांचें बहुतेक उत्थापन झाल्या बरोबर आपणास आतां कोणी जवळचा शत्रु उरला नाहीं, असें पाहून या वसाहतींना इंग्लंडपासून मिळणाऱ्या संरक्षणाची तितकी जरूरी भासेना. अर्थात् इंग्लिश राजानें जेव्हां त्यांच्यावर नवे कर बसविण्याचा प्रयत्न सुरू केला तेव्हां त्यांनीं एकत्र होऊन इंग्लंड विरुद्ध उघड युद्ध पुकारलें. ता. ४ जुलै १७७६ या दिवशीं सदरील तेरा वसाहतींच्या प्रतिनिधींची एक काँग्रेस भरली व तिनें एक "स्वातंत्र्याचा जाहीरनामा" काढला. त्यांतील "सर्व मनुष्यें परमेश्वरानें समान दर्जाची निर्माण केलेलीं आहेत, प्रत्येक व्यक्तिमात्राला कांहीं जन्मसिद्ध व ईश्वरदत्त हक्क आहेत, स्वातंत्र्य व सुखोपभोग हे सर्वांचे जन्मसिद्ध हक्क आहेत, हे हक्क उपभोगिण्या करितांच मनुष्यांनीं शासनसंस्था निर्माण केल्या आहेत, प्रजेच्या संमतींतूनच सरकारच्या सर्वमान्य हक्कांची उत्पत्ति होत असते, जेव्हां कोणत्याही सरकारची घटना या ध्येयांना विरोधी होऊं लागते तेव्हां ती घटना बदलणें किंवा तें सरकार नष्ट करणें, हा प्रत्येक राज्यांतील लोकांचा हक्क आहे, अशा वेळीं आपल्या संरक्षणास व सुखवृद्धीस पोषक अशा तत्त्वावर नव्या शासन संस्थांची उभारणी व संघटना करणें, हाही त्यांचाच हक्क आहे" वगैरे मजकूर वाचला म्हणजे त्यावेळच्या अमेरिकन लोकांवर फ्रान्सांत प्रसार पावत असलेल्या लोकसत्तेच्या नव्या तत्त्वांचा किती परिणाम झालेला होता, हें स्पष्ट दिसून येतें.

युद्धास आरंभ झाल्यानंतर थोड्याच काळांत इंग्लंडचा पराभव करून वसाहती स्वतंत्र झाल्या. यानंतर सदरील तेरा वसाहतींनीं आपलें एक राज्य बनविण्याचा निश्चय करून त्याची राज्यघटना बनविण्यासाठीं इ.स. १७८७ मध्यें एक सर्व वसाहतींतील सुप्रसिद्ध अशा पंचावन्न मुत्सद्यांची एक सभा भरविण्यांत आली होती. या पंचावन्न सभासदांत—ऱ्होड आयलंड

संयुक्त सरकारच्या घटनेचें सामान्य स्वरूप व तिची मूलभूत तत्त्वें.

नांवाच्या वसाहतीखेरीज सर्व वसाहतींचे प्रतिनिधी होते. या पंचावन्न प्रतिनिधींच्या सभेनें चारपाच महिन्यांत संयुक्त राज्यांची घटना तयार केली व ती निरनिराळ्या वसाहतींकडे पाठविली. पुढें ती सर्वांनीं मजूंर केल्यावर "संयुक्त संस्थानें" (United states of America) नांवाचें राज्य अस्तित्वांत आलें. या राज्याला संयुक्तराज्याचें स्वरूप देऊन पूर्वींच्या वसाहतींना त्याचीं पोट राज्यें बनविण्याशिवाय त्यांना दुसरा मार्गच नव्हता;कारण त्या वसाहतींना जरी संरक्षणाकरितां आपलें एक राष्ट्र बनावें अशी इच्छा होती, तरी त्या आपलें पूर्वींचें स्वातंत्र्य सर्वस्वी गमावण्यास तयार नव्हत्या. या प्रतिनिधींनीं ज्यावेळीं राज्यघटना तयार केली, त्यावेळीं त्यांनीं पोट राज्यांचें अस्तित्व गृहीत धरलें असल्या कारणानें त्यांना जें संयुक्त सरकार नवें बनवावयाचें होतें, त्याच्या घटनेंत इतर राज्यांतील सरकारांच्या सर्व कार्यांची तरतूद करण्याचें कांहीं प्रयोजन नव्हतें. जीं कार्यें पोटराज्यांकडून—संस्थानी सरकारकडून—पार पाडणें शक्य नव्हतें किंवा राष्ट्रैक्याच्या व सुरक्षिततेच्या दृष्टीनें इष्ट नव्हतें, तेवढीं कार्यें करण्याकरतांच त्यांनीं संयुक्त सरकार निर्माण केलें होतें. या कार्यांपैकीं (१) परराष्ट्रीय संबंध, तहनामे, युद्ध वगैरे बाबी, (२) लष्कर व आरमार (३) संयुक्त सरकारचें न्यायदान (४) व्यापार –संस्थानासंस्थानांतील व परराष्ट्रीय (५) नाणीं, (६) पोस्ट व रस्ते (७) वरील कार्यें करण्यासाठी करग्रहण (८) संस्थानी सरकारच्या अन्याय्य कायद्यांपासून नागरिकांचें संरक्षण; हीं कार्यें प्रमुख होतीं. याकरितां अगदीं नव्या संस्था त्यांना निर्माण करावयाच्या होत्या. तसें करतांना त्यांना इंग्लंडची राज्यघटना व मूळच्या वसाहतींच्या घटना,यांच्या अनुभवाचा पुष्कळ उपयोग होणें साहजिक होतें. तसेंच ब्लॅक्स्टन माँटेस्क्यू वगैरे ग्रंथकारांचीं इंग्लंडच्या राज्यघटनेची स्तुतिपर वर्णनेंही त्यांच्या नजरेपुढें होती. शिवाय

रुसो टॉमस पेन वगैरे तात्त्विक राजनीतिज्ञांनीं प्रजास्वातंत्र्य, लोकसत्ता वगैरे विषयांवर प्रसृत केलेले अभिनव विचारही त्यांच्या डोक्यांत खेळत असले पाहिजेत. त्यांना संयुक्त सरकारच्या घटनेंत एकंदर चार गोष्टी साध्य करावयाच्या होत्या, असें ब्राईस या ग्रंथकाराचें मत आहे. त्या चार गोष्टी अशा (१) संयुक्त सरकार जोमदार व कार्यक्षम बनलें पाहिजे. (२) त्याचें स्वरूप कायम टिकावें याकरितां त्याचीं सर्व खातीं स्वतंत्र असलीं पाहिजेत. (३) त्याच्यावर लोकांचें प्रभुत्व असलें पाहिजे आणि (४) नागरिकांचें व्यक्तिस्वातंत्र्य सुरक्षित राहिलें पाहिजे. पहिला हेतु साध्य करण्यासाठीं त्यांनीं अंमलबजावणी खात्याची जोमदार व स्वतंत्र संघटना केली. दुसरा हेतु सिद्धीस नेण्याकरितां त्यांनीं कायदे करणें, न्याय देणें व अंमलबजावणी करणें हीं कार्यें पृथक करून तीं निरनिराळ्या संस्थांच्या हवालीं केलीं. या योगानें त्यांचा नागरिकांच्या स्वातंत्र्याच्या सुरक्षिततेचाही प्रश्न बराच सुटला. तिसरा म्हणजे सर्व खात्यांवर लोकांचें पूर्ण प्रभुत्व चालावें हा हेतु तडीस न्यावा म्हणून त्यांनीं सर्व अधिकारी व अधिकृत संस्था लोक-नियुक्त बनविल्या व त्यांच्या निवडणुकी थोड्याच मुदतीनें पुनः पुनः व्हाव्यात अशी व्यवस्था केली. नागरिकाच्या स्वातंत्र्याचा चवथा हेतु बहुतांशीं राज-सत्तेच्या अंगांच्या पृथक्करणानें सिद्ध झालाच होता. परंतु तेवढ्यावर समाधान न मानतां नागरिकांना कांहीं हक्क राज्यघटनेच्या कायद्यानेंच देऊन टाकून त्यांचा अपहार संयुक्त किंवा संस्थानी सरकारांनीं करूं नये अशी व्यवस्था केली. संयुक्त सरकारची घटना वरील तत्त्वांना धरून त्यांनीं पुढीलप्रमाणें बनविली आहे. (१) कायदे करण्याची व कर-बसविण्याची सर्व सत्ता कॉंग्रेस नांवाच्या लोक-सभेकडे दिलेली असून तिचें स्वरूप द्विदळ बनविलें आहे, त्या दळांना सीनेट (महाजन-सभा) व " हाऊस ऑफ रेप्रेझेंटेटिव्हज् " (प्रतिनिधी सभा) अशीं नांवें दिलेलीं आहेत. प्रतिनिधी सभेची दर दोन वर्षांनीं निवडणूक होत असते व तींत

निरनिराळ्या संस्थांनातून लोक-संख्येच्या प्रमाणांत लोकनियुक्त प्रतिनिधी
येत असतात. महाजन सभेंत प्रत्येक संस्थानचे दोन दोन सभासद अस-
तात. (२) अंमल बजावणी व राज्यकारभार याची सर्व सत्ता
" राष्ट्राध्यक्ष " नांवाच्या लोकनियुक्त अधिकाऱ्याकडे असते. याची प्रत्येक
चार वर्षांनीं स्वतंत्रपणें निवडणूक होत असते. याच्याच बरोबर एक दुय्यम
राष्ट्राध्यक्ष निवडण्यांत येतो. हा महाजन सभेचा अध्यक्ष असतो व मृत्यु
सारख्या अनपेक्षित कारणानें राष्ट्राध्यक्ष नाहींसा झाला तर तो उरलेल्या
मुदतीपुरतां राष्ट्राध्यक्ष बनतों. मंत्रि, संयुक्त सरकारचे न्यायाधीश व इतर
अधिकारी यांच्या नेमणुका राष्ट्राध्यक्ष करतो व अंमल बजावणीचें व राज्य
कारभाराचें सर्व कार्य करून घेण्याची जबाबदारी त्याच्यावर असते. (३)
न्यायदानाचे कार्य सुप्रीम कोर्ट नांवाच्या श्रेष्ठ न्यायासनाकडे व लोकसभेनें
स्थापिलेल्या इतर दुय्यम न्यायासनाकडे सोंपविलें आहे.

ज्यावेळीं वरील राज्यघटना तयार करण्यांत आली, त्यावेळीं इंग्लंड
देश स्वातंत्र्याचें माहेरघर गणला जात असून तेथील राजसत्तेच्या तीन
अंगाच्या पथक्करणाचें तत्त्व तत्कालीन विद्वानांत
सर्वमान्य झालें होतें. अर्थात् अमेरिकन लोकांनीं
त्या तत्त्वाला आपल्या राज्य-घटनेंत अग्रस्थान
दिलें,हें योग्यच झालें.त्यांनीं हें तत्त्व इंग्लंडच्याही
पुष्कळ पुढें नेलें. इंग्लंडांतील राजांप्रमाणें

या घटनेची तत्कालीन इंग्लिश राज्यघटनेशी तुलना.

आपलें मंत्रि नेमण्याचा त्यांनीं राष्ट्राध्यक्षाला अधिकार दिला होता, तथापि
त्यानें अगर त्याच्या मंत्र्यांनीं लोक-सभेंत ढवळाढवळ करूं नये, म्हणून ते
लोकसभेचे सभासद असूं नयेत असें ठरवून दिलें.यामुळें कायदे करणे व अंम-
लबजावणी करणें, या राजसत्तेच्या दोन अंगांचें कायमचें व त्यावेळच्या
इंग्लिश राज्य-घटनेपेक्षांही अधिक पृथक्करण झालें. इंग्लंडांत अलीकडे पुनः
हीं दोन अंगें एकत्र झालेलीं आहेत; तसें अमेरिकेंत होऊं शकलें नाहीं.

याची माहिती पुढें येईलच. लोकसभेनें केलेला कायदा नामंजूर (Veto) करण्याचा अधिकार राष्ट्राध्यक्षाला इंग्लंडच्या राजाप्रमाणेंच देण्यांत आला आहे, पण तोच मसुदा पुनः दोन्ही सभांनीं दोन तृतीयांस बहुमतानें पसार केल्यास त्याला कायद्याचें स्वरूप प्राप्त व्हावें, असा या नामंजुरीच्या सत्तेवर निर्बंध घातलेला आहे. अंमलबजावणी खात्यांतील अधिकाऱ्याच्या नेमणुका करण्याचा अधिकार राष्ट्राध्यक्षाला दिलेला आहे, तरी त्या कामींही त्यानें महाजन-सभेची संमति घ्यावी, असें ठरविलें असल्यामुळें त्याची ही सत्ता मर्यादित झालेली आहे. न्यायाधीशांचें स्वातंत्र्य सुरक्षित करण्यासाठीं त्यांचा पगार कमी करण्याचा अधिकार कोणास असू नये, त्यांची नेमणूक तहाहयात असावी, त्यांना दुर्वर्तनाबद्दल शिक्षा करावयाची झाल्यास केवळ प्रतिनिधीसभेनें त्यांच्यावर खटला करावा, व तो महाजनसभेपुढें चालावा. असें ठरविण्यांत आलें. या कल्पनाही इंग्लंडच्या राज्यघटनेंतूनच बहुतांशीं घेतलेल्या आहेत. अमेरिकेंतील श्रेष्ठ न्यायासनाचा दर्जा तेथील लोकसभेच्या बरोबरीचा आहे. कारण दोघांचीही उत्पत्ति दोघांनाही मान्य कराव्या लाग॰णाऱ्या घटनात्मक कायद्यांतून झालेली आहे. इंग्लंडांतील लोकसभाशी हवा तसा कायदा अनिर्बंधपणें करूं शकते व तिनें केलेला कायदा इंग्लंडांतील सर्व न्यायासनांना मान्य करावा लगतो, तशी अमेरिकेंत स्थिति नाहीं. तेथील लोकसभेला राज्य-घटनेनें घालून दिलेली मर्यादा ओलांडता येत नाहीं व ती ओलांडून तिनें एखादा कायदा केला तर अमेरिकेची न्यायासनें तो मान्य करीत नाहींत. त्या राज्याची घटना संयुक्त असल्यामुळें अशा व्यवस्थेची जरूरी अमेरिकेला अधिक आहे. ती जरूरी कां भासतें याचें सविस्तर विवेचन सध्या करणें शक्य नाहीं, तें पुढें येईल. कोणत्या कां कारणानें होईना अमेरिकेनें राजसत्तेच्या तीन अंगाच्या पृथक्करणाचें व स्वातंत्र्याचें तत्त्व तत्कालीन इंग्लंडांपेक्षां बरेंच पुढें नेलें, एवढें वरील विवेचनावरून वाचकांच्या ध्यानांत आलें म्हणजे पुरें आहे.

लोकसत्तेचें तत्त्व तर त्याच्या प्रत्येक संस्थेंत अधिक शुद्ध स्वरूपांत प्रतिबिंबित झालेलें स्पष्ट दिसत होतें. इंग्लंडांतील राष्ट्राधिपति हा अनुवंशिक होता व सध्याही आहे, पण अमेरिकेनें आपला राष्ट्राध्यक्ष लोकनियुक्त करून त्याचवेळीं अंमलबजावणी खातेंही लोकांच्या प्रभुत्वाखालीं आणिलें. तसेंच त्याच्यावर खटला करण्याचा कायदेशीर अधिकारही लोकसभेला दिलेला आहे. लोकसभेची घटना त्यांनीं इंग्लंडाप्रमाणेंच द्विदळ स्वरूपाची बनविली होती; पण त्यांची महाजनसभा ही सर्वस्वीं लोकनियुक्त आहे व इंग्लंडची महाजन सभा आनुवंशिक सभासदांची आहे, हें ध्यानांत घेतलें पाहिजे. पुढें एकोणिसाव्या शतकांत इंग्लंडातही निराळ्या स्वरूपांत लोकसत्तेची स्थापना झाली. ही कशी झाली तें सांगण्यापूर्वीं आपणास फ्रेंच लोकांच्या इतिहासाची थोडी माहिती करून घेतली पाहिजे. येथें अठराव्या शतकांतील इंग्लंडच्या राज्य-घटनेशीं अमेरिकेच्या राज्य-घटनेची तुलना केली असतां त्यावेळीं इंग्लंडांत लोकनियंत्रित राजसत्ता नांदत होती व अमेरिकेंत शुद्ध लोकसत्ता स्थापन झाली होती, एवढें ध्यानांत येईल.

इंग्लंडची लोक-नियंत्रित राजसत्ता व अमेरिकेची लोकसत्ताक लोकशाही. (Democratic Republic)

इंग्लिश लोकांच्या इतिहासाचा प्रवाह आणि फ्रेंच लोकांच्या इतिहासाचा प्रवाह हे अगदीं भिन्न स्वरूपाचे आहेत. मध्ययुगांत सरंजामी पद्धति चालू असतां तिचा जितका विकास फ्रान्समध्यें झाला होता, तितका इंग्लंडांत झाला नव्हता. यानंतर अनियंत्रित राज्यसत्तेचा काळ प्राप्त झाला. तेव्हांही फ्रान्समधील राजसत्तेचें स्वरूप इंग्लंडांतील टयूडर अमलांतील

इंग्लिश व फ्रेंच लोकांच्या राजकीय इतिहासांतील विसदृशता.

राजसत्तेच्या स्वरूपापेक्षां अधिक निर्भेळ होतें. पुढें लोक-
सत्तेचें युग प्राप्त झालें, तेव्हांही फ्रान्समध्यें लोकसत्तेची लाट अधिक जोरानें
उसळली व एका शंभर वर्षांच्या अवधींत चारपांच क्रांत्या होऊन इंग्लंड-
पेक्षां अधिक शुद्ध स्वरूपांत तेथें लोकसत्तेची स्थापना झाली. याच्या उलट
इंग्लंडांत कोणत्याही काळीं केवळ सरंजामदार, केवळ राजे किंवा सामान्य
लोक यांच्या हातीं सत्ता असलेली दृष्टीस पडत नाहीं. प्रथमपासून या
तिघांत राजसत्ता विभागलेली दिसत असून क्रमाक्रमानें ती राजांच्या व
समाजांतील श्रेष्ठ वर्गाच्या हातून निघून सामान्य लोकांच्या हातीं आलेली
दिसतें. यामुळें इंग्लंडांतील राजकीय सत्तेचा प्रवाह समाजाच्या शिखरावरून पाय-
थ्यापर्यंत संथपणें वाहत आल्यासारखा भासतो. फ्रेंच लोकांच्या राजकीय सत्तेचा
प्रवाह कधीं एका दिशेस झुकलेला तर कधीं त्याच्या अगदीं उलट दिशेस
झुकलेला, कधीं संथ तर कधीं वेगानें धावणारा, कधीं सपाट मैदानांतून वाहणारा
तर कधीं मोठमोठ्या कड्यावरून उड्या घेणारा, असा बहुविध दृष्टीस
पडतो. या दोन देशांच्या राजकीय इतिहासांत इतका फरक असण्याचें
कारण इंग्लिश व फ्रेंच लोकांच्या स्वभावभिन्नतेंतच आहे असें कांहीं लोक
समजतात. इंग्लिश लोकांची मनोवृत्ति व्यावहारिक आहे. ते केव्हांही एखाद्या
तत्त्वाच्या नादीं लागून आपल्या व्यवहारदक्षतेंत कमीपणा येऊं देत नाहींत.

स्वभावभेद हें या विसदृशतेचें कारण आहे काय ?

यामुळें त्यांच्या संस्था कोणत्याही काळीं प्रचलित
असलेल्या तत्त्वांच्या दृष्टीनें गौण भासत असल्या
तरी त्या व्यवहाराच्या कसोटीस पूर्णपणें उतरतात.
याच्या उलट फ्रेंच लोकांची मनोवृत्ति अव्यवहार्य
परंतु तत्त्वनिष्ठ अशी आहे. ज्यावेळीं जीं
तत्त्वें पुढें येतील त्यांचा मनापासून स्वीकार करून तात्त्विक
विचारांच्या जोरावर देशांतील सर्व संस्थांचें पूर्ण रूपांतर
करावयाचें व पुनः कांहीं काळानें नवीं तत्त्वें पुढें आलीं म्हणजे त्या

संस्था मोडून टाकून दुसऱ्या नव्या संस्था स्थापन करावयाच्या असा फ्रेंच
लोकांचा स्वभावच आहे, असें वरील लोकांचें मत आहे. केवळ राष्ट्रीय
स्वभावभेदावरून या दोन देशांतील ऐतिहासिक उत्क्रांतींतील स्वरूप-
भेदाची उपपत्ति लावणें बरोबर नाहीं, असें आम्हांस वाटतें. अठराव्या शत-
काच्या अखेरीपासून एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंतचा फ्रेंच
लोकांचा व इंग्लिश लोकांचा इतिहास ताडून पाहिल्यास फ्रेंच लोक अस्थिर
व चंचल मनोवृत्तीचे, व्यवहारापेक्षा तत्त्वांकडे विशेष लक्ष्य देणारे असे
दिसतात हें खरें आहे. परंतु त्यांचा स्वभाव असा बनण्यास ऐतिहासिक
कारणें आहेत. ज्यावेळीं सामाजिक किंवा राजकीय संस्था लोकांच्या
विचारांतराबरोबर हळू हळू पालटत जाण्याचा संभव नसतो,
त्यावेळीं समाजांतील व्यवहारदक्ष पुढाऱ्यांच्या हातून नेतृत्व निघून जाऊन
तत्त्वनिष्ठ लोकांच्या हातीं तें येतें. सामाजिक किंवा राजकीय क्रांतीचा हा
काळ असतो. उत्क्रांतीच्या न्यायाप्रमाणें सामाजिक किंवा राजकीय संस्थांचें
रूपान्तर सावकाश होणें अशक्य झालें, म्हणजे राष्ट्राचा जीवंतपणा कायम
राखण्याकरितां क्रांतीच्या जालीम उपा-
याची योजना करावी लागते. राजकीय किंवा

क्रांति व उत्क्रांति.

सामाजिक क्रांतीमुळें प्राणहानि, रक्तपात,
अशांतता, बेबंदशाही, इत्यादि प्रकार कांहीं काळ माजतात व लोकांना
आपल्या जीविताची व वित्ताची सुराक्षितता वाटेनाशी होतें, हें खरें आहे.
रंतु त्याचबरोबर क्रांतीच्या काळांत सत्प्रवृत्तींचाही तितक्याच जोरांत फैलाव
होतो, हेंही विसरून चालणार नाहीं. अन्यायांचा तिटकारा, सत्कार्यासाठीं
आत्मयज्ञ करण्याची तयारी, सामाजिक समतेवरील निष्ठा, लोकसत्तेसारख्या
उच्च तत्त्वांची आवड, सत्य, न्याय, परोपकार वगैरें सत्प्रवृत्तींना क्रांतीच्या-
काळीं जितकें चालन मिळतें, तितकें इतर वेळीं मिळत नाहीं. अशा प्रसगीं
समाजांतलि सर्व लोकांत नवी जागृति, नवा उत्साह व नवें तेज हीं दृग्गो-

चर होऊं लागतात. अशा वेळीं पेटलेल्या वणव्यांत सर्व सामाजिक व्यंगांची राखरांगोळी होऊन नव्या समाजरचनेचा पाया घातला जातो. तात्पर्य क्रांतीचा मार्ग सर्वस्वी विघातक आहे असें म्हणतां येत नाहीं, आणि लोकांचा स्वभाव कसाही असला तरी विशिष्ट परिस्थितींत त्यांना क्रांतीचा अवलंब करावा लागतो. सतराव्या शतकांत व्यवहारदक्ष गणलेल्या इंग्लिश लोकांनीही आपलें नेतृत्व अव्यवहार्य परंतु तत्त्वनिष्ठ प्युरिटन लोकांच्या हातीं देऊन देशांत मोठी क्रांति केली होती, हें इतिहासज्ञास विदित आहेच.

इंग्लिश व फ्रेंच याच्या इतिहासांतील भेदाचीं खरीं कारणें.

इंग्लंडांत ज्याप्रमाणें मध्ययुगांतील राजदरबारांचें लोकसभेंत परिवर्तन होऊन लोकनियंत्रित राजसत्ता अस्तित्वांत आली, तसें फ्रान्समध्यें न होतां तेथें अनियंत्रित राजसत्ता स्थापन झाली याचीं मुख्य कारणें दोन देतां येतील. फ्रान्समधील सामाजिक वर्गांत इंग्लंडाइतकें ऐक्य नव्हतें आणि फ्रान्स हा इंग्लंडाप्रमाणें युरोपखंडापासून अलग नसल्यामुळें त्या देशाला सारखें परचक्राचें भय असतें व त्यामुळें तेथें लष्करी सरदारांचें पहिल्यापासून फारच प्रस्थ माजलें होतें. शिवाय ज्या देशाला परचक्राचें भय जास्त, तेथें राजसत्ता प्रबल असावी अशी लोकांची साहजिक प्रवृत्ति असते. शिवाय इंग्लंडांतील नॉर्मन राजांनीं स्वार्थ-बुद्धीनें सरंजामी सरदारांना दडपून टाकल्यामुळें त्यांचे व मध्यम वर्गाचें ऐक्य लवकरच होऊं शकलें म्हणजे इंग्लंडचें नॉर्मन अमदानींतील पारतंत्र्य हेंही त्यांच्या सामाजिक दार्ढ्यास कारण झालें. कावेबाज परकीय राज्यकर्त्यांचें धोरण समाजांतील श्रेष्ठ वर्गाला खालीं दडपून खालच्या वर्गाला वर ओढण्याचें असल्यामुळें तें सामाजिक ऐक्यास अखेरीस पोषक होऊन हें सामाजिक ऐक्य कांहीं काळानें राजसत्तेच्या नियंत्रणास कारणीभूत होतें, याचा अनुभव सध्या आपल्या इकडे येत आहे. असो; आतां फ्रेंच राजकीय उत्क्रांतीचा थोडा इतिहास पाहूं.

स्टेट्स जनरलचा इतिहास.

इंग्लंडांत ज्याप्रमाणें पहिल्या एडवर्डच्या राज्यापासून पार्लमेंट बोलावण्याचा प्रघात पडला होता, त्याचप्रमाणें फ्रान्समध्येंही इ. स. १३०२ पासून " स्टेट्स जनरल " नांवाची लोकसभा भरविण्याचा प्रघात तेथील राजांनीं ठेविला होता. या लोकसभेमध्यें सरदार, धर्माधिकारी व नगरप्रतिनिधी असे तिन्ही वर्गांचे लोक येत असत; पण या तीन वर्गांत बिलकुल ऐक्य नसल्यामुळें प्रत्येक वर्गांतील लोक आपलें कार्य पृथकपणें करीत व आपल्या वर्गाची राजाकडे काय गाऱ्हाणीं न्यावयाचीं,आपणावरील कोणत्या करांना मंजुरी द्यावयाची याचा विचार पृथकपणें करीत. यामुळें या लोकसभेला इंग्लंडच्या लोकसभेइतकें महत्त्व प्राप्त होऊं शकलें नाहीं. १३०५ पासून १६१४ पर्यंत ही लोकसभा वारंवार भरविली जात असे. याचें कारण या वेळीं राजांना नगर प्रतिनिधींच्या साहाय्यानें सरदारांच्या सत्तेला पाडाव करावयाचा होता. इ. स. १४६९ मध्यें या लोकसभेनें टेल (Taille) नांवाचा जमिनीवर कर बसविण्याचा कायमचा हक्क राजांना देऊन टाकिला. हा कर सरदार लोकांवर बसविला जात नसे; कारण ते लष्करी नोकरीवर जात असत. व हा कर लष्करच्या खर्चाकरितांच बसविण्यांत आला होता. हा कर बसविण्याचा अधिकार मिळाल्यापासून राजांना द्रव्याची पंचाईत पडेनाशी झाली व अर्थात्च लोकसभेचें फारसें कारण उरलें नाहीं. पुढें सरदार लोकांचा लष्करी पेशा नाहींसा झाला तरी त्यांच्यावर हा कर बसविला गेला नाहीं, यामुळें त्यांनींही राजाला विरोध करण्याचें किंवा लोकसभा बोलावण्यास भाग पाडण्याचें सोडून दिलें. १६१४ पर्यंत समाजांतील व्यापारी व लष्करी वर्गांना हतबल करून राजानीं सर्व सत्ता आपल्या हातीं घेतली व येथून पुढें राज्यक्रांतीची स्पष्ट चिन्हें अठराव्या शतकाच्या अखेरीस दिसूं लागेपर्यंत लोकसभेची एकही बैठक बोलाविली नाहीं.

मध्यवर्ती सरकारांत जशी " स्टेट्स जनरल " नांवाची लोकसभा होती त्याचप्रमाणें प्रांतांतही " एस्टेट्स " नांवाच्या लोकसभा होत्या. मध्ययुगांत सरंजामी सरदार या सभा भरवीत असत व अशा सभांच्या हातीं स्थानिक करांना मंजुरी देण्याचा अधिकार होता. राजांनीं आपल्या हातीं राज्यकारभार घेतल्यावर या सभा हळूं हळूं नष्ट होऊं लागल्या.

प्रांतिक लोकसभा व स्थानिक स्वराज्याचा अंत. राजसत्तेचें केंद्रीकरण.

राजांचे अधिकारीच सर्व कारभार स्वैरपणें करूं लागले. या शिवाय निरनिराळ्या शहरांत व कम्यून नांवाच्या खेडयांच्या गटांत स्थानिक स्वराज्याच्या उत्तम प्रकारच्या संस्था होत्या. सरंजामी सरदारांच्या अंदाधुंदीच्या काळांत फ्रान्समध्यें स्थानिक स्वराज्याच्या संस्था जोमांत होत्या; परंतु राजसत्तेच्या वृद्धीबरोबर या स्थानिक स्वराज्याच्या संस्थाही हळूंहळूं मावळल्या. अशा रीतीनें लोकांतील राजकीय चैतन्य अगदीं नष्ट झालें. चवदाव्या लुईच्या कारकीर्दींत राजसत्तेचें पूर्ण केंद्रीकरण झालें. निरनिराळ्या प्रांतावर नेमलेल्या " इंटेंडंट " नांवाच्या अधिकाऱ्याच्या मार्फत त्यानें सर्व राज्यकारभार चालविला होता. त्याच्या पूर्वींचे गव्हर्नर नांवाचे अधिकारी एस्टेट्स किंवा जेथें या संस्था नसत तेथें पार्लमेंट्स नांवाच्या ज्या लोकसंस्था होत्या त्यांच्यामार्फत कारभार करीत असत. पण या इंटेंडंटच्या काळांत खालपासून वरपर्यंतचे सर्व अधिकारी राजांकडून नेमले जाऊन त्याच्या हातीं सर्व कारभार होऊं लागला. मध्यवर्ति सरकारांत राजा व त्याचें कौन्सिल करील ती पूर्व-दिशा होऊं लागली. या कौन्सिलांतही " कंट्रोलर जनरल " याचेंच विशेष प्रस्थ असून तो राज्यांतील सर्वाधिकारीच (Dictator) बनला होता, असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. फ्रान्समध्यें पार्लमेंट नांवाच्या ज्या सभा होत्या त्या न्यायसभा होत्या; परंतु त्यांचा काहीं काळ राजसत्तेच्या नियंत्रणास उपयोग होत असे. कारण राजांनीं केलेल्या कायद्यांची नोंदणी करण्याचा

त्यांना अधिकार असे व एखादा कायदा अयुक्त आहे असें वाटल्यास त्याची नोंदणी या न्यायसभा करीत नसत. परंतु चवदाव्या लुईच्या कारकीर्दीत या न्यायसभांचेंही स्वातंत्र्य नष्ट होऊन राजांनीं केलेल्या सर्व कायद्यांची नोंद निमुटपणें त्यांनीं केलीच पाहिजे असा प्रघात पडला. तथापि पॅरिसमधील "पार्लमेंट" अखेरपर्यंत जीव धरून होते व अखरीस या पार्लमेंटच्या विरोधाच्या आघाताची ठिणगी उडूनच राज्यक्रांतीचा भडका सर्व देशांत उडाला.

सरदार वर्ग व धर्माधिकारी वर्ग यांची विलासी वृत्ति व सामाजिक विषमता.

हळूहळू राजे लोकांचा व त्यांच्या अधिकाऱ्यांचा लोकांवर फार जुलूम होऊ लागला. लोकांच्या द्रव्याची हवी तशी उधळपट्टी सुरू झाली व सरदार वर्ग अगदीं अवनत स्थितीला पोहोचला. एकेकाळीं जे सरदार लोक आपापल्या जहागिरींत राहून आपल्या लोकांचें संरक्षण करीत, त्यांच्यांतील उद्योगधंद्यांना व कलाकौशल्याला उत्तेजन देत व अपापल्या प्रदेशांत स्वतंत्र राजांप्रमाणें वागण्यांत अभिमान बाळगीत असत, तेच आतां देशाचा सर्व कारभार राजाच्या हातीं गेल्यामुळें आळसांत, चैनींत व दुर्व्यसनांत काळक्रमणा करू लागले. त्यांच्या पूर्वजांचा लष्करी पेशा व स्वतंत्रवृत्ति हे गुण आतां त्यांच्यांत उरले नसून राजांची हांजीहाजी करण्यांत व पॅरिस सारख्या राजविलासी शहरांत ऐषआरामांत राहण्यांत त्यांना धन्यता वाटूं लागली होती। सरदार लोकांचें पूर्वींचें सामाजिक किंवा राजकीय कार्य उरलें नव्हतें त. त्यांच्या पूर्वींच्या सवलती मात्र कायम होत्या. बरेचसे कर त्यांना माफ असत. वरिष्ठ दर्जाच्या सर्व नोकऱ्या बहुतेक त्यांना व त्यांच्या आप्तेष्टांनाच मिळत असत. त्यांच्या पूर्वींच्या जहागिरींतील कुळांवर त्यांचे पूर्वींचे कांहीं कांहीं

हक्क तसेच चालू होते. सरदार लोक हे केवळ आळशी व चैनी जमीनदार बनले होते. अर्थात्च सामान्य शेतकरी वर्गांत त्यांच्या विषयीं अनादर व मत्सर पसरलेला होता. वरच्या वरच्या धर्माधिकाऱ्यांचीही तीच स्थिति होती. स्वतंत्र विचारांच्या लोकांचा हे फार छळ करीत. त्यांचें वर्तन निंद्य व पेशा सरदारी किंवा विलासी झाला होता. खालच्या दर्जाच्या खेडयापाडयांतील जोशासारख्या गरीब लोकोपयोगी धर्माधिकाऱ्यांबद्दल मात्र लोकांत अप्रीति नव्हती व राज्यक्रांतीच्या प्रसंगीं हे छोटे धर्माधिकारी लोकांच्या पक्षाला मिळाले.

प्रांताप्रांतांतील विषमता व व्यापाऱ्यावरील निर्बंध.

या सामाजिक वर्गांतील विषमतेप्रमाणेंच निरनिराळ्या प्रांतांतील लोकांच्या स्थितींत विषमता दिसून येत होती. एका प्रांतांत एक कायदा तर दुसरीकडे दुसरा कायदा. एकीकडे एक कर तर दुसरीकडे दुसराच कर. अशी स्थिति होती. तसेंच एका प्रांतांतून दुसऱ्या प्रांतांत मालाची नेआण करतांना व्यापाऱ्यांना जबर जकाती द्याव्या लागत. यामुळें व्यापाऱ्यांचें व गिऱ्हाइकांचें फार नुकसान होई. धंदेवाईक लोकांचे संघ असून ते आपल्या धंद्यांत दुसऱ्यांनीं येऊं नये याबद्दल एकसारखा प्रयत्न करीत असत. एकंदरींत कोणत्याही दृष्टीनें विचार केला तरी यावेळची फ्रेंच लोकांची स्थिति अगदीं कृत्रिम बनलेली होती. सामान्य लोकांना मुळींच स्वातंत्र्य नव्हतें. सरदार व धर्माधिकारी लोक कांहीं सामाजिक कार्य करीत नसतां, त्यांचे जादा अधिकार व विशेष सवलती कायम होत्या. पूर्वींच्या जहागिरी मोडून सर्व देशाचें एक राज्य बनलें होतें, तरी अंतर्गत व्यापाऱ्यावरील निर्बंध व जकाती कायम होत्या. सरकारच्या करांना कांहींच नियम नसून दुर्बलांवर विशेष भार व प्रबलांची अजीबात सुटका अशी विषम वांटणी दिसून येत होती. या

सर्व अन्यायांत पंधराव्या लुईच्या स्वैर वर्तनाची भर पडल्यामुळें लोकांत फारच असंतोष माजला.

सोळावा लुई इ. स. १७७४ मध्यें गादीवर बसला. त्यावेळीं सरकारी तिजोरींत एकसारखी तूट येत होती. सामान्य लोकांवर करांचा भार पुष्कळ झाला होता व वरच्या वर्गांतील लोक आपणांवर कर बसवून घेण्यास किंवा आपल्या सवलती सोडून देण्यास तयार नव्हते. लुईनें 'टर्गो' या प्रसिद्ध मुत्सद्यास कांहीं काळ कंट्रोलर जनरलचा अधिकार दिला होता. यानें राजदरबारचा पुष्कळ खर्च कमी केला. धान्याच्या व्यापारावरील निर्बंध काढून टाकिले. व्यापाऱ्यांचे संघ मोडून टाकून वाटेल त्या लोकांनीं हवा तो व्यापार करावा असें जाहीर केलें. तसेंच 'टेल' व 'कॉर्व्ही' या नांवाचे जे कर केवळ गरीब शेतकऱ्यांवरच बसत होते, ते सरदार व जमीनदार लोकांवरही बसविण्याचा आपला निश्चय त्यानें जाहीर केला. हें पाहून सरदार लोकांनीं राजाकडे व राणीकडे तक्रारी करून टर्गोला काढून टाकण्यास राजाला भाग पाडले. या नंतर 'नेकर' यास कंट्रोलर जनरल नेमण्यांत आले याच्या कारकीर्दींत इंग्लंड बरोबर युद्ध सुरू होऊन सरकारला पुष्कळ कर्ज झालें. या नंतर 'कलोन' हा कंट्रोलर जनरल झाला (१७८३ ते १७८७.) सरकारची कर्जांतून मुक्तता कशी होणार व राज्यकारभाराची तोंडमिळवणी कशी होणार, याचा त्याला कांहींच उलगडा होईना. त्यानें आपलें राज्य दिवाळखोर बनलेलें आहे. याची राजाला पूर्ण कल्पना आणून दिली. समाजांतील श्रेष्ठ वर्गांवर कर बसविण्याखेरीज या दिवाळखोरींतून बाहेर पडण्यास मार्ग नव्हता. म्हणून त्यानें १७८६ मध्यें एक श्रेष्ठ लोकांची सभा बोलावून त्यांच्यापुढें सर्व स्थिति ठेविली. हे श्रेष्ठ लोक (Notables)

सोळावा लुई, टर्गो, नेकर व कलोन यांचें सुधारणेचे विफल प्रयत्न. सरकारची दिवाळखोरी व राज्यक्रांतीची सुरुवात.

अर्थात्च आपणांवर कर बसवून घेण्यास तयार होईनात. या नंतर राजानें कलोन यास काढून टाकून आपणच आपल्या अधिकारांतच कांहीं नवे कर लादण्याचा प्रयत्न सुरू केला. पॅरिसमधील पार्लमेंटनें (न्यायसभेनें) या कृत्यास विरोध करून नवे कर बसविण्यापूर्वी "स्टेट्स जनरल" ही लोकसभा भरवावी अशी मागणी केली. या न्यायसभेनें एक लोकांच्या हक्कांचा जाहीरनामाही प्रसिद्ध केला. या नंतर १७८९ मध्यें "स्टेट्स जनरल" ही लोकसभा राजानें बोलाविली व तेव्हांपासून राज्यक्रांतीला प्रारंभ झाला.

यानंतर एकदोन वर्षांत 'स्टेट्स जनरल' हीच नॅशनल असेंब्ली बनून तिनें राज्यक्रांतीचें कार्य पुरें केलें. हीच सभा कॉंस्टिटयुअंट असेंब्ली या नांवानें बसली व तिनें एक नवी राज्यघटनाही तयार केली. या सभेनें दोनतीन वर्षांत केलेली कामगिरी खरोखर आश्चर्य वाटण्यासारखी आहे. तिनें नवी केलेली राज्यघटनाही खरोखर उत्तम होती. राजानेंही ती घटना मान्य केली होती व इंग्लंडच्या राजाप्रमाणें लोकसभेनें नियंत्रित होण्याला तो तयार झाला होता. परंतु ज्या धर्माधिकाऱ्यांचें व सरदार लोकांचे जादा अधिकार लोकसभेनें काढून घेतले होते त्यांनीं बाहेरच्या देशांत जाऊन तेथील राजांना फ्रान्स विरुद्ध उठविलें. सर्व युरोपियन राजांना फ्रेंच लोकांतील हें लोकसत्तेचें खूळ मारून टाकण्याची इच्छा झाली. सरदार लोकांचें हें राष्ट्रद्रोहाचें कृत्य पाहून लोकही चिडले व राजाला काढून टाकून शुद्ध लोकशाही (Republic) स्थापन करण्याचे विचार लोकांत पसरूं लागले. अखेरीस बाहेरच्या देशांच्या स्वारीच्या दहशतीनें चिडून जाऊन लोकांनीं राजाराणीला फाशीं दिले व लोकशाहीचें राज्य स्थापन केलें. यानंतर सर्व युरोपियन राजे एक होऊन फ्रान्समधील लोकशाहीला मोडण्याचा व तेथें पुनः राजसत्ता स्थापन करण्याचा प्रयत्न करू लागले. यावेळीं कांहीं काळ

१७८९ पासून १८७० पर्यंतचा फ्रेंचांचा त्रोटक इतिहास.

देशांत अंदाधुंदी माजली लोकशाहीच्या पक्षानें आपल्या विरोधकांस कापून काढण्याचा सपाटा चालविला. यावेळीं नेपोलियन हा प्रतापशाली पुरुष पुढें आला व त्यानें देशांत शांतता स्थापन करून जवळ जवळ सर्व युरोखंड पादाक्रांत केलें. या नंतरचा फ्रान्सचा सुमारें ७०|८० वर्षांचा इतिहास म्हणजे निरनिराळ्या राज्यघटनांच्या प्रयोगांचा इतिहास आहे, असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. नेपोलियन नंतर त्याचें साम्राज्य लयास गेलें व फ्रान्सांत पुनः राजसत्ता स्थापन झाली. पण फ्रेंचांनीं पेरलेलें लोकसत्तेचें बीं फुकट गेलें नाहीं. दोन तीन क्रांत्या झाल्या. नंतर १८७० मध्यें फ्रान्समध्यें पुनः लोकशाही सुरू झाली व ती अद्यापपर्यंत कायम आहे.

फ्रेंच लोकांनीं लोकसत्तेची भावना प्रज्वलित केली व त्यामुळेंच एकोणीसाव्या शतकांत सर्व युरोपांत लोकसत्तेची स्थापना झाली.परंतु त्या लोकसत्तेला

इंग्लंडांतील राज्ययंत्राची सुधारणा

अनुरूप असें राज्ययंत्र घडविण्याचें कार्य इंग्लिश लोकांनीं केलें आहे.मागच्या प्रकरणांत सतराव्या शतकाच्या अखेरीपर्यंत इंग्लिशांनीं आपल्या राज्ययंत्राला लोकनियंत्रित राजसत्तेचें स्वरूप कसें दिलें होतें, तें आपण पाहिलें. आतां त्याच राज्ययंत्राला पूर्ण लोकसत्तेचें स्वरूप त्यांनीं कसें दिलें हें पाहावयाचें आहे.राजा, त्याचे मंत्रि व द्विदळ लोकसभा हें त्यांच्या राज्ययंत्राचे प्रमुख भाग आहेत. त्यांच्या परस्पर संबंधांत फरक घडवून आणून ते त्याच राज्ययंत्राकडून आज लोकसत्तेचें कार्य करून घेत आहेत. आजच्या त्यांच्या राज्यघटनेस लोकनियंत्रित राजसत्ता हें नांव लागू पडत नसून 'लोकसत्ताक राजशाही' हें नांव बरोबर लागू पडतें. अठराव्या शतकांतील 'लोकनियंत्रित राजसत्तेचें' लोकसत्ताक राजशाहींत कसें रूपान्तर झालें, हें थोडया विस्तारानें आतां पाहूं.

सतराव्या शतकांमध्यें इंग्लिश लोकसभेनें राजाशीं जो तंटा केला, तो

लोकनियंत्रित राजसत्तेचें लोकसत्ताक राजशाहींत रूपांतर कसें झालें?

त्याच्या हांतून राजसत्ता अजीबात काढून घ्यावी, या इच्छेनें केला नाहीं. ती राजसत्ता लोकसभेनें केलेल्या कायद्यांप्रमाणें उपभोगिली जावी, एवढाच त्यांचा हेतु होता. राज्य कारभार करणें हें राजाचें कर्तव्य आहे, त्याच्याशीं लोकसभेचें कांहीं कर्तव्य नाहीं, अशी राजपक्षाचीच नव्हे, तर लोकपक्षांचीही समजूत सतराव्या व आठराव्या शतकांत कायम होती. तथापि सतराव्या शतकांत लोकसभेनें एका राजाला दुर्वतनाबद्दल फाशी दिला होता व एका राजाला हाकलून देऊन त्याच्या मुलीला व जावयाला गादीवर बसाविलें होतें. तसेंच राजाच्या मंत्र्यांवरही महाजनसभेसमोर खटले (Impeachment) चालवून त्यांना दुष्कृत्याबद्दल शिक्षा ठोठावल्या होत्या. यामुळें अंमलबजावणीच्या किंवा राज्यकारभाराच्या अंगावरही प्रसंगविशेषीं लोकसभेची सत्ता चालते, असें सिद्ध झालें होतें. परंतु आज तशी स्थितिही उरलेली नसून प्रसंगविशेषीं उपभोगिली जाणारी सत्ता संपूर्णत्वानें लोकांच्या हातीं आली आहे व राजाचें राष्ट्राधिपत्य केवळ नांवाचें उरलें आहे. हें परिवर्तन कसें झालें, हें पाहिलें पाहिजे. १६८८ नंतर राजानें खडें सैन्य ठेऊं नये असें ठरविण्यांत आलें होतें. तथापि खड्या-सैन्याची तेव्हांपासून एकसारखी जरूर भासत आहे. ही गरज भागविण्यासाठीं दरसाल " आर्मी ॲक्ट " नांवाचा कायदा—यालाच पूर्वी म्युटिनी ॲक्ट असें नांव होतें—लोकसभा दरसाल पास करते व त्या कायद्यानें एक वर्षभर खडें सैन्य ठेवण्याचा अधिकार राजाला किंवा त्याच्या मंत्र्यांना मिळतो. हा कायदा एखादे वर्षी लोकसभेनें पास केला नाहीं, तर देशांतील सैन्य बेकायदेशीर ठरून त्यांत शिस्त ठेवणें शक्य होणार नाहीं. अर्थात् इतर कोणत्याही कामाकरितां नसलं तरी हा कायदा पास करून घेण्याकरितां तरी वर्षांतून एकदां लोकसभा भरविणें राजाला व त्याच्या मंत्र्यांना अवश्यच आहे.

तशीच ":अप्रोप्रिएशन ॲक्ट" नांवाच्या कायद्याची स्थिति आहे. हा कायदाही दरसाल पास होत असून तो पास झाल्याशिवाय सरकारी खजिन्यांतील एक पैचाही खर्च राजाला किंवा त्याच्या मंत्र्यांना काय-देशीर रीतीनें करतां येणार नाहीं. अर्थात् अठराव्या शतकाच्या प्रारंभापासून दरसाल एकदां तरी लोकसभा बोलावणें व तिची वरील दोन कायद्यांना तरी संमति घेणें, या गोष्टी कोणत्याही राजाला चुकविणें शक्य नव्हतें. याचा अर्थ राजानें लोकसभेंतील बहुमत आपल्या बाजूचें करून घेऊनच सर्व राज्य-कारभार केला पाहिजे, असा होता. १६९० नंतर राजे अनेक प्रकारच्या हिकमती लढवून व लोकसभेच्या सभासदांवर निरनिराळ्या प्रकारें दडपण आणून लोकसभेंत आपलें वर्चस्व व बहुमत ठेवित असत; परंतु लोकसभेनें पास केलेला कायदा नामंजूर करण्याचा आपला कायदेशीर हक्क उपयोगांत आणून लोकसभेशीं उघड तंटा करीत नसत. लोकसभेंत फूट पाडणें, तिच्या सभासदांना लाचलुचपती देणें, कित्येक प्रसंगीं दहशत घालणें, इत्यादि उपा-यांनीं पण लोकसभेच्या अनुमतीनेंच राज्यकारभार करणें त्यांना भाग होतें. अठराव्या शतकांत लोकसभेच्या सभासदांचे व्हिग् व टोरी असे दोन संघटित पक्ष तयार झाल्यापासून राजांना वरील हिकमती लढविणें दिवसेंदिवस कठीण होऊं लागलें. तसेंच हिंदुस्थान देशांतील बंगाल इलाखा ताब्यांत आल्यामुळें इंग्लंडचा व्यापारीवर्ग जसजसा सधन होऊं लागला तसतसे त्यांच्यावर दडपण आणणें राजाला कठीण होऊं लागलें.या वर्गांतील लोकांच्या हातींच त्यावेळची लोकसभा असल्यामुळें अठराव्या शतकांच्या उत्तरार्धांत लोकसभेंत ज्याचें बहु-मत होईल असाच मुख्य प्रधान नेमण्याची आवश्यकता राजांना भासूं लागली. फ्रेंच राज्यक्रांतीनें लोकांचे विचार बदलून अंमलबजावणीचा अधिकारही आपल्याच हातीं असावा अशी लोकसभेला इच्छा होऊं लागली. तसेंच अठराव्या शतकाच्या अखेरीस सुरूं झालेलें नेपोलियनशीं युद्ध संपल्यावर देशांतील बेकारीचा प्रश्न, नवीन स्थापन झालेल्या कारखान्यांतील मजुरांचा

प्रश्न, धान्यावरील आयात जकाती उठविण्याचा प्रश्न, हे पुढें येऊन सरकारला अनेक नवे कायदे करण्याची आवश्यकता भासू लागली, आणि कायदे करणें हें तर लोकसभेचें काम. तेव्हां लोकसभेंतील दोन पक्षांपैकीं ज्यापक्षाचें बहुमत असेल, त्याच्या पुढाऱ्यालाच मुख्य प्रधान नेमून मंत्रिमंडळ बनविण्यास सांगण्याशिवाय राजांना गत्यंतर नव्हतें. या सर्व कारणांमुळें एकोणिसाव्या शतकांत जबाबदार मंत्रिमंडळाची व्यवस्था कायमची रूढ झाली, व मंत्रिमंडळ म्हणजे प्रतिनिधी सभेंतील बहुमतवाल्यापक्षाची एक कमेटी असा प्रकार घडून आला. हें मंत्रिमंडळ आतां राजाला जबाबदार उरलेलें नसून तें लोकसभेला जबाबदार झालेलें आहे. मंत्रिमंडळांतील मुख्य प्रधान हा आज इंग्लंडचा खरा राजा आहे व त्याला काढून टाकण्याचा व दुसऱ्या पक्षाच्या पुढाऱ्याला मुख्य प्रधान बनविण्याचा अधिकार लोकसभेला किंवा लोकांना आहे. कोणत्याही महत्त्वाच्या प्रश्नावर मंत्रिमंडळाचा लोकसभेंत पराभव झाला तर मुख्य प्रधान आपली वस्त्रें खालीं ठेवतो, किंवा लोकसभा बरखास्त करून नव्या निवडणुकींत आपल्या पक्षाचें बहुमत होतें किंवा नाहीं तें पाहतो. या प्रयत्नांत अपयश आलें कीं, ज्या पक्षाचें बहुमत होईल, त्या पक्षाचा पुढारी नवें मंत्रिमंडळ तयार करतो. अशा प्रकारचा हा आटयापाटयाचा खेळ इंग्लंडच्या लोकसभेंत सारखा चालला असतो. एका पक्षानें अधिकाऱ्याच्या सूरपाटया धराव्यात व दुसऱ्या पक्षानें कोंडी फोडण्याचा प्रयत्न करावा. एकदां कोंडी फुटली म्हणजे दुसऱ्या पक्षानें अधिकाऱ्याच्या सूरपाटया धराव्यात व पहिल्यानें कोंडी फोडण्याचा प्रयत्न करावा, अशी स्थिति आहे. पण हा खेळ ज्या देशांत दोन पक्ष आहेत तेथेंच खेळतां येतो, दोहोंहून जास्त पक्ष झाले कीं खेळाचा बेरंग होऊन कोणत्याच मंत्रिमंडळाचें सिंहासन फार काळ टिकूं शकत नाहीं.

वरील प्रकारच्या जबाबदार मंत्रिमंडळाच्या व्यवस्थेनें राजाची सत्ता लोकांच्या हातीं आली व राजा केवळ नामधारी बनला; परंतु त्याचमुळं कायदे करणें व अंमलबजावणी करणें (किंवा राज्यकारभार करणें) ही

जबाबदार व स्वतंत्र मंत्रिमंडळ.

राजसत्तेचीं दोन्हीं अंगें पुनः मंत्रिमंडळाच्या हातीं एकत्र झालीं. ज्या पक्षाचें लोकसभेंत बहुमत असतें त्याचपक्षाचें मंत्रिमंडळ असल्यानें मंत्रिमंडळानें आणलेले कायदे त्यांना काढून टाकण्याचें ठरविल्याशिवाय लोकसभेला नापास करतां येत नाहींत. अर्थात् कायदे करण्याची बहुतेक कामगिरी आज मंत्रिमंडळाकडेच गेलेली आहे. मुख्य प्रधान हा आजचा राजा असून तोच लोकसभेच्या अनुमतीनें कायदे करतो व मंत्रिमंडळाच्या साहाय्यानें त्यांची अंमलबजावणी करतो. मात्र त्याला वाटेल तेव्हां पदभ्रष्ट करण्याचा अधिकार लोकसभेला आहे. राजा हा नामधारी राजा आहे. कायदे करणें व अंमलबजावणी करणें, या राजसत्तेच्या अंगांचें पृथक्करण अमेरिकेंत मात्र जशाचें तसें अद्यापि कायम आहे. तेथें राष्ट्राध्यक्ष हा राष्ट्राधिपति (किंवा राजा) आहे व तेथील मंत्रि लोकसभेला जबाबदार नसून त्याला जबाबदार आहेत. यामुळें आज अमेरिकेंत व इंग्लंडांत लोकसत्ताच नांदत असली तरी त्यांच्या राज्ययंत्राचीं स्वरूपें अगदीं भिन्न आहेत. इंग्लंडांत जबाबदार मंत्रिमंडळाची व्यवस्था (Parliamentary executive) आहे व अमेरिकेंत स्वतंत्र मंत्रिमंडळाची व्यवस्था (Non Parliamentary executive) आहे. कायदे करणें व अंमलबजावणी करणें या अंगांचें पृथक्करण अमेरिकेंत दृष्टीस पडतें तर इंग्लंडांत त्यांचें एकीकरण दृष्टीस पडतें.

मतदानाच्या हक्काचा विस्तार व प्रातिनिधि सभेचें वर्चस्व.

इंग्लंडांतील राज्ययंत्राला शुद्ध लोकसत्तेचें स्वरूप प्राप्त होण्याला आणखी दोन अडथळे होते. अठराव्या शतकांत प्रतिनिधि सभेच्या निवडणुकींत मतें देण्याचा अधिकार अगदीं मर्यादित होता आणि महाजन सभेसारख्या आनुवंशिक सभासदांच्या सभेला लोकसभेंत बरेंच महत्त्व होतें. या दोन उणिवा एकोणि-

साव्या शतकांत क्रमाक्रमानें भरून काढण्यांत आल्या. १८३२, १८६७, १८८४ व १९१८ या सालांत मतदानाचा हक्क विस्तृत करण्याचे कायदे करण्यांत येऊन आतां सार्वत्रिक मतदानाची पद्धति सुरू झालेली आहे. १९१८ च्या कायद्यानें तीस वर्षांवरील स्त्रियांनाही मतदानाचा हक्क देण्यांत आला आहे. महाजन सभेचें महत्त्व एकोणिसाव्या शतकांत कमी कमी होत आलेंच होतें. अखेरीस १९११ च्या पार्लमेंटरी ॲक्टानें महाजन सभेचे बहुतेक महत्त्वाचे अधिकार काढून घेण्यांत आले. अशा प्रकारें हल्लीं इंग्लंडांत लोकसत्ताक राजशाही प्रस्थापित करण्यांत आली आहे.

एकोणिसाव्या व विसाव्या शतकांत या लोकसत्तेची स्थापना सर्व सुधारलेल्या देशांत झाली. आशिया खंडांतीलही बहुतेक स्वतंत्र देशांनीं ही राज्यरीति स्वीकारलेली आहे. या निरनिराळ्या देशांतील लोकसत्ताक संस्थांचीं स्वरूपें कशीं आहेत, याचें वर्णन पुढील भागांत देऊन त्याच्या पुढील म्हणजे तिसऱ्या भागांत या संस्थांच्या गुणदोषांचें सोपपत्तिक विवेचन करावयाचें आहे. येथें या पुस्तकाचा ऐतिहासिक भाग संपूर्ण झाला.

राजनीतिशास्त्रपरिचय.

भाग २ रा

वर्णनात्मक.

भाग दुसरा.

प्रकरण १ लें.

प्रचलित शासनसंस्थाः—इंग्लंड व अमेरिका.

प्रचलित राज्ययंत्राचे स्थूल विभाग.

आतांपर्यंत राज्य म्हणजे काय, त्याची उत्पत्ति कशी झाली, त्याची वाढ कशी झाली आणि लोकसत्तेचा युरोप व आशिया या खंडांत कसा प्रसार होत आहे याची माहिती देण्यांत आली. येथून पुढचे विषयविवेचन समजण्याला अर्वाचीनकाळीं सुधारलेल्या राष्ट्रांत ज्या शासनसंस्था आहेत त्यांचें स्थूल स्वरूप तरी समजणें अवश्य आहे. याकरितां या व पुढच्या दोन प्रकरणांत इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स, जर्मनी, जपान आणि हिंदुस्थान या देशांत सध्यां ज्या प्रचलित शासनसंस्था आहेत त्यांचें वर्णन करावयाचें योजिलें आहे. हें झाल्यानंतर शासनसंस्था कशा असाव्यात वगैरे तात्त्विकविवेचन करण्यास सोयीचें होईल. प्रचलित शासनसंस्थांचें वर्णन करण्यास सुरवात करण्यापूर्वीं एकदोन गोष्टी सांगणें अवश्य आहे. अर्वाचीन राजसत्तेला प्रत्येक देशांत तीन अंगें आहेत असें आपणांस दिसून येईल, व मागच्या प्रकरणांतही तें सांगण्यांत आलेंच आहे. तीं तीन अंगें म्हणजे कायदे करणें, त्यांची अंमलबजावणी करणें आणि न्याय देणें. कोणत्याही देशांतील शासनसंस्था किंवा सरकार हीं तीन कार्यें करीत नाहीं असें होणार नाहीं; आणि प्रत्येक सरकारचें कोणतेंही कार्य घेतलें तरी त्यांचा या तिन्हींपैकीं कोणत्या तरी एका वर्गांत समावेश झाल्याशिवाय राहाणार नाहीं. तेव्हां प्रत्येक देशांतील शासन-

संस्थांचा विचार करतांना या तीन कार्यांकरितां ज्या संस्था स्थापन केल्या आहेत त्यांची माहिती मिळविली म्हणजे बस्स आहे. तसेंच प्रत्येक राज्यांत राज्यकारभाराच्या सोयीकरतां राज्याचे लहान लहान विभाग असतात, आणि त्या विभागांत स्थानिक स्वराज्याच्या संस्था स्थापन केलेल्या असतात. वरिष्ठ सरकारच्या माहितीबरोबरच या स्थानिक स्वराज्याच्या संस्थांची माहिती करून घेणें जरूर आहे. राज्य अमेरिकेप्रमाणें संयुक्त असेल तर तेथें वरिष्ठ मध्यवर्ति सरकार, पेट राज्यांतील सरकार आणि स्थानिक स्वराज्य या सर्वांची माहिती करून घेतली पाहिजे. असो.

१ इंग्लंड.

प्रथमतः इंग्लंडांतील शासनसंस्थांची माहिती देण्यास सुरवात करूं. इंग्लंडच्या गादीवर आनुवंशिक राजा आहे, आणि कायदे करणें, अंमलबजावणी करणें, आणि न्याय देणें हीं तिन्ही कार्यें औपचारिक दृष्टीनें त्याच्या हातीं आहेत, म्हणजे तीं त्याच्या नांवानें चाललेलीं आहेत; परंतु वास्तविक त्याच्या हातीं कांहींच सत्ता नाहीं. कायदे करणें व अंमलबजावणी करणें हीं कामें पार्लमेंट आणि मंत्रिमंडळ व सिव्हिल सर्व्हिस हे करीत असून न्यायदानाचें कार्य न्यायासनें करीत असतात. न्यायासनें, मंत्रिमंडळ आणि लोकसभा (पार्लमेंट) या तिन्हींपैकी एकावरही त्याचा ताबा नसून, त्यांत कोणत्या लोकांचा समावेश व्हावा अगर होऊं नये, त्यांतील लोकांचें धोरण कसें असावें अगर असूं नये, या कामीं त्याला यत्किंचितही अधिकार नाहीं. कायद्याचा मसुदा पुढें आणण्याचा राजाचा अधिकार आज मंत्रिमंडळाच्या हातीं गेलेला आहे; तो मसुदा पास करण्याचा अगर नापास करण्याचा अधिकार लोकसभेला आहे. लोकसभेनें पास केलेल्या मसुद्याला नामंजुरी (veto) देण्याचा अधिकार राजाला असला तरी

राजा

त्याला त्याचा उपयोग आज करतां येत नाहीं. त्याचा अंमलबजावणी करण्याचा अधिकार मंत्रिमंडळानें बळकावला आहे; आणि न्यायदानाचा अधिकार न्यायासनें त्याच्या नांवानें उपभोगित असतात. त्यांच्या कार्यांत राजाला कांहीं ही ढवळाढवळ करतां येत नाहीं. वास्तविक रीतीनें राजाचीं सर्व कार्यें आज त्याचे मंत्री करीत असून त्यांनाच त्याबद्दल जबाबदार धरलें जातें. लोकसभेंत ज्या पक्षाचें ज्या वेळीं बहुमत असेल त्यावेळीं त्यापक्षाचेंच मंत्रिमंडळ असलें पाहिजे असा प्रघात आहे.

लोकसभेचें द्विदळ स्वरूप

लोकसभाः– सर्व सुधारलेल्या राज्याप्रमाणें इंग्लंडांतील लोकसभा सुद्धां द्विदल स्वरूपाची आहे. प्रतिनिधिसभा (House of Commons) आणि महाजनसभा (House of Lords) हीं तीं दोन दळें होत. सन १९११ च्या पार्लमेंटरी ॲक्टानें आज बहुतेक सर्व सत्ता प्रतिनिधिसभेच्याच हातीं आलेली आहे. इंग्लंडांतील लॉर्डांची सभा ही सर्व देशांत जुनी महाजनसभा आहे. याकरितां तिच्या घटनेचा प्रथम विचार करण्यास हरकत नाहीं.

महाजनसभा.

महाजनसभेंत एकंदर पांच प्रकारचे सभासद असतात. (१) राजघराण्यांतील पुरुष. यांना या सभेंत बसण्याचा तत्त्वतः अधिकार आहे, तरी ते कधीं हजर रहात नाहींत. (२) आनुवंशिक हक्कानें असणारे सभासद यांत तीन वर्ग करितां येतील. (अ) इंग्लिश पीअर्स. इंग्लंड व स्कॉटलंड १७०७ मध्यें एक होण्यापूर्वीं झालेलें पीअर्स. (ब) ग्रेट ब्रिटनच पीअर्स. यांत १७०७ पासून १८०१ मध्यें आयर्लंड व ग्रेटब्रिटन यांचीं पार्लमेंटें एक होईपर्यंत झालेले पीअर्स येतात. (क) युनायटेड किंग्डमचें पीअर्स (संयुक्त राज्यांतील सरदार). हें ग्रेटब्रिटन व आयर्लंड यांचीं पार्लमेंटें एकत्र झाल्यावर पीअर झालेले आहेत. कोणत्याही व्यक्तीला पीअर

करावयाचें असल्यास मुख्य प्रधानाच्या सल्लयानें राजा त्यास पीअर करतो. लॉ पीअर्स म्हणून जे असतात त्यांशिवाय सर्व प्रकारचे पीअर हे आनुवांशिक असतात, म्हणजे कोणीहि मनुष्य पीअर झाला म्हणजे त्याचा मुलगा व त्याचे वंशज पीअर होतात. पीअर्समध्यें ड्युक, मार्क्विस, अर्ल, व्हायकाउंट आणि बॅरन असे पांच दर्जे आहेत. (३) स्कॉटिश पीअर्स. यांपैकीं सोळा पीअर्सची प्रत्येक पार्लमेंटच्यावेळीं निवडणूक होते. (४) आयरिश पीअर्स. यांपैकीं चोवीस पीअर्सची तहाहयात निवडणूक होत असते. आयरिश पीअर्संना इंग्लंडांतील मतदारांमार्फत प्रतिनिधिसभेंतही निवडून देण्याचा अधिकार आहे, परंतु स्कॉटिश पीअर्स किंवा युनायटेड किंग्डमचे पीअर्स यांना तो अधिकार नाहीं. (५) अधिकारी या नात्यानें महाजनसभेंत बसणारे पीअर्स यांत दोन वर्ग आहेत. एक (अ) लॉ लॉर्डस् हे कायदेपंडित असून त्यांची नेमणूक राजा करतो. महाजनसभेकडे जें न्यायदानाचें कार्य आहे तें करण्यासाठीं त्यांची नेमणूक केलेली असते. न्यायदानाचें कार्य करण्याच्या वेळीं लॉर्ड चॅन्सेलरच्या अध्यक्षतेखालीं तें कार्य हे लॉर्ड्स करीत असतात. (ब) धर्माधिकारी आर्चबिशप आणि इतर कांहीं बिशप. प्रत्येक सभासदांचें वय निदान एकवीस वर्षें तरी असलें पाहिजे; तसेंच ते परकीय, गुन्हेगार किंवा दिवाळखोर असतां कामा नयेत. कोणीहि पीअर मेला कीं, त्याचा वारस हा महाजनसभेचा सभासद झालाच पाहिजे असा नियम आहे.

प्रतिनिधीसभेंत सध्यां एकंदर ७०७ सभासद आहेत. त्यांची निवडणूक काउंटीज (जिल्हे), बरोज (शहरें) आणि विश्वविद्यालयें यांतील मतदारांनीं केलेली असते. १९१८ सालच्या रेप्रिझेन्टेशन ऑफ दि पीपल या नांवाच्या कायद्यानें मतदारांसंबंधीं नियम केलेले आहेत. या कायद्याप्रमाणें इंग्लंडांतील वयांत आलेल्या बहुतेक स्त्रीपुरुषांना मताधिकार मिळालेला आहे. या कायद्यापूर्वीं स्त्रियांना इंग्लंडांत मुळींच मता-

प्रतिनिधी सभा.

धिकार नव्हता. पुरुष मतदाराचें वय निदान एकवीस असून जेथें तो मतदार असेल त्या किंवा त्याच्या शेजारच्या काउंटींत अगर बरोमध्यें दरसाल निदान दहा पौंड उत्पन्नाची जागा त्याच्याकडे सहा महिने तरी असली पाहिजे. स्त्रीमतदाराचें वय निदान तीस वर्षांचें असलें पाहिजे. शिवाय दरसाल पांच पौंडांच्या उत्पन्नाची जागा त्यांच्याकडे असल्यामुळें त्यांना स्थानिक स्वराज्यांत मतदानाचा हक्क असला पाहिजे; किंवा त्यांच्या नवऱ्यांना तसा अधिकार असला पाहिजे. विश्वविद्यालयातर्फें मत देण्याचा अधिकार प्रत्येक एकवीस वर्षांच्या पदवीधरास आणि तीस वर्षांच्या स्त्री-पदवीधारिणीस आहे. ज्या लोकांनीं पदवीच्या परीक्षांचा अभ्यासक्रम पुरा केला आहे त्यांनाहि हा अधिकार दिला जातो. कोणासहि फक्त वसतीच्या मुद्यावर दोनदां मतें देतां येणार नाहींत. एकदां अमुक ठिकाणचा रहिवासी म्हणून व एकदां दुसऱ्या नात्यानें, अशा प्रकारें एका व्यक्तीस दोन मतें देतां येतील. परंतु दोन ठिकाणचा रहिवासी म्हणून मात्र दोन ठिकाणीं मत देतां येणार नाहीं. लोकसंख्येंतील प्रत्येक ७०००० लोकांना एक प्रतिनिधी, अशी इंग्लंडांत प्रतिनिधींची वांटणी झालेली आहे. आयर्लंडांत प्रत्येक४३००० लोकांस एक प्रतिनिधी दिलेला आहे. एकवीस वर्षांखालील कोणाही व्यक्तीस प्रतिनिधी होतां येणार नाहीं. धर्माधिकारी (Ministers of the Church) प्रतिनिधिसभेचे सभासद होऊं शकत नाहींत. सरकारी कंत्राटदार, शेरीफ, निवडणुकीचे काम करणारे अधिकारी (ज्या ठिकाणीं काम करीत असतील तेथून), यांना प्रतिनिधी निवडून येतां येत नाहीं. इंग्लिश व स्कॉटिश पीअर्स, नागरिक नसलेले लोक, दिवाळखोर, वेडे, आणि गुन्हेगार यांना मतदानाचा हक्क नाहीं. इंग्लिश व स्कॉटिश पीअर्सना प्रतिनिधी होतां येत नाहीं. प्रतिनिधीसभेंतील जे सभासद पगारी मंत्री किंवा राजाचे नोकर नसतील त्यांना दरसाल ४०० पौंड पगार मिळतो. महाजनसभेच्या सभासदांना अर्थातूच कांहीं पगार नसतो.

महाजनसभेची निवडणूक होत नसते. अर्थात् पार्लमेंटची निवडणूक याचा अर्थ फक्त प्रतिनिधिसभेची निवडणुक. प्रतिनिधिसभेची निवडणूक निदान पांच वर्षांनीं झालीच पाहिजे असें १९११ च्या कायद्यानें ठरलें आहे. याच्या पूर्वीं ही मुदत सात वर्षांची होती. तथापि कायदे करण्याचा किंवा तो बदलण्याचा सर्व अधिकार लोकसभेलाच असल्यानें एकादे प्रसंगीं ती मुदत वाढविण्याचाही अधिकार लोकसभेला आहे. महायुद्धाच्या वेळीं नवी निवडणूक करणें देशहिताला इष्ट नसल्यामुळें मुदत भरली होती तरी महायुद्ध संपेपर्यंत नवी निवडणूक करण्यांत आली नाहीं.

लोकसभेची निवडणूक.

प्रतिनिधिसभेंत स्पीकर (अध्यक्ष), वेज् ॲण्ड मीन्स् कमिटीचा चेअरमन् व डेप्युटी चेअरमन, क्लार्क, सार्जंट ॲट आर्म्स् आणि चॅपलेन् असे अधिकारी असतात. यांपैकी क्लार्क्, सार्जंट् ॲट् आर्म्स् आणि चॅप्लेन् हे कायमचे अधिकारी असतात. क्लार्क याच्याकडे सभेचा कार्यक्रम लिहून काढणें वगैरे सर्व काम दिलेलें असतें. सार्जंट् ॲट् आर्म्स याचें काम स्पीकरच्या सांगण्याप्रमाणें सर्व सभासदांना वागावयास लावण्याचें असतें. स्पीकरची निवडणूक प्रत्येक वेळीं लोकसभेची नवी निवडणूक झाली म्हणजे प्रतिनिधि सभा करीत असते. त्याची निवड पक्षाभिमानानें न होता, ज्याला पुष्कळ दिवसांचा अनुभव असेल व ज्याची त्या कामाबद्दल लायखी असेल त्यालाच त्या जागीं निवडलें जातें. प्रतिनिधिसभेचें काम चालू असतांना तो अध्यक्षस्थानीं असतो. त्याला बरेच अधिकार कार्य सुरळीत चालावें याकरितां दिलेले असतात. प्रतिनिधिसभेचें काम चालू राहाण्यास निदान चाळीस सभासद हजर असले पाहिजेत. महाजनसभेचें कार्य चालू होण्यास कायदेशीर रीतीनें तीन सभा-

प्रतिनिधिसभेची कार्यपद्धति.

सद हजर असले तरी पुरे होतात; परंतु निदान तीस तरी सभासद हजर असल्या खेरीज काम सुरू होऊं नये असा प्रघात ठेवलेला आहे. या सभेचा अध्यक्ष लॉर्ड् चॅन्सेलर हा असतो. हा मंत्रिमंडळाचा सभासद असून न्याय खात्याचाहि हा अधिपति गणला जातो. महाजनसभेंत वादविवादाचें नेतृत्त्व याचेकडे असत नाहीं. प्रतिनिधिसभेच्या स्पीकरचे अधिकार याला नसतात. तो ज्या पक्षाचें मंत्रिमंडळ असेल त्या पक्षाचा असतो. केव्हांही मतें घेण्याचा प्रसंग आला म्हणजे तो आपलें मत देतो. प्रतिनिधिसभेचा अध्यक्ष, ज्या वेळीं दोन्हीं पक्षांचीं सारखीं मतें पडतील त्या वेळींच मत देतो. तत्त्वतः पाहिल्यास लॉर्ड् चॅन्सेलर हा पीअर नसला तरी हरकत नाहीं. परतु खरोखरी तो असतो. एखाद्या पीअरवर खटला चालू असला म्हणजे राजानें नेमिलेला लॉर्ड् हाय् स्टयुअर्ड हा अध्यक्षस्थानीं असतो. लॉर्ड चॅन्सेलर शिवाय महाजन सभेंत लॉर्ड् चेअरमन ऑफ् दि कमिटीज् म्हणून अधिकारी असतो, व तो कमेटी ऑफ दि होल् या नात्यानें या सभेचें कार्य चाललें असेल तेव्हां अध्यक्ष असतो. या शिवाय क्लार्क, सार्जंट् ॲट् आर्म्स्, जंटलमन्, अशर ऑफ दि ब्लॅक् रॉड् (चोपदार) वगैरे अधिकारी नेहमींची कामें करावयास नेमलेले असतातच. यांची नेमणूक राजाकडून होत असते.

कायद्यांचे मसुदे

कोणताही कायदा करावयाचा असला म्हणजे त्याचा मसुदा सामान्यतः दोन्ही सभांत पसार व्हावा लागतो व तसा पसार झाल्यावर त्याच्यावर राजाची सही होते आणि मग त्याला कायद्याचें स्वरूप प्राप्त होतें. आयव्ययाखेरीज कोणताही कायद्याचा मसुदा असला तरी तो कोणत्याही सभेंत चर्चेसाठीं पुढें आणतां येतो व तो राजाचे मंत्रि किंवा इतर कोणतेही सभासद आणूं शकतात. आयव्ययासंबंधीचे मसुदे मात्र प्रतिनिधिसभेंतच प्रथम चर्चेला पुढें आले पाहिजेत. बिल्स ऑफ अटेंडर म्हणजे एखाद्या मोठ्या सरकारी अधिकाऱ्यानें गुन्हा केल्यास त्याला शिक्षा करण्या-

संबंधाचा ठराव. मंत्रिमंडळाशिवाय इतर सभासदांना आपले मसुदे आपण पुढें आणतां येतात, पण ते मंत्रिमंडळानें स्वीकारल्या खेरीज पसार होण्याचा संभव नसतो. कारण प्रतिनिधिसभेंत ज्या पक्षाचें बहुमत असेल त्याच पक्षाचें मंत्रिमंडळ असतें. सार्वजनिक हिताच्या कोणत्याही कायद्याच्या मसुद्याला सामान्यतः पांच अवस्थेंतून जावें लागतें. त्या अवस्था म्हणजे पहिलें वाचन, दुसरें वाचन, कमेटींतील चर्चा, कमेटीचा अहवाल आणि तिसरें वाचन, या सर्व अवस्थांतून कोणताही मसुदा गेला म्हणजे मग तो दुसऱ्या सभेकडे चर्चेसाठीं पाठविण्यांत येतो. पहिल्या वाचनाच्या वेळीं कांहीं विशेष चर्चा होत नाहीं. ज्या मंत्र्याला तो मसुदा आणावयाचा असेल तो सभेची परवानगी मागतो व आपला मसुदा वाचून दाखवितो. मसुदा फारच महत्त्वाचा असेल तरच पहिल्या वाचनाचे वेळीं त्याच्यावर भाषणें किंवा वादविवाद होतात,नाहीं तर कांहींच होत नाहींत.दुसऱ्या वाचनाचे वेळेपासून वादविवादास सुरवात होते. यावेळीं फक्त मसुद्याच्या मूलभूत सामान्य तत्त्वाचीच चर्चा होते. यावेळीं कित्येकदां 'हा मसुदा सहा महिन्यानंतर चर्चेला घ्यावा 'असा ठराव पुढें येतो व तो ठराव पास झाल्यावर तो मसुदा काढून घेण्यांत येतो. दुसऱ्या वाचनाचें वेळीं कोणताही मसुदा पसार झाला म्हणजे त्याची कमेटींत चर्चा सुरू होते. कमेटींत तपशिलाची सुद्धां चर्चा होते. आयव्ययासंबंधींचा मसुदा असेल, किंवा अंमलबजावणी खात्यांतील अधिकाऱ्यांनीं लोकसभेच्या अनुमति शिवाय एखादें काम सुरू करण्यास परवानगी दिली असेल, व तिला मंजुरी देण्यासंबंधीचा मसुदा असेल (Money Bills or Bills for the confirmation of provisional orders) तर त्याची चर्चा सर्व सभाच "कमेटी ऑफ् दि होल्" या नांवानें करते. दुसऱ्या मसुद्यांचीही चर्चा सभेची इच्छा असल्यास "कमेटी ऑफ् दि होल्" पुढें होऊं शकते.परंतु सामान्यतः दुसऱ्या मसुद्यांची चर्चा त्या कामाकरितां ज्या निरनिराळ्या स्टँडिंग कमिट्या नेमलेल्या असतात त्यांच्यापैकीं एखादीं पुढें होते. नंतर या कमिटयांचा

अहवाल सभेपुढें येतो. कित्येक वेळीं स्टँडिंग कमिटीचा अहवाल येण्यापूर्वींच
त्यांची चर्चा सिलेक्ट कमिटीपुढें होते. स्टँडिंग कमेटीचा अहवाल आला
किंवा कमेटी ऑफ् दि होलनें पूर्वींच्या मसुद्यांत कांहीं फेरफार सुचविले तर
त्या मसुद्याची तपशिलासुद्धां पुन्हां चर्चा होते; नाहीं तर अहवालवाचनाचें
कार्य गाळून तिसऱ्या वाचनाचें कार्य सुरू होतें. तिसऱ्या वाचनांत पुनः तप-
शिलाची चर्चा न होतां सर्व मसुद्यांची सामान्य चर्चा होते, व त्यांतून तो
निभावून निघाला म्हणजे त्याची दुसऱ्या सभेकडे रवानगी होते. दुसऱ्या
सभेंतही या सर्व विधींतून त्याला जावें लागतें व त्यांतूनही तो पार पडला
म्हणजे राजाची सही होऊन त्याला कायद्याचें स्वरूप प्राप्त होतें. दुसऱ्या
सभेंत कांहीं फेरफार सुचविले गेल्यास पुनः पहिल्या सभेकडे त्याची रवा
नगी होते.

आयव्ययासंबंधाच्या मसुद्याविषयीं विशेष असे नियम आहेत. हे
मसुदे प्रतिनिधिसभेंतच प्रथम पुढें आले पाहिजेत आणि ते मंत्रिमंडळामार्फ-

आयव्ययाचें मसुदे व अंदाजपत्रक.

तच आले पाहिजेत. इतर समासदांना एखाद्या विशिष्ट प्रकारच्या खर्चासंबंधीं ठराव आणतां येतील किंवा मंत्रिमंडळानें सुचवलेल्या करांत फेरबदल करण्याचे किंवा नामंजुरी देण्याचे ठराव आणतां येतील. प्रत्येक वर्षीं सर्व जमाखर्चाचें अंदाजपत्रक पसार व्हावें लागतें. त्यांत गेल्या सालचा सर्व जमाखर्च असतो. पुढच्या वर्षाचा अंदाज केलेला असतो आणि त्याकरितां लागणारें उत्पन्न कसें उत्पन्न करावयाचें यासंबंधीं सूचना केलेल्या असतात. याशिवाय ' अप्रो-प्रिएशन ॲक्ट ' या नावांचा एक कायदा दरसाल व्हावा लागतो. यांत कोणत्या कार्याकरितां किती खर्च करावयाचा हें ठरविलें जातें. आयव्यया-संबंधीच्या सर्व मसुद्यांची सर्व चर्चा सभेपुढेंच झाली पाहिजे असा नियम आहे. चॅन्सेलर ऑफ दि एक्स्चेकर (फडणीस) हा दरसाल आपलें

अंदाजपत्रक "कमेटी ऑफ दि वेज अँड मीन्स" इच्यापुढें सादर करतो. सर्व प्रातिनिधिसभाच "कमेटी ऑफ दि वेज अँड मीन्स" या नांवानें अंदाजपत्राची चर्चा करते, आणि आपलें अहवाल तयार करते, व तिनें सुचविलेल्या फेरफारांसह तें अंदाजपत्रक मसुद्याच्या रूपानें पास होतें. नंतर महाजनसभेपुढें तें जातें. परंतु त्यांत तिनें फेरफार सुचविले तरी राजाच्या सहीनें तें पूर्वींच्याच स्वरूपांत पास होतें. कारण आयव्ययाच्या मसुद्यांना महाजन सभेच्या मंजुरीची जरूरी नाहीं असें १९११ च्या पार्लमेंट ॲक्टनें ठरलेलें आहे.

प्रतिनिधिसभा व महाजनसभा.

१९११ च्या पार्लमेंट ॲक्टनें बहुतेक सर्व सत्ता प्रतिनिधिसभेलाच मिळालेली आहे. आयव्ययाच्या मसुद्याला तर महाजनसभेची संमति लागत नाहींच. परंतु इतर कोणताही मसुदा जर प्रतिनिधिसभेनें तीन बैठकींत एकसारखा पास केला आणि दुसरी बैठक व तिसरी बैठक यांमध्यें दोन वर्षांचा अवधि गेलेला असला तर त्याला महाजनसभेनें फेटाळून लाविलें तरी तो राजाच्या सहीनें तो कायदा होऊं शकतो. अशा प्रकारें या कायद्यानें कायदे करण्याची बहुतेक सत्ता प्रतिनिधिसभेलाच दिली आहे. तसेंच मंत्रिमंडळ कोणत्या पक्षाचें असावयाचें हें सुद्धां प्रतिनिधिसभेंतील बहुमतानेंच ठरत असतें, आणि मंत्रिमंडळाच्या हातींच कोणते कायदे पुढें आणावेत ही सत्ता एकवटली असून अंमलबजावणी खात्याचे सर्व अधिकार मंत्रिमंडळासच आहेत. तात्पर्य इंग्लंडांतील खरी राजसत्ता मंत्रिमंडळाच्या हातीं आहे, आणि तें प्रतिनिधिसभेलाच जबाबदार आहेत. कोणत्याही दिशेनें विचार केला तरी आज महाजनसभेला जवळ जवळ कांहींच अधिकार नाहींत असें म्हणावें लागतें. तरी कोणत्याही मसुद्याची पूर्ण चर्चा व्हावी एवढें कार्य तिला साधतां येतें.

मंत्रिमंडळ'—ब्रिटिश राज्य व्यवस्थेंत कायदे करण्याची व अंमल
बजावणी करण्याची सर्व सत्ता मंत्रिमंडळांत एकवटली आहे. कोणत्याही
कायद्याचा मसुदा पुढें आणावयाचा झाल्यास तो बहुधा मंत्रिमंडळापैकीं
ज्याच्या खात्याशीं त्याचा संबंध असेल त्या मंत्र्याकडून आणला जातो.त्याबद्दल
सर्व मंत्रिमंडळ जबाबदार असतें. अशा रीतीनें कायदे करण्याच्या कार्यांतील
बराच हिस्सा मंत्रिमंडळाला मिळालेला आहे. तसेंच मंत्रिमंडळ हें प्रतिनिधि
सभेंतील बहुमताच्या पक्षाचें असल्यानें त्यानें आणलेले मसुदे पास होण्यास
सहसा अडचण पडत नाहीं. मंत्रिमंडळानें
आणलेला मसुदा नापास करणें म्हणजे तें

मंत्रिमंडळ.

मंत्रिमंडळ काढून टाकण्यासारखेंच असतें.
आपण आणलेला महत्त्वाचा मसुदा नापास झाला तर मंत्रिमंडळाला राजी-
नामे देणें किंवा लोकसभा बरखास्त करून नव्या निवडणुकीनें आपल्या
पक्षाचें मताधिक्य लोकसभेंत पुनः करून घेणें हे दोनच मार्ग मोकळे
असतात. नव्या निवडणुकींत मंत्रिमंडळाच्या पक्षाचें बहुमत न झाल्यास स्वतः
राजीनामे देऊन लोकसभेंत ज्या पक्षाचें मताधिक्य असेल त्या पक्षाच्या
पुढाऱ्यास नवें मंत्रिमंडळ तयार करण्यास संधि द्यावी लागते. अर्थात् जोपर्यंत
कोणत्याही मंत्रिमंडळाला काढून टाकण्याची प्रतिनिधिसभेची तयारी
नाहीं तोपर्यंत त्या मंत्रिमंडळानें पुढें आणलेल्या कायद्याच्या मसुद्यांना व
त्यानें केलेल्या इतर कृत्यांना सामान्यतः तिला मान्यता द्यावी लागते.यावरून
असें स्पष्ट दिसून येईल कीं, इंग्लंडांतील कायदे करण्याची व त्यांची अंमल-
बजावणी करण्याची बहुतेक सत्ता प्रतिनिधिसभेच्या सुद्धां हातीं खरोखर
नसून ती मंत्रिमंडळाच्या हातीं एकवटलेली आहे. मात्र या मंत्रिमंडळास
वाटेल तेव्हां काढून टाकण्याची सत्ता प्रतिनिधिसभेच्या हातीं आहे. याच
पद्धतीला जबाबदार मंत्रिमंडळाची व्यवस्था असें नांव आहे.
मंत्रिमंडळानें पुढें आणलेले मसुदे पास करण्याशिवाय अन्य

प्रकारानेंही लोकसभेच्या सभासदांचा मंत्रिमंडळावर ताबा चालूं शकतो. कोणत्याही खात्यांतील कारभारासंबंधीं प्रश्न व खुलासा विचारण्याचा अधिकार प्रत्येक सभासदाला आहे, आणि योग्य वेळीं सूचना दिली असल्यास व तो खुलासा केल्यानें लोकहिताला धोका येण्याचा संभव नसल्यास त्या प्रश्नाचें उत्तर किंवा खुलासा त्या खात्यावरील मंत्र्यानें केलाच पाहिजे असा नियम आहे. इंग्लंडांत या हक्काचा फ्रान्स इतका उपयोग केला जात नाहीं. तथापि तो हक्क असल्यामुळें राज्यकारभारांतील वाटेल ते घोटाळे हवे तेव्हां लोकांपुढें आणून अवश्य तर मंत्रिमंडळास त्याबद्दल राजीनामे देण्यासही भाग पाडतां येतें.

लोकसभेची देखरेख

ब्रिटिश राज्यव्यवस्थेंत मंत्रिमंडळ ही संस्था जरी इतक्या महत्त्वाची असली तरी अद्यापि कायद्याच्या दृष्टीनें तिला अस्तित्व मुळींच नाहीं. मंत्रिमंडळांतील लोकांना जे अधिकार आहेत ते सर्व प्रिव्हीकौन्सिलर या नात्यानें आहेत. मंत्रिमंडळाच्या सर्व सभा खासगी समजल्या जातात आणि त्या सभांत काय घडलें हें लिहून ठेवण्याचा प्रघात परवांच्या महायुद्धापर्यंत नव्हता. महायुद्ध सुरू झाल्यापासून मात्र प्रत्येक सभेची साग्र हकीगत लिहून ठेवण्याचा प्रघात पडला असून हें काम करण्यासाठीं एक स्वतंत्र सेक्रेटरीएटही स्थापन करण्यांत आलें आहे. १९०५ पर्यंत मुख्य प्रधानाचें अस्तित्व कायदा जाणत नव्हता, परंतु तेव्हांपासून कायद्यानें त्याचें अस्तित्व मान्य केलें आहे.

सरकारची निरनिराळीं खातीं निरनिराळ्या मंत्र्यांच्या किंवा बोर्डांच्या स्वाधीन करण्यांत आलेली असतात. मुख्य प्रधानाच्या कामाकरितां स्वतंत्र पगार ठेविलेला नाहीं. परंतु तो प्रायः फर्स्ट लॉर्ड ऑफ् दि ट्रेझरी या नात्यानें पगार घेत असतो. लॉर्ड प्रिव्ही कौंसील, लॉर्ड

प्रमुख मंत्रि व त्यांचीं कामें.

प्रेसिडेंट् ऑफ् दि कौन्सिल अशा कांहीं पगारी जागा आहेत. पण त्या अधिकाऱ्यांना कांहीं काम नसतें. लॉर्ड चॅन्सेलर हा फार जुना अधिकारी आहे. इतर राज्यांत न्यायमंत्री असतात त्यासारखें याचें कार्य आहे. हायकोर्ट व कोर्ट ऑफ् ॲपील यांत तो सरन्यायाधीश असतो. तोच महाजनसभेचा अध्यक्ष असून राजाचें शिक्कामोर्तब त्याचें स्वाधीन असतें. जस्टिसीज् ऑफ् दि पीस् व काऊंटी कोर्टांतील न्यायाधीश, यांना नेमण्याचा त्याला अधिकार आहे. या शिवाय धर्माधिकाऱ्यांना मदत करण्याचाहि त्याला अधिकार असतो. या नंतर दुसरा महत्त्वाचा मंत्रि म्हणजे चॅन्सेलर ऑफ् दि एक्स्चेकर हा होय. सर्व खजिना याच्या ताब्यांत असून आयव्यय खातें त्याच्या हातीं असतें. खजिना हा खरें पाहिल्यास एका बोर्डाच्या ताब्यांत दिलेला असून त्यांना लॉर्ड्स् ऑफ् दि ट्रेझरी अशी संज्ञा आहे. मुख्य प्रधान हा फर्स्ट् लार्ड ऑफ् दि ट्रेझरी या नात्यानें पगार घेत असतो हें वर सांगितलेंच आहे. तथापि हें बोर्ड कधींच काम करीत नाहीं व त्याचा सर्व कारभार चॅन्सेलर ऑफ् दि एक्स्चेकर (फडणीस) स्वतः करीत असतो. या नंतर महत्त्वाचा मंत्रि म्हणजे फर्स्ट् लॉर्ड ऑफ् दि ॲडमिरॅलिटी. हा आरमार मंत्रि आहे. याच्या हाताखालीं सुद्धां एक बोर्ड असून तें नियमितपणें कार्य करीत असतें. यानंतर पांच सेक्रेटरीज ऑफ स्टेट या नांवाचे मंत्रि असतात. यांत (१) गृहमंत्रि (secretary of state for home affairs); (२) परराष्ट्रमंत्रि (secretary of state for foreign affairs); (३) वसाहतमंत्रि (secretary of state for the colonies); (४) युद्धमंत्रि (secretary of state for war) याच्याच ताब्यांत सध्यां वैमानिक दल आहे, (५) भारतमंत्रि (secretary of state for india). या सर्वांचीं कार्यें त्यांच्या नांवांवरून व्यक्त होत आहेतच. याशिवाय कांहीं खात्यांसाठीं ॲडमिनिस्ट्रेटिव्ह बोर्डें तयार केलीं असून त्यांच्यावर एक एक अध्यक्ष असतो. हा अध्यक्षच त्या

खात्याच्या कारभाराबद्दल जबाबदार असतो. बोर्डें बहुधा नामधारी असतात. व्यापार, स्थानिक स्वराज्य, मजुरांचे प्रश्न, शेतकी, शिक्षण वगैरे खात्यांकरितां अशीं बोर्डें व त्यांवरील अध्यक्ष अलीकडे नेमण्यांत येतात. याशिवाय ॲटर्नी जनरल, सॉलिसिटर जनरल, लॉर्ड ॲडव्होकेट् वगैरे कांहीं कायदेपंडितांच्या जागा आहेत. कित्येक प्रसगीं त्यांचा मंत्रिमंडळांत समावेश होत असतो. हे निरनिराळे मंत्रि व त्यांच्या हाताखालीं असणारे मुलकी, लष्करी अगर आरमारी कायमचे अधिकारी हे सर्व राज्यकारभार लोकसभेच्या इच्छेप्रमाणें चालवीत असतात. प्रतिनिधिसभेंतलि कोणत्याही सभासदांस मंत्रिपद मिळालें म्हणजे आपल्या मतदारांकडून त्याला पुनः एकदां आपली निवडणूक करून घ्यावी लागते. असें झाल्यानें त्याच्या मतदारांचा त्याच्यावर विश्वास कायम असल्याचें सिद्ध होतें.

महायुद्धापूर्वी मंत्रिमंडळांत जवळ जवळ एकोणीस सभासद असत. मंत्रिमंडळांतील मंत्र्यांची संख्या कमी किंवा अधिक करणें हें मुख्य प्रधानाच्या इच्छेवर अवलंबून असतें. सर्वच मंत्र्याचा मंत्रिमंडळांत (cabinet) समावेश होतो असें नाहीं. उदाहरणार्थ अंडर सेक्रेटरी वगैरे जे मंत्रि असतात त्यांचा मंत्रिमंडळांत समावेश होत नाहीं. महायुद्धापूर्वी या मंडळांत मुख्यतः मुख्य प्रधान (हाच फर्स्ट् लॉर्ड ऑफ् दि ट्रेझरी असतो), लॉर्ड चॅन्सेलर, चॅन्सेलर ऑफ् दि एक्स्चेकर (फडणीस), पांच सेक्रेटरी ऑफ् स्टेट (वसाहतमंत्रि, भारतमंत्रि वगैरे), लॉर्ड प्रिव्हीसील, लॉर्ड प्रेसिडेंट् ऑफ् दि कौन्सिल, दि फर्स्ट् लॉर्ड ऑफ् दि ॲडमिरॅल्टी (आरमारमंत्रि), प्रेसिडेंट ऑफ् दि लोकल गव्हर्नमेंट बोर्ड (स्थानिकस्वराज्यमंत्रि), दि प्रेसिडेंट ऑफ् दि बोर्ड ऑफ् ॲग्रिकल्चर (शेतकी किंवा कृषिमंत्रि), दि चॅन्सेलर ऑफ् दि डची ऑफ् लँकॅस्टर, दि फर्स्ट कमिशनर ऑफ् दि वर्क्स, पोस्टमास्टर जनरल, सेक्रेटरी

महायुद्ध व मंत्रिमंडळ.

फॉर स्कॉटलंड, चीफ् सेक्रेटरी फॉर आयर्लंड, इत्यादि मंत्र्यांचा समावेश होत असे. महायुद्धांमध्यें या मंत्रिमंडळाच्या घटनेंत बरेच फेरफार झालेले आहेत. महायुद्धाच्या कामाकरितां एक पांच मंत्र्यांचें लहानसें युद्धमंत्रिमंडळ (War cabinet) तयार करण्यांत येऊन त्याच्या मार्फत युद्धविषयक कारभार चालला होता. पुढें यांतच कांहीं वसाहतींचे प्रतिनिधी घेऊन त्याला साम्राज्य–युद्ध–मंत्रिमंडळ असें नांव देण्यांत आलें. तसेंच कांहीं जादा खातीं उत्पन्न करून एकंदर मंत्र्यांची संख्या बरीच वाढविण्यांत आली; उदाहरणार्थ मजूर, पेन्शन, दारूगोळा, अन्नसामुग्री, इत्यादि अनेक खातीं नवीन तयार करण्यांत आलीं; व त्यांवर निरनिराळ्या मंत्र्यांची योजना करण्यांत आली. या सर्व खात्यांच्या सर्व मंत्र्यांचा मंत्रिमंडळांत समावेश करून सर्वांशीं सर्व कारभाराची चर्चा करणें शक्य नाहीं. मंत्रिमंडळांत इतक्या मंत्र्यांचा समावेश केल्यास त्यांतून एखाद्या छोट्या मंत्रिमंडळाची उत्पत्ति होणें अपरिहार्य असतें. महायुद्ध चालू असेंपर्यंत युद्ध मंत्रिमंडळ चालू होतें, व तें सांगेल त्याप्रमाणें सर्व कारभार चालला होता. महायुद्ध संपल्यावर पुनः नवी निवडणूक झाली तरी कांहीं दिवस युद्ध मंत्रिमंडळ चालू होतें. परंतु त्यावर फारच टीका होऊं लागल्यामुळें मुख्य प्रधानानें तें मोडून टाकलें. यानंतर पुनः पूर्वींप्रमाणें एकोणीस सभासदांचें मंत्रिमंडळ अस्तित्वांत आलें. परंतु त्यांत पूर्वींच्या कांहीं मंत्र्यांना वगळून नव्या मंत्र्यांना जागा करून देण्यांत आली. महायुद्धानंतर मशिनरी ऑफ गव्हर्नमेंट नांवाची एक कमिटी नेमण्यांत आली होती. तिनें मंत्रिमंडळासंबंधीं पुढील सूचना केल्या आहेतः—(१) मंत्रिमंडळांतील संख्या दहा किंवा बारापेक्षां जास्त असूं नये. (२) त्यांच्या सभा वरचेवर व्हाव्यात. (३) त्यांस ताबडतोब आपलें मत बनवितां येण्यास लागणारी सर्व माहिती मिळवून देण्याची तजवीज करण्यांत यावी. (४) मंत्रिमंळाच्या निकालानें ज्या ज्या खात्याच्या कार्यावर

सुधारणांच्या सूचना.

परिणाम होणार असेल त्या त्या खात्याच्या मुख्य मंत्र्यांचा त्यात समावेश करण्यांत यावा. (५) अंमलबजावणी खात्याकडून आपलें ठराव अमलांत आणले जातात किंवा नाहीं हें पाहाण्याची त्यांची पद्धति निश्चित ठरून गेली पाहिजे. मंत्रिमंडळाचीं मुख्यतः तीन कर्तव्यें आहेत असें या कमिटीचें मत आहे. (१) लोकसभेपुढें मांडण्याचें धोरण ठरविणें. (२) लोकसभेनें ठरविलेल्या धोरणाला धरून अंमलबजावणी खात्यावर ताबा चालविणें. (३) आणि सरकारच्या निरनिराळ्या खात्यांच्या कार्यांत सुसंगति राखणें.

न्यायासनें:—न्यायासनांचे दोन भाग करतां येतील; एक दिवाणी व दुसरा फौजदारी. दिवाणी कामाकरितां सर्वांत खालच्या दर्जाचीं कोर्टें म्हणजे कौंटी कोर्टें आणि फौजदारीं कामाचीं सर्वांत खालचीं कोर्टें, म्हणजे जस्टिस् ऑफ दि पीस्चीं कोर्टें किंवा बॅरो क्रिमिनल कोर्टें.

न्यायखातें.

सर्वांत श्रेष्ठ कोर्ट म्हणजे सुप्रीम कोर्ट ऑफ ज्युडिकेचर. याचे दोन भाग आहेत. एक हायकोर्ट आणि दुसरें कोर्ट ऑफ अपील. यांवरही प्रिव्हिकौन्सिलची ज्युडिशिअल कमेटी आणि महाजनसभा यांच्याकडे अपिलें जाऊं शकतात.

कौंटी कोर्टाच्या कामाकरितां एकंदर इंग्लंडचे जवळ जवळ पांचशें विभाग केलेले आहेत. यांपैकीं कांहीं विभागांचा मिळून एक गट केलेला असतो. या प्रत्येक गटावर एकेक न्यायाधीश नेमलेला असतो. तो आपल्या गटांपैकीं प्रत्येक विभागांत बहुधा दर महिन्यांतून एकदां तरी कोर्ट भरवितो. अशा प्रकारचे सुमारें पन्नास गट असून प्रत्येक न्यायाधीशाच्या हाताखालीं सुमारें दहा विभाग दिलेले असतात. अशा तऱ्हेचे पन्नास न्यायाधीश असतात व त्यांची नेमणूक लॉर्ड चॅन्सलेर करीत असतो. यांच्या कोर्टांत ज्यूरी केव्हां असते, केव्हां नसते; परंतु बहुधा नसतेंच म्हटलें तरी चालेल. १०० पौन्डापर्यंतचे दावे या कोर्टांत चालतात. याच्यावर हायकोर्टाकडे कायद्याच्या प्रश्नावर अपिल करतां येतें, पण अशीं अपिलें फारच थोडीं होतात. कोणाही

वादीस प्रथमच आपला दावा हायकोर्टापुढें नेतां येतो, परंतु तसें कोणी सहसा करीत नाहीं.

फौजदारी कामासाठीं जस्टिस ऑफ दि पीस नांवाचे ऑनररी मॅजिस्ट्रेट नेमलेले असतात. ते केव्हां एकटे बसून अगदीं लहान खटल्याचा निकाल देतात. केव्हां पेटी सेशनमध्यें बसतात, म्हणजे दोन दोन मॅजिस्ट्रेट एकत्र बसतात. येथें लहान फौजदारी खटले चालतात, व त्यांवर कार्टर सेशनकडे अपील असतें; कार्टर सेशनमध्यें यावेळीं सर्व स्थानिक मॅजिस्ट्रेट एकत्र जमतात. हें सेशन वर्षांतून चार वेळां भरतें. या कोर्टांना मूळ खटले अगर अपिलें ऐकण्याचा अधिकार असतो. या कोर्टावर हायकोर्टाकडे अपिलें जातात. कांहीं खटले या कोर्टांत कमिट करून कोर्ट ऑफ असाइजीज्‌कडे जातात. हीं कोर्टस ऑफ असाइजीज् वर्षांतून चार वेळां सर्व देशांत निरनिराळ्या ठिकाणीं भरतात. या कामाकरितां राजाकडून कामिशनर्स नेमलेले असतात. हे कमिशनर्स हायकोर्टांतील किंग्ज बेंचमधील न्यायाधीश असतात सर्व महत्त्वाच्या फौजदारी खटल्यांत बारा लोकांची ज्यूरी असते.

हायकोर्ट ऑफ जस्टिस पुढें दिवाणी व फौजदारी दोन्ही कामें चालतात. तसेंच मूळ कामें किंवा अपिलें हींहि चालूं शकतात. हायकोर्टाचें तीन विभाग आहेत. एक ' चॅन्सरी ', दुसरा ' किंग्ज बेंच ' आणि तिसरा विभाग ' प्रोबेट ॲडमिरॅलिटी ॲंड डायव्होर्स. ' हायकोर्टांतील कोणताही न्यायाधीश कोणत्याहि विभागांत काम करूं शकेल. चॅन्सरी विभागांत लॉर्ड चॅन्सेलर अध्यक्ष असतो. किंग्ज बेंचमध्यें लॉर्ड चीफ जस्टिस हा असतो आणि तिसऱ्या विभागावरील अध्यक्षाची नेमणुक राजाकडून केली जाते. हायकोर्टांतील सर्व न्यायाधिश एकत्र बसून कधींच काम चालवीत नाहींत. ते एकएकटे किंवा गट करून बसतात.

कोर्ट ऑफ ॲपीलमध्यें मास्टर ऑफ दि रोल्स आणि लॉर्ड जस्टि

लीज ऑफ अपील हे असतात. हायकोर्टाच्या तिन्ही विभागांचे अध्यक्ष आणि सर्व पूर्वींचे लॉर्ड चॅन्सेलर हें या कोर्टांत कामें करतात. अपिलें ऐकण्याकरितां या कोर्टाचेहि दोन विभाग केलेले असतात. या कोर्टापुढें दिवाणी व फौजदारी दोन्ही प्रकारची अपिलें येतात. फौजदारी अपिलें ऐकण्याच्यावेळीं लॉर्ड चीफ जस्टिस व हायकोर्टांतील किंग्ज बेंचमधील कांहीं न्यायाधिश असें बसून काम चालवितात.

सर्व न्यायाधीशांची नेमणूक लॉर्ड चॅन्सलरच्या सल्ल्यानें राजाकडून केली जाते; आणि लोकसभेच्या दोन्ही सभांनीं विनंति केल्याशिवाय कोणत्याही न्यायाधीशाला काढण्याचा राजाला अधिकार नाहीं. यामुळें न्यायाधीश स्वतंत्र राहून त्यांना निःपक्षपातानें न्याय देतां येतो. तसेंच इंग्लंडांत कोणत्याही मोठ्या मनुष्यानें गुन्हा केला तरी त्याची चौकशी नेहमींच्याच कोर्टापुढें होऊं शकते. यामुळें तेथील लोकांना अधिकाऱ्यांच्या जुलुमाची भीति वाटत नाहीं. न्यायासनें आपल्या स्वातंत्र्याचें संरक्षण करण्यास केव्हांही तयार आहेत असेंच त्यांना वाटत असतें. कोणत्याही अंमलबजावणीखात्यांतील अधिकाऱ्यांच्या हातीं कोणत्याही न्यायाधिशाचें बरें वाईट करणें असत नाहीं.

न्यायाधिशांचें स्वातंत्र्य व प्रजेच्या हक्कांची सुरक्षितता.

सर्वांत श्रेष्ठ दर्जाचीं अपील कोर्टें म्हणजे महाजनसभा आणि प्रिव्ही कौन्सिलची ज्युडिशियल कमेटी हीं होत. महाजनसभेपुढें युनायटेड किंग्डममधील धार्मिक कोर्टांशिवाय सर्व कोर्टांपुढील अपिलें चालतात; आणि प्रिव्ही कौन्सिलच्या ज्युडिशियल कमेटीपुढें धार्मिक कोर्टांवरील अपिलें व साम्राज्यांतील इतर भागांतील अपिलें चालावयाचीं असतात. वस्तुतः हीं

महाजनसभा व प्रिव्ही कौन्सिल.

दोन्ही कामें चालविणारें तेच लोक असतात. महाजनसभेंतील चार लॉर्डस्
हेच ते लोक होत. महाजनसभेचें व प्रिव्ही कौन्सिलचें न्यायासंबंधीं सर्व काम
यांच्याकडूनच केलें जातें. या शिवाय प्रिव्ही कौन्सिलचें इतर वकील सभा-
सद किंवा हिंदुस्थान व वसाहती यांच्याकरितां म्हणून नेमलेले सभासदही
त्यांत काम करूं शकतात.

स्थानिक स्वराज्यः—कोणत्याही देशांतील स्थानिक स्वराज्याच्या
संस्थांचा विचार करावयाचा झाल्यास खेड्यांचा आणि शहरांचा विचार
पृथक्‌पणें करावा लागतो. त्या दृष्टीनें आपण आधीं इंग्लंडांतील खेड्यांचा
विचार करूं, आणि मग शहरांचा विचार करूं. इंग्लंडांतील स्थानिक स्वरा-
ज्याला व्यवस्थित स्वरूप १८८८ आणि १८९४ या वर्षीं पास झालेल्या
लोकल गव्हर्नमेंट ॲक्टांनीं आणून दिलेलें आहे, आणि आजच्या तेथील
स्थानिक स्वराज्याच्या संस्था त्याच कायद्यांच्या

स्थानिक स्वराज्य.

आधारावर रचलेल्या आहेत. १८८८ च्या
कायद्यानें पुढील गोष्टी करण्यांत आल्या.

(१) एकंदर देशांत राज्यकारभाराच्या सोयीसाठीं ६२ कौंटीज् करण्यांत
आल्या. यापैकीं कांहीं पूर्वींच्या शायरच्याच विस्ताराच्या आहेत. तर कांहीं
त्यांचे पोट विभाग करून करण्यांत आल्या आहेत आणि साठ किंवा अधिक
काउंटी बरोज (म्हणजे कौंटी गणल्या जाणारीं शहरें) तयार केल्या.
(२) प्रत्येक कौंटीमध्यें व कौंटी बरोमध्यें एकेक कौंटीकौन्सिल स्थापन
करण्यांत आलें; त्यांत स्थानिक कर देणाऱ्या लोकांनीं निवडलेले कौन्सिलर्स
आणि त्या कौंटीकौन्सिलर्सनीं आपल्या संख्येच्या एक तृतीयांशापेक्षां अधिक
नाहींत इतके निवडलेले ॲल्डरमेन यांनीं काम करावें असें ठरलें. (३)
यांच्यांकडे वेड्यांची इस्पितळें, भिकाऱ्यांची व्यवस्था, लहान मुलांचे तुरुंग
(रेंफरमेटरी), औद्योगिक शाळा, स्थानिक आयव्यय खातें, रस्ते व पूल
यांची व्यवस्था आणि कांहीं स्थानिक अधिकाऱ्यांच्या नेमणुका इत्यादि,

पूर्वीं कार्टर सेशनकडे असलेलीं कामें देण्यांत आलीं. (४) जस्टिसीज् आफ् दि पीस यांच्याकडे फक्त न्यायदानाचें व परवाने देण्याचें काम ठेवण्यांत आलें. (५) कौंटी कौन्सिलर्स व जस्टिसीज् यांच्या जॉइंट बोर्डाच्या स्वाधीन कौंटी पोलीस करण्यांत आलें. याशिवाय १८८९ आणि १९०२ या वर्षीं झालेल्या कायद्यांनीं प्राथमिक, दुय्यम व उच्च शिक्षणाचें कार्यही त्यांच्याच स्वाधीन करण्यांत आलेलें आहे.

या नंतर, १८९४ च्या कायद्यानें प्रत्येक कौंटीचे रूरल आणि अर्बन डिस्ट्रिक्ट् नांवाचे विभाग पडले, आणि प्रत्येक डिस्ट्रिक्टचे पॅरिश (खेडें) नांवाचे विभाग करण्यांत आले. प्रत्येक डिस्ट्रिक्टमध्यें आणि प्रत्येक रूरल पॅरिशमध्यें एकेक लोकनियुक्त कौन्सिल निर्माण करण्यांत आलें. सर्वांत लहान पॅरिशमध्यें सर्व लोकांची एक ग्रामसभा असते. पॅरिश कौन्सिलला पूर्वीं व्हेस्ट्रीकडे असलेले सर्व अधिकार देऊन, दानधर्म, फूटपाथांची व्यवस्था ठेवणें, पॅरिशच्या मालमत्तेची व्यवस्था ठेवणें वगैरे कामें देण्यांत आलीं आहेत. कांहीं पॅरिश कौन्सिलांनीं वाचनालयें, स्नानगृहें, दिवाबत्ती, खेळण्याच्या जागा वगैरे कामेंही अंगावर घेतलेलीं आहेत. डिस्ट्रिक्ट कौन्सिलांकडे मोठमोठे रस्ते आणि आरोग्य यांची व्यवस्था देण्यांत आलेली आहे. अर्बन डिस्ट्रिक्ट म्हणजे वस्तुतः लहानशी म्युनिसिपालिटीच असते. अशा तऱ्हेचे एकंदर ८०० अर्बन डिस्ट्रिक्ट आज इंग्लंडांत आहेत. यांतील लोकसंख्या ३०० पासून १००००० पर्यंत असते.

शहरांतील स्थानिक स्वराज्याला सुव्यवस्थित स्वरूप देण्याचें श्रेय १८२५ च्या कायद्याला आहे. या कायद्याप्रमाणें प्रत्येक शहरांत एक टौन कौन्सिल स्थापण्यात आलें आहे. यांतील कौन्सिलरांची निवडणूक दर तीन वर्षांनीं केली जाते. हे कौन्सिलर्स आपला मेयर व कांहीं ॲन्सल्डरमेन निवडतात. ॲल्डरमेनची संख्या कौन्सिलर्सच्या एकतृतीयांशापेक्षां जास्त असतां कामा नये. कौन्सिलचें काम निरनिराळ्या स्टॅंडिंग कमेट्यांमार्फत केलें जातें.

यांच्या हाताखालीं टौन क्लार्क व इतर कायमचे अधिकारी दिलेले असतात. तथापि त्यांत प्रायः एक एंजिनीअर, एक मेडिकल ऑफिसर, एक सॅनिटरी ऑफिसर, एक शिक्षण सेक्रेटरी, एक खजिनदार आणि ज्या गांवांत स्वतंत्र पोलीस देण्यांत आलें असेल त्यांना एक चीफ कॉन्स्टेबल हे अधिकारी असतात. सध्यां इंग्लंड व वेल्समध्यें मिळून एकंदर ३५० शहरें आहेत. परंतु त्यांचा दर्जा, लोकसंख्या आणि विस्तार यांत पुष्कळ भिन्नता आहे. एकंदर सात दर्जांचीं शहरें आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. तीं अशीं:— (१) कौंटीज ऑफ सिटीज (२) कौंटी बरोज (३) स्वतंत्र कार्टर सेशन असणाऱ्या ब्रोज (४) स्वतंत्र कमिशन ऑफ पीस बरोज (५) स्वतंत्र कमिशन ऑफ पीस नसणाऱ्या ब्रोज (६) स्वतंत्र पोलीस असणाऱ्या व (७) स्वतंत्र पोलीस नसणाऱ्या बरोज्.

१८८८ च्या कायद्यानें लंडन शहरांतील स्थानिक स्वराज्याच्या संस्थांनाही बरेंच व्यवस्थित स्वरूप दिलें. लंडन शहर हें मूळचें लंडन व इतर अठरा शहरें मिळून झालेलें आहे. १८८८ च्या पूर्वीं या सर्व गांवची व्यवस्था निरनिराळ्या कौन्सिलामार्फत होत असे. १८८८ मध्यें त्या सर्वांवर देखरेख करणारें असें लंडन कौन्टि कौन्सिल निर्माण करण्यांत येऊन त्या सर्वांच्या कामांत सुसंगति राहावी अशी व्यवस्था करण्यांत आली. याशिवाय मेट्रापोलिटन वॉटरबॉर्ड, मेट्रापोलिटन असायलमबॉर्ड, पोर्ट ऑफ लंडन ॲथॉरिटी वगैरे निरनिराळ्या संस्था निरनिराळ्या कामांकरितां स्थापन करण्यांत आल्याच आहेत.

स्थानिक स्वराज्याची कार्यव्याप्ति वाढत आहे.

म्युनिसिपालिट्यांनीं आतां दिवसेंदिवस आधिकाधिक लोकोपयोगी कार्यें अंगावर येण्याचा सपाटा चालविला आहे. त्यांचें मुख्य कार्य म्हणजे गांवांत शांतता राखणें, शिक्षण देणें, आरोग्य राखणें हेंच होय. या शिवाय पाणीपुरवठा, गॅस व वीज यांचा पुरवठा, मार्केटें बांधणें, तालमी बांधणें, घरें बांधून गरि-

यांना भाड्यानें देणें, स्नानगृहें बांधणें, ट्रॅमवे सुरू करणें, वाचनालयें उघडणें, बागा तयार करणें, बँड, अजबखाने वगैरे सुरू करणें इत्यादि अनेक कार्यें अंगावर घेऊन आपल्या नागरिकांच्या सुखसोयीच्या गोष्टींचा पुरवठा करण्यास त्या अधिकाधिक पुढें येत आहेत. स्थानिक स्वराज्याच्या संस्थांवर, तत्त्वतः पाहिल्यास, मध्यवर्ति सरकारचा बराच ताबा आहे, तरी वस्तुतः त्या सत्तेचा फारच क्वचित् उपयोग केला जातो. बहुधा स्थानिक स्वराज्याच्या कामांत वरिष्ठ सरकार मुळींच हात घालीत नाहीं. मध्यवर्ति सरकारांतील होम ऑफीस, शिक्षण, शेतकी आणि व्यापार, यांचीं बोर्डें आणि स्थानिक स्वराज्य बोर्ड यांना स्थानिक स्वराज्याच्या संस्थांवर देखरेख ठेवण्याचा अधिकार आहे. पण सामान्यतः स्थानिक संस्थांना शक्य तितकें स्वातंत्र्य द्यावयाचें असें त्यांचें धोरण आहे.

---

२ अमेरिका

(अ) संयुक्त सरकार

अमेरिकेच्या राज्यघटनेंत, संयुक्त संस्थानांचें राज्य कायदे करणाऱ्या, अंमलबजावणी करणाऱ्या आणि न्याय देणाऱ्या, अशा तीन प्रकारच्या स्वतंत्र संस्थांच्या हातीं दिलें जावें असें म्हटलें आहे; परंतु त्या संस्थांची रचना कशी असावी वगैरे संबंधीं तपशील सांगितलेली नाहीं. या तपशीलाच्या बाबी सामान्य कायद्यांनीं ठरविलेल्या आहेत. संयुक्त सरकारची राजधानी वॉशिंग्टन ही आहे. कोणत्याही संस्थानांत नसलेली अशी संयुक्त सरकारला जागा पाहिजे म्हणून १७९१ मध्यें मेरीलँड आणि व्हर्जिनिया, या दोन संस्थानांतून थोडा थोडा प्रदेश घेऊन कोलंबिया डिस्ट्रिक्ट स्थापन करण्यांत आला व त्याचा राज्यकारभार संयुक्त सरकारच्या खास अमलाखालीं देण्यांत आला. या कोलंबिया

कोलंबिया डिस्ट्रिक्ट

डिस्ट्रिक्टची व्याप्ति वॉशिंग्टन शहराबाहेर फारशी नाहीं. त्याचें क्षेत्रफळ सुमारें ६० चौरस मैल आहे. याचा राज्यकारभार राष्ट्राध्यक्षानें नेमलेल्या तीन कमिशनरांमार्फत होत असतो. तेथें म्युनिसिपल कौन्सिल वगैरे कांहीं नसून तेथील लोकांना स्थानिक किंवा राष्ट्रीय सरकारांत मत देण्याचा अधिकार नाहीं.

संयुक्त सरकारचीं कर्तव्यें.

संयुक्त सरकारला जे अधिकार आहेत ते राज्यघटनेमध्यें लिहिलेले आहेत; आणि बाकीचे सर्व अधिकार पोट राज्यांतील सरकारांस आहेत. सामान्यतः कर बसविणें, परराष्ट्रीय संबंध, सैन्य, आरमार, परदेशीं आणि एका संस्थानाचा दुसऱ्या संस्थानाशीं होणारा व्यापार, पोस्टखातें, नाणीं, वजनेंमापें, आणि संयुक्तसरकार विरुद्ध केलेले गुन्हे इत्यादि संबंधीचें अधिकार संयुक्त-सरकारला दिलेले आहेत.

लोकसभाः—राज्यघटनेप्रमाणें संयुक्त सरकारची कायदे करण्याची सत्ता कॉंग्रेस नांवाच्या लोकसभेच्या हातीं दिलेली आहे. ही लोकसभाही द्विदल स्वरूपाची असून तिच्या प्रतिनिधिसभेला हाऊस ऑफ रिप्रिझेंटेटिव्ह्ज् आणि महाजनसभेला सीनेट असें म्हणतात. महाजनसभा ही निरनिराळ्या संस्थानांचीं प्रतिनिधि असून, प्रतिनिधिसभा ही लोकांची प्रतिनिधि आहे. महाजनसभेच्या घटनेंत राज्याचें संयुक्तत्व प्रतिबिंबित झालें असून प्रतिनिधि सभेंत राज्याचे एकराष्ट्रीयत्व व्यक्त झालें आहे.

महाजनसभा

महाजनसभेंत प्रत्येक संस्थानांमार्फत दोनदोन असे एकंदर अठ्ठेचाळीस संस्थानांमार्फत शहाण्णव सभासद येतात. १९१३ पूर्वी या सभासदांची निवडणूक संस्थानांतील कायदे करणाऱ्या लोकसभांकडून केली जात असे. परंतु आतां तें काम त्या त्या संस्थानांतील

लोकच करतात. अर्थात् महाजन सभेंतील सभासद सुद्धां लोकनियुक्तच आहेत. हे संस्थानी सरकारांचे प्रतिनिधि समजले जात नाहींत व त्यांना वाटेल त्याप्रमाणें मत देण्यास पूर्ण स्वातंत्र्य असतें. जर्मनींत बुंडेस्रॅट् म्हणून जी महाजनसभा होती तिचे सभासद पोट राज्यांतील सरकारचे वकीलच गणले जात; व त्यांना आपल्या सरकारच्या इच्छेप्रमाणेंच मत द्यावें लागत असें. तशी स्थिति अमेरिकेंत नाहीं. महाजनसभेच्या प्रत्येक सभासदाची निवडणूक सहा वर्षांच्या मुदतीनें केलेली असते. त्याचें वय कमींत कमी तीस तरी असलें पाहिजे, तो अमेरिकेचा नागरिक होऊन निदान नऊ वर्षें तरी झालीं असलीं पाहिजेत, आणि तो ज्या संस्थानांतून निवडला जावयाचा त्या संस्थानचा रहिवासी असला पाहिजे.

महाजनसभेला कायदे करण्याच्या कामाव्यतिरिक्तही कांहीं कामें आहेत. कोणत्याही इतर राष्ट्राशीं केलेला तह महाजनसभेंतील दोन तृतीयांश सभासदांना मान्य असल्याखेरीज खरा ठरत नाहीं. तसेंच राष्ट्राध्यक्षानें केलेल्या नेमणुका मान्य करण्याचा किंवा अमान्य करण्याचा अधिकार महाजनसभेला आहे. तसेंच प्रतिनिधिसभेनें कोणावर इंपीचमेंट (खटला) चालविल्यास तो खटला महाजनसभेपुढें चालू शकतो. तथापि कोणासही एखाद्या अधिकारावरून दूर करणें किंवा एखाद्या जागेला नालायख ठरविणें एवढाच या कामीं या सभेला अधिकार आहे. कोणावर इंपीचमेंट करावयाची हा अधिकार प्रतिनिधिसभेलाच आहे.

महाजनसभेच्या अध्यक्षस्थानीं संयुक्त सरकारच्या दुय्यम राष्ट्राध्यक्षाची योजना केलेली असते. हा महाजनसभेचा सभासद असत नाहीं, व कोणत्याही प्रश्नावर सारखीं मतें पडलीं तरच त्याला मत देण्याचा अधिकार असतो. राष्ट्राध्यक्ष मयत होऊन दुय्यम राष्ट्राध्यक्ष त्याच्या जागेवर गेल्यास महाजनसभा आपला अध्यक्ष स्वतः निवडते. महजनसभेला आपल्या कार्याकरितां वाटेल ते नियम करून कार्यपद्धति ठरवितां येते. महाजनसभेंत निरानिराळ्या

विषयाचा विचार करण्यासाठीं स्टँडिंग कमेट्या नेमलेल्या असतात व कोण-ताही प्रश्न सभेपुढें आला म्हणजे त्याची छाननी प्रथम त्या विषयावरील स्टँडिंग कमेटीमध्यें होते. प्रत्येक कमेटी ही त्या त्या विषयांत तज्ञ गणली जाते व तिच्या मताला पुष्कळच मान दिला जातो. अशा प्रकारें कायदे करण्याच्या कार्याचें नेतृत्व या कमेट्यांकडेच गेलेलें आहे असें म्हणतां येईल. इंग्लंडांत हें नेतृत्व मंत्रिमंडळाकडे असतें. स्टँडिंग कमेट्यांची निवड महाजन सभाच करीत असल्यामुळें महाजनसभेकडेच तें नेतृत्व आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. इंग्लंडांत ज्या त्या मंत्र्याकडेच त्या त्या विषयासंबंधीं काय-द्याचे मसुदे पुढें आणण्याचें कार्य असल्यानें त्याला त्या संबंधीं हवी ती माहिती मिळू शकते. अमेरिकेंत सुद्धां स्टँडिंग कमेटयांना वाटेल ती माहिती अंमलबजावणी खात्यांकडून मागविण्याचा अधिकार आहे. तरी कित्येक वेळां ती मिळण्यास फारच अडचण पडते.

प्रतिनिधिसभेची निवडणूक दर दोन वर्षांनीं अमेरिकेंतील लोकां-कडून केली जाते. निवडणूकीकरतां केलेला कोणताहि विभाग एका संस्थानांत थोडा व दुसऱ्या संस्थानांत थोडा असा असत नाहीं. प्रतिनिधिसभेंत एकं-दर किती सभासद असावयाचे हें वेळोवेळीं लोकसभा ठरवीत असते. प्रत्येक ३०००० लोकसंख्येला एकांपेक्षां अधिक प्रतिनिधि पाठविण्याचा अधिकार असू नये असा राज्य-घटनेचा नियम आहे. दहा वर्षांनीं होणाऱ्या खानेसुमारीच्या मानानें प्रति-निधींची संख्या ठरविली जाते. १९१० च्या खानेसुमारीप्रमाणें प्रत्येक २१०४१५ लोकसंख्येला एक याप्रमाणें एकंदर ४३२ ही प्रतिनिधींची संख्या ठरविलेली आहे. प्रतिनिधींचें वय पंचविसांपेक्षां कमी नसावें आणि सात वर्षें तरी ते अमेरिकेचे नागरिक असले पाहिजेत असा कायदा आहे. शिवाय ज्या संस्थानांतून ते निवडले जाणार त्या संस्थानचे ते रहिवासी

प्रतिनिधि-सभा.

असले पाहिजेत. संस्थानांतून येणाऱ्या प्रातिनिधींशिवाय संयुक्त सरकारच्या ताब्यांत जे प्रदेश असतात त्यांतूनही एकेक प्रतिनिधी घेतला जातो; परंतु त्यांना मत देण्याचा अधिकार नसतो. ज्या लोकांना संस्थानांतील कायदे करणाऱ्या दोन सभांपैकीं मोठ्या सभेंत प्रातिनिधी पाठविण्याचा अधिकार आहे, त्या सर्वांना प्रतिनिधीसभेंत प्रातिनिधी पाठविण्याचा म्हणजे मतदा-नाचा अधिकार आहे. सामान्यतः प्रत्येक एकवीस वर्षांवरील नागरिकाला हा अधिकार असतो. तथापि यासंबंधीं प्रत्येक संस्थानांत निरनिराळे नियम आहेत. कित्येक संस्थानांत, कमींत कमी इतके दिवस आपल्या संस्थानचे रहिवासी असले पाहिजे असें ठरवितात. कित्येक ठिकाणीं मतदाराचा तेथील नागरिक होण्याचा हेतु असला तरी पुरे होतो. कांहीं ठिकाणीं कांहीं कर देण्याची अट असते; तर कांहीं संस्थानांत केवळ नोंदणीचीच अट असते. कित्येक संस्थानांत नीग्रो लोकांना मताधिकार नसतो. कित्येक ठिकाणीं साक्षरतेची अट आहे. पुष्कळ संस्थानांत पुरुषा बरोबरीचा स्त्रियांनाही मता-धिकार आहे. जे अमेरिकन इंडियन कर देत नाहींत त्यांना मताधिकार नाहीं. तसेंच गुन्हेगार, शिक्षा झालेले, मतदानांत लुच्चेगिरी करणारे या सर्वांचा मताधिकार काढून घेतला जातो. कोणत्याही सभासदाची निवड-णूक बरोबर झाली कीं नाहीं हें ठरविण्याचा अधिकार त्या त्या सभांना आहे. कोणाही सभासदास काढून टाकावयाचें असल्यास तसें ठरविण्यास दोन तृतीयांश बहुमत पुरें होतें.

महाजनसभेप्रमाणें आपल्या कार्यपद्धति-संबंधीं नियम करण्याचा अधिकार प्रतिनिधीसभेला आहे. महाजनसभेचा अध्यक्ष राज्यघटनेप्रमाणें ठरलेला आहे. परंतु प्रतिनिधीसभा आपल्या अध्यक्षाची आपणच निवडणूक करते. त्याला स्पीकर असें म्हणतात. या स्पीकरला एकेकाळीं पुष्कळ सत्ता होती. कारण प्रतिनिधिसभेचें बहुतेक काम स्टँडिंग कमेटयांमार्फत होत असतें व या स्टँडिंग कमेटया नेमण्याचा अधिकार पूर्वी स्पीकरला असे.

आतां या कमेटयांची निवड प्रतिनिधीसभाच करीत असते, व त्याकरितां
प्रत्येक पक्षाच्या पुढाऱ्यांच्या कमेटयांकडून नांवें सुचविलीं जातात. महाजन-
सभेपेक्षां प्रतिनिधिसभेंतील सभासदांची संख्या फार मोठी असल्यानें तेथें
वादविवाद होण्याला फार अवकाश मिळत नाहीं. अर्थात् हें काम बहुतांशीं
स्टँडिंग कमेटयांतच होतें व प्रतिनिधीसभेला त्यांचेंच धोरण स्वीकारावें लागतें.
अशा प्रकारच्या अनेक स्टँडिंग कमेटया असतात. त्यांत ‘ कमेटी ऑफ
वेज अँड मीन्स ’ आणि ‘ अॅप्रोप्रिएशन कमेटी ’ या प्रमुख आहेत. पहि-
लीकडे करांचें काम असतें व दुसरीकडे खर्चाचें काम असतें. याशिवाय
‘कमेटी ऑफ रूल्स’ ही कोणतें काम केव्हां करावयाचें हें ठरवून प्रतिनिधी-
सभेचें वेळापत्रक तयार करते. या कमेटीचा अध्यक्ष स्पीकर असत असे; परंतु
आतां तो त्या कमेटीचा सभासदही नसतो. मात्र तिनें ठरविलेल्या निय-
मांच्या अर्थासंबंधीं निर्णय देण्याचा अधिकार त्याला आहे.

कोणताही मसुदा दोन्ही सभांत पसार व्हावा लागतो व त्यानंतर
राष्ट्राध्यक्षाच्या सहीनें तो कायदा होऊं शकतो. मसुदा एका सभेनें पास

लोकसभेचे अधिकार.

केला व दुसऱ्या सभेनें त्यांत फेरफार केल्यास
त्या फेरफारासह पुनः पहिल्या सभेनें तो पास
केल्यावर मग तो राष्ट्राध्यक्षाकडे सहीला
जातो. उत्पन्नासंबंधीचे मसुदे प्रतिनिधीसभेंतच प्रथम पुढें आले पाहिजेत;
परंतु त्यांत फेरफार सुचविण्याचा अधिकार महाजनसभेला आहे. कोणत्याही
सभेचें काम सुरू होण्यास व चालू राहाण्यास सभासदांपैकीं निम्म्यांहून अधिक
सभासद हजर असलेच पाहिजेत. राष्ट्राध्यक्षाला दोन्ही सभांनीं पास केलेल्या
मसुद्यावर सही न करण्याचा अधिकार आहे. त्याला विचाराकरितां दहा दिवस
मुदत दिलेली असते. या मुदतींत त्यानें सही केली किंवा कांहींच केलें
नाहीं तर त्या मसुद्याला कायद्याचें स्वरूप प्राप्त होतें. परंतु त्या मुदतींत
त्यानें जर तो मसुदा अमान्य म्हणून फिरून लोकसभेकडे पाठविला तर

तो कायदा बनण्यास प्रत्येक सभेंत दोनतृतीयांश बहुमतानें पसार व्हावा लागतो. तसें बहुमत मिळालें नाहीं तर त्याला कायद्याचें स्वरूप प्राप्त होत नाहीं.

महाजनसभा व प्रतिनिधिसभा यांच्या सभासदांस प्रत्येकीं दरसाल ७५०० डॉलर पगार मिळतो, व शिवाय वाटखर्चाकरितां दरमैली भत्ता मिळतो. लोकसभेच्या कोणत्याही सभासदास अमेरिकेंतील कोणतीही पगारी जागा मिळूं शकत नाहीं, तसेंच कोणाही सरकारी नोकरास—तो नोकर असें-पर्यंत—कोणत्याही सभेचें सभासद होतां येत नाहीं. संयुक्त सरकारच्या किंवा संस्थानी सरकारच्या कोणत्याही नोकरीला धर्मसंबंधीं अट नाहीं.

अंमलबजावणी खातें:—राज्यघटनेप्रमाणें अंमलबजावणी खात्याचा अधिपति राष्ट्राध्यक्ष हा आहे. त्याची दर चार वर्षांनीं निवडणूक होते. राज्य-घटनेप्रमाणें प्रत्येक संस्थानांतील लोकांनीं मतदार निवडावेत व त्या मतदारांनीं अध्यक्ष निवडावा असें ठरविलें आहे. प्रत्येक लीपईयरच्या पुढील सालच्या चार मार्चला ही निवडणूक होत असते. याचप्रमाणें दुय्यम राष्ट्राध्यक्षाचीहि निवड केली जाते, व तीहि तितक्याच मुदतीनें केली जाते. याचें मुख्य कार्य म्हणजे महाजनसभेचा अध्यक्ष होणें व राष्ट्राध्यक्ष मयत झाल्यास त्याचें काम चालविणें. राष्ट्राध्यक्ष हा अमेरीकेंतच जन्मलेला, अमेरिकेचा नागरिक असावा लागतो. त्याचें वय पस्तीस तरी असलें पाहिजे आणि तो अमे-रिकेचा चौदा वर्षांचा तरी रहिवासी असला पाहिजे. जरी एका मनुष्यानें किती वेळां राष्ट्राध्यक्ष व्हावें यासंबंधीं कांहीं कायदा नाहीं, तरी दोन्ही-पेक्षां अधिक वेळां कोणीहि अध्यक्ष होऊं नये असा सर्वमान्य प्रघात आहे. अमेरिकेंतील जे दोन प्रमुख राजकीय पक्ष आहेत त्यांच्या हातींच अध्य-क्षाच्या निवडणुकीचें बरेंच कार्य असतें. ज्या वेळीं राष्ट्राध्यक्षाची निवड व्हावयाची असेल त्याच्या पूर्वींच्या वसंतऋतूंत दोन्ही पक्षाच्या राष्ट्रीय (कन्व्हेन्शन्स) परिषदा भरतात. या परिषदांत आपल्या पक्षातर्फें राष्ट्रा-ध्यक्ष व दुय्यम राष्ट्राध्यक्ष यांच्या जागेसाठीं कोण उमेदवार उभे कराव-

याचें हें ठरविण्यांत येतें. तसेंच प्रत्येक संस्थानांतील राष्ट्राध्यक्षाचे मतदार यांचीहि निवडणूक संस्थानांतील पारिषदा करीत असतात. अर्थात् ज्या पक्षाला संस्थानांत बहुमत मिळालेलें असतें त्याच पक्षाला पुढेंहि सर्व राष्ट्रांत बहुमत मिळतें. तसेंच या राजकीय पक्षांच्या घटनेमुळें ज्या पक्षाचें बहुमत लोकसभेच्या सभासदांत असेल त्याच पक्षाचा राष्ट्राध्यक्ष निवडला जातो; कारण लोकसभेंतील सभासदांची निवडणूक होतांनाहीं, हे राजकीय पक्ष आपल्या बाजूचे लोक यावेत म्हणून प्रयत्न करीत असतात. या राजकीय पक्षांच्या संस्थाचें जाळें सर्व देशभर पसरलेलें असतें व त्यामुळें लोकसभा व अमलबजावणीखात्यांतील राष्ट्राध्यक्ष व इतर अधिकारी यांचें एक मत व्हावें अशी योजना आपोआपच घडून येते.

राष्ट्राध्यक्ष हा अंमलबजावणी खात्याचा अधिपति असल्यानें संयुक्त सरकारचे सर्व कायदे योग्य प्रकारें अमलांत आणले जातात किंवा नाहीं हें पाहाण्याची जबाबदारी त्याच्यावर असते. लष्करचें व आरमारचें मुख्य सेनापतित्व त्याच्याकडेच असतें. अमेरिकेचें पर-

राष्ट्राध्यक्ष.

राष्ट्रीय धोरण तोच ठरवितो. दुसऱ्या राष्ट्राचे वकील त्याच्याकडेच येतात व महाजनसभेच्या दोन तृतीयांश बहुमतानें तोच इतर राष्ट्रांशीं तह करतो. संयुक्त सरकारचे सर्व आधिकारी तोच नेमतो. त्याला कोणासही गुन्ह्याबद्दल क्षमा करण्याचा अधिकार दिलेला आहे. महाजनसभेची अनुमति घेऊनच त्यानें सर्व नेमणुका कराव्यात असें जरी ठरलेलें आहे तरी या कामांत महाजनसभेची फारशी हुकमत चालत नाहीं. परराष्ट्रीय वकील, मंत्रि, कायद्याचे सल्लागार, संयुक्त सरकारच्या कोर्टांतील न्यायाधीश व लष्करी, आरमारी वगैरे खात्यांतील मुख्य मुख्य अधिकारी यांच्या नेमणुकीच्या वेळीं मात्र महाजनसभेची संमति त्याला घ्यावी लागते, राष्ट्राध्यक्षाला अधिकाऱ्यांच्या नेमणुका करण्याचा हा जो अधिकार दिलेला आहे त्याचा कांहीं काळ

फारच दुरुपयोग होऊं लागला होता. प्रत्येक राष्ट्राध्यक्ष आला म्हणजे तो पूर्वीचे अधिकारी काढून टाकून आपल्या वशिल्याचे नवे अधिकारी नेमीत असे. याकरितां १८३३ मध्यें सिव्हिल सार्व्हिस ॲक्ट नांवाचा कायदा करून ब-याच जागा परीक्षा घेऊन भरण्याचें ठरविलें. परंतु अद्यापि सुद्धां जास्त महत्त्वाच्या जागा भरण्याची सत्ता राष्ट्राध्यक्षास आहे. याशिवाय वेळोवेळीं लोकसभेला संदेश पाठवून निरनिराळ्या सूचना करण्याचा अधिकारही त्याला दिलेला आहे. तसेंच कांहीं विशिष्ट महत्त्वाच्या कामाकरितां लोकसभा भरविण्याचा व बरखास्त करण्याचा त्यास अधिकार आहे.

मंत्रि.

राष्ट्राध्यक्षाला मदत करण्यासाठीं निरनिराळीं खातीं निरनिराळ्या मंत्र्यांच्या हातीं दिलेलीं असतात व अंमलबजावणीचें मुख्य कार्य या मंत्र्याकडूनच केलें जातें. सध्यां असे दहा मंत्रि आहेत. या दहा मंत्र्यांचें मंत्रिमंडळ होतें. या शिवाय कांहीं मंत्रि असतात; परंतु त्यांचा मंत्रिमंडळांत समावेश होत नाहीं. इंग्लंडांतील मंत्रिमंडळ हें लोकसभेला जबाबदार असतें. अमेरिकेंतील मंत्रिमंडळाचा लोकसभेशीं मुळींच संबंध नाहीं. तेथील मंत्रि हे लोकसभेचे सभासद नसतात व लोकसभेंत हजरही राहात नाहींत. तें फक्त राष्ट्राध्यक्षाला जबादार असतात. लोकसभेला त्यांना राजीनामे देण्यास भाग पाडतां येत नाहीं. या पद्धतीला स्वतंत्र प्रधानमंडळाची राज्यव्यवस्था म्हणतां येईल. दहा मंत्रि येणेंप्रमाणें आहेत. (१) सेक्रेटरी ऑफ स्टेट. याच्या हाताखालीं डिपार्टमेंट ऑफ स्टेट हें खातें आहे, हा परराष्ट्रीय मंत्रि आहे. (२) खजिन्याच्या खात्यावर सेक्रेटरी ऑफ ट्रेझरी. (३) युद्धखात्यावर सेक्रेटरी ऑफ वॉर. (४) न्यायखात्यावर ॲटर्नी जनरल. (५) पोस्ट खात्यावर पोस्टमास्तर जनरल. (६) आरमार खात्यावर सेक्रेटरी ऑफ नेव्ही. (७) अंतर्गत व्यवस्थेसाठीं सेक्रेटरी ऑफ इंटीरिअर; याच्याकडे अनेक कामें असतात. (८) शेतकी खात्यावर सेक्रेटरी ऑफ ॲग्रिक-

ल्वर. (९) व्यापारखात्यावर सेक्रेटरी ऑफ कॉमर्स. आणि (१०) मजुरांच्या खात्यावर सेक्रेटरी ऑफ लेबर. असे मंत्रि असतात. यापैकीं पुष्कळ मंत्र्यांचें काम फक्त माहिती गोळा करणें आणि सूचना करणें हेंच असतें, कारण त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याचें काम संस्थानी सरकारांच्या अधिकाऱ्यांकडेच असतें.

न्यायासनें.

न्यायासनें:—संयुक्त सरकारचें सर्वांत श्रेष्ठ दर्जाचें न्यायासन म्हणजे वॉशिंग्टन येथील सुप्रीम कोर्ट हेंच होय. येथें एक सर न्यायाधीश व आठ इतर न्यायाधीश असतात. यांच्यापुढें खालच्या दर्जाच्या न्यायासनावरील अपिलें चालतात व कांहीं मूळ कामेंही चालतात. ज्या खटल्यांत सरकार पक्षकार आहे असे खटले, सरकारी वकील किंवा परराष्ट्रीय मंत्रि यांच्या संबंधीं खटले, हे सर्व प्रथमपासून सुप्रीम कोर्टापुढें चालू शकतात. इतर काम अपिलांचेंच असतें. याच्या खालीं सार्किट कोर्टें आहेत. यांत दोन प्रकार आहेत. (१) सार्किट कोर्टें (२) अपिलांचीं सार्किट कोर्टें. एकंदर देशाचीं नऊ सार्किट्स केलेली आहेत, व त्यांपैकीं प्रत्येकांत एकेक कोर्ट असून त्यावर सुप्रीम कोर्टांतील एकेका न्यायाधीशानें काम करावें असें ठरलें आहे. दर दोन वर्षांतून एकदां तरी प्रत्येक सार्किटमध्यें कोर्ट भरलेंच पाहिजे असा नियम आहे. सुप्रीम कोर्टांतील न्यायाधीशांकडून सर्व काम होत नाहीं म्हणून सार्किट न्यायाधीश नेमलेले असून त्यांचीं स्वतंत्र कोर्टें भरतात. प्रत्येक सार्किटचे पुनः डिस्ट्रिक्ट केलेले आहेत. असें एकंदर ६८ डिस्ट्रिक्ट आहेत, व त्यांपैकीं प्रत्येकांत एकेक डिस्ट्रिक्ट कोर्ट असतें. हींच संयुक्त सरकारचीं सर्वांत खालच्या दर्जाचीं कोर्टें होत. अपिलांचीं सार्किट कोर्टें हीं सुप्रीम कोर्टाचें कार्य हलकें व्हावें म्हणून स्थापण्यांत आलीं आहेत. अशा कोर्टांत एक सुप्रीम कोर्टांतील न्यायाधीश आणि दोन सार्किट न्यायाधीश, व एक डिस्ट्रिक्ट न्यायाधीश हे काम करतात. कांहीं बाबतींत सार्किट अपील

कोर्टावर अपील चालत नाहीं. परंतु राज्यघटनेसंबंधीचे प्रश्न, तहासंबंधीचे प्रश्न किंवा मृत्यूची शिक्षा या संबंधांत सुप्रीम कोर्टापुढें अपील चालूं शकतें. या शिवाय कांहीं विशेष कारणाकरितां संयुक्त सरकारचीं स्वतंत्र कोर्टें आहेत.

संयुक्त सरकारच्या न्यायाधीशांच्या नेमणुका राष्ट्राध्यक्ष महाजन सभेच्या अनुमतीनें करीत असतो व त्यांच्या नेमणुका तहाहयात (for life or during good behaviour) केलेल्या असतात. डिस्ट्रिक्ट ॲटर्नी आणि मार्शल यांच्या नेमणुका राष्ट्राध्यक्ष करतो. डिस्ट्रिक्ट ॲटर्नी हा, कोणी संयुक्त सरकारचा फौजदारी कायदा मोडल्यास त्याच्यावर खटला चालवितो. संयुक्त सरकारच्यातर्फे दिवाणी दावे चालवितो व इतर सरकारी वकिलाचीं कामें करतो. मार्शल हा सार्किट व डिस्ट्रिक्ट कोर्टांच्या हुकमांची अंमलबजावणी करतो व कोणास अटक करावयाची असल्यास हाच करतो.

संस्थानें.

संस्थानें:—अमेरिकेंतील संस्थानाचें आयुष्य संयुक्त राज्यापेक्षां पूर्वीपासूनचें आहे.संयुक्त राज्य स्थापन झालें तेव्हा प्रत्येक संस्थानाची स्वतंत्र पासूनचें राज्यघटना होती, आणि संयुक्त स्वराज्य निर्माण झाल्यावर त्यांना पोट राज्यांचें स्वरूप प्राप्त झालें. त्यावेळीं प्रत्येक संस्थानास आपलें स्वतंत्र प्रभुत्व नष्ट होणार याबद्दल बराच खेद झाला असला पाहिजे, परंतु निरुपाय म्हणून त्यांनीं संयुक्त राज्य स्थापन केलें. अर्थात् अगदीं अवश्य तेवढेच हक्क संयुक्त सरकारला देऊन बाकीचे शक्य तितके आपल्या हातीं ठेवावयाचे अशीच प्रत्येक संस्थानची प्रवृत्ति होती व त्या धोरणानेंच संयुक्त राज्याची घटना बनविलेली आहे. कांहीं विशिष्ट ठराविक अधिकार संयुक्त सरकारला देऊन बाकीचे सर्व अधिकार संस्थानी सरकारांनीं आपल्याकडे ठेविले आहेत. परराष्ट्रीय संबंध, युद्ध व त्या संबंधींच्या बाबी, नाणीं पाडणें, जकाती बसविणें, पोस्ट आणि खर्चास लागणारा पैसा गोळा करण्याची सत्ता अशा सारखे अधिकार

संयुक्त सरकारला दिलेले आहेत. यामुळें नागरिकांच्या नित्याच्या व्यवहारांत त्यांचा संबंध संयुक्त सरकारशीं विशेषसा येत नाहीं. मताधिकार कोणास असावा, राष्ट्राध्यक्ष व इतर लोकांच्या निवडणुकी कशा व्हाव्यात हें ठरविणें, (कांहीं अपवादानें) फौजदारी कायदे करणें, तुरुंगाची स्वच्छता ठेवणें, दिवाणी कायदे, व्यापारसंबंधीं कायदे, मजुरांचें प्रश्न, शिक्षण, परवाने देणें, दानधर्म वगैरे सर्व अधिकार संस्थानी सरकारासच आहेत. यांशिवाय ज्या बाबींचा अधिकार संयुक्त सरकारला दिलेला आहे पण त्या सरकारनें त्या संबंधीं कांहीं व्यवस्था केलीं नाहीं, त्यांसंबंधींही जरूर ती व्यवस्था करण्याचा अधिकार संस्थानांना आहे. नागरिकत्त्वाच्या अटी ठरविणें इत्यादि संबंधांत संयुक्त सरकारला अंशतः अधिकार आहेत.

संस्थानी सरकारचें सामान्य स्वरूप.

प्रत्येक संस्थांनची राज्यघटना लोकशाहीच्या (Republican) स्वरूपाची आहे. निरनिराळ्या संस्थांनच्या घटनेंत तपशिलाच्या बाबींत पुष्कळ भिन्नता दिसून येते; परंतु या सर्वांमध्यें अगदीं ठळक असें जें साम्य आहे. तें म्हणजे राजसत्तेच्या तीन अंगांचें–कायदे करणें, अंमलबजावणी करणें व न्याय देणें–अत्यंत पृथक्करण आणि स्वातंत्र्य. हें पृथक्करण संयुक्त सरकारापेक्षाही संस्थानी सरकारांत कांहीं बाबतींत जास्त व अनुचित असेंहि आहे. उदाहरणार्थ अंमलबजावणी खातें व न्यायखातें यांचा मुळींच संबंध राहूं नये या हेंतूनें न्यायाधीशसुद्धां लोंकनियुक्त नेमण्याची पद्धति बऱ्याच संस्थानांत आहे. ही पद्धति न्यायाच्या दृष्टींनें विघातक आहे.

द्विदळ पद्धति.

लोकसभाः—प्रत्येक संस्थानांत कायदे करणाऱ्या द्विदळ स्वरूपाच्या लोकसभा आहेत; एक महाजन सभा व दुसरी प्रतिनिधीसभा. दोहोंतील सभासद लोकनियुक्तच असतात; फक्त महाजनसभेंतील सभासद अधिक विस्तृत

क्षेत्रफळाच्या प्रदेशांकडून निवडला जातो. महाजनसभेंतलि सभासद अर्थात्च कमी असतात, व तिच्या सभासदांची निवडणूक चार वर्षांच्या मुदतीनें होत असते. प्रतिनिधिसभेच्या सभासदांची निवडणूक दर दोन वर्षांनीं होते. दोन्ही सभांच्या सभासदांचा पगार सारखाच असतो. दोघेही नागरिक असावेच लागतात. प्रायः वयाची अट दोघांनाहीं असते (महाजनांना एकवीस पासून तीसपर्यंत व प्रतिनिधींना एकवीस पासून पंचवीसपर्यंत कांहींतरी कमीतकमी वय असावें असे कायदे निरनिराळ्या संस्थानांत आहेत). याशिवाय संस्थानांत किंवा निवडणुकीच्या प्रदेशांत राहाण्याची अटही बहुधा असतेच.

तात्त्विक दृष्टीनें, ज्या ज्या बाबी संयुक्त सरकारच्या हातीं दिलेल्या नाहींत त्यांत कायदे करण्याचें स्वातंत्र्य संस्थानांतील लोकसभांना आहे. परंतु

संस्थानी लोकसभांचें अधिकार क्षेत्र.

या त्यांच्या स्वातंत्र्याला संस्थानी राज्यघटनांनीं बरींच बंधनें घातलीं आहेत. तसेंच कांहीं कांहीं ठिकाणीं लोकसभेच्या कार्यपद्धती-संबंधीं आणि बैठकीच्या मुदतीसंबंधींसुद्धां राज्यघटनांनीं नियम ठरवून दिलेले आहेत. त्यांना धरूनच लोकसभेची सर्व कार्यें चालावीं लागतात. हीं बंधनें घालण्याचा हेतु लोकसभांनीं नागरिकांच्या व्यक्तिस्वातंत्र्यावर गदा आणूं नये हाच आहे.

लोकसभेंतील दोन्ही सभांची अंतर्घटना जवळ जवळ संयुक्त सरकारच्या लोकसभेसारखीच आहे. प्रतिनिधीसभा आपला अध्यक्ष आपण निवडते

कार्य-पद्धति.

व महाजनसभेचा अध्यक्ष लेफ्टनंट गव्हर्नर हा असतो. कायद्याचे मसुदे पास होण्याची पद्धतीही वरिष्ठ सरकाराप्रमाणेंच आहे. प्रत्येक कायद्याचा मसुदा दोन्ही सभांत पसार व्हावा लागतो व त्यानंतर त्यावर गव्हर्नरची सही होते. स्टँडिंग कमेट्या नेमण्याची व्यवस्था वरिष्ठ सरकारप्रमा-

णेंच असते; व त्याचें कार्यही तसेंच असतें. दोन्ही सभांचीं कार्यें सारखींच असतात. मात्र कांहीं संस्थानांत आयव्ययासंबंधींचे मसुदे प्रथम प्रतिनिधी-सभेंतच आले पाहिजेत असा कायदा आहे. कोणा अधिकाऱ्यावर प्रतिनिधी-सभेनें इंपीचमेंट (खटला) केल्यास तें काम महाजनसभेपुढें चालतें; व गव्हर्नरनें केलेल्या नेमणुका मान्य किंवा आमान्य करण्याचाही अधिकार कांहीं ठिकाणीं महाजनसभेला दिलेला आहे.

संस्थानांतील अंमल-बजावणी खात्याचा अधिपति गव्हर्नर हा असतो. त्याची निवडणूक सर्व मतदारांकडून दोनपासून चार वर्षांच्या मुदतीनें होत असते. मॅसॅच्युसेट्स् व ऱ्होड आयलंड

अंमलबजावणीचें अंग.

यांमध्यें त्याची निवडणुक दरसाल होते. बऱ्याच संस्थानांत लेफ्टनंट गव्हर्नर असतात. या शिवाय सेक्रेटरीज्, खजिनदार, ॲटर्नीजनरल वगैरे अधिकारी असतात. कांहीं ठिकाणीं कंट्रोलर, ऑडिटर व सुपरिंटेंडेंट ऑफ एज्युकेशन हेही अधिकारी असतात. कित्येक ठिकाणीं गव्हर्नरांना कौन्सिलें दिलेलीं असतात. गव्हर्नरांप्रमाणेंच संस्थानांतलि इतर अधिकारीही लोकनियुक्त असून ते लोकांनाच जबाबदार असतात. संयुक्त सरकारच्या अधिकाऱ्याच्या नेमणुका राष्ट्राध्यक्ष करतो व ते त्याला जबाबदार असतात. अशी स्थिति संस्थानांत नाहीं. यावरून हें दिसून येईल कीं संयुक्त सरकारांत राष्ट्राध्यक्ष ज्या अर्थानें अंमलबजावणी खात्याचा अधिपति आहे त्या अर्थानें संस्थानांत गव्हर्नर हा अंमलबजावणी खात्याचा अधिपति नाहीं. अनेक लोकनियुक्त अधिकाऱ्यांपैकीं तो एक आहे. संस्थानांतलि सर्व अधिकारी खरोखर लोकांचे नोकर आहेत, त्यांना कामावरून दूर करावयाचे असले तरी प्रति-निधिसभेनें यांच्यावर इंपीचमेंट केल्याशिवाय काढतां येत नाहीं.

संस्थानी सरकारासंबंधीं आणखी एक विशेष गोष्ट ध्यानांत ठेवण्या-सारखी आहे. संस्थानी सरकारचे नोकर हे खरोखर कोणत्याच गोष्टीची

संस्थानी सरकारच्या अंमलबजावणी

प्रत्यक्ष अंमलबजावणी करीत नाहींत. खरा राज्यकारभार स्थानिक संस्थांच्या नोकराकडूनच उरकला जातो. संस्थांनी सरकारच्या अधिकाऱ्याचें काम फक्त देखरेख करण्याचें असतें. शिक्षणखात्यांतसुद्धां संस्थानी सरकारचें काम देखरेख करण्याचेंच आहे. त्या खात्यांतील खरे अधिकार स्थानिक संस्था उपभोगितात. अशा प्रकारें गव्हर्नरला फारच थोडी सत्ता आहे हें ध्यानांत येईल. आपल्या अधिकार क्षेत्रांत कायद्यांची योग्य अंमलबजावणी होत आहे कीं नाहीं हें पाहण्याचेंच त्याचें मुख्य कार्य आहे. लोकसभेला राज्यकारभाराची माहिती देऊन कायद्यासंबंधीं सूचना करणें हें त्याचें कर्तव्य आहे. लोकसभेंत कायद्याचें मसुदे आणणें हें त्याचें काम नाहीं. कांहीं ठराविक सभासदांनी विनंति केल्यास त्याला लोकसभेची जादा बैठक भरवितां येतें. दोन संस्थानांशिवाय इतर संस्थानांत लोकसभेनें पसार केलेला कायदा अमान्य (Veto) करण्याचा त्याला अधिकार आहे, परंतु अमान्य केलेले (Veto) मसुदेसुद्धां दोनतृतीयांश किंवा तीनपंचमांश बहुमतानें दोन्ही सभांत पुनः पास झाल्यास कायदे होऊं शकतात. याशिवाय कांहीं गुन्हेगारांना माफी देण्याचा वगैरे त्याला मर्यादित हक्क आहे. अधिकारी नेमण्याचा त्याचा अधिकार अगदींच संकुचित आहे हें वर आलेंच आहे.

न्यायासनें:—संयुक्त सरकारचीं न्यायासनें व संस्थानी सरकारचीं न्यायासनें हीं अगदीं स्वतंत्र आहेत. प्रत्येक संस्थानांत स्वतंत्र अशी न्यायासनांची संघटना आहे. संयुक्त सरकारच्या न्यायासनांचा या न्यायासनांवर परिणाम एवढाच घडतो कीं, त्यांच्यामुळें यांच्यापुढें येणारे विषय मर्यादित झालेले आहेत.

निरनिराळ्या संस्थानांतील न्यायासनांची व्यवस्था बरीच भिन्न आहे, तरी त्यांचे सामान्य स्वरूप पुढीलप्रमाणें आहे. (१) अगदीं खालच्या

दर्जाची कोर्टें म्हणजे जास्टिस ऑफ दि पीस किंवा शहरांत पोलीस जज्ज यांचीं होत. यांच्यापुढें लहान लहान दिवाणी व फौजदारी दोन्ही कामें चालतात. मोठ्या खटल्यांची चौकशी करून ते खटले कमिट करून वरच्या कोर्टाकडे पाठवितात. (२) यांच्यावरचीं कोर्टें म्हणजे कौंटीकोर्टें किंवा म्युनिसिपल कोर्टें. यांच्यापुढें अधिक मोठीं दिवाणी व फौजदारी कामें चालतात, व खालच्या कोर्टांवरचीं अपिलें चालतात. (३) यांच्यावर सर्किट कोर्टें आहेत. यांच्यापुढें खालच्या दोन्हीं कोर्टांपुढें न चालणारीं कामें व त्यांच्यावरील अपिलें चालतात. (४) सर्वांत श्रेष्ठ दर्जाचें कोर्ट म्हणजे सुप्रीम कोर्ट हें आहे. याच्यापुढें फक्त अपिलेंच चालतात. यांत एक सर न्यायाधीश व इतर न्यायाधीश असतात. कांहीं संस्थानांत कांहीं विशिष्ट कामें चालविणारीं जादा कोर्टें आहेत. तसेंच निरनिराळ्या संस्थानांत वर दिलेल्या संघटनेची भिन्न भिन्न स्वरूपें दृष्टीस पडतात.

न्यायखात्यासंबंधीं सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे न्यायाधीशांची नेमणूक. प्राय: संस्थानांतील सर्व न्यायाधीश लोकनियुक्त असतात. कांहीं

लोकनियुक्त न्यायाधीश.

ठिकाणीं त्याची निवडणूक लोकसभा करतात व कांहीं ठिकाणीं गव्हर्नर महाजन सभेच्या अनुमतीनें त्यांची नेमणूक करतो. त्यांची नोकरीची मुदतही दोन वर्षांपासून कायम तहाहयांत (During good behaviour) निरनिराळी असते. त्यांच्या पात्रतेसंबंधानेंसुद्धां ते कायदेपंडित असले पाहिजेत असा नियम अगदीं थोड्या संस्थानांतच आहे. तरी प्राय: ते वकिलीच्या धंद्यांतीलच असतात. तसेंच नागरिकत्व, वसति, वय (पंचवीसपासून तीसपर्यंत) यासंबंधीं अटी बहुधा आहेतच. न्यायासनाचे इतर नोकरही लोकनियुक्तच असतात. उदाहरणार्थ—कोर्ट क्लार्क, शेरीफ वगैरे सुप्रीम कोर्टांतील न्यायाधीशांची निवड संस्थानांतील सर्व लोकांकडून केली जाते; व इतर

न्यायाधीशांची निवड त्या त्या प्रदेशांतील किंवा भागांतील लोकांकडून होत असते.

स्थानिक स्वराज्यः—अमेरिकेच्या राज्यघटनेंत स्थानिक स्वराज्याचें महत्त्व फार आहे. तेथें स्थानिक स्वराज्याच्या संस्थांना जितकें स्वातंत्र्य आहे व त्यांच्या कार्याची व्याप्ति आहे, तितकें स्वातंत्र्य किंवा तितकी कार्यव्याप्ति दुसऱ्या कोणत्याच देशांतील स्थानिक संस्थांना नाहीं, असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं.अमेरिकेंत कायदे करण्याची सत्ता मध्यवर्ति सरकारांत केंद्रीभूत झालेली आहे; परंतु अंमलबजावणीची सभा बहुतेक स्थानिक संस्थांच्याच हातीं देण्यांत आली आहे. न्यायदानाचें कार्यही थोड्या अंशानें याच स्थानिक संस्थांकडे दिलेलें आहे. पोलीस, तुरुंग, शिक्षण, आरोग्य, वाचनालयें, दारिद्र्यनिवारण, रस्ते व पूल, कर बसविणें व गोळा करणें, व्यापारांना परवाने देणें, खालच्या दर्जाचीं कोर्टें चालविणें, हीं सर्व कामें संस्थानी कायद्यांना अनुसरून स्थानिक स्वराज्यांतील अधिकारी करीत असतात. मात्र कायदे करण्याचें काम स्थानिक स्वराज्याच्या हातीं नाहीं; त्यांची अंमलबजावणी करणें हेंच स्थानिक अधिकाऱ्यांचें मुख्य कार्य गणलें जातें. ज्या ठिकाणीं कायदे करणाऱ्या स्थानिकसंस्था आहेत तेथें त्यांचा तो अधिकार त्यांना दिलेल्या सनदांनीं (charters) अगदीं मर्यादित केलेला आहे. इंग्लंडांत ज्याप्रमाणें स्थानिक स्वराज्यावर देखरेख करण्यासाठीं स्थानिक स्वराज्य बोर्ड म्हणून मध्यवर्ति सरकारांत एक खातें आहे, तसें खातें अमेरिकेंत नाहीं. मध्यवर्ति सरकार आपली हुकमत न्यायसभामार्फत स्थानिक सरकारावर चालवितें.

अमेरिकेंतील स्थानिक संस्था तीन प्रकारच्या आहेत. ते तीन प्रकार म्हणजे टौनशिप, कौंटी व मिश्र. ज्या ठिकाणीं टौनशिप ही संस्था असते तेथें सर्व सत्ता नगरसभेच्या (town meeting) हातीं

स्थानिक संस्थांचे तीन प्रकार.

असते. नगरसभेंत सर्व मतदार नागरिकांचा समावेश होतो. ही सभा सामान्यतः वर्षांतून एकदां भरते व गरज पडल्यास आणखीही भरते. या सभेंत सर्व स्थानिक अधिकाऱ्यांची निवडणूक होते. यांना सिलेक्ट मेन म्हणतात. त्यांत टौन क्लार्क, खजिनदार, ॲसेसर, स्कूल कमेटी, वाचनालयाचे ट्रस्टी, कॉन्स्टेबल हे अधिकारी असतात. हे नगर सभेला जबाबदार असतात; त्यांचे हिशेब तिच्याकडून तपासले जातात आणि तीच त्यांना लागणारा पैसा मंजूर करते. नगर सभेच्या अध्यक्षाला मॉडरेटर म्हणतात.

ज्या ज्या ठिकाणीं कौंटी होण्यापूर्वी टौनशिप ही संस्था अस्तित्वांत आली तेथें अशा प्रकारची व्यवस्था असते. यानंतर तेथें कौंटीज् निर्माण होऊन त्यांच्याकडे कांहीं न्यायाचें व कांहीं राज्यकारभाराचें काम दिलेलें आहे. कांहीं ठिकाणीं टौनशिपच्या आधीं कौंटीची संघटना झालेली आहे. त्या ठिकाणीं कौंटी व टौनशिप यांचा अधिक निकट संबंध आहे व तेथें टौनशिप हा कौंटीचा एक विभाग गणला जातो.

दक्षिण अमेरिकेंत कौंटी या संस्थेला फार महत्त्व प्राप्त झालेलें आहे. तेथें स्थानिक अधिकाऱ्यांवर प्रमुख कौंटी कमिशनर्स नांवाचे अधिकारी असतात. यांशिवाय ट्रेझरर, ऑडिटर, सुपरिंटेंडंट ऑफ रोड व एज्युकेशन असे लोकनियुक्त अधिकारी असतात. ते कौंटी कमिशनरांच्या हाताखालीं कामें करतात. तसेंच कौंटीमध्यें न्यायदानाच्या व्यवस्थेसाठीं शेरीफ, कॉरोनर, ॲटर्नी वगैरे अधिकारीही असतात. शिक्षणाची देखरेख, रस्ते, तुरुंग इत्यादि गोष्टींची व्यवस्था करणें हें कौंटीचें कर्तव्य गणलें जातें.

ज्या ठिकाणीं कौंटी व टौनशिप अशा दोन्ही संस्था आहेत तेथें हीं कामें वाटून दिलेलीं असतात. कोठें टौनशिपमधील प्रमुख अधिकारी हेच कौंटींतील अधिकारी असतात तर कोठें कौंटीचे अधिकारी टौनशिपकडून

निवडले जातात. कांहीं ठिकाणीं टौनशिपला अधिक अधिकार असतात तर
कांहीं ठिकाणीं कौंटीला अधिक अधिकार असतात.

कोणतीही व्यवस्था असली तरी शिक्षणाच्या कामाकरितां लहान
लहान विभाग केलेले असतात, व त्या कार्याकरितां डिस्ट्रिक्ट डायरेक्टर्स
किंवा ट्रस्टी या नांवाचे अधिकारी नेमलेले
असतात. ते आपापल्या विभागांतील शिक्ष-
णाची व्यवस्था स्वतंत्रपणें पाहातात. यामुळें
निरनिराळ्या ठिकाणच्या शिक्षण व्यवस्थेंत
असावी तितकी सुसंगति व एकवाक्यता दिसून येत नाहीं.

शिक्षण व स्थानिक स्वराज्य

स्थानिक संस्थांचा कर बसविण्याचा अधिकार कायद्यानें मर्यादित
केलेला असतो. कौंटी व टौनशिप यांना संस्थानी सरकारनें बसविलेले कर
वसूल करण्याचें कामही करावें लागतें. कांहीं ठिकाणच्या लोकांना कर
अधिक द्यावे लागतात तर कांहीं ठिकाणच्यांस कमी द्यावे लागतात. ही
विषमता दूर करण्यासाठीं बोर्ड्स् ऑफ् ईकलायझेशन नेमलेलीं आहेत.

मोठमोठया शहरांत म्युनिसिपालिट्या आहेत व त्या बहुधा कौंटीच्या
हाताखालीं असतात; परंतु फार मोठीं गांवें असलीं म्हणजे त्यांना कौंटीचेच
सर्व अधिकार असतात. निरनिराळ्या म्युनिसिपालिटयांची घटना व अधिकार
यांत बराच फरक आहे. या म्युनिसिपालिटयांचे अधिकार इतर स्थानिक
संस्थापेक्षां अधिक असतात. न्यायदानाचेही त्यांचे अधिकार जास्त आहेत.
तेथील अधिकाऱ्यांचीं नांवें मेयर, ॲल्डरमेन, कौन्सिलर वगैरे इंग्लंड सारखींच
आहेत. बऱ्याच शहरांत बोर्ड ऑफ् ॲल्डरमेन व बोर्ड ऑफ कौन्सिलर्स
अशा दोन सभा असतात. न्यूयॉर्क संस्थानांतील म्युनिसिपालिटयांत या
दोहोंपैकीं कोणतें तरी एकच बोर्ड असतें.

प्रकरण २ रें.

प्रचलित शासनसंस्थाः—फ्रान्स, जर्मनी व जपान.

१ फ्रान्स.

सध्यांची फ्रान्सची राज्यघटना १८७१–७६ या काळांत बनलेली आहे. तीही अमेरिकेप्रमाणेंच लोकशाहीच्या स्वरूपाची आहे. तेथील राज्यघ-टना बदलण्याचा अधिकार नॅशनल अॅसेंब्ली नांवाच्या लोकसभेला आहे. ती लोकसभा द्विदळ स्वरूपाची आहे. एका दळास चेंबर ऑफ डेप्युटीज् (प्रतिनिधिसभा) व दुसऱ्याला सीनेट (महाजनसभा) असें म्हणतात.

नॅशनल असेंब्ली.

या दोन्ही सभांची एक बैठक झाली म्हणजे त्या सभेला नॅशनल असेंब्ली असें म्हणतात. प्रतिनिधिसभा व महाजनसभा या नेहमींचें काम पहाण्यासाठीं पॅरिस येथें भरतात; परंतु नॅशनल असेंब्ली या नात्यानें दोन्ही सभांची एकत्र बैठक व्हावयाची असेल तर ती व्हर्सेलीस येथें होते. राज्यघटनेप्रमाणें लोकशाही बदलून दुसरी राज्यव्यवस्था स्थापन करण्याचा अधिकार नॅशनल असेंब्लीला नाहीं असें ठरलें आहे; परंतु तिला ज्याअर्थीं राज्यघटनेपैकीं वाटेल तें कलम बदलण्याचा अधिकार आहे त्या अर्थीं हेंही कलम तिला बदलतां येणें शक्य आहे. नॅशनल असेंब्लीचीं दोन कामें आहेत; एक राज्यघटनेंत फेरफार करणें व दुसरें राष्ट्राध्यक्षाची निवडणूक करणें. प्रतिनिधिसभा व महाजनसभा या दोन्ही सभांची एकवाक्यता होऊन राज्यघटनेंत फेरबदल करावा असें ठरलें म्हणजे तो प्रश्न नॅशनल असेंब्ली पुढें ठेवण्यांत येतो. राज्यघटनेंत फेरफार करावयाचे झाले किंवा राष्ट्राध्यक्षाची निवडणूक करावयाची असली, तरी हीं कार्यें केवळ बहुमतानें होऊं शकतात. तसेंच महाजनसभा व प्रतिनिधिसभा

यांनीं केलेला कायदा राज्यघटनेनें त्यांना दिलेल्या अधिकारांत आहे किंवा नाहीं हें ठरविण्याचाही अधिकार त्या सभांनाच आहे; पण अमेरिकेंत हा अधिकार न्यायासनांना दिलेला आहे.

महाजनसभा.

महाजनसभेंत एकंदर तीनशें सभासद असतात. ते फ्रान्सचे नागरिक असून त्यांचें वय निदान चाळीस तरी असलें पाहिजे. त्यांची निवडणूक नऊ वर्षांच्या मुदतीनें होते व त्यांच्यापैकीं प्रत्येक एक तृतीयांश सभासदांची दर तीन वर्षांनीं निवडणूक होते; म्हणजे दर तीन वर्षांनीं त्यांच्यापैकी शंभर सभासद मुदत भरल्यामुळें जातात व त्यांच्या जागा पुनः भरल्या जातात. अशाप्रकारें नऊ वर्षांनीं सर्व सभासद नव्या निवडणुकीचे येतात. निवडणुकी प्रत्यक्ष लोकांकडून न होतां त्या करितां तयार केलेल्या खास मतदारसंघाकडून होतात. या मतदारसंघांत (Electoral College) प्रत्येक कम्यून (गांव) नें निवडलेले प्रतिनिधी (लोकसंख्येच्या मानानें) आणि डिपार्टमेंट मधील डेप्युटी, कौन्सिलर्स जनरल व डिस्ट्रिक्ट कौन्सिलर्स यांचा समावेश होतो. कांहीं कारणानें एखाद्या सभासदाची जागा रिकामी झाल्यास कोणत्या डिपार्टमेंटकडून ती जागा भरली जावी हें चिठ्या टाकून ठरविलें जातें. पदभ्रष्ट झालेल्या पूर्वींच्या राजघराण्यांतील कोणाही इसमास कोणत्याही सभेचे सभासद होतां येत नाहीं.

प्रतिनिधिसभा व महाजनसभा

कायद्याच्या दृष्टीनें आयव्ययाच्या प्रश्नाखेरीज इतर कामांत महाजनसभेचे अधिकार प्रतिनिधिसभे इतकेच ठरलेले आहेत; तरी प्रत्यक्ष व्यवहारांत बहुतेक सत्ता प्रतिनिधिसभेलाच मिळते. आयव्यया संबंधीचे मसुदे प्रथम प्रतिनिधिसभेलाच आहे. आयव्यया संबंधीचे मसुदे प्रथम प्रतिनिधिसभेपुढेंच आले पाहिजेत; पण महाजनसभेला त्यांत

फेरफार सुचवितां येतात. शिवाय मंत्रिमंडळ इंग्लंडांतल्याप्रमाणें प्रतिनिधिसभेसच जबाबदार असतें.

प्रतिनिधिसभा सर्व: पुरुष नागरिकांकडून चार वर्षांच्या मुदतीनें निवडली जाते. ज्याचें वय एकविसांहून जास्त आहे, जो लष्करी नोकरींत नाहीं व जो कोणत्याही गांवांत सहा महिने राहिलेला आहे अशा प्रत्येक नागरिकास दुसऱ्या कांहीं कारणानें त्याचा मताधिकार काढून घेतला नसल्यास, मत देण्याचा अधिकार आहे. प्रतिनिधींचें वय पंचवीसच्या खालीं नसून ते नागरिक असले पाहिजेत. :सध्यां प्रतिनिधिसभेंत एकंदर ६०२ सभासद आहेत. सामान्यतः प्रत्येक ॲरॉंडिसमेंटला एक प्रतिनिधि निवडण्याचा अधिकार आहे. एखाद्या ॲरॉंडिसमेंट (देशाचा एक विभाग) मधील संख्या एक लक्षाहून जास्त असल्यास त्याचे दोन किंवा अधिक विभाग केले जातात. प्रमुख वसाहतींनाही प्रतिनिधी पाठविण्याचा अधिकार आहे. अल्जीअर्सला पांच, कोचीनचायना, सेनेगाल व हिंदुस्तानांतील फ्रेंच मुलुख यांना प्रत्येकीं एक, असे प्रतिनिधी पाठविण्याचा अधिकार आहे. निवडणुकीची तारीख राष्ट्राध्यक्षाच्या हुकमावरून ठरते. प्रतिनिधिसभेची मुदत भरल्यानंतर साठ दिवसांच्या आंत नव्या निवडणुकीचा दिवस राष्ट्राध्यक्षानें ठरविला पाहिजे. त्यानेंच ती सभा बरखास्त केली असल्यास दोन महिन्यांच्या आंत नवी निवडणूक केली पाहिजे. निवडणुकीच्या दिवसापूर्वीं निदान वीस दिवस तरी तो दिवस जाहीर झाला पाहिजे.

प्रतिनिधि-सभा.

अंमलबजावणी खात्याचा अधिपति राष्ट्राध्यक्ष हा आहे. त्याची निवडणूक सात वर्षांच्या मुदतीनें नॅशनल असेंब्लीकडून केली जाते. त्याला वयाची मुळींच अट नाहीं; फक्त तो राजघराण्यांतील इसम नसला म्हणजे

अंमलबजावणी खातें.

झालें. कोणाही फ्रेंच नागरिकास निवडून येण्यास हरकत नाहीं. तो लोकसभेचे कायदे जाहीर करून त्यांची अमलबजावणी करतो. सरकारी नोकरींतील सर्व अधिकाऱ्यांच्या नेमणुका करण्याचा व त्यांना बडतर्फ करण्याचा त्याला अधिकार आहे. लोकसभेचे कायदे जरी अमान्य (Veto) करण्याचा त्याला अधिकार नाहीं, तरी ते पुनः विचारासाठीं लोकसभेकडे पाठविण्याचा अधिकार आहे. त्याला कोणत्याही सभेची बैठक एक महिनापर्यंत तहकूब करतां येते. कोणतीही बैठक पांच महिने काम झाल्यावर त्याला बंद करतां येते व जादा बैठक केव्हांही बंद ठेवतां येते. नवी निवडणूक झाल्यावर दहा दिवसांच्या आंत त्यानें सभांची बैठक बोलावलीच पाहिजे. गुन्हेगारास माफी देण्याचा त्याला अधिकार आहे. परराष्ट्राशीं तह करण्याचाही त्याला अधिकार आहे. तरीपण फ्रान्स किंवा फ्रान्सच्या वसाहती यांच्या क्षेत्रफळाशीं संबंध येणाऱ्या तहांना लोकसभेची संमति अवश्य लागते. लोकसभेच्या संमतीनें त्याला युद्ध पुकारण्यास मुभा आहे. त्याच्यावर फक्त देशद्रोहाच्या आरोपाबद्दल इंपीचमेंट होऊं शकते. हा खटला प्रतिनिधीसभा करते व तो महाजनसभेपुढें चालू शकतो.

फ्रान्समध्यें इंग्लंडप्रमाणेंच जबाबदार मंत्रिमंडळाची व्यवस्था आहे. जोंपर्यंत मंत्रिमंडळाच्या बाजूचें बहुमत लोकसभेंत आहे तोंपर्यंतच ते

जबाबदार मंत्रिमंडळ.

आपल्या पदावर राहूं शकतात; नाहीं तर त्यांनीं राजीनामे दिले पाहिजेत असा तेथें कायदाच केलेला आहे. इंग्लंडांत तसा कायदा नाहीं, तरी तसा प्रघात आहे. मंत्र्यांची निवड करण्याचें काम राष्ट्राध्यक्षाकडे आहे व तो त्यांची निवड बहुधा लोकसभेंतूनच करतो. कांहीं मंत्रि दोन्ही सभांत सभासद नाहींत असेही असतात. तथापि कोणत्याही मंत्र्यांना दोन्ही सभांत हजर राहून बोलतां

येते. जो ज्या सभेचा सभासद असेल त्या सभेंतच त्याला मत देतां येतें. मंत्रिमंडळ नेहमीं लोकसभेच्या विश्वासास पात्र असलें पाहिजे असा कायदा असल्यानें राष्ट्राध्यक्षाचा निवड करण्याचा अधिकार अगदींच संकुचित झालेला आहे. एका दृष्टीनें मंत्रि हे राष्ट्राध्यक्षाच्या हाताखालचे अधीकारी आहेत. त्यांना सर्व चर्चा त्याच्या समक्ष करावी लागते, व यावेळीं ते 'कौन्सिल ऑफ मिनिस्टर्स' गणले जातात. परंतु लोकसभेचें जबाबदार मंत्रिमंडळ (Cabinet) या नात्यानें त्याला मंत्रिमंडळाचें वर्चस्व मान्य करावें लागतें. राष्ट्राध्यक्षाच्या कोणत्याही हुकमावर मंत्र्याची सही नसेल तर त्याला मान्यता मिळणार नाहीं. तसेंच लोकसभेच्या विश्वासांतील मंत्र्याच्या अनुमतिशिवाय त्याला एक पैचा देखील खर्च करतां येणार नाहीं. प्रत्यक्ष त्याचा पगार व भत्ता हा सर्व वर्षाच्या अंदाजपत्रकाबरोबर मंजूर करून घेण्याचें काम आयव्ययाच्या मंत्र्याच्या हातीं असते. तात्पर्य, अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षाप्रमाणें फ्रान्सचा राष्ट्राध्यक्ष स्वतंत्र नसून इंग्लंडच्या राजाप्रमाणें त्याची बरीच सत्ता मंत्रिमंडळाच्या हातीं गेलेली आहे. फ्रान्समधलि मुख्य प्रधानास जी सत्ता आहे ती अमेरिकेंतील मुख्य प्रधानास नाहीं. अमेरिकेंतील मंत्रि सर्वस्वी राष्ट्राध्यक्षाला जबाबदार आहेत व लोकसभेशीं त्यांचा कांहीं संबंध नाहीं. तात्पर्य फ्रान्सची लोकशाही व इंग्लंडची लोकसत्ताक राजशाही यांच्या राज्यघटनेंत जितकें साम्य आहे तितकें फ्रान्सची लोकशाही व अमेरिकेची लोकशाही यांच्यामध्यें नाहीं. अमेरिकेंत कायदे करणें व अंमलबजावणी करणें हीं राजसत्तेचीं दोन अंगें अगदीं प्रथक् आहेत व परस्परांहून स्वतंत्र आहेत. परंतु इंग्लंड व फ्रान्स या देशांतील कायदे करणाऱ्या लोकसभांच्या ताब्यांत तेथील मंत्रिमंडळ आहे. इंग्लंडांत एक मंत्रिमंडळ जितका काळ टिकूं शकतें तितका काळ फ्रेंच मंत्रिमंडळ टिकूं शकत नाहीं. याचें एक मुख्य कारण म्हणजे इंग्लंडच्या लोकसभेंत बहुधा दोनच मोठे पक्ष अस-

इंग्लंड व फ्रान्स: तुलना.

तात; पण फ्रान्समध्यें लहान लहान अनेक पक्ष असतात. यामुळें कोणत्याही पक्षाला पुष्कळ वेळ आपल्या बाजूचें बहुमत राखणें फार कठीण जातें. तसेंच राज्यकाभारासंबंधी मंत्र्याला प्रश्न विचारण्याच्या हक्काचा उपयोग मंत्रिमंडळाला पदभ्रष्ट करण्याकडे बऱ्याच वेळां करण्यांत येतो. तेथें आधीं सूचना न देतांही मंत्रिमंडळांतील एखाद्या मंत्र्याला त्याच्या खात्यांतील राज्यकारभारासंबंधीं प्रश्न (Interpellation) विचारण्याचा हक्क लोकसभेच्या सभासदांना आहे. याचा अचानक उपयोग करून घेऊन केव्हांही मतें घेण्यांत येतात,व त्याचा निर्णय मंत्रिमंडळाविरुद्ध झाला तर मंत्रिमंडळाला राजीनामे द्यावे लागतात. फ्रान्समधील लोकसभेंत अनेक पक्ष असल्यामुळें एका मंडळांत नेहमीं एकाच पक्षाचे लोक असतात असें नाहीं. तसेंच पदभ्रष्ट झालेल्या मंत्रिमंडळापैकीं सुद्धां कांहीं मंत्रि नव्या मंत्रिमंडळांत येऊं शकतात. इंग्लंडांतील मंत्रिमंडळाकडे लोकसभेचें सर्व प्रकारचें नेतृत्व असतें, तशी स्थिति फ्रान्समध्यें नाहीं. फ्रान्समधील मंत्रिमंडळावर तेथील लोकसभेचा अधिक ताबा चालतो व लोकसभेच्याच धोरणाची त्याला अंमलबजावणी करावी लागते. याचा उलगडा होण्यासाठीं तेथील लोकसभेंतील कमेटीच्या पद्धतीचा विचार केला पाहिजे. मंत्रिमंडळानें आपल्या कामाची बारा खात्यांत वाटणी केलेली आहे व त्यापैकीं प्रत्येकांवर एकेक दोनदोन मंत्र्यांची योजना केलेली आहे. तीं खातीं:—युद्ध, न्याय, अंतर्गत व्यवस्था–(Interior), परराष्ट्रीय संबंध, आरमार, आयव्यय, वसाहती, शिक्षण,पब्लिक वर्क्स, व्यापार, उद्योगधंदे, पोस्ट व तार, शेती व सप्लाइज्, आणि मजूर, यांशिवाय शत्रूकडून परत मिळालेलें प्रांत आणि नवी रचना–(Reconstruction) या करितां दोन नवीं खातीं महायुद्धानंतर सुरू करण्यांत आलेलीं आहेत.

लोकसभेची बैठक चालू असतांना दरमहा प्रत्येक सभेचे ब्यूरो नांवाचें

विभाग करण्यांत येतात. महाजनसभेंत एकोणीस आणि प्रतिनिधिसभेंत अकरा ब्यूरो करण्यांत येतात. महाजनसभेंतील ब्यूरोमधून निरनिराळ्या विषयांच्य कमेट्या निवडल्या जातात. प्रतिनिधिसभेच्या ब्यूरोकडे निवडणुकीची शिफारसपत्रें तपासण्याचें काम असतें. तें झाल्यावर प्रतिनिधिसभेंत कमेट्या निवडण्याकरितां दुसऱ्या ब्यूरोची निवड होते. या ब्यूरो स्टँडिंग कमेटी खेरीज इतर खास कमेट्या निवडतात. पूर्वीं कमिट्या फक्त तात्पुरत्याच निवडल्या जात असत परंतु आतां वर्षभर टिकणाऱ्या स्टँटिंग कमेट्या निवडण्याचा प्रघात पडला आहे. महाजनसभेंत या स्टँटिंग कमेट्यांची निवड ब्यूरोकडून केली जाते, व प्रतिनिधिसभेंत त्या कमेट्यांत कोणीं काम करावें हें निरनिराळ्या पक्षांकडून ठरविलें जातें. जो पक्ष ज्या प्रमाणांत प्रतिनिधिसभेंत निवडून आला असेल त्या प्रमाणांत त्या पक्षाचे प्रतिनिधी प्रत्येक स्टँडिंग कमेटींत घेतले जातात. प्रतिनिधिसभेंतील अंदाजपत्रकाची कमेटी फार महत्त्वाची आहे. हिची निवडणूक एक वर्षाच्या मुदतीनें होते व इच्यांत एकंदर पंचेचाळीस सभासद असतात. महाजनसभेंत इच्यासारखींच एक आयव्यय कमेटी असते व तिच्यांत अठरा सभासद असतात. या दोन कमेट्यांच्या हातीं आयव्ययासंबंधीची बहुतेक सत्ता असून इतर बाबतींतील कायद्यासंबंधाचीही अशाच कमेट्या नेमून व्यवस्था केली जाते. तात्पर्य इंग्लंडांत ज्याप्रमाणें कायद्यांचे मसुदे तयार करण्याचे बहुतेक कार्य मंत्रिमंडळाकडे गेलेले आहे त्याप्रमाणें फ्रान्समध्यें स्थिति नसून हें कार्य लोकसभेच्या निरनिराळ्या कमेट्यांच्या हातून होत असतें. यामुळें फ्रान्समध्यें मंत्रिमंडळ बदललें तरी राज्यकारभाराचें धोरण फारसें बदलत नाहीं व वरचेवर मंत्रिमंडळें बदललीं तरी राजकीय धोरणांत अस्थिरता उत्पन्न होण्याची तितकी भीति नसते.

लोकसभेची कार्यपद्धति.

कोणताही कायद्याचा मसुदा मंत्र्याला किंवा इतर सभासदाला पुढें

आणतां येतो, व तो आयव्ययासंबंधीं नसेल तर कोणत्याही सभेंत प्रश्न सादर करतां येतो. परंतु आयव्ययासंबंधाचे सर्व मसुदे प्रतिनिधिसभेपुढेंच आले पाहिजेत. मसुदा पुढें आला कीं, त्याचा विचार होण्यासाठीं तो योग्य त्या कमेटीकडे जातो व कमेटींतील कोणाची तरी कमेटीचा अहवाल सादर करण्यावर नेमणूक होते. विशेष निकडीचा मसुदा असेल तर कमेटीकडे दिला जात नाहीं. कमेटीचा अहवाल आला म्हणजे त्याचीं दोन वाचनें व्हावीं लागतात व त्यानंतर तो सभेकडे रवाना होतो.

कायद्यांचे मसुदे.

एकदोन बाबींत फ्रान्समधील अंमलबजावणी खातें इंग्लंडांतील त्या खात्यांपेक्षां अधिक स्वतंत्र आहे. एक तर लोकसभेंत कोणत्याही कायद्यांतील सामान्य तत्त्वें व स्थूल रूपरेषा ठरविण्यांत येऊन तपशील ठरविण्याचें काम बहुतांशीं अंमलबजावणी खात्याकडेच सोंपविलें जातें. तसेंच अंमलबजावणी खात्यांतील अधिकाऱ्यांनीं अधिकारी या नात्यानें केलेल्या कृत्याबद्दलची तक्रार सामान्य न्यायासनापुढें येऊं शकत नाहीं. त्यांचा विचार करण्याकरिता स्वतंत्र राज्य कारभाराचीं कोर्टें (Administrative Courts) स्थापन करण्यांत आलेलीं आहेत. हीं राज्यकारभारांचीं स्वतंत्र कोर्टें स्थापन करण्याची पद्धति सर्व युरोपखंडांत (इंग्लंडशिवाय) चालू आहे.

अंमलबजावणी खात्यांचें स्वातंत्र्य.

फ्रान्समध्यें एकंदर दोन प्रकारचीं न्यायासनें आहेत. एक राज्यकारभार विषयक व दुसरीं सामान्य न्यायासनें. सामान्य न्यायासनांतहि दोन प्रकार आहेत. एक दिवाणी व फौजदारी कामें चालविणारीं व दुसरी व्यापारीं कामें चालविणारीं जादा न्यायासनें. या न्यायासनांपैकीं सर्वांत खालच्या दर्जाचें न्यायासन म्हणजे जस्टिस ऑफ दि पीस

न्यायासनें.

चीं कोर्टें होत. या जस्टिसच्या नेमणुका राष्ट्राध्यक्षाकडून केल्या जातात; व
त्यांना कामावरून काढून टाकण्याचाहि त्यास अधिकार आहे. प्रत्येक कँट-
नमध्यें (देशाचा तालुक्यासारखाच एक लहान विभाग) एकेक जस्टिस
ऑफ दि पीस असतो. त्याला मर्यादित स्वरूपाचे दिवाणी व फौजदारी
अधिकार असतात. फौजदारी कामें चालवितांना तो पोलिस कोर्टाचा
अध्यक्ष असतो. पोलिस कोर्ट हें अगदीं खालचें फौजदारी कोर्ट असतें.
यांपेक्षा मोठ्या गुन्ह्यांचे खटले करेक्शनल कोर्टापुढें चालतात. यांत तीन
न्यायाधीश असतात. पण ज्युरी नसते. या खटल्याची प्रथम एका मॅजिस्ट्रेटा-
पुढें गुप्त चौकशी होते व तो खटला कमिट करावा कीं काढून टाकावा
हें ठरवितो. लहान खटल्यांत जस्टिस ऑफ दि पीसच्या निकालावर अपील
चालत नाहीं. कांहीं जरूरीच्या खटल्यांत त्याला जास्त अधिकार दिलेले
असतात. मोठ्या खटल्यांत त्याच्या निकालावर ॲरॉंडिसमेंट (देशाचा
जिल्ह्यासारखा मोठा विभाग) कोर्टापुढें अपील होऊं शकतें. जस्टिस ऑफ
दि पीसनें शक्य तितके खटले आपापसांत तोडण्याचा प्रयत्न करावयाचा
असतो व त्याचे हे प्रयत्न निष्फळ झाले तरच वरच्या कोर्टाकडे काम जातें.
त्याच्यावरचें कोर्ट म्हणजे ॲरॉंडिसमेंट कोर्ट. प्रत्येक ॲरॉंडिसमेंटमध्यें
असलीं कोर्टें असतात. त्यांच्यापुढें मूळ कामें व अपिलें दोन्ही चालतात.
त्यांच्या निकालावर कोर्ट ऑफ अपीलकडे अपिलें जातात. ॲरॉंडिसमेंट
कोर्टांत एक अध्यक्ष एक किंवा अधिक उपाध्यक्ष व कांहीं इतर न्यायाधीश
असतात. यांच्यावरचीं कोर्टें म्हणजे कोर्टस ऑफ अपील हीं होत. अशीं
कोर्टें एकदर सर्व देशांत मिळून सव्वीस आहेत. एकेका अपिल कोर्टाच्या
अधिकारक्षेत्रांत एकापासून पांच डिपार्टमेंटस (इलाख्यासारखा देशाचा
मोठा विभाग) असतात, यांत अध्यक्ष असून इतर न्यायाधीशांचे निरनि-
राळे गट केलेले असतात. यांच्यापुढेंही अपिलें व मूळ कामें दोन्हीहि चाल-
तात. यांचें आणखी एक कार्य म्हणजे फौजदारी खटल्यांपैकीं कोणचीं

कामें असाइजीज कोर्टापुढें चालावयाचीं व कोणतीं कामें खालच्या दर्जाच्या कोर्टापुढें चालावयाचीं याचा निर्णय देणें हें असतें. असाइजीज कोर्टे प्रत्येक डिपार्टमेंटमध्यें दर तीन महिन्यांनीं भरतात. यांच्यापुढें फौजदारी खटले चालतात. यांत बारा इसमांची ज्यूरी कायद्याशिवाय इतर प्रश्नांचा निकाल देण्यास नेमलेली असते. कायद्याच्या मुद्यांचा निकाल न्यायाधीश करितात.

कॅसेशन कोर्ट हें सर्वांत श्रेष्ठ दर्जाचें न्यायासन आहे. हें पॅरिसमध्यें आहे. याचे दिवाणी, फौजदारी व कोर्ट ऑफ पिटिशन, असे तीन विभाग केलेले आहेत. यांपैकीं प्रत्येक विभागावर एकेक अध्यक्ष असून या सर्वांवर एक मुख्य अध्यक्ष असतो. या कोर्टांत राज्यकारभारविषयक कोर्टाखेरीज इतर सर्व कोर्टांवर आपिलें चालतात.

मोठमोठ्या शहरांत व्यापाऱ्याव्यापाऱ्यांतील तंटे तोडण्याकरितां स्वतंत्र व्यापारीं कोर्टें स्थापन करण्यांत आलीं असून यांतील न्यायाधीश प्रमुख व्यापाऱ्यांतूनच निवडलेले असतात. असलीं कोर्टें नसतील तेथें हे खटले साध्या कोर्टापुढें चालू शकतात. याशिवाय औद्योगिक तंटे तोटण्यासाठीं (मजूर व कारखानदार यांचे प्रश्न) कोठेंकोठें लवाद कोर्टेंहीं स्थापन करण्यांत आलेलीं आहेत.

व्यापारी न्याया-
सनें.

फ्रान्समधील सर्व न्यायाधीशांच्या नेमणुका राष्ट्राध्यक्षाच्या नांवानें त्याचा न्यायमंत्रि तहाहयात करीत असतो. (During good behaviour)

राज्यकारभारविषयक कोर्टांमध्यें कौन्सिल ऑफ स्टेट हें सर्वांत श्रेष्ठ आहे. यांतील सर्व सभासदांची नेमणूक राष्ट्राध्यक्षच करीत असतो. सरकारनें विचारलेल्या कोणत्याही कायद्याच्या प्रश्नावर मत देण्याचा अधिकार या संस्थेस आहे. राज्यकारभारासंबंधीं नियम करण्याचें

राज्यकारभार विषयक
न्यायासनें.

कामही हिलाच करावें लागतें. प्रिफेक्चुरल् कौन्सिल म्हणून आणखीही कांहीं राज्यकारभार विषयक कोर्टें आहेत. या शिवाय कोर्ट ऑफ कॉन्फ्लिक्टस् या नांवाचें एक न्यायासन आहे. कोणती कामें सामान्य कोर्टांत चालवयाचीं व कोणतीं कामें राज्यकारभार विषयक कोर्टांत चालवयाचीं याचा निर्णय देणें हें त्याचें काम आहे. यांत दोन्हीं प्रकारच्या कोर्टांचे प्रतिनिधी असतात.

स्थानिकस्वराज्यः—फ्रान्समधील स्थानिकस्वराज्याची व्यवस्था सर्व देशांहून अतिशय सुव्यवस्थित अशी आहे.फ्रेंच क्रांतीच्या वेळीं देशाचे पूर्वींचे सर्व विभाग मोडून त्यांचे जागीं नवे व्यवस्थित विभाग पाडण्यांत आले. सर्व देशाचें डिपार्टमेंट म्हणून सर्वांत मोठे विभाग पाडलेले आहेत. प्रत्येक डिपार्टमेंटचे ॲरॉंडिसमेंट,व ॲरॉंडिसमेंटचे कँटन म्हणून विभाग केलेले आहेत. राज्यकारभारासाठीं केलेला देशाचा सर्वांत लहान विभाग म्हणजे कम्यून (गांव). मुख्य विभाग म्हणजे डिपार्डमेंट. डिपार्टमेंटमधील मुख्य अधिकारी प्रिफेक्ट हा असतो. तो मध्यवर्ति सरकारचा प्रतिनिधि असून, त्याच्या हातीं पुष्कळ सत्ता असते. कायद्याची अंमलबजावणी करणें, पोलीस रेग्युलेशन्स जाहीर करणें, खालचे अधिकारी नेमणें आणि डिपार्टमेंटमधील सर्व अधिकाऱ्यांच्या कामावर देखरेख करणें हीं कामें त्याला करावीं लागतात. प्रत्येक डिपार्टमेंटमध्यें एक कायदेमंडळ असते व त्यांनीं केलेल्या कायद्यांची अंमलबजावणी या प्रिफेक्ट मार्फतच होत असते. या कायदे मंडळावर त्याचा बराच ताबा चालू शकतो. प्रिफेक्टचीं कृत्यें अमान्य करण्याचा अधिकार मंत्र्यांना आहे. परंतु मंत्र्यांचा सर्व अंमल प्रिफेक्ट मार्फत चाललेला असतो.

डिपार्टमेंटमधील कायदेमंडळाची निवडणूक लोक करितात व प्रत्येक कँटनमधून तेथें एकेक सभासद येतो. सभासदाची निवडणूक सहा वर्षांच्या मुदतीनें होते व निम्या सभासदांची निवडणूक दर तीन वर्षांनीं होते. पुढच्या तीन वर्षांनीं दुसऱ्या निम्या सभासदांची नवी निवडणूक होते. अशा रीतीनें

सर्वच नवे सभासद एकदम येत नाहींत. या मंडळाच्या वर्षांतून दोन बैठकी होतात. पहिली बैठक पंधरा दिवस व दुसरी बैठक महिनाभर भरावी असें कायद्यानें ठरविलें आहे. सभासदांपैकीं दोन तृतीयांश सभासदांनीं विनंति केल्यास जादा बैठक बोलविण्याचा अधिकार अध्यक्षाला आहे. कायदेशीर मुदतीपेक्षां जास्त दिवस बैठक बसल्यास कायदेमंडळ बरखास्त करण्याचा अधिकार प्रिफेक्टला आहे. तसेंच त्या मंडळानें आपल्या अधिकाराचा अतिक्रम करून कायदा केल्यास तो कायदा अध्यक्षाच्या हुकमानें रद्द होतो. सभासदांना पगार मिळत नाहीं परंतु गैरहजेरीबद्दल दंड मात्र करण्यांत येतो. या कायदेमंडळाचे अधिकार अगदीं मर्यादित आहेत. त्याचें मुख्य कर्तव्य डिपार्टमेंटच्या राज्यकारभारावर देखरेख करणें हें आहे. नवीन कायदे करण्याचा फारसा अधिकार त्याला नाहीं स्थानिक बाबींत त्याचे निर्णय अखेरचेच समजले जातात. त्याचें मुख्य कर्तव्य प्रत्येक ॲरॉंडिसमेंट कडून किती कर वसूल केले जावेत हें ठरविण्याचें असतें. एकंदर डिपार्टमेंटकडून किती कर यावयाचे व ते कसे बसवावयाचे हें मध्यवर्ति सरकारनेंच ठरविलेलें असतें. त्याची ॲरॉंडिसमेंटमध्यें योग्य वाटणी करण्याचें काम या कायदे मंडळाचें असतें. डिपार्टमेंट मधील सरकारी मालमत्तेची सर्व व्यवस्था त्याच्याकडे असते.नवे रस्ते करणें, रेल्वे, पूल,व कनॉल बांधणें, यांची मंजुरी देण्याचें काम याच्याचकडे असतें. तसेंच पोलिसांच्या पगाराची रक्कम त्यानें मंजूर करावी लागते. स्थानिक प्रश्नासंबंधीं मध्यवर्ति सरकारला सल्ला देण्याचें कामही त्याचेंच असतें. राजकीय धोरणासंबंधीं मात्र त्यास कांहीं अधिकार ठेवलेले नाहींत.

डिपार्टमेंटपेक्षां लहान विभाग म्हणजे ॲरॉंडिसमेंट. प्रातिनिधिसभेचे सभासद निवडण्याचे हे विभाग असतात. या विभागावरील अधिकाऱ्याला सबप्रिफेक्ट म्हणतात. याचे अधिकार प्रिफेक्टपेक्षां अधिक मर्यादित आहेत; तरी तो सुद्धां प्रिफेक्ट प्रमाणेंच मध्यवर्ति सरकारचा प्रतिनिधी गणला जातो.

या विभागांत एक डिस्ट्रिक्ट ॲरॉंडीसमेंट कौन्सिल असतें, त्यांत प्रत्येक कॅंटनकडून एकएक लोकनियुक्त प्रतिनिधि येतो. या कौन्सिलचें काम, डिपार्टमेंटच्या कायदे मंडळानें जी कराची रक्कम ॲरॉंडिसमेंटवर बसविली असेल तिची वांटणी करून प्रत्येक कम्यूनकडून किती वसूल करावयाचा हें ठरवून द्यावयाचें. याशिवाय या कौन्सिलला फार काम असत नाहीं.

ॲरॉंडेसमेंटचा कॅंटन हा पोटविभाग फक्त राज्यकारभाराच्या सोयी-साठीं केलेला विभाग आहे, व त्याची स्वतंत्र अशी संस्था कांहीं नाहीं. डिपार्टमेंट व ॲरॉंडिसमेंट येथील कौन्सिलांतील सभासदांच्या निवड-णुकीचा हा विभाग आहे. जस्टिस ऑफ् दि पीसच्या अधिकारक्षेत्राची व्याप्ति कॅंटन इतकीच असते. त्याचप्रमाणें सैन्य जमविण्यासाठींही याचा उपयोग केला जातो.

कम्यून हा फ्रेंच स्थानिक स्वराज्याचा सर्वांत लहान विभाग आहे. सर्व गावें हीं कम्यून्स होत. त्यांचे शहर कम्यून (urban commune) आणि ग्राम कम्यून (Rural commune) असे दोन वर्ग आहेत. मेयर हा कम्यूनमधील मुख्य मॅजिस्ट्रेट असतो. तो लोकनियुक्त असतो. मेयर व दुय्यम मेयर यांची चार वर्षांच्या मुदतीनें निवडणूक होते. ही निवडणूक म्युनिसिपल कौन्सिलरांकडून त्यांच्यापैकीं एकाची केली जाते. मेयरला एक किंवा अधिक दुय्यम मेयर मदतीला दिलेले असतात. मध्य-वर्ति सरकारचें काम करणें हें त्याचें आद्य कर्तव्य आहे. त्याची निवड लोकांनीं केली असली तरी तो मध्यवर्ति सरकारचा नोकर समजला जातो. त्याला किंवा त्याच्या दुय्यमांस एक महिनाभर कामावरून दूर करण्याचा अधिकार प्रिफेक्टला आहे व तीन महिनेपर्यंत कामावरून दूर करण्याचा अधिकार ' मिनिस्टर ऑफ दि इंटीरियर ' या मंत्र्याला आहे. मध्यवर्ति सरकारला त्यास बडतर्फ करण्याचाही अधिकार आहे. त्याच-प्रमाणें म्युनिसिपालिटीचें काम करणें व तिच्या नोकरांवर देखरेख ठेवणें

हेहीं त्याचेंच काम आहे. म्युनिसिपल कौन्सिलर निवडण्याचा हक्क प्रत्येक नागरिकास आहे, त्यांची–कौन्सिलरांची–संख्या लोकसंख्येवर अवलंबून असते. कम्यूनची सर्व कामें या म्युनिसिपल कौन्सिलच्या हातीं असतात. त्यानें दिलेले निर्णय प्रायः एक महिन्यानंतर अमलांत येतात. ज्या प्रश्नांचा संबंध इतर ठिकाणच्या लोकांच्या हिताशीं येतो त्या प्रश्नासंबंधींच्या निर्णयाला प्रिफेक्टर किंवा डिपार्टमेंटचें कायदेमंडळ यांची अगर कांहीं बाबींत अध्यक्षांची मान्यता मिळावी लागते. तसेंच महाजनसभेच्या सभासदांची निवड करणारे मतदार निवडण्याचा अधिकार या म्युनिसिपल कौन्सिलाच असतो. कम्यूनतर्फेचे मतदार तें निवडतें. तसेंच या कौन्सिममध्यें ॲसेसर्सची निवड होते, व त्यांतील दहाजणांकडे ॲरॉंडिसचा सब प्रिफेक्ट प्रत्येक कर भरणाऱ्यानें किती कर द्यावा हें ठरविण्याचें काम नेमून देतो. सामान्यतः या कौन्सिलचा अध्यक्ष मेयरच असतो. फक्त ज्यावेळीं मेयरच्या खर्चांचा विचार चाललेला असतो तेव्हां तो अध्यक्ष नसतो. आयव्ययाखेरीज इतर प्रश्नांची चर्चा करण्याच्या बैठकी चौदा दिवसपर्यंत चालतात व आयव्ययाच्या प्रश्नांची चर्चा करणारी बैठक सहा आठवडेपर्यंत चालू शकते. प्रत्येक वर्षांत साधारणपणें याच्या चार बैठकी होतात. या कौन्सिलला एक महिनापर्यंत पदच्युत करण्याचा अधिकार प्रिफेक्टला आहे व अजीबात बरखास्त करण्याचा अधिकार मंत्र्यांच्या कौन्सिलला आहे. तें बरखास्त झालें असतां दुसरी निवडणूक होईपर्यंत अध्यक्षानें नेमलेल्या एका छोट्या कौन्सिलामार्फत त्याचें काम चालूं असतें.

———

२ जर्मनी

महायुद्धापूर्वीचें जर्मन साम्राज्य आणि आजचें जर्मन साम्राज्य यांच्या घटनेंत जमीन अस्मानाचें अंतर आहे. पूर्वीचें जर्मन साम्राज्य मोडून आज तेथें लोकशाही स्थापन झालेली आहे, तरी इतिहासाच्या दृष्टीनें, आणि आजची त्या राज्याची घटना समजण्याच्या दृष्टीनें महायुद्धा पूर्वीच्या साम्रा- ज्याच्या घटनेचा विचार करणें जरूर व महत्त्वाचें आहे. याकरितां प्रथम तिचा विचार करूं व मग तेथें झालेल्या क्रांतीनंतर जी राज्यव्यवस्था स्थापन झाली आहे तिची माहिती देऊं.

अमेरिका व जर्मनी

जर्मनसाम्राज्य हें अमेरिकेप्रमाणेंच संयुक्त राज्य होतें. परंतु अमेरिका व जर्मनी यांच्या राज्यघटनांत पुष्कळ महत्त्वाचें अंतर होतें. अमेरिकेंतील संयुक्त सरकारला कायदे करण्याची जितकी सत्ता आहे त्याच्याहून अधिक सत्ता जर्मनींतील साम्राज्य सरकारला होती. परंतु अमेरिकेच्या संयुक्त सरकारला अंमल- बजावणीची जितकी सत्ता आहे, तितकी देखील अंमलबजावणीची सत्ता जर्मनींतील साम्राज्य सरकारला नव्हती. उदाहरणार्थ, पराष्ट्रीय संबंध, आरमार, लष्कर, जकाती इत्यादि बाबींत कायदे करण्याची सत्ता तर साम्राज्यसरकारला असून शिवाय पोटराज्यांच्या अंतर्गत व्यवस्थेपैकीं सुद्धां अनेक बाबींत कायदे कर- ण्याची सत्ताही साम्राज्यसरकारकडे होती. (उदाहरणार्थ कालवे, रस्ते व दिवाणी अगर फौजदारी कायदे या संबंधीं कायदे करण्याची सत्ता साम्राज्य सरकारला होती.) तथापि यांपैकीं फारच थोडया कायद्यांची अंमलबजावणी साम्राज्यसरकार स्वतः करीत असे. फक्त लष्कर व परराष्ट्रीय संबंध या बाबतीं- शिवाय इतर सर्व कायद्यांची अमलबजावणी करण्याचें कार्य पोटराज्यांतील अधिकारी वर्गाकडे सोंपविलेलें असे. अशाप्रकारें साम्राज्यसरकार हें कायदे

करणारें व देखरेख करणारें सरकार होतें. एकदा अमुक जकाती बसवाव्यात असे ठरवून दिलें म्हणजे त्यांची योग्य वसुली पोटराज्यांतील अधिकारी करतात किंवा नाहींत एवढें पाहाण्यापुरते अधिकारी साम्राज्यसरकार नेमीत असे. जर एखाद्या पोटराज्यानें साम्राज्यसरकारचा कायदा मान्य केला नाहीं तर त्याची तक्रार बुंडेसॅट या सभेपुढें जात असे, व ती जो निर्णय देईल तो अखेरचा ठरत असे. पण त्यानंतरही या पोटराज्यानें आपलें वर्तन सुधारलें नाहीं तर बादशहाला त्या राज्यास योग्य ती शिक्षा करण्याचा अधिकार असे.

अमेरिका व जर्मनी यांत दुसरा मोठा फरक म्हणजे अमेरिकेंतील सर्व संस्थानें लोकसंख्या, विस्तार वगैरे बाबींत साधारण सारखींच आहेत व त्यांचें संयुक्त सरकारांतील वजन सारखेंच आहे. जर्मनींत तशी स्थिति नाहीं. तेथें पोटराज्यांतील लोकसंख्या, त्यांचा विस्तार व साम्राज्य सरकारांतील त्यांचें वजन यांत फार भिन्नता व असमता दिसून येते. प्रशिया हें एकच एवढें मोठें पोट राज्य होतें व त्याच्या हातीं साम्राज्यसरकारच्या सत्तेचा एवढा मोठा भाग होता कीं, जर्मन साम्राज्यावर इतर पोटराज्यांच्या मदतीनें प्रशियाच राज्य करीत होता असें म्हणण्यास हरकत नाहीं. एकट्या प्रशियाची लोकसंख्या सर्व जर्मन साम्राज्याच्या तीन पंचमांशांइतकी होती व त्याचें लष्करी सामर्थ्यही फार मोठें होतें; व त्या मानानें प्रशियाला पुढील अधिकार प्राप्त झाले होते. (१) प्रशियाचा राजा हा साम्राज्याचा बादशहा असावयाचा.(२) राज्यघटनेंतील कोणताही सुचविलेला फेरफार न होऊं देणें प्रशियाला शक्य होतें;कारण राज्यघटनेंतील फेरफाराविरुद्ध बुंडेसॅट सभेंत चौदा मतें पडलीं कीं तो फेरफार नामंजूर होत असे.प्रशियाला एकंदर सतरा मतांचा अधिकार असे. (३) आरमार, लष्कर व जकातीचें धोरण यांत बदल करूं नये असें मत प्रशियानें दिलें असतां, त्यांत बदल करूं नये असें राज्यघटनेनें ठरलेलें होतें. अर्थात् या तिन्ही प्रश्नांत त्याला पुष्कळच अधि-

कार होता. (४) बुंडेस्रॅट सभेंत एखाद्या प्रश्नावर अनुकूल व प्रतिकूल मतांची संख्या सारखी भरल्यास प्रशियाला निर्णायक मत (Casting vote) देण्याचा अधिकार होता. (५) बुंडेस्रॅटमधील स्टँडिंग कमेटींतील अध्यक्षांच्या जागा प्रशियाला मिळत असत. यांशिवाय पोट-राज्यांपैकीं कांहीं राज्यांनीं स्वखुषीनें कांहीं अधिकार प्रशियाला दिलेले होते. उदाहरणार्थ, साम्राज्याची घटना तयार झाली तेव्हां लष्करी कायदे साम्राज्य सरकारनें करावेत व बादशहा हा मुख्य सेनापति असावा असें ठरलें होतें. पोटराज्यांतील लष्करांच्या जनरलांची त्यानें निवड करावयाची व इतर लष्करी अधिकारीही त्यानेंच पसंत करावयाचे, परंतु खालच्या प्रतीचे लष्करी अधिकारी नेमण्याचा अधिकार पोटराज्यांना ठेविला होता. बहुतेक सर्व लहान पोटराज्यांनीं हा अधिकार बादशहालाच दिला होता व त्याबद्दल शांततेच्या वेळीं ज्या त्या पोटराज्यांतील लष्कर ज्या त्या पोटराज्यांतच ठेवण्याची परवानगी बादशहानें दिली होती. वॉल्डेक या पोटराज्यांतील राजाला बरेंच कर्ज झालें होतें,तेव्हां बरीच मोठी रक्कम घेऊन त्यानें आपलें राज्यच प्रशियाला दिलें व आपण इटलींत जाऊन राहिला. प्रशिया शिवाय इतर राज्यांनाही त्यांच्या त्यांच्या महत्त्वाच्या मानानें कमी अधिक अधिकार दिलेले होते. उदाहरणार्थ हॅंबर्ग व ब्रेमेन या बंदरांना प्रथम साम्राज्याचें जकातीचें धोरण लागूं केलें नव्हतें; पण पुढें त्यांनीं तो अधिकार सोडून दिला. दक्षिणेकडील बऱ्याच राज्यांनीं आपणास मिळावें म्हणून त्यांना बिस्मार्कनें विशेष सवलती दिलेल्या होत्या. बव्हेरिया, नुरेंबर्ग व बेडन या राज्यांना साम्राज्यसरकारनें बसविलेले कांहीं कर माफ होते व त्यांना ते बसविण्याचा अधिकार दिलेला होता.तसेंच वुर्टेंबर्ग व बव्हेरिया यांना पोस्ट व तार खात्यासंबंधीं बहुतेक स्वातंत्र्यच होतें. बव्हेरियाचें लष्करही जवळ जवळ त्याच्याच हातीं होतें. या प्रमाणें अनेक बाबींत बव्हेरिया, वुर्टेंबर्ग, सॅक्सनी वगैरे राज्यांत सवलती दिलेल्या होत्या. तसेंच प्रशिया नसेल तेव्हां बुंडेस्रॅटचें

अध्यक्षस्थान बव्हेरियाला मिळत असे. तात्पर्य जर्मन साम्राज्य हें इतर संयुक्त साम्राज्यासारखें नव्हतें. त्यांतील पोटराज्यांचा दर्जा समान नव्हता, व एकट्या प्रशियाला अतिशय अधिकार होते. अर्थात् ज्यावेळीं बिस्मार्कनें हें साम्राज्य बनविलें तेव्हां समान दर्जाच्या अटीवर त्यांत समाविष्ट होण्याला मोठीं राज्यें केव्हांच तयार झालीं नसतीं.

लोकसभा व तिच्या दोन दळांतील अधिकारविभागणी.

इतर सुधारलेल्या राष्ट्रांप्रमाणें जर्मनींतही द्विदल स्वरूपाची लोकसभा होती. महाजनसभेला बुंडेस्रॅट व प्रतिनिधिसभेला रीचस्टॅग असें म्हणत; परंतु इतर राष्ट्रांत राजसत्तेचा बराच मोठा भाग प्रतिनिधिसभेच्या हातीं असतो, तर जर्मनींत महाजनसभेच्याच हातीं खरी सत्ता होती. शिवाय या सभेला कायदे करणें, अंमलबजावणी करणें व न्यायदान या तिन्ही प्रकारचे अधिकार होते. या सभेंत निरनिराळ्या पोट राज्यांतील राजांचे वकील येत असत. यांना वकील म्हणण्याचें कारण त्यांना इतर प्रतिनिधीं-प्रमाणें स्वतंत्र मतें देण्याचा अधिकार नसून त्यांच्या सरकारनें सांगितल्या-प्रमाणेंच त्यांना मतें द्यावीं लागत. तसेंच एका पोट राज्याला एकाहून अधिक वकील पाठविण्याचा अधिकार होता तरी पुष्कळ बिन महत्त्वाच्या प्रसंगीं एखादाच वकील जाऊन सर्वांचीं मतें देऊन येत असे. या सभेंत प्रशियाला सतरा वकील पाठविण्याचा हक्क होता; बव्हेरियाला सहा, सॅक्सनी व वुर्टेंबर्ग यांना प्रत्येकीं चार, आणि बेडन व हेसे यांना प्रत्येकी तीन असे वकील पाठवितां येत असत. इतर पोटराज्यांना एकेक दोनदोन वकील पाठवितां येत. प्रशियाला आपल्या सतरा मतांशिवाय आणखी तीन मतें नेहमीं आपल्या बाजूस मिळवितां येत असत. ब्रन्स्विकच्या गादीवर प्रशियाच्या राजघराण्यांतीलच पुरुष बसल्यामुळें ब्रन्स्विकचीं दोन मतें व वाल्डेकचें एक अशीं तीन मतें नेहमीं त्याच्या बाजूला पडत. अशा प्रकारें एकं-

दर वीस मतें त्याच्या बाजूला नेहमीं असल्यानें आणखी दहाबारा मतें अनुकूल झालीं कीं नेहमीं प्रशियाच्या बाजूचें बहुमत होत असे. तात्पर्य बुंडेस्रॅटमध्यें प्रशियाला बहुमत मिळण्यास फार प्रयास पडत नसत. बुंडेस्रॅटच्या सभासदांना बदलण्याचा अधिकार त्या त्या पोट-राज्यांना होता; व पोटराज्यांतील सरकार सांगेल त्याप्रमाणेंच त्यांनीं मतें द्यावयाचीं असल्यानें त्या सभेस लोकमताचा वारा सुद्धां लागत नसे. बुंडे-स्रॅटचा अध्यक्ष इंपीरियल चॅन्सेलर हा असे व त्याची नेमणुक बादशहा करीत असे. याची निवडहि प्रशियामार्फत येणाऱ्या वकिलांतून प्रायः केली जात असे. महायुद्धामध्यें मात्र याला अपवाद झाला होता. या सभेंत एकंदर आठ स्टँडिंग कमेट्या होत्या. लष्कर व किल्ले यासंबंधाच्या कमे-टयांमधील सभासदांची नेमणूक बादशहा करीत असे. यांमध्यें बव्हेरिया, सॅक्सनी व वुर्टेंबर्ग यांचे सभासद असत. आरमार कमेटीहि बादशहा-कडूनच नेमली जात असे. इतर कमेटयांची निवडणूक सभाच करीत असे. त्यांत एकच नियम होता कीं, प्रत्येक कमेटींत प्रशियासुद्धां पांच पोटराज्यांचे प्रतिनिधी असले पाहिजेत व तिचे अध्यक्षस्थान प्रशियाच्या प्रतिनिधीला दिलें पाहिजे. ज्या त्या पोटराज्यांनीं आपापले प्रतिनिधी या कमेटयांत निवडून द्यावेत असा प्रघात होता. परराष्ट्रीय प्रश्नांसंबंधीची कमेटी थोडी जास्त महत्त्वाची होती. इच्यांत चॅन्सेलर स्वतः असे व तिचें अध्यक्षस्थान बव्हेरियाला मिळत असे. या कमेटींत बव्हेरिया, वुर्टेंबर्ग व सॅक्सनी यांचे प्रतिनिधी असलेच पाहिजेत असें होतें. चॅन्सेलर ज्या प्रश्ना-संबंधीं त्यांचा सल्ला घेत असे त्या प्रश्नासंबंधीचे आपल्या सरकारचें मत ते प्रतिनिधी तेथें सांगत असत. ज्यावेळीं बुंडेस्रॅटची बैठक असेल अशावेळीं सुद्धां स्टँडिंग कमेटयांच्या बैठकी होत असत. बुंडेस्रॅटची एकंदर सत्ता बरीच मोठी होती. जर्मनीच्या कारभारावर तिची हुकमत चालत होती असें म्हणण्यास हरकत नाहीं. सर्व कायदे व तह यांना तिची अनुमति

लागत असे. तात्त्विक दृष्टीनें कायद्याचे मसुदे पुढें आणण्याचा अधिकार प्रतिनिधिसभेला सुद्धां होता, परंतु वस्तुतः नवे कायद्याचे मसुदे पुढें आणणें, त्यांची चर्चा करणें, व अंदाजपत्रकावर चर्चा करणें हे हक्क बुंडेस्रॅट-च्याच सभेच्या हातीं होते. येथें त्यांची चर्चा झाल्यावर मग ते प्रतिनिधिसभे-कडे जात व तेथून पासही होऊन आल्यावर पुनः या सभेंत पास होऊन ते बादशहाकडे सहीला जात असत. बुंडेस्रटला अंमलबजावणीचेही बरेच अधिकार होते. राज्यकारभारासंबंधींचे नियम व कायद्याच्या अमलबजाव-णीचे हुकूम करण्याचा अधिकार तिला होता. सरकारी जमाखर्चासंबंधीहि बरीच सत्ता तिला होती. ती बोर्ड ऑफ अकाउंटस म्हणून एक बोर्ड नेमीत असे व त्याला जमाखर्चावर देखरेख ठेवण्याचा अधिकार असे. साम्राज्य कोर्टाचे न्यायाधीश नेमण्याचा अधिकार याच सभेला होता. साम्राज्यसरकारच्या बँकेचे डायरेक्टर्सही हीच नेमीत असे. इतर अधिकारी नेमण्यासही तिची मान्यता लागत असे. युद्ध पुकारण्याच्या आधीं तिची परवानगी घ्यावी लागे. फक्त परराष्ट्राची अचानक स्वारी आली तरच बादशहाला इच्या परवानगीशिवाय युद्ध सुरू करतां येत असे. तसेंच प्रतिनिधिसभा बरखास्त करावयास आणि एखाद्या पोट राज्यानें साम्राज्य सरकारचा कायदा न पाळल्यास त्याला शिक्षा करण्यापूर्वी या सभेची संमति अवश्य असे. तसेंच या सभेंतील सभासदांची प्रतिनिधिसभेंत, या सभेंत मान्य झालेल्या कायद्यांना दुजोरा देण्याकरितां, नेमणूक केली जात असे. तेथें ते आपल्या सरकारचीं मतें सांगत. मग तीं मतें बुंडेस्रटला मान्य असोत वा नसोत. याशिवाय कांहीं न्यायाधीशांचें कामहि या सभेकडे असे. साम्राज्यसरकारच्या कायद्याच्या अर्थासंबंधीं साम्राज्यसरकार व पोटराज्य यांत तंटा झाल्यास त्याचा निकाल ही सभा देत असे. तसेंच पोटराज्यांतीलहि तंट्यांचा निकाल ही सभा देत असे. या कामांत त्या राज्यांनीं या सभेचें मत विचारलें तर ती न्याय देत असे. एखाद्या

राज्याच्या राज्यघटनेसंबंधीं वाद उत्पन्न झाला व त्याचा निर्णय देणारी संस्था तेथें नसली तर त्याचाही निर्णय ही सभा देई. एखाद्या राज्यांत कोणास न्याय मिळाला नाहीं तर या सभेकडे त्याला दाद मागतां येत असे.

प्रतिनिधिसभा.

रीचस्टॅग ही जर्मनींतील प्रतिनिधिसभा होती व तिची निवडणूक पांच वर्षांच्या मुदतीनें होत असे. प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार प्रत्येक पंचवीस वर्षांवरील मनुष्यास होता. लष्करी नोकर, भिकारी, वेडे व गुन्हेगार इत्यादि लोकांना मताधिकार नसे. निवडणुकीच्या कार्याकरितां सर्व देशाचे विभाग केलेले होते व प्रत्येक विभागांतून एकेक प्रतिनिधि येत असे. कोणत्याही एका विभागांत एकाहून अधिक पोटराज्यांतील प्रदेशांचा समावेश होत नसे. यामुळें पोटराज्य कितीही लहान असलें तरी त्याला एक प्रतिनिधि मिळतच असे. हे विभाग करतांना प्रत्येक एक लक्ष वसतीच्या प्रदेशाला एक प्रतिनिधि मिळावा अशी व्यवस्था केली होती; परंतु त्यानंतर लोकवस्ती बरीच हलल्यामुळें अलीकडे त्यांत पुष्कळ विषमता उत्पन्न झाली होती. प्रशियामधील प्रतिनिधींची संख्या एकंदर प्रतिनिधींच्या तीन पंचमांशाइतकी होती. रीचस्टॅग आपली अंतर्गत संघटना आपणच करीत असे. अध्यक्ष, दुय्यम अध्यक्ष व चिटणीस यांच्या निवडणुकी तीच करीत असे. प्रत्येक बैठकीच्या सुरवातीस सात कमेट्या निवडल्या जात; परंतु या स्टँडिंग नसून तात्पुरत्या असत. एकंदर सभेचे सात विभाग केले जात व प्रत्येक भाग एक किंवा अधिक सभासद त्या कमेट्यांत पाठवीत असे. हे विभाग कसे पाडावयाचे तें राजकीय पक्षाचे पुढारी ठरवीत असत. रीचस्टॅगची सत्ता दिसण्यांत बरीच होती तरी तिला खरी फार सत्ता नव्हती. सर्व कायदे, अंदाजपत्रक आणि कायद्याच्या सदराखालीं येणारे सर्व तह, कर्ज, वगैरे सर्व प्रश्नांत तिची संमति लागत

असे. तसेंच नवीन कायद्यांचे मसुदे पुढें आणणें,राज्यकारभारावर मत व्यक्त करणें आणि सरकारकडे अहवाल मागणें हे अधिकार या सभेला होते; परंतु बुंडेस्रॅटमुळें या सभेचे अधिकार फार मर्यादित झाले होते. दरसालचें अंदाजपत्रक तयार होत असे. परंतु सरकारी उत्पन्नाचे बरेच कायदे कायमचे असून त्यांची चर्चा दरसाल होत नसे, व त्यांत बदल करावयाचा तो बुंडेस्रॅटच्या अनुमतीशिवाय होत नसे. लष्करी खर्च आणि सैन्यांतील शिपायांची संख्या ही कायद्यानेंच ठरलेली असून बऱ्याच वर्षांची मंजुरी एकदम घेऊन ठेवलेली असे. चॅन्सेलर व बुंडेस्रॅट यांनीं तयार केलेल्या कायद्यांच्या मसुद्यांची चर्चा करणें हेंच या सभेचें मुख्य कार्य होतें. या सभेला त्यांत फेरफार सुचवितां येत असत; परंतु अखेरचा निर्णय देण्याचा अधिकार बहुधा बुंडेस्रॅटलाच असे. रीचस्टॅग बोलविण्याचा अधिकार बादशहाला असे. तो ही सभा वर्षांतून एकदां किंवा अधिक वेळां भरवीत असे. बुंडेस्रॅट व ही सभा एकदमच बोलवावी लागे व त्यांचें काम जाहीरपणें चालत असे. सभासदांना खासगी रीतीनें जमतां येत असे परंतु अशा बैठकीला कांहीं महत्त्व नव्हतें. ही सभा बरखास्त करण्याचा अधिकार बुंडेस्रॅटची परवानगी मिळाल्यास बादशहास असे. ह्या सभेचा अध्यक्ष व जर्मनीचा मंत्रि इंपिरियल चॅन्सेलर हा असे. हा एकच मंत्रि जर्मनींत असल्यानें रीचस्टॅग यालाच राज्यकारासंबंधीं प्रश्न विचारीत असे. यावर केव्हां केव्हां चर्चा होऊन मतेंहि घेण्यांत येत असत. परंतु प्रतिकूल मतें पडलीं तरी चॅन्सेलरला राजीनामा द्यावा लागत नसे; म्हणजे तो प्रतिनिधिसभेला जबाबदार नव्हता. तो बादशहालाच जबाबदार असून त्याच्या हातीं पुष्कळ सत्ता असे.

जर्मन साम्राज्याचा बादशहा हा नेहमीं प्रशियाचा राजाच असला पाहिजे असें ठरलें होतें; त्याला लष्कर व परराष्ट्रीय संबंध यांत मुख्य अधि-

बादशहा.

कार असे, लष्कर व आरमार यांचें मुख्य सैनापत्य त्याच्याकडे असे, परराष्ट्रीय संबंध याच्यामार्फत ठरले जात असें व त्याला बुंडेस्रॅटच्या अनुमतीनें सर्व तह करतां येत व युद्ध पुकारतां येई. परराज्याची स्वारी अचानक आल्यास बुंडेस्रॅटचीही परवानगी लागत नसे. बुंडेस्रॅट बोलावणें व तिची बैठक बंद करणें, बुंडेस्रॅटच्या अनुमतीनें रीचस्टॅग बरखास्त करणें, चॅन्सेलर व इतर मोठे अधिकारी नेमणें हे सर्व अधिकार त्याला होते. परंतु याच्यापेक्षांही प्रशियाचा राजा या नात्यानें त्याला पुष्कळच अधिक अधिकार प्राप्त झालेले होते. नवीन कायदे सुचविणें किंवा लोकसभेनें केलेले कायदे अमान्य (veto) करणें हे दोन्ही अधिकार त्याला बादशहा या नात्यानें नव्हते. प्रशियाचे सतरा वकील बुंडेस्रॅटमध्यें पाठविण्याचा अधिकार त्याला प्रशियाचा राजा या नात्यानें होता; शिवाय प्रशियाच्या बाजूचीं नेहमींची बुंडेस्रॅटमधील वीस मतें त्याच्या बाजूलाच होती. तसच चॅन्सेलरही तोच नेमीत असे. अर्थात् प्रशियाला जे अधिकार होते ते सर्व यालाच होते असें म्हणतां येईल. अशा रीतीनें सर्व जर्मन साम्राज्यावर याची हुकमत चालत असे.

चॅन्सेलर हा जवळजवळ दुसरा बादशहाच होता. अंमलबजावणी खात्याचा वास्तविक अधिपति तोच असे. बुंडेस्रॅटचा अध्यक्ष तोच असे.

चॅन्सेलर

तो फक्त बादशहाला जबाबदार असे. बादशहा व रीचस्टॅग यांना जोडणारा तो दुवा होता. रीचस्टॅगमध्यें तोच अंदाजपत्रक सादर करी, व एकंदर राज्यकारभाराचा अहवाल तोच देई. तथापि त्याच्यावर त्या सभेची सत्ता चालत नसे. साम्राज्य सरकारचे कायदे योग्य प्रकारें अमलांत आणण्याचें काम साम्राज्यसरकारचे व पोटराज्यांतील अधिकारी करीत आहेत किंवा नाहींत हे पाहाणें त्याचें काम होतें. हा महायुद्धापर्यंत बहुधा

प्रशियाच्या वकिलांपैकींच असे; परंतु महायुद्धाचे वेळीं मात्र दुसरीकडचा चॅन्सेलर बादशहानें नेमला होता. या चॅन्सेलरला एक दुय्यम चॅन्सेलर नेमण्याचा अधिकार असे. चॅन्सेलरच्या गैरहजेरींत हाच त्याचें काम करीत असे, तथापि त्यानें केलेल्या कृत्यांची खरी जबाबदारी चॅन्सेलरवरच असे.

न्यायासनें:—जर्मन साम्राज्यांतील न्यायदानाची संघटना साम्राज्य-सरकार व पोट–राज्यें या दोहोंच्याही अमलाखालीं होती; परंतु त्यांत साम्राज्यसरकारचा ताबा अधिक होता. रीचगेरिच् (Reichsgericht) या नांवाचें साम्राज्यसरकारच्या ताब्यांतलि सर्वांत श्रेष्ठ अपील कोर्ट होतें. या कोर्टापुढें राजद्रोहाचे खटले तेवढे मूळ चालत असत, परंतु त्याचें मुख्य काम अपिलें ऐकण्याचेंच होतें. एकंदर सर्व न्यायासनावर साम्राज्य-सरकारची देखरेख असे. पोटराज्यांतलि सरकारें आपापले न्यायाधिश नेमून त्यांच्याकडे कामें वाटून देत परंतु या न्यायाधीशांच्या अंगीं काय योग्यता असली पाहिजे आणि न्यायासनांची व्यवस्था कशी असावी हें साम्राज्यसरकारच्या कायद्यानें ठरलें जात असे. तसेंच या न्यायासनांपुढें चालू असणारे दिवाणी व फौजदारी कायदे साम्राज्यसरकारच करीत असे. साम्राज्यसरकारच्या कायद्यांना धरूनच हीं न्यायासनें न्याय देत असत. एकंदर न्यायसंघटनेची कल्पना येण्याला प्रशियांतील न्यायसभांची संघटना लक्षांत घेतली पाहिजे. प्रशियांत प्रत्येक प्रॉव्हिन्समध्यें एक सुपीरियर डि-स्ट्रिक्ट कोर्ट असे व त्याच्याखालीं डिस्ट्रिक्ट कोर्टें असत. याच्याखालीं मॅजिस्टेरियल डिस्ट्रिक्टमध्येंहि एकेक कोर्ट असे. या कोर्टापुढें लहान दिवाणी दावे चालत. मॅजिस्टेरियल डिस्ट्रिक्टमध्यें शेरीफचीं कोर्टें असत. व त्यांपुढें लहान फौजदारी खटले चालत. डिस्ट्रिक्ट कोर्टाच्या तीन चेंबर्स असत व त्यांच्यापुढें दिवाणी, फौजदारी व व्यापारी अशीं कामें चालत. मोठया गुन्ह्यांसंबंधाचे खटले डिस्ट्रिक्ट कोर्टांतील तीन जज्जांच्या व ज्युरीच्या जादा कोर्टापुढें चालत. शेरीफ कोर्टावर डिस्ट्रिक्ट कोर्टाकडे

व त्याच्यावर सुपीरियर डिस्ट्रिक्ट कोर्टांकडे अपिलें चालत. सुपीरियर डिस्ट्रिक्ट कोर्टांवरचीं अपिलें साम्राज्यसरकारच्या इंपीरियल कोर्टांपुढें चालत. न्यायाधीशांच्या नेमणुका राजाकडून तहाहयात केल्या जात. राज्य-कारभाराविषयक कामें चालविण्यासाठीं स्वतंत्र कोर्टें असत व स्थानिक स्वराज्यासाठीं केलेल्या प्रत्येक देशाच्या विभागांत तसलें एकेक कोर्ट असे. सर्कल्समध्यें सर्कल कमेटी, डिस्ट्रिक्ट कमेटी व सिटीमध्यें (शहरामध्यें) सिटी कमेटी यांच्याकडे राज्यकारभारविषयक खटले चालत असत. या कोर्टांत सर्वांत वरिष्ठ कोर्ट बर्लिनमध्यें असे; यांत कांहीं अंमलबजावणी खात्यांतील अधिकारी व कांहीं न्यायखात्यांतील अधिकारी असे दोन्ही असत. साध्या कोर्टांपुढें कोणचीं कामें चालावीं व राज्यकारभारविषयक कोर्टांपुढें कोणचीं कामें चालावीं हें ठरविण्याकरितां एक कोर्ट ऑफ कॉन्फ्लिक्ट्सुद्दी होतें.

प्रशियांतील न्यायासनांची माहिती दिली. त्याचप्रमाणें तेथील लोकसभा, राजा व मंत्रि इत्यादींची माहिती देणें गैरवाजवी होणार नाहीं. प्रशियाच्या गादीवर आनुवंशिक राजे असत; सर्व कायद्यांना त्यांची सही व मंत्र्यांची अनुमति लागत असे. राज्यांतील मुख्य अधिकारी नेमण्याचा,

प्रशियाची राज्यघटना.

स्वतःचा खर्च करण्याचा व पदव्या देण्याचा राजाला अधिकार होता. मंत्रि हे राजाचे नोकर असून ते त्याला जबाबदार होते. त्यांना नेमणें व काढून टाकणें या बाबतींत लोकसभेला कांहीं अधिकार नव्हता. लोकसभेच्या दोन्ही सभांत त्यांना हजर राहून बोलतां येत असे. मंत्र्यांच्या हातीं निरनिराळीं खातीं वाटून दिलेलीं होतीं व कॉलेज ऑफ मिनिस्टर्स किंवा मिनिस्ट्री ऑफ स्टेट या नांवानें त्यांचें मंडळ भरत असे. त्यांत परस्परांचा विचारविनिमय व निरनिराळ्या खात्यांच्या कार्यांची एक-वाक्यता होत असे. याशिवाय चेंबर ऑफ अकाउंटस या नांवाची एक

संस्था असून तिच्या हातीं आयव्ययासंबंधींची सत्ता होती. ही संस्था देखील राजालाच जबाबदार होती. यांतील कांहीं सभासद राजा नेमीत असे व कांहीं मंत्रिमंडळ नेमीत असे. या संस्थेचा अध्यक्ष मंत्रिमंडळाकडून सुचविला जाई व त्याची नेमणूक राजाकडून होई. याशिवाय इकॉनॉमिक कौन्सिल म्हणजे आर्थिक मंडळ म्हणून एक संस्था असे व तिच्याकडे व्यापार, शेती व पब्लिक वर्क्स यासंबंधीं सल्ला देण्याचें काम असे. त्याचप्रमाणें बुंडेसॅटमध्यें प्रशियाच्या मंत्रिमंडळानें कशीं मतें द्यावयाचीं हेंहि हेंच मंडळ ठरवीत असे.

प्रशियाची लोकसभा.

प्रशियांतील लोकसभा ही द्विदळ स्वरूपाचीच होती. एक प्रतिनिधिसभा (हाउस ऑफ रिप्रिझेंटेटिव्हज) व दुसरी महाजनसभा (हाउस ऑफ लॉर्डस). महाजनसभेंत आनुवंशिक सरदार, तहाहयात सभासद मोठमोठे अधिकारी, राजघराण्यांतील राजानें नेमलेले पुरुष (ज्यांच्या जहागिरी किंवा राज्यें नष्ट झालीं होतीं असे). विश्वविद्यालयांचे प्रतिनिधी व राजानें बोलावलेले इतर मोठे लोक यांचा समावेश होत असे. प्रतिनिधिसभेंत प्रशियांतील पंचवीस वर्षांवरील सर्व लोकांनीं निवडलेले प्रतिनिधी असत. प्रशियांतील निवडणुकीची पद्धति थोडी विशिष्ट प्रकारची होती. सर्व देशाचे निरनिराळे विभाग या कामारितां केलेले होते. प्रत्येक विभागांतील मतदारांचे तीन गट केलेले होते. प्रत्येक गटांतील लोक त्या विभागांतील कर बसविलेल्या मालमत्तेपैकीं एक तृतीयांशाचे मालक असत. या तीन गटांपैकीं प्रत्येक वर्गाकडून एक तृतीयांश मतदार निवडले जात, व ते सर्व मिळून प्रतिधिधिसभेच्या सभासदांची निवड करीत असत. प्रत्येक अडीचशें लोकांना एक मतदार निवडण्याचा अधिकार असे. मतें जाहीरपणें द्यावीं लागत. प्रतिनिधींचें

वय तिसांपेक्षां जास्त असावें लागे व निवडणूक पांच वर्षांच्या मुदतीनें केली जाई.

सामान्यतः दोन्ही सभांचें काम पृथक् बैठकींत चालत असे. राजा अज्ञान असून रीजंट नेमावयाचा असल्यास एकत्र बैठकींत त्याची निवड केली जाई. कायदे करण्याची सत्ता, राजा व या दोन सभा यांच्याच हातीं असे. कोणत्याही सभेला कायद्याचे मसुदे प्रथम पुढें आणतां येत; परंतु आयव्ययासंबंधीचे मसुदे मात्र प्रतिनिधि सभेंतच पुढें आणले जात. अंदाजपत्रक जसेंच्यातसें पास तरी करावें किंवा नापास तरी करावें. परंतु त्यांत फेरफार सुचवूं नयेत, असा नियम होता. बहुतेक सत्ता मंत्र्यांच्या हातीं होती व ते लोकसभेला जबाबदार नसत.

स्थानिक स्वराज्यः—प्रशियांत स्थानिक स्वराज्याचे चार मुख्य विभाग होते; ते प्रॉव्हिन्स, डिस्ट्रिक्ट् सर्कल, व ग्राम आणि नगर हे होत. सर्वांत खालचा विभाग म्हणजे ग्राम (Township) किंवा नगर (Town) ग्रामांत मेयर, प्रेसिडेंट किंवा व्हिलेज जज्ज् नावांचा एक प्रमुख अधिकारी असे; व मोठ्या खेड्यांत त्याला एक कौन्सिल दिलेलें असे. लहान खेडयांत ग्रामसभा (सर्व रहिवाशांची सभा) असे. शहरांतील व्यवस्था निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळी असे. कित्येक ठिकाणीं एकच बर्गोमास्टर नांवाचा अधिकारी असे; व कित्येक ठिकाणीं बोर्डें किंवा कौन्सिलें असत. आयव्यय, पोलीस व लष्कर या बाबतींत मध्यवर्ति सरकारच्या हातीं सर्व सत्ता होती. मोठमोठ्या शहरांत एक मेयर व एक ॲल्डरमेनचें कौन्सिल असे. या कौन्सिलांत कांहीं तज्ञ अधिकारी व कांहीं लोकनियुक्त प्रतिनिधी असत. मेयर हाही एक तज्ञ (Trained) अधिकारी असे. मेयर व ॲल्डरमेन यांच्या हातीं अंमलबजावणीची सत्ता असे. याशिवाय टौन कौन्सिल नांवाची संस्था असे व तिचा अंदाजपत्रकावर ताबा असे.

निरनिराळ्या खेड्यांचा एक गट करून त्याला ॲडमिनिस्ट्रेटिव्ह डिस्ट्रिक्ट असे म्हणत. याच्यावर एक न्यायाधीश नेमला जाई. याच्या हातीं स्थानिक पोलीस असे व आरोग्य आणि दारिद्र्य निवारण हीं कामें याच्याकडे असत. याची नेमणूक सरकलमधील डायट (सभा) च्या सूचनेप्रमाणें राजा करीत असे.

याच्यावरचा विभाग म्हणजे डिस्ट्रिक्ट. पण यांत स्थानिक स्वराज्याची मुळींच संस्था नसून मध्यवर्ति सरकारच्या राज्यकारभारासाठीं केलेला हा एक विभाग होता. यांतील सर्व अधिकारी मध्यवर्ति सरकारच नेमीत असे. त्या सर्वांना समुच्चयानें ॲड्मिनिस्ट्रेशन असें नांव असे, व त्यांचा स्थानिक मुख्य अधिकारी ॲड्मिनिस्ट्रेशन प्रेसिडेंट या नांवानें प्रसिद्ध असे. कामाच्या सोयीसाठीं अधिकाऱ्यांचीं निरनिराळीं बोर्डें केलेलीं असत. प्रत्येक बोर्डाच्या मुख्याला सुपीरियर ॲड्मिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलर असें म्हणत. याशिवाय एक डिस्ट्रिक्ट कमेटीही असे व हिच्यांतील सभासद कांहीं तज्ञ अधिकारी व कांहीं प्रॉव्हिन्शियल कमेटीनें नेमलेले सभासद असे असत. कांहीं बाबतींत ॲड्मिनिस्ट्रेटिव्ह प्रेसिडेंटच्या हुकुमांना मान्यता देण्याचें काम या कमेटीकडे असे; व राज्यकारभारविषयक न्यायदानाचेंही काम हिजकडेच असे.

डिस्ट्रिक्टच्या वरचा देशाचा मोठा विभाग म्हणजे सरकल. यांत डायट ही सभा मुख्य असे. हिच्यांत शहरांचे व खेड्यांचे प्रतिनिधी असत. सरकलमधील मुख्य अंमलबजावणीचा अधिकारी लॅंडरॅट नांवाचा असे. तो मध्यवर्ति सरकार व लॅंडरॅट या दोघांचीही कामें करी.त्याला एक सरकल कमेटी नांवाची मदत कमेटी असे. लॅंडरॅट हा सिव्हिलसर्व्हंट असून त्याची नेमणूक प्रॉव्हिन्सच्या मुख्य अधिकाऱ्याकडून होत असे. सरकल कमेटीकडे राज्यकारभारविषयक न्यायदानाचें काम असे.

याच्यावरचे मोठे विभाग म्हणजे प्रॉव्हिन्सेस. यांच्यावरील मुख्य अधिकाऱ्याला सुपीरिअर प्रेसिडेंट असा हुद्दा असे. शिवाय प्रत्येक प्रॉव्हिन्समध्यें एक प्रॉव्हिन्सियल कौन्सिल असून त्याला स्थानिक बाबतींत कांहीं अधिकार असत. लँडटॅग नांवाची एक सभा असून तींत सरकारच्या डायटमध्यें निवडलेले प्रतिनिधि सभासद असत. लँडटॅगला, अधिकारी निवडणें, सरकल्समध्यें करांची रक्कम वाटून देणें, प्रॉव्हिन्सचें अंदाजपत्रक मंजूर करणें वगैरे अधिकार असत. प्रॉव्हिन्शियल कमेटीची निवड या सभेंतच होत असे. राज्यकारभाराची जबाबदारी सुपीरिअर प्रेसिडेंटवर असे.

१९१८च्या राज्यक्रांतीनंतरची जर्मनीची राज्यघटना

१९१८ च्या नोव्हेंबरमध्यें जर्मनींत राज्यक्रांति झाल्यानंतर त्यामध्यें शुद्ध लोकशाही स्थापन झाली. तसेंच जर्मनींतील सर्व पोटराज्यांतील राजांनाही पदच्युत करून तेथेंहि लोकशाहीची स्थापना करण्यांत आली. पूर्वींच्या पोटराज्यांचें स्टेट नांव काढून त्यांना टेरिटरी हें नांव देण्यांत आलें. पूर्वींचें संयुक्त राज्याचें स्वरूप बदललें आहे. प्रशियाचे बारा प्रांत (प्रॉव्हिन्सिस्) स्वतंत्रपणें गणले गेले आहेत. प्रशियातर्फे इंपीरियल कौन्सिलमध्यें (बुंडेस्रटबद्दल उत्पन्न केलेली संस्था) एकंदर सभासदांच्या दोन पंचमांश सभासद असून त्यांतून निम्मे प्रांतांनीं नेमून द्यावयाचे आहेत. अशाप्रकारें पूर्वींचें प्रशियाचें वर्चस्व जवळजवळ नाहींसें झालें आहे. बुंडेस्रटच्या ऐवजीं इंपीरियल कौन्सिल ही संस्था स्थापन केली आहे. दहा लक्ष लोकसंख्येला एक सभासद या प्रमाणांत या सभेंतील सभासदांची संख्या ठरविण्यांत आली आहे.प्रत्येक टेरिटरीला निदान एक तरी सभासद असलाच पाहिजे, प्रशियाचे सभासदही मर्यादित केले आहेत. हे सभासद पूर्वींप्रमाणें त्या त्या सरकारकडूनच निवडले जातील. या सभेचें अंमलबजावणीचें कार्यही पूर्वी-

च्या बुंडेस्रॅट इतकेंच ठेवण्यांत आलेलें आहे. हें कार्य कमेट्यामार्फत केलें जाईल व त्यांत प्रत्येक टेरिटरीला एक मत असेल. या सभेला पूर्वीच्या बुंडेस्रॅटपेक्षां इतर सत्ता फारच कमी आहे. कायद्याचे मसुदे पुढें आणण्याचा तिला अधिकार आहे. तरी हा अधिकार प्रत्यक्ष व्यवहारांत चॅन्सेलर व मंत्रि यांच्याकडेच जाईल व हे तर रीचस्टॅगला म्हणजे प्रतिनिधिसभेला जबाबदार केलेले आहेत. तसेच रीचस्टॅगनें पास केलेले मसुदे अमान्य करण्याचाही पूर्ण अधिकार इंपीरियल कौन्सिलला नाहीं.

रीचस्टॅग (प्रतिनिधि सभा) ही तशीच कायम राखली असून मंत्रि व चॅन्सेलर हे तिला जबाबदार केलेले आहेत. जे लोक प्रतिनिधिसभेच्या विश्वासाला पात्र आहेत, अशाच लोकांचीं नांवें राष्ट्राध्यक्षाला मंत्रिपदासाठीं चॅन्सेलरनें सुचवावीत व चॅन्सेलर आणि मंत्रि, हे प्रतिनिधिसभेच्या विश्वासास नेहेमी पात्र असावेत असें नव्या राज्यघटनेनें ठरविलें आहे. प्रत्येक मंत्रि आपल्या खात्यापुरताच जबाबदार आहे. परंतु मंत्र्याच्या प्रत्येक हुकुमावर चॅन्सेलरची सही असली पाहिजे.

राष्ट्राध्यक्ष हा इंग्लंडचा राजा किंवा फ्रान्सचा राष्ट्राध्यक्ष याप्रमाणें पक्षभेदापासून अलिप्त असावा, त्याची निवडणूक लोकांनीं करावी, ती सात वर्षांच्या मुदतीची असावी, व पुनः त्याची नेमणूक होऊं नये असें आतां ठरविलें आहे. तो, चॅन्सेलर व मंत्रि, यांपैकीं कोणावरही इंपीचमेंट (खटला) करण्याचा अधिकार रीचस्टॅगला आहे. रीचस्टॅगनें ठरविल्यास मुदत भरण्यापूर्वीं सुद्धां राष्ट्राध्यक्षाला कामावरून दूर करतां येतें. मुख्य सेनापतीचें काम आणि परराष्ट्राशीं येणाऱ्या संबंधांत जर्मनीचा प्रतिनिधि म्हणून बोलणें, चालणें करणें हीं त्याचीं मुख्य कर्तव्यें आहेत.

रीचस्टॅग केव्हां बोलवावी, कशी बरखास्त करावी, तिचें काम कसें चालावें या संबंधींही नवे नियम केलेले आहेत. तसेंच निडवणुकी संबंधानें बऱ्याच सुधारणा केल्या आहेत. त्यांत स्त्रीपुरुषांचे समान हक्क मान्य करणें,

प्रमाणशीर मतदान सुरूं करणें, मतदान गुप्त रीतीनें चालूं ठेवणें, पंचवीस वर्षांची अट काढून एकवीस वर्षांची घालणें, या सुधारणा महत्त्वाच्या आहेत.

रीचस्टॅग आणि इंपीरियल कौन्सिल (रीचस्रॅट) याच्यांत मतभेद उत्पन्न झाल्यास प्रत्यक्ष मतदारांचें मत घेण्याची पद्धति (रेफरेंडम्) सुद्धां सुरूं करण्यांत आली आहे. प्रत्यक्ष मतदारांचें मत घेण्यास राष्ट्राध्यक्षानें परवानगी द्यावी व त्यानें न दिल्यास रीचस्टॅगनें दोन तृतीयांशाच्या बहुमतानें तसें करण्यास राष्ट्राध्यक्षाला जरूर तर भाग पाडावें असें ठरविलें आहे. राज्य-घटनेच्या प्रश्नासंबंधीं दोन सभांत मतभेद उद्भवल्यास मतदारांचें मत घेतलेंच पाहिजे. तसेंच एक दशांश मतदारांनीं कोणत्याही कायद्याच्या मसुद्यावर मतदारांचें प्रत्यक्ष मत घेण्याची विनंती केली असतां राष्ट्राध्यक्षानें ती मान्य केली पाहिजे. अंदाजपत्रक, करवसुली किंवा पगार यासंबंधींचे कायद्यांचे मसुदे या नियमाला अपवाद धरले आहेत. त्याच प्रमाणें एकदशांश मतदारांच्या सहीनें कोणताही कायद्याचा मसुदा लोकसभेपुढें आणण्याचा (इनीशिएटिव्हचा) हक्कही लोकांना दिलेला आहे.

पूर्वीच्या पोटराज्यांचे अधिकारही बऱ्याच मर्यादित स्वरूपांत हल्लींच्या टेरिटरीजकडे ठेवण्यांत आले आहेत. लोकशाहीचें स्वरूप कायम ठेवून त्यांना आपल्या राज्यघटनेंत फेरफार करण्याचा अधिकार आहे. त्यांच्यावर साम्राज्यसरकारच्या कायद्यांचें बंधन ठेवलें असल्यानें त्यांचें स्वातंत्र्य पुष्कळच मर्यादित झालेलें आहे.

न्यायदानाच्या व्यवस्थेंत लोकांच्या स्वातंत्र्यरक्षणाच्या दृष्टीनें कांहीं सुधारणा करून पूर्वींची व्यवस्था चालू ठेवली आहे.

---

३ जपान

इ० स० १८८१ मध्यें जपानच्या बादशाहानें प्रथम लोकसत्ताक राज्यव्यवस्था स्थापन करणार म्हणून जाहीर केलें व निरनिराळ्या देशांच्या राज्यघटनांचा विचार करून आपल्या देशाकरितां एक राज्यघटना तयार करण्यासाठीं कमिशन नेमलें. या कमिशनमध्यें प्रिन्स इटो हा प्रमुख गृहस्थ होता. कमिशनाचा अहवाल तयार होऊन १८८९ मध्यें सध्यांची राज्यघटना जाहीर करण्यांत आली व १८९० च्या नोव्हेंबर महिन्यांत जपानची पहिली लोकसभा बोलवण्यांत आली.

सध्यांची राज्यघटना ही राजाची प्रजेला देणगी आहे व तींत फेरफार सुचविण्याचाही अधिकार राजालाच आहे; परंतु कोणताही फेरफार लोकसभेपुढें ठेवला पाहिजे व त्यावेळीं दोन्ही सभांचे निदान दोन तृतीयांश तरी सभासद हजर असले पाहिजेत व त्या फेरफाराला दोनतृतीयांश मतें अनुकूल पडलीं पाहिजेत, तरच तो फेरफार केला जाईल.

तात्त्विक दृष्टीनें कायदे करण्याची सत्ता राजा व द्विदल लोकसभा यांच्या हातीं आहे. लोकसभेंत प्रतिनिधिसभा (House of Representatives) आणि महाजनसभा (House of Peers) अशा दोन सभा आहेत व प्रत्यक्ष व्यवहारांत कायदे करण्याची सर्व सत्ता लोकसभेच्याच हातीं आहे. राजाला लोकसभा बोलविणें, तहकूब ठेवणें व बरखास्त करणें हे अधिकार आहेत. लोकसभेची बैठक दरवर्षीं तीन महिनेपर्यंत भरत असते. एखादी जादा बैठक बोलविण्याचाही अधिकार राजाला आहे. या सभेंतील चर्चा सामान्यतः जाहीररीतीनें होत असते, परंतु एखाद्या प्रसंगीं गुप्त रीतीनें काम चालविण्याचा अधिकार लोकसभेला किंवा राजाला आहे. लोकसभेच्या सभासदांना व्यक्तिशः ज्या सवलती व विशेष हक्क इंग्लंडांत आहेत, तेच जपानमध्यें आहेत.

प्रत्येक सभेमध्यें एक अध्यक्ष व एक उपाध्यक्ष असतो. त्यांना पगार देण्यांत येतो. महाजनसभेंतील हे अधिकारी राजाच नेमतो व प्रतिनिधिसभेंत प्रत्येक जागेकरितां तीन उमेदवारांची निवडणूक सभा करते व त्यांतून कोणाला तरी त्या जागीं राजा नेमतो. यांची कामाची मुदत सात वर्षें असते. प्रत्येक सभेचे अनेक विभाग करण्यांत येऊन या विभागांकडून सारखेच सभासद प्रत्येक स्टँडिंग कमेटींत घेतले जातात. अवश्य असल्यास जादा कमेट्याही विशिष्ट कामाकरितां नेमण्यांत येतात. कायद्याचे मसुदे पुढें आणण्याचा अधिकार प्रत्येक सभेला आहे, किंवा सरकारही ते पुढें आणूं शकतें. प्रत्येक मसुदा दोन्ही सभांत पास होऊन त्यावर राजाची सही व्हावी लागते. अंदाजपत्रक प्रथमतः प्रतिनिधिसभेपुढेंच सादर केलें पाहिजे. परंतु महाजनसभेला त्यांत फेरफार करतां येतात.

महाजनसभेंत एकंदर पांच प्रकारचे सभासद असतात. (१) राजघराण्यांतलि प्रौढ पुरुष. (२) पंचवीस वर्षांवरील प्रिन्सिज्. (३) काऊंट, व्हायकाऊंट व बॅरन यांनीं आपल्या वर्गांतील निवडलेले पंचवीस वर्षांवरील प्रतिनिधी. (४) मोठें देशकार्य केलेले किंवा विद्वान् यांपैकीं ज्यांची राजाकडून नेमणूक केली जाईल ते. (५) सर्वांत अधिक कर देणाऱ्यांचे त्यांनीं निवडलेले प्रतिनिधी. हुद्देवाल्यालोकांपेक्षां बिनहुद्देवाल्यांची संख्या नेहमीं कमीच असली पाहिजे. निवडलेले लोक सात वर्षेंपर्यंत काम करतात व इतर सभासद तहहयात असतात. या सभेंतील सभासदांची एकंदर संख्या सध्यां ३९९ आहे. अशा प्रकारें उच्च कुल, विद्वत्ता, संपत्ति व देशसेवा या सर्व तत्त्वांच्या आधारावर महाजनसभेची रचना झालेली आहे. या महाजनसभेला इतर देशांतील महाजनसभांपेक्षां थोडे अधिक अधिकार आहेत. कायद्याच्या बाबतींत या सभेला प्रतिनिधिसभेच्या बरोबरीचे अधिकार आहेत व पुष्कळ वेळां प्रतिनिधिसभेनें पसार

केलेले मसुदे ही सभा अमान्य करते. तसेंच आयव्ययासंबंधीं देखील कांहीं अधिकार या सभेला आहेत.

प्रतिनिधिसभेंत एकंदर ४६४ सभासद आहेत. त्यांचें वय तिसांवर असावें लागतें व त्यांना निवडण्याचा मताधिकार पंचवीस वर्षांवरील, तीन येन प्रत्यक्ष कर देणाऱ्या प्रत्येक जपानी पुरुष नागरिकाला आहे. ३०००० पेक्षां जास्त लोकसंख्येच्या शहरांना एक सभासद पाठविण्याचा अधिकार आहे. एक लक्षाहून अधिक लोकसंख्येच्या शहरांना प्रत्येक ३०००० लोकसंख्येला एक अशा प्रमाणांत सभासद पाठविण्याचा अधिकार आहे. खेडयांच्या गटांमार्फत प्रत्येक १३०००० लोकसंख्येला एक सभासद या प्रमाणांत सभासद पाठविण्याचा अधिकार आहे. निवडणुकीचे विभाग एकेक प्रतिनिधि निवडला जावा असेच केलेले आहेत. राजघराण्यांतील पुरुष, लष्करांत व आरमारांत प्रत्यक्ष काम करणारे लोक, धर्माधिकारी; विद्यार्थी, प्राथमिक शाळांतील शिक्षक व इतर कांहीं सरकारी अधिकारी, यांना प्रतिनिधि होतां येत नाहीं. प्रत्येक चार वर्षांनीं नवी निवडणूक झालीच पाहिजे व मध्यंतरी सभा बरखास्त झाल्यास मध्यंतरी झाली पाहिजे. मतदान गुप्त असतें व प्रत्येक मतदारानें ज्याला मत द्यावयाचें त्याचें नांव चिठीवर लिहावें असा नियम असल्यानें मतदारांस साक्षरतेची अट आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

अंमलबजावणी खात्याचा अधिपति राजा हा असून लोकसभा बोलावणें, तहकूब करणें, बरखास्त करणें हे अधिकार त्याला आहेत. लोकसभा भरली नसल्यास कांहीं जरूरीच्या कामाकरितां हुकूम सोडून मग त्याला लोकसभेची संमति मिळविण्याचा अधिकार आहे. तसेंच कायद्याची अंमलबजावणी व्हावी आणि शांतता व सुव्यवस्था राहावी या करितांही हुकूम (Ordinances) सोडण्याचा अधिकार त्याला आहे. सैन्य व आरमार यांचें मुख्य सैनापत्य त्याच्याकडे असून त्यांची घटना ठर-

विणें व परराष्ट्रीय संबंधांत युद्ध करणें, तह करणें वगैरे अधिकार त्याला आहेत. तसेंच राज्यकारभारांतील अधिकाऱ्याच्या नेमणुका करण्याचा, पदव्या देण्याचा व गुन्हेगारांस माफी देण्याचा अधिकार त्याला आहे. परंतु हे सर्व अधिकार त्यानें त्या त्या खात्याच्या मंत्र्याच्या सल्लयानेंच उपभोगिले पाहिजेत, त्याच्या प्रत्येक कृत्याला मंत्र्याची लेखी अनुमती पाहिजे व त्याच्या सर्व कृत्यांबद्दल त्या त्या खात्याचा मंत्रीच जबाबदार असला पाहिजे. यामुळें राजाचे सर्व अधिकार मंत्रिमंडळाच्याच हातीं आलेले आहेत.

राजाला सल्ला देण्याला एक प्रिव्हिकौन्सिल म्हणून संस्था आहे. तींत एक अध्यक्ष, एक मुख्य चिटणीस, पांच चिटणीस व पंचवीस इतर सभासद असतात. सर्व मंत्रि हे अधिकारी या नात्यानें प्रिव्हिकौन्सिलचे सभासद असतात. अंमलबजावणीच्या कामांत, राज्यघटनेच्या कामांत, मंत्रिमंडळाच्या निवडणुकीसंबंधीं व इतर कामांत राजाला सल्ला देण्याचें काम या कौन्सिलकडे आहे. राज्यघटनेंत याच संस्थेकडे हें काम दिलें आहे; परंतु हें काम आतां मंत्रिमंडळच करीत असतें. मंत्रिमंडळ ही संस्था राज्यघटना मानीत नाहीं, तथापि आज तिच्या हातीं सर्व राज्यसूत्रें आलेलीं आहेत. मंत्रिमंडळ हें प्रतिनिधिसभेला जबाबदार असतें. राजा, मंत्रिमंडळ व प्रतिनिधिसभा यांचे संबंध इंग्लंडांतल्याप्रमाणेंच येथेंही आहेत. मंत्रिमंडळांत एकंदर दहा मंत्रि असतात. त्यांतील एक मुख्य प्रधान असतो. बाकीचे नऊ म्हणजे अंतर्गत मंत्रि, परराष्ट्रीय मंत्रि, आयव्ययमंत्रि, लष्करमंत्रि, आरमारमंत्रि, न्यायमंत्रि, शिक्षणमंत्रि, कृषि व व्यापारमंत्रि, व तार, पोस्ट, रेल्वे वगैरेसंबंधीचा मंत्रि, हे होत.

न्यायासनें:—न्यायदानाचें सर्व काम राजाच्या नांवानें न्यायासनें करीत असतात. हीं न्यायासनें एकंदर चार दर्जाचीं आहेत. (१) स्थानिक कोर्टें. (२) डिस्ट्रिक्ट कोर्टें. (३) अपील कोर्टें. आणि (४) सुप्रीम कोर्ट. स्थानिक कोर्टांत एकेक न्यायाधीश असतो. डिस्ट्रिक्ट कोर्टें

व अपील कोर्टें यांत अनेक न्यायाधीश असून तीन तीन न्यायाधीशांचे गट करून त्यांच्याकडे कामें वाटून दिलेलीं असतात. सुप्रीमकोर्टांतही अनेक न्यायाधीश असतात. व त्यांचे पांचपांचाचे गट केलेले आहेत. प्रत्येक कोर्टाचे अधिकार कायद्यानें ठरलेले आहेत. प्रत्येक कोर्टाला दिवाणी व फौजदारी कामें चालविण्याचा अधिकार असतो. राज्यकारभारविषयक कामें चालविण्यासाठीं एक राज्यकारभारविषयक कोर्टही स्थापिलेलें आहे. राज्य-घटनेचा विचार करण्याचा अधिकार न्यायासनांना नाहीं. राज्यघटनेचा अर्थ करण्याचा अधिकार राजाला आहे.

स्थानिक स्वराज्यः—जपानांतील स्थानिक स्वराज्याच्या संस्था प्रशियाच्या संस्थांच्या नमुन्याच्या आहेत. सर्व देशाचे 'फु' व 'केन' अशा नांवांचे विभाग केलेले आहेत. फू हीं शहरेंच आहेत. केनमध्यें अनेक गावांचा समावेश होतो. यांचे पुनः 'शि' आणि 'गन' असे पोटविभाग आहेत. गनचे पुनः शहरें व खेडीं असे विभाग आहेत. फू किंवा केन यांच्यावर एक प्रिफेक्ट म्हणून अधिकारी असतो. त्याला एक कौन्सिल व एक सभा मदत करण्याला दिलेलीं असतात. प्रत्येक गनमध्यें एक शेरीफ, एक कौन्सिल व एक सभा अशीच व्यवस्था असते. म्युनि-सिपालिटींतही मेयर, म्युनिसिपल कौन्सिल व म्युनिसिपल सभा अशा संस्था असतात. ज्या गांवांत म्युनिसिपालिटी नाहीं तेथें व खेड्यांत, एक मॅजिस्ट्रेट व एक नगरसभा किंवा ग्रामसभा असते. यांचे अधिकार वरिष्ठ सरकारनें ठरविलेले असतात. स्थानिक स्वराज्यांतील मताधिकार वसती व कांहीं कर देणें यांवर अवलंबून असतो.

प्रकरण ३ रें.

प्रचालेत शासनसंस्था

कानडा, ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका व हिंदुस्थान.

या प्रकरणांत ब्रिटिश साम्राज्यांतील युनायटेड किंग्डमच्या बाहेरच्या प्रमुख घटकावयवांच्या राज्यव्यवस्थांची माहिती द्यावयाची आहे. युनायटेड किंग्डमच्या (इंग्लंड, स्कॉटलंड व आयर्लंड) बाहेर जे ब्रिटिश साम्राज्याचे घटक आहेत, त्याचे राज्यव्यवस्थेच्या दृष्टीनें तीन वर्ग करतां येतील. (१) स्वराज्यमंडित वसाहती. यांत जबाबदार राज्यपद्धति पूर्णपणें परिणत झालेली असून त्यांना पूर्ण स्वराज्याचे अधिकार प्राप्त झालेले आहेत. यांचा साम्राज्यांतील दर्जा एकसारखा वाढत असून, इंग्लंडच्या बरोबरीचा होत चालला आहे. यांना वसाहती असें न म्हणतां 'डोमिनियन्स्' किंवा 'सिस्टर स्टेट्स ' असें म्हणण्याचा प्रघात पडत आहे. (२) क्राउन् कॉलनीज् म्हणजे राजाच्या ताब्यांतील वसाहती. यांचा राज्यकारभार इंग्लंडांतील वसाहतमंत्रि आणि वसाहतीवर ब्रिटिश मंत्रिमंडळानें नेमलेला गव्हर्नर यांच्या हातीं असून त्यांतील लोकांचें तेथील सरकारवर मुळींच नियंत्रण नाहीं. (३) तिसरा वर्ग या दोहोंच्या दरम्यानची राज्यव्यवस्था ज्या ठिकाणीं आहे त्यांचा. या वसाहतींत किंवा देशांत लोकनियुक्त कायदेमंडळें आहेत. परंतु तेथें जबाबदार राज्यव्यवस्था स्थापन झालेली नाहीं. पहिल्या वर्गांत कानडा, ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका, न्यूझीलंड व न्यू फौंडलंड यांचा समावेश होतो. दुसऱ्या वर्गांत वेस्टइंडीज्, सीलोन वगैरेंचा समावेश होतो. तिसऱ्या वर्गांत बर्म्युडा, बारबॅडॉस, बहामा हीं येतात. हिंदुस्थानचा समावेश तिसऱ्या वर्गांतच करण्यास हरकत नाहीं. आपणास

या सर्व देशांपैकीं फक्त कानडा, ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका व हिंदुस्थान या देशांतील राज्यव्यवस्थांचा विचार करावयाचा आहे, कारण तेच देश प्रमुख आहेत.

---

१ कानडा

—:०:—

कानडाची प्रचलित राज्यव्यवस्था कशी आहे हें सांगण्यापूर्वी तेथील राज्यव्यवस्थेचा थोडा इतिहास दिला असतां बरें पडेल. १७९३ मध्यें अमेरिकेंतील बऱ्याच वसाहती ब्रिटिश साम्राज्यांतून फुटून निघाल्या व त्यांनीं अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें या नांवाचें स्वतंत्र राज्य स्थापन केलें. यावेळीं कानडांतील लोक इंग्लंडच्या राजाशीं राजनिष्ठ राहिले होते; परंतु त्यावेळीं त्यांची वसाहत फारच लहान होती. अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें हें राज्य स्थापन झाल्यानंतरही तेथील जे लोक ब्रिटिश राजाशीं राजनिष्ठ होते त्यांना कानडांत येऊन वसाहती करण्यास ब्रिटिश सरकारनें पुष्कळ सवलती दिल्या. त्याप्रमाणें संयुक्त संस्थानांतील पुष्कळ लोकांनीं कानडांत येऊन वसाहती केल्या. त्याचवेळीं इंग्लंडांतूनही बरेच लोक जाऊन तेथें वसाहती करूं लागले. अशा रीतीनें कानडाचा विस्तार बराच वाढला; व त्यांत जुने वसाहतवाले व नवे वसाहतवाले यांचे दोन भिन्न प्रदेश अस्तित्वांत आले. जुने वसाहतवाले मूळचे फ्रेंच असून त्यांचा धर्म रोमन कॅथॉलिक होता. नवे वसाहतवाले मूळचे इंग्लिश असून त्यांचा धर्म प्रॉटेस्टंट होता. अर्थात् या दोघांनीं एकत्र नांदणें फार कठीण होतें. त्यांच्यांत वरचेवर तंटे उपस्थित होऊं लागले, म्हणून विल्यम पिटनें १७९१ मध्यें 'कानडा कॉन्स्टिटयूशनल ॲक्ट' नांवाचा कायदा करून एकंदर कानडाचे ऑंटॅरिओ आणि क्वेबेक असे दोन विभाग

राज्यघटनेचा इतिहास.

केले व दोन्ही विभागांत स्वतंत्र राज्यव्यवस्था स्थापन करण्यांत आल्या. प्रत्येक विभागांत एक लोकनियुक्त लेजिस्लेटिव्ह असेंब्ली व एक, राजानें तहहयात नेमणुका केलेल्या सभासदांचें लेजिस्लेटिव्ह कौन्सिल, अशीं स्थापण्यांत आलीं. त्यांच्यावर एक राजानें नेमलेला गव्हर्नर होता. कोणत्याही विभागांत अंमलबजावणी खात्याचे मुख्य अधिकारी लोकप्रतिनिधिसभेला जबाबदार केलेले नव्हते. ही राज्यव्यवस्था कशीतरी १८४० पर्यंत चालली. इतक्या अवधींत कायदे करण्याची सर्व सत्ता लोकनियुक्त लेजिस्लेटिव्ह ॲसेंब्लीकडे आली होती. अर्थात् याच्या पुढची पायरी म्हणजे जबाबदार राज्यव्यवस्था ही अपरिहार्य होती. एकदां लोकनियुक्त सभेकडे कायदे करण्याची सत्ता आली म्हणजे तेथील लोक अंमलबजावणी खात्यांतील अधिकारी आपणांस जबाबदार करून घेतल्याखेरीज राहाणार नाहींत. या नियमाला अनुसरून तेथील लोकांनीं जबाबदार राज्यव्यवस्थेबद्दल जोरांत चळवळ चालविली. १८३७ मध्यें तर दक्षिण कानडामध्यें उघड बंडच उपस्थित झालें. यानंतर लॉर्ड डरहॅम याला कानडांतील लोकांना शांत करण्याकरितां पाठविण्यांत आलें. त्यानें तेथील सर्व व्यवस्था पाहून जबाबदार राज्यव्यवस्था स्थापन करण्याविषयीं आपल्या अहवालांत शिफारस केली. त्यानंतर १८४० मध्यें कानडा यूनियन ॲक्ट पास झाला. या कायद्याप्रमाणें तेथें द्विदळ स्वरूपाच्या लोकसभेची स्थापना करण्यांत आली. प्रतिनिधिसभेस ॲसेंब्ली व महाजनसभेस लेजिस्लेटिव्ह कौन्सिल अशीं नांवें देण्यांत आलीं. तथापि लॉर्ड डरहॅम याच्या रिपोर्टांतील जबाबदार राज्यव्यवस्थेच्या शिफारशीसंबंधीं कांहींच तरतूद करण्यांत आलेली नव्हती. गव्हर्नरला एक कार्यकारी मंडळ मात्र दिलेलें होतें; परंतु त्याची निवडणूक कशी करावी यासंबंधीं कांहींच लिहिलें नव्हतें. पुढें १८४७ मध्यें लॉर्ड एल्जिन हा गव्हर्नर झाला असतां त्याला, कार्यकारी मंडळाच्या सल्ल्यानें सर्व राज्यकारभार करावा आणि कार्यकारी मंडळांत जे सभासद

नेमावयाचे ते प्रतिनिधिसभेच्या विश्वासास पात्र असतील असे नेमावेत असें सरकारी रीतीनें कळविण्यांत आलें. या वेळपासून कानडांत जबाबदार राज्यपद्धति स्थापन झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं; व अशाप्रकारें ब्रिटिशसाम्राज्यांतील वसाहतींत या तत्त्वाचा प्रथम प्रवेश झाला.

परंतु एवढ्यानेंही कानडांतील लोकांचीं सर्व गाऱ्हाणीं दूर झालीं नाहींत. पूर्वी पिटच्या कायद्यानें कानडाचे दोन विभाग केले होते; ते १८४० मध्यें पुनः जोडून एकरूप राज्य स्थापन करण्यांत आलें होतें. ही व्यवस्था तेथील लोकांना सुखाची व सोयीची नव्हती. एकंदर कानडामध्यें अनेक पोटविभाग आहेत व त्या सर्वांना आपापल्यापुरतें स्वातंत्र्य प्राप्त करून घेण्याची इच्छा होणें अगदीं साहजिक होतें. तथापि त्यांना परस्परांपासून अगदीं स्वतंत्र होण्याचीही इच्छा नव्हती. हे दोन्ही हेतु सफल होण्यास संयुक्त राज्यव्यवस्था स्थापन करणें हा एकच उपाय आहे. १८६८ मध्यें 'ब्रिटिश नॉर्थ अमेरिका ॲक्ट' करून पार्लमेंटानें कानडांत संयुक्त राज्यव्यवस्था स्थापन केली. या संयुक्त राज्यांत प्रथम ऑंटेरिओ, केबेक, नोव्हास्कोशिया आणि न्युब्रन्स्विक एवढेच प्रांत सामील झालेले होते. नंतर मॅनिटोबा, व्हॅंकोव्हर, ब्रिटिश कोलंबिया, प्रिन्स एडवर्ड आयलंड, आल्बर्टा आणि सास्कॅचिव्हॅन् हे नवीन प्रांत सामील झालेले आहेत.

येथें सध्यां गव्हर्नर जनरल व त्याचें प्रधानमंडळ यांच्या हातीं अंमलबजावणीचे अधिकार असून कायदे करण्यासाठीं एक लोकसभा आहे;

प्रस्तुत राज्यघटना.

तिची प्रतिनिधिसभा (House of Commons) आणि महाजनसभा (Senate) अशीं दोन दळें आहेत. अंमलबजावणीची सर्व सत्ता प्रधान मंडळाच्याच हातीं असून तें प्रतिनिधिसभेला जबाबदार आहे. गव्हर्नरजनरल हा अंमलबजावणी खात्याचा केवळ नामधारी अधिपति आहे. महाजनसभेंतील चोवीस सभासद ऑंटेरिओंतून व चोवीस

क्वेबेकमधून नेमावयाचे; मॅनिटोबा, अल्बर्टा, सॅस्काचिव्हॅन आणि प्रिन्स एड-वर्ड आयलंड यांच्यांतील प्रत्येकीं चार नेमावयाचे, आणि ब्रिटिश कोलंबिया व व्हॅंकोव्हर यांतील प्रत्येकीं तीन नेमावयाचे असें ठरलेलें आहे. एकंदर या सभेंत सत्त्याऐंशीं सभासद असून त्यांची नेमणूक मंत्रिमंडळाच्या शिफारशीवरून तहाहयात मुदतीनें राजा करतो. प्रतिनिधिसभेंत क्वेबेकमधून पांसष्ट सभासद यावयाचे असतात व बाकीचे लोकसंख्येच्या प्रमाणांत इतर प्रांतांतून निवडून येतात. प्रत्येक प्रांतांत एक लेफ्टनंट गव्हर्नर, एक प्रतिनिधिसभा व तिला जबाबदार असणारें एक कार्यकारी मंडळ, यांच्या हातीं सर्व राज्यकारभार असतो. क्वेबेक व नोव्हास्कोशिया या प्रांतांत द्विदल लोकसभा आहेत. इतर प्रांतांत एकदळ प्रतिनिधिसभाच आहेत. क्वेबेक व नोव्हास्कोशिया यांच्या दोन दळांना लेजिस्लेटिव्ह कौन्सिल व लेजिस्लेटिव्ह ॲसेंब्ली अशीं नावें आहेत. यांशिवाय युकान व नॉर्थ वेस्टर्न टेरिटरीज् असे दोन प्रांत आहेत; त्यांच्यावर कमिशनर्स आहेत. युकानमध्यें कमि-शनराच्या मदतीस दहा लोकनियुक्त सभासद व नॉर्थ वेस्टर्न टेरिटरीजमध्यें चार लोकनियुक्त सभासद असतात.

इंग्लंडांतील राज्यव्यवस्था आणि कानडांतील मध्यवर्ति सरकारची राज्यव्यवस्था यांत फारच साम्य आहे. इंग्लंडांतील राजाचे बहुतेक अधि-

इंग्लंड व कानडा.

कार कानडांतलि गव्हर्नरजनरल राजाच्या नांवानें उपभोगितो. इंग्लंडांत ज्याप्रमाणें द्विदल स्वरूपाची लोकसभा (Parliament) आहे तशीच येथेंही द्विदळ स्वरूपाची लोकसभा (Parliament) आहे. इंग्लंडांतील राजाचें प्रधानमंडळ येथील प्रतिनिधिसभेला जबाबदार आहे, तसेंच येथील प्रधानमंडळ येथील प्रतिनिधिसभेला जबाबदार आहे. मात्र इंग्लंडांतील महाजनसभेचे बहुतेक सभासद आनुवंशिक असतात, व येथील महाजनसभेचे सभासद तहाहयातच असतात. त्यांची नेमणूक मंत्रिमंडळाच्या

सल्ल्यानें गव्हर्नर जनरल करतो. त्यांचें वय तीस वर्षांहून जास्त असलें पाहिजे त्यांचें उत्पन्न दरसाल चार हजार डॉलर्सहून जास्ती असलें पाहिजे. आणि ज्या प्रांतातर्फे त्यांची नेमणूक झाली असेल त्या प्रांतांत ते राहणारे असले पाहिजेत.

कानडाचें राज्य संयुक्त आहे व इंग्लंडचें एकरूप आहे. या बाबतींत कानडा व अमेरिका यांचें साम्य आहे. अमेरिकेंतील लोकांनीं मध्यवर्ति सरकारास कांहीं विशिष्ट हक्क तोडून

कानडा व अमेरिका.

दिलेले असून बाकीचे हक्क संस्थानी सरकारकडे ठेविले आहेत. कानडांत याच्या उलट आहे. तेथें प्रांतिक सरकारला विशिष्ट हक्क तोडून देऊन बाकीचे अधिकार (Residuary Powers) मध्यवर्ति सरकारकडे ठेविले आहेत. कानडा ही ब्रिटिश साम्राज्यांतील वसाहत असल्यानें तें अगदीं स्वतंत्र राज्य नाहीं. त्याची राज्यघटना ब्रिटिश पार्लमेंटानें ठरविलेली आहे.

---

२ ऑस्ट्रेलिया.

--:*:--

ऑस्ट्रेलियाची राज्यव्यवस्था देखील कानडा किंवा अमेरिका यांच्याप्रमाणें संयुक्त स्वरूपाची आहे. ऑस्ट्रेलियाचे न्यू साउथवेल्स, व्हिक्टोरिया, टास्मानिया, क्वीन्सलँड, दक्षिण ऑस्ट्रेलिया व पश्चिम ऑस्ट्रेलिया असे सहा प्रांत आहेत. त्या सर्वांवर संयुक्त सरकार आहे. संयुक्त सरकारांत गव्हर्नरजनरल, द्विदळ स्वरूपाची लोकसभा आणि लोकसभेला जबाबदार प्रधानमंडळ अशा संस्था आहेत. लोकसभेंतील महाजनसभेला ‘ सीनेट ’ व प्रतिनिधिसभेला ‘हाऊस ऑफ् रिप्रिझेंटेटिव्हज’ असें म्हणतात. सीनेटमध्यें प्रत्येक प्रांतांतून सारखेच प्रतिनिधी येतात. तिच्या रचनेंत ऑस्ट्रेलियाच्या राज्याचें संयुक्त स्वरूप व्यक्त झालेलें आहे. प्रतिनिधिसभेचे सभासद

लोकसंख्येप्रमाणें प्रत्येक प्रांतांला वाटून दिलेले आहेत. ही व्यवस्था अगदीं अमेरिकेच्या सारखी आहे. परंतु अमेरिकेंत स्वतंत्र प्रधानमंडळाची व्यवस्था आहे. ऑस्ट्रेलियांत जबाबदार प्रधानमंडळाची व्यवस्था आहे. अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष लोकनियुक्त आहे व त्याच्या हातीं पुष्कळ सत्ता आहे. ऑस्ट्रेलियांतील गव्हर्नरजनरलची नेमणूक इंग्लंडचा राजा करतो व त्या गव्हर्नर जनरलास जवळजवळ कांहींच अधिकार नाहींत. येथें संयुक्त सरकारचें एक संयुक्त न्यायासनही आहे.

ऑस्ट्रेलियाच्या प्रत्येक प्रांतांत द्विदल लोकसभा आहेत व एक गव्हर्नर व जबाबदार प्रधानमंडळ अशी व्यवस्था आहे. न्यू साउथ वेल्स आणि क्वीन्सलँड यांतील महाजनसभेंतील सभासद सरकारनियुक्त आहेत.इतर प्रांतांत तेही लोकनियुक्तच आहेत. संयुक्त सरकारकडे व्यापार, संपत्ति, लष्कर, पोस्ट, खानेसुमारी, रेल्वे, चलनी नाणीं वगैरे संबंधाचे अधिकार सोंपविलें असून इतर सर्व अधिकार प्रांतिक सरकारकडे आहेत.

---

३ दक्षिण आफ्रिका

सन १९०९ च्या कायद्या अन्वयें दक्षिण आफ्रिकेंतील केप ऑफ् गुडहोप. नाताळ, ट्रान्सव्हाल व ऑरेंज रिव्हर कॉलनी, या वसाहती एकत्र करून त्यांचें एकच एकरूप (Unitary) राज्य स्थापन झालें. पूर्वींच्या चार स्वतंत्र वसाहती या आतां एका राज्याचे प्रांत झाल्या. येथेंही एक गव्हर्नर जनरल, द्विदल लोकसभा व प्रधान मंडळ अशा संस्था आहेत. महाजनसभेंत (Senate) एकंदर चाळीस सभासद असतात. त्यांपैकीं चार प्रांतांचे प्रत्येकी आठ आणि सरकारनियुक्त आठ असे असतात. महाजनसभेचा सभासद निदान तीस वर्षें वयाचा, पांच वर्षांचा रहिवासी व दरसाल पांचशे पौंड तरी मिळकत असणारा असला पाहिजे. प्रतिनिधिसभेंत केप

ऑफ गुडहोपचे ५१, नाताळचे १७, ट्रान्सव्हालचे ४५ व ऑरेंज रिव्हर कॉलनीचे १७, याप्रमाणें एकंदर १३० सभासद आहेत. प्रतिनिधिसभेच्या प्रत्येक सभासदास राजनिष्ठेची शपथ घ्यावी लागते. खर्चासंबंधाच्या सूचना लोकसभा करूं शकते. परंतु गव्हर्नर जनरलच्या संमतीशिवाय तिला कर बसवितां येत नाहींत. प्रत्येक प्रांतांत एक कारभारी (Administrator) असून त्याच्या मदतीस प्रांतिक मंडळें आहेत. प्रांतिक मंडळांतील सभासद येणेंप्रमाणें:— केप ऑफ गुड होप ५१, नाताळ २५, ट्रान्सव्हाल् ३६ व ऑरेंज रिव्हर कॉलनी २५. प्रातिक मंडळास प्रांतांतील शिक्षण, संपत्ति, शेतकी, स्थानिकस्वराज्य, रस्ते, पूल वगैरेसंबंधी अधिकार आहेत. परंतु त्यांतसुद्धां एखादा कायदा अमान्य करण्याचा अधिकार गव्हर्नर जनरलास आहे. दक्षिण आफ्रिका हें राज्य संयुक्त स्वरूपांचें नसून तें एकरूपच आहे. कारण जे अधिकार प्रांतिक सरकारला दिलेले आहेत ते कमीअधिक करण्याचा अधिकार वरिष्ठ सरकारला आहे.

---

४ हिंदुस्थान

स्थूल वर्णन.

हिंदुस्थानच्या प्रचलित राज्यव्यवस्थेचें योग्य ज्ञान होण्यास इंग्लंडांतील भारतमंत्री व त्याचें कौन्सिल; हिंदुस्थानांतील गव्हर्नर जनरल, त्याचें कार्यकारी मंडळ व दिल्लीची द्विदल लोकसभा; प्रांतिक गव्हर्नर, त्याची कार्यकारी मंडळें, त्यांचे दिवाण, आणि प्रांतिक कायदे मंडळ, या सर्वांचें परस्पर संबंध व अधिकार समजले पाहिजेत. त्यानंतर न्यायासनांची संघटना व स्थानिक स्वराज्य यांची माहिती दिली म्हणजे हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थेचें चित्र पूर्ण होतें. सध्यां हिंदुस्थानांतील ब्रिटिश मुलखाचे आठ प्रांत केले असून प्रत्येक प्रांतांत एक गव्हर्नर, त्याचे कार्यकारी

मंडळ व दिवाण यांच्या हातीं अंमलबजावणीची सत्ता दिलेली असून कायदे करण्याकरितां एक कायदेमंडळही असतें. यासर्व प्रांतांवर देखरेख करून सर्व हिंदुस्थानावर राज्य करण्याचें काम गव्हर्नर जनरल व त्यांचें कार्यकारी मंडळ, आणि कायदे करणाऱ्या दोन सभा यांच्याकडे आहे. या हिंदुस्थानसरकारावरही देखरेख करण्याकरीतां, हिंदुस्थानच्या राज्यकारभाची सर्व जबाबदारी घेणारा, विलायतेंत ब्रिटिशमंत्रिमंडळांत एक भारत-मंत्रि- (Secretary of State for India) असतो. हा मंत्रिमंडळांतील इतर मंत्र्यांबरोबर इंग्लंडांतील लोकसभेला जबाबदार असतो. शिवाय त्याला इंडिया कौन्सिल (भारतमंडळ) या नांवाचें कौन्सिल दिलेलें असतें.

भारतमंत्रि व भारतमंडळ.

प्रथम भारतमंत्रि व भारतमंडळ यांचे अधिकार काय आहेत याचा विचार करूं. तात्त्विक दृष्टीनें हिंदुस्थानचें राज्य बादशहाच्या (King Emperor) च्या ताब्यांत आहे. तेथील सर्व राज्यकारभार बादशाहाच्या नांवानें चालतो, सर्व कर बादशहाच्या नांवानें वसूल करण्यांत येतात आणि न्यायदानाचें काम न्यायासनें बादशाहाच्या नांवानेंच करीत असतात. तथापि इंग्लडांतील राज्यघटनेप्रमाणें बादशहानें सर्व कृत्यें आपल्या मंत्र्यांच्या सल्ल्यानें करावयाचीं असल्यानें आणि बादशहाच्या सर्व कृत्यांबद्दल त्याचे मंत्रीच जबाबदार असल्यामुळें बादशहाच्या सर्व अधिकारांचा उपभोग भारतमंत्रीच घेत असतो. भारतमंत्रि आणि भारतमंडळ यांना पुढील अधिकार आहेत. (१) हिंदुस्थानांतील कायदे करणाऱ्या सभांनीं पास केलेले कायदे अमान्य (Veto) करण्याच्या बाबतींत बादशहाला सल्ला देणें; प्रांतिक मर्यादा बदलणें, किंवा नवीन प्रांतिक कायदेमंडळें निर्माण करण्याबद्दल जाहीरनामे काढण्याच्या बाबतींत बादशहाला सल्ला देणें; हायकोर्टांचे अधिकार बादशहाचा मंत्रि या नात्यानें उपभोगणें. (२)

भारतमंत्र्याला कांहीं बाबतींत भारतमंडळाला न कळवितां हिंदुस्थानांतील अधिकाऱ्यांना हुकूम करण्याचा अधिकार आहे. उदाहरणार्थ १९१५ च्या गव्हर्नमेंट ऑफ् इंडिया ॲक्टानें हिंदुस्थानच्या सर्व उत्पन्नाचा खर्च करण्याचा अधिकार भारतमंत्रि व भारतमंडळ यांना दिलेला आहे. परंतु या बाबतींत त्याला भारतमंडळाच्या मताविरुद्ध वागण्याचाहि अधिकार आहे. (३) तसेंच हिंदुस्थानच्या राज्यकारभाराबाबत जी संपत्ति बादशहाच्या ताब्यांत असेल ती विकणें, गहाण टाकणें किंवा इतर करार करणें,हे अधिकार त्याला व भारतमंडळाला दिलेले आहेत. (४) याशिवाय हिंदुस्थान सरकारच्या सर्व कारभारावर देखरेख करणें, इंपीरियल सर्व्हिस मधील लोकांना बढती देणें, त्यांना कमी करणें वगैरे अधिकार आहेत.

भारतमंत्रि हा आपल्या सर्व कृत्यांबद्दल तत्त्वतः इंग्लंडांतील पार्लमेंटला जबाबदार असतो. या व इतर तऱ्हेनें हिंदुस्थानच्या राज्यकारभारावर ब्रिटिश पार्लमेंटचा ताबा असतो. त्या ताब्याचें स्वरूप पुढीलप्रमाणें आहेः— (१) कायदे करण्याच्या बाबतींत हिंदुस्थानासंबंधीं वाटेल तो कायदा करण्याचा अधिकार ब्रिटिश पार्लमेंटला आहे. तथापि सामान्यतः नित्याच्या कामाचे कायदे करण्याचे अधिकार पार्लमेंटानें हिंदुस्थानांतील कायदे करणाऱ्या सभांना दिलेले आहेत. त्यांचे अधिकार व घटना हीं मात्र पार्लमेंटकडून ठरविलीं जातात. अर्थात् हिंदुस्थानच्या राज्यघटनेंत कांहीं बदल करावयाचा झाल्यास तो करण्याचा अधिकार पार्लमेंटलाच आहे. (२) राज्यकारभारासंबंधीच्या नियमांनाही पुष्कळ बाबतींत पार्लमेंटची परवानगी घ्यावी लागत असते. गव्हर्नर किंवा गव्हर्नर जनरल यांनीं कायदे करणाऱ्या सभांना न जुमानतां जे कायदे केले असतील ते पार्लमेंटानें मान्य करावे लागतात. भारतमंत्र्याचे अधिकार व हिंदुस्थानसरकारचे अधिकार यासंबंधींचे निर्णय पार्लमेंटानें मान्य करावे लागतात. इंडियन सिव्हिल सर्व्हिससंबंधीचे नियम पार्लमेंटानें पास करावे लागतात. भारतमंत्र्यानें हिंदुस्थानसरकारला

युद्ध सुरूं करण्यासंबंधीं केलेले हुकूम तीन महिन्यांच्या आंत त्यास पार्लमेंटपुढें ठेवावे लागतात. (३) हिंदुस्थानच्या सरहद्दीबाहेर जो लष्करी खर्च होईल त्याला पार्लमेंटची परवानगी लागते. हिंदुस्थानसरकारचें अंदाजपत्रक आणि हिंदुस्थानच्या आर्थिक व नैतिक प्रगतीचा अहवाल दरसाल पार्लमेंटला भारतमंत्र्यास सादर करावा लागतो. त्याचप्रमाणें ऑडिटरचे सर्व अहवाल पार्लमेंटपुढें ठेवावे लागतात. भारतमंत्रि हा मंत्रिमंडळाचा सभासद असल्यानें त्याला प्रश्न विचारण्याचा, त्याच्या खात्यासंबंधीं ठराव आणण्याचा किंवा माहितीचे कागद मागण्याचा अधिकार पार्लमेंटच्या सभासदांना आहे; तथापि पार्लमेंटचे सभासद प्रायः हिंदुस्थानच्या कारभारासंबंधीं कांहीं चौकशी करीत नसल्यामुळें हिंदुस्थानच्या कारभाराची सर्व सत्ता भारतमंत्रि व त्याचें भारत-मंडळ यांच्याच हातीं आहे. १९१९ च्या सुधारणांच्या कायद्यानें भारत-मंत्र्याचा प्रत्यक्ष ताबा हिंदुस्थानच्या कारभारावर यापुढें फार काळ चालणार नाहीं व हिंदुस्थानसरकारला जास्त स्वातंत्र्य मिळेल असा अंदाज आहे.

हिंदुस्थान सरकारः--हिंदुस्थानसरकारचा अधिपति गव्हर्नर जनरल किंवा व्हाइसरॉय हा आहे. याची नेमणूक भारतमंत्र्याच्या सूचनेप्रमाणें बाद-शहा करतो. १९१५ च्या कायद्याप्रमाणें हिंदुस्थानच्या लष्करी व मुलकी राज्यकारभारावर देखरेख करण्याचा, धोरण ठरविण्याचा व त्यावर ताबा चालविण्याचा अधिकार गव्हर्नर जनरल व त्याचें कार्यकारीमंडळ यांना दिलेला आहे; मात्र त्यांनीं भारतमंत्र्याकडून येणारे हुकूम मान्य केले पाहिजेत. अशा प्रकारें गव्हर्नरजनरलला आपलें कार्यकारीमंडळ आणि भारतमंत्रि या दोघांच्या इच्छेकडे लक्ष देऊन राज्यकारभार करावा लागतो. राजाचा प्रतिनिधि या नात्यानें त्याला विशिष्ट अधिकार प्राप्त झालेले असून त्याला त्याच्या दर्जाला साजेसा मानही दिला जातो. त्यानें अधिकारी या नात्यानें केलेल्या कृत्या-बद्दल त्याच्यावर कोणत्याही हायकोर्टापुढें खटला चालू शकत नाहीं-त्याला कोणत्याही कृत्याबद्दल अटक किंवा कैद करतां येणार नाहीं.

अशा तऱ्हेच्या कांहीं सवलती त्याला दिलेल्या आहेत. त्याच्या कार्यकारीमंडळांत पूर्वी सहाच सभासद असत, परतु १९१९ च्या कायद्यानें ही मर्यादा काढून टाकलेली आहे. सध्यां त्याच्या कार्यकारी मंडळांत आठ सभासद आहेत. त्या आठ सभासदांकडे निरनिराळीं खातीं वांटून दिलेलीं असतात. परराष्ट्रीय संबंध व राजकारण हीं खातीं (Foreign and Political departments) स्वतः गव्हर्नर जनरलच्या ताब्यांत असतात. याशिवाय (१) होम (अंतर्गतव्यवस्था); (२) रेव्हिन्यु, शेती व पब्लिक वर्क्स; (३) व्यापार; (४) शिक्षण व आरोग्य; (५) आयव्यय; (६) उद्योगधंदे व दारूगोळा; (७) कायदा. या खात्यांवर एकेक कार्यकारी सभासद नेमलेला असतो. याशिवाय मुख्य सेनापती—(Commander in chief) हाही या मंडळाचा जादा सभासद (Extra ordinary member) असतो. या मंडळाचा गव्हर्नर जनरल अध्यक्ष असतो, व याशिवाय तो कोणास तरी उपाध्यक्ष नेमून ठेवितो. अध्यक्ष व उपाध्यक्ष हे दोघेही गैरहजर असल्यास मंडळ आपल्यापैकीं कोणास तरी अध्यक्ष करते. हिंदुस्थानसरकारचे सर्व हुकूम व कार्यें गव्हर्नर जनरल व कार्यकारी मंडळ यांच्या नांवानें केलीं जातात. हिंदुस्थानची शांतता व संरक्षण यांना धोका येण्याचा संभव नसेल तर कार्यकारी मंडळांतील बहुमताचा निर्णय गव्हर्नर जनरलास मान्य करावा लागतो. गव्हर्नर जनरल ज्यावेळीं कार्यकारी मंडळानें बहुमतानें दिलेला निर्णय मान्य करीत नाहीं त्यावेळीं त्या गोष्टीचा रिपोर्ट भारतमंत्र्याकडे करण्याचा अधिकार कार्यकारीमंडळांतलि कोणत्याही दोन सभासदांस आहे. गव्हर्नर जनरल हा हिंदुस्थानचा राजा समजल्यास त्यांचें कार्यकारी मंडळ हें त्याचें मंत्रिमंडळ होतें. परंतु हें कार्यकारी मंडळ कायदे करणाऱ्या लोकसभेला जबाबदार नाहीं. इग्लंडांतील मंत्रिमंडळ तेथील

जबाबदार राज्यपद्धति व हिंदुस्थान.

लोकसभेला जबाबदार आहे. १९१७ मध्यें, हिंदुस्थानला जबाबदार राज्यपद्धति द्यावयाची, हें धोरण भारतमंत्र्यानें इंग्लंडांतील लोकसभेंत जाहीर केलें. त्यानंतर १९१९ च्या सुधारणाचा कायदा झाला. तथापि अद्यापि जबाबदार राज्यपद्धतीच्या तत्त्वाचा शिरकाव हिंदुस्थानसरकारांत झालेला नाहीं. प्रांतिक सरकारांत मात्र तो अंशतः करण्यांत आलेला आहे.

लोकसभाः–१९१९ च्या सुधारणांच्या कायद्यानें हिंदुस्थानसरकारांत द्विदल स्वरूपाच्या कायदे करणाऱ्या लोकसभेची स्थापना करण्यांत आली आहे. तेथील प्रतिनिधिसभेस लेजिस्लेटिव्ह ॲसेंब्ली व महाजन सभेस कौन्सिल ऑफ स्टेट्स् अशीं नावें देण्यांत आलीं आहेत. महाजन सभेंत एकंदर ६० सभासद असतात. त्यांपैकीं ३३ लोकनियुक्त, फारतर २० सरकारी व इतर सरकारनियुक्त पण बिन सरकारी असे सभासद असतात. या सभेचा अध्यक्ष नेमण्याचा अधिकार गव्हर्नर जनरलाला आहे. प्रतिनिधिसभेंत एकंदर १४४ सभासद असतात. त्यांपैकीं १०३ लोकनियुक्त व ४१ सरकारनियुक्त असतात. सरकारनियुक्तांपैकीं २६ सरकारी अधिकारी असतात. कायद्याप्रमाणें प्रतिनिधि सभासदाची-संख्या १४० च ठरली आहे, पण त्यांत थोडीफार वाढ करण्याची सत्ता गव्हर्नर जनरलला आहे; मात्र लोकनियुक्त सभासद व सरकारनियुक्त सभासद यांचें प्रमाण कायम ठेविलें पाहिजे. प्रतिनिधिसभेचा अध्यक्ष प्रथमतः गव्हर्नर जनरलनें नेमलेला होता; परंतु सध्या प्रतिनिधि-सभा त्याची निवडणूक करूं शकते; मात्र ती निवडणूक गव्हर्नर जनरलनें मान्य केली पाहिजे. याच प्रमाणें एका उपाध्यक्षाची निवडणूक ही सभा करते. गव्हर्नर जनरलनें नेमलेल्या अध्यक्षाच्या पगाराची रक्कम त्यानेंच ठरविली होती. यापुढील सभेनें निवडलेल्या अध्यक्षाचा पगार व उपाध्यक्षाचा पगार हे

द्विदल लोकसभा.

ठरविण्याचा अधिकार प्रतिनिधिसभेला आहे. दोन्ही सभांच्या बैठका कोठें व केव्हां व्हावयाच्या हें गव्हर्नर जनरल ठरवितो. बैठक तहकूब करण्याचाही अधिकार त्याला आहे. अध्यक्षाला दोन्ही बाजूंस सारखीं मतें पडल्यास निर्णायक मत (Casting vote) देण्याचा अधिकार आहे. इतर प्रसंगीं त्यास मत देतां येत नाहीं. महाजनसभा पांच वर्षांच्या मुदतीची असते. प्रतिनिधिसभेची मुदत तीन वर्षें असते. कोणतीही सभा मुदतीच्या आधीं बरखास्त करण्याचा अगर तिची मुदत वाढविण्याचा अधिकार गव्हर्नर जनरलास आहे. कोणतीही सभा बरखास्त केल्यानंतर सहा महिन्यांच्या आंत किंवा भारतमंत्र्याची परवानगी मिळाल्यास नऊ महिन्यांच्या आंत तिची नवी बैठक झाली पाहिजे. कोणताही सरकारी अधिकारी या दोन्हीपैकीं कोणत्याही सभेचा सभासद होऊं शकत नाहीं आणि एखादा सभासद सरकारी नोकरींत गेल्यास त्याचें सभासदत्व नष्ट होतें. गव्हर्नरजनरलाच्या कार्यकारी मंडळांतील सभासद कोणत्या तरी एका सभेचा सभासद असतो. पण त्याला दोन्ही सभांत बोलण्याचा अधिकार आहे.

स्त्रिया, ब्रिटिश नागरिक नसणारे लोक, ज्याची सनद काढून घेतली आहे असा वकील, वेडे लोक, दिवाळखोर, कांहीं फौजदारी गुन्हेगार इत्यादि लोकांस प्रतिनिधिसभेचे अगर महाजनसभेचे किंवा प्रांतिक कायदेमंडळाचे सभासद होतां येत नाहीं. फौजदारी गुन्हेगारांस तीन किंवा पांच वर्षांची मुदत झाल्यावर सभासद होतां येते.तसेंच ज्या ठिकाणाहून निवडून यावयाचें तेथील रहिवासी असण्याचीही अट घातलेली आहे.सभासदांचे मतदार होण्याच्याही अटी निरनिराळ्या प्रांतांत निरनिराळ्या ठरविलेल्या आहेत. त्यांत (१) जात किंवा धर्म, (२) वसति, (३) अमुक भाडयाचें अगर किंमतीचें

सभासदत्वाचा व मतदारीचा हक्क.

घर ताब्यांत असणें, (४) संपत्तीवरचा किंवा, धंद्याबद्दल किंवा, कंपन्यावरचे कर देणें, (५) उत्पन्नावरचा कर देणें, (६) लष्करी पेन्शन मिळणें, किंवा (७) जमिनीचा मालक असणें, इत्यादि संबंधी अटी घातलेल्या आहेत. प्रतिनिधिसभेच्या निवडणुकीचा मताधिकार स्थानिक संस्थांच्या सर्व सभासदांस असतो. महाजनसभेचे सभासद व प्रतिनिधिसभेचे सभासद यांची वाटणी निरनिराळ्या प्रांतांत केलेली असते. शिवाय प्रत्येक प्रांताला दिलेल्या सभासदांची सुद्धां जातवार व निरनिराळ्या हितसंबंधांच्या मतदारांत वाटणी केलेली असते.

गव्हर्नर जनरल व लोकसभा.

एका सभेनें पास केलेला कायद्याचा मसुदा दुसऱ्या सभेनें पास केला नाहीं तर सहा महिन्यांच्या मुदतीनंतर दोन्ही सभांच्या एकत्र बैठकीपुढें तो मसुदा गव्हर्नर जनरलास ठेवतां येतो. अशी एकत्र बैठक होण्यापूर्वी दोन्ही सभांनीं समेट करण्याकरितां नेमलेल्या सभासदांचें बोलणें झालेलें असलें पाहिजे. कोणताही मसुदा दोन्ही सभांनीं पास केला तरी तो गव्हर्नर जनरल मान्य करीलच असें नाहीं. तो मसुदा मान्य करील किंवा राजाच्या मताकरितां म्हणून राखून ठेवील किंवा अमान्य करील. कोणत्याही मसुद्याला गव्हर्नरजनरलच्या मान्यतेशिवाय कायद्याचें स्वरूप प्राप्त होत नाहीं. दोन्ही सभांनीं पास केलेला मसुदा फेर विचाराकरितां कोणत्याही सभेकडे परत पाठविण्याचा अधिकार गव्हर्नरजनरलास आहे.

दरसालचें अंदाजपत्रक हिंदुस्थानसरकारचा आयव्यय खात्यावरील कार्यकारी सभासद दरसाल लोकसभेपुढें ठेवतो. गव्हर्नरजनरलच्या परवानगीशिवाय कोणतीही रक्कम खर्चासाठीं काढून ठेवली

अंदाजपत्रक, लोकसभा व गव्हर्नर जनरल यांचे अधिकार.

जात नाहीं. कांहीं बाबींतील खर्चासंबंधीं मंजुरी देण्याचा अधिकार लोकसभेला ठेवलेलाच नाहीं. या बाबीखेरीज इतर बाबींसंबंधीं मात्र लोकसभेला चर्चा करण्याचा व मंजुरी देण्याचा अधिकार आहे. ज्या बाबींतील खर्चाला मंजुरी देण्याचा अधिकार लोकसभेला नाहीं त्या बाबी:–(१) सरकारी कर्जावरील व्याज किंवा सिंकिंगफंडाकरितां काढून ठेवलेली रक्कम. (२) कोणत्याही कायद्यानें ठरवून दिलेला खर्च. (३) भारतमंत्रि किंवा बादशहा यांनीं नेमलेल्या अधिकाऱ्यांचे पगार किंवा त्यांच्या पेन्शनी. (४) चीफ कमिशनर व ज्युडिशियल कमिशनर यांचे पगार. (५) धार्मिक, राजकीय (Political) आणि संरक्षणसंबंधीचा खर्च. या बाबींतील खर्चासंबंधीची चर्चा करण्यालासुद्धां गव्हर्नरजनरलची परवानगी लोकसभेला घ्यावी लागते. इतर बाबींतील खर्चाच्या रकमा मागणीच्या रूपानें लोकसभेपुढें ठेवल्या जातात व त्यांना मंजुरी देण्याचा अगर त्यांत फेरफार करण्याचा अधिकार लोकसभेला आहे. त्यानंतर लोकसभेनें मंजूर केलेलें अंदाजपत्रक गव्हर्नरजनरलपुढें ठेवण्यांत येतें. आपलें कर्तव्य बजावण्यास अगदीं अवश्य असणारी एखादी रक्कम जर लोकसभेनें मंजूर केली नाहीं असें याला आढळून आलें तर ती रक्कम मंजूर झाली आहे असें समजून त्यानें चालावें असें ठरविलें आहे. अडचणीच्या प्रसंगीं ब्रिटिश हिंदुस्थानच्या सुरक्षिततेस किंवा शांततेस लागणारी रक्कम मंजूर करण्याचाही अधिकार गव्हर्नर जनरलास दिलेला आहे. अशा तऱ्हेनें लोकसभेंतील सभासदांकडून अडथळा झाल्यास राज्ययंत्रास खीळ पडूं नये अशी व्यवस्था करून ठेवलेली आहे. तसेंच एखादा कायदा हिंदुस्थानच्या शांततेच्या, सुरक्षिततेच्या अगर हिताच्या दृष्टीनें अत्यंत अवश्य आहे असें गव्हर्नर जनरलास वाटत असलें व त्याचा मसुदा लोकसभेनें पास केला केला नाहीं, तर तो तसा अवश्य आहे

अशी शिफारस लिहून गव्हर्नर जनरलाला आपल्या सहीनें त्याला कायद्याचें स्वरूप देतां येतें. मात्र असा कायदा ब्रिटिश पार्लमेंटापुढें ठेवण्यांत येऊन त्याला राजाची संमति मिळाली पाहिजे. तथापि अडचणीच्या वेळीं अशा कायद्याची, राजाची संमति मिळण्याच्या आधींच,अंमलबजावणी करण्याचाही अधिकार गव्हर्नरजनरलास आहे.

लोकसभेचें कार्यक्षेत्र.

हिंदुस्थानांतील लोकसभेला पुढील बाबीसंबंधानें कायदे करण्याचा हक्क आहे:—(१) ब्रिटिश हिंदुस्थानांतील सर्व मनुष्यें व सर्व वस्तू यांसंबंधीं. (२) हिंदुस्थानांतील इतर प्रदेशांतील बादशहाचे नोकर व प्रजाजन यांसंबंधीं. (३) बादशहाच्या हिंदी सैन्यांतील सैनिक, अनुचर व अधिकारी या संबंधीं आर्मी अॅक्टाखालीं न येणाऱ्या बाबीं संबंधीं. हे लोक कोठेंही असले तरी त्यांच्यावर हिंदुस्थान सरकारच्या कायद्यांचें बंधन आहे. (४) रॉयल इंडियन मरीन सर्व्हिस मधील सर्व लोकांसंबंधीं. (५) गव्हर्नर जनरल व त्याचें कार्यकारी मंडळ यांना ज्यांच्या संबंधीं कायदे करतां येतात त्या लोकांना किंवा ब्रिटिश हिंदुस्थानांतील रहिवासी लोकांना लागू असणारा कोणताही कायदा काढून टाकण्यासंबंधीं किंवा त्यांत बदल करण्यांसंबधीं.

ब्रिटिश पार्लमेंटानें प्रत्यक्ष परवानगी दिल्याखेरीज खालील बाबतींत लोकसभेला कायदे करण्याचा अधिकार नाहीं:— (१) पार्लमेंटानें १८६० नंतर आर्मी अॅक्ट व इतर जे हिंदुस्थानाला लागू असणारे कायदे केलेले आहेत त्यांच्या संबंधीं. (२) हिंदुस्थान सरकारच्या वतीनें भारतमंत्र्याला इंग्लंडांत कर्ज काढण्याला परवानगी देण्याबद्दल जे कायदे केले असतील त्या संबंधीं.

तसेंच बादशहाचे हिंदुस्थानांतील कोणत्याही भागावरील किंवा व्यक्तिवरील प्रभुत्व कमी होईल अशा रीतीनें इंग्लंडच्या राज्यघटनेच्या

कायद्याला किंवा प्रघाताला विरोध येईल असा कोणताही कायदा करण्याचा अधिकार हिंदुस्थानच्या लोकसभेला नाहीं. भारतमंत्र्याच्या परवानगीशिवाय ब्रिटिश हिंदुस्थानांतील कोणाही युरोपियन ब्रिटिश प्रजाजनाला फांशीची शिक्षा देण्याची सत्ता हायकोर्टाखेरीज कोणत्याही कोर्टाला देण्याचा अधिकार हिंदी लोकसभेला नाहीं. तसेंच भारतमंत्र्याच्या परवानगीशिवाय कोणतेंही हायकोर्ट कमी करण्याचा अधिकारही या सभेला नाहीं. रॉयल इंडियन मरीन सर्व्हिसमधील लोकांसाठीं केलेले कायदे, गुन्हा झाला त्यावेळीं ज्या जहाजांत गुन्हा झाला, तें जर हिंदुस्थानच्या हद्दींत असेल तरच लागू होतात, नाहीं तर नाहीं.

पुढील बाबींसंबंधीं कायदे करण्यापूर्वीं गव्हर्नरजनरलची परवानगी घेणें अवश्य असतेः—(१) हिंदुस्थानसरकारचें कर्ज अगर उत्पन्न, अगर उत्पन्नांतून कांहीं खर्च करण्यासंबंधीं. (२) हिंदुस्थानांतील ब्रिटिश प्रजाजनांच्या धार्मिक समजुतीसंबंधीं. (३) बादशहाच्या सैन्याच्या किंवा त्याला लागणाऱ्या खर्चासंबंधीं. (४) हिंदुस्थानसरकारच्या परराष्ट्रीय संबंधासंबंधीं. (५) हिंदुस्थानसरकारकडे नसलेल्या कोणत्याही प्रांतिक प्रश्नासंबंधीं किंवा त्यांतील एखाद्या भागासंबंधीं. (६) प्रांतिक कायदेमंडळांनीं केलेल्या कायद्यांत फेरफार किंवा तो काढून टाकण्यासंबंधीं. (७) गव्हर्नरजनरलनें केलेल्या कोणत्याही कायद्यांत किंवा हुकुमांत (Ordinance) फेरफार करण्यासंबंधीं किंवा तो काढून टाकण्यासंबंधीं.

प्रांतिक सरकारः—हिंदुस्थानांतील राज्यव्यवस्थेसंबंधीच्या कांहीं बाबी हिंदुस्थानसरकारकडे व कांहीं प्रांतिक सरकारकडे दिलेल्या आहेत. त्याचप्रमाणें प्रांतिक बाबींपैकीं कांहीं खातीं राखीव (Reserved) व कांहीं सोंपीव (Transferred) आहेत. राखीव खात्यांचा अंमलबजावणीचा अधिकार गव्हर्नर व त्याचे कार्यकारी कौन्सिलर यांना असून सोंपीव

खात्यांच्या अंमलबजावणीचा अधिकार गव्हर्नर आणि दिवाण (Ministers) यांना दिलेला आहे

हिंदुस्थानसरकारकडे परराष्ट्रीय संबंध, संरक्षण, दळणवळणाचीं मोठीं साधनें (Major Communications), जहाजें,नाणीं,जकाती, पोस्ट व तारखातें, बंदरावरील ताबा, कॉपीराइट, दिवाणी कायदा, फौजदारी कायदा व कांहीं सर्व्हे खातीं इत्यादि एकंदर चव्वेचाळीस विशिष्ट खातीं दिलेलीं आहेत. याशिवाय प्रांतिक सरकारकडे न दिलेल्या कोणत्याही बाबीसंबंधानें कारभार करण्याचा अधिकार हिंदुस्थानसरकारला आहे.प्रांतिक सरकारकडे जमीनमहसूल, न्यायखातें, पोलीस, शिक्षण, आरोग्य, दवाखाने, स्थानिक स्वराज्य, पब्लिकवर्क्स, दुष्काळनिवारण, शेती, सहकारी संस्था, औद्योगिक उन्नति वगैरे एकंदर सुमारें बावन्न खातीं आहेत. त्यांतून राखीव खात्यांत न्यायदानाची व्यवस्था, पोलीस, जमीनमहसूल वगैरे प्रमुख आहेत व सोंपीव खात्यांत शिक्षण, आरोग्य, औद्योगिक उन्नति, स्थानिक स्वराज्य वगैरे प्रमुख आहेत.

प्रांतिक सरकारला कांहीं उत्पन्नाच्या बाबीही ठरवून दिलेल्या आहेत. वरील सुधारणा अमलांत येण्याच्या वेळची शिल्लक, प्रांतिक बाबींतून होणारें उत्पन्न, प्रांतिक सरकारनें बसविलेल्या करांचें उत्पन्न, प्रांतिक सरकारनें काढलेल्या कर्जाचें उत्पन्न आणि हिंदुस्थानसरकारची कामगिरी केल्याबद्दल हिंदुस्थानसरकारनें दिलेला पैसा, या उत्पन्नाच्या प्रमुख बाबी आहेत. त्याचप्रमाणें प्राप्तीवरील कराच्या उत्पन्नांतून कांहीं भाग प्रांतिकसरकारला हिंदुस्थानसरकारनें दिलेला आहे.शिवाय प्रांतिक सरकारास दरसाल हिंदुस्थानसरकारला ठराविक रक्कम द्यावी लागते. या रकमा हिंदुस्थानसरकार प्रत्येक प्रांताला ठरवून देतें. कर बसविण्याचे व कर्ज काढण्याचे अधिकार प्रांतिक सरकारना दिलेले आहेत.

प्रांतिकसरकार व हिंदुस्थानसरकार यांच्यामध्यें कांहीं तंट्याचा प्रश्न

उपस्थित झाल्यास त्याचा निर्णय देण्याचा अधिकार गव्हर्नरजनरलास आहे. राखीव व सोंपीव खात्यासंबंधीं वादग्रस्त प्रश्न उपस्थित झाल्यास त्याचा निर्णय देण्याचा अधिकार प्रांतांवरील गव्हर्नरास आहे; व फारच महत्त्वाचा प्रश्न उद्भवल्यास त्यानें कार्यकारीमंडळ व दिवाण यांची सल्ला घेतली पाहिजे. प्रांतिक बाबीसंबंधाची माहिती प्रांतिक सरकारनें हिंदुस्थानसरकारला दिली पाहिजे. एखादें सोंपीव खातें परत घेऊन राखीव करण्याचा अधिकार भारत-मंत्र्याच्या परवानगीनें प्राप्त होतो.

गव्हर्नरांच्या नेमणुका भारतमंत्र्यांच्या सल्ल्यानें राजाच करतो. व्हाइसरॉयाप्रमाणें गव्हर्नरांसही कांहीं विशिष्ट अधिकार व सवलती त्यांच्या अधिकारामुळें प्राप्त होतात.प्रत्येक गव्हर्नरास एक कार्यकारीमंडळ दिलेलें आहे. भारतमंत्र्याला कार्यकारीकौन्सिल कांहीं काळ अधिकारभ्रष्ट (Suspend) करण्याचा अधिकार आहे. अशावेळीं त्या कौन्सिलचे सर्व अधिकार गव्हर्न-रासच प्राप्त होतात. कार्यकारीमंडळाचे सभासदही राजाकडूनच नेमले जातात.त्यांची संख्या चारपेक्षां अधिक असतां कामा नये.या मंडळाचा अध्यक्ष गव्हर्नर असतो व त्यांच्यापैकींच कोणाला तरी तो उपाध्यक्ष करतो.

सोंपीव खात्यांच्या कारभाराकरितां दिवाण नेमण्याचा अधिकार गव्हर्नरांस आहे. हे दिवाण कार्यकारी मंडळाचे सभासद किंवा सरकारी

दिवाण.

अधिकारी असतां उपयोगी नाहींत. गव्हर्न-रांच्या इच्छेवर त्यांच्या अधिकाराची मुदत अवलंबून आहे. दिवाण हे कायदे मंडळां-तील लोकनियुक्त सभासद असले पाहिजेत, किंवा सहा महिन्यांच्या आंत ते तसे झाले पाहिजेत. कार्यकारी मंडळांतील सभासदांच्या इतकाच पगार दिवाणांना प्रथम देण्यांत आलेला आहे. परंतु तो कमी करण्याचा अधिकार कायदेमंडळाला आहे. यामुळें दिवाण हे कायदेमंडळाला जबाबदार होऊं शकतील. सोंपीव खात्याचा कारभार दिवाणांच्या सल्ल्यानेंच गव्हर्नरनें

चालविला पाहिजे. तथापि कांहीं विशेष प्रसंगीं त्याला दिवाणांच्या सल्ल्याविरुद्धही वर्तन करतां येईल. तसेंच कांहीं कारणामुळें एखाद्या खात्यावरील दिवाणाची जागा कांहीं काळ रिकामी राहिली तर त्या खात्याचा कारभार करण्याचीही व्यवस्था करून ठेवलेली आहे. इंपीरियल व प्रॉव्हिन्शियल सर्व्हिस मधील कोणत्याही अधिकाऱ्यास कमी करणें किंवा खालीं ढकलणें अगर इंपीरियल सर्व्हिसमधील कोणाची बदली करणें झाल्यास त्यास गव्हर्नरची परवानगी घ्यावी लागते.

प्रांतिक कायदेमंडळें.

प्रत्येक गव्हर्नराच्या प्रांतांत एकेक कायदे मंडळ असतें; त्यांत कांहीं लोकनियुक्त, कांहीं सरकारनियुक्त बिनसरकारी व कांहीं सरकारी अधिकारी असे सभासद असतात. शिवाय कार्यकारी मंडळाचे सभासद आणि दिवाण हे कायदेमंडळाचे सभासद असतातच. कायदेमंडळांतलि सभासदांची संख्या निरनिराळ्या प्रांतांत निरनिराळी आहे. मुंबई १११, मद्रास १२५, संयुक्तप्रांत ११८, पंजाब ८३, बिहार आणि ओरिसा ९८, मध्यप्रांत ७०, आसाम ५३. शेंकडा वीसपेक्षा अधिक सभासद सरकारी अधिकारी असूं नयेत व निदान शेंकडा सत्तर सभासद लोकनियुक्त असले पाहिजेत. हें प्रमाण कायम ठेऊन वरील आंकड्यांत वाढ करण्यास हरकत नाहीं. तसेंच एखाद्या विशिष्ट मसुद्याच्या चर्चेच्या वेळीं तज्ञ म्हणून कांहीं जादा सभासद नेमण्याचा अधिकार गव्हर्नरास दिलेला आहे व या जादा सभासदांना नेहमींच्या सभासदांचे सर्व अधिकार प्राप्त होतात. कोणाही सरकारी अधिकाऱ्यास कायदे मंडळाचे सभासद होतां येत नाहीं; व कोणीही सभासद सरकारी नोकर झाला कीं, त्याचें सभासदत्व नष्ट होतें. अर्थात् हा नियम दिवाणांना लागू नाहीं. प्रांतिक प्रश्नासंबंधीं कायदे करण्याची सत्ता प्रांतिक कायदेमंडळांना असते. अर्थात्च ज्या बाबतींत हिंदी लोकसभेला कायदे करतां येत नाहींत

त्या बाबतींत प्रांतिक कायदे मंडळासही कायदे करतां येत नाहींत. यां-शिवाय पुढील प्रकारचे कायदे करण्याचा अधिकार त्यांना नाहीं:—(१) पार्लमेंटच्या कायद्याला बाध येणारे कायदे. (२) खालील बाबींसंबंधानें कायदा करावयाचा असल्यास गव्हर्नर जनरलची परवानगी आगाऊ घ्यावी लागते:—

(अ) १९११ च्या कायद्यानें अपवाद केलेल्या करांशिवाय कोण-ताही नवा कर बसवावयाचा असल्यास.

(आ) हिंदुस्थान सरकारच्या कर्जासंबंधीं किंवा ज्या कायद्याच्या योगानें हिंदुस्थान सरकारनें बसविलेल्या करावर परिणाम होईल किंवा जकातीशीं संबंध येईल असे कायदे.

(इ) हिंदुस्थानचें लष्कर, आरमार किंवा विमानें यांच्या शिस्तीला किंवा खर्चाला अडचण येईल असे कायदे.

(ई) ज्यांचा हिंदुस्थानच्या परराष्ट्रीय धोरणाशीं संबंध येइल असे कायदे.

(उ) मध्यवर्ति सरकारकडे दिलेल्या बाबी संबंधाचे कायदे.

(ऊ) मध्यवर्ति सरकारकडे अंशतः तरी ताबा येणाऱ्या प्रश्नां-संबंधीचे कायदे.

(ऋ) गव्हर्नर जनरलला कायद्यानें जी सत्ता दिली आहे तिच्यावर ज्यांच्यामुळें परिणाम होईल असे कायदे.

(ॠ) १९१९ च्या पूर्वीं पास झालेला व जो बदलणें किंवा काढून टाकणें प्रांतिक कायदे मंडळाच्या अखत्यारांत नाहीं असा कायदा बदलण्या संबंधीचे किंवा काढून टाकण्या संबंधीचे कायदे.

(ऌ) हिंदुस्थान सरकारनें केलेल्या ज्या कायद्यांत फेरबदल कर-ण्याला गव्हर्नर जनरलची परवानगी घेतली पाहिजे त्या कायद्यांत दुरुस्ती करणारे किंवा ते काढून टाकणारे कायदे.

एखाद्या कायद्या संबंधानें अगोदर परवानगी घेणें अवश्य असलें परंतु ती तशी न घेतां तो कायदा प्रांतिक कायदेमंडळानें पास केला व मग त्याला गव्हर्नर जनरलनें अनुमति दिली तरी तो कायदा बेकायदेशीर किंवा निरुपयोगी होत नाहीं.

अंदाजपत्रकांसंबंधीचे नियम हिंदी लोकसभेला व प्रांतिक कायदे मंडळांना सारखेच आहेत. कांहीं विशिष्ट बाबींखेरीज इतर बाबींच्या खर्चा-

प्रांतिक अंदाजपत्रक.

ला मंजुरी देण्याचा अधिकार कायदेमंडळाला आहे. तरी एखादी रक्कम आपलें कर्तव्य बजावण्यास अत्यंत अवश्य आहे असें गव्हर्नरास वाटल्यास ती मंजूर करण्याचा अधिकार त्यांना आहे, हिंदुस्थान सरकारला प्रांतिक सरकारनें द्यावयाची रक्कम, कर्जावरील व्याज व सिंकिंग-फंडाला लागणारी रक्कम, कायद्यानें ठरविलेल्या खर्चास लागणारी रक्कम, बादशाहानें किंवा भारतमंत्र्यानें नेमलेल्या अधिकाऱ्यांच्या पगारास किंवा पेन्शनीस लागणारी रक्कम, ॲडव्होकेट जनरल व हायकोर्टातील न्यायाधीश यांच्या पगारास लागणारी रक्कम यांना कायदे मंडळाच्या मंजुरीची जरूरी लागत नाहीं.

कायदेमंडळानें पास केलेला कायदा गव्हर्नरास मान्य नसल्यास गव्हर्नर जनरलपुढें विचाराकरितां रवाना करण्याचा अधिकार गव्हर्नरास आहे. असा कायद्याचा मुसुदा पास झाल्यापासून सहा महिन्यांच्या आंत गव्हर्नर जनरलाच्या संमतीनें फिरून विचारासाठीं कायदेमंडळाकडे पाठविण्याचा अधिकार गव्हर्नरास आहे. यानंतर पुनः विचार झाल्यावर तो मुसदा—फेरफार झाले असल्यास त्यांसहित—पुनः गव्हर्नराकडे जातो. गव्हर्नरजनरलच्या विचारासाठीं पाठविलेल्या मसुद्याला त्यानें संमति दिल्यास त्याला एकदम कायद्याचें स्वरूप प्राप्त होतें. गव्हर्नर, लेफ्टनंट गव्हर्नर किंवा चीफ कमिशनर यांनीं मान्यता दिलेला परंतु गव्हर्नर जनरलनें सहा महिन्यांच्या

आंत समति न दिलेला मसुदा, सहा महिन्यांच्या आंत कायदेमंडळानें फिरून विचारासांठीं गव्हर्नराकडे पाठविला नाहीं किंवा तो नव्या बैठकींत विचारास येईल असें जाहीर केलें नाहीं तर त्याला कायद्याचें स्वरूप येत नाहीं. प्रांतिक कायदेमंडळानें पास केलेला कायदा बादशाहाच्या विचारासाठीं राखून ठेवण्याचा अधिकार गव्हर्नरजनरलास आहे.

न्यायासनें:—हिंदुस्थानांतील कामासंबंधी अखेरचा निर्णय देणारें सर्वांत श्रेष्ठ न्यायासन म्हणजे इंग्लंडांतील प्रिव्हि कौन्सिलची ज्युडीशियल कमेटी. हिच्या खालीं हिंदुस्थानांतील हायकोर्टें. १९१५ च्या गव्हर्नमट ऑफ इंडिया ॲक्टानें हिंदुस्थानांतील हायकोर्टांची सत्ता व अधिकार हीं ठरवून दिलेलीं आहेत. हायकोर्ट स्थापन करावयाचें झाल्यास तें राजा लेटर्सपेंटट नांवाच्या हुकुमानें करतो. अर्थात् ही सत्ता भारतमंत्रीच राजाच्या वतीनें उपभोगितो. एखादें हायकोर्ट कमी करावयाचें झाल्यास हिंदी लोकसभेला भारतमंत्र्याच्या परवानगीनें तसें करतां येतें. प्रत्येक हायकोर्टांतील न्यायाधीशांची संख्या विसाहून जास्त असूं शकत नाहीं. दोन वर्षांपर्यंतच्या मुदतीचे जादा (Additional) न्यायाधीश नेमण्याचा अधिकार गव्हर्नर जनरलास आहे. हायकोर्टांचे अधिकार लेटर्सपेटंटनीं ठरवून दिलेले आहेत व त्यांत बदल करण्यास सुद्धां लेटर्सपेटंटचीच आवश्यकता असते. हायकोर्टांमध्यें रेव्हिन्युसंबंधाचें मूळ काम चालूं शकत नाहीं. ज्या कोर्टांवर हायकोर्टांकडे अपिलें चालतात त्या कोर्टांवर देखरेख करणें हें हायकोर्टचें काम आहे. हायकोर्टकडे कांहीं मूळ कामें व बहुतेक अपिलाचीं कामें चालतात.

ज्याठिकाणीं हायकोर्टें स्थापन झालेलीं नाहींत तेथें तें काम चीफ कोर्टें करतात व जेथें तींही नाहींत तेथें तीं कामें ज्युडिशियल कमिशनर्स करतात. ज्युडिशियल कमिशनरची नेमणूक गव्हर्नर जनरल करतो.

हायकोर्टें, चीफ कोर्टें किंवा ज्युडिशियल कमिशनर्सची कोर्टें यांच्या खालीं सेशन्स कोर्टें असतात. यांत फौजदारी कामें चालतात. यांच्या पुढें-ही कांहीं मूळ कामें व कांहीं अपिलें चालतात. फाशीशिवाय कोणतीही शिक्षा देण्याचा त्यांना अधिकार आहे. फाशीची शिक्षा हायकोर्टानें कायम (Confirm) करावी लागते. सेशन्स जज हा इंडियन किंवा—प्रॉव्हि-न्शियल सिव्हिल किंवा ज्युडीशियल सर्व्हिसमधील मनुष्य असतो. याच्या खालीं फौजदारी कामें चालविणारीं मॅजिस्ट्रेट कोर्टें असतात. त्यांत पहिला वर्ग, दुसरा वर्ग व तिसरा वर्ग मॅजिस्ट्रेट असे तीन वर्ग असतात. हे मॅजि-स्ट्रेट अंमलजावणीखात्यांतील अंमलदार असतात. जिल्ह्याचा कलेक्टर, मामलतदार वगैरे अधिकाऱ्यांना मॅजिस्ट्रेटचे अधिकार दिलेले असतात.

दिवाणी कामें चालविण्यासाठीं हायकोर्टाखालीं डिस्ट्रिक्ट कोर्टें व सबजज्ज किंवा मुन्सफकोर्टें असतात. मुन्सफ कोर्ट हें सर्वांखालचें कोर्ट. डिस्ट्रिक्ट जज्ज किंवा सबजज्ज किंवा मुन्सफ यांचा अंमलबजावणीखात्याशीं कांहीं संबंध नाहीं.

याशिवाय मोठमोठ्या शहरांत स्मॉलकॉज कोर्टें, कॉरोनर कोर्टें वगैरे जादा कोर्टें असतात.

अंमलबजावणी खात्यांतील अधिकाऱ्यांनाच मॅजिस्ट्रेटचे अधि-कार दिल्यानें हिंदुस्थानांत अंमलबजावणी व न्यायखातें यांचें पृथक्करण झालेलें नाहीं. यामुळें निःपक्षपाति न्याय मिळत नाहीं अशी तक्रार आहे. तसेंच रेव्हिन्युसंबंधाच्या तक्रारीही नेहमींच्या कोर्टांत चालत नसून त्याकरितां स्वतंत्र रेव्हिन्यू कोर्टें आहेत व त्यांत रेव्हिन्यु खात्यांतीलच अधिकाऱ्यांचा समावेश होतो. हेंही न्याय व अंमलबजावणी या दोहोंचें पृथक्करण न झाल्याचेंच उदाहरण आहे.

स्थानिक स्वराज्यः—प्रत्येक जिल्ह्यांमध्यें एक डिस्ट्रिक्ट बोर्ड नांवाची स्थानिक स्वराज्याची संस्था असते. तिच्याखालीं तालुका लोकलबोर्डें अस-

तात. मुंबई इलाख्यांत हा दोनच संस्था लहान गांवासंबंधीं आहेत.बंगाल-मध्यें यूनियन्स, लोकलबोर्डें व डिस्ट्रिक्टबोर्डें अशा तीन आहेत. मद्रास इलाख्यांत पंचायती, ताळुकाबोर्डें व डिस्ट्रिक्टबोर्डें आहेत. संयुक्तप्रांतांत डिस्ट्रिक्टबोर्डें व सबडिस्ट्रिक्टबोर्डें आहेत. आतां ग्रामपंचायती स्थापन करण्याचा उपक्रम सगळीकडे चालू आहे. याशिवाय मोठ्या शहरांना म्युनिसिपालिट्या आहेत. त्यांचा डिस्ट्रिक्टबोर्डांकडे कांहीं संबंध नसतो. इतर देशांतील स्थानिक स्वराज्याच्या संस्थांच्या मानानें येथील स्थानिक स्वराज्याच्या संस्थांचीं उत्पन्नें, त्यांचे अधिकार व त्यांचें स्वातंत्र्य हीं अगदीं कमी आहेत.

प्रकरण ४ थें.

प्रचलित शासनसंस्थांचें वर्गीकरण.

" In modern West-European States we see no tendency to pure oligarchy and but little tendency to pure despotism. The representative system naturally combines with democracy an element of aristo cracy-in the sense of-Government by persons specially qalified; and the principle of monarchy has also been to an important extent maintained in combination with that of democracy. " H. Sedgwick, The Elements of Politics. P. 622.

आजपर्यंत पृथ्वीच्या पाठीवर जीं अनेक राज्यें होऊन गेलीं त्यांत अनेक प्रकारच्या राज्यव्यवस्था अस्तित्वांत आल्या व लयास गेल्या. तथापि त्या राज्यांतील राज्यव्यवस्थांचें वर्गीकरण करावयाचें झाल्यास फार वर्ग करावे लागतील. आपणांस आजपर्यंतच्या सर्व राज्यांतील शासनसंस्थांचें वर्गीकरण करण्याचें प्रयोजन नाहीं. प्रचलित शासनसंस्थांचें वर्गीकरण केलें तरी आपलें कार्य भागणार आहे. शासनसंस्थांचें वर्गीकरण करण्याचा प्रघात आपल्या इकडच्या राजनीतिशास्त्रज्ञांनीं ठेवलेला दिसत नाहीं. शुक्रनीति, अर्थशास्त्र यांसारखे ग्रंथ, किंवा मनुस्मृति याज्ञवल्क्यस्मृति यांसारखे धर्मग्रंथ यांत वर्णन केलेली किंवा प्रशस्त ठरविलेली राज्यपद्धति एकाच प्रकारची दिसून येते. ज्यावेळीं हे ग्रंथ लिहिले गेले त्यावेळीं इतर प्रकारच्या शासन पद्धति भरतखंडांत अस्तित्वांत असाव्यात असें अनुमान करण्यास प्रत्यक्ष त्या ग्रंथांतील व इतरत्र सापडणाऱ्या उल्लेखांवरून पुष्कळ

आधार आहे. तरी त्या सर्व प्रकारच्या शासनसंस्थांचें वर्गीकरण करून त्यांतील प्रत्येक वर्गाचें गुणदोष विवेचन केलेलें निदान अद्यापपर्यंत तरी उपलब्ध झालेलें नाहीं. ग्रीस लोकांतलि तत्त्वज्ञान्यांनीं आपल्या वेळच्या राज्यांतील भिन्न भिन्न शासनसंस्थांचें गुणदोषवर्णन केलेलें आहे; व तसें करतांना त्यांना त्या वेळच्या शासनसंस्थाचें वर्गीकरणही करावें लागलें आहे. सुप्रसिद्ध ग्रीक तत्त्ववेत्ते सॉक्रेटीस, प्लेटो व ॲरिस्टॉटल यांनीं या विषयासंबंधीं पुष्कळ विचार केलेला होता. त्यांत ॲरिस्टॉटल या पंडिताचें राज्यपद्धतीचें वर्गीकरण युरोपियन राजनीतिशास्त्रांत बरेंच प्रसिद्ध आहे. त्यानें आपलें वर्गीकरण प्लेटो व सॉक्रेटीस यांच्या विचारांवरच उभारलेलें आहे. ॲरिस्टॉटलचें वर्गीकरण आजच्या शासनसंस्थांना यथातथ्य लागू पडत नाहीं व तें पुरेंसेंही होत नाहीं. तथापि ऐतिहासिक दृष्टीनें व त्याच्या विचारांचा इतर काळच्या पंडितांच्या विचारांवर जो परिणाम झाला आहे त्या दृष्टीनें त्याचा विचार करणें आपणांस अवश्य आहे.

एकंदर राज्यापद्धतीचें ॲरिस्टॉटलचें वर्गीकरण राजसत्ता उपभोगणाऱ्या व्यक्तींच्या संख्येवर अवलंबून आहे व तें समजण्यास अगदीं सोपें आहे.

ॲरिस्टॉटलचें वर्गीकरण.

कोणत्याही राज्यांतील राजसत्ता एका व्यक्तींच्या किंवा अनेक व्यक्तींच्या हातीं असणार हें उघड आहे, त्याचप्रमाणें ज्या राज्यांतील राज्यसत्ता अनेक व्यक्तींच्या हातीं असेल तेथें ती समाजांतील सर्व लोकांच्या हातीं असेल किंवा एखाद्या अल्पसंख्यांक वर्गाच्या हातीं असेल. यावरून ॲरिस्टॉटलनें एकंदर राज्यपद्धतींचे तीन वर्ग केलेले आहेत. ज्या राज्यांत एकाच व्यक्तींच्या हातीं सत्ता असेल तेथील राज्यव्यवस्थेस मॉनर्की म्हणजे राजसत्ता, ज्या राज्यांत अल्पसंख्याक वर्गाच्या हातीं सत्ता असेल तेथील राज्यपद्धतीस ॲरिस्टॉक्रसी म्हणजे महाजनसत्ता व ज्या राज्यांत सर्व लोकांच्या म्हणजे

लोकांतील बहुसंख्येच्या हातीं राजसत्ता असेल तेथलि राज्यपद्धतीस पोलिटी म्हणजे लोकसत्ता अशीं नांवें त्यानें दिलेलीं आहेत. तथापि एवढ्यानेंच त्याचें वर्गीकरण संपत नाहीं. या प्रत्येक वर्गाचें विकृत स्वरूप त्यानें वर्णन केलेलें आहे. राजसत्ताक राज्यपद्धतींत जेव्हां राजा केवळ आपल्याच हिताकडे लक्ष देऊन राज्यकारभार चालवितो व प्रजेच्या हिताचा यत्किंचितूही विचार करीत नाहीं तेव्हां त्या राज्यपद्धतीस तो टिरनी म्हणजे सुलतानी राज्यपद्धती असें म्हणतो. तसेंच महाजनसत्ताक राज्यांतील राजसत्ता उपभोगणारा वर्ग जेव्हां लोकहिताकडे दुर्लक्ष देऊन आपल्याच स्वार्थाच्या दृष्टीनें राज्यकारभाराचा गाडा हाकतो तेव्हां त्या विकृत राज्यपद्धतीस ॲरिस्टॉटलनें ऑलिगार्की म्हणजे अल्पजनसत्ता असें नांव दिलेलें आहे. त्याचप्रमाणें लोकसत्तेच्या विकृत स्वरूपास त्यानें डेमॉक्रसी म्हणजे अज्ञजनसत्ता असें नांव दिलेलें आहे. अशाप्रकारें अरिस्टॉटलचें राज्यपद्धतीचें वर्गीकरण षड्विध आहे हें दिसून येईल. राजसत्ता, महाजनसत्ता व लोकसत्ता हे मूळचे तीन वर्ग आणि सुलतानशाही, अल्पजनसत्ता व अज्ञजनसत्ता अशीं त्यांचीं अनुक्रमें तीन विकृत स्वरूपें होत. अर्वाचीन इंग्लिश वाङ्मयांत डिमॉक्रसी या शद्वाचा वाईट अर्थ उरलेला नसून आज तो शब्द लोकसत्तेच्या अर्थानें योजिला जातो. परंतु ॲरिस्टॉटलनें त्याचा उपयोग अज्ञजनसत्ता अशा वाईट अर्थानें केलेला आहे. ॲरिस्टॉटलच्या षड्विध वर्गीकरणांत राजसत्ता किती लोकांच्या हातीं आहे एवढयाच एका प्रश्नाचा विचार केलेला नसून त्या सत्तेचा उपभोग कशा रीतीनें घेतला जातो इकडेही त्यानें लक्ष दिलें होतें, असें सूक्ष्म विचाराअंतीं दिसून येईल.

ॲरिस्टॉटलनें राज्यांचें हे जे सहा वर्ग केलेले आहेत ते निरनिराळ्या समकालिन राज्यांचेच वर्ग नसून एकाच [illegible] होणाऱ्या निरनिराळ्या [illegible] ती एक परंपराच आहे

राजकीय उत्क्रांति व ॲरिस्टॉटल

असें तो समजतो. एकाच राज्याला एका-मागून एक अशा क्रमानें या सहाही अवस्था प्राप्त होतात व हें चक्र कालचक्राप्रमाणें एकसारखें फिरत असतें असें त्याचें मत होतें. ज्या अनुक्रमानें त्या अवस्था प्राप्त होतात तो अनुक्रम पुढें दिल्याप्रमाणें आहे.कोणत्याहि राज्यांत प्रथम राजसत्ताक राज्यपद्धतीच स्थापन होत असते. प्राथमिक अवस्थेंतील लोक आपल्यापैकींच एखाद्या मनुष्यास त्याच्या अंगच्या शौर्य, प्रजावात्सल्य वगैरे गुणांमुळें राज्यपद देतात. यानंतर राज्यांतिल इतर मोठेलोकही राज्यसत्ता आपल्या हातीं यावी याबद्दल खटपट करूं लागतात. या खटपटींत त्यांना यश आलें म्हणजे तेथें महाजनसत्तेची स्थापना होते. कांहीं काळ हे राज्यांतील प्रमुख लोक प्रजाहिताकडे दृष्टी देऊन राज्याकारभार चालवितात व लोकांनाही त्यापासून सुख होतें. पुढें कांहीं काळानें त्यांची स्वार्थबुद्धि जागृत होऊन ते केवळ आपल्याच हिताकडे पाहून राज्यकारभार करूं लागतात. यावेळीं महाजनसत्तेला अल्पजनसत्तेचें विकृतस्वरूप प्राप्त होतें. अल्पजनसत्तेच्या दुर्गुणांचा अतिरेक झाला म्हणजे राज्यांत यादवी माजून कांहीं काळानें तेथें सुलतानशाही प्रस्थापित होते.या सुलतानशाहीला लोक कंटाळले म्हणजे लोकसत्तेची स्थापना होते. कालान्तरानें लोकसत्तेलाही अज्ञजनसत्तेचें स्वरूप प्राप्त होतें. पुन्हां देशांत अस्थिरता व बेबंदशाही माजूं लागतात. अशा बेबंदशाहींतूनच एखादा पराक्रमी पुरुष निर्माण होऊन पुनः राजसत्तेची स्थापना करतो व या चक्राच्या दुसऱ्या फेऱ्याला प्रथमपासून सुरवात होते. राज्यांच्या निरनिराळ्या अवस्थांचा हा अनुक्रम ग्रीक नगरराज्यांच्या इतिहासाला धरून आहे. कांहीं लोक हा अनुक्रम थोडा बदलून या अवस्थांची परंपरा किंचित् निराळी दाखवितात. [illegible]र्थ वुड्रो विल्सन यांनीं या अवस्थांची परंपरा पुढीलप्रमाणें दिली

उदाह[illegible] होऊन नंतर ति[illegible]

[illegible]हे. कोणत्याही राज्यांत प्रथमतः [illegible] स्थापन [illegible]

सुलतानशाहींत रूपांतर होतें व राजे प्रजेवर जुलूम करू लागतात. यानंतर राज्यांतील वरिष्ठ वर्ग प्रथम त्यांच्याविरुद्ध बंड करून आपल्या हातीं राजसत्ता घेतो. अशा रीतीनें स्थापन झालेल्या महाजनसत्तेला, तो श्रेष्ठ वर्ग आपल्या कर्तव्यापासून भ्रष्ट झाला म्हणजे अल्पजनसत्तेचें विकृत स्वरूप प्राप्त होतें. असें झालें म्हणजे सामान्य लोक या सत्ताधीश वर्गाविरुद्ध बंड करून लोकसत्तेची स्थापना करितात. लोकसत्तेच्या काळांत बहुमताचे लोक अल्पमताच्या लोकांवर जुलूम करूं लागले म्हणजे अज्ञजनसत्ता स्थापन होते व बहुमताच्या जुलमाला लोक कंटाळले म्हणजे पुनः राजसत्तेची पाळी येते. या परंपरेंत कोणतीही राज्यपद्धति आपल्या ध्येयापासून च्युत झाली नाहीं तोंपर्यंत तिच्याजागीं दुसरी राज्यपद्धति स्थापन होऊं शकत नाहीं, असें दाखविलेलें आहे. तथापि ज्या ग्रीक राज्यांच्या इतिहासाला धरून हा अनुक्रम बसविलेला आहे व ज्यांना हा अनुक्रम लावणें योग्य आहे त्या ग्रीस राज्यांच्या इतिहासाला अनुसरून तो नाहीं. बहुतेक ग्रीस राज्यांत अल्पजनसत्तेचें लोकसत्तेंत रूपांतर होण्याच्या संक्रमणावस्थेंत सुलतानशाही स्थापन झालेली दृष्टीस पडते. या गोष्टीकडे वरील परंपरेंत दुर्लक्ष झालेलें दिसतें, म्हणून राज्यांच्या अवस्थांची पहिली परंपरा ग्रीस नगरराज्यांच्या इतिहासाला धरून आहे असें वर म्हटलें आहे.

ॲरिस्टॉटलचें वर्गीकरण अपुरें व प्रस्तुत निरुपयोगी.

ॲरिस्टॉटलनें केलेलें हें राज्यांचें वर्गीकरण प्रचलित शासनसंस्थांच्या वर्गीकरणास फारसें उपयोगी पडत नाहीं. सध्यां पाश्चात्य युरोपियन देशांत व आशियांतील स्वतंत्र देशांत लोकसत्तेचें तत्त्व मान्य केलेलें असून त्याची बहुतेक देशांत स्थापना झालेली आहे; तथापि राजसत्ता आणि महाजनसत्ता या राज्यपद्धतींतील मूलभूत तत्त्वांचाही कोठें पूर्णपणें लोप झालेला नाहीं, व त्यांचा पूर्ण लोप व्हावा असेंही आर्वाचीन राजनीतिज्ञांचें

मत दिसून येत नाहीं. तें असें समजण्यास राजसत्ता व महाजनसत्ता या राज्यपद्धतींल मूलभूत तत्त्वें कोणतीं आहेत याचा थोडा सूक्ष्म विचार केला पाहिजे. देशांतील राज्यव्यवस्था करण्यासाठीं अनेक अधिकारी नेमावें लागतात. तसेंच परचक्रापासून निवारण होऊन आपल्या राज्याचें स्वातंत्र्य कायम राहावें याकरितां सैन्य, आरमार वगैरे युद्धसामुग्री नेहमीं तयार ठेऊन परराष्ट्रीय संबंधांचा दूर दृष्टीनें विचार करून आपल्या राज्याचे परराष्ट्रीय धोरण ठरवावें लागतें. या सर्व गोष्टी उत्तम प्रकारें होण्यास राष्ट्राधिपत्य कोणातरी एका लायक व्यक्तीच्या हातीं असावें हें राजसत्ताक राज्यपद्धतीचें मूळ तत्त्व आहे; त्याचप्रमाणें राज्यकारभारांतील अनेक संकीर्ण व बिकट कार्यें योग्य रीतीनें पार पाडण्यास राज्यकारभार तज्ञ लोकांच्या हातून होत असावा हें महाजनसत्तेचें मूळ तत्त्व आहे; आणि राजसत्तेचा दुरुपयोग केला जाऊं नये, तिचा उपभोग घेणारे लोक हे प्रजेचे सेवक आहेत आणि ती सत्ता कोणाच्या स्वाधीन करावयाची हें ठरविण्याचा अंतिम अधिकार प्रजेला असावा हें लोकसत्तेचें मूलभूत तत्त्व आहे. या दृष्टीनें या तीन राज्यपद्धतींचा विचार करूं लागलें असतां कोणत्याही राज्यांत त्यांतील मूल तत्त्वांकडे पूर्ण दुर्लक्ष्य करून चालणार नाहीं, हें कोणासही पटेल. आतां राज्यांच्या कोणत्या अंगांत कोणत्या तत्त्वाचा कितपत अवलंब करावयाचा याबद्दल मतभेद होऊं शकेल. या मतभेदांचा विचार करून निर्णय देण्याचें काम पुढील भागांत विस्तृत रीतीनें करण्यांत येईल. येथें सध्यां सुधारलेल्या देशांत प्रचलित असलेल्या शासनसंस्थांत वरील तीन तत्त्वांना कसा अवकाश मिळालेला आहे त्याची थोडीशी माहिती दिली म्हणजे पुरे आहे.

सध्यां सर्वत्र रूढ असलेली लोकसत्ता प्रातिनिधिक स्वरूपाची आहे, ही गोष्ट प्रथम ध्यानांत घेतली पाहिजे. प्रत्येक आर्वाचीन राज्यांत ज्या लोकसभा आहेत त्यांतील एका दळाचे सभासद लोकांनीं

प्रस्तुत राज्ययंत्रें व ॲरिस्टॉटलचें वर्गीकरण.

निवडलेले असतात. त्यांना निवडण्याचा हक्क जरी आज बहुतेक देशांत सार्वत्रिक झालेला आहे तरी त्यांची निवड करतांना लोकसभेचें कार्य करण्याची लायकी पाहूनच ती निवड व्हावी हें तत्त्व सर्वत्र गृहीत धरलेलें आहे. प्रजाजनांपैकीं वाटेल तो मनुष्य लोकसभेचें कार्य करण्यास सारखाच लायक आहे अशा भावनेनें प्रस्तुत राज्ययंत्राची घटना केलेली नाहीं. लायक मनुष्यांच्या हातींच लोकसभेचें कार्य असावें हे आर्वाचीन राज्यपद्धतींतील तत्त्व महाजनसत्तेचेंच आहे. लोकसभेच्या सभासदांची लायकी ठरविण्याच्या कसोटींत लोकसत्तेचें तत्त्व अंतर्भूत झालेलें आहे. तात्पर्य प्रातिनिधिक लोकसत्ता ही शुद्ध लोकसत्ता नसून तिचें स्वरूप संमिश्र आहे. सर जॉन सीले हे आपल्या " इंट्रोडक्शन टु पोलिटिकल सायन्स " या पुस्तकांत म्हणतात " प्रातिनिधिक लोकसभा ही एक प्रकारची लोकनियुक्त महाजनसत्ताच आहे[1] " प्रातिनिधिक स्वरूपामुळेंच लोकसत्तेंतील दोष नाहींसे होऊन तिची शक्ति कायम राहाते असें जेम्स ब्राइस हे आपल्या " दि अमेरिकन कॉमनवेल्थ " या ग्रंथांत म्हणतात.[2] ज्या मानानें लोक-

1 " As I have said a representative Parliament is a kind of elective aristocracy." Seeley. p.353.

2 " Nevertheless a representative or parliamentary system provides the means of mitigating the evils to be feared from ignorance or haste, for it vests the actual conduct of affairs in a body of specially chosen and presumably specially qualified men who may themselves entrust such of their functions as need peculiar knowledge or skill to a smaller governing body or bodies selected in respect

प्रतिनिधींच्या निवडणुकी अधिक मुदतीनें होत जातील, प्रतिनिधींनीं अमुक ठरावावर अमुक प्रकारचींच मतें द्यावींत अशीं वचनें ज्या मानानें वारंवार त्यांचेकडून घेतलीं जातील, प्रत्यक्ष मतदारांचें मत घेण्याचे प्रसंग, किंवा मतदारांना कायद्याचे मसुदे लोकसभेपुढें मांडण्याचे हक्क ज्या मानानें वाढत जातील, त्या मानानें हल्लींच्या प्रातिनिधिक लोकसत्तेंतील महाजनसत्तेचें तत्त्व कमी कमी होत जाईल[1]. शिवाय अंमलबजावणी खात्यांतील सर्वांत श्रेष्ठ अधिकारी जरी लोकनियुक्त असला तरी तो इतर अधिकाऱ्यांच्या नेमणुका त्यांच्या लायखीप्रमाणेंच करीत असल्यामुळें त्या खात्यांत महाजन-सत्तेचें तज्ञांच्या हातून राज्यकारभार करून घेण्याचें तत्त्व अधिक प्रामुख्यानें दृग्गोचर होत असतें. अमेरिकेंत राष्ट्राध्यक्ष हा राष्ट्राधिपति असून अंमलबजावणी खात्यांतील व न्यायखात्यांतील अधिकाऱ्यांच्या नेमणुका त्यांच्या लायकीप्रमाणेंच तो करीत असतो. इंग्लंडांत राजा हा नामधारी राष्ट्राधिपति असल्यामुळें खरें राष्ट्राधिपत्य मुख्य प्रधानाकडे असतें व तो आपल्या मन्त्र्यांची व त्यांच्या सल्ल्यानें न्यायाधिशांची वगैरे नेमणूक करीत असतो. तसेंच अंमलबजावणी खात्यांतील बऱ्याच जागा ज्या कायमच्या अधिकारी वर्गाच्या (Permanent Civil service) हातीं असतात त्या अधिकाऱ्यांची भरती चढा-

---

of their more eminent fitness. By this method the defects of democracy are remedied while its strength is retained. Vcl 11 p. 635.

1 " Hence, I do not consider representative Government-even when the suffrage is universal-as merely a mode of organizing democracy, but rather as a combination or fusion of democray and aristocracy. This fusion or Combination may become less or more aristocratic in Character through various minor modifications. Thus it may be made

ओढीच्या परीक्षेंतील नंबरवारीनें होत असते. येथेंही महाजन सत्तेचेंच तत्त्व मान्य केलेलें उघडपणें दिसून येतें. याशिवाय सर्व सुधारलेल्या राष्ट्रांतील लोकसभा आज द्विदळ स्वरूपाच्या असून त्यांपैकीं एका दळांतील—महाजन सभेंतील—सभासद अधिक तज्ञ असावेत अशा हेतूनेंच त्या दळाची घटना बनविलेली असते. हा हेतु कोठें कितपत साध्य झालेला आहे याचें विवेचन पुढील भागांत येईल. आतां राज्यांतील कारभार एकमुखी व एकतंत्री असावा या राजसत्तेच्या मुलभूत तत्त्वाचा विचार केला तरी त्याचाही अंतर्भाव प्रस्तुतच्या राज्ययंत्रांत सर्वत्र थोडाबहुत तरी केलेला दिसून येतो. या तत्त्वाची अंमलबजावणी राजसत्तेच्या सर्व अंगांत सारखीच करावी असें कोणीही म्हणणार नाहीं. कायदे करणें, कर बसविणें व सरकारचें सामान्य धोरण ठरवून देणें या कामीं लोकसभा सारख्या चर्चात्मक संस्था जास्त लायक असतात तर युद्धासारख्या कामीं सर्व सत्ता एकाच श्रेष्ठ व्यक्तीच्या हातीं देणें अधिक श्रेयस्कर होईल याबद्दल हल्लींच्या विद्वान लोकांत तरी मतभेद होईल असें वाटत नाहीं. सरकारच्या नित्याच्या व्यवहारांना अंमलबजावणी

---


less aristocratic by increasing the intervention of the people at large in legislation—Through measures like the referendum and initiative before mentioned by shortening the time for which the legislature or the executive is appointed, by the habit of demanding elaborate pledges at elections or even imposing mandates at other times to which the representatives submit and by the practice of appointing executive officials on other grounds than their qualifications for office." Sidgwick, Elements of Politics p. 616-17

असें नांव देऊन लोकसभांनी अगाऊ केलेल्या कायद्यांची केवळ बजावणी करण्याचेंच काम राष्ट्राधिपति व त्याचे मंत्रि यांच्याकडे आहे असें सुचविलें जातें. तथापि परराष्ट्रीय संबंधांत हें तत्त्व कोणत्याच देशांत पूर्णपणें अवलंबिलेलें दिसत नाहीं. सर्व परराष्ट्रीय संबंधांची आगाऊ चर्चा लोकसभापुढें इंग्लंड किंवा अमेरिका या देशांतही आज केली जात नाहीं. या कामीं तेथील राष्ट्राधिपति व मंत्रि आपल्या इच्छेप्रमाणें धोरण आधीं ठरवून नंतर त्याला लोकसभेची संमति मिळवीत असतात. तात्पर्य प्रत्येक राज्यांत राष्ट्राधिपत्य कोणा तरी एकाच व्यक्तीच्या हातीं असावें, अंमलबजावणी खात्यांतील सर्व अधिकारी त्याला जबाबदार राहावेत आणि परराष्ट्रीय संबंधांत त्याला बरेंच स्वातंत्र्य असावें हीं राजसत्तेंतील तत्त्वें हल्लींही सर्वत्र रूढ असलेलीं प्रत्ययास येतात. वरील विवेचनावरून सध्यांच्या पाश्चात्य राज्ययंत्रांत लोकसत्ता, महाजनसत्ता व राजसत्ता या तीनही तत्त्वांचा अंशतः अंतर्भाव झालेला आहे,अशा अर्थाचें प्रोफेसर सिज्विक यांचें जें एक वाक्य या प्रकरणाच्या शिरोभागीं घातलें आहे त्यांतील स्वारस्य लक्षांत येईल. अर्थात् ॲरिस्टॉटलनें केलेलें राज्यांचें वर्गीकरण प्रस्तुत राज्ययंत्राच्या वर्गीकरणास उपयोगी पडत नाहीं हें उघड आहे.

लीकॉक व मेरियट यांचें प्रचलित राज्ययंत्रांचें वर्गीकरण.

ॲरिस्टॉटल नंतरही बऱ्याच पंडितांनीं शासनसंस्थांचें वर्गीकरण करण्याचे प्रयत्न केलेले आहेत. परंतु त्या सर्वांची चर्चा करण्याचें कारण नाहीं. आर्वाचीन राज्यव्यवस्थांचा विचार करून त्यांना अनुरूप असें वर्गीकरण अमेरिकन राजनीतिज्ञ लीकॉकें यानें केलेलें आहे. मेरियट या इंग्लिश ग्रंथकारानेंही तेंच वर्गीकरण स्वीकारलेलें आहे व आज तें बहुतेक सर्वमान्य झालेलें आहे. याकरितां तें वर्गीकरण आम्ही स्वीकारून वाचकांस सादर करितों. लीकाकनें सर्व शासन-

संस्थांचे प्रथम अनियंत्रित आणि लोकसत्ताक Despotic and *Democratic*) असे दोन स्थूल वर्ग केलेले आहेत. लोकसत्ताक शासन संस्थांचे पुनः लोकसत्ताक राजशाही (Limited monarchy) व लोकशाही (Republic) असे पोट वर्ग केलेले आहेत. ज्या राज्यांतील राष्ट्राधिपति–मग तो वास्तविक असो किंवा नामधारी असो–लोकनियुक्त असतो तेथें त्याला लोकशाही व जेथें तो आनुवंशिक असतो तेथें त्याला लोकसत्ताक राजशाही अशीं नावें दिलेलीं आहेत.यांपैकीं प्रत्येकाचे एकरूप (Unitary) व संयुक्त (Federal) असे पोट वर्ग करून त्यांपैकीं प्रत्येकाचे पुनः जबाबदार प्रधान मंडळाच्या व स्वतंत्र प्रधान मंडळाच्या शासनसंस्था असे पोटवर्ग केलेले आहेत. पुढील आकृतीवरून हें वर्गीकरण स्पष्ट होईल.



वरील वर्गीकरण ज्या तत्त्वांवर केलेलें आहे त्यांचें ज्ञान इग्लंड व अमेरिका या दोन राज्यांतील शासनसंस्थांची तुलना केली असतां लवकर होईल. इंग्लंड व अमेरिका या देशांतील शासनसंस्थांत तीन मुख्य भेद आहेत व त्याच्याच आधारावर वरील वर्गीकरण केलेलें आहे. ते तीन भेद म्हणजे (१) इंग्लंडांत लोकसत्ताक राजशाही आहे तर अमेरिकेंत लोकशाही आहे; (२) इंग्लंडचें राज्य म्हणजे ब्रिटीश साम्राज्य कायदेशीर रीतीनें एकरूप आहे तर अमेरिकेचें राज्य संयुक्त आहे आणि (३) इंग्लंडांत जबाबदार प्रधान मंडळाची व्यवस्था रूढ आहे. तर अमेरिकेंत स्वतंत्र प्रधान मंडळाची व्यवस्था रूढ आहे. या तीन भेदांवरच आर्वाचीन राज्यपद्धतींचें वर्गीकरण करण्यांत येतें. फ्रान्समधील राज्यव्यवस्था एकरूपता आणि जबाबदार प्रधान मंडळाची व्यवस्था या दोन दृष्टींनीं इंग्लंडसारखी आहे; परंतु तेथें इंग्लंडप्रमाणें लोकसत्ताक राजसत्तेची व्यवस्था नसून अमेरिकेसारखी लोकशाही (Republic) ची राज्यव्यवस्था आहे. जुन्या जर्मन साम्राज्यांत इंग्लंडप्रमाणेंच लोकसत्ता व राजशाही होती, परंतु तें राज्य संयुक्त असून तेथें स्वतंत्र प्रधान मंडळाची व्यवस्था असल्यानें या दोन गोष्टींत त्याचें अमेरिकेशीं साम्य होतें. जपान व इटली या देशांतील राज्यव्यवस्था तिन्ही मुद्यांच्या दृष्टीनें इंग्लंडसारख्या आहेत म्हणजे त्या जबाबदार प्रधान मंडळाच्या एकरूप लोकसत्ताक-राजशाही आहेत.

राजनीतिशास्त्रपरिचय.

भाग ३ रा

औपपात्तिक.

भाग तिसरा.

प्रकरण १ लें.

राज्ययंत्राची आवश्यकता

राष्ट्रस्य यत्कृत्यतमं राज्ञ एवाऽभिषेचनम् ।
अनिन्द्रमबलं राष्ट्रं दस्यवोभिभवन्त्युत ॥
अराजकेषु राष्ट्रेषु धर्मो न व्यवतिष्ठते ।
परस्परं च खादन्ति सर्वथा धिगराजकम् ॥ '

शांति० अ ६६ श्लो २।३

मागील दोन भागांत सरकार या संस्थेची उत्पत्ति, अभिवृद्धि व स्थिति, या संबंधीं माहिती देऊन सध्यांच्या राजयंत्रांचें वर्गीकरणही करण्यांत आलें. आतां राज्ययंत्राच्या आवश्यकतेचें, त्याच्या कार्यांचें व स्वरूपाचें तात्त्विक उपपादन करून त्याचें सर्वोत्तम स्वरूप कसें असावें आणि सध्याच्या राज्ययंत्रांत कोणकोणते गुणदोष आहेत, याचें विवेचन करावयाचें आहे. हें करितांना राज्ययंत्राच्या निरनिराळ्या अंगांचें पृथक् विवेचन करावें लागेल; तथापि त्या

अराजक पंथाचें प्राचीनत्व

---

१ कोणातरी राजाला अभिषेक करणें हें प्रत्येक राष्ट्राचें आद्य कर्तव्य आहे. ज्या राष्ट्रांत राजा किंवा सैन्य नाहीं त्याच्यावर शत्रू हल्ले करितात. अराजक राष्ट्रांत धर्म टिकत नाहीं आणि प्रजा एकमेकांस खावयास उठतात. म्हणून अराजक स्थितीचा सर्वथा धिःकार असो.

पूर्वीं राज्ययंत्राची आवश्यकताच आहे किंवा नाहीं, या प्रश्नाचें उत्तर देणें भाग आहे. सामाजिक संस्थांचा तर्कदृष्ट्या विचार करण्यास एकदां सुरवात झाली म्हणजे प्रत्येक संस्थेच्या अस्तित्वाचें प्रयोजन तर्काला पटेल अशा रीतीनें सिद्ध करणें भाग असतें. राजनीति शास्त्राच्या उत्पत्तीपासून समाजांत कोणी तरी अराजक मतांचे लोक नेहेमीं असावेत, असें वाटतें; कारण अति प्राचीन अशा राजधर्मावरील ग्रंथांतूनही राजधर्माचें विवेचन करण्यापूर्वीं राजसत्तेची आवश्यकता काय आहे, समाजांत सरकार ही दंडधारी संस्था नसल्यास कोणते अनर्थ ओढवतील व ती असल्यापासून समाजाचें कोणतें हित होतें, वगैरे प्रश्नांचीं उत्तरें देऊन अराजक स्थितीचा धिःकार केलेला आढळतो. हल्लीं पश्चात्य देशांतही अराजक पंथाचे कांहीं अनुयायी दृष्टीस पडतात आणि गेल्या शतकाच्या पहिल्या दशकांत रशियामध्यें अराजक पंथाचें बरेंच प्रस्थ माजलें होतें. सिंडिकॅलिस्ट कम्युनिस्ट किंवा बोल्शेव्हिक या पंथांचें अंतिम ध्येय अराजकता हेंच आहे. अर्थात् या अराजक मतांचा प्रथम विचार केल्याखेरीज राजनीतिशास्त्राची उपपत्ति सांगण्यास प्रारंभ करणें, योग्य होणार नाहीं.

रशियांतील अराजक पंथ.

राज्ययंत्राची उभारणी दंडशक्तीवर झालेली असून कायद्यांची अंमलबजावणी सक्तीनें करणें, हें सरकार या संस्थेचें विशिष्ट लक्षण आहे. सक्ति आणि स्वातंत्र्य या कल्पना प्रथम दर्शनीं परस्पर विरोधी अशा भासतात व यामुळेंच स्वातंत्र्यप्रिय लोकांना सरकार ही संस्था कित्येक वेळीं अनिष्ट, अनवश्यक व अनर्थावह अशी भासते. ज्याकाळीं व ज्या देशांत कोणत्याही कारणानें राजकीय परिस्थिति असावी तशी असत नाहीं, त्याच वेळीं व तशाच देशांत अराजक मतांचा फैलाव जारीनें होत असतो, असा सामान्य नियम आहे. तदनुसार गेल्या शतकांत अराजक पंथाचा उदय रशियामध्यें झाला. क्रोपोट-

किन् बॅकुनिन् व टॉलस्टॉय् हे या पंथाचे प्रमुख पुरस्कर्ते होत. अमुक एका विशिष्ट राज्यघटनेवरच यांचा आक्षेप होता असें नसून समाजांत कोणतीही सक्तिप्रधान किंवा दण्डधारी संस्था असू नये, असें या तत्त्वज्ञांचें मत होतें. पाश्चात्य देशांत त्यावेळीं अत्यंत नावाजलेली अशी जी प्रातिनिधिक लोकसत्ता तिचाही यांना तिटकारा आलेला असून बहुमताचा अंमल अल्पमतावर सक्तीनें लादणें, हें जें या पद्धतीचें आद्यतत्त्व तें या लोकांस मुळींच मान्य नव्हतें. प्रातिनिधिक राजपद्धती संबंधीं क्रोपोटकिन् हा म्हणतो "प्रातिनिधिक राज्यपद्धतीचें ऐतिहासिक कार्य आतां उरकलें आहे; राज्याच्या दरबारी लोकांच्या अमलाचा तिनें शेवट केला आहे.आणि आपल्या विवाद॰ पद्धतीनें सामान्य लोकांना सार्वजनिक प्रश्नाची गोडी लावली आहे. परंतु समाजसत्तात्मक भावी समाजांत ही राज्यपद्धति कायम राहील, अशी कल्पना करणें, हें अगदीं चुकीचें आहे."

क्रोपोटकिनचें मत

" या राज्ययंत्रांत कसकसें रूपान्तर होईल, याचीं पूर्व चिन्हें दिसतच आहेत. आज जीं सरकारचीं कर्तव्यें गणलीं जात आहेत, तीं पार पडण्यास स्वतंत्र व संयुक्त स्वरूपाच्या संघटना वाढत जातील व सरकारचीं कर्तव्यें वाढत न जातां हळूहळू कमी होत जातील (व अखेरीस ती संस्था नष्ट होईल.)" " जे लोक समाजाचीं बंधनें तोडतील, त्यांना दंड करण्यासाठीं सरकारची आवश्यकता आहे, या तिसऱ्या आक्षेपासंबंधीं इतकें कांहीं लिहितां येण्याजोगें आहे कीं, त्या सर्वांचा संक्षेपानेंही येथें उल्लेख करणें शक्य नाहीं. या विषयाचा अपण जों जों अभ्यास करावा तों तों आपली अशी पक्की खात्री होऊं लागते

(I "Anarchist Communism by Kropotkin" Quoted in Roads to Freedom P. 126 B. Russell.)

कीं, समाजांत घडणाऱ्या समाजविघातक पापकर्मांची जबाबदारी समाजावरच आहे, आणि तुरुंगांची किंवा फासांची संख्या वाढविल्यानें हीं दुष्कर्में कमी होण्याची आशा नाहीं. आपल्या न्यायासनांपुढें दरसाल जे गुन्हे येतात, त्यांतील तीन चतुर्थांश गुन्ह्यांचें मूळ मनुष्यांच्या दुष्ट मनोवृत्तींत नसून संपत्त्युत्पादन आणि विनिमय यासंबंधींच्या सामाजिक अन्यायांत असतें. (शिवाय) जीं थोडीं पापकर्में मनुष्यांच्या दुष्ट मनोविकारांमुळें घडतात, त्यांची संख्या तुरुंगाच्या किंवा फांशीच्या शिक्षांनीं कमी होणें संभवनीय नसतें. उलट आमच्या बंदिखान्यांनीं तीं वाढून त्या पापकर्मांचें स्वरूप अधिकच हिडिस होतें. आमचे गुप्त पोलीस, आमचे मारेकरी, आमचे बंदिखाने, या सर्वांमार्फत इतक्या दुराचारांचा व दुष्प्रवृत्तींचा इतका प्रसार आम्ही समाजांत एकसारखा करीत असतों कीं, ज्यांना या सर्व संस्थांच्या वास्तविक स्वरूपांचें खरें ज्ञान होईल, त्यांना नीतिमत्तेच्या संरक्षणाच्या नांवाखालीं समाज करीत असलेलीं हीं दुष्कृत्यें पाहून खरोखरच भय वाटेल. यावर आपण कांहीं तरी निराळे उपाय शोधून काढणें अवश्य आहे. हे उपाय मागें सांगितलेच आहेत[1]. ”

टालस्टॉयचें मत.

अराजक स्थितीसंबंधीं कौंट टॉलस्टॉय यांचे विचार पुढें थोडक्यांत दिले आहेत. “ सरकार नष्ट झाल्यावर त्याच्या जागीं कोणती संस्था निर्माण होईल, असा प्रश्न नेहेमीं विचारण्यांत येत असतो. याचें उत्तर कोणतीही संस्था अस्तित्वांत येणार नाहीं, असेंच आहे. बराच काळ निरुपयोगी बनल्यामुळें जी संस्था अनिष्ट व अनवश्यक झाली आहे, तिचा अंत होईल, समाजाचा जो अवयव अनवश्यक व अतएव अनर्थावह झाला आहे, तो नष्ट होईल.

1 The same, Page 127.

यावर लोक आक्षेप घेतात कीं, सरकार नसेल तर लोक एकमेकांवर अत्याचार करतील व परस्परांस मारून टाकतील. पण असें कां घडावें ? ज्या संघटनेची उत्पत्ति आणि अनेक पिढ्यांची स्थिति केवळ अत्याचारावर अवलंबून आहे, ती नष्ट झाल्यास लोकांतील अत्याचारांची किंवा हिंसेची प्रवृत्ति वाढण्याचें काय कारण ? उलट समाजाचें अत्याचारी अंग नष्ट झाल्यामुळें लोकांतील अत्याचारप्रवृत्ति व हिंसावृत्ति नष्ट होतील, असेंच मानणें साधार होईल. सध्यां समाजांतील कांहीं व्यक्तींना अत्याचारांचें व हिंसेचें मुद्दाम शिक्षण देण्यांत येतें, कांहीं लोकांना अत्याचार करण्याचा अधिकारच आहे असें समजतात, आणि हे लोक या संघटनेचा तसा उपयोगही प्रत्यक्ष करीत असतात. असल्या अत्याचारांची व हिंसांची स्तुत्य अशा सदाचारांत हल्लीं गणना होत असते; पण अराजक परिस्थितींत लोकांना असलें शिक्षण दिलें जाणार नाहीं, कोणांसही अत्याचार करण्याचा अधिकार देण्यांत येणार नाहीं आणि ज्याप्रमाणें मनुष्यें अत्याचारांची व हिंसेची स्वभावतःच दुष्कर्मांत गणना करतात, त्याचप्रमाणें अराजक स्थितींत हीं कर्में कोणींही केलीं तरी त्यांची दुष्कर्मांत गणना होईल. सरकार नष्ट झाल्यानंतर कांहीं अत्याचार घडलेच तर निदान त्यांची संख्या सध्यापेक्षां पुष्कळ कमी होईल. कारण सध्याच्या परिस्थितींत अत्याचार करणारी एक स्वतंत्र संघटना असून तिनें केलेल्या खुनांचा व अत्याचारांचा समाजोपयोगी सत्कर्मांत अंतर्भाव करण्यांत येत असतो....कायदे, न्यायसभा, पोलिस व्यवस्था, खासगी मालमत्ता, संपत्तिविनिमय किंवा लोकशिक्षण इत्यादि संस्थांत ज्या सयुक्तिक व सदुपयोगी बाबी आहेत, व म्हणून ज्यांची अत्याचारांवर उभारणी झालेली नाहीं, त्यांचा नाश अत्याचारप्रधान सरकारच्या नाशांत अंतर्भूत होत नाहीं. उलट केवळ सरकारच्याच अस्तित्वास आवश्यक अशा पाशवी शक्तीच्या नाशानें, अधिक न्याय्य, सयुक्तिक व अनत्याचारी अशी सामाजिक संघटना निर्माण करण्यास फार

मदत होईल. जितक्या प्रमाणांत लोकांना न्यायसभा, सार्वजनिक कार्यें, लोकशिक्षण इत्यादींची आवश्यकता असेल, तितक्या प्रमाणांत त्या गोष्टी उरतील. फक्त सध्यांच्या राज्यघटनेंतील दोषामुळें त्यांना जें विकृत स्वरूप प्राप्त झालें आहे, तें मात्र पुढें उरणार नाहीं.......बरें आपण अशीही कल्पना केली कीं, त्या स्थितींत अशांतता माजून तंटेबखेडे होतील. तरी ही लोकांची स्थिति सध्यांपेक्षां अधिक कष्टप्रद होईल असें नाहीं. सध्याची स्थिति इतकी हीन आहे कीं, तीहून हीनतर स्थितीची कल्पनाही करणें शक्य नाहीं. लोकांचा एकसारखा नाश होत असून त्याचें प्रमाण दिवसें दिवस वाढत आहे. समरांगणावर नेण्याकरितां तयार केलेल्या गुलामांची स्थिति सर्व लोकांना प्राप्त झालेली असून, मारण्यास किंवा मरण्यास चाल करून जाण्याच्या हुकुमांची ते एकसारखी मार्गप्रतीक्षा करीत असतात. या स्थितीहून अधिक वाईट ती कोणती स्थिति होणार? इतक्या हीन स्थितीला पोहोंचलेले हे लोक उपासमारीनें ठार होतील, एवढीच कोणास भीति असल्यास रशिया, हिंदुस्थान, इटाली वगैरे देशांत तेंही घडून येत आहे. पुरुषांप्रमाणें स्त्रियांवरही गुलाम व सैनिक बनण्याचा प्रसंग येईल अशी कोणास भीति असल्यास ट्रान्सवॉलमध्यें तोही प्रसंग ओढवण्यास आज सुरवात झाली आहे "[1] मग यापेक्षां अधिक शोचनीय अशी कोणती स्थिति उरलेली आहे कीं, जी अराजक स्थितींत उद्भवेल म्हणून आपण भ्यावें? असा या रशियन तत्त्ववेत्याचा मोठा मार्मिक व खोंचदार प्रश्न आहे.

या अराजक पंथाच्या विचारसरणीला उत्तर देण्यापूर्वीं महाराष्ट्रांतील इतिहास संशोधक राजवाडे यांनीं हिंदुस्थानांतील सामान्य लोकांच्या राजकीय औदासिन्यापासून जगाला काय शिकतां येईल, याचें

---

1 " The evils of Government " by Count Leo Tolstoy.

राजवाड्यांचे दोन उतारे

विवेचन करतांना अराजक विचारांची जी एके ठिकाणीं चटकदार मांडणी केली आहे, ती वाचकांपुढें ठेवावी अशी आम्हास इच्छा झाली आहे. अर्थात् या उताऱ्यांत हिंदी लोकांच्या राजकीय औदासिन्याची व्याजोक्तीनें निंदा करण्याचाच लेखकाचा मुख्य उद्देश आहे, हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. " अपरंपार अशी अन्नसंपत्ति, साही ऋतूंत अत्यल्प कपडालत्त्यावर शीतोष्ण निवारण होईल अशी हवा, कित्येक शतकें पुरून उरेल अशी जागा, वगैरे साधनांची सुलभ अनुकूलता असल्यामुळें, या देशांत जे जे लोक स्थानिक रहिवाशी होतात, ते बाहुल्यानें मुक्तद्वारी, संन्यस्त, व्यक्तिनिष्ठ, समाजपराङ्मुख व राष्ट्रपराङ्मुख बनतात. ही कहाणी गेल्या दहा रकान्यांत सांगितली. अन्नाकरितां दाही दिशास हिंडणाऱ्या व चोऱ्यामाऱ्या, खून, कत्तली, जबरदस्ती, दंगे व लढाया, यांत चूर झालेल्या गेल्या तीन हजार वर्षांतील मध्य आशियांतील मोंगलादि बिन सुधारलेल्या उनाड लोकांकडे तिरस्कारानें दुर्लक्ष करून, अलीकडील चारशें वर्षांतील सुसंस्कृत म्हणविणाऱ्या युरोपियन लोकांना, हे मुक्तद्वारी, संन्यस्त, व्यक्तिनिष्ठ व राष्ट्रपराङ्मुख लोक असा प्रश्न करीत कीं, सरकारें बनवून कर उकळीत न बसतां, सालसपणें निमूटपणें व शांततेनें ह्या देशांत इतरांप्रमाणें अन्न खात राहिलात तर काय बिघडेल? एक समाज करून, राज्ययंत्रें बनवून, राष्ट्रें निर्मून, शास्त्रें रचून, शास्त्रास्त्रें घडवून, एकजूट होऊन, स्वदेशांतील लक्षावधि मोलमजुरांची व भिकार भणंगांची उपासमार करून व परदेशांतील अन्न लुटून शेवटीं पोटाची खळीं भरण्या पलीकडे कोणतें शतकृत्य साधतां? आमच्या देशांत आम्हांला ज्या प्रमाणें सरकार ही संस्था जरूरीची भासत नाहीं, त्या प्रमाणें तुमच्याकडील शेंकडा नव्वद लोकांनाही समाजाच्या अंतर्बाह्य जिकडे तिकडे घुसणारी सरकार ही संस्था मनापासून नको आहे. तेव्हां कांहीं उपद्व्यापी अल्पसंख्याक लोकांनीं

स्वतःची चैन भागविण्याकरितां स्थापलेल्या व सर्व पृथ्वीला पीडा करणाऱ्या सरकार ह्या कृत्रिम व अनवश्यक संस्थेला तुम्ही आम्ही सर्व मिळून मातींत गाडून टाकूं या. सर्व पृथ्वीभर फर्लांगा फर्लांगावर एकेका कुटुंबाला घरवाडा देऊन जुलमाची व पापाची जन्मस्थानें जीं शहरें त्यांचा प्रथम नायनाट करूं या. ज्याला ज्या देशांत रहावेसें वाटेल, त्यानें त्या देशांत जाऊन जागा असेल तेथें विन हरकत राहावें. भय काय तें (१) चोराचिलटांचे (२) पृथ्वीच्या पाठीवरील अर्ध रानटी उनाड लोकांचें किंवा (३) बडे जमीन-दार, जंगी पेढीवाले व धंदेवाईक मुसद्दी यांचें पैकीं चोरा चिलटांचा मागमूस फर्लांगाफर्लांगावर घरें झाल्यानें मुदलांतच राहात नाहीं, असा दक्षिण कोंकणांतील अनुभव आहे. तोच अनुभव सर्व पृथ्वीवर येईल व चोराचिलटांच्या निवारणार्थ महार व कुत्रीं ह्यांचे देखील सरकार निर्मिण्याची आवश्यकता राहाणार नाहीं. अर्धरानटी लोकांचा एक जमाव आफ्रिकेच्या मध्यभागांत आहे आणि दुसरा मोठा जमाव मध्यआशियांत आहे. या दोन्ही अर्ध रानटी जमावांना माघून रेटून पुढें ढुसकून देण्यास त्यांच्याहून रानटी व भुकेबंगाल लोक आतां राहिले नाहींत. करतां हेही समाज आपा-पल्या मूळ भूमींत स्थिर होण्याचा संभव आहे. तेव्हां त्यांचा प्रतिकार करण्यासाठीं सरहद्दीवरून सैन्य ठेवणाऱ्या सरकारांची आतां आवश्यकता राहिली नाहीं. म्हणून दंडधारी सरकारांना येथून पुढें कायमची रजा देणें युक्त नव्हे काय ? बडे जमीनदार, जंगी पेढीवाले आणि धंदेवाईक मुत्सद्दी, यांनीं सर्व पृथ्वीभर मोंगलादि अर्ध रानटी लोकांप्रमाणें धुमाकूळ घालण्या-करितां व आपली अनिवार द्रव्यतृष्णा भागविण्याकरितां जुलमी व घातकी सरकारें चालविलीं आहेत.त्यांचा हा परोपघातक स्वार्थी धंदा बंद पाडण्याची वेळ होऊन गेली नाहीं काय ? भारतवर्षांतील व उत्तर कोंकणांतील उदासीन व निवृत्त अशा बहुतम लोकांचा शकाच्या सोळाव्या व सतराव्या

१ महिकावतीची बखर प्रस्तावना पान १०५।१०६

शतकांतील इतिहास जर कांहीं विचारीत व शिकवीत असला तर हे प्रश्न विचारीत व शिकवीत आहे.[१]" हिंदुस्थानांतील लोकांना राज्ययंत्राची विशेष फिकीर कां वाटत नसे याचें विवेचन करून त्यांच्या राजकीय औदासन्याची मीमांसा रा. राजवाडे पुढीलप्रमाणें करतात. " विपुल अन्न आणि सुलभ अन्न हाताशीं तयार असल्यामुळें, हिंदुस्थानांतील माणसाला पोलिसाची म्हणजे सरकार म्हणून जी संस्था आहे त्या संस्थेची अडगळ फारच थोडी खपे. श्वापदापासून व चोराचिलटांपासून अन्नाचें संरक्षण करण्याला महार व कुत्रा असला म्हणजे हिंदू गांवाचे काम भागे. पंचायत, महार व कुत्रा यांहून जास्त भानगडीचें भव्य किंवा भयंकर सरकार हिंदू ग्रामसंस्थेला नको असे. गेल्या तीन हजार वर्षांत हिंदुस्थानांत जी देशी व परदेशी सरकारें होऊन गेलीं तीं सर्व एका प्रकारच्या पोटबाबू चोरांचीं झालीं व सरकार म्हणजे एक उपटसुंभ चोरांची टोळी आहे, अशी हिंदू गांवकऱ्यांची अंतस्थ प्रामाणिक समजूत असे. त्यामुळें सरकारच्या बऱ्या-वाईटाकडे हिंदु गांवकरी स्वत्तः होऊन बिलकुल लक्ष देत नसे. जुनें सरकार मोडो किंवा नवीन सरकार जुडो त्याचें सुखदुःख गांवकऱ्याला तितपतच असे. अपरिहार्य आपत्ति म्हणून सरकार नांवाच्या चोरांचें देणें एकदां कसें तरी देऊन टाकिलें म्हणजे वर्षभर पीडा चुकली इतपत प्रेम सरकार नांवाच्या संस्थेवर गावकऱ्यांचें असे......ज्या मूठभर उपटसूंभांनीं सरकार स्थापिलें तें मूठभर लोक जुन्या सरकारच्या वतीनें नव्या सरकाराशीं झुंजत, तंडत व पराभूत झाले असतां रडत व विजयी झाले असतां खिदळत.हिंदुस्थानांत सरकार ही संस्था सदा कांहीं अत्यल्प संख्याकांची असे, सार्व लौकिक कधींही नसे[१]" चीन मधील लोकांची ही सामान्यतः अशीच स्थिति होती. चिन देशावर सरकारी अंमल जगांतील कोणत्याही देशापेक्षां अगदीं कमी आहे, दरसाल

१ महिकावतीची बखर, प्रस्तावना, पान ९२।९३.

जमीनसाऱ्याच्या देण्यासारख्या अगदीं थोड्या बाबींचे अपवाद सोडून दिल्यास चीन मधील गांवकऱ्यांशीं साम्राज्य सरकारचा कांहींही संबंध येत नाहीं,असें राधाकमल मुकर्जी आपल्या "पौरस्त्य लोकसत्ता" या पुस्तकांत लिहितात.[1]

रा. रा. राजवाडे यांच्या पुस्तकांतील दोन मोठे उतारे देऊन जागा अडविण्याचें प्रयोजन असें आहे कीं, हिंदी व चिनी लोकांच्या सध्यांच्या स्थितीकडे पाहिलें असतां अराजक पंथाच्या मतांचें खंडन करण्यास फारशी जागा अडविण्याची गरज पडणार नाहीं. हिंदी व चिनी लोकांचा इतिहास जगाला असें सांगत आहे कीं, आपल्या राष्ट्रांत राज्ययंत्राची अत्यंत आवश्यकता असून त्याच्या सुस्थितीकडे लक्ष्य देणें हें प्रत्येक गांवकऱ्याचें अवश्य कर्तव्य आहे. जगांत जोंपर्यंत उपद्व्यापी, परपीडक व महत्त्वाकांक्षी लोक आहेत, तोंपर्यंत राज्ययंत्राकडे दुर्लक्ष्य करून चालणार नाहीं. " अनिंद्रंमबलं राष्ट्रं दस्ययोऽभिवन्त्युत " या महाभारतांतलि सिद्धान्ताचाही तोच अर्थ आहे. आपल्या पुढचें विपुल अन्न आम्ही सुखानें खाऊं असा जरी एखाद्या देशांतील लोकांनीं निश्चय केला तरी इतर देशांतील लोक त्यांस तसें करूं देणार नाहींत. शिवाय आपल्या देशांतीलही उपद्व्यापी व महत्त्वाकांक्षी लोक संघटित प्रयत्नांनी संन्यस्त वृत्तीच्या लोकांना गुलाम बनविल्याखेरीज राहाणार नाहींत. म्हणून काम, लोभ आणि सत्ताभिलाष या मनोवृत्तींनीं मनुष्याच्या अंतःकरणांतून आपलें ठाणें उठविलें नाहीं

हिंदी व चिनी इतिहासाची शिकवण.

1 " China is the least Governed country in the world: with a few exceptions, such as the payment of a nominal land tax, the chinese village is virtually independent of the imperial administration. " Democracies of the East, Forecast P XXiii

तोंपर्यंत एक स्वतः राज्ययंत्र बनवून दुष्टांचें दमन करणें किंवा दुष्टांनीं बनविलेल्या राज्ययंत्रांतून भरडून जाणें याशिवाय तिसरा मार्ग नाहीं. याकरितां ज्या संत महात्म्यांना प्रस्तुत राज्ययंत्रें परोपघातक लोकांच्या हातीं आहेत असें वाटत असेल, त्यांनीं तीं अजीबात मोडून टाकण्याच्या अव्यवहार्य व अनर्थावह उपायांचा उपदेश न करितां तीं राज्ययंत्रें परोपकारी व निष्काम बुद्धीच्या लोकांच्या हातीं जातील असे प्रयत्न करावेत. लोकांतील दुष्ट मनोभावना जोंपर्यंत अजीबात नष्ट झाल्या नाहींत तोंपर्यंत त्यांचें दमन करणाऱ्या दण्ड शक्तीची आवश्यकता आहे. या दण्डशक्तीच्या अभावीं या दुष्ट भावना कमी न होतां उलट वाढतील मात्र!

यावर अराजक पंथाच्या लोकांचें असें म्हणणें आहे कीं सध्याच्या सामाजिक अन्यायामुळें लोकांत दुष्कर्मे करण्याची प्रवृत्ति होत असते.

अराजक पंथाचा युक्तिवाद.

बहुतेक गुन्हे समाजांतील बुभुक्षित लोकांकडून होत असतात. सध्यां समाजांत द्रव्यसंपादनाचे असे कांहीं मार्ग आहेत कीं, त्यांचें स्वरूप, प्रत्यक्ष चोरी करणाऱ्या आडदांड लोकांच्या कृत्यापेक्षां समाजाला अधिक हानिकारक असल्यामुळें अधिक हिडीस समजलें गेलें पाहिजे; परंतु अशा मार्गांचा अवलंब करणारे लक्षाधीश, समाजांत उजळ माथ्यानें वावरतात आणि केवळ पोटाला मिळत नाहीं, म्हणून—आणि तें सुद्धां स्वतःचा कांहींही अपराध नसतां—चोरी करणाऱ्यांना तुरुंगाच्या अनैतिक व अमानुष वातावरणांत खेंचण्यांत येतें. तेथेंही त्यांना सुधारण्याचा प्रयत्न न करतां, त्यांची अधिकच अवनति होईल अशा परिस्थितींत त्यांस ठेवण्यांत येतें. बाहेर आल्यावर त्यांनीं आपलें वर्तन सुधारावें म्हटलें, तरीही समाज त्याला तसें करण्यास मदत किंवा प्रोत्साहन देत नाहीं. तात्पर्य सध्याची समाजस्थिति ज्यांना यदृच्छेनें द्रव्यप्राप्ती झाली आहे, त्यांचें संरक्षण करण्यासच अनुकूल आहे आणि ही

अन्याय्य परिस्थिति एकदा मोडून समाजांतील धनिक लोकांची सत्ता नष्ट झाली, म्हणजे लोकांना दुर्वृत्त होण्याची गरजच उरणार नाहीं. ही धनिक वर्गाची जाचक व जुलमी सत्ता, त्यांच्या हातीं राज्ययंत्र असल्यामुळें उत्पन्न झाली आहे व म्हणून हें राज्ययंत्र एकदा मोडून टाकिलें म्हणजे धनिक वर्गाची सत्ता आपोआपच लयाला जाईल, लोक आपल्या सुखसोयी सहकार्यानें व स्वयंप्रेरणेनें करूं लागतील, ज्याला त्याला आपल्या श्रमाचा मोबदला मिळेल, भौतिक शास्त्रांच्या प्रगतीमुळें वाटेल त्या जमिनींत व हवेंत मनुष्यमात्रांच्या गरजा भागतील इतकें अन्न आणि वस्त्र अगदीं थोड्या श्रमानें मिळूं शकेल आणि असें झालें म्हणजे खून, मारामाऱ्या किंवा चोऱ्या करण्यास कोणीही प्रवृत्त होणार नाहीं. अशी अराजक पंथियांची विचारसरणी आहे.

या विचारसरणींत मुख्य दोष असा आहे कीं, सध्याच्या समाजांतील दुष्ट मनुष्यांच्या दुष्टवृत्तीचा उद्भव सर्वस्वी अन्यायी सामाजिक संस्थामुळेंच होतो असें हे लोक समजतात; पण हें मत एककल्लीपणाचें आहे. समाजांतील व्यक्तीच्या दुष्टवृत्तींना सामाजिक अन्याय कित्येक प्रसंगीं चालना देतात, हें जरी खरें असलें, तरी समाजांत अन्याय्य संस्था निर्माण होण्यास त्यांतील व्यक्तींच्या दुष्ट वृत्तिच कारण होतात हेंही तितकेंच खरें आहे. अर्थात् उलट दृष्टीनें विचार करूं लागलें म्हणजे सामाजिक अन्यायांचा उगमही व्यक्तिगत दुष्ट वृत्तींत आहे, असें सिद्ध होत असल्यामुळें आणि सध्यांच्या परिस्थितींतही सर्व वैयक्तिक गुन्ह्यांची जबाबदारी सामाजिक अन्यायांवर लादतां येत नसल्यामुळें, एकदां क्रांति करून सर्व सामाजिक अन्यायांचा नायनाट केल्यावर मग सरकारची गरज लागणार नाहीं, हें अराजक पंथीयांचें मत साधार ठरत नाहीं. सत्ताभिलाषी उपद्यापी लोकांनीं आपल्या स्वार्थाकरितांच

या युक्तिवादांतील दोष

प्रस्तुत राज्ययंत्रें निर्माण केलीं आहेत, हें अराजकपंथी लोकांचें मत क्षणभर गृहीत धरलें, तरी अशा सत्ताभिलाषी व उपद्यापी लोकांना पुनः तशींच राज्ययंत्रें निर्माण करण्यास कोणती अडचण आहे, या प्रश्नाचें समाधान-कारक उत्तर या लोकांना देतां येत नाहीं. तात्पर्य काम, क्रोध, लोभ, मद, मत्सर इत्यादि षड्रिपूंनीं जोंपर्यंत आपलें ठाणें मानवी अंतःकरणांतून उड-विलें नाहीं, तोंपर्यंत अराजक परिस्थितीची काल्पनिक चित्रें मनश्चक्षूंना कितीही मोहक दिसलीं, तरी ती व्यवहारांत येणें शक्य नाहीं.

आतां अराजक मतानुयायांच्या आणखी एका आक्षेपाचें विवेचन करूं. टॉलस्टॉय प्रमाणें निरपवाद अहिंसा तत्त्व आंगींकारणाऱ्या लोकांचें असें मत आहे कीं, समाजांत दण्डधारी संस्था निर्माण करणें, हा एक अत्याचार आहे व तिच्या योगानें दुष्टांचें दमन न होतां त्यांच्या दुष्टवृत्तींना उलट जास्त चालन मिळतें. महाभारतांतील शांतिपर्वांत युधिष्ठिरानें असाच एक आक्षेप क्षात्रधर्मावर घेऊन

अहिंसा व दण्डनीति यांतील विरोध.

क्षत्राधर्माद्धि पापीयान्न धर्मोऽस्ति नराधिप ।
अपयानेच युद्धे च राजा हान्ति महाजनम् ॥[१]

क्षत्रधर्म हा अत्यन्त पापी धर्म आहे, कारण त्यांत पदोपदीं हिंसा घडत असते. अशा तऱ्हेनें राजधर्माच्या धिःकार केला आहे. परंतु भीष्मांनीं या शंकेचें निवारण केलें आहे. ते म्हणतात[२] " राजामुळेंच पापी लोकांचा निग्रह आणि साधूंचा संग्रह होत असल्यामुळें आणि त्यांच्या मार्फत यज्ञ-

---

१ ज्या अर्थीं युद्धांत किंवा गुप्त छाप्यांत राजाच्या हातून चांगल्या लोकांची हिंसा होत असते, त्या अर्थीं क्षत्रधर्माहून अधिक पापी असा दुसरा धर्म नाहीं.

२ पुढें पहा

दानें होत असल्यामुळें राजे निष्कलंक आणि शुचिर्भूत होत असतात. राजे लोक विजय प्राप्त करण्यासाठीं प्राणीमात्रांना किंवा मनुष्यांना त्रास देतात, हें जरी खरें असलें, तरी विजयप्राप्ती झाल्यानंतर त्यांच्याचमुळें प्रजाजनांची संख्या वाढत जाते. यज्ञ, दान, तपादिकांच्यामुळें पापें नाहींशीं होतात आणि भूतमात्रांवर तें अनुग्रह करीत असल्यामुळें त्यांचें पुण्य वृद्धींगत होत असतें. ज्याप्रमाणें शेताची मशागत करणारा शेतकरी पीक किंवा गवत उपटून टाकतो, पण त्यामुळें धान्याचा नाश होत नाहीं, त्याचप्रमाणें आपल्या शस्त्रमोचनानें राजा वध्यांची हिंसा वारंवार करीत असतो, पण या त्याच्या निष्कृतीमुळें प्राणिमात्रांचा नाश न होतां उलट संवर्धनच होत असतें, किंवा त्यांची संख्या वाढते. जो नेहमी लोकांचें संकटापासून, वधांपासून, क्लेशापासून व चोरांपासून (किंवा शत्रूंपासून) संरक्षण करून प्राणदान करतो, त्या राजाला धनदाता, सुखदाता व पराक्रमी असेंच सम.

---

२ निग्रहेण च पापानां साधूनां संग्रहेण च ।
यज्ञैर्दानैश्च राजानो भवन्ति शुचयोऽमलाः ॥ ३ ॥
उपरुन्धन्ति राजानो भूतानि विजयार्थिनः ।
त एव विजयं प्राप्य वर्धयन्ति पुनःप्रजाः ॥ ४ ॥
अविध्यन्ति पापानि दान यज्ञ तपोबलैः ।
अनुग्रहेण भूतांना पुण्यमेषां विवर्धते ॥ ५ ॥
यथैव क्षेत्र निर्यांता निर्यातं क्षेत्रमेव च ।
हिनस्ति धान्यकक्षं च न च धान्यं विनश्यति ॥ ६ ॥
एवं शस्त्राणि मुञ्चन्तो घ्नन्ति वध्याननेकधा ।
तस्यैषा निष्कृति र्दृष्टा भूतांना भावनं पुनः ॥ ७ ॥
यो भूतानि सदाऽनर्थाद्वधा त्क्लेशाच्च रक्षति ।
दस्युभिः प्राणदानात् स धनदः सुखदो विराट् ॥ ८ ॥
शांतिप० अ० ९७

जलें पाहिजे. " इत्यादि. दुसऱ्या एका ठिकाणीं राजधर्माचेंच वर्णन करीत असतां भीष्माचार्यांनीं

अधर्मरूपो धर्मो हि कश्चिदस्ति नराधिप ।
धर्मरूपो ह्यधर्मश्च तच्चज्ञेयं विपाश्चिता ॥
शांतिपर्व अ. ३२ श्लो. २०

म्हणजे " हें नराधिपा, कित्येकवेळां धर्म हा अधर्मरूपी भासतो व अधर्म धर्माप्रमाणें भासतो, परंतु शाहाण्या मनुष्यानें तें बरोबर ओळखिलें पाहिजे " असें युधिष्ठिरास सांगितलें आहे. भगवद्गीतेंतही

यस्यनाहंकृतो भावो बुध्दिर्यस्य न लिप्यते ।
हत्वाऽपि स इमां ल्लोकान् न हन्ति न निबध्यते ॥

म्हणजे ज्याच्या अंगीं अहंकार उरला नाहीं व ज्याची बुद्धि अगदीं शुद्ध झाली, त्यानें सर्व लोकांची हिंसा केली, तरी त्याच्या हातून हिंसा होत नाहीं, तो त्या पापकर्मानें बद्ध होत नाहीं, असा सिद्धान्त सांगून आत्मज्ञानी सिद्ध पुरुषांनींहि लोकसंग्रहार्थ दण्डधारी बनून क्षात्रधर्म चालू ठेवण्यास हरकत नाहीं, इतकेंच नाहीं तर तो चालू ठेवावा असाच उपदेश अर्जुनास केलेला आहे.

त्यास भगवद्गीतेचें उत्तर.

ख्रिस्ति धर्मांत या निष्काम कर्माचारणाचें तत्त्वज्ञान अंतर्भूत झालें नसल्यानें टॉलस्टॉय सारख्या पापभीरू मनुष्यांपुढें राजधर्माचें किंवा राज्ययंत्राचें समर्थन तिकडच्या लोकांना ख्रिस्ति धर्माला धरून करतां येत नाहीं. साम्यबुद्धि ठेऊन लोकसंग्रहार्थ निष्काम कर्में केलीं असतां, कर्त्याला त्यापासून कसलाहि दोष लागत नाहीं, या नैष्कर्म्यवादाचा अंगिकार केल्याखेरीज राजधर्माचें किंवा राजनीतिशास्त्राचें खरें समर्थन कधींच होणार नाहीं. आणि तें तसें झालें नाहीं तोंपर्यंत थोर मनाचें व उदार बुद्धीचें लोक राज्ययंत्र चालविण्यास तयार होणार नाहींत. अर्थात् तोंपर्यंत

राज्ययंत्रावर स्वार्थी, उपद्व्यापी व परोपघातक लोकांचाच ताबा चालणार. राज्ययंत्रांत कितीहि यांत्रिक सुधारणा केल्या तरी त्यांचे चालकत्व जोंपर्यंत जनक, युधिष्ठारासारख्या राजर्षींच्या हातीं आलें नाहीं, तोंपर्यंत त्या सुधारणा फोल आहेत. अशा राजर्षींनीं पूर्णपणें दण्डनीतिला धरून वर्तन केलें असतां कृतयुगाचा काल प्राप्त होतो असें महाभारतांत सांगितलें आहे. हें सापेक्ष कृतयुग बराच काळ टिकून लोकांची नैतिक व अध्यात्मिक उन्नति बरीच झाली आणि लोकांना स्वभावतःच धर्मानें वागण्याची सवय लागली म्हणजे फार प्राचीनकाळीं असणारी जी निरपेक्ष कृतयुगाची अराजक स्थिति महाभारतांत वर्णन केली आहे, ती प्राप्त होऊं शकेल. त्या स्थितीचें वर्णन पुढीलप्रमाणें केलें आहे.

नैव राज्यं न राजाऽसीन्न च दण्डा न दाण्डिकः ।
धर्मेणैव प्रजाः सर्वा रक्षन्ति स्म परस्परम् ।। शांतिपर्व अ. ५८ श्लो. १४

असो. सध्याच्या परिस्थितींत अराजक मतांचा सर्वस्वी स्वीकार करणें अशा प्रकारें अयुक्त ठरलें तरी त्यांच्या विचारांपासून बराच बोध घेण्यासारखा आहे.

अराजक मतांपासून घेण्याचा बोध.

तात्त्विकदृष्ट्या लोकांचें अंतर्गत व बाह्य शत्रूंपासून रक्षण करणें हें जरी सरकारचें कर्तव्य असलें, तरी समाजांत एकदा दंडशक्तीचें संघटन झालें म्हणजे तिचें धर्मस्वरूप कायम ठेवणें अत्यंत बिकट कार्य आहे. "आर्तत्राणाय वः शस्त्रं न प्रहर्तुं मनागसि" या नियमाचें उल्लंघन कधींहि न करणारें असें एक तरी सरकार आज आपणांस पृथ्वीच्या पाठीवर दाखवितां येईल काय? मानवी अंतःकरणांतील पाशवीवृत्तींचें दमन करण्यासाठीं निर्माण झालेली ही दैवी दण्डशक्ति, जर सर्वत्र पाशवीशक्तीच्या स्वरूपानेंच वावरतांना दिसत असेल, तर तिचें हें आसुरी किंवा सैतानी स्वरूप नष्ट होईल अशी आशा बाळगण्यास खरोखर कितीसा आधार आहे? अशा तऱ्हेच्या संश-

त्याच्या भोवऱ्यांत मनुष्य सांपडला म्हणजे त्याची प्रवृत्ति अराजक पंथाकडे होणें साहजिक आहे. पण हा निष्कर्षही तर्कदृष्ट्या सयुक्तिक नाहीं. धर्माचें साधन म्हणून आपल्या हातीं आलेलें देहयंत्र बहुतेक लोक अधर्माचें साधन बनवितात, म्हणून त्याचा नाश करणें हा ज्या प्रमाणें अविचार आहे, कारण तसें केल्यास आत्महत्येचें पाप लागून आहे त्यापेक्षांही हीन दर्जाचें देहयंत्र आपणास मिळून आपला जन्म तिर्यग्योनींत होईल असें धर्मशास्त्र सांगतें, त्याचप्रमाणें बहुतेक देशांत आज जीं राज्ययंत्रें आहेत त्यांचा अधर्माकडे उपयोग केला जातो, म्हणून आम्हाला राज्ययंत्रच नको असें म्हणणें असमंजस आहे, असें राजनीतिशास्त्र सांगते. तथापि: राज्यांतील अपराधांची संख्या वाढल्यास त्याची जबाबदारी राजावर किंवा राज्ययंत्रावर आहे, समाजांतील पुष्कळ गुन्ह्यांची जबाबदारी अन्याय्य सामाजिक संस्थांवर असते, याकरितां सामाजिक विषमता शक्य तितकी कमी केली पाहिजे, दुराचारी लोकांचें दमन करतांना केवळ सूडाची भावना न ठेवतां त्यांच्या सुधारणेचे शक्य तितके उपाय योजिले पाहिजेत, केवळ कडक शिक्षेनें मनुष्यांची सुधारणा होणें शक्य नाहीं, वगैरे बऱ्याच गोष्टी अराजक पंथीयांच्या विचारांतून आपणास ग्रहण करण्यासारख्या आहेत. तसेंच राज्ययंत्राची कितीही सुधारणा झाली तरी त्यांत कांहीं तरी दोष नेहेमींच असतात व म्हणून सरकारच्या हातीं असणाऱ्या या सत्तीच्या शक्तीचा उपयोग फारच सावधगिरीनें केला पाहिजे. लोक स्वयंप्रेरणेनें आपल्या उन्नतीचा जितका मार्ग आक्रमतील, तितकें श्रेयस्कर समजलें पाहिजे. आज पाश्चात्य देशांत अत्यंत सुधारलेली समजण्यांत येणारी प्रातिनिधिक लोकसत्ता पाहिली, तरी तिच्यांतही मूलभूत असे कांहीं दोष आहेत. सार्वजनिक निवडणुकींत यशस्वी झालेले उमेदवारच राज्ययंत्रावर ताबा ठेवण्यास लायक असतात, व सर्व गोष्टींचा निर्णय बहुमतानें व्हावा, वगैरे प्रातिनिधिक राज्यपद्धतीचीं आद्य तत्त्वेंही निरपवाद नाहींत, हें पाश्चात्य लोकांना आज पटूं लागलें

असून त्यांच्याबरची प्रातिनिधिक राज्यपद्धतीची मोहिनी आज उतरत आहे. आणि बऱ्याच विचारी लोकांना राज्ययंत्राची जरी आवश्यकता भासत असली तरी त्याचें कर्तव्य-क्षेत्र अत्यंत मर्यादित असावें असे ते लोक आज म्हणत आहेत. अलीकडे बरेच प्रसिद्धीस आलेले इंग्लिश तत्त्वज्ञ बर्ट्रंड रसेल, यांची विचारसरणी अशीच आहे.[१] राज्ययंत्राच्या कार्यक्षेत्राच्या मर्यादेचा प्रश्न फार महत्त्वाचा असल्यामुळें त्याचें विवेचन स्वतंत्रपणें पुढील प्रकरणांत करणेंच इष्ट होईल.

---

१ प्रातिनिधिक राज्यपद्धतीबद्दलचे आणि राज्ययंत्राच्या कार्यक्षेत्रासंबंधींचे बर्ट्रंड रसेल यांचे विचार पुढें दिले आहेत.

" It is undeniable, that to all who care for progress, actual experience of democratic representative government, is very disullusioning. " Roads to Freedom P. 138.

" But granting that the State, in some form must continue, we must also grant, I think, that its powers ought to be very strictly limi e l to what is absolutely necessary ....The State, though at present a source of much evil, is also a means to certain good things, and will be needed so long as voilent and destructive impulses remain common. But it is *merely* a means, and a means which needs to be very carefully and sparingly used if it is not to do more harm than good. "

Roads to Freedom P. 144-145
by Bertrand Russell.

प्रकरण २ रें.

राज्ययंत्राचें कार्यक्षेत्र.

" रक्षणं सर्वभूतानां इति क्षात्रं परं मतम् । "[1]

शांतिपर्व.

" प्रजानां विनयाधानाद्रक्षणाद्भरणादपि ।
स पिता पितर स्तासां केवलं जन्महेतवः ॥ "[2]

रघुवंश कालिदास.

प्रकरणाचा विषय.

राज्ययंत्राच्या घटनेचा विचार सुरू करण्यापूर्वी राज्ययंत्राच्या कार्यक्षेत्राचा विचार करणें अवश्य आहे. कारण प्रथम साध्याचा निश्चय झाल्याखेरीज साधनाचें स्वरूप निश्चित करणें शक्य नाहीं. राज्ययंत्राचें किंवा राजाचें आद्य कर्तव्य लोकांचें संरक्षण करणें हें आहे, याबद्दल कोणासही संशय उत्पन्न होणें शक्य नाहीं. परंतु हें आद्य कर्तव्य उत्तम प्रकारें पार पाडण्याकरितां आणि इतर तऱ्हेनें लोकांचें हित साध्य होण्याकरितां या राज्ययंत्रामार्फत दुय्यम कार्यें कोणतीं, तीं कितपत व कशीं करून घ्यावीं, याबद्दल मतभेद होण्यास पुष्कळ अवकाश आहे. गेल्या शतकांत युरोपियन राजनीतिज्ञांत या संबंधींच्या मतभेदाचीं बरींच रणें पडून समाजसत्तावादी व व्यक्तिस्वातंत्र्यवादी असे दोन प्रमुख पक्ष अस्तित्वांत आले व ते अद्यापि कायम

१ सर्व भूतांचें रक्षण करणें, हेंच श्रेष्ठ क्षत्रियत्व आहे.

२ प्रजांचें शिक्षण, रक्षण आणि भरणही तो करीत असल्यामुळें तोच त्यांचा खरा पिता होता. त्यांचे आईबाप हे केवळ जन्मदाते होते.

आहेत. या दोन्ही पक्षांच्या मतांची माहिती देऊन त्यांचा सारासारविचार या व पुढील प्रकरणांत वाचकांपुढें मांडावयाचा आहे. गेल्या पन्नाससाठ वर्षांतील युरोपीयन राजशास्त्रज्ञांच्या विचारांचें परिवर्तन पाहिल्यास असें दिसून येतें कीं, सुमारें पन्नास वर्षांपूर्वीं या विषयांसंबंधींच्या राजकीय विचारांचा लंबक व्यक्तिस्वातंत्र्यवादाला सोडून राज्ययंत्राचें कार्यक्षेत्र विस्तृत करावें असें म्हणणाऱ्या समाजसत्तावादाकडे झुकूं लागला, तो कांहीं वर्षें तसाच पुढें जाऊन तें कार्यक्षेत्र शक्य तितकें विस्तृत करावें या मताला जाऊन पोहोंचला. परंतु आज तोच लंबक समूहस्वातंत्र्यवाद्यांनीं पुनः पूर्वस्थळावर आणून सरकारचें कार्यक्षेत्र शक्य तितकें संकुचित करावें किंवा हुना सरकार ही संस्थाच नष्ट करावी अशा मताच्या थराला आणून ठेविला आहे. पन्नास वर्षांपूर्वीं सरकारचें कार्यक्षेत्र वाढवूं नये म्हणणाऱ्यांची जुन्या लोकांत गणना होत होती व सरकारनें प्रजाजनांची सर्व पितृकर्तव्यें करावींत असें प्रतिपादणाऱ्यांची गणना सुधारकांत होत असे. आज राज्ययंत्राच्या कार्यक्षमतेवर विश्वास असणाऱ्यांना पुराणप्रिय समजतात व राज्ययंत्रावर अश्रद्धा असल्यामुळें ह्याची गरज नाहीं असें ध्वनित करणाऱ्यांची गणना फार पुढारलेल्या सुधारकांत होत असते, असें एका इंग्रज ग्रंथकारानें म्हटलें आहे.[१]

व्यक्तिस्वातंत्र्यवादाचा उदय अठराव्या शतकाच्या अखेरीस

---

१ अर्नेस्ट बार्कर हे यासंबंधीं लिहितातः—

" While in 1864 orthodoxy meant distrust of the [illegible], and heresy took the form of a belief in paternal government, in 1914 orthodoxy means belief in the state, and heresy takes the form of mild excursions into anarchism. "

Political Thought from Spencer to to-day. P.23.

व्यक्तिस्वातंत्र्य-
वादाचे युक्तिवाद.

होऊन एकोणीसाव्या शतकाच्या मध्या-पर्यंत त्याची विशेष चलती होती. व्यक्तिस्वातंत्र्यवादी पक्षाचें म्हणणें, राज्य-यंत्रें केवळ लोकांच्या जीविताचें व मालमत्तेचें संरक्षण करण्याकरितांच स्थापन झालेली असल्यामुळें सरकारनीं व्यक्तीच्या इतर व्यवहारांत विशेष ढवळाढवळ न करतां देशांत शांतता व सुव्यवस्था राखून परचक्रापासून राष्ट्रांतलि लोकांचें संरक्षण करण्याचेंच तेवढें कार्य तटस्थपणें करावें. लोकांच्या सामाजिक, धार्मिक किंवा आर्थिक व्यवहारांत सरकारांनीं हात घातल्यास त्यापासून लोकांचें खरें व कायमचें हित होत नाहीं. अठराव्या शतकाच्या अखेरीस राजशास्त्र, अर्थशास्त्र व समाजशास्त्र या तिन्ही शास्त्रांतलि तज्ञांनीं हा सिद्धान्त मान्य करून त्याचा जोरानें पुरस्कार केला होता. फ्रेंच राज्यक्रांतीनंतर लोकसत्तेची जी लाट बहुतेक युरोपियन देशांत उसळली तिचा व्यक्तिस्वातंत्र्यावर विशेष जोर होता. व्यक्ति स्वातंत्र्यवाद आणि लोकसत्तावाद हीं दोन्ही तत्त्वें कांहीं काळ एकरूपच बनलीं होतीं. प्रत्येक व्यक्तीला तिच्या आर्थिक, सामाजिक व धार्मिक व्यवहारांत शक्य तितकें स्वातंत्र्य देऊन प्रत्येकाचा भाग्योदय स्वतःच्या प्रयत्नावर अवलंबून ठेवणें हेंच लोकसत्तेचें आदितत्त्व मानण्यांत येत होतें. राजकीय तवत्ज्ञांप्रमाणें यावेळचे अर्थशास्त्रज्ञही व्यक्तिस्वातंत्र्यवा-दीच होते. फ्रेंच राज्यक्रांती पूर्वीं त्या देशांत फिजिओक्रॅट्स्(Physiocrats) नांवाचे अर्थशास्त्रज्ञ होऊन गेले. रूसो सारखे राजकीय सुधारक लोकसत्तेच्या तत्त्वाचा पुरस्कार करीत असतांना सरकारचें कार्यक्षेत्र योग्य मर्यादेंत संकुचित केल्यानें सर्व सार्वजानिक आपात्ति दूर होतील अशा मतांचा हे पुरस्कार करीत होते. त्यांना राज्यघटना सुधा-रण्याची विशेष मातब्बरी वाटत असून राज्ययंत्राचें कार्यक्षेत्र मर्यादित करण्याचें त्यांना फार महत्त्व वाटत होतें. कायदे करणें हें सरकारचें कार्य

नाहीं, लोकांच्या जीविताचें व मालमत्तेचें संरक्षण करण्यापलीकडे त्यांनीं त्यांच्या कोणत्याही व्यवहारांत हात घालूं नये, वगैरे त्यांचीं मतें सुप्रसिद्ध आहेत. या नंतर ॲडम स्मिथ, रिकॅर्डो, माल्थस वगैरे अर्थशास्त्रज्ञ इंग्लंडांत झाले व त्यांनीं आर्वाचीन युरोपियन अर्थशास्त्राचा पाया घातला. त्यांचाहि बहुतेक सर्व भर व्यक्तिस्वातंत्र्याच्या तत्त्वावरच होता. त्यांच्या मतानेंही सरकारनें समाजाच्या आर्थिक व्यवहारांत पूर्ण तटस्थ धोरण स्वीकारावें असें होतें. प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ हर्बर्ट स्पेन्सर यानें समाजशास्त्रांत याच तत्त्वाचा विशेष गौरव केला. जीव कोटींची उत्क्रांति जगांतील जीवनकलहाच्या तीव्रतेमुळेंच होत असते या प्राणिशास्त्रांतील सिद्धान्ताच्या दृष्टान्तावरून समाजांतील व्यक्ति व्यक्तींमधील जीवनकलह अव्याहत चालू देण्यानेंच नालायक व्यक्तींचा अंत होऊन समाजांत लायख व्यक्तींची संख्या वाढते व त्यामुळें समाजाचें खरें हित होतें, असा सिद्धान्त स्पेन्सरनें लोकांपुढें मांडिला. तसेंच सरकारनीं आपल्या कर्तव्याची मर्यादा वाढवून समाजोपयोगी किंवा नीतिसंवर्धक कार्यांचा भार आपल्या शिरावर घेतल्यास लोक परावलंबी व दुर्बल बनतात म्हणून सरकारनीं त्यांचीं सर्व पितृकर्तव्यें उरकण्याच्या उपद्यापांत न पडतां त्यांचा उद्धार त्यांसच स्वावलंबनानें करूं द्यावा असें स्पेन्सर साहेबाचें मत होतें. तात्पर्य एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत प्रजाजनांच्या जीविताच्या व मालमत्तेच्या संरक्षणापलीकडे इतर कोणतेंही कार्य राज्ययंत्रावर लादूं नये किंवा सरकारनें अंगिकारूं नये, हें मत राजशास्त्र, अर्थशास्त्र व समाजशास्त्र यांतील बहुतेक तज्ञांस मान्य झालें होतें.

व्यक्तिस्वातंत्र्यवाद व समाजसत्तावाद यांतील मतभेद मुख्यतः आर्थिक स्वरूपाचा आहे म्हणून अर्थशास्त्रांतील व्यक्तिस्वातंत्र्यवादाचें थोडें सविस्तर वर्णन व इतिहास येथें देणें

व्यक्तिस्वातंत्र्य-वादाची उत्पत्ति कशी झाली?

अवश्य आहे. प्रथमतः ज्या परिस्थितींत हा पक्ष उदयास आला त्या परिस्थितीचें योग्य ज्ञान झालें पाहिजे. अठराव्या शतकाच्या अखेरीस युरोपांतील बहुतेक देशांतील राजे व्यापाराच्या कामीं अयोग्य ढवळाढवळ करीत असत. अमेरिकेंतील वसाहतींतील व आशिया खंडांतील लोकांचा सर्व व्यापार आपल्या राष्ट्राच्या हातीं असावा याबद्दल त्यांचे सारखे प्रयत्न चालू असत. वसाहतींतील लोकांनीं कच्चा माल उत्पन्न करावा व तो आपल्या देशांत पाठवावा व आपण त्याचा पक्का माल बनवावा, परंतु पक्का माल बनविण्याचे उद्योगधंदे त्यांनीं स्थापूं नयेत, असें इंग्लंडसारख्या औद्योगिक उन्नतीच्या मार्गें लागलेल्या देशांतील राज्यकर्त्यांना वाटत असे व त्याकरितां ते कायद्यांचे कृत्रिम उपाय योजीत असत. देशांतल्या देशांतही एका भागांतून दुसऱ्या भागांत मालाची नेआण करणाऱ्या व्यापाऱ्यांना फ्रान्ससारख्या देशांत जबर जकाती द्याव्या लागत. याशिवाय मध्य युगांतील व्यापारी व औद्योगिक संघ या संस्था कोणत्या व्यवसायांत कोणते लोक असावेत, त्यांनीं आपापले उद्योगधंदे कसे करावेत यांसंबंधी नियम घालून देऊन व्यक्तींच्या आर्थिक व्यवहारांचे नियमन करीत असत. याच सुमारास उद्योगधंद्याच्या कामीं वाफेच्या शक्तीचा उपयोग करण्याचा शोध लागून घरगुती धंद्यांची पद्धति मोडून गिरणीची पद्धति सुरू झाली. यामुळें औद्योगिक बाबतींत फार मोठी क्रान्ति होण्याचा काळ आला आणि या क्रांतीच्या मार्गांत पूर्वापार चालत आलेली सामाजिक व राजकीय बंधनें अडथळा करूं लागलीं. इंग्लंडांत ॲडॅम स्मिथ हा अर्थशास्त्रज्ञ होऊन गेला त्यावेळीं या औद्योगिक क्रांतीचीं नुकतीं कोठें पूर्वचिन्हें दिसूं लागलीं होतीं. अर्थात् त्याला तिचें खरें स्वरूप कळणें शक्य नव्हतें. तथापि पूर्वींचीं बंधनें व्यक्तीस्वातंत्र्याला व औद्योगिक प्रगतीला जाचक होत आहेत याची त्याला पूर्ण जाणीव झाली होती. ॲडॅम स्मिथ यानें औद्यो-

गिक क्रांतिच्या पूर्वीं व्यक्तीस्वातंत्र्याच्या तत्त्वावर अर्थशास्त्राचा पाया घालून प्रजाजनांच्या आर्थिक व्यवहारासंबंधी सरकारनें सामान्यतः तटस्थ धोरण स्वीकारावें असें मत प्रतिपादन केलें. यानंतर रिकॅर्डो व माल्थस यांनींही अर्थशास्त्राची हीच परंपरा कायम ठेविली व औद्योगिक क्रांतीमुळें अस्तित्वांत आलेल्या सामाजिक अन्यायांचे नियमन करण्यासाठीं अवश्य झालेल्या सामाजिक बंधनांकडे अगदीं दुर्लक्ष केलें, किंबहुना अशीं बंधनें घालूं इच्छिणाऱ्यांना व्यक्तिस्वातंत्र्याच्या नांवावर विरोध केला. या अर्थशास्त्रज्ञांचा सर्व भर व्यक्तिस्वातंत्र्य, व्यापारांतील व उद्योगधंद्यांतील लोकांची स्पर्धा आणि सरकारचें तटस्थ धोरण, या तत्त्वांवर होता.

व्यक्तिस्वातंत्र्यवादाचे मूलभूत सिद्धान्त.

प्रत्येक व्यक्तीला आपलें आर्थिक हिताहित इतरांपेक्षां व सरकारपेक्षां अधिक कळतें आणि समाजांतील सर्व व्यक्तींना आपल्या हितावर नजर देऊन आपलें जास्तींत जास्त सांपत्तिक हित साधण्याचा प्रयत्न करूं दिल्यानेंच एकंदर समाजाची सांपत्तिक भरभराट होणें शक्य आहे. या दोन मूलभूत सिद्धान्तांवर व्यक्तिस्वातंत्र्यावदाची उभारणी झालेली आहे. प्रत्येक मनुष्याला आपलें आर्थिक हित कशांत आहे, हें समजत असल्यामुळें ज्या मालाला बाजारांत खप असेल तो माल उत्पन्न करण्यांतच पुष्कळ लोक आपल्या श्रमाचा व भांडवलाचा विनियोग करतात व ज्या मालाला खप नाहीं त्याच्या निपजेंतून आपलें भांडवल काढून घेतात. या कामीं सरकारनें एखाद्या मालाच्या निपजेला कृत्रिमतेनें उत्तेजन देण्यापासून समाजाचा फायदा न होतां उलट घोटाळा होण्याचा संभव आहे, असें तें म्हणत. मालाच्या किंमतीच्या बाबतींतही सरकार तटस्थ राहून व्यापाऱ्यांतील चढाओढीस योग्य अवकाश देईल तर गिऱ्हाइकांच्या पदरांत आपोआप स्वस्त व

मनपसंत माल पडेल. हीच गोष्ट कामकरी लोकांच्या मजुरीला लागू आहे. मजुरांची संख्या आणि आणि त्यांच्या मजुरीसाठीं कारखानदारांजवळ असलेला पैसा (Wages-fund) यांच्यांतलि प्रमाणावर मजुरीचा दर अवलंबून असतो. यांत सरकारनें हात घालणें योग्य नाहीं. या कामांत सरकारनें हात घातल्यास मजुरांच्या व कारखानदारांच्या करारस्वातंत्र्यावर गदा येते. परराष्ट्रीय व्यापारासंबंधींहि सरकार तटस्थ राहील तर जो माल ज्या देशांत उत्पन्न करणें अत्यंत सोयीचें असेल तो माल तेथें उत्पन्न होऊं लागेल व इतर माल दुसऱ्या देशांतून आणिला जाईल. अशा प्रकारें राष्ट्राराष्ट्रांत श्रमविभागाचें तत्त्व अमलांत येऊन सर्वांचीच सोय होईल व जगांत शांतता नांदूं लागेल. आपल्या देशांत अमुक एक धंदे असलेच पाहिजेत म्हणून बाहेरून येणाऱ्या तसल्या मालावर संरक्षक जकाती ठेविल्यास लोक आपणास जास्त किफायतशीर असणाऱ्या धंद्यांतील भांडवल काढून कमी किफायतशीर धंद्यांत गुंतवितात. यामुळें राष्ट्रांतील द्रव्यबल व श्रमशक्ति यांचा व्हावा तितका फायदेशीर विनियोग होत नाहीं. दारिद्र्यनिवारण, लोकशिक्षण या सारखीं लोकोपयोगीं कार्यें सरकारनें स्वतः अंगावर न घेतां तीं लोकांची लोकांसच करूं दिल्यानें लोकांचें हित होतें व लोक उद्योगी व स्वावलंबी बनतात. पोस्ट, तारायंत्र, रेलवे, आरोग्य या सारख्या संस्थांमार्फत होणाऱ्या लोकांच्या सोयी खाजगी भांडवलवाल्यांनींच कराव्यात असें त्यांस वाटत असे. सारांश लोकांच्या जीविताच्या व मालमत्तेच्या संरक्षणापलीकडे सरकारनें आपलें कर्तव्यक्षेत्र वाढवूं नये हा सिद्धान्त एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत सर्वमान्य नसला तरी बहुमान्य झाला होता.

या सर्व मतांचा परिणाम इंग्लंडांतील राजकरणावर बराच झाला. एलिझाबेथच्या आमदानीपासून अमलांत असलेले मजुरी संबंधीचे कायदे (१८१३–१४ मध्यें) रद्द करण्यांत आले.

व्यक्तिस्वातंत्र्यवादाला मान्यता व त्याचे इष्ट परिणाम.

तसेंच मजुरांच्या स्थानत्यागावरील कायदेशीर निर्बंध काढून टाकण्यांत आले. मात्र मजुरांच्या संघ स्वातंत्र्यावरील कडक निर्बंध किंचित्ही शिथिल करण्यांत आले नाहींत. यामुळें यार्कशायर व लँकेशायर मधील कोळशाच्या खाणींजवळ गिरण्यांना वाटेल तितकें मजूर वाटेल त्या अटीवर मिळण्याची सोय झाली. आगगाड्या, आगबोटी वगैरें दळणवळणाचीं साधनें वाढल्यामुळें बाजारपेठेचें क्षेत्र वाढून जगडव्याळ व्यापाराची सोय झाली आणि स्थानिक मागणीच्या अनुरोधानें मालाची निपज होणें बंद पडून वाटेल तितका माल खपण्याची आशा व्यापाऱ्यांना व कारखानदारांना वाटूं लागली. याच वेळीं खुल्या व्यापाराचें तत्त्वही इंग्लिश सरकारनें मान्य केल्यामुळें परदेशांतून कच्चा माल आणून पक्का माल इतर देशांतील लोकांच्या पदरांत बांधण्याच्या किफायतशीर धंद्याला पुष्टी मिळाली व राष्ट्रिय संपत्तीची अतोनात वाढ झाली. अशा प्रकारें इंग्लंड देश उद्योगधंद्यांत फार पुढारला व त्यानें इतर सर्व युरोपीयन देशांना औद्योगिक प्रगतींत मागें टाकिलें.

पण या औद्योगिक व सांपत्तिक उन्नतीबरोबरच सामाजिक विषमता, मजूर वर्गाचें दारिद्य व हाल, शहरांतील रोगट वसति, स्त्रियांवर गिरणींतील कामाचें ओझें, गृहसौख्याची नासाडी, चाळींतील संकुचित जागेंत स्त्रीपुरुषांची एकत्रवसति झाल्यामुळें झालेला अनीतीचा प्रसार, अज्ञानदशेंतील अर्भकांवरील गिरणींतील कामाच्या ओझ्यामुळें होणारा राष्ट्रीय शरीरसंपत्तीचा नाश, वगैरे अनेक सामाजिक आपात्ति यावेळीं इंग्लंडवर ओढवल्या. औद्योगिक क्रांति हेंच या सर्व आपत्तींचें मूळ होतें. या क्रान्तीमुळें उद्योगधंद्यांचें घरगुती व वैयक्तिक स्वरूप नष्ट होऊन त्यांना कारखान्याचें व

व्यक्तिस्वातंत्र्य वादाचे अनिष्ट परिणाम.

सामुदायिक स्वरूप प्राप्त झालें होतें; परंतु संपत्त्युत्पादनांच्या साधनांची मालकी मात्र व्यक्तीकडेच राहिली होती. यामुळें संपत्त्युत्पादनांच्या साधनांचे मालक व चालक असे दोन पृथक वर्ग समाजांत निर्माण होऊन मालकांना नफा आणि चालकांना श्रम अशी विभागणी होऊं लागली. पूर्वीचे लहान प्रमाणावरचे संपत्त्युत्पादनांच्या साधनाचे मालक व स्वतंत्र चालक मोठ्या भांडवलवाल्यांचे आर्थिक गुलाम बनले आणि जड वस्तूंच्या विक्रयाप्रमाणें त्यांच्या श्रमशक्तीचा उघड विक्रय अर्थशास्त्रांतील स्पर्धेच्या तत्त्वावर होऊं लागला. या स्पर्धेच्या क्षेत्रांत अल्पवयी मुलें व स्त्रियाही ओढल्या गेल्या. सातआठ वर्षांच्या लहान कोंवळ्या अर्भकांना गिरण्यांत किंवा कोळशांच्या खाणींतील रोगट हवेंत बारा ते सोळा तास काबाडकष्ट करावें लागत. या शोचनीय स्थितींतून मजुरांची मुक्तता अंशतः तरी करावी म्हणून कोणी कांहीं कायद्यांचा मसुदा घेऊन सरकारकडे दाद मागितल्यास व्यक्ति-स्वातंत्र्याच्या नांवावर ती दाद घेण्याचें सरकार नाकारीत असे. मजुरांच्या शारीरिक आरोग्याची व पोटाच्या प्रश्नांची जर ही स्थिति, तर शिक्षणाचें तर नांवच काढावयास नको. या वेळच्या इंग्लिश लोकांच्या औद्योगिक उन्नतीबद्दल फिलिप स्नोडन हे ग्रंथकार म्हणतात "त्या काळचें ब्रिटनचें व्यापारी महत्त्व किंवा वर्चस्व, जगताला अवगत असलेल्या कोणत्याही प्रकारच्या गुलामगिरीपेक्षां अधिक हीन अशा गुलामगिरीवर उभारलेलें होतें. या गुलामगिरीचें वास्तविक स्वरूप तर निंद्य होतेंच पण तिची व्यक्तिस्वातंत्र्याच्या नांवावर प्रशंसा होत असल्यामुळें तें स्वरूप अधिकच निंद्य समजलें पाहिजे."[१]

("1 The commercial greatness of Britain was built up in those days by an industrial slavery worst than any chattee -slavery the world had ever

वरील सामाजिक आपत्तींच्या निवारणांकडे लोकांचें लक्ष जाऊं लागल्यानंतर समाजसत्तावाद्यांचा पंथ अस्तित्वांत आला व त्यानें या सर्व सामाजिक आपत्तींचा नायनाट करण्याचा विडा उचलला. या पंथाखेरीज कार्लाईल, रस्किन वगैरे वाङ्मयोपासकांनींही या सामाजिक अन्यायाकडे लोकांचें चित्त वेधून घेतलें होतें. रस्किन् यानें रिकार्डो प्रभृति अर्थशास्त्रज्ञांच्या अर्थशास्त्रावर उघड टीका करण्यास सुरुवात करून राष्ट्रांतील केवळ जड संपत्तीच्या वाढीपेक्षां शारीरिक व नैतिक संपत्तीच्या वाढीला विशेष महत्त्व दिलें पाहिजे आणि अर्थशास्त्रांतही नैतिक विचारांना स्थळ मिळालें पाहिजे;हीं तत्त्वें लोकांच्या मनावर बिंबविलीं. संपत्तीच्या वाढीपेक्षां तिचा विनिमय व उपभोग कसा होतो हें पाहाणें विशेष महत्त्वाचें आहे व वस्तूची किंमत तिच्या उपयुक्ततेवर असते, या सिद्धान्तांची जाणीव अर्थशास्त्रज्ञांना करून दिली. तसेंच सामाजिक आपत्तींच्या निवारणार्थ सरकारची मदत घ्यावी व लोकांनीं परस्पर विनाशक अशा स्पर्धेच्या तत्त्वाला सोडून सहकार्याच्या तत्त्वाचा अवलंब करावा असें त्यानें प्रतिपादिलें. " नियंत्रण आणि सहकार्य हीं तत्त्वें जीवनपोषक असून अनियंत्रण व स्पर्धा हीं तत्त्वें जीवनविनाशक आहेत " असें तो म्हणे.[१] तथापि रस्किन हा समाजसत्तावादी नव्हता.त्या पंथाचा खरा प्रस्थापक कार्ल मार्क्स हा जर्मनींत

समाजसत्तावादाचा प्रस्थापक कार्ल मार्क्स

known–worse in its actual deeds, infinitely worse because it was glorified as individual liberty." Socialism & Syndicalism;by Philip Snowden P. 49

1" Government and cooperation are the laws of life; anarchy and competition the laws of death "

Ruskin.

झाला. यानें एकंदर तीन तत्त्वें प्रामुख्यानें पुढें आणिलीं. (१) मानवी संस्कृतीचा पाया त्यांच्या आर्थिक परिस्थितीवर असतो, या तत्त्वाच्या दृष्टीनें इतिहासाचा अभ्यास केला पाहिजे. समाजांत नेहेमी एक आईतखाऊ व एक कष्टाळु असे दोन वर्ग अस्तित्वांत असतात आणि मानवी इतिहासांतील बहुतेक भाग या दोन सामाजिक वर्गांतील लढ्यानेंच व्यापिलेला आहे. सध्यां हा लढा भांडवलवाले व कामकरी यांच्यांतील तंटयांच्या स्वरूपानें समाजापुढें आलेला आहे. (२) औद्योगिक क्रांति होतां होतां समाजांतील मध्यम वर्ग अजीबात नष्ट होऊन एका बाजूला भांडवलवाल्यांचा एक अल्पसंख्याक धनिक वर्ग आणि दुसऱ्या बाजूला मजुरांचा बहुसंख्याक निर्धन वर्ग असे दोन तट प्रत्येक देशांत होतील व अखेरीस मजुरांचा बहुसंख्याक पक्ष संपत्त्युत्पादनाची सर्व साधनें अल्पसंख्याक भांडवलवाल्यांच्या हातून जबरीनें काढून घेईल आणि या सामाजिक क्रांतीचें पर्यवसान समाजसत्तावादांत होईल. (३) कार्ल मार्क्स याची तिसरी कल्पना म्हणजे पदार्थांच्या किमतींतील वाढाव्याची (Surplus value) कल्पना होय. निसर्गदत्त कच्च्या मालाचा पक्का माल बनवितांना त्यावर जे श्रम करावे लागतात त्यावरच त्या मालाची खरी किंमत अवलंबून असते, या रिकार्डोच्या कल्पनेवर किमतींतील वाढाव्याची कल्पना उभारलेली आहे. वस्तूची किंमत ती निर्माण करण्यास लागणाऱ्या श्रमावर अवलंबून असल्यामुळें कारखान्यांतील सर्व नफा खरोखर त्यांत काम करणाऱ्या लोकांना मिळावयास हवा असें मार्क्स याचें मत आहे. परंतु सध्याच्या भांडवलप्रधान समाज व्यवस्थेमुळें या नफ्यांतील बराच भाग व्याज, जमिनीचा खंड व नफा या रूपानें आईतखाऊ भांडवलवाला धनिक वर्ग उपटतो असा मार्क्सचा प्रस्तुत समाजस्थितीवर आक्षेप आहे. भांडवलवाले लोक बाजारभावानें मजुरांची व कामकऱ्यांची श्रमशक्ति विकत घेतात आणि त्यामुळें उत्पन्न झालेला माल बाजार भावानें विकतात

व या दोहोंमधील अंतर आपण घेतात. भांडवलवाल्याच्या दृष्टीनें मजूर हीं केवळ यंत्रें आहेत आणि हीं यंत्रें दुरुस्त राहून कार्यक्षम राहण्या इतक्याच किमतीला विकत घेण्याचा त्यांचा हेतु असतो. हा त्यांचा हेतु मजुरांतील परस्पर स्पर्धेमुळें पूर्णपणें सिद्धीस जातो.

कार्ल मार्क्स यांच्या वरील तीनही सिद्धान्तांत अतिशयोक्ति व एकांगिपणा हे दोष आहेत असे आजचे बहुतेक समाजसत्तावादी लोक समजतात. मार्क्सनें वर्तविलेलें सामाजिक क्रान्तीचें भविष्य खरें न ठरतां समाजसत्तावादाची स्थापना प्रत्येक देशांत उत्क्रान्ति तत्त्वानुसार हळूं हळूं व शांततेनें व्हावी अशा हेतूनें मार्क्सनंतर थोड्याच काळांत एक उत्क्रांतिवादी समाजसत्तावादी पक्ष बहुतेक युरोपियन देशांत एकोणिसाव्या शतकांच्या उत्तरार्धांत अस्तित्वांत आला. जर्मनींतील सोशल डेमोक्रॅटिक पक्ष आणि इंग्लंडांतील फेबियन सोशॅलिस्ट पक्ष हे असेच उत्क्रान्तिप्रिय समाजसत्तावादी पक्ष होत. फेबियन सोशॉलिस्ट पक्षाचे मुख्य प्रवर्तक सिडने वेब हे आहेत. याशिवाय एच्. जी. वेल्स व बर्नार्ड शॉ हे वाङ्मयात्मक ग्रंथांनीं याच मतांचा प्रसार सामान्य लोकांत करीत असतात. या लोकांना मार्क्स यांची वरील तीन तत्त्वें बरीच अतिशयोक्तीची व एकांगी आहेत, हें मान्य आहे. मानवी संस्कृती केवळ अर्थमूलकच नाहीं. सामाजिक वर्गांतील द्वेषभावनेनें होणारी सुधारणा खरी सुधारणा होऊं शकत नाहीं आणि वस्तूची किंमत केवळ ती निर्माण करण्यास लागणाऱ्या श्रमानेंच मोजणें योग्य नसल्यामुळें किंमतींतील वाढाव्याचें तत्त्वही अक्षरशः पाहूं गेल्यास खोटें आहे, असे हे लोक मानतात, परंतु संपत्त्युपादनाचीं साधनें सामुदायिक मालकीचीं असावींत, व्याज, खंड व नफा यावर जगणारा निरुद्योगी वर्ग समाजांतून नाहींसा व्हावा, संपत्त्युत्पादन स्पर्धेच्या तत्त्वावर न होतां सहकार्याच्या तत्त्वावर व्हावें, आर्थिक व्यवहारांत समाजानें अनियंत्रणाची

उत्क्रान्तिवादी समाज सत्तावाद.

तटस्थ वृत्ति न स्वीकरतां त्यांचें योग्य नियंत्रण करावें इत्यादि मतें या लोकांना मान्य आहेत. जर्मनींत या उत्क्रांतिप्रिय समाजसत्तावाद्यांस हाताशीं धरून प्रिन्स बिस्मार्क यानें क्रांतिकारक समाजसत्तावाद्यांस नामशेष केलें.इंग्लंडांतही फेबियन सोशॅलिस्टांचा सरकारच्या तटस्थ धोरणावर परिणाम होऊन राज्य-यंत्राचें कार्यक्षेत्र हळू हळू वाढूं लागलें आणि बऱ्याच सामाजिक आपत्तींना आळा बसून समाजाच्या आर्थिक व्यवहारांत स्पर्धा, व्यक्तिस्वातंत्र्य व अनि-यंत्रण हीं तत्त्वें मागें घडून समाजसत्ता, नियंत्रण व सहकार्य हीं तत्त्वें प्रामु-ख्यानें पुढें येऊं लागलीं. सामाजिक नियंत्रणाच्या अभावीं केवळ स्पर्धेच्या तत्त्वावर संपत्तीची उत्पत्ति, विभागणी व विक्रय होऊं लागल्यानें समाजाचें अनहित होतें व अनेक सामाजिक अन्याय उद्भवतात असा व्यक्तिस्वातंत्र्य वादावर यांचा आक्षेप आहे. अनियंत्रित चढाओढीनें हजारो लोकांचें भांड-वल व श्रम फुकट जातात, हजारों लोकांचीं दिवाळीं निघतात आणि हजारों मजूर वेळोवेळीं बेकार होऊन त्यांची अन्नान्न दशा होते. शिवाय कोणताही माल तयार करण्याच्या धंद्यांत जितके लोक असावयास पाहिजेत त्याहून नेहेमींच अधिक लोक पडत असल्यामुळें गिऱ्हाइकांनाही माल पडावा तितका स्वस्त पडत नाहीं. प्रत्येक कारखानदारास दुसऱ्याचे गिऱ्हाइक आपणांकडे ओढून घेण्यासाठीं जाहिराती, एजंट वगैरे करितां जो व्यर्थ खर्च करावा लागतो तो अखेरीस गिऱ्हाइकांच्याच माथ्यावर बसत असतो. या शिवाय शहरांतील प्रमुख स्थळीं दुकानें थाटण्यासाठीं होणारा पैशाचा अपव्यय आणि शहरांतील जागांच्या मालकांना मिळणारा प्रमाणाबाहेर खंड,या सर्वांचा बोजाही गिऱ्हाइकांनाच उचलावा लागतो. या सर्व गोष्टींचा विचार केल्यास स्पर्धेच्या तत्त्वामुळें जमीनदारांसारख्या (शहरांतील जमि-नीचे मालक) निरुद्योगी वर्गाची कशी भरभराट होते हेंही लक्षांत येतें. तसेंच जो माल समाजनियंत्रणाखालीं एकाच ठिकाणीं निर्माण होणें शक्य आहे, तोच माल अनेक लहान लहान कारखानदार चढा-

ओढीनें निर्माण करीत असल्यानें माल पडावा तितका स्वस्तही पडत नाहीं. ही गोष्ट कारखानदारांच्या लक्षांत येऊनच त्यांनीं आपापसांत स्पर्धा न करतां आपले संघ बनवून सहकार्यानें वागण्याची वृत्ति अंगिकारिली आहे. पण हे कारखानदार लोकांचे संघ समाजहिताला पोषक होत नसल्यामुळें जे धंदे चढाओढीच्या क्षेत्रांतून निघून सहकार्याच्या क्षेत्रांत जाऊं लागले व ज्यांना मक्तयाचें स्वरूप (Monopoly) येऊं लागलें ते सरकारनें किंवा स्थानिक स्वराज्यानींच चालवावेत असें या समाजसत्तावाद्यांचें मत आहे. " जेव्हां एखादा लोकोपयोगी धंदा फायद्याच्या दृष्टीनें इतक्या मोठ्या प्रमाणावर चालवावा लागतो कीं, त्यांत अनेक लोकांना स्पर्धा करणें जवळ जवळ अशक्य असतें, तेव्हां लोकांची ही एकच गरज भागविण्यासाठीं अनेक खर्चाचे कारखाने समाजांत चालू ठेवणें हा राष्ट्रीय भांडवालाचा दुरुपयोग आहें. यापेक्षां हें कार्य सार्वजनिक समजून तें सरकारनीं किंवा सार्वजनिक संस्थांनीं अंगिकारावें किंवा जेव्हां सरकारला तें फायदेशीर होणें शक्य नसेल तेव्हां जी कंपनीं लोकांना जास्तींत जास्त फायदेशीर अटी मान्य करील तिला त्या कार्याचा मक्ता द्यावा, हेंच उत्तम[१] " असें जॉन स्टुअर्ट

१ " When a business of real public importance can only be carried on advantageously upon so large a scale as to render the liberty of competition almost illusory, it is an unthrifty dispensation of the public resources that several costly sets of arrangements should be kept up for the purpose of rendering this one service It is much better to treat it at once as a public function; and if it be not such as government itself could beneficially undertake it should be made over entire to the company or association which will perform it on the best terms for the public. "

मिल्ल यानें आपल्या अर्थशास्त्रांत म्हटलें आहे. या आधारें आज बरींच आर्थिक स्वरूपाचीं लोकोपयोगीं कार्यें पाश्चात्य देशांतील सरकारांनीं व स्थानिक स्वराज्यांनीं अंगिकारिली आहेत. पाणीपुरवठा, गॅसचा पुरवठा, दिवे किंवा इतर कार्याला विजेचा पुरवठा, ट्रॅमगाडया, रेलवे वगैरे अनेक आर्थिक स्वरूपाचीं कार्यें आज सार्वजनिक बनलेलीं आहेत. अशा कार्यांचीं संख्या वाढून लोकांच्या बहुतेक सार्वजनिक गरजा भागविण्याचें कार्य खासगी व्यक्तींच्या हातून निघून समाजाच्या नियंत्रणाखालीं यावें असें या समाजसत्तावाद्यांचें मत आहे व या कार्यांत सरकारांच्या व स्थानिक स्वराज्यांच्या मदतीनें ते हळूं हळूं यश मिळवीत आहेत. आपल्या मतांच्या यशस्वितेबद्दल सिडने वेब म्हणतात " आज प्रत्येक प्रकारचा व्यापार कोठेंना कोठें तरी पॅरिश, म्युनिसिपालिटी किंवा राष्ट्रीय सरकारें, मध्यस्थ किंवा भांडवलवाले यांच्या मदतीखेरीज चालवीत असल्याचें दिसून येईल.··· अजबखाने, पाळीव जनावरांचीं रानें, चित्रांचीं प्रदर्शनें, वाचनमंदिरें, संगीत-मंदिरें, रस्ते, पूल, मंडया, कसाईखाने, आगीचीं यंत्रें, दीपगृहें, बोटी, नांवा,···स्मशानगृहें, स्नानगृहें, धोबीखाने, बंदरें, पाणीपुरवठा, गॅसपुरवठा, ट्रॅमवे, तारायंत्रें, गायरानें, कारागिरांचीं घरें, शाळा, प्रार्थनामंदिरें, इस्पितळें, दवाखाने, इत्यादि संस्था सध्यां समाज आपल्या आपण सुरूं करून चालवीत आहे. " अशा प्रकारें लोकांच्या आर्थिक, शारीरिक, मानसिक, बौद्धिक किंवा नैतिक उन्नतीप्रीत्यर्थ निरनिराळीं खर्चाचीं व्यापारी स्वरूपाचीं किंवा मोफत स्वरूपाचीं कामें आज पाश्चात्य देशांतील स्थानिक व राष्ट्रीय सरकारें अंगिकारीत आहेत आणि यांची संख्या दिवसानुदिवस वाढत जाऊन त्या त्या कामांतील भांडवल्यांचें कार्य संपुष्टांत येणार अशीं चिन्हें समाजसत्तावाद्यांचीं मतें सर्वस्वी मान्य नसणारांसही स्पष्ट दिसूं लागलीं आहेत. अशा प्रकारें सार्वजनिक मालकीचा किंवा नियंत्रणाचा हा वाढता व्याप सुव्यवस्थितपणें उरकण्याच्या सामर्थ्यावरच लोकसत्तेचें बरेंचसें

भवितव्य अवलंबून आहे, असें एका प्रसिद्ध अमेरिकन अर्थशास्त्रज्ञानें म्हटलें आहे[१].

सरकार व स्थानिक स्वराज्याच्या संस्था यांच्या कार्याचा हा व्याप वाढण्यास वरील आर्थिक विचारांखेरीज आणखी एक सामाजिक विचार कारण झाला आहे. तो म्हणजे राष्ट्राच्या व्यक्तिगत कर्तव्यांची नवी जाणीव हा होय. कोणत्याही राष्ट्राची भरभराट त्यांतील व्यक्तींच्या किमान प्रतीच्या जीवनक्रमाच्या स्वरूपावर अवलंबून असते, हा विचार अलीकडे सर्व विचारी लोकांस पटूं लागला आहे. राष्ट्रांतील प्रत्येक व्यक्तीच्या शारीरिक, बौद्धिक व नैतिक परिस्थितीची किमान मर्यादा ठरवून देऊन तिच्याखालीं कोणीही पडत नाहीं, याविषयीं खबरदारी घेणें हें प्रत्येक राष्ट्राचें अवश्य कर्तव्य आहे. जीवनपरिस्थितीची ही किमान मर्यादा शिक्षण, आरोग्य, आधिभौतिक संपत्ति किंवा आध्यात्मिक उन्नति या सर्वांसंबंधीं ठरविलीं गेलीं पाहिजे व जीवनकलहाच्या तीव्रतेमुळें ज्यांना स्वावलंबनानें या मर्यादेच्या वर राहातां येत नाहीं किंवा अज्ञानामुळें ज्यांना त्याची किंमत कळत नाहीं, त्यांना सरकारनें आपल्या हातीं असणाऱ्या सत्तीच्या सामर्थ्यानें तसें करणें शक्य केलें पाहिजे व भाग पाडलें पाहिजे. या विचारांमुळेंच शिक्षण, आरोग्य वगैरे संबंधांत अलीकडे सरकारची सत्ती होऊं लागली असून मजुरांची किमान मजुरी ठरवून देणें, त्यांच्या वार्ध-

सरकारचें कार्यक्षेत्र वाढण्याचें दुसरें कारण

---

१ टॉसिग यांनीं हें मत पुढीलप्रमाणें व्यक्त केलें आहे.

"It is not too much to say that the future of democracy will depend on its success in dealing with the problems of public ownership and regulation." Principles of Economics Vol II P. 411.

क्यांत व आजारीपणांत मदत मिळण्यासाठीं विमा उतरविणें, बेकार लोकांना उद्योगधंदे मिळवून देणें, दारूसारख्या व्यसनांना आळा घालणें, वाचनाभिरुची लागून मानसिक किंवा बौद्धीक सुखांची आवड उत्पन्न व्हावी म्हणून वाचनमंदिरें स्थापन करणें, वगैरे अनेक कार्यें कायदे करून व निरनिराळीं लोकोपयोगीं खातीं उघडून सरकारें व स्थानिक स्वराज्य संस्था आज पाश्चात्य देशांत करीत आहेत, आणि लहानांना दूध, थोरांना अन्न, व सर्वांना शिक्षण, मुबलक मिळावें याबद्दल शक्य ती दक्षता दाखवीत आहेत.

उत्क्रान्तिवादी समाजसत्तावादाला मान्यता.

हा सर्व आर्थिक व सामाजिक कर्तव्यांचा व्याप चालू ठेवण्यास देशांतील कारखानदार, जमीनदार व भांडवलवाले, या धनिक वर्गाच्या उत्पन्नावर करांचा बोजा वाढवून त्याचा लाभ समाजांतील निकृष्ट वर्गाला दिला जात आहे. समाजांतील निरनिराळे वर्ग हे एकजीवी राष्ट्रपुरुषाचे भिन्न भिन्न अवयव आहेत आणि एकाच्या सुखदुःखांवर दुसऱ्यांचेंही सुखदुःख अवलंबून आहे, या तत्त्वावर सरकारच्या वरील कृत्यांचें समर्थन होऊं शकतें. पण याच्याही पुढें जाऊन जमिनींतील खंड, कारखान्यांतील नफा किंवा भांडवलाचें व्याज, या रूपानें व्यक्तीला मिळणारें उत्पन्न कष्टार्जित नाहीं, सामाजिक गरजांमुळें आणि शेतकींतील व औद्योगिक शोधांमुळें हें उत्पन्न आपोआप वाढत जातें आणि त्यावर कर बसाविले तरी कोणतेही समाजोपयोगी श्रम कमी होण्याचा संभव नाहीं या समाजसत्तावाद्यांच्या मतांनींहि या कृत्यांचें समर्थन अलीकडे पुष्कळ सरकारें करीत आहेत. तसेंच व्यक्तींची खासगी किंवा स्वकष्टार्जित संपत्ती पाहिली तरी तिची प्राप्ति ही समाजांतील अनेक संस्थांच्या साहाय्यावरच अवलंबून असल्यामुळें समाजाच्या या ऋणाची फेड सरकारनें सक्तीनें करून घ्याव-

यास कांहीं हरकत नाहीं, ही विचारसरणीही लोकांना अलीकडे पटूं लागली आहे.

याशिवाय आणखी एका दृष्टीनें सरकारची जबाबदारी वाढून समाजसत्तेच्या तत्त्वाची अंमलबजावणी होत आहे, असें या उत्क्रांतिप्रिय समाजसत्तावाद्याचें मत आहे.

सरकारची एक नवी जबाबदारी

समाजांत जे कारखाने खासगी मालकीचे आहेत त्यांतील कामकरी लोकांना त्यांचे मालक कसे वागवीत आहेत, यांवर देखरेख करण्याचें व कामकऱ्यांच्या हितार्थ मालकांवर कायदेशीर बंधनें घालण्याचें तत्त्व सर्व सुधारलेल्या सरकारांनीं आतां मान्य केलेलें आहे. कामकऱ्यांनीं काम किती तास करावें, त्यांना वर्षांतून सुट्या किती मिळाव्यात, कोणत्या यंत्राभोवतीं अपघात न होण्याबद्दल कुंपणें घालावीत, वगैरे बाबतींत तर कायदे होतच आहेत, पण असुक वर्षेंपर्यंत लहान मुलांना कामावर नेमूं नये, गरोदर स्त्रियांना बाळंतपणापूर्वी व नंतर कामावर न घेतां त्यांच्या पोटाला मिळावें, कामकरी लोकांचीं मुलें शाळेंत जातात किंवा नाहीं हें कारखानदारांनीं पाहावें. कोणतेंही यंत्र चालूं असतां त्यांची साफसुफी करवून घेऊं नये वगैरें अनेक प्रकारें कारखानदारांना कायदेशीर बंधनांनीं जखडण्यांत येत आहे.

तात्पर्य समाजांतील प्रत्येक व्यक्तीच्या जीवनक्रमाची किमान मर्यादा कायम राखण्यासाठीं व ती शक्य तितकी वाढविण्याकरितां सरकारी सत्तेचा उपयोग करणें, याकरितां व सार्वजनिक गरजा

सरकारनिष्ठ समाजसत्तावाद.

भागविण्याकरितां, फार मोठया प्रमाणांत चालू असणारे कारखाने चढाओढीच्या क्षेत्रांतून निघून जाऊं लागले म्हणजे ते सार्वजनिक मालकीचे करण्यासाठीं सरकारची व स्थानिक स्वराज्याच्या संस्थांची आर्थिक

खातीं वाढविणें, खासगी भांडवलवाल्या जमीनदारांवर व कारखानदारांवर अनेक कायदेशीर बंधनें घालून त्यांचें नियंत्रण करणें, आणि व्याज, खंड, व नफा, या उत्पन्नांवर धनिक बनलेल्या वर्गावर करांचा बोजा लादून त्यांतून निकृष्ट वर्गाच्या एकंदर समाजाच्या हिताची अनेक कार्यें चालू ठेवणें या चार मार्गांनीं हे उत्क्रांतिप्रिय समाजसत्तावादी (Evolutionary Socialists) आपलें ध्येय हळू हळूं गाठण्याचा प्रयत्न प्रत्येक युरोपियन देशांत एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून करीत आहेत. या मार्गांनीं जातां जातां संपत्त्युत्पादनाची सर्व साधनें सामाजिक मालकीची बनतील व व्याज, खंड व नफा या उत्पन्नावर गब्बर बनणारा कारखानदारांचा किंवा जमीनदारांचा निरुद्योगी वर्ग समाजांतून नष्ट होईल, अशी यांची अपेक्षा आहे. या समाजसत्तावाद्यांची बरीच मदार सरकारवर असल्यामुळें त्यांना सरकारनिष्ठ समाजसत्तावादी(State Socialists) असें ही म्हणतात.

सरकारचें कर्तव्यक्षेत्र शक्य तितकें संकुचित करावें, हें तत्त्व एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत ज्याप्रमाणें सर्वमान्य झालें होतें, त्याचप्रमाणें

लंबकाचा उलट दिशेनें हेलकावा

त्या शतकाच्या अखेरीस व्यक्तिस्वातंत्र्य आणि खासगी संपत्ति यांच्या नियंत्रणार्थ आणि दुर्बलांच्या साहाय्यार्थ सरकारनें अनेक औद्योगिक व लोकोपयोगी कामें अंगावर घेऊन, लोकांच्या औद्योगिक, आरोग्यविषयक व शिक्षणविषयक व्यवहारांवर देखरेख ठेऊन, त्यांचें अनेक कायद्यांनीं नियमन करण्यासाठीं आपल्या कर्तव्याचें क्षेत्र वाटेल तितकें विस्तृत करावें, हें तत्त्व सर्वमान्य नसलें तरी बहुमान्य होण्याच्या मार्गास लागलें होतें. सरकारनिष्ठ समाजसत्तावाद्यांच्या अत्यंत भरभराटीचा काळ इ. स. १८७० मधील फ्रँकोजर्मन युद्धापासून १९१४ मध्यें सुरू झालेल्या युरोपियन महायुद्धापर्यंत होता असें म्हणण्यास हरकत नाहीं. या पक्षाचा प्रथम विशेष विकास प्रिन्स बिस्मार्कच्या वरद-

हस्तानें जर्मनींतच झाला असें म्हणता येईल व गेल्या महायुद्धाच्या वेळीं बहुतेक युरोपियन सरकारांच्या वर्तनावर या पक्षाच्या तत्त्वांची छाप बसलेली स्पष्ट दिसत होती. पण या पक्षाच्या भरभराटीचा काळ आतां निघून गेला आहे व सरकारच्या कर्तव्यक्षेत्राचा विस्तार कमी करावा असे म्हणणारे दुसरेच कांहीं पक्ष पुढें येऊं लागले आहेत. ह्यांपैकीं बहुतेक पक्ष समाजसत्तावादीच आहेत; पण ते सरकारनिष्ठ नसून संघनिष्ठ आहेत. पूर्वीच्या व्यक्तिस्वातंत्र्यवादाचा जरी त्यांना तिटकारा आहे, तरी समूह-स्वातंत्र्याचे ते उपासक आहेत आणि यांच्यापैकीं कांहींचा कल अराजक मतांकडे आहे.

संपत्त्युत्पादन व राज्ययंत्र यासंबंधी सिज्विकचें मत.

या लोकांच्या मतांचा विचार करूं लागण्यापूर्वीं संपत्त्युत्पादना सारख्या कार्याचा विशेष भार राज्ययंत्रावर टाकल्यास काय घोटाळे उत्पन्न होण्याचा संभव आहे या संबंधीं सुप्रसिद्ध राजनीतिज्ञ सिज्विक यांचें मत नमूद करून ठेवणें अवश्य आहे. सरकारनीं संपत्त्युत्पादनाचें कार्य अंगिकारल्यापासून पुढील तीन घोटाळे उत्पन्न होतील असे ते म्हणतात. (१) राज्ययंत्रावर बाजवीपेक्षां फाजील कामाचा बोजा पडल्यानें त्याची कार्यक्षमता कमी होईल. (२) राज्ययंत्राच्या चाल-कांस आपल्या सत्तेचा दुरुपयोग करण्यास अधिक अवसर मिळेल. (३) समाजांतलि एखाद्या विशिष्ट वजनदार वर्गाच्या हिताप्रीत्यर्थ राज्ययंत्राच्या आर्थिक कार्याला विकृत स्वरूप देण्यांत येईल व त्यामुळें तें कार्य बरोबर चालणार नाहीं. सरकारनिष्ठ समाजसत्तावाद्यांच्या मतांप्रमाणें निरनिराळ्या सरकारांनीं संपत्त्युत्पादनाचीं कार्यें अंगिकारल्यापासून हे अनिष्ट परिणाम हळू हळू लोकांच्या अनुभवास येऊं लागले आहेत, इतकेंच नाहीं तर राज्य-यंत्रांत आणखीही कांहीं घोटाळे उत्पन्न होऊन प्रातिनिधिक राज्ययंत्रावरचा

लोकांचा विश्वासच उडूं लागला आहे. तो कां व कसा याची कल्पना येण्यास वर उल्लेखिलेल्या समूहस्वातंत्र्यवादी समाजसत्तावाद्यांच्या मतांचा आतां विचार करूं.

समूहस्वातंत्र्यवाद.

सरकारानिष्ठ समाजसत्तावादी पक्ष सरकारच्या व कायद्यांच्या सहाय्यानें सामाजिक अन्यायांचा व भांडवलशाहीचा मागें सांगितल्याप्रमाणें प्रतिकार करीत असतां कांहीं समाजसत्तावादी लोक सहकारी चळवळी व मजूरसंघ यांच्या मार्फत भांडवलशाहीच्या जाचांतून लोकांना मुक्त करून समाजाच्या आर्थिक व्यवहारांत सहकार्य व सामाजिक नियमन या तत्त्वांचा शिरकाव करण्याचा प्रयत्न करीत होता. सरकारनिष्ठांचे प्रयत्न सक्तीच्या व परावलंबनाच्या तत्त्वावर चालू असले तर यांचे प्रयत्न स्वेच्छेच्या व स्वावलंबनाच्या तत्त्वावर चालू होते. सरकारनिष्ठांचें साधन राष्ट्रीय व स्थानिक प्रातिनिधिक संस्थांत मजूर वर्गाचे प्रतिनिधि शक्य तितके निवडून आणणें हें होतें तर या लोकांचें साधन मजूर संघटनांच्या मार्फत प्रत्यक्ष कृतीच्या (*D*irect action) मार्गानें सामाजिक क्रांति घडवून आणून संपत्त्युत्पादनाचीं साधनें भांडवलवाल्यांकडून काढून घेऊन तीं कामकरी लोकांच्या हातीं देणें हें होतें. ज्या मानानें कामकरी वर्गांत स्वावलंबनाचा व सहकार्याचा जोम वाढत चालला त्या मानानें सरकारनिष्ठांचा पक्ष मागें पडत जाऊन समूहस्वातंत्र्यवादी लोक पुढें येऊं लागले.

अराजक संघवादी

सिंडिकॅलिझम् या नांवाचा एक पंथ विसाव्या शतकाच्या प्रारंभीं फ्रान्स देशांत निर्माण झाला. त्याचें जनकत्व सोरेल या गृहस्थांस दिलें जातें सध्यां निरनिराळ्या देशांत जे कामकरी लोकांचे संघ आहेत, त्यांनीं कोणत्याही कार्याकरितां सरकारकडे धाव न घेतां सार्वत्रिक संपाच्या (General Stri*k*e) प्रत्यक्ष कृतीच्या मार्गानें संपत्त्युत्पादनाचीं

सर्व साधनें आपल्या ताब्यांत घेऊन समाजाचीं सर्व कार्यें आपण चालवूं लागावें आणि सरकार ही दंडधारी संस्था मोडून टाकावी असें या सिंडिकॅलिस्ट लोकांचें मत आहे. यांना राज्ययंत्राची मुळींच गरज भासत नसल्यामुळें त्यांना " अराजक संघवादी " असें नांव देतां येईल. यांचें अराजकत्वाचें ध्येय कसें अव्यहार्य आहे याची चर्चा मागील प्रकरणांत केली असल्यामुळें त्यांच्या मतांचा विशेष उहापोह येथें करण्याचें कारण नाहीं.

संघनिष्ठ समाजसत्तावाद.

या लोकांच्या मतांतील अराजकत्वाचा भाग वगळून " गिल्ड सोशॅलिस्ट " या नांवाचा एक पंथ निर्माण झाला आहे. या पंथाला संघनिष्ठ समाजसत्तावादी असें नांव देण्यास हरकत नाहीं. यांना सरकार ही सत्ताप्रधान दंडधारी संस्था अजीबात नको आहे, असें नाहीं; परंतु तिनें अलीकडे जीं सामाजिक व आर्थिक कार्यें अंगीकृत केलीं आहेत, तीं सरकारच्या देखरेखीखालीं परंतु सामाजिक व औद्योगिक संघांमार्फत चालावींत असें त्यांचें मत आहे. संपत्त्युत्पादनाच्या साधनांवरील मालकी सर्व राष्ट्राची असली तरी त्यांची व्यवस्था व कारभार औद्योगिक व सामाजिक संघांकडे असावा असें ते सुचवितात. समाजांतील व्यक्तींच नियंत्रण करणाऱ्या, कुटुंब, औद्योगिक व कारागिर संघ, धार्मिक संस्था, स्थानिक स्वराज्याच्या संस्था वगैरे ज्या अनेक संस्था मध्ययुगांत देशांत होत्या, त्यांचें नियंत्रण औद्योगिकक्रांतीला जाचक होऊं लागलें म्हणून हळूं हळूं त्यांचीं बंधनें तुटूं लागलीं व कांहींचा तर अत्यंत लोपच झाला. यामुळें समाजांत अनवस्था उत्पन्न होऊन बळी तो कान पिळी हा न्याय माजला आणि अनेक सामाजिक अन्याय उद्भवले. त्यांचें निवारण करण्याकरितां राष्ट्राला जेव्हां पुनः नियंत्रणाची आवश्यकता भासूं लागली तेव्हां सरकारनिष्ठ समाजसत्तावाद्यांच्या उपदेशानुसार तें कार्य सरकारनें अंगावर घेतलें. पण हें कार्य सरकारमार्फत, व्हावें तसें होत नाहीं; भांडवलवा-

त्यांप्रमाणेंच सरकारही मजुरांना स्वातंत्र्य देऊं इच्छित नाहीं. श्रमशक्तीचा बाजार पूर्वीप्रमाणें अनिर्बंध स्पर्धेच्या तत्त्वावर चालू राहातो, सरकारचीं कामें अतोनात वाढल्यामुळें लोकप्रतिनिधींना त्यांवर योग्य देखरेख ठेवितां येत नाहीं, लोकांना हजारो कामाकरितां एकच प्रतिनिधि निवडावा लागत असल्यामुळें प्रातिनिधिक पद्धति ही बहुतेक बाबतींत लोकमताची निदर्शक होत नाहीं, इत्यादि अनेक आक्षेप हे संघनिष्ठ समाजसत्तावादी लोक पाश्चात्य राज्यघटनेवर व राष्ट्रघटनेवर आणीत आहेत. या सर्व घोटाळ्यांतून बाहेर पडण्यासाठीं सरकारनें सर्व सामाजिक व औद्योगिक कार्यांतून आपलें अंग काढून घेऊन तें सामाजिक व औद्योगिक संघाकडे सोपवावें, व स्वतः लोकरक्षणाचें आपलें आद्य कर्तव्य करून स्वस्थ बसावें असें हे लोक प्रतिपादित आहेत. सरकारच्या अंगीकृत कार्यांची संख्या वाढल्यानें तीं कार्यें चांगलीं तर वठतच नाहींत उलट ती संस्था सक्तिप्रधान असल्यामुळें सक्तीची व लष्करी शिस्तीची छाया सरकारनें अंगीकृत केलेल्या सर्व खात्यांवर पडत असते. यामुळें व्यक्तींचें व व्यक्तिसमुदायांचें स्वातंत्र्य नष्ट होतें व त्यांच्या सर्वांगीण विकासाला व उन्नतीला बाध येतो, अशी ओरड हे लोक करीत आहेत. सरकारनिष्ठ समाजसत्तावाद्यांचें ध्येय प्रत्यक्ष सृष्टींत अवतरेल तर राष्ट्रांतील सर्व लोक एका अनियंत्रित लष्करी नोकरशाहीचें गुलाम बनलेले दिसतील व कोणासही आपल्या व्यवहारांत स्वातंत्र्यसुख उपभोगितां येणार नाहीं अशी भीति हे व्यक्त करतात. तात्पर्य संपत्त्युत्पादन व इतर सामाजिक हिताचीं कार्यें सहकार्यानें, सामाजिक नियंत्रणाखालीं व सामुदायिक पद्धतीनें चालावींत, हें समाजसत्तावादाचें तत्त्व जरी यांना मान्य असलें तरी तीं सर्व कार्यें करणाऱ्या लोकांच्या संघांसारख्या स्वतंत्र संस्था स्थापाव्या व त्या कार्यांवर केवळ देखरेख करण्याचें काम सरकारनें करावें, अशा दिशेनें आज पाश्चात्य देशांतील राजकीय सुधारकांच्या विचारांचा वारा वाहूं लागला आहे.

सिडने वेब हे इंग्लंडांतील फेबियन सोशॅलिस्टांपैकीं एक प्रमुख विद्वान आहेत, हें मागें सांगितलेंच आहे. त्यांनीं संघनिष्ठ समाजसत्तावाद्यांच्या विचारांचा सहानुभूतिपूर्वक विचार

सिडने वेब यांचीं मतें

करून "A constitution for the Socialist Common wealth of Great Britain" या नांवानें एक पुस्तक लिहिलें आहे. त्यांत सरकारनिष्ठ समाजसत्तावादावरील बहुतेक आक्षेपांस मान्यता देऊन त्यांच्या निराकरणाचे मार्ग सुचविले आहेत. इंग्लिश लोकांनीं आपली सामाजिक व औद्योगिक राष्ट्रीय कार्यें करण्यासाठीं पार्लमेंट सारखी एक निराळीच लोकप्रतिनिधिसभा स्थापन करावी व हल्लींच्या लोकसभेनें आपलें लोकरक्षणाचेंच तेवढें आद्य कर्तव्य करीत बसावें अशी सूचना केली आहे. या दोन लोकसभांना ते अनुक्रमें "सोशल पार्लमेंट" व "पोलिटिकल पार्लमेंट" अशीं नांवें देतात. शिवाय या सामाजिक लोकसभेनेंही सामाजिक व औद्योगिक कार्यांचा सर्व भार आपल्या शिरावर न घेतां देखरेख व सामान्य धोरण एवढीं कार्यें आपण करून लोकांच्या सामाजिक व आर्थिक गरजा भागविण्याचें प्रत्यक्ष कार्य त्या त्या कार्यांतील धंदेवाईक लोकांच्या संघांकडे सोपवावें असेंही त्यांनीं प्रतिपादन केलें आहे. तात्पर्य समाजाच्या सामाजिक औद्योगिक किंवा धार्मिक व्यवहारांच्या नियमनाचें व चालकत्वाचें कार्य लोकरक्षणार्थ निर्माण झालेल्या दंडधारी राज्ययंत्रावर न लादतां, तें पार पाडण्याची कांहीं तरी निराळी व्यवस्था केली पाहिजे व दंडधारी राज्ययंत्राचा व्याप लोकरक्षणाच्या कार्याबाहेर विशेष वाढूं देऊं नये, या संघनिष्ठ समाजसत्तावाद्यांच्या कल्पनेला सिडने वेब यांनीं संमति दिलेली आहे. तथापि अराजक मतांकडची त्यांची प्रवृत्ति व इतरही त्यांचीं कांहीं मतें वेब यांना मान्य नाहींत. सध्यां आपणास सरकारच्या कार्यक्षेत्राचाच विचार करावयाचा असल्यानें ती चर्चा येथें करण्याचें प्रयोजन नाहीं.

समाजांतील सर्व नियंत्रणशक्तिचें एकीकरण करून ती शक्ति मध्यवर्ति लोकसभेच्या हातीं देणें राष्ट्रहितास पोषक नसून ही नियंत्रणशक्ति स्थानिक, औद्योगिक, सामाजिक, धार्मिक किंवा इतर अनेक समूहांच्या हातीं विभागून दिली पाहिजे व समाजाची पृथक् कार्यें उरकण्यासाठीं निरनिराळया संस्था लोकांनीं निर्माण केल्या पाहिजेत, अशा प्रकारची जी विचारप्रवृत्ति पाश्चात्य देशांत हल्लीं वाढूं लागली आहे, ती पाहून निरनिराळ्या जाती, औद्योगिक श्रेणी, धार्मिक पंथ, निरनिराळे वर्ण आणि ग्रामसंस्था सारख्या अनेक स्थानिक संस्था, या सर्वांच्या परंपरागत रूढींना व सामाजिक नियंत्रणाला मान देऊन व त्यांच्याकडून समाजांतील निरनिराळीं कार्यें करवून घेऊन, राजानें वर्णाश्रमधर्माच्या संरक्षणाचें कार्य करावें असें सांगणाऱ्या प्राचीन भारतीय राजधर्माचें स्मरण होतें. ज्यांनीं भारतीयांच्या प्राचीन राजकीय व सामाजिक संस्थांचा अभ्यास केला आहे, त्यांचें असें मत आहे कीं, प्राचीन भारतवर्षांत जे राजे होऊन गेले त्यांची सत्ता अनियंत्रित नसून मध्ययुगीन युरोपांतल्याप्रमाणें, जातिसंस्था, ग्रामसंस्था व वर्णाश्रम संस्था इत्यादि अनेक सार्वजनिक संस्थांनीं ती नियंत्रित झालेली होती. अशा संस्थांना कायदे करण्याचे व न्यायदानाचेही बरेच अधिकार असत.

भारतीय राजनीति.

जातिजानपदान्धर्मान् श्रेणीधर्मांश्च धर्मवित् ।
समीक्ष्य कुलधर्मांश्च स्वधर्मं प्रतिपादयेत् ।

असा जो राजनीतीचा नियम मनुसंहितेंत दिलेला आहे, तो संघनिष्ठ समाजसत्तावाद्यांच्या मतांशीं बहुतांशीं जुळतो. राधाकमल मुकर्जी यांच्या "Democracies of the *East*" या ग्रंथांत पाश्चात्य राजनीतिशास्त्राच्या या नव्या प्रवृत्तीची आणि भारतीयांच्या ग्रामसंस्थांच्या व जातिसंस्थांच्या अधिकारांची योग्य संगति लावून दिलेली आहे. इतकेंच नाहीं

तर आमच्या प्राचीन राष्ट्रसंघटनेपासून या पाश्चात्य राजनीतिज्ञांना बऱ्याच गोष्टी शिकतां येण्यासारख्या आहेत असेंही त्यांचें मत आहे. राज्य ही एक अनेक नियामक संस्थांची संयुक्तस्वरूपाची संघटना आहे, ही आर्वाचीन पाश्चात्य कल्पना शुक्रनीतिसारख्या प्राचीन राजनीति शास्त्रावरील ग्रंथाशीं अगदीं जुळती आहे असें विनयकुमार सरकार यांनींही आपल्या शुक्रनीतीवरील पुस्तकांत म्हटलें आहे.[१] त्याचबरोबर अराजक संघवाद्यांची अराजक मतें किंवा व्यक्तिस्वातंत्र्यवाद्यांची एकान्तिक मतें ही शुक्राचार्यप्रभृति प्राचीन राजनीतिशास्त्रज्ञांना मान्य नव्हती, असाही इषारा त्यांनीं दिलेला आहे. केवळ लोकरक्षणाच्या कार्याखेरीज मजुरांचे किमान दर ठरवून देणें, व्याजाच्या दरावर नियंत्रण ठेवणें, उद्योगधंद्यांतील नफ्यांना मर्यादित करणें, वस्तूंच्या क्रयविक्रयासंबंधीं देखरेख ठेऊन गिऱ्हाइकांची फसगत न व्हावी म्हणून कायद्यानें शक्य तेवढी तरतूद करणें, विशिष्ट पदार्थांच्या विक्रीस परवाने ठेवणें, वगैरे अनेक स्वरूपांनीं शुक्रनीति, अर्थशास्त्र, वगैरे प्राचीन ग्रंथांत समाजाच्या आर्थिक व्यवहारांचें नियंत्रण राजांनीं करावें असें सांगितलेलें आहे. पण समाजाचे संपत्त्युत्पादनाचें सर्व कार्य राज्ययंत्राकडून करून घ्यावें ही सरकारनिष्ठ समाजसत्तावाद्यांची कल्पना त्यांना मान्य अस-

---

१ "In Shukraniti The State resolves itself by this process virtually into an association of *imperia et emperis* i-e a Union of lesser corporations almost in the manner in which Gierke and Figgis would desire the modern state to do. Like *A*lthresin Shukra may then be regarded as an exponent of the decentralised state, embodying the principle of functional Swaraj (selfrule), which as is welknown, was fact of

त्याचें दिसत नाहीं. एकंदरींत संघनिष्ठ समाजसत्तावाद्यांच्या राज्ययंत्राच्या कर्तव्याच्या कल्पनेशीं आमच्या प्राचीन राजधर्माची कल्पना बरीच जुळते असें मानण्यास हरकत नाहीं.

आमचें मत

येथपर्यंत सरकारच्या कर्तव्यक्षेत्रासंबंधीं आज पाश्चात्य देशांत कोणती मतें प्रचलित आहेत, त्यांत किती पंथ व उपपंथ आहेत, आपली प्राचीन कल्पना कशा प्रकारची आहे वगैरे गोष्टींचें विवेचन केलें. आतां आमचा या संबंधींचा निष्कर्ष सारांशरूपानें खालीं देतों.

१ समाजाच्या आर्थिक व्यवहारांचें समाजानें मुळींच नियमन करू नये व व्यक्तीला अमर्याद स्वातंत्र्य द्यावें. तसेंच लोकरक्षणाखेरीज कोणतेंही लोकोपयोगी कार्य सरकारनें अंगिकारूं नये, हें व्यक्तिस्वातंत्र्यवादाचें मत पाश्चात्य देशांतील अनुभवानें अनर्थावह ठरलें आहे.

२ संपत्त्युत्पादनाची व लोकोपयोगाची सर्व मोठया प्रमाणावरचीं कार्यें प्रत्यक्ष राज्ययंत्रावरच लादावीत हें सरकारनिष्ठ समाजसत्तावादाचें मतही समाजहिताला व लोकस्वातंत्र्याला पोषक नाहीं. ध्येय या दृष्टीनें संरक्षणा खेरीज—यांतच न्यायदानही येतें—इतर सर्व लोकोपयोगी कार्यें लोकांनीं स्वावलंबनानें सहकार्यानें स्वतंत्र संस्थांमार्फत करावी, हें संघनिष्ठ समाजसत्तावाद्यांचें मत बरोबर आहे.

---

medieval Euro-Asian polity and has obtained forceful advocacy over again in recent times...... It has to be remembered however, that although the theory of an allpowerful and centralised state is avoided Shukra does not contemplate the total negation of the state as desired by the Syndicalists of today."The positive Back-Ground of Hindu sociology. Book II Part I.

३ परंतु व्यवहाराच्या दृष्टीनें कोणत्या सरकारनें कोणतीं कार्यें अंगावर घ्यावीं हें त्या राज्यांतील इतर संस्थांवर व लोकांच्या सामर्थ्यावर अवलंबून आहे. लोकांनीं स्वतंत्र संस्थांमार्फत आपले सर्व सामाजिक व्यवहार चालवावेत हें युक्त असलें तरी तशी जेथें शक्यता नसेल तेथें वाटेल तीं लोकोपयोगाचीं कार्यें परिस्थित्यनुरूप राज्ययंत्राकडून करवून घेण्यास हरकत नाहीं. राज्ययंत्राच्या कार्यक्षेत्राची मर्यादा व्यवहारांत समाजाच्या गरजांवरून, त्यांच्यामध्यें असणाऱ्या इतर संस्थांच्या स्थितीवरून व राज्ययंत्राच्या कार्यक्षमतेवरून व सुस्थितीवरून ठरवावी लागते. केवळ तात्त्विक उपपत्तीचा फारसा उपयोग नाहीं. सामान्य धोरण व ध्येय ठरविणें एवढेंच तात्त्विक उपपत्तीचें कार्य आहे.

या प्रकरणांत समाजाच्या आर्थिक गरजांच्या दृष्टीनें आणि इतर लोकोपयोगी कार्यांच्या दृष्टीनें राज्ययंत्राच्या कार्यक्षेत्राचा विचार केला. आतां नैतिक दृष्टीनें व लोकस्वातंत्र्याच्या दृष्टीनें, सरकारचें कार्यक्षेत्र कितपत मर्यादित करावें व राष्ट्रहिताच्या दृष्टीनें प्रजेचे मूलभूत हक्क कोणचे असावेत याचा विचार पुढील प्रकरणांत करावयाचा आहे.

प्रकरण ३ रें.

सरकार, सक्ति व स्वातंत्र्य.

समाजांमध्यें सरकाराव्यातिरिक्त अनेक संस्था असतात. परंतु, सरकार आपल्या आज्ञा मोडल्या असतां ज्याप्रमाणें शिक्षा करतें त्याप्रमाणें शिक्षा करण्याचा अधिकार इतर संस्थांना असत नाहीं. समाजांतील शस्त्रसामर्थ्याच्या जोरावर लोकांवर सक्ति करणारी संस्था म्हणजे सरकार हींच होय. सक्ति आणि स्वातंत्र्य या गोष्टी सकृद्दर्शनीं अगदीं परस्परविरोधी दिसतात आणि म्हणून सक्ति करणें हें जसें सरकारचें एक मुख्य लक्षण आहे, त्याचप्रमाणें लोकांच्या स्वातंत्र्याचें रक्षण करणें हेंहीं सरकारचें मुख्य कर्तव्य आहे हें म्हणणें कांहीं लोकांना पटत नाहीं. पण हें बरोबर नाहीं. स्वातंत्र्य आणि सक्ति या गोष्टी सकृद्दर्शनीं भासतात त्याप्रमाणें परस्परविरोधी नसून त्या परस्परपूरक अशा होऊं शकतात असेंही दाखवतां येणें शक्य आहे. समाजहिताच्या दृष्टीनें स्वातंत्र्याची जितकी आवश्यकता आहे, तितकी सक्तीचीही आहे. सरकार निर्माण होण्यापूर्वींच्या काल्पनिक निसर्गावस्थेंत सर्व व्यक्तींना पूर्ण स्वातंत्र्य होतें, अशी जर कोणाची कल्पना असेल, तर ती बरोबर नाहीं. सरकार ही सक्तिप्रधान संस्था नष्ट झाल्यास समाजांतील कोणत्या तरी प्रबल वर्गाचें दास्य इतर लोकांना करावें लागेल, वगैरे अराजक पंथाचा विचार करीत असतांना केलेलें विवेचन वाचकांस स्मरत असेलच. आतां प्रजेला किंवा प्रजेंतील व्यक्तींना कशा प्रकारचें स्वातंत्र्य देण्याच्या कामीं सरकारच्या सक्तीचा उपयोग करावा लागतो व त्या स्वातंत्र्याची समाजहिताला कितपत आवश्यकता आहे याचें विवेचन करावयाचें आहे.

सक्ति व स्वातंत्र्य.

समाजांतील कोणत्याही संस्थेचें ध्येय त्यांतील व्यक्तींच्या अभ्युदय निःश्रेयसप्राप्तीला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष मदत करणें हें असलें पाहिजे. हा नियम राज्य या संस्थेलाही लागू आहे. राज्याची आवश्यकता आधिभौतिक अभ्युदयाला तर आहेच पण " अराजकेषु राष्ट्रेषु धर्मो न व्यवतिष्ठति " या महाभारतांतील वचनांत सांगितल्याप्रमाणें व्यक्तींच्या धार्मिक किंवा नैतिक उन्नतीलाही राज्याची जरूरी आहे, कारण सर्व वर्णाश्रमधर्माचें अस्तित्वच राजा म्हणजे सरकारच्या अस्तित्वावर अवलंबून आहे. पण याचबरोबर दुसरी एक गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे. ती ही कीं, कोणत्याही व्यक्तीच्या नैतिक किंवा आध्यात्मिक उन्नतीला समाजाकडून किंवा कोणत्याही संस्थेकडून जी मदत मिळणार ती अप्रत्यक्ष स्वरूपाचीच केव्हांही असणार. कारण " उद्धरेदात्मनात्मानं " या आत्मोद्धाराच्या तत्त्वावरच आध्यात्मिक उन्नति सर्वस्वी अवलंबून आहे. व्यक्तींना अप्रतिहतपणें आध्यात्मिक उन्नति करतां येईल अशा प्रकारची परिस्थिति निर्माण करणें सरकारचें कर्तव्य आहे. परंतु त्यांची आध्यात्मिक उन्नति करण्याबद्दल व्यक्तींवर सक्ती करणें, हें केव्हांही सरकारचें कर्तव्य होऊं शकत नाहीं. हें सक्तीचें क्षेत्र नसून तें व्यक्तीस्वातंत्र्याचें क्षेत्र आहे. सक्तीचा अंमल बाह्य वर्तनावर चालू शकतो तसा तो आत्म्यावर चालूं शकत नाहीं. इतकेंच नाहीं तर सक्तीचा अंमल अंतःसृष्टीवर चालू केल्यास त्याचा विपरीत परिणाम घडतो. मनुष्याच्या अंगीं सत्यसंशोधनाची जी प्रबल इच्छा आहे, त्याच्या अंतःकरणांत जो दैवी प्रतिभाशक्ति आहे, अंतःकरणांतील दुष्प्रवृत्तींचा मोड करून इंद्रियदमन करण्याचें किंवा मनोविजय मिळविण्याचें जें अद्‌भुत सामर्थ्य त्याच्यापाशीं आहे, तें सक्तीनें निर्माण होऊं शकत नाहीं. उलट अंतःसृष्टीवर सक्तीचा अंमल सुरू करण्याचा जर कोणी प्रयत्न केला तर वरील सक्ती

सक्तीचीं व स्वातंत्र्याचीं भिन्न क्षेत्रें.

जेथें केवळ बीजरूपानेंच वास्तव्य करीत असतात तेथून त्या अजीबात नष्ट होण्याचाही संभव असतो. त्यांच्या विकासाला सरकार केवळ अप्रत्यक्ष मदत करूं शकेल. बागेंतील कांटेरी झुडपें उपटून टाकणें, सभोंवार कांटेरी कुंपण घालणें, जमिनीची कष्ट—मशागत करणें किंवा खत घालणें या गोष्टी माळ्यास करणें शक्य आहे; परंतु झाडांची वाढ होणें, त्यांना पालवी व मोहोर फुटणें किंवा फुलाफळांनीं तीं ओथंबून जाणें, या गोष्टी त्यांतील अंतःशक्तीनेंच झाल्या पाहिजेत. त्याचप्रमाणें दुर्जनांच्या बाह्य वर्तनाचें नियमन करणें व त्यांच्यापासून सज्जनांना उपद्रव पोहोंचूं नये एवढी गोष्ट सरकारला करतां येईल. परंतु सज्जनांच्या सौजन्याची खरी वाढ त्यांची त्यांनींच केली पाहिजे. यासारख्या विचारसरणींतच व्यक्तीस्वातंत्र्यवादाचें खरें रहस्य आहे.

सुप्रसिद्ध इंग्लिश तत्त्ववेत्ता जॉन स्टयुअर्ट मिल्ल यानें व्यक्तीस्वातंत्र्याचें समर्थन पुढील तीन मुद्यांवर केलेलें आहे. कोणत्याही समाजांतील

मिल्लचें मत.

सत्याचें ज्ञान अपूर्ण असतें, तें एकसारखें वाढत असतें, व तें नेहेमीं वाढत असण्यांतच समाजाचें खरें हित आहे. याकरितां समाजांतील सत्यसंशोधनाची लालसा एकसारखी जागृत असली पाहिजे व ती जागृत राहाण्यास प्रत्येक व्यक्तीस मतस्वातंत्र्य किंवा विचारस्वातंत्र्य याचा पूर्ण उपभोग घेऊं दिला पाहिजे. आपणास सत्य भासणारीं मतें समाज जर अल्पसंख्याकांवर सक्तीनें लादू लागला, तर सत्यसंशोधनाची लालसा समाजांतून नष्ट होईल व कोणत्याही नव्या सत्याचें ज्ञान उपलब्ध होणार नाहीं. समाजांतील कायदे, रूढी व आचारविचार यांची सुधारणा होण्यास मतस्वातंत्र्याची आवश्यकता आहे. तसेंच स्वतः बनविलेलें मत चुकीचें असलें तरी तें बनवितांना मनुष्यांच्या शोधकबुद्धीला जे प्रयास पडतात त्यांपासून तिला मिळणारें चांचल्य व त्यापासून व्यक्तिमात्रास वाटणारें समाधान यांची

किंमत कमी होत नाहीं. तात्पर्य मतस्वातंत्र्यामुळें नवीं सत्यें उघडकीस येतात व समाजांतील सत्यान्वेषणबुद्धि सदैव जागृत राहाते, हे मुख्य दोन मुद्दे मतस्वातंत्र्याच्या मंडनार्थ त्यानें पुढें आणिलेलें असून शिवाय व्यक्ति-स्वातंत्र्यामुळें समाजाच्या आचारविचारांत एकप्रकारची सजीव विविधता दृष्टीस पडते असें त्याचें म्हणणें आहे. सर्वांनाच एका साच्यांत घालून ओतलेल्या ठशाप्रमाणें बनविणें हें ध्येय कोणत्याही समाजानें न स्वीकारतां प्रत्येक व्यक्तीला आपल्या अंगच्या मानसिक किंवा शारीरिक शक्तींचा पूर्ण विकास करण्यास शक्य तितकें स्वातंत्र्य देण्यांत समाजाचें खरें हित आहे, असें ती म्हणतो. या विचारसरणीनुसार विचार, उच्चार व आचार यांतील स्वातंत्र्याचें महत्त्व त्यानें लोकांना पटवून दिलेलें आहे. विचार व उच्चार या बाबतींत जितकें स्वातंत्र्य देतां येणें शक्य आहे तितकें आचाराच्या बाबतींत देणें शक्य नाहीं, म्हणून व्यक्तींच्या एकंदर व्यवहारांचे सामाजिक म्हणजे ज्या व्यवहारांचे समाजाशीं संबंध येतो ते, व वैयक्तिक म्हणजे ज्यांचा दुसऱ्याशीं संबंध येत नाहीं तें, असे दोन भाग करून दुसऱ्या व्यवहारांत व्यक्तीला पूर्ण स्वातंत्र्य देऊन पहिल्या व्यवहारांचें समाज-हिताच्या दृष्टीनें सरकारनें नियमन करावें असें मिल्लचें मत आहे.

या मतांत दोन दोष आहेत. एक तर व्यक्तीचा असा कोणताही व्यवहार दाखवितां येणार नाहीं कीं ज्याचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष परिणाम समाजावर घडत नाहीं. शिवाय व्यक्तीच्या खाजगी वर्तनापैकींहि जेवढा भाग समाजाला सुधारणें शक्य असेल तेवढ्याचा दुसऱ्याशीं संबंध येत नसला तरी तो सुधारण्याचा प्रयत्न समाजानें कां करूं नये अशी यावर शंका येते. समाजहितांतच व्यक्तींच्या हिताचा अंतर्भाव होतो व म्हणून त्याच्या कोणत्याही व्यवहारासंबंधीं समाजाला उदासीन

मिल्लच्या मतांतील दोष व सत्तीच्या क्षेत्राची खरी मर्यादा.

राहाण्यास सांगणें योग्य नाहीं. म्हणून या तत्त्वापेक्षां ज्या नियंत्रणामुळें विपरीत परिणाम होण्याचा संभव आहे तें नियंत्रण अमलांत आणूं नये, या तत्त्वानुसार सक्तीचें क्षेत्र बाह्यवर्तन, आणि स्वातंत्र्याचें क्षेत्र अंतःप्रवृत्ति, हें तत्त्व अधिक सयुक्तिक आहे असें दिसून येईल. व्यक्तीला मतस्वातंत्र्य द्यावयाचें तें त्याचा संबंध समाजाशीं येत नाहीं म्हणून द्या असें न म्हणतां सत्यान्वेषणकबुद्धि जागृत राहाते म्हणून द्या, असें म्हणणें अधिक सयुक्तिक आहे. त्याचप्रमाणें भाषण व मुद्रण स्वातंत्र्याची गोष्ट आहे. विचारांचें नियंत्रण सक्तीनें करणें शक्य नाहीं. तसें करावयाचें झाल्यास विचारशक्तीच मारून टाकली पाहिजे. ही विचारशक्ती मारून टाकावयाची नसल्यास तिला व्यक्त स्वरूप देण्यास अवसर दिला पाहिजे व म्हणूनच भाषण व मुद्रण स्वातंत्र्याची आवश्यकता आहे. वर्तनाची तशी स्थिति नाहीं. वर्तनाचें नियंत्रण कायद्यानें करणें शक्य आहे. परंतु सक्तीनें करविलेल्या किंवा बंद केलेल्या वर्तनाला वैयक्तिक नीतीच्या दृष्टीनें कांहीं किंमत नाहीं. या करितां लोकांची नीतिमत्ता सुधारणें हा सरकारी सक्तीचा केव्हांही हेतु असू नये. बाह्य वर्तनाच्या नियंत्रणापलीकडे सरकारनें आपल्या सक्तीच्या क्षेत्राची मर्यादा ठेवूं नये हें बरें. जें वर्तन स्वयंस्फूर्तीनें झालें तरच त्यास किंमत आहे, अशा बाबतींत सक्ती करणें, हेंहि तितकेंच गर्ह्य समजलें पाहिजे. उदाहरणार्थ पुनर्विवाहाची स्त्रियांना कायद्यानें बंदी करून पातिव्रत्याची वृद्धी करूं इच्छिणें अयुक्त आहे. तसेंच मूर्तींचा सक्तीनें विध्वंस केल्यानें लोकांना ईशस्वरूपाचें ज्ञान होईल अशी अपेक्षा करणें हेंहि बरोबर होणार नाहीं.

वरील विवेचनावरून असें दिसून येईल कीं, कांहीं विशिष्ट प्रकारचें स्वातंत्र्य व्यक्तींना देणें समाजहिताच्याच दृष्टीनें अत्यंत अवश्य आहे.

नागरिकांचे मूलभूत हक्क.

हें स्वातंत्र्य उपभोगण्याच्या हकांना नागरिकत्वाचे मूलभूत हक्क असें समजून त्यांचें योग्य संरक्षण होण्याबद्दल प्रत्येक

सुधारलेल्या सरकारकडून शक्य ती खबरदारी घेतली जाणें अवश्य आहे. समाजहिताच्या दृष्टीनेंच व्यक्तीच्या हक्कांचा विचार करावा लागतो व समाजविघातक असा कोणताही हक्क व्यक्तीला देणें योग्य होणार नाहीं, यावरून व्यक्तींच्या हक्कांची कल्पना सापेक्ष आहे, असें दिसून येईल. समाजाव्यतिरिक्त व्यक्तीला अस्तित्व नाहीं व जन्मापासून त्याला समाजानें व्यापिलेलें आहे. व्यक्तीचा स्वभाव, त्याची मनोरचना व त्यांचे विचार, या सर्वांवर समाजाचा परिणाम होत असतो. मात्र व्यक्तीचे हक्क समाजाहिताशीं सापेक्ष आहेत, याचा अर्थ तात्पुर्त्या समाजहिताकडे लक्ष देऊन समाजाच्या चिरंतन हिताला अवश्य असणारे व्यक्तीचे हक्क काढून घ्यावेत असा करणें केव्हांही बरोबर होणार नाहीं. तथापि कांहीं संकटप्रसंग सर्व राज्यावरच गुदरला तर आपद्धर्म म्हणून व्यक्तींच्या मूलभूत हक्कांनाही कित्येक प्रसंगीं मर्यादित करावें लागतें, पण असले प्रसंग अपवादात्मकच समजले पाहिजेत.

सामान्यतः पुढील हक्क मूलभूत गणून त्यांच्या संरक्षणाची व्यवस्था प्रत्येक सुधारलेल्या सरकारनें केली पाहिजे असें अलीकडील विद्वानांचें मत दिसून येतें.

(१) जीवितसंरक्षण व शारीरिक स्वातंत्र्य.

(२) खासगी मालमत्तेचा हक्क.

(३) करार करण्याचा हक्क.

(४) संघस्वातंत्र्य.

(५) मतस्वातंत्र्य व मतप्रसारस्वातंत्र्य.

(६) धर्म व मनोदेवता यासंबंधींचे हक्क.

(७) कौटुंबिक हक्क.

जीवित संरक्षण व शारीरिक स्वातंत्र्य, यासंबंधीचे हक्कः—समाजाचें जीवित व्यक्तींच्या जिवावरच अवलंबून असल्यामुळें, व्यक्तींच्या जीवि-

जीवित संरक्षण
व
शारीरिक स्वातंत्र्य

ताचें संरक्षण करणें हें सरकारचें आद्य कर्तव्य आहे याबद्दल विशेष चर्चा करण्याचें कारण नाहीं. प्रत्येक व्यक्तीला आपल्या जीविताचें रक्षण करण्याचा व करवून घेण्याचा हक्क आहे. तथापि याचा अर्थ मनुष्यांनीं स्वेच्छेनें प्राण-दान करण्यास केव्हांच तयार होऊं नये, असा होत नाहीं. आपलें कर्तव्य बजावीत असतां प्राणदान करण्यास तयार असणें ही मनुष्याच्या अंतःकरणाची अत्यंत प्रशस्त अशी वृत्ति आहे. तथापि ही वृत्ति सक्तीनें केव्हांही निर्माण होऊं शकत नाहीं; व म्हणूनच कोणावरही प्राणदान करण्याचा प्रसंग येऊं नये याबद्दल सरकारनें दक्षता बाळगली पाहिजे. युद्धासारख्या राष्ट्रीय आपत्तिच्या प्रसंगीं व राष्ट्रीय जीविताला धोका उत्पन्न झाला असतां प्रजेवर लढण्याची सक्ती करण्याचा प्रघात बहुतेक देशांत आहे. पण अगदीं निरुपाय झाल्याखेरीज स्वयंसेवकाचें तत्त्व सोडून या सक्तिच्या अधिकाराचा उपयोग करण्यांत येत नाहीं.

सामान्य प्रसंगीं जीवितस्वातंत्र्याचा अर्थ कोणी कोणास ठार मारूं नये इतकाच समजला जातो. खून करणाऱ्या व्यक्तीला बहुधा फांशीचीच

हत्यारांची मोकळीक.

शिक्षा देण्यांत येते. जीवनस्वातंत्र्याचे कांहीं कैवारी फांशीच्या शिक्षेच्या अगदीं विरुद्ध आहेत. तथापि हें मत फारच थोड्या लोकांना पटतें. सरकारनें प्रजेच्या जीविताचें संरक्षण करण्याकरितां कितीही व्यवस्था केली तरी व्यक्तीला स्वसंरक्षणार्थ शस्त्राचा उपयोग करण्याचा अधिकार असल्याखेरीज लोकांच्या जीविताचें खरें संरक्षण होऊं शकत नाहीं. आपल्या देशांत हत्यारांचा परवाना सामान्य लोकांना सहज मिळण्यासारखा नसल्यामुळें कित्येक प्रसंगीं अकारण मृत्युमुखीं पडण्याचा प्रसंग

कांहीं लोकांवर येतो. याशिवाय सर्व प्रजा निःशस्त्र झाल्यामुळें लोकांत एक प्रकारचें स्त्रैण्य उत्पन्न झालेलें आहे.

शारिरिक स्वातंत्र्याच्या तत्त्वाप्रमाणें कोणावरहि न्यायसभेंत उघड चौकशी होऊन गुन्हा शाबीत झाल्याखेरीज बंदींत पडण्याचा प्रसंग येऊं नये. याबद्दल सरकारी कायद्यांत योग्य तजवीज झाली असली पाहिजे. त्याचप्रमाणें कोणत्याही व्यक्तीला न्यायासनासमोर चौकशीकरितां उभें करण्यापूर्वीं, वाजवीपेक्षां अधिक काळ अटकेंत ठेवण्यांत येतां कामा नये. एखाद्या व्यक्तीस कोणा अधिकाऱ्यानें बिगर चौकशी अटकेंत ठेवल्यास त्याची मुक्तता करण्याचे किंवा त्याची उघड चौकशी करवून घेण्याचे इंग्लंडांत दोन मार्ग आहेत. एक ज्या मनुष्यानें दुसऱ्यास अटकेंत ठेवलें असेल त्याच्यावर न्यायासनासमोर खटला करणें, किंवा न्यायासनाकडून अटक झालेल्या मनुष्यास सोडून देण्याबद्दल अगर त्याची कायदेशीर चौकशी करण्याबद्दल “ हीबस कॉर्पस् रिट ” नांवाचा हुकूम मागून घेणें. या गोष्टी अटक झालेल्या इसमास अगर त्याच्या संबंध्यास करतां येतात.

हीबस कॉर्पस् रिट.

खासगी मालमत्तेचा हक्कः—खासगी मालकीची कांहीं संपत्ति नसेल तर मनुष्यांना कोणतेंही स्वातंत्र्य उपभोगतां येणार नाहीं. संपत्ति ही एक शक्ति आहे. हिच्या योगानें स्वार्थ किंवा परमार्थ दोन्हीही साधण्यास उपयोग होतो. व्यक्तींना खासगी संपत्ति सांठविण्याचा अधिकार नसल्यास सामान्य लोक संपत्ति उत्पन्न करण्यासाठीं प्रयत्न करणार नाहींत. प्रत्येकाला आपल्या कष्टार्जित संपत्तीवर समाजानें हक्क दिलेला आहे म्हणूनच लोक उद्योग करतात. कुटुंबांत ज्याप्रमाणें कांहीं व्यक्ती पैसा मिळवितात व त्याचा उपभोग कुटुंबांतील सर्व व्यक्ति घेतात तशी स्थिति समाजांत उत्पन्न होणें शक्य दिसत नाहीं. कुटुंबांतील व्यक्तींमध्यें जितकें दृढ

प्रेम असतें, तितकें समाजांतील सर्व व्यक्तींत उत्पन्न होणें शक्य नसल्यामुळे खासगी संपत्तीची संस्था समाजांतून अजीबात नष्ट करावी असें कोणीही विचारी मनुष्य आज म्हणत नाहीं. समाजसत्तावादी लोक समाजांत खासगी संपत्ति मुळींच असूं नये असें म्हणतात, अशी कित्येकांची कल्पना आहे; पण ती खरी नाहीं. मोठमोठे कारखाने, जमिनी, खाणी यांसारखी संपत्त्युत्पादनाचीं साधनें खासगी मालकीचीं असूं नयेत, एवढेंच त्यांचें म्हणणें आहे. या गोष्टी खासगी मालकीच्या असल्या तर अनेक लोकांच्या जीवनक्रमावर धनिक लोकांची सत्ता चालू शकते, आणि प्रत्ये-काला आपल्या श्रमाचा योग्य मोबदला मिळावा, हें जें खासगी मालकीच्या संस्थेचें आद्यतत्त्व, त्याला हरताळ फासला जातो, असें ते समजतात. म्हणून खासगी मालमत्तेच्या उपयोगावर नियंत्रण असावें असें ते म्हणतात. व्याज, खंड व नफा हे निरुद्योगानें द्रव्य संपादन करण्याचे मार्ग बंद करून शारी-रिक किंवा बौद्धिक श्रम करणें हा एकच द्रव्यार्जनाचा मार्ग मोकळा ठेवावा असें त्यांचें मत आहे. कांहीं झालें तरी खासगी संपत्ति अजीबात नष्ट करावी असें कोणीही म्हणत नाहीं.

एक गैरसमज

करार करण्यासंबंधी हक्कः—खासगी व्यक्तींना खुषीचे करार कर-ण्याचे हक्क दिलेले आहेत; आणि त्या करारांतील अटी दोन्ही पक्षांकडून पाळल्या जातात किंवा नाहीं हें सरकार पाहात असतें. म्हणूनच समाजांतील नानाविध व्यवहार चालले आहेत. ज्या करारांच्या योगानें समाजहिताला कायमचा धक्का बसण्याचा संभव आहे असले करार कायदेशीर समजले जात नाहींत. उदाहरणार्थ कोणत्याही व्यक्तीला करारानें दुसऱ्याची गुलाम-गिरी पतकरतां येणार नाहीं. करार करतांना कोणी कोणाला फसवीत नाहीं, कोणी कोणावर सक्ति करीत नाहीं किंवा अयोग्य दडपण आणीत नाहीं हें पाहाणें सरकारचें कर्तव्य आहे. करार करण्याचें स्वातंत्र्य प्रत्येक प्रौढ

व्यक्तीला पूर्णपणें असावें, या मताची उभारणी ज्याला त्याला आपलें हित दुसऱ्यापेक्षां अधिक समजणें शक्य आहे, या तत्त्वावर झाली आहे. सामान्यतः हें तत्त्व बरोबर असलें तरी त्याला पुष्कळ अपवाद आहेत. शिवाय, मनुष्य अडचणींत असला म्हणजे कळूनसवरूनही आपल्या हिताविरुद्ध करार लिहून देण्यास तयार होतो, या गोष्टी ध्यानांत घेऊन कारखानदार आणि मजूर, किंवा जमीनदार आणि कुळें यांच्यांतील आर्थिक विषमतेकडे लक्ष देऊन त्यांच्यामध्यें होणाऱ्या करारांचें कायद्यानें नियंत्रण करण्याचा अधिकार अलीकडे सर्व सुधारलेल्या सरकारांनीं बजाविलेला आहे. अशा कायद्यांना कांहीं काळ समाजसत्ताप्रस्थापक कायदे असें समजत असत. पण आज व्यक्तिस्वातंत्र्यवादी लोकांनाही ते कायदे पसंत पडूं लागले आहेत. करार करणाऱ्यांच्या आर्थिक परिस्थितींत ज्यावेळीं विलक्षण अंतर असतें त्यावेळीं व दरिद्री लोकांच्या पोटापाण्याच्या सोयीच्या अडचणीचा अयोग्य फायदा घेतला जाण्याचा संभव असतो त्यावेळीं हीन स्थितींतील लोकांचें संरक्षण करणें हें आज सरकारचें एक प्रमुख कर्तव्य समजलें जातें.

संघस्वातंत्र्यासंबंधीं हक्कः—कराराचा हक्क आणि संघस्वातंत्र्य यांचा फार निकट संबंध आहे. कोणाही तिऱ्हाइताच्या हिताला धक्का पोंचत नसेल तर कोणासही आधिभौतिक किंवा आध्यात्मिक उन्नतीसाठीं वाटेल ते संघ, समाज किंवा संस्था स्थापन करण्यास हरकत नसावी असा सामान्य नियम आहे. अर्थात् बेकायदेशीर कृत्य करण्याच्या उद्देशानें कोणताही संघ स्थापन करण्याचा अधिकार कोणासही नाहीं हें सांगावयास नकोच. पण संघस्वातंत्र्याची मर्यादा याहूनही थोडी संकुचित करणें अवश्य आहे. व्यक्ति आणि संघ यांच्या स्वातंत्र्यांत बराच फरक आहे. जीं कृत्यें व्यक्तीनें केलीं असतां राज्याला किंवा समाजाला धोका येण्याचा संभव नाहीं तींच कृत्यें संघामार्फत होऊं लागल्यास राज्यांतील सरकारला धोका उत्पन्न

होण्याचा आणि संघाबाहेरील किंवा संघांतीलही व्यक्तींवर जुलूम होण्याचा संभव असतो. या कारणामुळें संघासंबंधीं कांहीं विशिष्ट नियम सरकारला करावे लागतात. संघनिष्ठ समाजसत्तावाद म्हणून जो नवा पंथ पाश्चात्य देशांत निघाला आहे तो संघस्वातंत्र्याला फारच महत्त्व देतो. सरकारच्या सत्तीविरुद्ध संघाच्या स्वातंत्र्याचें संरक्षण करणें हें त्याचें ब्रीद आहे. एके काळीं व्यक्तिस्वातंत्र्याचें प्रस्थ जसें वाढलें होतें तसेंच संघस्वातंत्र्याचें आज पाश्चात्य देशांत वाढण्याचीं चिन्हें दिसत आहेत.

मतस्वातंत्र्य व मतप्रसारस्वातंत्र्यः—प्रत्येक व्यक्तीला आपलें मत बनविण्याचा व त्याचा प्रसार करण्याचा अधिकार कां दिला पाहिजे हें मागें सांगितलेंच आहे. मतस्वातंत्र्याला आणि त्यांच्या प्रसाराला युरोपांतील धर्माधिकाऱ्यांकडून मध्ययुगांत अतिशय तीव्र विरोध झालेला आहे. प्रॉटेस्टंट पंथ स्थापन झाला त्यावेळीं विशिष्ट धार्मिक मतांबद्दल अनेक लोकांना जिवंत जाळल्याचींही उदाहरणें युरोपच्या इतिहासांत नमूद आहेत. त्याचप्रमाणें तत्त्वनिष्ठ लोकांनीं सत्याग्रहाचा अवलंब करून स्वतःला स्वेच्छेनें जाळून घेतल्याचीं उज्वल आदर्शभूत उदाहरणेंही या वेळच्या युरोपियन इतिहासांत अनेक आढळतात. आपल्या इकडे मुसलमानी अमदानींत अशा प्रकारचीं कांहीं उदाहरणें झाल्याचें लोक सांगतात. तथापि एकंदरीत या देशांत पूर्वींपासून मतसहिष्णुतेचें तत्त्व बरेंच अमलांत असलेलें दिसतें. सनातन वैदिकधर्मी व बुद्धधर्मी लोकांनीं किंवा राजांनीं धर्मच्छळ केल्याचीं विशेष उदाहरणें नाहींत. तसेंच मुसलमान धर्मांतील लोकांना मतस्वातंत्र्याबद्दल हिंदू राजांनीं त्रास दिल्याचींही उदाहरणें आपल्या देशाच्या इतिहासांत आढळत नाहींत. हें मतसहिष्णुतेचें तत्त्व अलीकडे युरोपियन लोकांस मान्य झालें असून बहुतेक देशांत व्यक्तींना आपलें मत बनविण्याचा व त्याचा प्रसार करण्याचा हक्क उपभोगितां येतो. सामान्यतः प्रत्येक राज्यांत सध्यां मतप्रसाराच्या स्वातंत्र्याला दोन मर्यादा घातलेल्या दिसून येतात. एक,

कोणी कोणाची निष्कारण बेअब्रू करूं नये आणि दुसरी, कायदेशीर सरकार उलथून पाडण्याच्या हेतूनें अत्याचारास प्रोत्साहन देऊं नये. पहिल्या मर्यादेसंबधीं असें मत आहे कीं, कोणाची बेअब्रू करणारीं विधानें सत्य असलीं व तीं प्रसिद्ध करणें समाजहिताला अवश्य असलें तर तीं प्रसिद्ध करण्यास हरकत नाहीं. परंतु ज्यांचा सार्वजनिक हिताशीं संबंध नाहीं, अशीं दुसऱ्याचीं बेअब्रू करणारीं उदाहरणें खरीं असलीं तरी तीं कोणींही प्रसिद्ध करूं नयेत. सरकारविषयीं होणाऱ्या टीकेसंबंधीं प्रायः प्रत्येक पाश्चात्य राष्ट्रांत पुष्कळ स्वातंत्र्य दिलेलें आढळतें. प्रस्थापित सरकारच्या दोषाविष्करणाला अगदींच आळा घातल्यास कोणतीच राजकीय सुधारणा होणें शक्य नाहीं. उलट प्रस्थापित सरकारविरुद्ध अत्याचार करण्यास प्रोत्साहन देण्याचें कायदेशीर स्वातंत्र्य लोकांना दिल्यास देशांत शांतता व सुव्यवस्था राहाणें अगदींच अशक्य होईल. प्रस्थापित सरकारविरुद्ध टीका करण्याच्या हक्काच्या मर्यादेसंबंधीं महात्मा गांधींनीं १९२२ सालीं राजद्रोहाच्या आपल्यावरील खटल्यांत कोर्टांत सादर केलेल्या जबानींत ग्रथित केलेलें पुढील तत्त्व तात्त्विक दृष्टीनें मान्य होण्याजोगें आहे असें आम्हांस वाटतें.

म. गांधींचें उद्गार.

" Affection cannot be manufactured or regulated by law. If one has no affection for a person or a thing one should be free to give a fullest expression to his disaffection so long as he does not contemplate, promote or incite to violence "Gandhi's speechess & writings. Published by. Natesan & co. P. 755.

" प्रीति कायद्यानें उत्पन्न करतां येत नाहीं, किंवा तिचें कायद्यानें नियमनही करतां येत नाहीं. जर एखाद्याच्या अंतःकरणांत अप्रीति असेल असेल, तर जोपर्यंत तो अत्याचार करूं इच्छित नाहीं, किंवा अत्याचारास

मदत अगर प्रोत्साहन देत नाहीं, तोंपर्यंत त्याला आपली अप्रीति व्यक्त करण्यास पूर्ण स्वातंत्र्य असावें." प्रस्थापित सरकारविरुद्ध सशस्त्र बंड करण्याचा अधिकार केव्हांही "कायदेशीर" या सदरांत येऊं शकत नाहीं. तथापि, कांहीं विशिष्ट परिस्थितींत कितीही सुधारलेली राज्यपद्धति असली तरी प्रजेला तिच्याविरुद्ध बंड करण्याचा नैतिक अधिकार आहे हें तात्त्विक दृष्टीनें अमान्य करतां येत नाहीं असें प्रो० सिज्विकसारख्या राजनीतिशास्त्रज्ञाचें मत आहे. ते आपल्या राजनीतीचीं मूलतत्त्वें या ग्रंथांत म्हणतात,

बंडाचा हक्क; सिज्विकचें मत

("I conceive, then, that a moral right of insurrec. tion must be held to exist in the most popularly governed community. In saying this I do not mean to imply thae this viloent remedy ought to bt or is likely to be brought in to operation frequentely in a modern civilized society. .... Still I think it important to dispel the illusion that any form of government can ever give a complete security against civil war.") Elements of Politics. P. 647—48.

"पूर्ण लोकसत्ताक राज्याखालील लोकांना सुद्धां बंड करण्याचा नैतिक अधिकार आहे, असें मानणें भाग आहे असें मला वाटतें. असें म्हणतांना हा अत्याचाराचा उपाय सुधारलेल्या आर्वाचीन समाजांत वारंवार उपयोगांत आणावा किंवा आणला जाण्याचा संभव आहे असें म्हणण्याचा माझा आशय नाहीं. तथापि राज्ययंत्राचें कोणतेंही स्वरूप अंतःकलहाच्या (Civil War) संकटाचें पूर्ण निवारण करूं शकेल, हा भ्रम दूर करणें महत्त्वाचें आहे असें मला वाटतें."

धर्म व मनोदेवता यांसंबंधींचे हक्कः—मत स्वातंत्र्याच्या विवेचनांत धर्ममतांच्या सहिष्णुतेचा विचार झालाच आहे. धार्मिक आचरणा संबंधीं मात्र थोडी मर्यादा घालणें अवश्य आहे. जे धर्माचार प्रचलित नैतिक भावनांच्या विरुद्ध असतील ते सक्तीनें बंद करण्याचा अधिकार सरकारला असावा. धर्माच्या नांवावर दुसऱ्यावर जुलूम करण्याचा कोणासही अधिकार असतां कामा नये. हीच गोष्ट मनोदेवतेच्या किंवा सदसद्विवेक बुद्धीच्या आज्ञेसही लागू आहे. सदसद्विवेक बुद्धीनें प्रेरित होऊन कोणीही केलेलें कृत्य समाजविघातक असल्यास त्याला सरकारनें शिक्षा केलीच पाहिजे. या संबंधांत व्यक्तीचें कर्तव्य आणि सरकारचें कर्तव्य यांत कांहीं अंशीं कायमचा विरोध असणें अपरिहार्य आहे. सरकारी कायद्यानें एखादी गोष्ट करणें अवश्य आहे असें ठरविलें आणि ती करणें आपल्या धार्मिक किंवा नैतिक भावनांच्या अगदीं विरुद्ध आहे असें एखाद्या व्यक्तीस वाटत असल्यास तो कायदा मोडून अवश्य ती शिक्षा सहन करणें हें व्यक्तीचें कर्तव्य आहे. या संबंधींही प्रो. सिज्विक यांनीं दिलेलें पुढील मत मननीय आहे.

"...... it is also generally recognised that Positive Law may sometimes command what morality and religion forbid and that in such cases there is a moral obligation to disobey the law"

Elements of Politics—Page 24

कौटुंबिक हक्कः—समाजांतील व्यक्तींना कुटुंबें करून राहाण्याचा अधिकार आहे व त्यांतच समाजाचें खरें हित आहे; या संबंधीं कोणाचाहि मतभेद नाहीं. व्यक्तीच्या खाजगी मालकीच्या संपत्ती संबंधीं समाजसत्तावादी लोकांच्या मतांचा जसा विपर्यास करण्यांत येतो तसा त्यांच्या कौटुंबिक मतासंबंधींहि बराच विपर्यास करण्यांत येऊन समाजसत्तावाद्यांना कुटुंब ही संस्था नको आहे असें कांहीं लोक बोलत असतात, व लिहीतही असतात. पण

त्यांत कांहीं तथ्यांश नाहीं. याचा स्पष्ट खुलासा फिलिफ स्नोडन यांनीं आपल्या सोशॅलिझम् व सिंडिकॅलिझम् या पुस्तकांत केलेला आहे.[१] कौटुंबिक हक्कांत वैवाहिक हक्क, स्त्री स्वातंत्र्य, मुलांचे हक्क वगैरे प्रश्नांचा अंतर्भाव होत असतो. तसेंच अनुवंशिक उत्पन्नावरील हक्कांचाहि यांतच समावेश होतो. या सर्व बाबींत निरनिराळ्या समाजांच्या धार्मिक व नैतिक भावनांवर उभारलेले कायदे निरनिराळ्या देशांत आहेत. वैवाहिक हक्कासंबंधीं प्रौढ स्त्रीपुरुषांनीं स्वेच्छेनुरूप प्रेमविवाह करावेत हें मत सर्व सुधारलेल्या देशांत आज प्रचलित होत आहे. आपल्या देशांतही बालविवाहाचा प्रघात अन्याय्य आहे हें मत सर्वमान्य होऊं लागलें असून स्त्रीशिक्षण, स्त्रीस्वातंत्र्य आणि प्रौढविवाह, या तीन प्रशस्त प्रघातांचें पर्यवसान स्वयंवराच्या पद्धतींत होईल अशीं चिन्हें दिसत आहेत. स्वयंवर हा शब्द ज्या प्रमाणें आपणांस अपरिचित नाहीं, त्याचप्रमाणें प्रेमविवाहाची कल्पनाही आपल्या पूर्वपरंपरेला किंवा उच्च नैतिक भावनांना सोडून नाहीं. सीता, सावित्री, दमयंती या सारख्या आमच्या स्त्रीवर्गाला अत्यंत पूज्य असणाऱ्या स्त्रियांनीं स्वयंवरेंच

---

१ ' There is no socialist of authority who does not hold the view that the family and marriage will remain as institutions under socialism, though both will undergo a much desired transformation when the economic—compulsion to women to sell themselves in marriage or into a loveless association is removed. Socialism stands for a free & healthy sex—relationship, for free—marriage and for a family life under economic conditions where husband and wife will be comrades too. Sharing each other's joys & sympathies in loving cooperation.

Socialism and Syndicalism. P, 196.

केलीं आहेत. तात्पर्य स्त्रीस्वातंत्र्य व स्वयंवर या कल्पना आपल्या आदर्शभूत स्त्रीचारित्र्याशीं अत्यंत संलग्न आहेत व त्यांचा प्रसार दिवसेंदिवस येथें झाल्याखेरीज राहाणार नाहीं. वैवाहिक हक्कांत एक पत्नीव्रताचाही समावेश होतो.त्याचप्रमाणें कुटुंबांतील लहान मुलांवर उद्योगधंद्यांची अकालीं भार पडूं नये, स्त्रियांना अपत्य संगोपनाचें कार्य सोडून द्रव्यार्जनाचें कार्य अंगीकारणें भाग पडूं नये, स्त्रियांनीं द्रव्यार्जन न केलें तरी कौटुंबिक संपत्तिवर त्यांचा हक्क पुरुषाइतकाच असावा, लहान मुलांच्या शिक्षणाची आणि वृद्ध मनुष्यांच्या शुश्रुषेची व्यवस्था कुटुंबांतील कर्त्या मनुष्यांकडून केली जावी वगैरे संबंधीं कायद्यांचीं बंधनें दिवसें दिवस वाढत जाऊन कौटुंबिक दास्य किंवा आपत्ति यांचा पूर्ण मोड झाला पाहिजे.

आतांपर्यंत ज्या हक्कांचें विवेचन केलें, तें बहुतेक सुधारलेल्या देशांतील प्रचलित कायद्यांत प्रविष्ट झालेले आहेत. आतां आणखी एक दोन

अद्यापि सर्वमान्य न झालेले हक्क.

हक्कांसंबंधीं लिहावयाचें आहे. या हक्कांना अद्यापि सर्व देशांत जरी कायद्यानें मान्यता दिलेली नाहीं तरी ती मान्यता लवकरच मिळेल असें दिसतें. व्यक्तिस्वातंत्र्यवादी व समाजसत्तावादी अशा दोन्ही पंथांच्या पाश्चात्य विद्वानांना तें आतां मान्य झालेलें असून आमच्या पूर्वापार भावनांतही त्यांना योग्य स्थान मिळालेलें आहे. ते हक्क म्हणजे चरितार्थ संपादनाचे हक्क होत.

चरितार्थसंपादनासंबंधीं हक्कः—कोणत्याही सुधारलेल्या देशांतील प्रत्येक व्यक्तीला श्रम करून चरितार्थ करितां आला पाहिजे. मनुष्य श्रम

हॉब हौस यांचें मत.

करण्यास तयार असून त्याला उद्योगधंदा मिळेनासा झाला तर तो त्याचा दोष होऊं शकत नाहीं. समाजांतील औद्योगिक परिस्थितींत बिघाड झाल्यानें देशांत बेरोजगारी

वाढते व त्यामुळें उद्योगप्रिय व प्रामाणिक लोकांनाही उद्योगाच्या अभावीं उपासमार करावी लागते. अशी स्थिति निर्माण होणें, हें समाजाला लांछन आहे व म्हणून प्रत्येक सुदृढ व्यक्तीला रोजगार मिळेल अशी व्यवस्था करणें हें समाजाचें व सरकारचें कर्तव्य आहे. इंग्लंड वगैरे पाश्चात्य देशांत औद्योगिक क्रांति होऊन यंत्रकलेच्या साहाय्यानें मालाची निपज होऊं लागली, तेव्हां अशीच बेरोजगारी माजली होती. गेल्या महायुद्धानंतर तीच स्थिति फिरून सर्वत्र पसरलेली आहे. शिवाय असे प्रसंग गेल्या शकतांत अनेकवार अनेक देशांत आलेले होते. हे प्रसंग टाळणें व आले असतां लोकांना रोजगार मिळवून देण्याची कांहीं तरी सोय करणें, हें प्रत्येक सरकारचें कर्तव्य आहे, असें सर्व विचारी लोकांना वाटूं लागलें आहे. तसेंच जे लोक उद्योग करीत आहेत त्यांना त्यांच्या व त्यांच्या कुटुंबाच्या पोषणास अवश्य इतकें तरी किमान वेतन मिळालें पाहिजे. हा त्यांचा हक्क आहे व समाजानें व सरकारनें त्या हक्कांचे इतर मूलभूत हक्का इतकेंच संरक्षण केलें पाहिजे. या हक्कांचा पुरस्कार प्रथम समाजसत्तावाद्यांनीं केला, तरी पण आज त्यांना व्यक्तिस्वातंत्र्यवादी पक्षांतील लोकांनींही मान्यता दिलेली आहे. एल. टी. हॉब हौस हे एक लिबरल पक्षाचे ग्रंथकार आहेत, त्यांनीं " लिबरॅलिझम " नांवाच्या आपल्या पुस्तकांत पुढील विचार व्यक्त केले आहेत.

" The right to work, and the right to a living wage are just as valid as the rights of .person or property. That is to say they are integral conditions of good social order. " Liberalism Home University Liabrary P. 159,

आपल्या इकडे परदेशी यांत्रिक माल येऊं लागल्यापासून खेडयापाडयांतील हजारो धंदे बुडून गेल्यामुळें इंग्लंडसारख्या संपन्न देशांत मधून

मधून उत्पन्न होणारा हा बेरोजगारीचा रोग आमच्या देशाला कायमचाच जडून बसला आहे व त्यामुळें खेडयांतील कर्जबाजारी अतोनात वाढली आहे. या बेरोजगारीचें निवारण करणें हें सरकारचें कर्तव्य आहे, परंतु येथील सरकार परकीय असल्यामुळें तें तिकडे लक्ष देत नाहीं. या करितां खेडयांतील उद्योगधंद्यांना उत्तेजन देणें व तेथें बनलेला माल वापरणें हें या देशांतील सुशिक्षित लोकांचें नैतिक कर्तव्य आहे.

व्यक्तिस्वातंत्र्यवाद व समाजसत्तावाद यांच्यांतील मतभेद व मतैक्य.

येथपर्यंत प्रत्येक अर्वाचीन राज्यांत व्यक्तिमात्राचे मूलभूत किंवा जन्मसिद्ध असे कोणते हक्क समजले जातात व ते कां समजलें जातात आणि त्यांच्या मर्यादा कोणत्या आहेत, इत्यादी प्रश्नांचें विवेचन करण्यांत आलें त्यावरून व्यक्तिस्वातंत्र्यवादी व समाजसत्तावादी या दोन्ही पक्षांच्या लोकांत या मूलभूत हक्कांसंबंधीं कशी एकवाक्यता आहे, तें दिसून येईल. समाजांतील व्यक्तींना योग्य तें स्वातंत्र्य उपभोगितां आलें पाहिजे याविषयीं खरा मतभेद नाहीं. समाजसत्तावादही व्यक्तिस्वातंत्र्याच्या खऱ्या ध्येयाला विरोध करूं इच्छित नाहीं. जो वाद आहे तो ध्येयविषयक नसून साधनसंबंधक आहे. जोंपर्यंत समाजांतील जमिनी व कारखाने यांसारखी संपत्त्युत्पादनाचीं साधनें खासगी मालकीची आहेत, तोंपर्यंत त्या जमिनीची कष्ट मशागत करणाऱ्या व कारखाने चालविणाऱ्या समाजांतील उद्योगी बहुसंख्याक लोकांना खरें स्वातंत्र्य मिळत नाहीं आणि त्यांना जमीनदार व कारखानदार लोकांचें आर्थिक दास्य पतकरावें लागतें, असें समाजसत्तावादी लोकांचें मत आहे. ही स्थिति नष्ट करून संपत्त्युत्पादनाचीं साधनें सामाजिक माल-

कीची झाली म्हणजे सर्वांना आपल्या श्रमांचा योग्य मोबदला मिळून समाजांतील एकंदर लोकांच्या खासगी मालकीची संपत्ति व व्यक्तिस्वातंत्र्य यांची वृद्धीच होईल असें त्यांना वाटतें. सध्या कारखानदार व जमीनदार लोकांच्या स्वातंत्र्याची व संपत्तीची अयोग्य व प्रमाणाबाहेर वाढ झाली असल्यानें एकंदर लोकसमाजाच्या संपत्तीचा व स्वातंत्र्याचा फार संकोच झाला आहे अशी त्यांची तक्रार आहे. अर्थात् जीवितस्वातंत्र्य, शारीरिक-स्वातंत्र्य, मतस्वातंत्र्य, मतप्रसारस्वातंत्र्य, धर्मस्वातंत्र्य, संघस्वातंत्र्य, स्त्रीस्वातंत्र्य वगैरे तत्त्वांना त्यांचा विरोध नाहीं हें उघड आहे.

दण्डनीतीचें विरोधाभासात्मक स्वरूप.

व्यक्तिमात्राला अत्यंत अवश्य अशा ज्या स्वातंत्र्याचा वर उल्लेख केला आहे, त्याच्या संरक्षणाकरितां सरकार या सक्तिप्रधान संस्थेची कशी जरूरी आहे, हें येथपर्यंतच्या विवेचनावरून ध्यानांत आलेंच असेल. स्वातंत्र्याच्या प्रस्थापनेकरितां सक्तीची आवश्यकता या शब्द-प्रयोगांतील विरोधाभासासंबंधी दोन शब्द लिहून हें प्रकरण संपावयाचें आहे. ही राज-नीति किंवा राजधर्मच एक प्रकारच्या विरोधाभासावर उभारलेला आहे, हें नेहेमी ध्यानांत ठेविलें पाहिजे. क्षात्रधर्माचें वर्णन करतांना भीष्माचार्यांनीं पुढील उद्गार काढले आहेत

अधर्मरूपो धर्मोहि कश्चिदस्ति नराधिप ।
धर्मरूपो ह्यधर्मश्च तच्च ज्ञेयं विपश्चिता ॥
शांतिपर्व अ. ३२ श्लो. २०

म्हणजे कित्येक प्रसंगीं धर्माचें रूप अधर्मासारखें व अधर्माचें रूप धर्मासारखें असतें व तें शहाण्या मनुष्यानें जाणिलें पाहिजे. समाजांत सक्ति-प्रधान संघटना तर हवी, परंतु तिनें लोकांवर अन्याय्य सक्ती तर करूं नये

अशी व्यवस्था करणें हेंच राज्यघटनेंतील कौशल्य आहे[१] हा हेतु साध्य होण्यास कशा प्रकारची राज्यघटना असली पाहिजे, या चर्चेस पुढील प्रकरणापासून प्रारंभ व्हावयाचा आहे.

---

१ जे. ए. आर. मेरियट यांनीं आपल्या "इंग्लिश राजकीय संस्था" या ग्रंथांत राज्यघटनेच्या प्रश्ना संबंधीं म्हटलें आहे.

" The problem to be solved has nevr been better stated than by an old fashiond writer. The great problem of government is to make the Executive power sufficiently strong to procure the peace and order of society and yet not to have it sufficiently strong to disregard the wishes and happiness of the community. "

English Political. Institutions. P. 46.

प्रकरण ४ थें.

लोकसत्तेचें स्वरूप व मर्यादा.

भेदमूलो विनाशो हि गणानामुपलक्षये ।
मन्त्रसंवरणं दुःखं बहुनामिति मे मतिः ॥ ८ ॥
प्राज्ञान् शूरान्महोत्साहान्कर्मसु स्थिर पौरुषान् ।
मानयन्तः सदा युक्ता विवर्धन्ते गणाधिप ॥ २० ॥
मन्त्रगुप्तिः प्रधानेषु चारश्चामित्रकर्षणं ।
न गणाः कृत्स्नशो मन्त्रं श्रोतुमर्हन्ति भारत ॥ २४ ॥
गणमुख्यैस्तु संभूय कार्यं गणहितं मिथः ॥ २५ ॥

—शांतिपर्व अ. १०७.

वरील श्लोकांत महाभारतकारांचें तत्कालीन गण नांवाच्या लोकसत्ताक राज्यपद्धतिसंबंधींचे विचार ग्रथित झालेले आहेत. भारतवर्षांत प्राचीनकाळीं अनेक लोकसत्ताक राज्यें नांदत होती; याबद्दल आतां इतिहासज्ञांत मुळींच मतभेद उरलेला नाहीं. महाभारतांत गण या संज्ञेनें त्यांचा उल्लेख झालेला असून शांतिपर्वाच्या १०७ व्या अध्यायांत या गणसंस्थांच्या उत्कर्षापकर्षाचें विवेचन युधिष्ठिर व भीष्माचार्य यांच्यामधील संवादरूपानें केलेलें आहे. गणांचा म्हणजे लोकसत्ताक राज्यांचा विनाश भेदमूलक आहे अशी युधिष्ठिरानें प्रस्तावना केलेली असून, "तस्मात् संघातमेवाहुर्गणांना शरणं महत्" म्हणजे गणांची सुस्थिति त्यांच्यांतील ऐक्यभावनेवरच अवलंबून आहे असा भीष्माचार्यांनींही अखेरीस निर्णय दिलेला आहे. त्याचप्रमाणें "बहुनां मन्त्रसंवरणं दुःखं" म्हणजे राजकीय धोरण

महाभारतकार
व
लोकसत्ताक राज्यें.

लोकसत्ताक राज्यपद्धतींत अनेकांच्या हातीं असल्यानें तें गुप्त राहणें कठीण असा युधिष्ठिराचा आक्षेप आहे. यावर "मन्त्रगुप्तिःप्रधानेषु" म्हणजे प्रधान मंडळासारखी संस्था नेमून मन्त्रगुप्ति साध्य करावी. " न गणाः कृत्स्नशो मंत्रं श्रोतुमर्हन्ति भारत" सर्व लोक राज्याचें धोरण ऐकण्यास लायक नसतात असें भीष्मानीं सांगितलें आहे. तसेंच सूज्ञ, शूर, उत्साही आणि कर्तृत्ववान अशा पुढाऱ्यांवर विश्वास ठेऊन त्यांचा योग्य सन्मान ठेवणारीं लोकसत्ताक राज्यें भरभराटीस येतात असें सांगून " गणमुख्यैस्तु संभूय कार्यं गणहितं मिथः। " म्हणजे लोकसत्ताक राज्यांतील पुढाऱ्यांनीं सहकार्यानें व गुप्तपणें लोकहिताचीं कार्यें करावींत असें म्हटलें आहे.

" तस्मान्मानयितव्या स्ते गणमुख्याः प्रधानतः।
लोकयात्रा समायत्ता भूयसी तेषु पार्थिव ॥ "

या श्लोकांतही लोकांचे व्यवहार चांगले चालणें हें ज्याअर्थीं गणमुख्यांवरच अवलंबून असतें त्याअर्थीं त्यांना मान दिला पाहिजे, असाच उपदेश केलेला आहे. तात्पर्य लोकसत्ताक राज्यें असलीं तरी लोकहित साध्य होणें अगर न होणें, त्यांतील नेत्या वर्गावरच अवलंबून असतें, त्यांना योग्य तो सन्मान लोकांनीं दिला पाहिजे. राज्याचें धोरण प्रधान मंडळासारख्या छोट्या सुटसुटींत संस्थेच्या हातीं असल्याखेरीज त्याला अवश्य तो गुप्तपणा राहूं शकत नाहीं आणि गणराज्यांना बाह्यशत्रूंपेक्षां अंतर्गत पक्षभेदाचें विशेष भय असतें, (आभ्यंतरं भयं रक्ष्यं असारं बाह्यतो भयम्।) वगैरे लोकसत्ताक राज्यपद्धतीसंबंधींचें विवेचन फारच मार्मिक आणि प्रस्तुत राजनीतिज्ञांच्या विचाराशीं बहुतांशीं जुळणारें असें आहे यांत शंका नाहीं. अर्थात् वरील चर्चा प्रत्यक्ष अनुभवाच्या आणि तत्कालीन संस्थांच्या निरीक्षणावर रचलेली असली पाहिजे हें उघड आहे. प्राचीन भारतीय लोकसत्ताक राज्यांतील राज्यघटनेसंबंधी मिळणाऱ्या माहितीपेक्षां आज ग्रीक व रोमन नगर राष्ट्रांच्या राजकीय इतिहासाची माहिती अधिक उपलब्ध

असल्यामुळें त्या देशांतील तत्कालीन तत्त्ववेत्यांचे लोकसत्ताक राज्यपद्धती संबंधी काय विचार होते हें समजून घेऊन नंतर आर्वाचीन काळच्या पाश्चात्य विद्वानांचे लोकसत्तेचे अनुभव व विचार कशा प्रकारचे आहेत तें पाहूं.

ग्रीसमधील अथेन्स राष्ट्रांत प्राचीन काळीं लोकसत्तेचा कळस झालेला होता व अथीनियन लोकसत्तेइतकी वैभवशाली लोकसत्ता आजपर्यंत जगाच्या इतिहासांत झाली नाहीं असें बरेंच युरोपियन समजतात व तें खरेंही आहे. तथापि ॲरिस्टॉटाल, प्लेटो वगैरे ज्या ग्रिक तत्त्ववेत्त्यांचीं मतें आज आपणास उपलब्ध आहेत ती सर्व बहुधा शुद्ध निर्भेळ लोकसत्तेला प्रतिकूल असल्याचें दिसून येतें[1] ॲरिस्टॉटलच्या मतानें राज्याचा विनाश भेदमूलकच आहे. या भेदाच्या कारणाला तो " Stasis " वर्गद्वेष किंवा " पक्षद्वेष " असें नाव देतो. त्याची वर्गद्वेषाची मीमांसा फारच बोधप्रद आहे. कांहीं लोकांना आपण एका बाबींत दुसऱ्याशीं समान योग्यतेचे आहोंत असें समजलें म्हणजे आपण सर्वच बाबींत समान दर्जाचे आहों असें वाटूं लागतें आणि याच्या उलट कांहींना आपण एखाद्या बाबींत इतरांहून श्रेष्ठ आहों असें समजलें

प्राचीन ग्रीक लोकसत्ता व तत्कालीन तत्त्वज्ञ.

---

1 " I think, we may take it as undeniable that whatever merits the full blown democracy of the fourth century in Greece may have had, it was generally disliked and condemned by the class of thoughtful persons whose utterances go down to posterity. " The Development of European polity. p 112—13 by H. Sidgwick.

म्हणजे आपण सर्वच बाबींत तसे आहोंत असें वाटूं लागतें. पहिल्या भावनेनें लोकसत्तेंत अनर्थ माजतात, तर दुसऱ्या भावनेनें महाजनसत्तेंत अनर्थ उद्भवतात. लोकसत्तेंतील लोकांना सर्वच लोक सर्व बाबतींत सारख्या दर्जाचे आहेत असें वाटू लागून ते सद्गुणी किंवा विद्वान किंवा धनिक अल्पसंख्याकांचा द्वेष करूं लागतात; म्हणून राज्यांत पक्षद्वेष माजतो.तर महाजन-सत्तेंतील श्रेष्ठ वर्गाला आपण सर्वच बाबींत इतरांहून श्रेष्ठ आहोंत असा भ्रम होऊन ते बहुसंख्याकांवर जुलूम करूं लागतात व त्यांतून पक्षद्वेषाचा उगम होतो. याकरितां केवळ लोकसत्ता किंवा केवळ महाजन-सत्ता अशा एकाच तत्त्वावर राज्यघटनेची उभारणी करणें हितावह नसून उत्तम राज्यघटनेंत या दोन्ही तत्त्वांचें योग्य संमिश्रण झालेलें असावें, असा ॲरिस्टॉटलचा अखेरचा निर्णय आहे. तथापि शुद्ध लोकसत्ता व शुद्ध अल्प-जनसत्ता यांत निवडच करण्याचा प्रसंग आल्यास शुद्ध लोकसत्ता बरी असेंही त्यानें लिहून ठेविलें आहे.[1] लोकसत्तेंतील सर्वच लोकांना सारखाच मत-दारीचा हक्क दिला असल्यानें त्यांना मोठ्या लोकांना मान देऊं नये कारण आपण सर्वजण सारख्याच योग्यतेचे आहोंत असें वाटण्याचा संभव असतो. म्हणूनच भीष्माचार्यांनीं “ तस्मान्मानयितव्यास्ते गणमुख्याः प्रधानतः । ” म्हणजे आपल्यांतील नेत्यांना योग्य मान द्यावा असा जोराचा उपदेश केलेला आहे.

प्लेटोचें चातुर्वर्ण्य.

प्लेटोचेंही उत्तम राज्यघटनेसंबंधींचें मत निर्भेळ लोकसत्तेला प्रतिकूलच आहे. प्लेटोनें आपल्या चातुर्वर्ण्यव्यवस्थेप्रमाणेंच ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र (Philosophers; fighting classes, artisens & hus-bandmen, slaves) अशा प्रकारें चार वर्ण कल्पिले असून त्यांपैकीं पहिल्या दोन वर्णांस त्यानें राज्यांचे संरक्षक मानिलें आहे. प्लेटोच्या कल्पने-

1 See Aristotle's Politics 1302 a.

प्रमाणें सर्वोत्कृष्ट राज्यघटनाही महाजनसत्ताक स्वरूपाची असून तिच्यांतील सत्ताधारी वर्ग तत्त्वज्ञांचा असावा असें होतें. अशा प्रकारची समाजसत्ता किंवा विद्वज्जनसत्ता प्रत्यक्ष व्यवहारांत दृष्टीस पडणें कठीण आहे, हें त्यास मान्य आहे. तथापि राजसत्ता एकंदर सामान्य लोकांच्या हातीं जाऊन राज्य दुर्बल बनण्यापेक्षां ती कोणत्या तरी अल्पसंख्यांक वर्गाच्या हातीं असलेली बरी, असें त्यास वाटत होतें.

ॲरिस्टॉट्ल, प्लेटो, झेनोफन् किंवा आयसोक्रेटीस् यांसारख्या तत्त्ववेत्त्यांचा वर्ग सोडून देऊन लोकांकडून आपली निवड करवून घेण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्या व्यवहारदक्ष मुत्सद्यांच्या वक्तृत्वपूर्ण भाषणांचा विचार केल्यास त्यांत शुद्ध लोकसत्तेचें बरेच गोडवे गाइलेले आपणांस आढळतात. परंतु अशा लोकांच्या भाषणांकडे विशेषसें लक्ष देण्याची आवश्यकता नाहीं. ग्रीक राष्ट्रांतील राज्यपद्धतीबद्दल हल्लींच्या युरोपियन राजनीतिज्ञांचे कशा प्रकारचें मत आहे याची कल्पना येण्यासाठीं प्रो० सिज्विक यांच्या तत्संबंधीं मतांचा गोषवारा येथें देतों. अथेन्समधील लोकसत्ताक राज्यांत व्यक्तिस्वातंत्र्याला पुष्कळच अवसर असून टॉकेव्हिली किंवा मिल्ल यांसारख्या आर्वाचीन विद्वानांस बहुमतांच्या जुलमाची (The tyranny of the majority) युरोपांतील भावी लोकसत्तेखालीं जी भीति वाटत होती, तिला अथीनियन लोकसत्तेच्या इतिहासांत फारसा आधार मिळत नाहीं. बहुसंख्यांक गरीब वर्गानें अल्पसंख्याक धनिक वर्गावर जुलूम, जबरदस्ती किंवा अन्याय केल्याचीं काहीं उदाहरणें अथीनियन इतिहासांत सांपडत असलीं तरी त्याच्या योगानें अथेन्समधील धनिक वर्गानें राज्यत्याग करावा, किंवा इतर राज्यांतील धनिकांनीं तेथें येऊं नये इतक्या मर्यादेला हा जुलूम खास पोंचलेला नव्हता. तसेंच लोकसत्ताक राज्यांतील

प्राचीन ग्रीक लोकसत्ता व सिज्विकचें मत.

अधिकारी अनेक प्रसंगीं लांचखाऊ, दुर्वृत्त व जुलमी दिसून आले तरी, हा दोष केवळ लोकसत्ताक राज्यांतच विशेष आढळत होता असें मानण्यास आधार नाहीं. त्याचप्रमाणें करांचा भार धनिकवर्गावरच विशेष वाढविण्याची जी प्रवृत्ति अथेन्समध्यें लोकसत्तेच्या काळांत दिसून येते ती फार पुरातन असून निर्भेळ लोकसत्तेमुळें ती विशेष वाढली होती असें म्हणतां येत नाहीं. अशा प्रकारें अथेन्समधील निर्भेळ लोकसत्तेचें कांहींसें समर्थन (Qualified defence) प्रो. सिज्विक यांनीं केलें असलें तरी ग्रीस देशांतील इतर लोकसत्ताक राज्यांना हें समर्थन लागू पडत नाहीं असेंही त्यांनीं कबूल केलें आहे. आतां अथेन्समध्यें लोकसत्तेहून अन्य प्रकारची राज्यघटना अस्तित्वांत असती तर तें राज्य मॅसिडोनच्या फिलिपच्या साम्राज्यांत अंतर्धान पावलें नसतें असा जो कांहीं लोकांचा तर्क आहे तो मात्र प्रो० सिज्विक यांना पटत नाहीं. कारण मॅसिडोनच्या बादशहाच्या स्वारीनें अथेन्ससारख्या लोकसत्ताक राज्याबरोबरच स्पार्टासारखें महाजनसत्ताक राज्यवृक्षही उलथून पाडले होते. एकंदरींत अथेन्सची लोकसत्ता वगळल्यास ग्रीसमधील लोकसत्ताक राज्यांत अल्पसंख्यांक धनिकांवर वारंवार जुलूम व अन्याय होत असावा असेंच सिज्विक यांचें मत आहे.

येथपर्यंत भारतीय व युरोपियन देशांतील प्राचीन लोकसत्ताक राज्यपद्धतीसंबंधीं तत्कालीन विद्वानांचें काय मत होतें याचा विचार झाला.

प्रातिनिधिक लोकसत्ता व महाजनसत्ता.

आतां आधुनिक काळांत पाश्चात्य देशांत ज्या लोकसत्ताक संस्था स्थापन झालेल्या आहेत त्यांच्या स्वरूपासंबंधीं व त्यांच्यांतील गुणदोषासंबंधीं तेथील विद्वानांचें काय मत आहे हें पाहावयाचें आहे. आर्वाचीन युरोपांत जी लोकसत्ता आज दृष्टीस पडते ती प्रातिनिधिक स्वरूपाची आहे आणि प्रातिनिधिक स्वरूपाची लोक-

सत्ता ही एक प्रकारची लोकनियुक्त महाजनसत्ताच आहे, ' हें नेहमीं ध्यानांत ठेविलें पाहिजे. एकोणिसाव्या शतकांत युरोपांत जे लोक मोठे लोकसत्तेचें चाहते होऊन गेले व आजही साधारण जुन्या वळणाचे जे राजनीतिज्ञ हयात आहेत ते सर्व अर्वाचीन लोकसत्तेच्या या प्रातिनिधिक स्वरूपावर विशेष भर देणारे आहेत, व लोकसत्तेच्या या स्वरूपांत महाजनसत्तेचें योग्य संमिश्रण होऊं शकतें या कल्पनेनेंच प्रातिनिधिक लोकसत्तेचें त्यांनीं समर्थन केलेलें आहे. एकोणिसाव्या शतकांत जोसेफ मॅझिनी हा लोकसत्तेचा एक अनन्य भक्त होऊन गेला असें म्हणण्यास हरकत नाहीं. तो म्हणतो, लोकसत्तेच्या तत्त्वांचा प्रातिनिधिक तत्त्वाशीं जो संयोग झालेला आहे तो अगदीं अर्वाचीन असून यामुळेंच पूर्वींच्या लोकसत्ताक राज्यांचा दाखला अर्वाचीन लोकसत्तेला लागू पडत नाहीं. या दोन्ही राज्यघटनांचें नांव जरी एकच असलें तरी त्यांचें स्वरूप वस्तुतः अगदीं भिन्न आहे. [१] मॅझिनीची

मॅझिनी.

प्रातिनिधिक लोकसतेची कल्पना महाजनसत्तेच्या तत्त्वाशीं बरीच सदृश अशी आहे. समाजांतील अत्यंत विद्वान् आणि सदाचारी अशा लोकांच्या नेतृत्वाखालीं सर्वांनीं आपली प्रगति करणें हेंच लोकसत्तेचें

---

1 " As I have said a Representative Parliament is a kind of elective aristocracy. "

Introduction to Political *Science* by *Seeley*. Page 353

1 " The union of the Democratic principle with the representative Government is an entirely modern fact, which throws out of Court all precedents that might be appealed to, they have nothing but the *Word* in Common, the thing is radically Different. " Mazzini on thoughts upon Democracy.

लक्षण आहे असें तो म्हणतो.[१] तसेंच अर्नेस्ट् बार्कर हे एक इंग्लंडांतील हयात राजनीतिज्ञांत प्रसिद्ध राजनीतिज्ञ आहेत. त्यांचीही लोकसत्तेची कल्पना समाजांतील अत्यंत लायख व सदाचारी लोकांच्या हातीं राजसत्ता असावी अशा प्रकारचीच आहे;आणि प्रातिनिधिक संस्थांचें तेंच ध्येय आहे, असें ते समजतात.[२] त्याचप्रमाणें जेम्स ब्राईस, सिज्विक वगैरे पसिद्ध राजशास्त्रज्ञांची विचारसरणी पाहिली तरी अशाच प्रकारें प्रातिनिधिक तत्त्वांमुळें लोकसत्तेंत अंतर्भूत होणारें महाजनसत्तेचें तत्त्व कायम राहावें असें त्यांचें मत असल्याचें

सिज्विक.

दिसून येतें. लोकांनीं आपले प्रतिनिधि निवडतांना त्यांच्या अंगीं आपणांपेक्षां कांहीं तरी अधिक ज्ञान आहे, अशा समजुतीनेंच निवडले पाहिजेत. ज्यांना राज्ययंत्र उत्तम तऱ्हेनें चालवितां येईल अशा प्रकारचे प्रतिनिधि निवडणें हें लोकांचें कार्य आहे. परंतु त्याला आपलें काम शिकविणें हें लोकांचें कार्य नव्हे,[३] असें सिज्विक यांनीं स्पष्ट बजाविलें आहे. यावरूनच मतदानाचा अधिकार सार्वत्रिक असला तरी प्रातिनिधिक लोक-

---

1 " The progress of all through all under the leadership of the best & wisest. " Ibid

2 " No believer in democracy would deny the great contention of Plato and Carlyle, that the aristocracy of the ablest and best should rule; but most believers in democracy would doubt whether such an arstocracy can be found by any other means than the free choice of all . "

Political thought from Spencer to to-day. p.190.

3 " What the electors have to do is to choose the man best qualified for the business of govern-

सत्ता ही निर्भेळ लोकसत्ता नसून तींत लोकसत्तेचा व महाजनसत्तेचा योग्य मिलाफ झालेला आहे असें त्यांचें मत आहे.[२] आपल्या अमेरिकन कॉमन वेल्थ या पुस्तकांत जेम्स ब्राईस यांनींहि असेच विचार प्रगट केले आहेत.

ब्राइस.

लोक कितीहि शहाणे झाले तरी त्यांना लायक पुढाऱ्यांची गरज लागत नाहीं असें कधींहि होणें शक्य नाहीं; आणि इतर कोणत्याहि राज्यघटनेपेक्षां लोकसत्ताक राज्यघटनेंत चांगल्या व लायख पुढाऱ्यांची अत्यंत जरूरी आहे असें ब्राईस यांनीं आपलें मत दिलेलें आहे. लोकांतील अज्ञान व बेसावधपणा यांच्यावर उपाय म्हणून प्रातिनिधिक राज्यपद्धतींत राज्यकारभाराची खरी जोखीम विशिष्ट गुणसंपन्न अशा मुद्दाम निवडलेल्या प्रतिनिधींच्यावर टाकलेली असून ज्या कामाला विशेष कौशल्याची किंवा विशिष्ट ज्ञानाची गरज असेल त्या करितां तद्विषयक तज्ञांची एखादी संस्था स्थापन करून तिच्याकडे तें काम सोंपवावें अशी व्यवस्था केलेली असतें. अशा पद्धतीमुळें लोकसत्ताक पद्धतीचें सामर्थ्य कायम राहून

---

ment, not to teach him his business." Elements of Politics p. 558

2 "According to any view, then, the representative system in its best form will realise to a substantial extent the principle of aristocracy in combination with the principle of democray." Ibid. p. 618

"The people are good, but not good enough to be able to dispense with efficient service by capable representatives and officials, wise guidance by strong and enlightened leaders." The American Common Wealth p. 640

तिचे दोष कमी होतात. याच्या योगानें लोकांच्या सामान्यतः काय भावना आहेत व त्यांना काय हवें आहे हें प्रतिनिधींना समजतें आणि लोकांच्या भावना किंवा आकांक्षा सफल होतील असे उपाय प्रतिनिधि आपल्या विद्वत्तेच्या व बुद्धिकौशल्याच्या साहाय्यानें शोधून काढितात. परंतु अमेरिकन लोकांनीं या पद्धतीचा करावा तितका उपयोग करून घेतला नसल्यामुळें त्यांना तिचे फायदे उपभोगितां येत नाहींत अशी ब्राईस यांची तक्रार आहे. तेथील लोक आपल्या प्रतिनिधींवर विश्वास ठेवून त्यांना द्यावा तितका मान देत नाहींत. त्यांना आपल्या अधिकारांचा स्वेच्छेनें उपयोग करण्यास योग्य अवसर देत नाहींत. त्यांच्या लायकीकडे पाहून त्यांची निवड करीत नाहींत व ते आपणापेक्षां अधिक लायक आहेत असें न समजतां त्यांनीं आपल्या अधिकारांचा उपयोग आपण सांगूं त्याप्रमाणेंच केला पाहिजे याबद्दल आग्रह धरितात असें त्यांनीं अमेरिकन राज्यपद्धतीवर व लोकांवर आक्षेप घेतले आहेत. तात्पर्य "तस्मान्मानयितव्यास्ते गणमुख्याः प्रधानतः" या भीष्माचार्यांच्या उपदेशाकडे अमेरिकन लोकांचें दुर्लक्ष झालेलें आहे, असें जेम्स ब्राईस यांचें मत आहे. इंग्लंड, फ्रान्स वगैरे युरोपियन देशांतील लोकांत आपल्या प्रतिनिधींवर विश्वास न ठेवितां आपणच सर्व बाबतींत निर्णय देण्याची वृत्ति फारशी दिसून येत नाहीं, असें ते म्हणतात. परंतु अमेरिकेच्या राज्ययंत्रांतील वरील दोष हा एक लोकसत्तेच्या परिणतावस्थेचा नैसर्गिक परिणामच आहे, असें ब्राईस यांनीं सुचविलें आहे, किंबहुना कबूल केलें आहे.[१] ज्या मानानें लोकसत्तेची परिणति होत जाते, त्या मानानें प्रति-

अमेरिकन लोकांचा दोष.

1 "I do not however, deny that democratic system makes the people self-confident, and that self-confidence may easily pass into a jealousy of

निर्धीकडे सोंपविलेल्या सत्तेचा लोकांना हेवा वाटूं लागतो, विशेष ज्ञान किंवा बुद्धिकौशल्य यांना मोल दिलें जात नाहीं, आणि कोणतेंही राज्यकारभाराचें काम करण्यास सर्व नागरिक सारखेच लायक आहेत, असा विश्वास लोकांत पसरूं लागतो. हे सर्वच परिणाम अनिष्ट आहेत, असें सिज्विक प्रभृति जुन्या वळणाच्या राजशास्त्रज्ञांचें मत आहे.

लोकसत्तेचे चहाते आपल्या मतांचें समर्थन दोन सिद्धांताच्या आधारें करीत असतात. पहिला सिद्धान्त असा कीं,कोणत्याही देशाचा राज्यकारभार

लोकसत्तेचे दोन सिद्धान्त.

लोकांच्या सक्रिय संमतीनें चालला पाहिजे हा सिद्धान्त प्रातिनिधिक राज्यपद्धतीच्या सिज्विक सारख्या चहात्यांना बहुतांशीं मान्य आहे. दुसरा सिद्धान्त असा कीं, कोणताही प्रामाणिक नागरिक, सामान्यतः दुसऱ्या कोणत्याही प्रामाणिक नागरिका इतकाच, राज्यकारभार करण्यास लायक आहे. हा सिद्धान्त सदरील लोकांना मान्य नाहीं.[1] ग्रीस देशांतील प्राचीन लोकसत्ताक राज्यांत

---

delegated power, an under valuing of skill and knowledge, a belief that any citizen is good enough for any Political work. This is perhaps more likely to happen with a people who have really reached a high level of political confidence, and so one may say that the American democracy is not better just because it is so good." Ibid, p. 636

1 "There seem to be two competing principles, one or other of which is more or less definitely assumed in current arguments for democratic institutions. One of these, which I myself accept, with important qualifications- is that 'Government

राज्यांतील मोठमोठ्या अधिकाऱ्यांच्या नेमणुका चिठ्या टाकून करण्यांत येत असत. अर्थात् तेथें या सिद्धान्ताला पूर्ण मान्यता दिलेली दिसून येते. पण आज ही पद्धती कोणाही विचारी मनुष्यास मान्य होणें शक्य दिसत नाहीं. बहुतेक राजकीय प्रश्नांवर मत बनविण्यास सामान्य लोकांना फारच कमी साधनें उपलब्ध असतात किंवा फारच थोडा काळ असतो आणि समाजांतील सुशिक्षित व सुखवस्तु लोकांना हीं साधनें अधिक उपलब्ध असून त्यांना तसें करण्यास संधि ही जास्त मिळते, याची जाणीव अज्ञान व अशिक्षित लोकांत नेहेमीं जागृत असली पाहिजे, असें सिज्विक यांचें मत आहे.[२] तात्पर्य एकोणिसाव्या शतकांत युरोपांत जे राजकीय तत्त्ववेत्ते होते, ते सर्व प्रातिनिधिक लोकसत्तेचे म्हणजे एक प्रकारच्या महाजनसत्तेचे भोक्ते

महाजनसत्ता व लोकसत्ता.

असून सार्वत्रिक निवडणुकींत यशस्वी होणारे प्रतिनिधि हे लोकांचे खरे पुढारी आहेत व त्यांच्या हातीं राज्यकारभाराचीं सर्व सूत्रें असावींत व तीं त्यांनीं मतदारांच्या मताचें फाजील स्तोम न माजवितां आपल्या प्रामा-

---

should rest on the active consent of the governed' The other is 'That anyone honest and self-supporting citizen is, on average, as well qualified as another for the work of government.' This latter proposition, I in the main reject.' Elements of Politics P. 610.

" It rather appears to me important to keep alive in the mass of comparatively ignorant and uneducated persons a due consciousness of their inferior means and opportunities of fomring a judgment on most Political problems, as compared

णिक मतानुसार हलवावीत असें त्यांचें मत होतें. खरें पाहिलें असतां प्रातिनिधीक लोकसत्तेंत राज्यकारभाराची खरी सत्ता लोकांच्या हातीं येत नसून केवळ राज्यकारभार करणाऱ्या लोकांची निवड करण्याची येवढीच सत्ता लोकांना प्राप्त होते [१] व हेंच उत्तम आहे, असें ते समजत असत. प्रातिनिधिक तत्त्वामुळें उत्पन्न होणारें हें महाजनसत्ताक स्वरूप नष्ट झाल्यास लोकसत्तेंत गोंधळ उडाल्या खेरीज राहाणार नाहीं, अशी त्यांना भीति होती. [२] राज्यकारभाराचें कार्य करण्यास सर्व प्रौढ नागरिक सारखेच लायक आहेत. किंवा त्या कार्यास विशेष कौशल्याची किंवा ज्ञानाची गरज नाहीं, असल्या एकान्तिक समतेच्या तत्त्वांचा त्यांनीं कधींच अवलंब केला नव्हता. त्यांना

with the means and opprtunities possessed by persons of more education and leisure Ibid. P. 558.

1" The truth is,it is not a share in government that is conferred with the franchise, but at the utmost a share in the power of making government. Introduction to Political Science by Seeley P.329.

२ जोसेफ मॅझिनी याची सुद्धां निर्भेळ लोकसत्तेबद्दल एक प्रकारची साशंक वृत्ति होती असे त्याचा चरित्रकार बोल्टन किंग म्हणतो:—

" But it is impossible not to feel that all through Mazzini's thought there runs a certain uneasiness about democracy. He accepted it as an inevitable fact, he recognised that at all events it was superior to all governments based on previlege,it fitted with his theory of Humanity and his own passionate sympathies. But he had an intermittent dread that democracy, like theocracy and monarchy might forget the law of God... ...and this mistrust made him turn to a strong authority, elected and

कृत्रिम किंवा अस्वभाविक विषमता नको असली, तरी गुणकर्मानुसार होणारी विषमता त्यांना अमान्य नव्हती. समाजाच्या हिताकडे लक्ष देणारे समाजाचें प्रेम संपादन केलेले व समाजाला योग्य दिशा दाखवू देणारे हुषार, कर्तृत्ववान्, धीर व तत्त्वनिष्ठ लोकनायक त्यांना हवे होते व अशा स्वाभाविक लोकनायकांच्या हातीं राज्यकारभाराचीं सूत्रें असावीत असा त्यांचा अभिप्राय होता व असे लोकनायक शोधून काढण्याचा सार्वजनिक निवडणुकी हाच एक मार्ग आहे असा त्यांचा भरंवसा होता.

विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून या विचारांचा पगडा कमी होऊं लागून प्रतिनिधी सभांवरील लोकांचा विश्वास उडूं लागला असून[१] राज्य-

---

deposable by the people, but with very extended powers, and charged not only to execute popular mandate but go in advance of it.'The supreme power in a state must not drag behind the stage of civilisation that informs it, it must rather take the lead in carrying it higher. and by anticipating the social thought bring the country up to its leval."

1 " During forty years, faith in parliamentary government has suffered an extraordinary. decline or as some would say, temporary eclipse. This change is visible in every civilised country Depre ciation of or contempt for, representative legislatures clearly exists under the parliamentary and republican government of France, under the federal and republican constitution of the Swiss confederacy, or of the United States; under the essential militarism and the superficial parlia-

प्रत्यक्ष लोक-
सत्तेचे विचार

पद्धतीचें प्रातिनिधिक स्वरूप बदलण्याकडे व प्रत्यक्ष लोकसत्तेची (Lirect democracy) कांहीं अंशीं स्थापना करण्याकडे लोकांची प्रवृत्ति होऊं लागली आहे. या संबंधी डायसीं यांच्या "राज्यघटनात्मक कायदे" या सुप्रसिद्ध पुस्तकांतील टीपेंत दिलेला उतारा वाचला असतां इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, स्विट्झर्लंड, अमेरिका इत्यादि सर्वच देशांतलि लोकांत प्रतिनिधिसभांवरचा विश्वास उडूं लागला आहे असें दिसून येईल. अर्थात् अमेरिकेंतील किंवा इतर कोणत्याही देशांतील राज्ययंत्राची विशिष्ट घटना त्यांस कारण नसून त्याची कांहीं तरी ज्यास्त व्यापक कारणें असलीं पाहिजेत असें मानणें भाग आहे. जेम्स ब्राईस यांनीं म्हटल्याप्रमाणें लोकसत्ताक संस्थांची परिणति व दीर्घ अनुभव यामुळें लोकांत वाढणारा आत्मविश्वास आणि मानवी समतेच्या खोट्या कल्पना हीच या लोकप्रतिनिधीवरच्या अविश्वासाची कारणें नसतलि काय ? अशीही शंका उत्पन्न होते. पण डायसी यांनी या अविश्वासाची[1] वेगळींच कारणें दिलेलीं आहेत.

---

mentarism of the German Empire, and even under the monarchical and historic constitutionalism of the British Empire "

Law of the coustitution by A. V Diecy P,Xcii Introducti on.

1 " what is even more important,parliamentary govrnment has by its continued existence betrayed two defects, hardly suspected by the liberals or reformers of Europe or at any rate of England, between 1832 and 188o. We now know for certain hat while Popular Government may be under wise

तीं अशी– प्रातिनिधिक राज्यपद्धति असो, किंवा इतर कोणतीहि राज्यपद्धीत असो, ती मुळें सर्व मानवी आपत्तींचा पूर्ण नायनाट होईल अशी आशा करणें हा केवळ भ्रम आहे, परंतु असा भ्रम बऱ्याच लोकांना एकेकाळीं उत्पन्न झाला होता. अर्थात् प्रातिनिधिक संस्थांच्या प्रत्यक्ष अनुभवानें अशा लोकांची निराशा होणें हें अगदीं अपरिहार्यच होतें.

प्रातिनिधिक पद्धतीवरचा विश्वास उडण्याचीं कारणें.

या खेरीज एकोणिसाव्या शतकांतील राजकीय सुधारकांच्या लक्षांत न आलेले दोन दोष प्रातिनिधिक लोकसत्ताक राज्यपद्धतींत प्रत्यक्ष अनुभवानें दिसून आले आहेत, असें डायसींचें मत आहे. यांपैकीं पहिला दोष म्हणजे लोकसत्ताक राज्यपद्धति प्रचलित गाऱ्हाणीं दूर करण्याच्या दृष्टीनें कितीहि उपयुक्त असली तरी नवीन संस्था निर्माण करण्याच्या किंवा नवी ध्येयें व्यवहारांत आणण्याच्या दृष्टीनें ही राज्यपद्धति जवळ जवळ निरुपयोगी आहे

---

leadership a good machine for simply destroying existing evils, it may turn out a very poor instrument for the construction of new institutions for the realisation of new ideals. We know further that party government, which to many among the wisest of modern constitutionalists appears to be the essence of England's farfamed constitution, inevitably gives rise to partisanship, and at last produces a machine which may well lead to political corruption and may, when this evil is escaped, lead to the strange but acknowledged result that a not unfairly elected legislature may misrepresent the permanent will of the electors.'

दुसरा असा एक दोष निदर्शनास आला आहे कीं, पक्षभेदावर अवलंबून असणाऱ्या राज्यघटनेमुळें पक्षाभिमान विकोपास जातो, यामुळें हीन व्यवहारास अवकाश मिळतो आणि साधारणतः निर्दोष निवडणुकी झाल्या तरी निवडून आलेल्या प्रतिनिधींचें बहुमत आणि राष्ट्राचें खरें मत यांचा पुष्कळ वेळां मेळ बसत नाहीं. प्रातिनिधिक पद्धतीवर अलीकडील नव्या विचारांच्या समाजसत्तावाद्यांनीं याहूनहि बरेच निरनिराळे आक्षेप आणिलेले आहेत.परंतु त्या सर्वांचा विचार करण्यापूर्वीं जेम्स ब्राईस यांनीं अमेरिकेंतलि लोकसत्तेंतील गुणदोषांचे जें मार्मिक व बोधप्रद विवेचन केलें आहे त्याची माहिती करून घेणें अवश्य आहे.

जेम्स ब्राईस यांनीं आपल्या अमेरिकन कॉमन् वेल्थ या ग्रंथांत अमेरिकेंतलि लोकसत्तेच्या गुणदोषांचें सविस्तर विवेचन केलेलें आहे. प्राचीन युरोपांत ज्या प्रमाणें अथीनियन लोकसत्ता ही आदर्शभूत गणली जात असे त्याचप्रमाणें एकोणिसाव्या शतकांत अमेरिकेची लोकसत्ता पूर्ण परिणत आणि आदर्शभूत अशी समजण्यांत येत असे. अर्थात् तिच्या गुणदोषांचें एका लोकसत्तावादी राजशास्त्रज्ञानें केलेलें विवेचन केव्हांही बोधप्रदच असणार. त्यांनीं आपल्या ग्रंथाच्या दुसऱ्या पुस्तकाच्या निम्या अधिक भागांत लोकसत्ताक राज्यपद्धतींत कोणते गुणदोष उद्भवतात अशी परंपरागत समजूत आहे तें सांगून, त्यांपैकीं कोणते गुणदोष किती प्रमाणांत अमेरिकेंत आढळतात व त्यांचीं खरीं कारणें कोणतीं आहेत, या विषयाची मुद्देसूद मांडणी केलेली आहे. प्रथमतः लोकसत्तेंत जे दोष संभवनीय आहेत अशी निरनिराळ्या तत्त्ववेत्त्यांनीं अटकळ बांधली होती, त्यांपैकीं फक्त एकच दोष अमेरिकेंतील लोकसत्ताक राज्यांत विशेष प्रामुख्यानें दिसून येतो असें आपलें मत दिलें आहे. लोकसत्ताक राज्यपद्धति ही दुर्बल आहे, संक-

लोकसत्तेवरील आक्षेप व अमेरिकन लोकशाही.

टाच्या प्रसंगीं निश्चयानें आणि अविलंबित्वानें ती कार्य करूं शकत नाहीं, लोकांच्या चंचल मनोवृत्तीमुळें तिच्यांत अस्थैर्य उत्पन्न होतें, सत्ताधारी वर्गाबद्दल निर्भयता अंगीं बाणल्यानें लोकांत बेशिस्तपणा वाढतो, मोठेपणाचा हेवा उत्पन्न होऊन सर्वांनाच एका सूत्रांत गोंवण्याची प्रवृत्ति दिसून येते, बहुसंख्याकांचा अल्प संख्याकांवर जुलूम होऊं लागतो, परंपरागत आणि पुरातन सामाजिक संस्थांचा विध्वंस करून नवे नवे सामाजिक किंवा राजकीय प्रयोग करून पाहाण्याची लोकांत उत्सुकता दिसून येते, अज्ञानी लोकांची खुषमस्करी करून लोकप्रिय बनलेले ढोंगी लोकनायक पुढें येऊन देशाचें अनहित करितात आणि स्वार्थी परंतु अज्ञान लोकांच्या आराधनेनें यशस्वी झालेले लोक सत्ताधारी बनतात; अशा प्रकारचे अनेक दोष लोकसत्तेवर आजपर्यंच्या तत्त्ववेत्त्यांनीं लादलेले आहेत. त्यांपैकीं फक्त एकच दोष अमेरिकेच्या लोकसत्तेंत विशेष प्रामुख्यानें दिसून येतो; तो म्हणजे बऱ्याच समुदायाला अप्रिय असलेल्या कायद्यांची अंमलबजावणी करतांना दिसून येणारी ढिलाई, सार्वजनिक शांततेच्या भंगाबद्दल औदासिन्य किंवा गुन्हेगारांबद्दल दाखविली जाणारी वाजवीपेक्षां फाजील सदयता हाच होय. कायदे करणें व त्यांची अंमलबजावणी करणें या गोष्टी आपल्याच हातीं असल्यामुळें बऱ्याच मोठ्या लोकसमुदायाला अप्रिय असलेल्या कायद्यांची विशेष कडक रीतीनें अंमलबजाणी केली जाऊं नये अशी वृत्ति साहाजिकच लोकांत उद्भवते. ही वृत्ति अलीकडे इंग्लंडादि युरोपियन देशांतही वृद्धिंगत होऊं लागली असून एक प्रकारें मोठमोठ्या लोकांकडून बेकायदेशीर वर्तनाला प्रोत्साहन दिलें जात आहे, अशा प्रकारची तक्रार डायसी यांनीं सुद्धां आपल्या राज्यघटनात्मक कायदे (Law of the Constitution) या पुस्तकास नवीन जोडलेल्या प्रस्तावनेंत केलेली आहे. गेल्या तीस वर्षांत इंग्लंड व इतर सुधारलेल्या देशांत बेकायदेशीर वर्तनाचें एक नवीनच तत्त्व उद्भुत झालें असून इतर दृष्टींनीं सन्मान्य अशा लोकांकडून आपल्या सदसद्विवेकबुद्धीच्या

नांवाखालीं राज्यांतील कायदे धाब्यावर बसविणें हें गैरशिस्त नाहीं असें प्रतिपादन करण्यांत येत असतें व त्याप्रमाणें बरेच लोक केव्हां केव्हां तसें आचरणही करतात. कायदेभंगाच्या या नव्या तत्त्वाचा लोकसत्तेच्या मूलभूत तत्त्वांशीं थोडासा दूरचा संबंध आहे असेंही डायसी यांनीं कबूल केलें आहे. ते म्हणतात " जो कायदा बऱ्याच मोठ्या लोकसमुदायाच्या प्रामाणिक मताला बाधक होत असेल तो निदान लोकसत्ताक राज्यांत तरी अन्यायाचा गणला जावा अशा खऱ्या वा खोट्या कल्पनेंतून हें कायदेभंगाचें नवें तत्त्व निघालेलें आहे. आणि सुधारलेल्या समाजाच्या हितालाच नव्हे तर अस्तित्वालाही अत्यवश्यक अशी सरकारकडून व्यक्तीवर किंवा व्यक्तिसमुदायावर केली जाणारी सक्ति ही कायम टिकावयाची असल्यास लोकमताला प्रत्येक प्रसंगीं मान देणें हेंच लोकसत्तेचें आदितत्त्व आहे, या मतास केव्हां तरी बाध आल्याखेरीज राहात नाहीं हें कबूल करण्याची वेळ आलेली आहे. " इंग्लंडांतील पक्षावलंबी राज्यकारभाराच्या (Party government) विकृत स्वरूपाशींहि या कायदेभंगाच्या तत्त्वाचा संबंध आहे, असें डायसी यांचें मत आहे, कारण इंग्लंडसारख्या राज्यघटनेंत नेहेमीं राज्यकारभार कोणत्या तरी एका राजकीय पक्षाच्या

---

1 " The time has come when the fact ought to be generally admitted that the amount of government, that is of coercion, of individuals or classes by the State, which is necessary to the welfare or even to the existance of a civilized community, cannot permanently coexist with the effective belief that deference to Public opinion is in all cases the sole or the necessary basis of a democracy "

Law of the Constitution. P. XIII.

सूत्रचालकांच्याच हातीं असतो, पण अशा पक्षाच्या सूत्रचालकांच्या सत्तेला राष्ट्राची सत्ता किंवा राष्ट्राचा अंमल असें नांव देणेंहि युक्त नाहीं, असें बरेच लोक उघडपणें प्रतिपादूं लागले आहेत. प्रतिनिधिसभांच्या राज्यकारभारावरील अविश्वासाचे ही कायदेभंगाची वृत्ति हें एक स्वरूप आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. तात्पर्य कायद्यांच्या शिस्तीबद्दल थोडा-बहुत अनादर, सरकारी दराऱ्याचा अभाव आणि सरकारी अमलांतील ढिलाई, हा अर्वाचीन लोकसत्तेचा एक खराच दोष आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

अमेरिकन लोकसत्तेचे आणखी दोन दोष.

याशिवाय आणखी तीन दोष अमेरिकन लोकसत्तेंत ब्राईस यांनी दाखविले आहेत. सार्वजनिक कार्यांच्या गंभीर व उदात्त स्वरूपाची अमेरिकन लोकांत विशेष जाणीव दिसून येत नाहीं, असें ते म्हणतात. रोजच्या सामान्य व्यवहारासंबंधीं लोक जशा प्रकारें बोलतात, त्याच प्रकारें राष्ट्रीय प्रश्नांची चर्चा करतात. सार्वजनिक व्यवहारांतील बारिकसारिक जबाबदाऱ्यांकडे दुर्लक्ष केलें जातें, सार्वजनिक आयुष्याचें उदात्त स्वरूप दृष्टीपुढें ठेविलें जात नाहीं, राष्ट्रीय कार्य करीत असतां उच्च भावना बाजूस सारून व्यापारी द्रव्यदृष्टि किंवा व्यवहारदृष्टि स्वीकारली जाते, संस्थानच्या किंवा राष्ट्राच्या अधिपतीबद्दल एकाद्या कारखान्याच्या व्यवस्थापकांहून जास्त आदर दाखविला जात नाहीं व त्यालाही त्याहून अधिक जबाबदारी वाटत नाहीं. हा परिणाम केवळ लोकसत्ताक राज्यपद्धतींचाच आहे, असें म्हणतां येत नाहीं. राष्ट्राच्या सार्वजनिक व्यवहारांचें गंभीर व उदात्त स्वरूप नष्ट होण्यास अर्वाचीन लोकसत्तेच्या उदयाबरोबरच समाजांत जो भांडवलशाहीचा उदय झाला तोहि कारण झाला असण्याचा फार संभव आहे असें आम्हांस वाटतें. या भांडवलशाहीच्या अमर्याद वाढीमुळें आमच्या सार्वजनिक व्यवहारांचें नैतिक,

आध्यात्मिक किंवा धार्मिक स्वरूप नष्ट होऊन त्यांना व्यापारी स्वरूप प्राप्त झालें आहे, असें कांहीं लोकांचें मत आहे. मनुष्यांनीं आपले सामाजिक व्यवहार द्रव्यप्राप्तीच्या आशेनें करावेत, या भांडवलशाहीला आधारभूत असलेल्या असत्य व अनर्थावह तत्त्वानें युरोपीयन लोकांना गेलीं दोन तीन शतकें पछाडलें होतें, परंतु त्यांतून आतां त्यांची मुक्तता होत असून द्रव्यप्राप्तीच्या हेतूऐवजीं समाजसेवेची बुद्धि सामाजिक व्यवहारांत दिसूं लागावी, असें त्यांना वाटूं लागलें आहे[१]. विशेषत: संघनिष्ठ समाजसत्तावाद्यांचा या गोष्टीवर फार कटाक्ष असलेला दिसतो. कोणाही सामान्य मनुष्याच्या अंतःकरणांतून स्वार्थबुद्धि अजीबात नष्ट होईल, असें म्हणतां येत नाहीं, परंतु आपल्या पूर्वापार परंपरेप्रमाणें ब्राह्मणक्षत्रियवैश्यादि वर्गांनीं आपापलीं सामाजिक कर्तव्यें चोखपणें करणें, हा त्या त्या वर्गांचा धर्म आहे, अशी धर्मबुद्धि समाजांत जागृत असल्यास राष्ट्राच्या सामाजिक किंवा राजकीय व्यवहारांना उदात्त व गंभीर स्वरूप येऊं शकतें. ही गोष्ट इतर कोणत्याही राज्यपद्धतीप्रमाणें लोकसत्ताक राज्यपद्धतींतही होणें शक्य आहे. अर्थात् राष्ट्रीय व्यवहाराचें उदात्त व गंभीर स्वरूप नष्ट झालें याचा दोष लोकसत्ताक राज्यपद्धतीला न देतां, भांडवल-

---

1 " The disastrous asumption on which the capitalist system was based-an assumption as immoral as it was fortunately untrue-that man in society is and should be inspired in the exercise of his function, by the passion for riches, was a morbid obsession into which Western Europe passed less than three centuries ago, and out of which it is now emerging. "

A Constitution for the Socialist Common Wealth by Webb.

शाहीच्या वाढीमुळें समाजांत उत्पन्न झालेल्या स्वार्थी भावनेला व व्यापारी-वृत्तीला देणेंच जास्त सयुक्तिक दिसतें.

तिसरा दोष.

अमेरिकन लोकसत्तेचा तिसरा दोष म्हणजे राष्ट्राच्या एकंदर सार्वजनिक व्यवहारांत सर्वच दर्जाच्या लोकांना प्रथमतः तरी सारखीच किंमत दिली जात असल्यानें समाजांतील विलासी चिकित्सक लोकांना त्यांत एक प्रकारच्या ग्राम्यवृत्तीचा वास येतो व म्हणून ते सार्वजानिक कार्यांत घालावें, तितकें लक्ष घालीत नाहींत. याला इतरही अनेक कारणें आहेत, परंतु मतदानाच्या अधिकारांत सर्वच दर्जाच्या मतदारांना एकाच दावणींत गोंवण्याच्या लोकसत्तेच्या पद्धतीकडे त्याचा बराच संबंध असावा असें म्हणण्यास हरकत नाहीं. जेम्स ब्राईस यांच्या मतें या स्थितीचीं कारणें कांहीं अंशीं सामाजिक आहेत, व कांहीं अंशीं अमेरिकेच्या विशिष्ट राज्यघटनेंत आहेत. अमेरिकेंतील लोकांना औद्योगिक मार्गांत आपलें दैव काढण्यास युरोपापेक्षां अधिक अवसर आहे, त्यांच्यांत राजकीय अधिकाराच्या आशेपेक्षां आर्थिक महत्त्वाकांक्षा विशेष आहे व लोकांतही राजकीय पुढाऱ्यांपेक्षां मोठमोठ्या व्यापाऱ्यांना व कारखानदारांना अधिक मान मान्यता मिळते, म्हणून महत्त्वाकांक्षी व उत्साही लोक राजकारणांत विशेष भाग न घेतां उद्योगधंद्यांतच गढून असतात, हें या स्थितीचें सामाजिक कारण आहे. तसेंच अमेरिकेच्या राज्यघटनेंत लोकप्रतिनिधींना किंवा पुढाऱ्यांना आपलें कर्तृत्व दाखविण्यास विशेष अवसर ठेवलेला नसून, प्रत्येक संस्थेची व अधिकाराची सत्ता चोहोंकडून मर्यादित केलेली आहे व सामान्य लोकांच्या हातींच खरी राजसत्ता दिलेली आहे. सामान्य लोक आपल्या पुढाऱ्यांच्या मतांना मान न देतां ज्या त्या बाबतींत आपलींच मतें पुढाऱ्यांवर लादतात. यामुळेंहि लोकांचें नेतृत्व करण्यास उत्साही, निस्वार्थी व महत्त्वाकांक्षी लोक तितकेसे पुढें येत नाहींत

व म्हणून राजकीय नेतृत्व सामान्य प्रतीच्या व स्वार्थी लोकांच्या हातीं गेलेलें आहे. अशा प्रकारें अमेरिकेंतील सार्वजनिक आयुष्यांतील ग्राम्यत्वाचा दोष तेथील विशिष्ट राज्यघटनेवर व सामाजिक परिस्थितीवर ब्राईस यांनीं लादलेला आहे. परंतु आम्ही वर म्हटल्याप्रमाणें सर्वच दर्जाच्या मतदारांना एकाच पंक्तीला बसविण्याच्या हल्लीच्या लोकसत्तेच्या आद्यतत्त्वाशींही त्याचा अत्यंत निकटसंबंध आहे असें कांहीं लोकांना वाटतें. मताधिकाराच्या बाबतींत ज्ञान, अनुभव, कर्तृत्व व चारित्र्य यांना हल्लींच्या लोकसत्ताक राज्यांत अवश्य तो मान दिला जात नाहीं व म्हणून हल्लींचे मतदानाचें तत्त्व मूलतःच बरोबर नाहीं, असेंहि कांहीं लोकांना वाटतें. याचा विचार पुढें लोकसभांच्या घटनेसंबंधीं विवेचन करतांना करावयाचा आहे. तूर्त डॉ. बेझंटबाई यांचे यासंबंधीचें मत[१] खालीं टीपेंत देऊन दुसऱ्या मुद्याचा विचार सुरू करूं.

अमेरिकेंत सामान्य लोक आपल्या प्रतिनिधींवर विशेष विश्वास न ठेवितां आपल्याच मताप्रमाणें राज्यकारभाराचा गाडा हाकविण्याचा प्रयत्न करीत असल्यामुळें त्यांच्या अनुभवावरून सामान्य लोकांच्या

---

1 "A system which gives a vote of equal weight to a Gladstone and a clodhopper, which sends an empty headed fop to Parliament rather than a man ripe in years, in knowledge and in experience, which is influenced more by a glib tongue than by a weighty arguement—such a system for making our rulers cannot be the *ne plus ultra* of human genius devising the perfection of Government"

Selfgovernment for India. New India Pamphlet.

लोकमताचे निर्णय केव्हां चुकतात व केव्हां बरोबर असतात ?

अंगीं राजकीय धोरण ठरविण्याचें कितपत सामर्थ्य आहे, त्यांचें धोरण कोठें बरोबर ठरतें व तें कोठें चुकतें, हें समजण्यास बरेंच साधन झालें आहे, असें ब्राईस यांचें मत आहे. यासंबंधीं ब्राईस यांनीं काढिलेला निष्कर्ष फारच बोधप्रद आहे. ते म्हणतात " व्यापक व साध्या प्रश्नांचा निर्णय करण्यास सामान्य लोक समर्थ असतात. विशेषतः ज्या प्रश्नांचा नैतिक भावनांशीं संबंध येतो, त्यांत तर सामान्य लोकांच्या मतांची युक्तता विशेषच प्रगट होते. परंतु ज्या प्रश्नांचा निर्णय देतांना सूक्ष्म दूरदृष्टी, विवेचकबुद्धी किंवा विशेष विद्वत्ता यांचें साहाय्य लागतें, अशा संकीर्ण प्रश्नांत सामान्य लोकमत योग्य निर्णय देऊं शकत नाहीं. "

(1 " Nevertheless the masses of the united States as one finds them to-day, show what are the limitations of the average man. They can deal with broad and simple issues, especially with issues into which a moral elementers .... But when a question of intricacy presents itself, requiring either keen foresight, exact reasoning, or wide knowledge, they are at fault.

The American Common Wealth. V.II P-635.)

या ठिकाणीं सामान्य लोकांच्या मताची राज्यकारभाराला कितपत, कशी व कां मदत होऊं शकते, या व्यापक प्रश्नाचा विचार केला पाहिजे.

लोकमताची मीमांसा.

एकेकाळीं कांहीं लोकांची अशी कल्पना होतीं कीं, लोकसत्ताक राज्यांतील प्रत्येक नागरिकानें आपल्या राष्ट्राच्या गरजा काय आहेत, त्या भागविण्यास कोणते उपाय

योजिले पाहिजेत, त्याकरितां कोणते कायदे करावेत, कसे कर बसवावेत, वगैरे प्रश्नांसंबंधीं पूर्ण विचार करून आपलीं मतें बनविलीं पाहिजेत आणि प्रत्येक सार्वजनिक प्रश्नासंबंधीं जीं जीं साधकबाधक प्रमाणें पुढें करण्यांत येत असतात, तीं त्याला पूर्ण अवगत असलीं पाहिजेत. तथापि आज असली भोळी कल्पना कोणासहि पटणार नाहीं. सामान्य लोकांना सार्वजनिक प्रश्नांची साधकबाधक चर्चा करून मत बनविण्याइतकी फुरसतही असत नाहीं आणि त्यांचा विचार करण्याइतकी त्या विषयांची त्यांना आवडही नसते. देशांतील कोणत्याही सार्वजनिक प्रश्नावरचें लोकमत बनविण्याच्या कामांत अनेक लोक भाग घेत असतात, त्यांपैकीं शेकडा पंचाण्णव लोक स्वतःच्या मेंदूला विशेषसा शीण न देतां, आपल्या पूर्वग्रहांनीं आणि भावनांनीं ओढले जातील तिकडे जात असतात व शेंकडा पांच लोक, लोकांच्या या पूर्वग्रहांना आणि भावनांना आपणांस इष्ट असें वळण देण्याचा प्रयत्न करीत असतात. हे शेंकडा पांच लोकही आपलीं मतें केवळ तर्कवश होऊन आहेत तशीं लोकांपुढें मांडण्याचा प्रयत्न न करतां, लोकांचे पूर्वग्रह, आवडीनिवडी व प्रचलित भावना, यांच्याशीं शक्य तितकें जुळतें घेण्याचा कळत अगर न कळत प्रयत्न करीत असतात. शिवाय लोकमत बनविणाऱ्या या शेंकडा पांच लोकांचे प्रयत्नही सर्वस्वी यशस्वी होतात असें नाहीं. अशा परिस्थितींत " लोकमत " म्हणून आपण ज्यास म्हणतों, तें राष्ट्रांतील सामान्य लोकांच्या विचारशक्तीपेक्षां भावनाशक्तीचेंच फळ असण्याचा संभव अधिक असतो. लोकांत ज्या प्रकारच्या भावना ज्या प्रसंगीं उद्दीपित झाल्या असतील, त्या प्रकारचें त्या वेळचें लोकमत असतें. अर्थात् लोकमताकडून तर्कशुद्ध निर्णयाची अपेक्षा न करतां सद्भावनाप्रधान पक्षाभिमानाचीच अपेक्षा केव्हांहि करवयास हवी. लोक सत्पक्षाला चिकटून राहतील किंवा नाहीं, हें त्यांच्यापुढें मांडलेल्या युक्तिवादाच्या तर्कशुद्धतेवर अवलंबून नसून, त्यांच्यांत जागृत असलेल्या व जागृत केलेल्य

सदसद्भवनांवरच प्रामुख्यानें अवलंबून असतें. लोकमताकडून राज्यकर्त्या अधिकाऱ्यांना तार्किक युक्तिवादाचा विशेष लाभ होण्याची आशा नसून, राज्यकारभाराला सद्भावनांचा जोर देण्याचेंच कार्य लोकमतामार्फत होण्याचा विशेष संभव असतो.[१] हे विचार समाजांतील आशिक्षित व हीन स्थितींतील लोकांस जितके लागू आहेत, तितकेच ते सुशिक्षित गणलेल्या सुस्थितींतलि लोकांसही सामान्यतः लागू पडतात, असेंच ब्राइस यांचें मत आहे. वरिष्ठ धंद्यांतील किंवा व्यापारी वर्गांतील लोकांतही सार्वजनिक प्रश्नांचा स्वतंत्र रीतीनें विचार करण्यास लागणारी बुद्धिमत्ता, फुरसत किंवा आवड असणारे लोक फारच थोडे आढळतात असें ते म्हणतात. इतकेंच नाहीं तर, या वरिष्ठ वर्गांतील लोकांत अहंभाव आणि एक प्रकारची स्वार्थबुद्धि विशेष दिसून येत असल्यामुळें, ते सत्पक्षापेक्षां असत्पक्षाकडेच विशेष झुकलेले दिसतात आणि म्हणूनच समाजांतील हीन गणलेल्या लोकांनीं पाठिंबा दिलेल्या कार्यांत बहुधा यश मिळाल्याचें दिसून येतें. समाजांतील वरिष्ठ वर्गांवर फारच थोडे सामाजिक अन्याय होत असल्यामुळें त्यांच्या निवारणार्थ सुरू केलेल्या चळवळींना बहुधा हे लोक विरोध करीत असतात; निदान विशेष प्रोत्साहन देत नाहींत. परंतु

1 " But to the great mass of mankind in all places, public questions come in the third or fourth rank among the interests of life, and obtain less than a third or a fourth of the leisure available for thinking. It is therefore rather sentiment than thought that the mass can contribute, a sentiment grounded on a few broad considerations and simple trains of reasoning, and the soundness and elevation of their sentiment will have more to do with their taking their stand on the side of justice, honour and

एखाद्या बुद्धिमान् व लोकहितैषी थोर पुरुषानें सामाजिक अन्यायाच्या निवारणार्थ एकादी चळवळ सुरू केली असतां, समाजांतील खालच्या वर्गांतील लोक आपल्या सरळ भावनेनें तींत सामील होतात. ज्या कल्पनांना किंवा नवीन विचारांना समाजांतील सुस्थितींतील व सुशिक्षित गणलेल्या लोकांकडून विरोध केला जातो व हीन स्थितींतील अशिक्षित लोकांचाच प्रथम पाठिंबा मिळतो, त्यांनाच पुष्कळ वेळां कालांतरानें सर्व राष्ट्राची मान्यता मिळते. या विरोधाभासाची ही अशी मीमांसा जेम्स ब्राइस यांनीं केलेली आहे.

लोकमताच्या स्वरूपाची अशी चिकित्सा करून लोकमतानुवर्ति राज्यपद्धतीसंबंधीं पुढील तीनचार सिद्धांत ब्राइस यांनीं मांडले आहेत.

लोकमतानुवर्ति राज्यपद्धतीबद्दल तीन सिद्धान्त.

(१) इतर सर्व राज्यपद्धतीप्रमाणें या पद्धतींतही प्रमाद होण्याचा तितकाच संभव असल्यामुळें लोकशाहीचा राज्यकारभार विशेष शहाणपणाचा असतो असें म्हणतां येत नाहीं. तथापि ही राज्यपद्धति इतर कोणत्याही राज्यपद्धतीहून राष्ट्रीय सामर्थ्याला विशेष पोषक आहे, असें म्हणतां येतें. (२) या राज्यपद्धतींत लोकांचें खरें बहुमत कोणत्या बाजूला आहे हें निश्चित करण्याचे योग्य मार्ग शोधून काढणें, ही फारच अवघड गोष्ट आहे. जे प्रश्न विशेष महत्त्वाचे आणि हजारों लोकांच्या व लोकसमुदायांच्या हिताहिताशीं संलग्न झालेले असतात त्यासंबंधीं मतें देतांना व

---

peace, than any reasoning they can apply to the sifting of the multifarious facts thrown before them,and to the drawing of the legitimate inferances therefrom."

The American commonwealth P. 254 Vol II.

मतें मोजतांना जुलूमजबरदस्तीचे, लांचलुचपतीचे किंवा फसवाफसवीचे प्रकार घडूं नयेत याबद्दल अतिशय सावधगिरी बाळगावी लागते. असे प्रकार फार घडूं लागल्यास ही पद्धति अगदींच कुचकामाची ठरते. (३) याखेरीज लोकसत्ताक राज्यपद्धतीचा सर्व अंमल बहुमतावरच अवलंबून असल्यामुळें अल्प मताचे लोक आपलीं मतें धाष्टर्यानें पुढें मांडण्यास कचरण्याचा फारच संभव असतो आणि असें झाल्यास राज्यांतील नव्या विचारांची किंवा कल्पनांची वाढ अजीबात खुंटण्याचा व कित्येक प्रसंगीं अल्पसंख्याक लोकांवर अन्याय किंवा जुलूम होण्याचा फारच संभव असतो. ज्याप्रमाणें अनियंत्रित बादशाहीच्या अमलांत बादशहाची खुषमष्करी करण्याची संवय त्याच्या अधिकाऱ्यांस लागते, त्याचप्रमाणें लोकसत्ताक पद्धतींत सामान्य लोकांची खुषमस्करी करून आपलें राजकीय नेतृत्व कायम ठेवण्याची पुढाऱ्यांना अनिष्ट संवय लागण्याचा संभव असतो. अशा राज्यपद्धतींत स्वतंत्र विचाराचे व मनोधैर्याचे लोक नायक जास्त असावे लागतात. परंतु प्रत्येक महत्त्वाच्या प्रश्नाचा केवळ संख्याबलावर निर्णय दिला जाण्याच्या लोकशाहीच्या वातावरणांत असें पुढारी दुर्दैवानें फारच थोडे निपजतात. लोकसत्तेच्या अमदानींतील या दोषांचें निराकरण करण्याचे दोन मार्ग असतात, एक, लोकांनींच आपल्या व आपल्या अधिकाऱ्यांच्या किंवा प्रतिनिधींच्या सत्तेला कालाची किंवा इतर मर्यादा घालून देणें, आणि दुसरा मार्ग म्हणजे, राजकीय सत्ता शक्य तितक्या अधिक व्यक्तींत व संस्थांत विभागून देणें, व अशा तऱ्हेनें कोणाही एका सत्ताधारी व्यक्तीस किंवा संस्थेस विशेष अनर्थ करण्याची संधि न देणें. यांपैकीं अमेरिकन लोकांनीं दुसऱ्या मार्गाचें अवलंबन केलें आहे. वरील दोषांना आळा घालण्यास लोकांतील प्रबल नैतिक भावना व नीतिमत्तेची वाड, या गोष्टी पुष्कळवेळां समर्थ होऊं शकतात. यामुळें अल्पसंख्याक लोकांतही अनेक प्रसंगीं विलक्षण धैर्य उत्पन्न होऊन अखेरीस ते आपल्या दृढ निश्चयानें

बहुसंख्याकांस आपलीं मतें ग्रहण करावयास लावतात. महात्मा गांधींनीं लोकांपुढें आणलेल्या सत्याग्रहाच्या मार्गाचा लोकसत्ताक राज्यपद्धतींतील अल्पसंख्याकांवरील अन्याय दूर करण्यास अशाच दृष्टीनें बराच उपयोग होईल असें वाटतें. असो.

येथपर्यंत प्रातिनिधिक लोकसत्तेच्या गुणावगुणांसंबंधीं सीले, सिज्विक्, ब्राइसप्रभृति प्रसिद्ध राजनीतिशास्त्रज्ञांचे विचार वाचकांपुढें मांडले. त्यावरून लोकसत्तेचा अंमल म्हणजे काय, लोकसत्तेला लायक पुढाऱ्यांची कशी गरज आहे आणि कोणत्याही काळांत लोकांस योग्य नायकांची कशी जरुरी असते, याची वाचकांस कल्पना आली असेल. प्रातिनिधिक पद्धतीचे बहुतेक सर्व चहाते एकप्रकारच्या लोकनियुक्त महाजनसत्तेचेच म्हणजे लोकसत्ताक व महाजनसत्ता यांच्या योग्य संयोगाचे, खरे चहाते आहेत हें आतांपर्यंतच्या चर्चेवरून वाचकांच्या मनावर बिंबलें असेलच. तसेंच नवीन संस्था निर्माण करण्याच्या आणि नवीन ध्येय अमलांत आणण्याच्या दृष्टीनें प्रचलित लोकसत्ताक राज्यपद्धति अगदींच असमाधानकारक आहे, आणि राजकीय पक्षांतील चुरशीमुळें व त्यांनीं एकमेकांस हाणून पाडण्याकरितां योजिलेल्या निंद्य साधनांमुळें, सामान्यतः निर्दोष वाटणाऱ्या निवडणुकीनंतरही लोकप्रतिनिधींच्या बहुमताचा खऱ्या लोकमताशीं पुष्कळ वेळां मेळ बसत नाहीं, हें डायसी यांनीं व्यक्त केलेलें मत ही वाचकांस स्मरत असेलच. येथपर्यंत प्रचलित लोकसत्ताक राज्ययंत्राच्या गुणावगुणांच्या विवेचनांत पाश्चात्य देशांत अतिशय प्रबल झालेल्या भांडवलशाहीच्या अस्तित्वामुळें लोकसत्ताक राज्यपद्धतीला कसें विकृत स्वरूप प्राप्त झालेलें आहे या मुद्याचा विचार केला गेला नाहीं. हा मुद्दा अलीकडे फारच महत्वाचा झाला असल्यामुळें आणि त्याचा विचार करतांना समाजसत्तावादी

लोकसत्ता व भांडवलशाही.

लोकांच्या मतांचा व त्यांनीं सुचविलेल्या सुधारणांचा विचार करावयाचा असल्यानें, तो स्वतंत्र विचारासाठीं आतांपर्यंत राखून ठेविला होता. समाजांतील धनिक वर्ग हा लोकसत्तेचा सर्वांत मोठा शत्रु आहे असे उद्गार जेम्स ब्राइस यांनींही काढलेलें आहेत. (" Of the power of wealth democracies may say, with Dante, Here we find the great enemy. ") तसेंच अमेरिकेच्या लोकसत्तेला बऱ्याच अंशीं धनिकसत्तेचें स्वरूप प्राप्त होऊं लागलें आहे अशीही त्यांनीं कबुली दिली आहे.

(" Plutocracy used to be considered a form of oligarchy and opposed to democracy. But there is a strong plutocratic element into American democracy ; and the fact that constitutions ignore differences of property, treating all voters alike, makes it neither less hotent nor less mischievous ")

दिवसे दिवस ही गोष्ट पाश्चात्य लोकांच्या नजरेस अधिकाधिक येऊं लागली असून समाजांतील आर्थिक व सामाजिक विषमता व तज्जन्य शिक्षण, सत्ता किंवा सामर्थ्य, या संबंधींची विषमता, ही खऱ्या लोकसत्तेला अगदीं मारक आहे, अशी विचारी लोकांची खात्री होऊं लागली आहे. अठराव्या शतकांतील तत्त्ववेत्यांनीं औद्योगिक क्रांतीपूर्वीं शोधून काढिलेलें प्रातिनिधिक लोकसत्तेचें राज्ययंत्र ज्या समाजांतील नऊ दशांश लोक त्यांतील एकदशांश धनिक वर्गाच्या आर्थिक दास्यांत आहेत. अशा अर्वाचीन समाजाला अत्यंत अपुरे व निरुपयोगी ठरलें आहे, असें बऱ्याच लोकांना वाटत आहे.

या शिवाय आणखी दोनतीन आक्षेप प्रचलित प्रातिनिधिक पद्धतीवर अर्वाचीन समाजसत्तावाद्यांनीं काढलेले आहेत. (१) या पद्धतींत

संघनिष्ठ समाजसत्तावाद्यांचे तीन आक्षेप.

लोकसत्तेऐवजी लोकप्रतिनिधींच्या मतानेंच सर्व राज्यकारभार चालतो. एकदा निवडणुकी झाल्या म्हणजे मतदारांचा प्रतिनिधींवर मुळींच ताबा राहात नाहीं. कांहीं विशिष्ट कालावधीनें आपले राज्यकर्ते बदलण्याचाच तेवढा अधिकार मतदारांना मिळतो व तोही फार मर्यादित स्वरूपांत उपभोगितां येतो. पुष्कळ वेळां उभे असलेल्या उमेदवारांपैकीं सर्वांत अधिक निरुपद्रवी प्रतिनिधी कोण आहे, हें पाहूनच त्याला मत द्यावें लागतें. (२) सध्यां सरकारचें कार्यक्षेत्र फारच विस्तृत झालें असून निरनिराळीं आर्थिक व सामाजिक कार्यें त्यांनीं अंगावर घेतलीं असल्यामुळें अनेक सामाजिक व आर्थिक व्यवहारांचें नियंत्रण करणें, हें सरकारच्या कक्षेंत येऊं शकतें. अशा अनेकविध कार्यांकरितां एकच प्रतिनिधि निवडून देण्यास मतदारांस सांगणें, हें अगदीं अनुचित आहे. कारण मतदारांचीं मतें कांहीं बाबतींत एका उमेदवाराशीं जुळत असलीं तर तीं इतर बाबतींत दुसऱ्याच एखाद्या उमेदवाराच्या मताशीं जुळण्याचा संभव असतो. खरें प्रतिनिधित्व हें कार्यविशिष्टच असलें पाहिजे, असें या आक्षेपकांचें मत आहे.[१] (All true and Democratic representation is therefore functional repre-

१ हे दोन आक्षेप जी. डी. एच्. कोल यांनीं आपल्या संघनिष्ठ समाजसत्तावादावरील पुस्तकांत पुढीलप्रमाणें मांडले आहेत.

" There are two respects in which the present form of parliamentary representation, as it exists in all democratic states today, flagrantly violates the fundamental principles of democracy. The first is that the elector retains practically no control over his representative, has only the power to change him at very infrequent intervals, and has in fact only a

sentation) हल्लींच्या राज्ययंत्रावर बर्ट्रंड रसेल यांनीं पुढील आक्षेप आणिले आहेत. (१) निवणुकींत यशस्वी झालेल्या लोकांत एक प्रकारचा अहंकार उत्पन्न होतो, हिकमती लढविल्याशिवाय राजकारणांत यश मिळत नाहीं, अशी समजूत होऊन एक प्रकारचा ढोंगीपणा वाढतो. लोकांची खुषमस्करी करून पुढें आलेले लोक राज्यसूत्राचे चालक बनतात. (२) निवडणुकी होऊन गेल्यानंतर निवडणुकीच्या वेळीं दिलेलीं वचनें प्रतिनिधींकडून पाळलीं जात नाहींत. यामुळें लोकमत आणि लोकप्रतिनिधींचें मत यांत मेळ रहात नाहीं. (३) जे प्रश्न राष्ट्रांतील एका भागाच्या किंवा र्गाच्याच हिताहितार्शी निगडित झालेले असतात, त्यांचा निर्णय सर्व राष्ट्र कडून केला जातो. अर्थात् असल्या प्रश्नांची इतर वर्गातील किंवा भागांतील लोकांना विशेष माहिती नसल्यामुळें आणि त्यांस त्याबद्दल विशेष काळजीही वाटत नसल्यानें ते वाटेल तशीं मतें देतात. [१]

वरील दोषांचें निराकरण करण्यासाठीं समाजांतलि कारखानदार व जमिनदार वर्गाचें प्रस्थ कमी करावें, सरकारचें कार्यक्षेत्र लोकरक्षणाच्या

---

very limited range of choice. The second is that the elector is called upon to choose one man to represent him in relation to every concievable question, that may come before parliament, whereas, if he is a rational being, he always certainly agrees with one man about one thing, and with another with another about another,or at any rate would do so as soon as the economic basis of present class divisions was removed " Guild Socialism Restated P. 31-32

१ see Roads to Freedom by B. Russell. p. 139-140-141.

प्रातिनिधिक पद्धतींत कोणत्या सुधारणा हव्यात ?

कामांतच मर्यादित करावें, निदान सामाजिक व आर्थिक कार्याकरितां एक स्वतंत्र लोकसभा स्थापन करावी, किंवा असल्या सामाजिक व आर्थिक व्यवहारांचे नियम मध्ययुगांतील "संघ" किंवा आमच्या इकडच्या "जातिसंस्था" वगैरे औद्योगिक व सामाजिक संस्थांकडे सोंपवून द्याव्या. सारांश राष्ट्रांतील ज्या वर्गाच्या किंवा विभागाच्या हिताचे जे प्रश्न असतील त्यांचा निकाल करण्याचें कार्य त्याच वर्गाकडे किंवा विभागाकडे सोंपवावें, लोकप्रतिनिधींवर मतदारांचा अधिक ताबा असावा, कांहीं प्रश्नांवर प्रतिनिधींनीं लोकसभेंत निर्णय दिल्यावर मतदारांची प्रत्यक्ष मंजुरी घ्यावी, (referendum) एकदां निवडलेल्या प्रतिनिधीला लोकसभेची फिरून निवडणूक होण्यापूर्वीही बडतर्फ करण्याचा अधिकार (Recall) मतदारांना कांहीं प्रमाणांत असावा, प्रमाणशीर मतदानाच्या पद्धतीनें (Proportional representation) लोकमताचें खरें प्रतिबिंब लोकसभेंत पडेल अशी तरतूद करावी, एका विशिष्ट संख्येइतक्या मतदारांनीं मागणी केल्यास एकादा कायदा लोकसभेंत चर्चेला निघालाच पाहिजे असा कायदा करावा (Initiative) वगैरे अनेक सुधारणा राज्यघटनेंत सध्यां सुचविल्या जात आहेत, त्यांचा विचार पुढें योग्य स्थळीं केला जाईलच.

हल्लीच्या राजकीय सुधारकांवर डायसीचा आक्षेप.

वरील सुधारणांपैकी बऱ्याच सुधारणांच्या स्वरूपावरून हल्लींचें पाश्चिमात्य देशांतील लोक प्रातिनिधिक राज्यपद्धतीवर किती नाखुष आहेत, याची कल्पना येईल. तसेंच सार्वत्रिक निवडणुकींत यशस्वी झालेल्या प्रतिनिधींवरील विश्वास उडाल्यामुळें लोकसत्तेचें प्रातिनिधिक स्वरूप बदलून तिला अंशतः तरी प्रत्यक्ष लोकसत्तेचें स्वरूप द्यावें, अशीहि इच्छा

सध्याच्या राजकीय सुधारकांत उद्‌भुत झालेली दिसत आहे. सार्वत्रिक निवडणुकी हाच लायक लोक निवडून काढण्याचा खरा मार्ग आहे आणि अशा निवडणुकींत यशस्वी झालेल्या प्रतिनिधींच्या शहाणपणाकडे लक्ष देऊन त्यांच्या तंत्रानें लोकांनीं वागावें, प्रतिनिधींनीं आपल्या मताप्रमाणें सर्व कारभार करावा, सामान्य लोकांनीं प्रतिनिधींवर बंधनें घालून त्यांनीं आपल्याच मतांचा प्रतिध्वनि काढावा अशी अपेक्षा करूं नये, वगैरे एकोणिसाव्या शतकांतील राजनीतिशास्त्रज्ञांचे महाजनसत्ताक विचार आज लोकांना नापसंत होऊं लागले आहेत. हें पाहून पूर्व पद्धतीच्या राजनीतिज्ञांना या लोकसत्ताक विचारांसंबंधीं बरीच साशंकता उत्पन्न झाली आहे. डायसी हे या संबंधीं म्हणतातः[१] "हल्लींच्या राजकीय सुधारकांना किंवा नवमतवाल्यांना प्रिय असलेल्या बहुतेक सुधारणांचा हेतु, राष्ट्राच्या कायद्यांत लोकमताचें पूर्ण प्रतिबिंब पडावें, म्हणजे लोकसभेनें केलेले कायदे लोकप्रिय असावेत, निदान ते लोकांना अप्रिय असूं नयेत, हाच असतो. परंतु देशांतील

I " Now all the ideas which are most dear to constitutional reformers or innovators in 1914 lead to schemes of more or less merit for giving full expression in the matter of legislation to public opinion i. e. for ensuring that any law passed by parliament shall be popular, or at lowest not unpopular. But these schemes make in general little provision for increasing the chance that legislation shall also be wise, in other words that it shall increase the real welfare of the country. The singular, superstition embodied in the maxim von populi vox Dei has experienced, in this miscalled scientific age an unexpected revial Law of the constitution p. lxi—lvii

कायदे अधिक शहाणपणाचे व्हावेत म्हणजे त्यापासून लोकांचें खरें हित व्हावें, याबद्दल या सुधारणांत फारच थोडी योजना केलेली दिसते. 'लोकमत हीच ईश्वरी इच्छा' या विलक्षण वेडया समजुतीचें हल्लींच्या नामधारी शास्त्रीय युगांत अनपेक्षित रीतीनें पुनरुज्जीवन झालेलें आहे. डायसी साहेबांची ही तक्रार बरीच सकारण आहे, असें आम्हास वाटतें. परंतु सार्वत्रिक निवडणुकीच्या पद्धतीला राजकीय पक्षांच्या सर्वव्यापक संघटनेमुळें फार विकृत स्वरूप प्राप्त झालेलें आहे, व तें नष्ट होण्याला कांहीं बाबतींत तरी लोकसभेच्या कायद्यांना मतदारांची प्रत्यक्ष मंजुरी (Referendum) घेण्याची तरतूद करून प्रत्यक्ष लोकसत्तेचें थोडें तरी पाऊल पुढें टाकणें अवश्य आहे, असें त्यांनींच कबूल केलें आहे. राजकीय पक्षांच्या चुरशीप्रमाणेंच भांडवलशाहीच्या रोगांतून लोकसत्तेला मुक्त केलें पाहिजे, सरकारवरचा सामाजिक व आर्थिक कार्यांचा बोजा हलका केला पाहिजे, निरनिराळ्या कार्यांचें पृथक्करण करून अधिकारविभागणीचें तत्त्व अमलांत आणलें पाहिजे, सत्तेचें केंद्रीकरण कमी केलें पाहिजे वगैरे नवे विचारहि सर्वमान्य होण्यासारखे असून ते हळूं हळूं अमलांत येण्याचीं चिन्हें दिसत आहेत. तथापि या सर्व सुधारणा अमलांत आल्या तरी समाजांतील लोकप्रिय व लोकहितदक्ष, अशा तज्ञांच्या हातींच खरी राजकीय सत्ता असली पाहिजे आणि लोकसत्तेंत महाजन सत्तेच्या तत्त्वाचें योग्य संमिश्रण झालें पाहिजे, या ॲरिस्टॉटलपासून मिल्ल् मॅझिनीपर्यंतच्या सर्व मोठ्या पाश्चात्य तत्त्ववेत्त्यांनीं मान्य केलेल्या सिद्धान्ताकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं.[1] तसेंच केवळ समाजांतील सर्व प्रौढ

अखेरचा निष्कर्ष.

---

१ हाच उपदेश महाभारतांत भीष्माचार्यांनीं या प्रकरणाच्या शिरोभागी घेतलेल्याः—

व्यक्तींना सारखाच मताधिकार दिला म्हणजे हा हेतु साध्य होईल, ही आशाही निराधार ठरली आहे.

लोकनियुक्ततेचें तत्त्व हवेंच.

त्याचप्रमाणें वरील हेतु साध्य होण्यास समाजांतील कोणत्याही एकाच वर्गाच्या हातीं सर्व सत्ता देणें किंवा विशिष्ट जातींत किंवा कुलांतच ती राहावी, असा निर्बंध करणें हे उपाय तर निवडणुकीच्या उपायाहूनही अधिक निरुपयोगी ठरलेले आहेत, हेंही विसरून चालणार नाहीं. कोणत्या तरी स्वरूपांत लोकनियुक्ततेचें तत्त्वच याकामीं उपयोगी पडणार आहे. तें कोठें, कसें व कितपत मर्यादित करावें, हें आतां या पुढील प्रकरणांत राज्यांच्या निरनिराळ्या अंगांचा पृथक्पणें विचार करतांना आपणांस पाहिलें पाहिजे. येथे हेंहि सांगून ठेविलें पाहिजे कीं, समाजसत्तावाद्यांतील किंवा नवमताभिमानी राजकीय सुधारकांतलि,सर्वच लोकांना प्रातिनिधिक लोकसत्तेचे तत्त्व अप्रिय वाटूं लागलें आहे किंवा प्रत्यक्ष लोकसत्तेचें ते सर्वच अनन्य भक्त बनले आहेत, असें नाहीं. इंग्लंडांतील रॅम्से मॅकडोनल्ड किंवा सिडने वेब यांसारख्या समाजसत्तावाद्यांची लोकसत्ताक राज्यपद्धतीची कल्पना मिल्ल,

---

प्राज्ञाञ्शूरान महोत्साहान्कर्मसु स्थिर पौरुषान् ।
मानयन्तः सदा युक्ता विवर्धन्ते गणा नृप ॥
मन्त्रगुप्तिः प्रधानेषु चारश्चामित्र कर्षण ।
न गणाः कृत्स्नशो मन्त्रं श्रोतुमर्हन्ति भारत ॥
गणमुख्यैस्तु संभूय कार्यं गणहितं मिथः ॥

या श्लोकांत व " तस्मान्मानयितव्या स्तेगणमुख्याः प्रधानतः " या श्लोकांत निराळ्या स्वरूपांत ग्रथित केलेला आहे.

फेबियन सोशॅलिस्ट व प्रातिनिधिक पद्धति.

मॅझिनी, सिज्विक, सीले, ब्राइस, डायसी वगैरे लिबरल राजनितिशास्त्रज्ञांच्या कल्पनेशीं जुळणारी अशीच असून, देशांतील राज्यकारभार त्यांतील तज्ञ, लोकप्रिय व लोकहितदक्ष, अशा पुढाऱ्यांच्या हातीं असावा, त्यांच्यावर लोकांनीं विश्वास ठेवून त्यांच्या विशेष ज्ञानाला व लोकहितबुद्धीला योग्य तो सन्मान द्यावा व त्यांच्या सल्ल्यानें व साहाय्यानें आपलें हित करून घ्यावें, असेंच त्यांना वाटतें.[१] मात्र समाजांतील आर्थिक किंवा सामाजिक विषमता नष्ट होऊन सर्व समाजांत अधिक समता दिसूं लाग-

---

1 "In this way Socialism of the Fiabian type has made representative democracy its creed. It has adopted the sound position, that democracy flourishes best in that form of state, in which the people freely produce, thanks to an equality of educational opportunity, and freely choose, thanks to a wide and active suffrage, their own best numbers for their guidance, and, since they have freely produced and chosen them, give them freely and fully the honour of their trust and thus socialists like Mr. Sidney webb and Mr. Ramsay Mac donald have not com quetted with primary democracy, which has always had a magnetic attraction for socialists. The doctrines that the people itself governs directly through obedient agents—the doctrine of mandate and plebicite, of referendum and initiative-is not the doctrine of the best English socialism." p.220 Political thought from Spencer to today" by Ernest Barker.

त्याखेरीज आणि सर्व लोकांत बराच ज्ञानप्रसार झाल्याखेरीज राजकीय निवडणुकींत खरे लायक लोक पुढें येणार नाहींत, असें तें म्हणतात. तसेंच लोकसत्तेचें तत्त्व समाजाच्या राजकीय संस्थांप्रमाणें सामाजिक व आर्थिक संस्थांत रूढ न झाल्यास राजकीय लोकसत्ताही फलद्रूप होत नाहीं, ह्या सिद्धांतावर त्यांची विशेष भर आहे. तात्पर्य लोकसत्तेमुळें अधिकारी वर्गांत व प्रतिनिधींत उत्पन्न होणारी जबाबदारीची जाणीव आणि लोकांत उत्पन्न होणारी सार्वजनिक हितबुद्धि, राष्ट्रभक्ति, स्वाभिमान व आत्मप्रत्यय, हीं कायम ठेऊन राज्यकारभाराचीं सूत्रें नेहमीं लायक लोकांच्या हातीं असलीं पाहिजेत, या महाजनसत्तेच्या तत्त्वाला योग्य अवसर देणें प्रत्येक राज्ययंत्राच्या सुस्थितीस व सुधारणेस अत्यंत अवश्य आहे, हें मत बहुतेक सर्व विचारी लोकांस मान्य आहे व तेंच योग्य आहे असें आम्हास वाटतें. अशा दृष्टीनें लोकसत्ता व महाजनसत्ता हीं तत्त्वें परस्पर विरोधी न ठरतां परस्पर पूरक व साहाय्यक अशीं ठरतात.

प्रकरण ५ वें.

लोकसभा.

पौरजानपदा यस्य स्वनुरक्ता अपीडिताः ॥
राष्ट्रकर्मकरा ह्येते राष्ट्रस्य च विरोधिनः ॥

शांति० अ० ९४ श्लो० १६

समिति व पौरजानपद.

फार प्राचीन काळापासून सर्व सुधारलेल्या राज्यांचे लोकसभा हें एक अवश्य अंग गणलें गेलेलें आहे. विशेषतः भारतीय व युरोपीय आर्य लोकांच्या राज्यपद्धतींत प्राचीन काळीं लोकसभेचें महत्त्व बरेंच होतें. वैदिक काळांत समिति या नांवाची सभा असून तिला राजा निवडण्यापर्यंतचे सर्व राजकीय अधिकार असत. वैदिक काळापासून इसवी सनापूर्वीच्या सातव्या आठव्या शतकापर्यंत समिति ही संस्था बरीच अधिकारसंपन्न असावी असा विद्वानांचा तर्क आहे. राज्यविषयक सर्व प्रश्नांत राजाला सल्ला देणें आणि राजांची निवड करणें हीं राजकीय कार्यें या सभेकडे असून शिवाय कांहीं धार्मिक कार्येंही हीमध्यें होत असावींत. इसवीसनापूर्वी ७०० च्या सुमारास सुमारें एक हजार वर्षें आपला प्रभाव गाजवून ही लोकसभा प्राचीन, भारतवर्षांतून नामशेष झाली असावी अशी बॅ० काशीप्रसाद जयस्वल यांची कल्पना आहे. यानंतर भारतवर्षांत राजकीय लोकसभा अस्तित्वांत नसावी अशी आजपर्यंत समजूत होती; परंतु जयस्वल यांनीं भारत रामायणादि पुराणांत, अर्थशास्त्रादि राजनैतिक ग्रंथांत व मन्वादि स्मृतिग्रंथांत पौरजानपद हा जो शब्द वारंवार येतो त्यावरून हे एका संघटित लोकप्रतिनिधिसभेचें नांव असावें आणि या पौरजानपद संस्थेला हल्लींच्या पाश्चात्य

देशांतील लोकसभांचे बरेच अधिकार असावेत असा सिद्धांत आपल्या "हिंदू पोलिटी" नांवाच्या इंग्रजी ग्रंथांत प्रस्थापित केलेला आहे. ही संस्था इसवी सनापूर्वीं ७०० पासून इसवी सन ७०० पर्यंतच्या काळांत भारतवर्षांतील निरनिराळ्या राज्यांत कमी अधिक अधिकारसंपन्न असलेली आढळते. हिला राजास पदच्युत करणें, गादीचा वारस ठरविणें, राजाच्या राजकीय धोरणासंबंधीं सल्ला देणें, नवीन करांना अनुमति दर्शविणें, मंत्र्यांना काढून टाकणें वगैरेसंबंधीं राजकीय अधिकार असून, कायदे करणें, लोकांना औद्योगिक किंवा आर्थिक सवलती मिळवून देणें आणि एकंदर राजाधिकाऱ्यांवर देखरेख ठेवणें हीं कार्यें ती करीत असे व म्हणून या संस्थेस "हिंदू डाएट्" म्हणजे हिंदू लोकसभा असें नांव देण्यास कांहीं हरकत नाहीं असें त्यांचें मत आहे. इसवी सन ७०० नंतर मात्र लोकसत्तेचें नांव सुद्धां हिंदुस्थानांत राहिलें नाहीं, इतकेंच नाहीं तर, पुढें मराठेशाहीच्या वेळीं शिवछत्रपतींनीं प्राचीन राज्यपद्धति फिरून प्रस्थापित करण्याचा जो प्रयत्न केला त्यावेळीं या प्राचीन लोकसभांच्या संस्थांची स्मृतिही अजीबात बुजून गेल्याचें दिसतें. शिवछत्रपतींनीं प्राचीन मंत्रिमंडळाची संस्था पुनः

1 "We had an organism or a twin organism, the PauraJanapada, which could depose the king who nominated successor to the throne, whose kindly feelings towards a member of the royal family indicated his chance of succession, whose president was apprized by the king of the policy decided upon in the Council of ministers, who were approached and begged by the king in all humility for a new tax, whose confidence in a minister was regarded as an essential qualification for his appointment as chancellor who were consulted and referred to with pro-

अस्तित्वांत आणिली; तथापि वैदिक समिति किंवा तदुत्तरकालीन पौर-जानपद यासारख्या लोकसभांच्या पुनरुज्जीवनाची कल्पनाही तत्कालीन राजनीतिज्ञांस सुचली नाहीं.

इंग्लिश राज्यघटनेच्या इतिहासाचें महत्त्व.

प्राचीन काळापासून तों तहत अद्यापपर्यंत लोकसभेची संस्था जगांतील सर्व देशांपैकीं फक्त इंग्लंडांतच कायम असल्याचें दिसून येतें. यामुळें त्या देशाच्या राज्यघटनेच्या इतिहासास एक प्रकारचें विशिष्ट महत्त्व प्राप्त झालेलें आहे. तो इतिहास आम्ही या पुस्तकाच्या पहिल्या भागांतील एका प्रकरणांत सविस्तर दिलेलाच आहे.त्यावरून व त्याच भागांत दिलेल्या इतर युरोपियन देशांच्या राजकीय इतिहासावरून असें दिसून येईल कीं, अलीकडे सुमारें शें दीडशें वर्षें सर्व सुधारलेल्या देशांची राजकीय प्रगति लोकसत्तेच्या दिशेनें होत असून सध्यांच्या राज्ययंत्रांत लोकसभेला अत्यंत महत्त्वाचें स्थान प्राप्त झालेलें आहे, निरनिराळ्या देशांत या सभांची घटना कशी आहे, त्यांना कोणकोणते अधिकार आहेत आणि त्यांचा राज्ययंत्राच्या इतर अंगाशीं काय

found respect by a king aspiring to introduce a new religion, who demanded and got industrial, commercial and financial privileges for the country, whose wrath meant ruin to the provincial governors, who were coaxed and flattered in public proclamations, who could enact Statutes even hostile to the king, in fine, who could make possible or impossible the administration of the king–an organism with these constitutional attributes was an institution which we will be justified in calling the Hindu Diet."–Hindu Polity, Part 11 p .108.

संबंध आहे याचें वर्णन आमच्या पुस्तकाच्या दुसऱ्या भागांत आलेलेंच आहे. येथें त्यासंबंधींची स्थूल तत्त्वें आणि सामान्य सिद्धांत यांचेंच विवेचन करावयासें आहे. तें करतांना लोकसभांची घटना, त्यांचीं कार्यें आणि कार्यपद्धति यांचा पृथक्पणें विचार केला पाहिजे. प्रायः कायदे करणें, राष्ट्रीय जमाखर्चावर ताबा ठेवणें आणि चालू राज्यकारभारावर देखरेख करणें हीं कामें प्रमुखतः या सभा करीत असल्यामुळें त्यांना कायदे करणाऱ्या सभा असें म्हणतात. परंतु वस्तुतः केवळ कायदे करणें एवढ्यांत त्यांच्या मुख्य कार्यांचा खरोखर अंतर्भाव होत नाहीं. या ठिकाणीं त्यांच्या कार्यासंबंधीं थोडें विस्तृत विवेचन करणें अवश्य आहे.

लोकसभेचें कार्य.

लोकसभांच्या कार्यांचें विवेचन करतांना आम्हीं मागें दाखवून दिलेल्या " जबाबदार मंत्रिमंडळ " आणि " स्वतंत्र मंत्रिमंडळ " या दोन राज्यपद्धतींतील भेद ध्यानांत घेणें अवश्य आहे. लोकसभांचें मुख्य कार्य कायदे करणें हेंच आहे असें जरी सामान्यतः सांगण्यांत येत असलें तरी त्यांचा राज्याच्या अंमलबजावणीखात्याशीं जो व जसा संबंध असेल त्यावरच त्यांच्या कार्याचें स्वरूप मुख्यतः अवलंबून असतें हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. या दृष्टीनें म्हणजे लोकसभांच्या कार्यक्षेत्राच्या दृष्टीनें प्रचलित राज्ययंत्रांतील लोकसभांचें सामान्यतः तीन स्थूल वर्ग करतां येतील. (१) ज्या राज्यांत लोकसभा केवळ राज्यकर्त्यांस निरनिराळ्या कामीं केवळ सल्ला देऊनच स्वस्थ बसतात व वस्तुतः त्यांना अनियंत्रित राज्यकर्त्यांचें म्हणणें म्हणजे अंमलबजावणी खात्याचें मत थोडाफार निषेध करून व लोकमत व्यक्त करून मान्य करावें लागतें अशा राज्यांतील दुर्बल व नामधारी लोकसभा. (२) ज्या राज्यांत इंग्लंडाप्रमाणें जबाबदार मंत्रिमंडळ असून मंत्रिपदें लोकसभेंतील बहुमतवाल्या पक्षासच मिळतात आणि त्यांच्या प्रभुत्वाखालीं सर्व अंमलबजावणी खातें येतें अशा

राज्यांतील सर्वाधिकारी लोकसभा. (३) ज्या देशांत अमेरिकेप्रमाणें मंत्रिमंडळ व अंमलबजावणीखातें लोकसभेहून अगदीं स्वतंत्र व समान दर्जाचें असतें अशा देशांतील लोकसभा. पहिल्या वर्गांत आमच्या देशांतील लोकसभा किंवा युद्धापूर्वीच्या रशिया, जर्मन साम्राज्य व आस्ट्रिया यांसारख्या देशांतील लोकसभांचा समावेश होतो. दुसऱ्या वर्गांत इंग्लंड, इटली, फ्रान्स, युद्धोत्तरकालीन जर्मनी वगैरे युरोपियन देशांतील लोकसभा येतात. तिसऱ्या वर्गाचें ठळक उदाहरण अमेरिकेचीं संयुक्तसंस्थानें हेंच आहे. दुसऱ्या व तिसऱ्या वर्गांतील लोकसभांपैकीं कोणत्या प्रकारच्या लोकसभा चांगल्या किंवा प्रत्येक प्रकारांत कोणते गुणदोष आहेत याचें विवेचन पुढील प्रकरणांत अंमलबजावणी अंगाचें विवेचन करतांना यावयाचें आहे. येथें एवढेंच सांगून ठेवणें अवश्य आहे कीं इंग्लंडादि ज्या देशांत जबाबदार मंत्रिमंडळाची व्यवस्था आहे व ज्या लोकसभांतील बहुमतवाल्या पक्षास मंत्रिपदें मिळून अंमलबजावणी खात्यावर प्रभुत्व गाजवितां येतें अशा लोकसभांत देशांतील कर्तृत्ववान्, बुद्धिमान्, उत्साही व महत्त्वाकांक्षी लोक निवडून येण्याचा जितका संभव असतो तितका अमेरिकेप्रमाणें लोकसभेचा अंमलबजावणीखात्यांशीं जेथें संबंध नाहीं, तेथील लोकसभांत असे लोक येण्याचा संभव नसतो. या लोक-

---

1 " The want of opportunities for distinction in Congress is one of the causes which make a political carreer unattractive to most Americans. ... . The country does dot go to the Congreas to look for its Presidencial candidates as England looks to Parliament for its prime ministers. The oppertunities by which a man can win distinction there are few. Congress, in short, is not a focus of political life as are the legislatures of France, Italy and England. "–The American Common wealth. by Jemes Bryce Vol.1 p

सभांना सध्या कायदे करणें, राष्ट्रीय तिजोरीवर ताबा चालविणें, राज्यकारभारावर देखरेख करणें, यांखेरीज परराष्ट्रीय धोरणावर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष देखरेख करणें हेंही कार्य करावें लागतें. या बाबींत त्यांचा ताबा बहुधा अप्रत्यक्ष म्हणजे द्रव्यमंजुरीच्या आणि मंत्रिमंडळावरच्या ताब्याच्या स्वरूपाचा असतो. इंग्लंड, फ्रान्स किंवा अमेरिका यासारख्या लोकसत्ताक राज्यांत सुद्धा अद्यापि परराष्ट्रीय राजकीय धोरण लोकसभेच्या पूर्णपणें ताब्यांत येत नाहीं व हें कार्य करण्याची पात्रता लोकसभांना कधीकाळीं तरी येईल किंवा नाहीं, याची शंकाच आहे.. या बाबतींत मंत्रिमंडळांनीं आधीं कांहीं कृत्यें करावींत व मग त्यांस लोकसभेची संमति मिळवावी आणि ती न मिळाल्यास राजीनामे द्यावेत असा प्रकार चालू असतो. या बाबींत सुद्धा लोकसभा हळूंहळूं पुढें पाऊल टाकीत आहेत, तथापि " मन्त्रगुप्तिः प्रधानेषु " आणि " न गणाः कृत्स्नशो मन्त्रं श्रोतुमर्हन्ति भारत " हे महाभारतकारांचेच विचार अद्यापि बहुतेक राजनीतिज्ञांस मान्य आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. या कार्यांखेरीज न्यायदानाच्या स्वरूपाचींही कांहीं कार्यें लोकसभांना करावीं लागतात. निवडणुकीसंबंधींच्या तंट्यांचे निकाल देणें किंवा एखाद्या बड्या अधिकाऱ्यावर किंवा लोकसभेच्या सभासदावर इंपीचमेंट करतांना त्यांना न्यायाधीशाचें काम करावें लागतें. तसेंच कांहीं अधिकाऱ्यांच्या नेमणुका करणें हेंही राज्यकारभाराचें काम या सभा थोड्याशा प्रमाणांत करीत असतात. असो. आतां या सभांच्या कार्यपद्धतींचा थोडा विचार केला पाहिजे.

लोकसभेपुढें येणारें निरनिराळें कार्यें योग्य रीतीनें पार पाडण्यासाठीं सर्व देशांतील लोकसभांनीं विशिष्ट प्रकारच्या कार्यपद्धति ठरवून दिल्या आहेत. या कार्यपद्धतींतील नियमांचे तपशील निरनिराळ्या देशांत वेगवेगळे असले तरी त्यांचे हेतु आणि सामान्य स्वरूप हीं

लोकसभेची कार्यपद्धति

सारखींच आहेत. कोणत्याही निर्णयाच्या कामीं अवास्तव घाई होऊं नये, प्रत्येक प्रश्नाचा निर्णयापूर्वी तज्ञ लोकांकडून योग्य प्रकारें खल व्हावा आणि वादविवादाचा काथ्याकूट योग्य मर्यादे-बाहेर चालूं नये, हे हेतु डोळ्यापुढें ठेऊन कार्यपद्धतीचे नियम निरनि-राळ्या देशांत केलेले असतात. प्रत्येक मसुद्याची चर्चा सर्व साधकबाधक दृष्टीनें व्हावी याकरितां कोणत्याही मसुद्याचा अखेरचा निर्णय लागण्यापूर्वी त्याचीं तीन वाचनें व्हावींत असा नियम असतो. तसेंच प्रत्येक विषयांतील तपशील ठरविण्याचें काम लोकसभेंतील निरनिराळ्या मंडळ्यांकडे (Com-mittees) सोंपविण्यांत येतें. या कमिटयांना निरनिराळ्या देशांत कमी अधिक महत्त्व प्राप्त झालेलें आहे. या कमिटयांच्या पद्धतमिुळें लोकसभांचें निरनिराळें विशिष्ट कार्य करणारे विभाग अस्तित्वांत येतात आणि त्यामुळें श्रमविभागाच्या नियमानुसार लोकसभांची कार्यक्षमता अधिक वाढतें. इंग्लं-डांत मंत्रिमंडळ हीच एक लोकसभेची प्रमुख कमिटी असल्यामुळें आणि कायदे करण्याचें बहुतेक कार्य रूढीनें इच्याच हातीं एकवटत गेल्यामुळें इतर कमिटयांना फारसें महत्त्व प्राप्त होत नाहीं. परंतु इतर कमिटयांच्या पद्धतीचा पूर्ण विकास अमेरिका व फ्रान्स या देशांतील लोकसभांत झालेला आहे. अमेरिकेंत अशा कायमच्या कमिटया (standing committees) बऱ्याच वाढल्यामुळें कॉंग्रेसच्या हातांतील कायदे करण्यांची सत्ता बहुतांशीं त्यांच्याच हातीं गेलेली आहे. फ्रान्समध्यें कमिटयांची जी पद्धति आहे, तीमुळें तेथील मंत्रिमंडळास कायदे करण्याची फारशी सत्ता उपभोगितां येत नाहीं. तसेंच या कमिटया नेमण्याच्या कामीं चिठया टाकण्याचा प्रघात असल्यामुळें आणि चिठया टाकून प्रतिनिधिसभेचे जे दहा अकरा विभाग होतात त्यांच्याकडून प्रत्येक बिलासाठीं निराळी कमिटी नेमण्यांत येत असल्यामुळें कांहीं प्रसंगीं मंत्रिमंडळानें आणिलेल्या मसुद्याचा विचार विरुद्ध पक्षाच्या कमिटीकडे सोपविण्यांत येत असतो. ही

पद्धति फ्रान्समधील जबाबदार मंत्रिमंडळाच्या राज्यपद्धतीस अनुकूल नाहीं. तथापि कायदे करण्याची व धोरण ठरविण्याची बहुतेक सत्ता इंग्लंडाप्रमाणें मंडिमंडळाच्या हातीं न गेल्यामुळें फ्रान्समधील मंत्रिमंडळें वारंवार मोडत असलीं तरी त्यांच्या धोरणांत सुसंगति कायम ठेवण्याचें कार्य या कमिट्यांच्या पद्धतीनें त्या देशांत होत असतें. प्रत्येक मसुद्याचीं तीन वाचनें करण्याच्या आणि निरनिराळ्या कार्यांसाठीं निरानिराळ्या कमिट्या नेमण्याच्या नियमाप्रमाणेंच बहुतेक लोकसभांत कोणत्याही विषयाची बरीच चर्चा झाल्या-नंतर चर्चेचें कार्य मतें घेऊन बंद करण्याची कांहीं तरी कायदेशीर व्यवस्था केलेली असते. अशा प्रकारची व्यवस्था ती सभासदांच्या भाषणस्वातं-त्र्याच्या आड येते या सबबीवर करण्यांत येऊं नये असें इंग्लंडांतील लोकांचें बरेंच दिवस मत होतें. परंतु ऐरिश पुढारी पार्नेल यांच्या अनुयायांनीं या भाषणस्वातंत्र्याच्या हक्काचा फायदा घेऊन आपल्या होमरूल बिलास मान्यता मिळेपर्यंत सर्व कामें बंद पाडण्याचा उपक्रम सुरू केल्यामुळें अखे-रीस ब्रिटीश पार्लमेंटानें अशा तऱ्हेची कायदेशीर व्यवस्था करून टाकली. यामुळें कोणाही अल्पमतवाल्या पक्षास अडवणुकीचें धोरण स्वीकारतां येत नाहीं.

आतां लोकसभांच्या घटनासंबंधीं विवेचन करावयाचें आहे. सध्याच्या बहुतेक सर्व सुधारलेल्या राज्यांत लोकसभांची द्विदळ पद्धति स्वीकारण्यांत आलेली आहे. ही पद्धति इंग्लंडातील विशिष्ट सामाजिक परिस्थितीमुळें प्रथमतः त्या देशांत सहजासहजीं कशी अस्तित्वांत आली याची माहिती आमच्या पुस्तकाच्या पहिल्या भागाच्या सातव्या प्रकारणांतील १३९ पानावर मागें आलेलीच आहे. सध्यां इंग्लिश लोकांच्या अनुकरणानें आणि इतर कांहीं महत्त्वाच्या कारणां-मुळें हिचा स्वीकार बहुतेक सुधारलेल्या देशांनीं केलेला आहे. या पद्धतीच्या

द्विदळ राज्यपद्धति

समर्थनार्थ तीन मुख्य युक्तिवाद पुढें करण्यांत येत असतात. (१) या पद्धतीमुळें लोकसभांच्या प्रत्येक निर्णयांत सावधगिरी आणि दूरदर्शित्व दिसून येतात. राज्यकारभाराचें धोरण ठरविण्याची जबाबदारी एकाच सभेकडे असल्यास ती विकारवश, एककल्ली किंवा बेसावध बनण्याचा संभव असतो. याच्या उलट हीच जबाबदारी दोन निरनिराळ्या सभांकडे सोंपविल्यानें प्रत्येक सभा दुसरीच्या प्रतिस्पर्धेनें आपल्या कार्यांत विशेष दक्षता दाखविते. तसेंच कोणत्याही संस्थेस किंवा व्यक्तीस आपल्या बरोबरीचे अधिकार इतर कोणासही नाहींत या भावनेमुळें जो एक प्रकारचा अहंकार उत्पन्न होतो व त्याला वश होऊन तिचें वर्तन कित्येक प्रसंगीं अविचाराचें होण्याचा जो एक संभव असतो तो या पद्धतीमुळें फारसा उरत नाहीं. (२) लोकसभेच्या प्रतिनिधिसभा आणि महाजनसभा या दोन्ही दळांची घटना भिन्न करून त्यांची मुदत व निवडणुकीच्या वेळा निरनिराळ्या ठेवल्यानें देशाचें खरें लोकमत अजमावण्यास या पद्धतीमुळें अधिक बिनचुक साधन उपलब्ध होतें. एकाच वेळीं निवडलेल्या सभासदांची प्रतिनिधि सभा पुष्कळ वेळां कांहीं काळानें लोकमताच्या विरुद्ध मताचीही होऊं शकते. तसेंच देशांतील सुविद्य, सुविचारी, सुसंपन्न किंवा अभिजात अशा लोकांचे प्रतिनिधी किंवा असे लोक महाजनसभेंत घेण्याची व्यवस्था केल्यास अज्ञानी सामान्य जनतेच्या मताहून अधिक श्रेष्ठ दर्जाचें व परिणामीं राष्ट्राच्या हिताचें असें मत राष्ट्रापुढें येऊं शकतें. तसेंच या पद्धतीमुळें शुद्ध लोकसत्तेच्या तत्त्वांत राष्ट्रहितदृष्ट्या महाजनसत्तेचें जें व जितकें मिश्रण असणें अवश्य असतें तें तितक्या प्रमाणांत आणतां येतें. (३) कायदे करण्याची व राज्यकारभाराचे धोरण ठरविण्याची सर्वच सत्ता एकाच सभेच्या हातीं दिल्यानें ती सभा हळूहळू अंमलबजावणी खात्याच्या कार्यक्षेत्रावर अतिक्रमण करून त्या खात्याचें स्वातंत्र्य हिरावून घेण्याची आपत्ति या पद्धतीमुळें सहसा उद्भवत नाहीं.

हें समर्थन कितपत सयुक्तिक व अनुभवास धरून आहे याची चर्चा करण्यापूर्वीं महाजनसभेच्या सभासदांची योजना कोणत्या तत्त्वावर केली जावी आणि त्या सभेला कोणते अधिकार असावेत याचें विवेचन करणें भाग आहे. महाजनसभेच्या सभासदांची योजना तीन निरनिराळ्या तत्त्वांवर केलेली आढळून येते.

महाजनसभेची घटना.

पहिलें तत्त्व म्हणजे आनुवंशिक हक्काचें किंवा वतनदारीचें, दुसरें नेमणुकीचें, आणि तिसरें म्हणजे निवडणुकीचें. या पैकीं पहिल्या म्हणजे आनुवंशिक हक्काच्या तत्त्वाचा सध्यां कोणीही विशेष प्रामुख्यानें पुरस्कार करीत असल्याचें दिसून येत नाहीं आणि केवळ उच्च कुलांतील जन्म किंवा अभिजातत्व एवढ्याच लायकीनें मनुष्याची योजना कायदे करणाऱ्या लोकसभेच्या कार्यावर व्हावी हें तत्त्व आतां कोणांस पटेल असें वाटत नाहीं. तथापि ज्या देशांत एकदां या तत्त्वास मान्यता मिळालेली आहे आणि ज्या देशांतील विशिष्ट कुलांत जन्मलेल्या सामाजिक वर्गाच्या अंगीं कांहीं विशिष्ट गुण परंपरेनें अगर इतर सामाजिक कारणांनीं दिसून येतात त्या देशांतील महाजन सभेच्या घटनेंतून एकदम या तत्त्वाचें आजिबात उच्चाटन करावें असें तेथील बहुजन समाजास वाटत नाहीं. याचें एक ठळक उदाहरण म्हणजे इंग्लंड देश हा आहे. या देशांतील महाजनसभेचे बहुसंख्याक सभासद आनुवंशिक वतनदारीच्या हक्कानें झालेले असतात. तथापि सूक्ष्म विचारांअती इंग्लंडचे उदाहरण आनुवंशिक तत्त्वाच्या पुरस्कर्त्यास फारसें किंबहुना मुळींच पोषक नाहीं असें दिसून येईल. इतर कोणत्याही सुधारलेल्या देशांतील महाजनसभांपेक्षां इंग्लंडांतील महाजनसभेचे अधिकार अतिशय संकुचित झालेले आहेत. आणि त्याचें एक मुख्य कारण म्हणजे त्या सभेंतील बहुतेक सभासद एखाद्या विशिष्ट कुलांतील जन्माच्याच केवळ लायकीवरून तेथें आलेले

असंल्यामुळें त्यांच्या सद्धेतूंवर व बुद्धिमत्तवेरं लोकांचा विश्वास नाहीं हे होय. तात्पर्य या आनुवंशिक सभासदत्वाच्या तत्त्वाचा अवलंब केल्यामुळें इंग्लंडांतील महाजनसभा आज केवळ नामधारी सत्ताधीश बनली असून त्या देशांत सध्यां द्विदळ राज्यपद्धति जवळ जवळ अस्तित्वांतच नाहीं असें म्हटल्यास फारसें अतिशयोक्तीचें होणार नाहीं. यामुळें इंग्लंडांतील सुविचारी राजनीतिज्ञांपुढें इतर कोणत्या तरी तत्त्वाचा अवलंब करून लोकादरास अधिक पात्र आणि अधिक कार्यक्षम अशी महाजनसभेची पुनर्घटना कशी करावी आणि द्विदळ राज्यपद्धतीचे सर्व फायदे आपल्या राष्ट्रास कसे प्राप्त करून घ्यावेत हा एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित झाला आहे. सिडने वेब यांच्यासारखे कांहीं समाजसत्तावादी लोक तर या द्विदळ राज्यपद्धतीची यापुढें लोकांस कांहींच गरज नाहीं असें स्पष्ट प्रतिपादन करूं लागले आहेत.[१] महाजनसभेच्या सभासदांच्या योजनेचें दुसरें तत्त्व म्हणजे नेमणुकीचें. कांहीं लोकांच्या मतें या कामीं निवडणुकीच्या तत्त्वापेक्षां नेमणुकीचें तत्त्व अधिक सरस आहे. समाजांत असे कांहीं सुविद्य आणि सुविचारी लोक नेहमीं असतात कीं, ज्यांच्या सल्ल्याची राज्यकारभाराला अत्यंत आवश्यकता असते, परंतु जे सार्वत्रिक निवडणुकींत कधींहि यशस्वी होण्याचा संभव नसतो अशा लोकांचा नेमणुकीच्या तत्त्वानें महाजनसभेंत बराच भरणा करतां येईल अशी या लोकांची समजूत आहे. हें नेमणुकीचें तत्त्व इटाली आणि कानडा या देशां-

---

1 " There is, of course, in the Socialist Commonwealth, no place for the House of Lords, which will simply cease to exist as a part of the Legislature."

A constitution for the Socialist Commonwealth of Great Britain page 110. by Sidney and Beatrice Webb.

तील महाजनसभांच्या घटनांत पूर्णत्वानें अवलंबिलेलें दिसून येतें. इटालीमध्यें महाजनसभेच्या राजघराण्यांतील सभासदाखेरीज इतर सर्व सभासदांची तहाहयात नेमणूक राजाकडून केली जाते. यांत धर्माधिकारी (Bishops), इतर मोठे अधिकारी, प्रतिनिधीसभेंत तीन वर्षांहून अधिक काम केलेले सभासद, रॉयल ॲकॅडमी ऑफ सायन्स हिचे सभासद, दरसाल सहाशें डॉलरहून अधिक कर भरणारे लोक आणि वाङ्मय, ललितकला इत्यादि अनेक मार्गांनीं देशाच्या संस्कृतींत भर घालणारे लोक या सारख्यांचा समावेश होत असतो. कानडांतील महाजनसभेचे सर्व सभासद तेथील गव्हर्नर जनरल तहहयात नेमीत असतो. या दोन्ही देशांतील अनुभव नेमणुकींच्या तत्त्वाला विशेषसा पोषक असल्याचें आढळत नाहीं. दोन्ही देशांतील महाजन सभांवर लोकांचा असावा तितका विश्वास नसल्यानें राज्यघटनेप्रमाणें या सभांना कितीहि अधिकार असले, तरी त्यांना ते व्यवहारांत उपभोगितां येत नाहींत. दोन्ही देशांत राजकीय सत्ता बहुतेक प्रतिनिधी सभेच्याच हातीं येत असल्याचें स्पष्ट दिसतें आणि प्रतिनिधी सभेवर दाब ठेवण्याचें कार्य येथें महाजनसभेकडून व्हावें तसें होत नाहीं. सध्याच्या एकंदर देशांत अमेरिकेंतील महाजनसभाच जास्त कार्यक्षम आणि लोकादरास पात्र असल्याचें दिसून येतें. या सभेची घटना निवडणुकीच्या तत्त्वावर झालेली असून अमेरिकेंतील लहान मोठया सर्व संस्थांत या सभेंत दोनदोन सभासद पाठविण्याचा अधिकार असतो. यावरून महाजनसभेची घटनाहि निवडणुकीच्या तत्त्वावरच करणें सध्याच्या लोकसत्तेच्या काळांत अवश्य आहे, असें म्हणणें भाग आहे. तसें न केल्यास ती सभा लोकादरास पात्र होत नाहीं आणि हळूं हळूं तिचे सर्व अधिकार प्रतिनिधि सभा बळकावूं लागते. निवडणुकीच्या तत्त्वावरच महाजनसभेची घटना करावयाची म्हटली म्हणजे तिच्यांत व प्रतिनिधिसभेंत फरक कसा करावयाचा हा एक महत्त्वाचा प्रश्न उत्पन्न होतो. अमेरिकेसारख्या संयुक्त

राज्यांत हा प्रश्न सोडविण्याचा एक सोपा प्रकार आहे. तेथें महाजनसभा ही संयुक्त राज्यांतील निरनिराळ्या प्रत्येक घटकाची समुच्चयरूपानें प्रतिनिधि गणली जाते. आणि प्रत्येक घटकामार्फत हिच्यांत सारखेच प्रतिनिधि घेतले जातात. उलट तेथील प्रतिनिधिसभाही प्रत्येक पोटराज्यांतील लोकांची लोकसंख्येनुसार प्रतिनिधि गणली जाते. याशिवाय महाजनसभेची निवडणूक अप्रत्यक्ष स्वरूपांत करण्याचा अमेरिका, फ्रान्स इत्यादि कांहीं देशांत प्रघात दृष्टीस पडतो. अमेरिकेच्या महाजनसभेच्या सभासदांची निवड पोटराज्यांतील लोकसभांकडून होत असते. फ्रान्समध्यें महाजनसभेंत प्रतिनिधि पाठविण्याचें काम करण्यासाठीं एक स्वतंत्र मतदारसंघ प्रत्येक डिपार्टमेंटमध्यें ठरविला असून त्यांत प्रत्येक कम्यूनमधील म्युनिसिपल कौन्सिलचे प्रतिनिधि, डिस्ट्रिक्ट कौन्सिलर्स, कौन्सिलर्सजनरल आणि डेप्युटी यांचा अंतर्भाव केलेला असतो. याखेरीज प्रतिनिधिसभा व महाजनसभा यांच्या घटना निरनिराळ्या बनविण्यासाठीं या दोन्ही सभांच्या सामान्य निवडणुकांची मुदत कमी अधिक ठेविलेली असते. कांहीं देशांत महाजनसभांच्या सभासदांचे दोनतीन विभाग करून प्रत्येक विभागाच्या निवडणुकीची वेळ कांहीं काळाच्या अंतरानें ठरविण्यांत येतात. अशा योजनेमुळें एकदम महाजनसभेचे सर्वच सभासद नवे न येतां क्रमाक्रमानें तिचा एकेक विभाग नवा बनत जातो व त्यामुळें नव्या सभासदांस जुन्यांच्या अनुभवाचा व ज्ञानाचा फायदा मिळतो.

महाजनसभा—लायखी व निवडणूक.

येथपर्यंत केलेल्या विवेचनावरून असें दिसून येईल कीं, अमेरिकेप्रमाणें ज्या देशांत महाजनसत्तेची घटना निवडणुकीच्या तत्त्वावर करण्यांत आलेली आहे तेथेंच ती कार्यक्षम व लोकप्रिय झालेली आहे. परंतु अशा देशांतही हिच्या स्थापनेचा जो मुख्य तात्त्विक हेतु कीं, तिच्या योगानें सामान्य लोकांच्या प्रतिनिधिसभेपेक्षां देशांतील सुविद्य,

सुविचारी व अनुभविक लोकांचा भरणा तींत विशेष असावा आणि सामान्य लोकांना नसणाऱ्या विशेष ज्ञानाची उणीव त्यांनीं भरून काढावी, तो फारसा सफल झाल्याचें दिसत नाहीं. तसें होण्यास महाजनसभेच्या घटनेंत निवडणुकीच्या तत्त्वाबरोबरच लायखीच्या तत्त्वास अवकाश मिळणें अवश्य आहे. जॉन स्टुअर्ट मिल्ल यानें आपल्या " प्रातिनिधिक राज्यपद्धती " या पुस्तकांत महाजनसभा ही मुख्यतः मुत्सद्यांची सभा असावी असें म्हटलें आहे. प्रतिनिधि सभेमार्फत राष्ट्रांतील सामान्य जनतेच्या भावना व आकांक्षा व्यक्त होत असल्या तर महाजनसभेंत ज्यानीं आपल्या आयुष्यातलि बराच काळ लोकसेवेंत म्हणजे राज्यकारभारांत घालविलेला आहे आणि तेथील प्रत्यक्ष अनुभवानें ज्यांच्या अंगच्या गुणांची पारख झालेली आहे अशा अनुभविक व विशिष्ट ज्ञानसंपन्न तज्ञांचें मत व्यक्त झालें पाहिजे. मोठमोठे न्यायाधीश, मंत्रि, सेनापति, प्रांतिक व मुलकी अधिकारी वगैरे राज्यकारभारातील तज्ञ तसेंच निरनिराळ्या विद्यांत विशारद बनलेले लोक, यांचा भरणा महाजनसभेंत असावा अशी मिल्ल याची सूचना आहे. ही सूचना अद्यापि कोणत्याहि अर्वाचीन सुधारलेल्या देशांत सर्वस्वी अमलांत आणलेली आढळून येत नाहीं. तथापि तात्त्विकदृष्ट्या ती ग्राह्य असून प्राचीन रोमन लोकांच्या लोकशाहींत तिला बरेंच मूर्त स्वरूप आलेलें होतें व तेथील महाजनसभा उत्तम प्रकारें कार्यक्षम झाली होती असा इतिहासाचा दाखला आहे. मिल्लनें आपली सूचना याच दाखल्यावरून केलेली आहे. मिल्ल किंवा मॅझिनी या सारखे एकोणिसाव्या शतकांतील लोकसत्तेचें युरोपियन पुरस्कर्ते समतेच्या तत्त्वाचे कितीही भोक्ते असले, तरी ते गुणकर्मानुसार होणाऱ्या सामाजिक उच्चनीच भावास विरोध करणारे नव्हते आणि ते खरोखर निर्भेळ लोकसत्तेचे पुरस्कर्ते नसून लोकसत्ता व खरी महाजनसत्ता यांचा संयोग राज्यघटनेंत व्यक्त व्हावा अशीच त्यांची इच्छा

रोमचा दाखला.

होती असे आम्ही मागच्या प्रकरणांत म्हटलें आहे. त्यास मिल्लच्या या सूचनेनें अधीकच पुष्टी मिळते. असो. महाजनसभेची घटना मिल्लनें सुचविलेल्या लायखीच्या तत्त्वावर आणि निवडणुकीच्या तत्त्वावर बनविणें कसें व कां अवश्य आहे हें आतां वाचकांच्या ध्यानांत आलेंच असेल. अशा तत्त्वावर महाजनसभेची रचना केल्यास आणि ज्ञान व अनुभव या गोष्टींस योग्य मान देण्याची भावना लोकांत जागृत ठेवली गेल्यास एकदळ लोकसभेपेक्षां लोकसभेची द्विदळ रचना राष्ट्रहितास अधिक पोषक होईल यांत शंका नाहीं. सध्यां एकटया ग्रीक राज्याखेरीज इतर कोणत्याही देशांत लोकसभेची एकदळ पद्धति अस्तित्वांत नाहीं. यावरून द्विदळ राज्यपद्धति पाश्चात्य देशांतील अनुभवानें उपयुक्त ठरलेली आहे असें समजण्यास हरकत नाहीं. जपान सारखे पौरस्त्य देशही या पद्धतीचा अंगीकार करीत असलेले दिसून येतात.

मि. वॅलेस यांची सूचना

महाजनसभेची घटना बनवितांना निवडणूक व लायखी या दोन्ही तत्त्वांचा मेळ बसवावा असें आम्ही वर म्हटलें; त्या दृष्टीनें मि.वॅलेस यांनीं आपल्या " The great society " या पुस्तकांत केलेल्या सूचनेला महत्त्व आहे. या पुस्तकांत महाजनसभेंतलि सभासदांची निवड निरानिराळ्या धंदेवाईक लोकांच्या संघांकडून केली जावी, असें त्यांनीं प्रतिपादिलें आहे. प्रतिनिधिसभेच्या सभासदांची निवड देशविभागांतील सर्व मतदारांनीं सामान्यत्वें करावी आणि महाजनसभेच्या सभासदांची निवड समाजांतील निरनिराळया धंद्यांतलि लोकांच्या संघटित संस्थामार्फत व्हावी, अशा संस्थांत राज्यकारभाराच्या निरनिराळया शाखांत काम करणाऱ्या लोकांच्याही संघांचा समावेश व्हावा आणि या संघांच्या सभासदत्वाच्या लायखीपेक्षा त्यांच्य

प्रतिनिधींच्या लायखीची कसोटी थोडी अधिक असावी अशी व्यवस्था केल्यास चांगल्या प्रकारची महाजनसभा निर्माण होईल असें वाटतें.

आतां महाजन सभेच्या अधिकारांचा विचार करूं. महाजनसभेची संघटना सर्वमान्य आणि तत्त्वशुद्ध पायावर केल्यास तिच्या अधिकारांसंबंधी लोकांना मत्सर वाटण्याचें कारण उरणार नाहीं आणि तिचेअधिकार कमी करण्याकडे लोकांची प्रवृत्ति होणार नाहीं. असें असलें तरी एक दोन बाबींत प्रतिनिधिसभेची सत्ता महाजनसभेपेक्षां सर्व राज्यांत अधिक असल्याचें दिसून येतें व तें तसें असणें, अपरिहार्य आहे. राज्यकारभारास लागणाऱ्या द्रव्याची मंजुरी देणें आणि मंत्रिमंडळाला पदभ्रष्ट करणें, या बाबतींतील अंतिम सत्ता कोणातरी एकाच सभेच्या हातीं देणें अवश्य आहे व ती प्रतिनिधिसभेकडेच असावी हें युक्त आहे. यांपैकीं दुसरा अधिकार जेथें जबाबदार मंत्रिमंडळाची राज्यपद्धति असते, तेथेंच असणार हें उघड आहे. जेथें स्वतंत्र प्रधान मंडळाची व्यवस्था असते तेथें मंत्रि राजाला किंवा राष्ट्राध्यक्षाला जबाबदार असून त्यांना वस्त्रें देणें किंवा तीं हिरावून घेणें हें त्याच्याच हातीं असतें.

महाजनसभेचे अधिकार.

प्राचीन काळीं भरतखंडांतील लोकसत्ताक राज्यांपैकीं कांहीं राज्यांत द्विदळ पद्धति व महाजनसभेची संस्था अस्तित्वांत असावी असें बॅ.जयस्वल यांचें मत आहे. पाटल राज्यांत या महाजन सभेला बरेच अधिकार असून तेथील राज्यपद्धति म्हणजे लोकसत्ता व महाजनसत्ता यांचें मिश्रण होतें असें ते म्हणतात.[१]

द्विदळ पद्धतीचें प्राचीनत्व

1 "Here in the Patala constitution we have a mixture of aristocracy and democracy." Hindu polity. Vol I. p. 82.

अंबष्ठांप्रमाणें इतर कांहीं लोकशाहीच्या राज्यांत अशाच महाजनसभा असल्या तरी त्यांच्याकडे विशेष अधिकार नसावेत असा त्यांचा तर्क आहे ![2] या प्राचीन महाजनसभांची घटना कोठें आनुवंशिक तत्त्वावर तर कोठें निवडणुकीच्या तत्त्वावर झालेली असावी. अंबष्ठांच्या राज्यांतील महाजनसभा लोकनियुक्त होती. या सभेला निरनिराळ्या राज्यांत कमी अधिक प्रमाणांत अधिकार असावेत. तसेंच या महाजनसभेकडे पुष्कळ ठिकाणीं अंमलबजावणीचे किंवा राज्यकारभाराचेही अधिकार असत. वैदिक काळांत "समिति" व "सभा" या नांवाच्या दोन लोकसभा होत्या. त्यांपैकीं "सभा" ही हल्लींच्या महाजनसभेसारखी राष्ट्रांतील श्रेष्ठ लोकांची सभा असावी असें कांहीं लोकांचें मत आहे. या सभेकडे त्यावेळीं कोणतीं कामें असत या विषयीं माहिती उपलब्ध नसली, तरी स्मृति पुराणें या ग्रंथांत "सभा" हा शब्द न्यायसभा या अर्थानें योजिला जातो, यावरून वैदिक काळच्या सभेकडे न्यायदानाचें कार्य असावें.असें मानण्यास हरकत नाहीं. अथर्ववेदांमध्यें "समिति" व "सभा" या दोन प्रजापतीच्या (म्हणजे राजाच्या) कन्या आहेत असें म्हटलें आहे. यावरून वैदिक काळीं ही द्विदळ राज्यपद्धति सर्वमान्य झाली असल्याचें दिसतें.

प्रतिनिधिसभेची घटना लोकनियुक्ततेच्या तत्त्वावरच सर्वत्र झालेली आहे व ती तशीच असली पाहिजे यांत शंका नाहीं. प्रातिनिधिक लोकसत्तेच्या गुणावगुणांची चर्चा मागलि प्रकरणांत

"The elders formed another body.they were like a Second House.They had varying powers according to individual constitutions. Amongst the Patlas, they were for all purposes the government. In the Ambashtha Sangha, they were not so." The same Vol. I p. 83.

प्रतिनिधि सभेची घटना.

करण्यांत आली असून लोकसत्ता व महाजनसत्ता यांचा योग्य संयोग्य करणें हें तिचें ध्येय आहे व तेंच तिच्या सर्व पुरस्कर्त्यांस मान्य आहे, असें तेथें दाखवून दिलेलें आहे. तसेंच या प्रातिनिधिक लोकसत्तेचें ध्येय सार्वत्रिक मतदानावर केल्या जाणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीनें प्रत्यक्ष अमलांत येत नाहीं, हा पाश्चात्य देशांतील अनुभवही तेथें नमूद केलेला आहे. येथें हे दोष वगळून तें ध्येय शक्य तितकें अमलांत येण्यास तिची घटना कशी असावी व ती कोणत्या मूलभूत तत्त्वांवर करण्यांत यावी याचें विवेचन करावयाचें आहे. हे प्रतिनिधि निवडण्याचा अधिकार कोणास असावा, हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा व वादग्रस्त आहे. फ्रेंच राज्यक्रांतीच्या पूर्वीं देशांत ज्या

मताधिकार सांप्रत स्थिति.

लोकांची मालमत्ता आहे त्यांनाच हा मताधिकार असावा हें तत्त्व इंग्लंडादि देशांत सर्व मान्य झालेलें होतें. पुढें एकोणिसाव्या शतकांत सार्वत्रिक मतदानाचें तत्त्व (Universal Franchise) प्रसार पावूं लागलें व आज त्याच तत्त्वाचा अंमल सर्व देशांत होऊं लागला आहे. स्त्रियांना मताधिकार असूं नये असें मत एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीपर्यंत बहुतेक सर्वमान्य झालेलें होतें; पण तेंही आतां मागें पडून पुरुषांप्रमाणें स्त्रियांनाही मताधिकार देण्याकडे बहुतेक सर्व देशांचा कल होत आहे व बऱ्याच देशांत आज तें तत्त्व अमलांत आलेलें आहे. आमच्या देशांतही या तत्त्वाला कायदेशीर मान्यता मिळूं लागली आहे. अमेरिकेंत व गोऱ्या युरोपियनांच्या इतर वसाहतींत नीग्रो प्रभृति काळ्या लोकांना हा मताधिकार न देण्याचा हट्ट गोऱ्या लोकांनीं धरलेला आहे, परंतु या त्यांच्या कृत्याचें तात्त्विकदृष्ट्या कोणासही समर्थन करतां येईल असें आम्हांस वाटत नाहीं. तात्पर्य राज्यांतील प्रत्येक प्रौढ

नागरिकास आपल्या देशांतील लोकसभेंतील प्रतिनिधि निवडतांना मत देण्याचा अधिकार असावा हें तत्त्व आतांच्या बहुतेक सर्व राजनीतिज्ञांनीं मान्य केलेलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. या तत्त्वाची कोणत्या देशांत किती प्रमाणांत अंमलबजावणी झालेली आहे, त्याची माहिती दुसऱ्या भागांत दिलीच आहे. जे देश पुढारलेले आहेत त्यांत सामान्यतः एकंदर लोकसंख्येच्या एकपंचमांशाइतके मतदार असल्याचें दिसून येतें. न्यूझीलंडसारख्या कांहीं देशांत तर लोकसंख्येच्या निम्म्यानें मतदारांची संख्या आहे. मतदानाचा अधिकार सामान्यतः (१) वय (२) लिंग (३) नागरिकत्व (४) संपत्ति आणि (५) बौद्धिक व नैतिक स्थिति, यासंबंधीच्या अटींनीं मर्यादित केलेला आढळतो. यांपैकीं वय आणि नागरिकत्व यासंबंधींच्या अटींबद्दल फारसा वाद किंवा मतभेद होण्याचें कारण नाहीं. ज्याप्रमाणें खासगी व्यवहारांत मनुष्याला सज्ञान गणण्यास वयाची अट असणें अवश्य आहे, त्याचप्रमाणें आपल्या देशांतील राज्यकारभारासंबंधीं मत देण्याचा अधिकार प्राप्त होण्यास कांहींतरी वयाची अट असणें अवश्य आहे हें उघड आहे. खासगी व्यवहारांत सज्ञानत्व प्राप्त होण्यास जें किमान वय ठरविलें असेल त्यापेक्षां सार्वजनिक कार्यांत भाग घेण्यास वयाची किमान मर्यादा थोडी अधिक ठेविली तरीही हरकत नाहीं. तसेंच नागरिकत्व, सांपत्तिक स्थिति व बौद्धिक आणि नैतिक स्थिति,यासंबंधींच्या अटी लागू पडणाऱ्या व्यक्तीस केवळ स्त्रीत्वामुळें मताधिकार असूं नये, हें मतही आतां फारसें संमत होण्याचा संभव दिसत नाहीं.

देशांतील राज्यकारभाराचीं सूत्रें हलविणाऱ्या लोकांच्या अंगीं सर्व लोकांच्या सुखदुःखांचें आणि गरजांचें ज्ञान असलें पाहिजे. सर्व वर्गांतील लोकांच्या हितांविषयीं त्यांना सारखीच कळकळ वाटत असली पाहिजे आणि राज्यकारभार आपल्या संमतीनें,इच्छेनुसार व आपल्या

सार्वत्रिक मताधिकाराचें तात्त्विक समर्थन.

हिताकडे लक्ष देऊनच चालला आहे, याची जाणीव राष्ट्रांतील सर्व वर्गांच्या लोकांत राहिली पाहिजे, हीं तत्त्वें प्रातिनिधिक राज्यव्यवस्थेच्या मुळाशीं आहेत. मताधिकार सार्वत्रिक असला, म्हणजे समाजांतील सर्व वर्गांचे प्रतिनिधि लोकसभेंत येऊन सर्वांच्या हिताकडे समत्वानें लक्ष देऊन राज्यकारभार चालतो, कोणत्या वर्गाचें काय गाऱ्हाणें आहे व कोणाची काय गरज आहे तें समजतें, सर्व लोकांना आपल्या सक्रिय संमतीनें राज्यकारभार चालला आहे याची जाणीव असल्यामुळें राज्यकारभार अप्रिय होत नाहीं, आणि लोकांना सार्वजनिक कार्यांत भाग घेण्याची संवय लागल्यानें राष्ट्रांतील सर्व लोकांच्या अंतःकरणांत सार्वजनिक हितबुद्धि, राष्ट्रीय भावना व राष्ट्रभक्ति, हे गुण जागृत असतात. तसेंच आपला राज्यकारभार आपल्याच हातीं आहे, या जाणिवेमुळें लोकांत स्वातंत्र्याचें व स्वावलंबनाचें जें वारें संचारत असतें, त्यामुळें त्यांच्या अंगीं जें चैतन्य दिसूं लागतें व त्या चैतन्याच्या अनुभवानें त्यांना जो स्वाभिमान व आनंद वाटत असतो, त्यांची किंमत अधिक आहे. पण याचबरोबर राज्यघटनेसंबंधीं विचार करतांना आणखीहि कांहीं तत्त्वें ध्यानांत घ्यावीं लागतात.

ज्या कार्याला विशिष्ट ज्ञानाची गरज असते. तें कार्य तसें ज्ञान असणाऱ्या लोकांकडूनच म्हणजे तज्ञांकडूनच करवून घेण्यांत आलें पाहिजे,

दुसरी बाजू.

देशांतील अज्ञ लोकांपेक्षां ज्ञानी लोकांना राज्यकारभारांत अधिक मान व महत्त्व देण्यांत आलें पाहिजे आणि राज्यांतील अज्ञ जनतेला सूज्ञ लोकांच्या बरोबरीनें वागविण्यांत येतां कामा नये, हीं तत्त्वेंही राज्यघटनेचा विचार करीत असतां दृष्टीआड होऊं देतां कामा नये.[१]

१ हीं तत्त्वें एकोणिसाव्या शतकांतील प्रसिद्ध इंग्लिश सामाजिक तत्त्ववेत्ता जॉन स्टयुअर्ट मिल्लनें पुढील शद्बांनीं सांगितलीं आहेत.

" No progress at all can be made towards obtain-

आपल्या देशाच्या राज्यकारभारांत आपलें मत घेतलें जातें ही जाणीव प्रत्येक प्रौढ नागरिकाला असणें जितकें अवश्य आहे तितकेंच हेंही अवश्य आहे कीं, आपल्या देशांच्या सार्वजनिक व्यवहारांत अज्ञानापेक्षां ज्ञानाला अधिक महत्त्व दिलें जातें आणि प्रत्येक कार्य त्या व्यवहारांतील तज्ञ मनुष्याकडून करवून घेणें यांतच आपलें व इतरांचें हित आहे, याचीही जाणीव प्रत्येक नागरिकाला असावी व ती जाणीव राहावयाची तर राज्यंत्राच्या घटनेंतही या तत्त्वांस महत्त्व मिळालें पाहिजे. या परस्पर विरोधी भासणाऱ्या तत्त्वांपासून लोकसत्ता व महाजनसत्ता उत्पन्न होतात आणि हीं ध्येयें परस्पर विरोधी न समजतां त्यांना परस्पर पूरक समजून राज्यघटना बनाविणें यांतच खरें राजनैतिक कौशल्य आहे आणि महाभारतकाळांपासून आतांपर्यंत झालेल्या प्रसिद्ध पाश्चात्य व पौरस्त्य राजनीतिज्ञांनीं हाच उपदेश केलेला आहे, हें

---

ing a skilled democracy unless the democracy are willing that the work which requires skill should be done by those who possess it." Representative Government. The chapter VI "...it is not useful but hurtful, that the constitution of the country should declare, ignorance to be entitled to as much power as knowledge. The national institutions should place all things that they are concerned with before the mind of the citizen in the light in which it is for his good that he should regard them and as it is for his good that he should think that every one is entitled to some influnce, but the better and wise to more than others, it is important that this conviction should be professed by the State, and embodied in the national institutions." The same, chapter VII.

आम्ही मागच्या प्रकरणांत दाखवून दिलेंच आहे. आतां मताधिकाराच्या बाबींत या तत्त्वाची अंमलबजावणी कशी करावी याचा विचार करूं.

या दोन्ही तत्त्वांची अंमलबजावणी करण्याचे दोन मार्ग आहेत. पहिला म्हणजे राष्ट्रीय प्रतिनिधिसभेच्या निवडणुकींत सर्व प्रौढ नागरिकांना एक एक मत द्यावयाचें आणि देशांतील विशेष सुशिक्षित, कर्तृत्ववान आणि परोपकारी वर्गांच्या निवडणुकींत एकाहून अधिक मतें द्यावयाचीं, आणि दुसरा मार्ग म्हणजे सार्वत्रिक मताधिकाराचें तत्त्व पूर्णत्वानें फक्त देशाच्या लहान विभागांतील स्थानिक लोकसभांत मान्य करून प्रांतिक किंवा राष्ट्रीय लोकसभांचे सभासद निवडण्याचा अधिकार या स्थानिक सभांतील सभासदांनाच द्यावयाचा. या दुसऱ्या पद्धतीस अप्रत्यक्ष निवडणुकीची पद्धति (Indirect election) असें म्हणतात. राष्ट्रीय प्रतिनिधि सभेसारख्या मोठ्या प्रदेशावर राज्य करणाऱ्या सभांची निवड करण्याचा हक्क अगदीं सामान्य मतदारांस देणें किंवा अशा सभांत प्रत्यक्ष निवडणुकीची पद्धत स्वीकारणें, ही केवळ आपली फसगत करून घेण्यासारखें आहे, असें जोरानें प्रतिपादन करणारे राजकीय सुधारक आज पाश्चात्य देशांत बरेच निघालेले आहेत. इंग्लंडांतील संघनिष्ट समाजसत्तावादाचें पुरस्कर्ते जी. डी. एच्. कोल, हे आपल्या "गिल्ड सोशॅलिझम् रीस्टेटेड" या पुस्तकांत म्हणतातः-

वरील तत्त्वांची अंमलबजावणी.

अप्रत्यक्ष निवडणुकी.

"लहान खेडीं किंवा मोठ्या शहरांतील वॉर्ड, यांसारख्या मतदारांच्या ज्या लहान गटांमध्यें प्रतिनिधि व मतदार यांची प्रत्यक्ष ओळख होऊन त्यास आपलें म्हणणें समजावून देणें शक्य असतें, अशा ठिकाणीं प्रत्यक्ष निवडणुकी फलप्रद होतात. परंतु पार्लमेंटसारख्या ज्या सभेच्या निवडणुकीचे मतदारांचे गट अवाढव्य असतात आणि जेथें निवडलेल्या प्रतिनिधींचा आपल्या

मतदारांशीं खरा संबंध राहाणें अशक्य असतें, अशा संस्थांत प्रत्यक्ष निवडणुकींचा आश्रय करणें हा केवळ फार्स आहे. याकरितां ज्या लहान विभागांत प्रतिनिधींशीं खरा संबंध राहूं शकतो अशा स्थानिक सभांत लोकसत्तेची अंमलबजावणी करणें, या सभांतील सभासदांना बडतर्फ करण्याचाहि अधिकार आपल्या हातीं ठेवणें आणि अधिक मोठ्या क्षेत्रांवरील लोकसभांत आपलें हित सुरक्षित राहाण्याच्या दृष्टींनीं या प्राथमिक संस्थांतील पूर्ण लोकसत्तेच्या तत्त्वांवर विसंबून राहाणें,हाच मतदारांच्या खऱ्या हिताचा मार्ग आहे. या मोठ्या क्षेत्रांतील लोकसभांत त्याहून लहान क्षेत्रांवरील लोकसभांचे प्रतिनिधि (delegates) घेणें आणि या प्रतिनिधींनाहि वाटेल तेव्हां बडतर्फ करण्याचा अधिकार (the right of recall) त्यांना निवडणाऱ्या लोकसभेला देणें हाच या विस्तृत क्षेत्रांतील लोकसभांच्या घटनेचा उत्तम मार्ग होय. "[१] या अप्रत्यक्ष निवडणुकींच्या तत्त्वाला रशियांतील बोल्शेव्हिक लोकांनीं फारच प्रामुख्य दिलेलें आहे. यावरून राजकीय सुधार-

1 "Thus, direct election is good in the village or the ward, because all the electors can meet with, question, and instruct their representative face to face; but it is a farce in the case of parliament, where the constituancy, is too large for the elected person to preserve any real contact with those who elected him, the real safeguard for the voter is to preserve the fullest form of democracy, including the right of recall in the small units, within which real contact is possible, and to rely on this contact and power of recall for the populer will in the larger bodies. The larger bodies can themselves best be composed of delegates from the bodies working

-या राष्ट्रीय सभेंतील प्रतिनिधि मध्यवर्ति कार्यकारी मंडळाची निवड करतात. तात्त्विक दृष्ट्या विचार केल्यास या निरनिराळ्या चाळणींतून गाळून आलेले प्रतिनिधि बुद्धिमान व कर्तृत्ववान असेच असले पाहिजेत, हें उघड आहे. लोकांवर आपल्या सामान्य गुणांनीं मोहनी घालून छाप पाडणारा, सामान्य लोकांशीं सलगी करून किंवा त्यांच्या मुलांना गोड बोलून, सवंग लोकप्रियता मिळविणारा मनुष्य अमेरिकेंतील राष्ट्रीय सभेंत निवडून येण्याचा जितका संभव आहे तितका तो रशियाच्या राष्ट्रीय सभेंत निवडून येण्याचा मुळींच नाहीं. याच्या उलट निवडणुकीच्या मार्गांत या चार जास्त पायऱ्या असल्यामुळें निवडून येणारे प्रतिनिधि राष्ट्रीय मतदाराच्या लोकमताहून निराळ्या मताचे यावेत, याबद्दल हिकमती लढविण्यास अधिकारारूढ सरकारास विशेष संधि मिळूं शकते. तसेंच प्रत्येक निवडणुकीच्या पायरीवर प्रमाणशीर मतदानाच्या पद्धतीचें कसोशीनें अवलंबन केलें नाहीं तर या प्रत्येक

---

backslapper, or baby kisser, would get to Moscow as frequently as he gets to Washington. On the other hand, the four extra stages, interecalted between the votor and national representatives give a good oppertunity for the Government of the time being to apply influence or pressure to deflect these bodies farther and farther away from the people's will. It is obvious that unless the principle of proportional representation is strictly adhered to at every stage, the minority strains must disappear from the skien and the Central Executive Committee would be composed entirely of the mejority party."

The Russian Soviet Republic. p. 319-20. by E A. Ross

कांत अग्रेसरत्व मिळवूं इच्छिणाऱ्या राजनीतिज्ञांपैकीं एका कर्तृत्ववान व कार्यकर्त्या मुत्सद्यांनीं त्याचा प्रत्यक्ष व्यवहारांत गौरव केल्याचें स्पष्ट दिसतें. रशियांतील बोल्शव्हिकांच्या राज्ययंत्रासंबंधीं लिहितांना अमेरिकेंतील एक प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ प्रो० ई. ए. रॉस्स, म्हणतातः[१] " आमच्या देशांपेक्षा सोव्हिएट पद्धतींत प्रत्यक्ष निवडणुकीचें तत्त्व फारच थोड्या प्रमाणांत आढळतें. रशियांमध्ये शेतकरी नागरीक आपल्या गांवांतील सोव्हिएट निवडतात, त्यांतील सभासद त्याच्यावरील व्हॉलस्ट सोव्हिएटची निवड करतात, त्याचे सभासद प्रांतिक कॉंग्रेसच्या सभासदांच्या निवडणुकी करतात, या प्रांतिक कॉंग्रेसचे सभासद अखिल रशियाच्या राष्ट्रीय सभेची निवड करतात आणि

अप्रत्यक्ष निवडणुकीचे गुणदोष.

within the smaller areas, always provided that these delegates themselves preserve constant contact with the smaller bodies which elect them, and are subject to the right of these bodies to recall them at any time."

Guild–socialism restated by G.D.H. Cole.p. 133-34

I " Representation under the soviet system is far less direct than with us......In Russia peasent citizens select a village soviet, which selects representatives for the volost soviet, which selects representatives for the all provincial Congress, which selects representatives for the all Russian congress, which select representatives on the central Executive Committee. Theoretically this repeated distillation ought to bring to the fore men of force and brains. It is hard to see how the popular spellbinder, handshaker,

चाळणींतून देशांतील अल्पमतवाल्या पक्षाचे प्रतिनिधि गाळ म्हणून निघून जातील व राष्ट्रीय मध्यवर्ति कार्यकारी मंडळांत केवळ बहुमतवाल्याचेच प्रतिनिधि येतील हें उघड आहे." या उताऱ्यांत अप्रत्यक्ष निवडणुकीच्या पद्धतींतील गुणदोषांचें मार्मिक विवेचन प्रो. ई. ए. रॉस्स् यांनीं केलेलें आहे. या पद्धतीचा अवलंब राष्ट्रीय लोक-सभेच्या घटनेंत केला तर तिच्यांत निवडून येणारे प्रतिनिधि कर्तृत्ववान व बुद्धिमान असे येतात आणि सवंग लोकप्रियता मिळवून लोकांची दिशाभूल करणारे लोक राष्ट्रीय लोकसभेचे सभासद होण्याचा संभव बराच कमी होतो. याच्या उलट अशा रीतीनें निवडलेच्या प्रतिनिधींचीं मतें पुष्कळ वेळां देशांतील प्राथमिक मतदारांच्या मतांहून भिन्न असूं शकतात यामुळें त्याचा कारभार अशा लोकमताला धरून न होण्याचा संभव असतो. तसेंच देशांतील अल्पसंख्याक लोकांचें प्रतिबिंब अशा पद्धतीनें बनलेल्या लोकसभांत पडूं शकत नाहीं, यामुळें बहुसंख्याक पक्षाचा अल्पसंख्याक पक्षावर जुलूम होण्याचा संभव असतो. हा दुसरा दोष प्रत्येक ठिकाणीं प्रमाणशीर मतदानाच्या पद्धतीच्या अवलंबनानें काढून टाकणें शक्य आहे असेंही त्यांनीं सुचविलें आहेच. राहतां राहिला लोकमत आणि राष्ट्रीय सभा यांच्या मतांत अंतर पडण्याच्या संभवाचा दोष तो कसा नष्ट करावा याचें विवेचन केलें पाहिजे.

लोकमताचें महत्त्व.

कोणत्याही प्रकारच्या राज्यरीतींत लोकमताला अत्यंत महत्त्व आहे, हें केव्हांहि विसरून चालणार नाहीं. देशाचा राज्यकारभार उत्तम प्रकारें चालावा हें जसें इष्ट आहे, त्याचप्रमाणें तो राज्यांतील लोकांना पसंत पडला पाहिजे, हेंही विसरून चालणार नाहीं. श्री समर्थ रामदास यांनीं लोकमताला राजनीतीच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्व दिलेलें आहे. या संबंधींचीं त्यांचीं चार वचनें येथें उध्दृत केल्यास विषयान्तर होणार नाहीं.

" लोकांसी राखणें राजी । तें राज्य प्रबळेंबळें ॥ "
लोक हे राखतां राजी । सर्व राजीच होतसे ॥
अंतरे चुकतां तेथें सर्व भाजीच होतसे ॥
" लोक राजी राखोनी कीजे । सकळ कांहीं ॥
जिकडे जग तिकडें जगन्नायक । कळला पाहिजे विवेक॥ "

तात्पर्य राज्यकर्ते आपणांस कितीही शहाणे समजत असले किंवा ते तसे असले तरी " लोक राजी राखोनी कीजे । सकळ कांहीं । " ही राजनीति विसरून चालणार नाहीं. शिवाय " जिकडे जग तिकडे जगन्नायक " हा सिद्धांत बऱ्याच अंशीं खरा असल्यानें राज्यकर्त्यांनीं लोकमतानुसार कारभार करावा, हें तत्त्वच अखेरीस एकंदरीनें लोकहितकारक ठरतें हेंहि ध्यानांत ठेविलें पाहिजे. " जिकडे जग तिकडे जगन्नायक " हा समर्थांचा सिद्धांत आणि पाश्चात्य देशांतील " Vox populi vox Dei " म्हणजे " लोकमत हीच ईशेच्छा " या तत्त्वाशीं अगदीं तंतोतंत जुळणारा आहे. एवंच लोकमताला राजकारणांत अत्यंत महत्त्व आहे, ही गोष्ट सर्वमान्य आहे. लोकांपेक्षां लोकनायक अधिक शहाणे असतात आणि लोकसत्तेचा कितीही विकास झाला तरी लोकनायकांच्या शहाणपणावरच राज्याचें बरेंवाईट अवलंबून असतें; तथापि अशा लोकनायकांनीं जबरदस्तीनें आपलीं मतें लोकांवर लादण्यापेक्षां आणि लोकमताचा अनादर करून वाटेल त्या सुधारणा करण्यापेक्षां आपलीं मतें लोकादरास पात्र करवून मग लोकमतांकडून त्या सुधारणा घडवून आणाव्यात हें उत्तम. तथापि या युक्तिवादाला आणि लोकमताच्या महत्त्वालाहि कांहींतरी मर्यादा आहेत.

राष्ट्राचें राजकारण चालविणें ही गोष्ट लहान सामान्य नाहीं. वाटेल त्या मनुष्याला या विषयाचा अभ्यास केल्याशिवाय किंवा त्याविषयीं विशेष विचार केल्याशिवाय आपलें मत बनवितां

तज्ञांची आवश्यकता.

येणें शक्य नाहीं. त्यांतून ज्या राज्यांत सामान्य लोकांशीं नित्य संबंध येणारीं व स्थानिक परिस्थितीशींच निकट संबंध असणारीं बहुतेक कामें स्थानिक किंवा प्रांतिक सरकारांकडे सोंपविलीं गेलीं आहेत आणि केवळ सर्व राष्ट्राला सामान्य आणि इतर राष्ट्राशीं संबंध असणारींच कामें राष्ट्रीय लोकसभेकडे सोपविलेलीं असतात, तेथें तर सामान्य अशिक्षित नागरिकाला या सभेचे सभासद प्रत्यक्ष निवडण्याचा अधिकार उपभोगितां येणें फार मुष्किलीचें आहे. सामान्य नागरिकांना आपल्या जिल्ह्यांतील किंवा फार तर प्रांतांतील परिस्थितीचें ज्ञान असूं शकेल, परंतु इतर प्रांतांशीं आणि इतर राष्ट्राशीं संबंध येणाऱ्या राज्यकारभाराचें धोरण ठरविण्याचें काम करणाऱ्या राष्ट्रीय लोकसभेचे सभासद निवडण्याचा अधिकार उपभोगणाऱ्या मतदाराची बुद्धिमत्ता किंवा ज्ञान, सामान्य मतदारांपेक्षां केव्हांही अधिक असलें पाहिजे. अर्थात् अशा सभेच्या मतदारांस विद्येची अट असणें अगदीं अवश्य आहे व ही विद्येची अट बरीच अवघड असली पाहिजे. ही अट पुरी करणाऱ्या सुविद्य नागरिकांस राष्ट्रीय लोकसभेचे प्रतिनिधी निवडण्याच्या कामीं प्रत्यक्ष मत देण्याचा अधिकार देण्यास हरकत नाहीं. या विद्येच्या अटीप्रमाणेंच एखादा बुद्धिप्रधान लोकोपयोगी धंदा कांहीं वर्षें यशस्वी रीतीनें चालविणें हें ज्ञान व अनुभव याचें द्योतक समजण्यास हरकत नाहीं व अशा धंद्यांत यश संपादन करणाऱ्या लोकांसही राष्ट्रीय सभेंत आपले प्रतिनिधि प्रत्यक्ष निवडणुकीच्या तत्त्वावर पाठविण्याचा हक्क देण्यास हरकत नाहीं. रशियांतील सोव्हिएट पद्धतींत या तत्त्वाचाही अंगिकार केलेला आहे. मोठमोठ्या शहरांतील सोव्हिएट्सना (औद्योगिक संघांना) प्रांतिक कॉंग्रेसमध्यें आपले प्रतिनिधि पाठवून रशियन राष्ट्रीयसभेच्या सभासदांच्या निवडणुकींत अप्रत्यक्ष रीत्या भाग घेतां येतो व शिवाय अखिल राष्ट्रीय रशियन कॉंग्रेसमध्यें प्रत्यक्ष

विद्येची अट व कर्तृत्वाची अट.

निवडलेले प्रतिनिधि पाठविण्याचाही त्यास अधिकार आहे. अशा प्रकारें मोठ्या शहरांत धंदे करणाऱ्या लोकांना मतदारीचा दुप्पट अधिकार उपभोगतां येतो. खेडयांतील लोकांपेक्षां शहरांतील धंदेवाईक लोक बुद्धिमत्तेच्या व संस्कृतीच्या दृष्टीनें खेडयांतील शेतकऱ्यांपेक्षां पुष्कळ पुढें असतात, या अनुभविक सिद्धांतानें रशियन लोक या विषमतेचें समर्थन करीत असतात. अशा तऱ्हेनें देशांतील कर्तबगारीनें व बुद्धिमत्तेनें पुढारलेल्या वर्गास राष्ट्रीय-लोकसभेच्या निवडणुकींत प्रत्यक्ष मत देण्याची व्यवस्था केल्यास खरें लोकमत आणि राष्ट्रीय प्रतितिनिधीचें मत यांत फार अंतर पडणार नाहीं. मात्र या कर्तबगारीच्या व बुद्धिमत्तेच्या अटी ठरवितांना फार सावधगिरी ठेविली पाहिजे. केवळ संपत्तिमत्ता हें कर्तबगारीचें किंवा बुद्धिमत्तेचें द्योतक होत नाहीं. तसेंच नैतिक दृष्टयाही संपत्ति हें गुणांचें नेहमींच अधिष्ठान असतें असें नाहीं, इतकेंच नाहीं तर विशेष कष्ट न करितां मिळालेली

संपत्ति, बुद्धि व नीति.

संपत्ति ही अनेक प्रसंगीं दुर्गुणांचेंच अधिष्ठान असूं शकतें. आपल्या अकाष्टार्जित संपत्तीनें दुसऱ्यांच्या श्रमांचें फल उपटणारा किंवा दुसऱ्यांवर चरणारा वर्ग समाजांत पुष्कळ वेळां असतो. सध्यां औद्योगिक क्रांतीच्या काळापासून हा वर्ग पाश्चात्य देशांत फार वाढलेला आहे. अशा वर्गाचे प्रतिनिधि अधिकारसंपन्न होण्यापासून देशाचा फारसा फायदा आहे असें आम्हांस वाटत नाहीं. आपल्या व परक्या देशाच्या खऱ्या हिताकडे पाहून हे लोक राज्याचें अंतर्गत व परराष्ट्रीय धोरण आखीत नाहींत, असा पाश्चात्यांना अनुभव आलेला आहे. या अनुभवानें इतरांनीं शहाणें झालें पाहिजे. अर्थात् ज्या लोकांना राष्ट्रीय लोकसभेचे प्रत्यक्ष मतदार करावयाचे त्यांत अशा निरुद्योगी धनिक लोकांचा वर्चष्मा न होण्याबद्दल शक्य ती खबरदारी घेतलीच पाहिजे. तसेंच देशांतील कोणाही व्यक्तीस आपणांव अन्याय होत आहे, असें न वाटावें म्हणून राष्ट्रीय लोकसभेच्या प्रत्यक्ष मत-

दारांच्या गटांत एखादी परीक्षा देऊन वाटेल त्या व्यक्तीस आपलें नांव शामील करून घेण्याची मुभा असावी. ज्यांना देशांतील प्रस्थापित शिक्षण-क्रमांतून जातां आलें नाहीं किंवा ज्यांनीं कांहीं कारणानें एखाद्या बुद्धिप्रधान धंद्यांत आपलें नांव काढलें नाहीं, परंतु ज्यांना राष्ट्रीय राज्यकारभारांत आपण प्रत्यक्ष भाग घ्यावा व तसा प्रत्यक्ष भाग घेण्याची पात्रता आपल्या आंगीं आहे असें वाटत असेल, त्यांना सदर मार्गानें तसें करतां येईल. ही गोष्ट ज्या सामान्य नागरिकांना करतां येणार नाहीं, त्यांनीं राष्ट्रीय लोक-सभेचे प्रातिनिधि निवडण्याच्या कामीं अप्रत्यक्ष निवडणुकीच्या हक्कावर संतुष्ट राहाण्यास हरकत नाहीं; आणि ज्या देशांत सामान्य नागरिकांशीं नेहेमीं संबंध येणारी आणि स्थानिक परिस्थितीवर अवलंबून असणारीं कामें स्थानिक व प्रांतिक लोकसभांकडे सोपविण्यांत आलीं आहेत, तेथें सामान्य नागरिक अप्रत्यक्ष निवडणुकीच्या हक्कानें संतुष्ट राहातील असें वाटतें.

येथपर्यंत राष्ट्रीय लोकसभेच्या घटनेसंबंधींचें विवेचन प्रातिनिधिक तत्त्वाला धरून केलें. आतां प्रत्यक्ष लोकसत्तेसंबंधीं दोन शब्द लिहून स्थानिक व औद्योगिक लोकसभांचा विचार करावयाचा आहे. आम्हीं येथपर्यंत प्रतिपादन केल्या-प्रमाणें राष्ट्रीय लोकसभेची घटना करतांना अप्रत्यक्ष निवडणुकीचा आश्रय केल्यास आणि तिच्या सभासदांच्या निवडणुकींत प्रत्यक्ष भाग घेण्याचा अधिकार बराच मर्यादित केला तर प्रत्यक्ष लोकसत्तेची अंमलबजावणी करण्याच्या ज्या दोन तीन पद्धती अलीकडे अमलांत येऊं लागल्या आहेत, त्यांचाही आश्रय करणें लोकसत्तेच्या व राष्ट्रहिताच्या दृष्टीनें अवश्य होईल. या तीन पद्धति रिकॉल, रेफरेंडम आणि इनिशिएटिव्ह या नांवानें प्रसिद्ध आहेत. रिकॉल म्हणजे आपण निवडलेल्या प्रतिनिधींना बडतर्फ करून दुसरे प्रतिनिधि निवडण्याचा अधिकार मतदारांना द्यावयाचा. अप्रत्यक्ष निवडणुकी व मर्या-

प्रत्यक्ष लोकसत्तेची अंमलबजावणी.

दित मताधिकार यांचा आश्रय करावा असें म्हणणारे लोक बहुधा प्रातिनिधींना बडतर्फ करण्याच्या मतदारांच्या अधिकाराचे चहोते व पुरस्कर्ते असतात. मतदारांची संख्या मोठी करून त्यांना आपल्या प्रतिनिधींवर हुकमत चालविण्याचा अधिकार न देणें, यापेक्षां मतदारांची संख्या मर्यादित करून त्यांना आपल्या प्रतिनिधींवर हुकमत चालविण्याला संधि देणें हें त्यांच्यामतें अधिक श्रेयस्कर आहे. तसेंच कांहीं विशिष्ट प्रकारच्या कायद्यांना, ते लोकसभेंत पास झाल्यावरही, प्राथमिक मतदारांची प्रत्यक्ष संमति घेणें व ती मिळाली तरच ते कायदे अमलांत आणणें या पद्धतीस रेफरंडम असें म्हणतात. ही पद्धति स्विट्झर्लंडांत बरेच दिवस अमलांत आहे. राज्यघटनेच्या मूलतत्त्वांशीं संबंध येणाऱ्या सर्व कायद्यांना आणि किमानपक्षीं तीस हजार मतदारांनीं किंवा आठ पोट राज्यांतील लोकसभांनीं विनंति केल्यास, इतर कोणत्याही कायद्यांना मतदारांची प्रत्यक्ष संमति घेतली पाहिजे, असा तेथें कायदा आहे. या पद्धतीचा स्वीकार केल्यानें विशिष्ट कायदेच प्रत्यक्ष स्वरूपांत लोकांपुढें येण्याचा संभव असल्यानें राजकीय पक्षांच्या कारवाईला फारशी जागा राहात नाहीं. विशेष महत्त्वाच्या प्रश्नासंबंधींच या पद्धतीचा अवलंब करावयाचा असल्यानें सामान्य मतदारांचें मत पुष्कळवेळां बरोबर ठरण्याचा संभव असतो; कारण साधे, स्थूल स्वरूपाचे प्रश्न लोकांपुढें मांडल्यास त्यांचा निर्णय ते देऊं शकतात. मात्र आयव्ययासंबंधीचे व संकीर्ण स्वरूपाचे प्रश्न प्राथमिक मतादारांपुढें मांडणें युक्त होणार नाहीं. तसेंच लोकसंमत अशा सुधारणा अमलांत आणण्याच्या वेळीं तत्प्रीत्यर्थ लागणाऱ्या नव्या करांचा प्रश्नच तेवढा मतदारांपुढें ठेवणें योग्य होणार नाहीं. अशा मर्यादा ठेऊन विशिष्ट महत्त्वाच्या कायद्यांना मतदारांची प्रत्यक्ष संमति घेण्याचा प्रघात ठेवल्यास लोकसत्तेचे सर्व फायदे पदरांत पडून प्रातिनिधिक पद्धतींतील दोष कमी होतील. या पद्धतीचा अवलंब केल्यास राज्यघटनेला अस्थिरता प्राप्त होईल व रोज नव्या नव्या सुधारणांचे प्रयोग लोक करूं लागतील ही

काल्पनिक भीति प्रत्यक्ष अनुभवानें खोटी ठरली आहे. सामान्य जनता ही प्रायः स्थितिप्रिय असते आणि तिच्या मतानें राज्यकारभार चालण्यानें राज्यांत घाईनें नव्या सुधारणा अमलांत येतील ही भीति व्यर्थ आहे, असाच अनुभव सर्वत्र येत आहे. स्विट्झर्लंडप्रमाणेंच अमेरिकेतील कांहीं घोट राज्यांसारख्या इतर राज्यांत ह्या पद्धतीची अंमलबजावणी झालेली आहे. प्रत्यक्ष लोकसत्तेचें तिसरें स्वरूप म्हणजे विशिष्ट संख्येइतक्या मतदारांनीं दर्शविलेला कोणताही कायद्याचा मसुदा लोकसभेपुढें चर्चेला मांडणें हें होय. या पद्धतींत तर आक्षेपार्ह असें कांहीं आहे, असें आम्हांला वाटत नाहीं. कारण अशा मसुद्यांना कायद्यांचें स्वरूप देणें किंवा न देणें हें सर्वस्वी लोकसभेच्याच हातीं असतें. कायद्यांचे मसुदे चर्चेला पुढें मांडण्याचाच केवळ अधिकार सामान्य मतदारांस दिलेला असतो. असो; अशा रीतीनें विशेष महत्त्वाच्या व सामान्य जनतेच्या बुद्धीला सहज आकलन होणाऱ्या स्थूल तात्त्विक स्वरूपाच्या प्रश्नांसंबंधीं प्रत्यक्ष लोकसत्तेची अंमलबजावणी करणें आणि जे प्रश्न तपशीलाचे, संकीर्ण स्वरूपाचे. सामान्य जनतेच्या बुद्धीमत्तेच्या आटोक्यांत न येणारे किंवा सामान्य जनतेला महत्त्वाचे न वाटणारे असे असतील त्या बाबतींत अप्रत्यक्ष निवडणुकी व मर्यादित मताधिकार यांचा अवलंब करणें राष्ट्रहितास पोषक होईल असें आम्हास वाटतें. असें केल्यास पध्याचें प्रातिनिधिक राज्ययंत्र कांहीं बाबतींत अधिक महाजनसत्ताक बनेल आणि कांहीं बाबींत शुद्ध लोकसत्ताक बनेल. आणि राजकीय पक्षांच्या कारवाईला फारसा अवकाश उरणार नाहीं.

स्थानिक व औद्योगिक इत्यादि लोकसभा.

लोकसत्तेचा पूर्ण परिपोष केवळ राष्ट्रीयसभेची घटना उत्तम झाल्यानें होऊं शकत नाहीं. तो होण्याला राष्ट्राच्या निरनिराळ्या घटकांची संघटना होऊन त्यांत लोकसत्तेचें तत्त्व अमलांत आलें पाहिजे. राष्ट्र हें अनेक प्रदेशांत राहाणाऱ्या, अनेक धंदे करणाऱ्या, अनेक मतांच्या व सांप्रदायांच्या अनेक समाजांचें, वर्गांचें किंवा जातींचें झालेलें असतें. या राष्ट्रीय घटकांना, किंवा राष्ट्रांतील समूहांना आपापल्या पुरतें स्वातंत्र्य देऊन त्यांच्या लोकसभांमार्फत त्यांचे व्यवहार होऊं लागल्याखेरीज राष्ट्रांत लोकसत्तेचा, सार्वजनिक हितबुद्धीचा व स्वातंत्र्याचा खरा उदय होणें शक्य नाहीं. राष्ट्रीय सरकारचें कार्य, या सर्व समूहांचे व्यवहार नीट चालले आहेत किंवा नाहीं हें पाहाणें, त्यांच्या सामान्य हितसंबंधाचें संरक्षण करणें, ज्या गोष्टी अशा एकदेशी समूहांमार्फत झाल्यानें राष्ट्रीय हिताला कमतरता येईल तेवढया करणें आणि देशांत शांतता राखून परचक्राचें निवारण करणें एवढेंच असणें तात्त्विकदृष्ट्या योग्य आहे. तथापि हल्लीं पाश्चात्य देशांत राजसत्तेचें केंद्रीकरण अतीशय झालेलें दृष्टीस पडतें. हें कमी होण्यासाठीं स्थानिकस्वराज्य आणि औद्योगिक स्वराज्य किंवा औद्योगिक लोकसत्ता, यांची स्थापना होऊन अधिकारवृद्धी व्हावी याबद्दल राजकीय सुधारकांचे प्रयत्न चाललेले आहेत. यासंबंधीं बँर्ट्रंड रसेल हे आपल्या " स्वातंत्र्याचे मार्ग " (Rcads to Freedom) या पुस्तकांत लिहितातः—

समूह स्वातंत्र्य.

"मोठमोठया राष्ट्रांत आज बहुमतांचें जें राज्य चालू आहे त्यांत एक अनर्थकारक दोष आहे. तो म्हणजे पुष्कळ प्रश्नांशीं राष्ट्रांतील केवळ एखाद्या विभागाचाच प्रत्यक्ष संबंध असतो व एकंदर लोकसंख्येपैकीं तेवढया विभागासच त्या प्रश्नासंबंधीं खरें ज्ञान असतें; परंतु त्यांचा निर्णय देण्याच्या

कामीं राष्ट्राच्या इतर विभागांना मत देण्याचा तितकाच अधिकार असतो. जेव्हां कोणत्याहि लोकांचे हिताहित एखाद्या प्रश्नावर अवलंबून असतें, तेव्हां त्याचा निर्णय देतांना अप्रासंगिक गोष्टींना महत्त्व देण्याकडे त्यांचा कल होतो,... याकरितां राष्ट्रांतील एका लहानशा विभागाशींच ज्या प्रश्नांचा संबंध असेल अशांचा निर्णय सर्व राष्ट्राला करूं देणें हें फार धोक्याचें आहे; मग हा विभाग प्रादेशिक असो किंवा औद्योगिक असो किंवा दुसऱ्या कोणत्याहि कारणांनीं बनलेला असो. या दोषावर सध्या दिसणारा उत्तम उपाय म्हणजे ज्या गोष्टीचा संबंध सर्व राष्ट्रांपेक्षां त्यांतील एका विशिष्ट विभागांशींच येत असेल त्या गोष्टींत अशा प्रत्येक विभागाला किंवा लोकसमूहाला स्वराज्य देणें हा होय. एका विशिष्ट लोकसमूहानें निवडलेल्या लोकांकडून चालविलें जाणारें त्या समूहाचे स्वराज्य, हें केव्हांही सर्व देशाचें नामधारी प्रतिनिधित्व करणाऱ्या दूरवर्ति राष्ट्रीय लोकसभेच्या राज्यापेक्षां, आपल्या मतदारांच्या हिताबद्दल अधिक दक्षता ठेवणारें आणि मतदारांशीं अधिक निकटसंबंध असणारें असेंच असेल. अराजक संघवादी(a syndicalists)आणि त्यांच्याच कल्पनेला अधिक व्यवस्थित स्वरूप देणारें संघनिष्ठ समाजसत्तावादी यांची, प्रत्येक औद्योगिक घटकांना आपापल्या अंतर्गत प्रश्नांसंबंधीं पूर्ण स्वातंत्र्य किंवा स्वराज्य देण्याची, कल्पना सर्वांत नवीन आहे आणि तिचा अवलंब केल्यास आणि ज्या लोकसमूहांचे पृथक् हितसंबंध आहेत त्या सर्वांना असेच अधिकार दिल्यास प्रातिनिधिक लोकसत्तेंत जे दोष दृग्गोचर होत आहेत ते बऱ्याच अंशानें नष्ट होतील असें मला वाटतें. "[१]

प्राचीन आर्यावर्तांत या स्थानिक स्वराज्याला, औद्योगिक स्वातंत्र्याला किंवा समूहस्वातंत्र्याला अत्यंत महत्त्व प्राप्त झालें होतें आणि मध्ययुगीन

I. see Roads to Freedom by Bertrand Russell p. 140-141

स्थानिक व औद्योगिक स्वराज्य.

युरोपांत न आढळणारीं अशीं लोकसत्तेचीं बरींच तत्त्वें या संस्थांत प्रत्यक्ष अमलांत असल्याचें स्पष्ट दिसतें. भारतीयांच्या जात-पंचायती, ग्रामपंचायती, औद्योगिक श्रेणी धार्मिकसंघ किंवा विद्यापीठासारख्या ज्ञानसंवर्धनाच्या संस्था चालविणाऱ्या संघटना पाहिल्यास त्यांत लोकसत्तेचें तत्त्व, बहुमताचा अंमल, सार्वजनिक निवडणुकी, सार्वत्रिक मतदान, प्रातिनिधिक लोकसत्ता, स्त्रियांचा मताधिकार, व्यक्ति व समाज यांच्या हक्कांची योग्य जोपासना, कांहीं विशिष्ट प्रश्नांवर मतदारांचें प्रत्यक्ष मत घेण्याची रेफरेंडमची पद्धति, मतस्वातंत्र्य, गुप्तमत दान वगैरे आर्वाचीन पाश्चात्य राष्ट्रांत दृष्टीस पडणाऱ्या संस्था, तत्त्वें किंवा आचार रूढ असलेले आढळतात.

भारतवर्षांतील ग्रामसंस्था म्हणजे लोकशाहीचीं छोटीं छोटीं राज्येंच होतीं, अशी अनेक युरोपीयन समाजशास्त्रज्ञांनींहि कबुली दिलेली आहे.

प्राचीन भारतीय ग्रामसंस्था.

या लोकशाहीच्या राज्यांच्याहातीं गांवांतील सर्व प्रभुत्व असे, सालोसाल ठराविक रक्कम राजाला कर रूपानें देण्यापलीकडे गांवांतील लोकांशीं सरकारचा अधिक संबंध येत नसे. दक्षिण हिंदुस्थानांत या स्थानिक स्वराज्याचे अवशेष बराच काळ राहिले होते व तेथेंच या संस्थांचा विशेष परिणाम झालेला दिसतो. तामिल प्रांतांतील ग्रामसंस्थासंबंधीं श्री. विनयकुमार सरकार लिहितातः– " कांजीवरम जवळच्या चोळ राज्यांच्या शिलालेखांवरून असा सामान्य निष्कर्ष काढतां येतो कीं, या ग्रामसभांवर खेड्यांतील राज्यकारभाराची सर्व जबाबदारी टाकलेली असे. दक्षिण हिंदुस्थानांतील ग्रामपंचायतींची खेड्यांतील जमिनींवर पूर्ण मालकी असे, आणि रान तोडून नवीन लागवडीस आलेल्या जमिनी गांवांतील पंचायतीच्याच कबजांत असत. गांवांतील लोकनियुक्त

अधिकाऱ्यांना प्रसंग पडल्यास दंड करण्याचा अधिकार ग्रामसभांना असे. धर्मादाय करण्याकरितां कोणी पैसा अगर जमिनी दिल्या तर त्या आपल्या कबजांत घेऊन निरनिराळे पंच नेमून त्यांच्याकडून त्यांची व्यवस्था लावीत असतात. सर्व प्रकारचे कर वसूल करण्याचें काम या पंचायतीकडेच असून एखाद्या खेड्याला करांतून मुक्त करणें किंवा एखाद्या जमीनदाराला कराची माफी देणें, हे अधिकार ह्यांना असत. ...... सरकार देणें न देणाऱ्याची जमीन जप्त करणेंहि त्यांच्या अखत्यारांत येत असे. स्थानिक न्यायदानाचें कार्यही यांच्याकडेच असे. खुनासारख्या गुन्ह्यांची चौकशी करण्याचा कामींही त्यांना अधिकार असून हे अधिकार अमलांत आणण्याच्या कामीं त्यांना राजाच्या अधिकाऱ्यांकडे याचना करावी लागत नसे......जमिनीवर सर्व समाजाची मालकी असो किंवा नसो, सीलोनमधील देशांत खेड्यांतील लोकांना राज्यकारभाराचे अतिशय अधिकार प्राप्त झालेले होते यांत शंका नाहीं. हिंदुलोकांच्या सार्वजनिक जीवनास ग्रामसंस्थांना प्रमुख व महत्त्वाचें स्थान प्राप्त झालेलें होतें आणि या संस्थांच्यामार्फत देशाच्या राज्यकारभारांत खेडयांतील लोक भाग घेत असत.

साम्राज्यांतलि राजसत्तेचें केंद्रीकरण

हिंदुस्थानांत सर्वच काळीं या ग्रामसंस्थांना असे राजकीय अधिकार उपभोगितां येत असत असें वाटत नाहीं. सध्यां ज्याप्रमाणें आमच्या देशांतील स्थानिक स्वराज्याच्या संस्था नामधारी आहेत, त्याचप्रमाणें मौर्य साम्राज्यांतील ग्रामसंस्था अधिकारहीन बनल्या असाव्यात[१] असें श्री. विनयकुमार सरकार हे म्हणतात. या

" To cite a modern analogue, The de facto initiative and responsibility of the Mourya rural assemblies were not more real than the sham local self—government enjoyed by the municipalities and dis-

वेळीं हल्लीच्या डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटप्रमाणेंच मौर्य सम्राज्याचा सर्व राज्यकारभार "गोप" नांवाच्या स्थानिक अधिकाऱ्यामार्फत होत असे असा त्यांचा तर्क आहे.

पाश्चात्य राज्यांतील स्थानिक स्वराज्य.

आतां अर्वाचीन पाश्चात्य देशांतील स्थानिक स्वराज्याकडे पाहिल्यास तेथील म्युनिसिपालिटया व इतर स्थानिक स्वराज्याच्या संस्था अनेक लोकोपयोगी कार्यें स्वतंत्रतेनें चालवीत असल्याचें दिसून येतें. समाजसेवेची आणि औद्योगिक स्वरूपाचीं अनेक कार्यें अंगावर घेऊन स्थानिक स्वराज्याच्या संस्थांनीं तीं चालविणें हें त्यांचें आद्य कर्तव्य आहे आणि अशा तऱ्हेनें समाजाच्या सर्व सार्वत्रिक व सामान्य गरजा या संस्थांमार्फत भागविल्या जाव्यात व भांडवलशाहीला या कार्यांत स्थान मिळूं नये अशा मताचे कांहीं लोक आहेत. समाजसेवेची औद्योगिक किंवा सामाजिक कार्यें समाजांकडून व्हावींत, त्यांत भांडवलशाहीला स्थळ असूं नये. परंतु हीं कार्यें मध्यवर्ति राज्ययंत्रावर न लादतां स्थानिक स्वराज्याच्या संस्थामार्फत व्हावीत आणि स्थानिक प्रदेशांतील संत्युपादनाच्या साधनांवर त्यांचीच मालकी असावी अशा मतांना म्युनिसिपल सोशॅलिझम म्हणजे स्थानिक समाजसत्तावाद असें म्हणतात. प्रो० शहा यांनीं हिंदुस्थानांतील म्युनिसिपालिटयासंबंधीं एक पुस्तक लिहिलें आहे. त्यांत मुंबईतील कापडाच्या गिरण्या किंवा कलकत्त्यांतील तागाच्या गिरण्या यांच्यावर तेथील कार्पोरेशनचा ताबा किंवा मालकी प्रस्थापित करावी असें सुचविलें आहे. श्री०

trict boards of British India at the beck and call of the district Magistrate."

The Political institutions and theories of the Hindus.

स्थानिक समाजसत्तावाद. राधाकमल मुकर्जी यांच्या मतानें व इतर विद्वानांच्या मतें प्राचीन भारतवर्षांत खेड्यांतील जमिनींची मालकी ग्रामपंचायतीकडे असे असें आहे. सध्यां ब्रिटिश सरकारनें हिंदुस्थानांतील सर्व जमिनीवर आपलचि मालकी आहे हें जें समाजसत्तेचें तत्त्व काढिलें आहे त्यापेक्षां हें भारतयांचें प्राचीन तत्त्व चांगलें आहे असें ते समजतात. पाश्चात्यांच्या म्युनिसिपल सोशॅलिझमूला धरूनच हीं मतें आहेत.

राष्ट्रीय सरकारशीं संबंध. राष्ट्रीय सरकार आणि स्थानिक स्वराज्य यांच्या परस्पर अधिकारांच्या दृष्टीनें विचार केल्यास पाश्चात्य देशांतील स्थानिक स्वराज्याच्या संस्थाचे तीन वर्ग करतां येतात. फ्रान्स, जर्मनी इत्यादि कांहीं देशांत स्थानिक स्वराज्याला फारसा अवसर ठेवलेला नसून राष्ट्रीय सरकारच्या स्थानिक अधिकाऱ्यांकडेच स्थानिक व्यवस्थेची बहुतेक जबाबदारी टाकलेली असून या संस्थांवर त्याची हुकमत चालूं शकते. अमेरिकेंत अगदीं याच्या उलट स्थिति आहे. तेथील संस्थानी पोटराज्यांतलि राज्यकारभाराच्या अंमलबजावणीचा बहुतेक भाग स्थानिक स्वराज्याच्या संस्थांनीं उचलला आहे. फक्त कायदे करण्याचेंच कार्य संस्थानीं सरकारास प्रामुख्यानें करावें लागतें. प्राचीन भरतखंडांतील ग्रामसंस्थाप्रमाणेंच अमेरिकेंतील स्थानिक स्वराज्यें छोटीशीं स्वतंत्र लोकशाहीचीं राज्यें आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. इंग्लंडांतील संस्था अधिकारांच्या दृष्टीनें या दोहोंच्या मधील वर्गांत पडतील. स्थानिक स्वराज्याच्या संस्थांना निरनिराळ्या कार्यांकरितां राष्ट्रीय सरकारकडून ग्रँट्स देऊन त्या त्या कार्यांच्या व्यवस्थेवर राष्ट्रीय सरकारचा ताबा व देखरेख वाढविण्याकडे तेथील सरकारचा कल आहे. तथापि फ्रान्स जर्मनीपेक्षां इंग्लंडांतील स्थानिक संस्थांना पुष्कळच स्वातंत्र्य आहे.

स्थानिक स्वराज्य आणि राष्ट्रीय सरकार ह्यांच्यांतील अधिकार-विभागणीच्या प्रश्नाचा विचार करतांना राष्ट्रिय सरकार मोठ्या प्रदेशावर कारभार करीत असल्यामुळें आणि अधिक बुद्धिमान व कर्तृत्वान लोक त्यांत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष भाग घेत असल्यामुळें ज्ञान व अनुभव किंवा राज्यव्यवस्थेची सामान्य-तत्त्वें जाणणें, या दृष्टीनें राष्ट्रीय सरकारांचा श्रेष्ठपणा कोणासही कबूल करणें भाग आहे. तसेंच स्थानिक परिस्थितीचें लोकांचें व त्यांच्या गरजांचें विशिष्ट ज्ञान, आणि राज्यकारमारांतील विशिष्ट परिस्थितीवर अवलंबून असणारा तपशील या बाबतींत स्थानिक स्वराज्यांत काम करणारे लोक श्रेष्ठ गणले पाहिजेत. या दृष्टीनें राज्यकारभारांची सामान्य तत्त्वें ठरविणें, राज्यांच्या निरनिराळ्या विभागांतील अनुभवाचा फायदा स्थानिक कारभार करणाऱ्या लोकांना देणें आणि सामान्यतः आपल्या श्रेष्ठ ज्ञानाचा लाभ स्थानिकसंस्थांना देऊन त्यांची वारंवार सुधारणा करणें, हें काम राष्ट्रीय सरकारनें केलें पाहिजे. उलट या तत्त्वांची व ज्ञानाची अंमलबजावणी करण्याचें काम स्थानिक-संस्थाकडे सोंपविलें पाहिजे. स्थानिक लोकांचें हिताहित व नित्याच्या सोयी-गैरसोयी स्थानिक स्वराज्यांत काम करणाऱ्या लोकांना जितक्या कळणें शक्य आहे तितक्या राष्ट्रीय सरकारला कळणें शक्य नाहीं. अर्थात् अशा सर्व बाबींचा कारभार त्यांच्याकडे सोंपवून त्यांना आपल्या श्रेष्ठ ज्ञानाचा फायदा देणें ते एखाद्या वर्गावर जुलूम करीत नाहींत याबद्दल त्यांच्यावर देखरेख ठेवणें आणि त्यांच्याकडे सोंपविलेली कार्यें उपयुक्ततेच्या व कार्यक्षमतेच्या दृष्टीनें एका किमान मर्यादेच्या खालीं पडत नाहींत याबद्दल दक्षता राखणें, ही जबाबदारी राष्ट्रीय सरकारांवर आहे. देशांत शांतता राखणें आणि पर-चक्राचें निवारण करणें, तसेंच सामाजिक, आर्थिक किंवा इतर अन्यायाचें निवारण करून सामाजिक, आर्थिक किंवा राजकीय क्रांतीचा संभव कमी

अधिकारविभाग-णीचीं तत्त्वें

करणें, देशांतील सर्वमान्य जनतेशीं सारखाच संबंध येत असल्यामुळें जीं कामें एकाच तंत्रानें होणें अवश्य आहे तीं करणें, हेंही राष्ट्रीय सरकारचें काम आहे. रस्ते, पूल, पाटबंधारे, पाणीपुरवठा, दवाखाने, आरोग्यसुधारणा, शेतीसुधारणा, शिक्षण, उद्योगधंदे, ट्राम व रेलवे, धर्मादाय, उतारूंच्या सोयी, वीजेसारख्या नैसर्गिक शक्तीचा पुरवठा, संरक्षण करणारे पोलीस, सामान्य प्रतीचे न्यायदान, वगैरे अनेक सामान्य लोकांच्या नित्याच्या व्यवहाराशीं संबंध येणारीं कामें स्थानिक लोकसभाकडे सोंपविणें शक्य व अवश्य आहे. अर्थात् खेडयांतील ग्रामपंचायतीसारख्या प्राथमिक लोकसभांकडे हीं कामें सर्वस्वीं सोंपवितां येणार नाहींत. याकरितां पांचसहा गांवचें लहान लहान गट करावे लागतील व पुन: या गटांचे निरनिराळीं लोकोपयोगीं कार्यें करण्यासाठीं त्या त्या कार्याच्या मानानें संघ करावे लागतील. मोठमोठया शहरांच्या म्युनिसिपालिटयांनींही आपणांस एकटयास न झेपणारीं कामें करण्यासाठीं म्युनिसिपाटयाचे संघ करणें सोयीचें होईल. अशा प्रकारचें स्थानिक स्वराज्यांचें गट किंवा संघ झाले असतां राष्ट्रीय सरकारचे देखरेखीचें काम बरेंच हलकें व कमी होऊन स्थानिककारांच्या वसुलीसारखीं राष्ट्रीय सरकारचीं कामेंही त्याकडें सोंपवितां येतील, आणि राष्ट्रीय सरकारच्या स्थानिक अधिकाऱ्यांवर देखरेख करण्याचें कार्यही या संस्थामार्फत होऊं शकेल.

स्थानिक स्वराज्य हें लोकसत्तेचें माहेरघर आहे. लोकांना आपल्या सत्तेचा खरा अनुभव येथेंच येत असतो आणि सार्वत्रिक मताधिकाराला योग्य क्षेत्र हेंच आहे. राज्यव्यवस्थेचा प्रदेश ज्या मानानें विस्तृत होत जातो आणि त्या खालच्या लोकांचे वर्ग ज्या मानानें बहुतर आणि बहुविध होऊं लागतात, त्या मानानें मताधिकार मर्यादित करणें आणि अप्रत्यक्ष निवडणुकीच्या तत्त्वाचा आश्रय

लोकसत्ता व महाजनसत्ता यांचीं क्षेत्रें.

करणें अवश्य होऊं लागतें. अर्थात् लोकसत्तेच्या परिपोषाच्या दृष्टीनें स्थानिक लोकसभांच्या कार्यांचा व्याप जितका वाढेल तितका इष्ट असतो. प्रांतिक किंवा राष्ट्रीय लोकसभांच्या घटनेंत महाजनसत्तेचें म्हणजे गुणकर्मांनी श्रेष्ठत्व मिळविलेल्या लोकांच्या सत्तेचें तत्त्व अवलंबणें योग्य आहे. मात्र हें श्रेष्ठत्व अनुवंशिक संपत्ति किंवा एकाद्या विशिष्ट जातींत किंवा कुलांत जन्म, अशा प्रमादी तत्त्वानें परीक्षिलें जातां कामा नये, आणि तें श्रेष्ठत्व आपल्या अंगीं आणवून घेण्याची संधि राष्ट्रांतील सर्व व्यक्तीस सारखीच मिळाली पाहिजे.

प्रतिनिधींची लायखी.

स्थानिक किंवा प्रांतिक अगर राष्ट्रीय लोकसभांत काम करणाऱ्या प्रतिनिधींना लायखीची अट असावी किंवा नाहीं, असा एक प्रश्न उद्भवत असतो. याचें उत्तर होकारार्थी देणेंच आम्हांला इष्ट वाटतें. पाश्चात्य देशांत प्रतिनिधींना मतदारांपेक्षां अधिक लायखीची अट असूं नये असाच प्रघात आहे. परंतु तो तात्त्विकदृष्ट्या समर्थनीय दिसत नाहीं. विद्येची अट ठेविल्यास सधन वर्गांतील लोकांनाच विद्या प्राप्त होत असल्यामुळें त्यांच्या हातीं सर्व कारभार जाईल हेंच लायखीची अट न ठेवण्याचें मुख्य समर्थन आहे; परंतु विद्या संपादनाची संधि सर्वांना सारखीच असली आणि देशांतील विलक्षण आर्थिक विषमता नष्ट होऊन ज्याला त्याला आपापल्या गुणाप्रमाणें नांव काढण्याची संधि मिळूं लागली म्हणजे अशी लायखीची अट ठेवण्यास कांहीं हरकत नाहीं; इतकेंच नाहींतर तशी ठेवणें अगदीं न्याय्य व आवश्यकच आहे, हें मत पाश्चात्य देशांतील सुधारकांनाही आतां पटूं लागलें आहे.[१] परंतु सध्याच्या आर्थिक व सामा-

१ मि. सिडने वेब हे आपल्या " A constitution for the Socialist Common wealth of Great Britain " या पुस्त-

जिक विषमतेच्या युगांत या तत्त्वाची अंमलबजावणी करण्यास ते तयार नाहींत; कारण तसें केल्यास गरीब लोकांना व खालच्या वर्गांना राज्य-यंत्रावर जी थोडीशीं हूकमत चालवितां येते तीही नाहींशी होईल व समाजांतील सर्वच सत्ता धनिक व पुढारलेल्या वर्गाच्या हातीं जाईल अशी त्यांना भीति आहे व ती योग्य आहे. अर्थात् ही स्थिति नष्ट करण्यास खरा उपाय समाजांतील आर्थिक व सामाजिक अन्याय्य विषमता नष्ट करणें हाच आहे, आपलें सार्वजनिक कार्य अज्ञान लोकांकडून करवून घेणें हा नव्हे. तात्पर्य स्थानिक, प्रांतिक किंवा राष्ट्रीय लोकसभांत काम करणाऱ्या लोकांना विद्येची कांहींतरीं अट ठेवणें अवश्य आहे यांत शंका नाहीं तसेंच गरीब लोकांचाही तेथें प्रवेश व्हावा म्हणून त्यांना कांहीं वेतन देणेंही आतां जरूर भासूं लागलें आहे, हें मि. वेब यांच्या खालीं दिलेल्या उताऱ्यावरून दिसून येईल.

कांत लिहितातः " when the whole population enjoye-in its life something like the same standardof material circumstances and something like a common comfort and home life; from infancy to manhood, approximately equel oppertunities of education and professioal training, it may be predicted that this demand that our elected representatives shall be both trained for their duties and adiquately maintained for the effecient performance of them, will be as much a common place of democracy as the insistance on definite vocational qualifications, along with payment at Standard Rates, for each section of the workers by hand or by brain " p.220. 221.

स्थानिक स्वराज्याप्रमाणेंच औद्योगिक किंवा व्यावसायिक स्वराज्याची (Industrial or Functional self-Government) कल्पना अलीकडे बरीच पुढें आलेली आहे.

औद्योगिक स्वराज्य.

संघनिष्ठ समाजसत्तावाद, अराजक संघवाद, किंवा बोल्शेव्हिझम् या पंथांनीं तिला प्रामुख्य दिलेलें आहे. समाजांतील निरनिराळे धंदे करणारे किंवा व्यवसाय करणारे लोक सहकार्यानें वागूं लागले म्हणजे त्यांचे संघ अस्तित्वांत येतात. या संघांना आपापल्या कार्यापुरतें स्वातंत्र्य देणें लोकसत्तेच्या दृष्टीनें अवश्य आहे. प्राचीन भारतवर्षांत आणि मध्ययुगीन युरोपांत औद्योगिक श्रेणि किंवा गिल्ड असत व त्यांना बरेंच स्वातंत्र्य असे. भारतीयांच्या श्रेणींची घटना त्यांच्या ग्रामसंस्थेप्रमाणेंच युरोपीयन तत्सदृश संस्थांपेक्षा लोकसत्तेच्या व समतेच्या तत्त्वांना अधिक अनुसरून होती असें राधाकमल मुकर्जी यांनीं दाखवून दिलें आहे. त्यामुळें कारखानदार आणि कामकरी यांच्यांतील लढ्याला त्यांत अवकाश नसे. तसेंच त्यांचा अंमलही अधिक सौम्य आणि समतेचा असे ते म्हणतात. या औद्योगिक किंवा व्यावसायिक संघांना स्वराज्य दिल्याखेरीज लोकांना खऱ्या स्वातंत्र्याचा उप-

---

" In the Indian guilds the wage-earning classes were never execluded, and indeed, their admission to full membership discouraged the development to that distinction between employing masters and employed wage-earners which was at the root of mutual jelousy,conflict and disintigration of the western, guild. In the east generally the guild regulations were not exacting, prohibitions and penalties were not harsh and frequent"...Democrasis of the east. p 213

भोग घेतां येणार नाहीं आणि राष्ट्रीय लोकसभेचा कार्यभाग कमी व आटोपशीर होणार नाहीं. ही संघ किंवा समूहस्वातंत्र्याची कल्पना ज्यांना समाजसत्तावादाचीं सर्व मतें मान्य नाहींत अशा राजनीतिज्ञांनाही आतां पटू लागलीं असून राष्ट्रीय लोकसभेच्या कार्याचा बराच भार कमी करून तो समाजांतील निरनिराळे धंदे व व्यवसाय करणाऱ्या लोकांच्या संघांकडे सोपवावा असें ते कबूल करू लागले आहेत. " इंग्लिश राजकीय संस्था " या पुस्तकाचे कर्ते व इंग्लंडांतील हयात राजनीतिज्ञापैकीं एक प्रमुख राजनीतिज्ञ मि. जे. ए. आर. मेरियट यांनीं आपल्या या पुस्तकाच्या नव्या आवृत्तीच्या प्रस्तावनेंत या औद्योगिक स्वराज्याच्या कल्पनेला मान्यता दिलेली आहे. ते लिहितात. " सनदशीर मार्गानें जाणारा परंतु बराच पुढें गेलेला एक राजकीय सुधारकांचा वर्ग प्रतिपादितो कीं,

मेरियटचें मत.

समाजांतील निरनिराळ्या व्यवसायांच्या लोकांच्या प्रातिनिधिक संस्थांची संख्या बरीच वाढविली पाहिजे. ट्रेड यूनियन कॉंग्रेस, ब्रि० औद्योगिक संघ, भौतिक विद्येच्या वृध्यर्थ स्थापिलेल्या संस्था, धर्मसांप्रदाय, वाचनालयें, शिक्षक, व्यापारी वगैरे लोकांच्या वार्षिक परिषदा, हीं सर्व भावी व्यावसायिक संघाचीं किंवा सोव्हिएट्सचीं बीजस्वरूपें आहेत असें मानावें. औद्योगिक लोकसभेची (Parliament of Industry) कल्पना जर मूर्त स्वरूपांत आली, तर सोव्हिएट कल्पना बऱ्याच अंशानें सिद्ध होईल. राष्ट्रीय लोकसभेचें प्रभुत्व कायम ठेऊन अशा संस्थांकडे त्या त्या वर्गाशीं संबंध येणारीं कामें सोंपविण्यास हरकत नाहीं आणि तसें करण्यापासून बरेच महत्वाचे फायदे लाभण्यासही कांहीं हरकत नाहीं. "

" A more advanced though still constitutionale school of reformers advocates the multiplication of re-

अशा तऱ्हेनें देशांतील बहुतेक कारभार स्थानिक व औद्योगिक किंवा व्यावसायिक स्वराज्यांच्या संस्थांकडे सोपविला म्हणजे लोकसत्तेचा पूर्ण परिपोष होऊन राष्ट्रीय लोकसभेची रचना करतांना मर्यादित मताधिकार आणि अप्रत्यक्ष निवडणुकी यांचा अवलंब करण्यास हरकत राहाणार नाहीं.

---

presentative bodies based not upon localities but upon vocations. In the trade union congress, the co-operative congress, the associaton of commerce and the Federation of Industries, perhaps even in the British association for the advancement of Science and the annual congress of such bodies as liabries, teachers, journalists, grocers and what not ? We have bodies which may possibly be regarded as soviets in embrys of the idea of a Parliament of Industry should materialize, it would represent an even more approach to the soviet principle. Nor is there any reason why subsidiary and sectional interests should not find representation in bodies of the kind enumerated above and why valuable results should not be obtained by them—provided that the legislative omnipotence of Parliament is carefully safeguarded."

See Introduction to tha English Political Institution's by J. A. R. Marriot.

प्रकरण ९ वें.

राज्यशासन व धर्मनिर्णय.

१ स्वभागभृत्या दास्यत्वे प्रजानां च नृपः कृतः ।
ब्रह्मणा स्वामिरूपस्तु पालनार्थं हि सर्वदा ॥

शुक्रनीतिसार अ. १ श्लो. १८८

२ प्रतिज्ञांच्चाधिरोहस्व मनसा कर्मणा गिरा ।
पालयिष्याम्यहं भौमं ब्रह्म इत्येव चासकृत् ॥
यश्चात्र धर्मो नीत्युक्तो दण्डनीतिव्यपाश्रयः ।
तमशङ्कः करिष्यामि स्ववशो न कदाचन ॥

शांतिपर्व अ. ५८ श्लो. ११५ ११६

३ सर्व विद्यासु कुशलो नृपो ह्यपि सुमन्मत्रवित् ।
मन्त्रिभि स्तु विना मन्त्रं नैकोऽर्थं चिन्तयेत्कचित् ॥
सभ्याधिकारि प्रकृतिसभासत्सु मते स्थितः ।
सर्वदा स्यान्नृपः प्राज्ञः स्वमते न कदाचन ॥

शु. नी. अ. २ श्लो. २-३

४ तस्मै मंत्रः प्रयोक्तव्यो दण्डमाधित्सता नृप ।
पौरजानपदा यस्मिन्विश्वासं धर्मतो गताः ॥

शां. प.

---

१ लोकांच्या पालनाकरितां आपल्या भागावर उपजीविका करणारा राजा हा स्वामिस्वरूपीं ईशकृत प्रजेचा नोकर आहे.

२ " मी राष्ट्र हेंच ब्रह्म समजून त्याचें नेहमी पालन करीन, येथें जो नीतिशास्त्र व राजनीतिशास्त्र यांना अभिप्रेत धर्म असेल तो मी निःशंकपणें करीन आणि स्वैर कधींहि वागणार नाहीं " अशी प्रतिज्ञा कर.

लोकसभांचें कार्य कायदे करणें, राजकीय धोरण ठरविणें, राज्यकारकारभारावर देखरेख ठेवणें, करांना मंजुरी देणें, या स्वरूपाचेंच असतें.

लोकसभा, स्वामी, अमात्य व अधिकारीवर्ग.

प्रत्यक्ष राज्यकारभार करणें आणि राजकीय धोरण अमलांत आणणें किंवा राज्यांतील कायद्यानुसार लोकांना न्याय देणें हीं कार्यें करण्यासाठीं राजापासून सामान्य शिपायापर्यंत अनेक अधिकारी व नोकर पगार देऊन कायमचे ठेवावे लागतात. राज्यरूपी पुरुषाचीं हीं कर्मेंद्रियें आहेत, असें म्हणण्यास हरकत नाहीं. मेंदूचें किंवा मनाचें कार्य लोकसभा करूं शकतील, परंतु हें कर्मेंद्रियांचें कार्य करण्यासाठीं एकावर एक अधिकार गाजविणारा असा अधिकारीवर्गच असावा लागतो, आणि या सर्व अधिकारीवर्गांच्या शिरोभागीं स्वामी व आमात्य म्हणजे एक राष्ट्राधिपति व त्याचे प्रधान किंवा मंत्रि, यांची योजना केलेली असते. लोकसभेचे सभासद किंवा लोकांचे प्रतिनिधि हे राज्याचे नेत्र किंवा ज्ञानेन्द्रियें होत, असें ही म्हणतां येईल व त्या दृष्टीनें स्वामी व आमात्य, यांना बुद्धि व मन यांची उपमा देतां येईल. राज्यघटनेचा विचार करतांना मनबुद्धिरूपी अमात्यस्वामींचा लोकप्रतिनिधीरूपीं ज्ञानेंद्रियांशीं आणि अधिकारीवर्गरूपी कर्मेंद्रियांशीं कसा व कोणता संबंध असावा, हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे.

शरीरांत ज्याप्रमाणें बुद्धि हें इंद्रिय सर्वांत श्रेष्ठ असून त्याचें प्रभुत्व सर्वांवर चालावें अशी योजना केलेली असते; त्याचप्रमाणें राज्यांतही एक

---

३ राजा सर्व विद्यांत प्रवीण व राजकारणवेत्ता असला तरी त्यानें एकट्यानें मंत्र्यांविना धोरणाचा कधींही विचार करूं नये. सभ्य, अधिकारी, सभासद यांच्या मतानें नेहमीं वागावें. आपल्या मतांप्रमाणें वागूं नये.

४ ज्यानें पौरजानपदाचा धर्मानें विश्वास संपादन केला आहे अशांकडेच राजानें राजकीय धोरण सोंपवावें.

स्वामी.

सर्वश्रेष्ठ व्यक्ती असावी लागते. हिला भूपति राष्ट्राधिपति, स्वामी राष्ट्राध्यक्ष किंवा राजा अशीं अनेक नांवें असतात. ही व्यक्ति लोकनियुक्त असली तर तिला राष्ट्राध्यक्ष म्हणावें व आनुवंशिक वतनदार असल्यास राजा म्हणावें असा हल्लींचा प्रघात आहे. आम्ही " स्वामी " हा शब्द दोन्हीही अर्थीं योजलेला आहे. प्राचीन भारतवर्षांत हा शब्द लोकनियुक्त राष्ट्राधिपासही लावीत असत आणि अशा राज्यांस राजशब्दोपजीवी संघ, असें म्हणत असत. लिच्छवींचें राज्य अशाच प्रकारचें असून त्यांत राजा, उपराजा, सेनापति व भांडागारिक, असे चार प्रमुख लोकनियुक्त अधिकारी असावेत असें बॅ. जयस्वल यांचें मत आहे.[1] तात्पर्य राजा हा नेहमीं आनुवंशिक वतनदारच असला पाहिजे ही हल्लींची समजूत प्राचीन भारतीयांच्या विचारांना धरून नाहीं. तसेंच आनुवंशिक वतनदार असला किंवा त्याला स्वामी अशी संज्ञा असली तरी तो राज्याचा मालक नसून तो प्रजेचा नोकर आहे असें (" स्वभागभृत्या दास्यत्वे प्रजानांच नृपःकृतः " " स्वामीरूपस्तु ") शुक्राचार्यांनीं स्पष्ट सांगितलें आहे. वेदान्ताच्या भाषेंत आत्मा हा रथी आणि बुद्धि हा सारथी असें म्हणतात, त्याचप्रमाणें राजनीतींत राष्ट्र रथी व राजा सारथी असें म्हणतां येईल. सारांश स्वामी, म्हणजे राजा किंवा राष्ट्राध्यक्ष, हा प्रजेचा नोकर आहे आणि त्याचें मुख्य कार्य धर्मशास्त्रानुसार प्रजेचें संरक्षण करणें हें आहे. राजानें प्रजेचें जें संरक्षण करावयाचें तें दण्डनीति व नीतिधर्म यांना धरून असलें पाहिजे, आपल्या स्वेच्छेप्रमाणें करतां कामा नये. आणि म्हणूनच मी धर्माला धरूनच वागेन, स्ववश होणार नाहीं किंवा स्वेच्छाचारी होणार नाहीं, अशी प्रतिज्ञा अभिषेकाच्या प्रसंगीं राजाकडून करवून घेण्याचा प्रघात हिंदुस्थानांत प्राचीन काळापासून तो शिवछत्रपतींच्या काळापर्यंत रूढ होता.

1 see Hindu Polity part I p. 51

स्वामींची प्रतिज्ञा.

ऐतरेय ब्राह्मणांत ही प्रतिज्ञा दिलेली असून तींत पुढील शब्द आहेत– " मी ज्या रात्रीं जन्मलों आणि ज्या रात्रीं मी मरणार, त्या दोहोंच्या मध्यंतरीं मी जें पुण्य केलें असेल, तें, माझा स्वर्ग, माझें जीवित, आणि माझी मुलेंबाळें, या सर्वांचा मी जर तुम्हांवर जुलूम केला तर, तुम्हीं अपहार करावा "[१] ज्या राजानें ही प्रतिज्ञा पाळली नाहीं त्याला पदभ्रष्ट करण्यासाठीं सौत्रामणि या नांवाचा एक विशिष्ट यज्ञ सांगितलेला असून तो पदभ्रष्ट राजाकडून करविला जात असे. यावरून राजा हा लोकांचा धर्मानें राज्य करण्यासाठीं नेमलेला नोकर आहे, ही कल्पना किती जागृत होती हें बरोबर पटतें.

धर्मशास्त्रानुसार राजानें प्रजेचें शासन करावयाचें असें ठरलेलें असल्यामुळें कायदे करण्याचें कार्य त्याच्याकडे उरत नाहीं. धर्माची अंमलबजावणी करणें आणि न्याय देणें, एवढींच कार्यें राजाकडे उरतात. पण हीं कार्येंही त्यानें स्वतः करावयाचीं नसून मंत्रिपरिषद आणि न्यायसभा, यांच्या अनुमतीनें करावयाचीं असतात असें राजनीतिशास्त्र सांगतें.

मन्त्रिपरिषद
व
न्यायसभा.

" प्रभुः स्वातंत्र्यमापन्नो ह्यनर्थायैव कल्पते " म्हणजे प्रभु स्वतंत्रतेनें वागू लागला असतां राज्यावर अनर्थच कोसळतो. म्हणून राजानें नेहेमीं मंत्रि, सभ्य अधिकारी, सभासद व प्रकृति यांच्या मतानें चालावें; आपल्या मतानें चालूं नये, असे शुक्रनीति सांगते. एक मनुष्य कितीही विद्वान किंवा सर्वज्ञ झाला तरी त्याच्या हातून दुसऱ्याच्या साहाय्याशिवाय राज्यकारभार होणें शक्य नाहीं आणि लोकांच्या हक्कांचें योग्य संरक्षणही होऊं शकत नाहीं. म्हणून धर्माची अंमलबजावणी करतांना मंत्रिपरिषदेच्या मतानें आणि

---

1 See Jayswal's Hindu Polity p, 27, 28 part ,II.

धर्मनिर्णय अथवा न्यायदान करतांना त्यानें न्यायसभेच्या तंत्रानें वागलें पाहिजे. अशाप्रकारें राज्यशासन म्हणजे अंमलबजावणी आणि धर्मनिर्णय म्हणजे न्यायदान, अशीं राजसत्तेचीं दोन पृथक् अंगें होतात आणि राजनीतींत त्यांचा पृथकपणेंच विचार करावा लागतो. राज्ययंत्रांत या दोन कार्यांकरितां पृथक् संस्थाही स्थापाव्या लागतात.

पैकीं राज्यशासनाचा ऊर्फ अंमलबजावणीच्या कार्याचा प्रथम विचार करूं. या कार्याची जबावदारी स्वामी व अमात्य यांच्या शिरावर लादलेली असते. राजत्व हें सहायसाध्य आहे. जसा एका चाकानें रथ चालत नाहीं, तसें एकट्या राजाच्यानें राजत्वाचें कार्य होऊं शकत नाहीं.

स्वामी व अमात्य.

म्हणून त्यानें अमात्य नेमावेत व त्यांचा सल्ला ऐकावा, असें कौटिल्यानें आपल्या अर्थशास्त्रांत म्हटलें आहे[१] स्वामीप्रमाणेंच अमात्य हें एक राज्याच्या सात अंगांपैकीं दुसरें स्वतंत्र अंग आहे[२] असें भारतीयराजनीतिज्ञ एकमुखानें सांगत आहेत; आणि कांहींनीं स्वामीव्यसनापेक्षां अमात्यव्यसन मोठें गणलेलें आहे.

वैदिक काळीं स्वामी किंवा राष्ट्रपति हा आनुवंशिक नसून लोकनियुक्त असत असे. त्याला निवडण्याचें कार्य समिति नांवाच्या लोकसभेकडे असें. त्याकाळीं राजाची निवड तहाहयातीच्या

१ सहायसाध्यं राजत्वं चक्रमेकं न वर्तते।
कुर्वीत सचिवां स्तस्मात् तेषां च श्रृणुयान्मतम् ॥ अर्थशास्त्र.

२ राज्याची सात अंगें शुक्रनीतींत दिलीं आहेत. तीं अशीं— (१) स्वामी (२) अमात्य (३) सुन्हृत् (४) कोश (५) राष्ट्र (६) दुर्ग (७) बल.

आनुवंशिक व लोकनियुक्त स्वामीत्व.

मुदतीनें होत असे. पुढें कांहीं राज्यांत राजाची निवड मर्यादित मुदतीनें होऊं लागून लोकशाही अस्तित्वांत आली तर कांहीं राज्यांत राजपद आनुवंशिक बनून लोकांचा आपला स्वामी निवडण्याचा अधिकार नाममात्रानेंच शिल्लक राहिला. ब्राह्मण ग्रंथांत राजपद आनुवंशिक होत असल्याचीं चिन्हें दृष्टीस पडतात. तथापि राज्याभिषेकाचे वेळीं लोकनियुक्ततेचा लोकांचा अधिकार स्वरूपतः कायम राहिला होता. आजच्या सुधारलेल्या पाश्चात्य देशांतही राष्ट्रपति नेमण्याच्या वरील दोन्ही पद्धति चालू असलेल्या दिसतात. कांहीं देशांत इंग्लंडाप्रमाणें आनुवंशिक राजपद अद्यापि कायम आहे तर बऱ्याचशा देशांत तें लोकनियुक्त बनलें असून त्यावर अधिष्ठित होणाऱ्या व्यक्तीस राष्ट्राध्यक्ष अशी पदवी दिलेली आहे. लोकसत्तेच्या काळांत आनुवंशिक तत्त्वावर राष्ट्रपतीची योजना करणें कोणालाही फारसें संमत होणार नाहीं. तथापि राजपद आनुवंशिक असलें तरी लोकसत्तेची स्थापना होऊं शकत नाहीं असें नाहीं. अशा देशांत इंग्लंडाप्रमाणें राजा केवळ नामधारी बनवून मंत्रिमंडळासच खरें सत्ताधारी बनविणें आणि मंत्रिमंडळाची घटना लोकसत्तेला अनुसरून करणें हा लोकसत्तेचा एक मार्ग असतो. ज्या देशांतील राजघराणें बराच काळ सिंहासनस्थ असल्यामुळें लोकांच्या आदरास पात्र झालेलें आहे किंवा ज्या लोकांची राजनिष्ठा फारच प्रबल आहे

नामधारी व सत्ताधारी राजपद.

अशा देशांत ही प्रच्छन्न लोकसत्ता अस्तित्वांत येते. सध्या इंग्लंडांतील आनुवंशिक राजपदाकडून आणखी एक महत्त्वाचें कार्य घडत आहे. तें म्हणजे साम्राज्याच्या ऐक्याचें बादशहा हें एक मूर्त स्वरूप बनलेलें आहे, हें होय. वसाहतींतील लोकांच्या साम्राज्यवादाच्या भावना व्यक्त आणि दृढ करण्यास बादशहाची मूर्ति कारण होऊन ही मूर्त्ति केवळ नामधारीच असल्यामुळें

असाहतवाल्यास तिजबद्दलची निष्ठा आपल्या स्वातंत्र्याचा अपहार करील अशी भीति वाटत नाहीं. साम्राज्यांतील ऐक्य भावनेच्या चिरस्थायित्वास असें एखादें मूर्त प्रतीक अवश्य आहे, असें बरेंच इंग्रज राजनीतिज्ञ समजतात. साम्राज्या॰ प्रमाणें राष्ट्रीय ऐक्यभावनेसहि अशा आनुवंशिक राजपदाची पुष्कळ मदत होणें शक्य आहे. राजपद आनुवंशिक असल्यामुळें राजकीय संस्थांत एका प्रकारचें स्थैर्य उत्पन्न होतें. निरानिराळ्या राजकीय पक्षांपासून अलिप्त अशी एक व्यक्ति स्वामित्वाच्या पदावर अधिष्ठित झालेली लोकांपुढें असली म्हणजे राजकीय पक्षांधतेमुळें राष्ट्रहिताचा विचार दृष्टीआड होण्याचा संभव कमी होतो आणि राजसत्ता व राजकीय संस्था यांच्या संबंधींचा गूढ असा एक अनिर्वचनीय आदर लोकांतच दैव जागृत राहातो, म्हणून असें आनुवंशिक राजत्वाचें समर्थन करणारे लोक अद्यापिही बरेच आढळतात. परंतु सत्ताविहीन बनलेल्या या राजपदाबद्दल लोकांत खरोखर आदर किती राहात असेल व तो आणखी किती काळ राहील याबद्दल बरीच शंका आहे. शिवाय ज्या देशांत असलें राजपद कांहीं कारणांनीं टिकून राहिलें आहे तेथेंच हे फायदे लाभणारे आहेत. आनुवंशिक राजपदाची संस्था जेथें नाहीं तेथें ती स्थापण्यापासून कांहीं फायदा होईल किंवा वरील फायदे तेथील लोकांस लाभतील अशी अपेक्षा करतां येत नाहीं. सारांश सध्याच्या युगांत लोकनियुक्त राजपद हेंच श्रेयस्कर आहे व जेथें आनुवंशिक राजपद असेल तेथें तें केवळ नामधारी बनणें अपरिहार्य व इष्टहि आहे. राष्ट्राचा स्वामी आनुवंशिक ठेऊन त्याला नामधारी बनविणें या पद्धतीपेक्षां तो लोकनियुक्त बनवून त्याला खरा सत्ताधारी करणें अधिक युक्त आहे, असें आम्हांस वाटतें.

स्वामी किंवा राष्ट्रपति हा लोकनियुक्त असला म्हणजेही तो नेहमीं खरा सत्ताधारी असतोच असें म्हणतां येत नाहीं. याचें उदाहरण फ्रान्स देश हें आहे. तेथें लोकनियुक्त राष्ट्राध्यक्ष आहे,

लोकनियुक्त पण नामधारी राजपद.

परंतु तो इंग्लंडच्या राजाइतकाच नामधारी असून खरी राजसत्ता तेथील मंत्रिमंडळाकडेच गेलेली आहे; आणि म्हणूनच अमेरिकन राजकारणांत राष्ट्राध्यक्षाचें नांव जितकें ऐकूं येतें, तितकें तें फ्रेंच राजकारणांत येत नाहीं. तेथील राज्यसूत्रें प्रधानमंडळच हलवीत असल्यामुळें मुख्य प्रधानाचेंच नांव वारंवार ऐकूं येतें. इंग्लंडाप्रमाणेंच तेथेंही जबाबदार प्रधान मंडळाची व्यवस्था अस्तित्वांत असल्यामुळें अशी स्थिति झालेली आहे, तथापि मंत्रिमंडळांच्या सभांना हजर राहून आपला सल्ला देण्याचा अधिकार फ्रान्सच्या राष्ट्राध्यक्षास आहे तसा इंग्लंडच्या राजाला नाहीं.

जबाबदार व स्वतंत्र प्रधानमंडळ.

जबाबदार प्रधानमंडळ आणि स्वतंत्रप्रधानमंडळ अशा दोन राज्यव्यवस्था सध्यां पाश्चात्य देशांत रूढ आहेत. जबाबदार प्रधानमंडळ हें समुच्चयरूपानें लोकसभेला जबाबदार असतें आणि लोकसभेंतील त्याचें बहुमत नष्ट झालें कीं तें आपल्या जागांचे राजीनामे देतें. स्वतंत्रप्रधान मंडळ हें राष्ट्रपतीस जबाबदार असतें. अशा पद्धतींत राष्ट्रपति हा खरोखरच सत्ताधारी असतो व पहिल्या पद्धतींत तो नामधारीच बनतो. प्रधानमंडळ लोकसभेला जबाबदार असल्यामुळें राष्ट्रपतीस त्यांच्याकडेच सर्व अधिकाराचीं सूत्रें देऊन स्वस्थ बसावें लागतें. स्वतंत्र प्रधानमंडळ असल्यास राष्ट्रपति लोकनियुक्त असेल तरच लोकसत्तेचा अनुभव प्रजेला मिळूं शकतो; परंतु प्रधानमंडळ लोकसभेला जबाबदार असलें म्हणजे राष्ट्रपति आनुवंशिक असो किंवा लोकनियुक्त असो, लोकसत्तेच्या प्रस्थापनेस अवकाश मिळतो, कारण त्यास नामधारी बनवून प्रधानमंडळाकडे राज्यसूत्रें आलीं म्हणजे लोकसत्ता पूर्णत्वानें नांदू शकते. प्राचीन भारतवर्षांत राष्ट्रपति लोकनियुक्त बनवून लोकशाहीची उघड स्थापना करण्याच्या मार्गाप्रमाणेंच जबाबदार

प्रधानमंडळाच्या राज्यव्यवस्थेनें लोकसत्तेची प्रच्छन्न स्थापना करण्याच्या कामीं लोकांनीं बरीच प्रगति केलेली असावी असें ब्रॅ. जयस्वल यांचें मत आहे.

जबाबदार प्रधानमंडळ व भारतीय राजनीति.

जबाबदार प्रधान मंडळाची व्यवस्था पूर्णावस्थेस पोहोंचली असतां दोन गोष्टी रूढ होतात. (१) राज्यसूत्रें प्रधानमंडळाच्या हातीं येऊन राष्ट्रपति केवळ नामधारी बनतो. (२) आणि प्रधाममंडळ त्यास जबाबदार न राहातां लोकसभेला जबाबदार राहातें म्हणजे त्यांची योजना करण्याची किंवा त्यांना पदभ्रष्ट करण्याची वास्तविक सत्ता लोकसभेला असते. हे दोन्ही प्रघात प्राचीन भारतीयांस माहीत होते इतकेंच नाहीं तर येथील राजनीतिशास्त्रज्ञांनीं त्यांची स्तुतिस्तोत्रेंही गायिलेलीं आढळतात, असें जयस्वल हे म्हणतात. नीतिवाक्यामृतांत " न खलु असौ राजा यो मन्त्रिणो अतिक्रम्य वर्तते " जो राजा मंत्र्यांना न जुमानतां वागतो तो राजाच नव्हे, असें म्हटलें आहे. " न बिभेति नृपो येभ्यः तैः स्यात्किं राज्यवर्धनम् " म्हणजे ज्या मंत्र्यांना राजा भीत नाहीं त्यांच्याकडून राज्याची वृद्धि किंवा समृद्धि कशी होणार असें शुक्रनीति सांगते. महाभारतांतील शांतिपर्वांत " परतन्त्रः सदा राजा स्वल्पे सोऽपि प्रसंजते । सन्धि–विग्रहयोगे च कुतो राज्ञः स्वतंत्रता " म्हणजे राजा हा नेहेमीं परतंत्रच असतो, तो थोड्यानेंही प्रसन्न होतो, सन्धिविग्रह करण्याच्या कामीं राजाला स्वतंत्रता कोठून असणार, असें स्पष्ट सांगितलें आहे. कौटिल्या इतका राजसत्तेचा भोक्ता पण तोही आपल्या अर्थशास्त्रांत " आत्यायिके कार्ये मन्त्रिणे मन्त्रिपरिषदं च आहूय ब्रूयात् । तत्र यद्भूयिष्ठाः कार्यसिद्धिकरं वा ब्रूयुः तत्कुर्यात् " म्हणजे असामान्य कार्यांच्या वेळीं मंत्रि व मंत्रिपरिषद यांना बोलवून त्यांचा विचार

घ्यावा आणि त्यांत जसें बहुमत पडेल तसें करावें, असें म्हणतो. शुक्राचार्य तर " प्रभुः स्वातंत्र्यमापन्नो ह्यनर्थायैव कल्पते " म्हणजे राजा स्वतंत्र होईल तर राज्यावर अनर्थच ओढवेल असें स्पष्ट बजावतात. सारांश राजानें सर्व राज्यकारभार मंत्र्यांच्या विचारेंच केला पाहिजे अशी सर्वमान्य भारतीय राजनीति आहे. तसेंच

तस्मिन्मंत्रः प्रयोक्तव्यो दण्डमाधित्सता नृप।
पौरजानपदा यस्मिन्विश्वास धर्मतो गताः॥

या श्लोकावरून ज्या मंत्र्यानें पौरजानपद नांवाच्या लोकसभेचा विश्वास संपादन केलेला आहे त्यालाच मुख्य प्रधानकीचीं वस्त्रें द्यावींत अशी राजनीति व्यक्त होतें असें बॅ. जयस्वल समजतात. तसेंच राजाविषयीं किंवा राजपुत्राविषयीं बाह्यतः राजनिष्ठा व्यक्त करून खरे राज्यसूत्रधारी जे मंत्री त्यांना पदभ्रष्ट करून आपला कार्यभाग करून घेण्याची कलाही प्राचीन भारतीय प्रजाजन जाणत असत असें ते म्हणतात. अशोक राजाच्या कारकीर्दींत तक्षशिलेची पौरसभा तेथील राजप्रतीनिधीवर रुष्ट झाली होती व म्हणून अशोकानें आपला पुत्र कुणाल यास तेथें पाठविलें. तेव्हां पौर प्रतिनिधींनी गांवाच्या बाहेर येऊन त्याचें स्वागत केलें व सांगितलें कीं,

"न वयं कुमारस्य विरुद्धाः न राज्ञोऽशोकस्यापी तु दुष्टात्मानोऽमात्या आगत्य अस्माकं अपमानं कुर्वन्ति "

"आमचा विरोध राजा अशोक किंवा राजपुत्र (कुणाल) याच्याशीं नाहीं. परंतु दुष्टात्मे अमात्य येथें येऊन आमचा अपमान करतात. " पुढें अशोक राजानें तेथील अमात्य काढून दर तीन वर्षांनीं नवे अमात्य नेमण्याची व्यवस्था केली. सारांश ह्या पाश्चात्य देशांत रूढ असलेल्या जबाबदार प्रधानमंडळाच्या व्यवस्थेच्या बुडाशीं असणारीं तत्वें भारतीयांसही अवगत होतीं, यांत शंका नाहीं. आतां या तत्त्वांचा कोणत्या काळीं कितपत अंमल होत असे, त्याबद्दल मतभेद होऊं शकेल. असो.

वर स्वतंत्र आणि जबाबदार प्रधानमंडळाच्या ज्या दोन राज्यव्यवस्था सांगितल्या त्यांतील गुणदोषांचें विवेचन केलें पाहिजे. तसें करतांना अमेरिका व इंग्लंड या ज्या दोन देशांत त्या अर्वाचीन-काळीं प्रथम उदित झाल्या तेथील वस्तुस्थिति डोळ्यापुढें उभी केली पाहिजे. इंग्लंडांत प्रधानमंडळाचें अस्तित्व लोकसभेंतील प्रतिनिधिसभेंत असणाऱ्या बहुमतावर अवलंबून असतें. तें नाहीसें होऊन मंत्रिमंडळाचा मुद्याच्या प्रश्नावर पराभव झाला म्हणजे एक तर जो विरुद्ध पक्षाचा पुढारी असेल त्याला प्रधानमंडळ बनविण्यास राजा सांगतो आणि नवें प्रधानमंडळ तयार होतें, अगर पूर्वीचें प्रधानमंडळ प्रतिनिधी सभा बरखास्त करून फेर-निवडणुकींत आपलें बहुमत करण्याचा प्रयत्न करतें व त्यांत यश आल्यास अधिकार सोडीत नाहीं, पण यश न आल्यास त्यास अधिकारसूत्रें सोडून देण्याखेरीज गत्यन्तर नसतें. या पद्धतींत लोकसभेचें धुरीणत्व नेहमीं प्रधान-मंडळाकडेच असतें आणि कायदे करणें किंवा राज्यकारभाराचें धोरण अमलांत आणणें या राजसत्तेच्या दोन अंगांचें योग्य पृथक्करण होत नाहीं. इंग्लंडात हीं दोन्ही कार्यें आज मुख्यः प्रधान मंडळाकडेच आलेलीं असून जोंपर्यंत कोणत्याही मुख्य प्रधानाचें प्रतिनिधिसभेंत निर्विवाद बहुमत आहे तोंपर्यंत त्याच्या इतका अनियंत्रित राज्यकर्ता इतर कोठेंही सांपडणार नाहीं असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. याच्या उलट फ्रान्सांतील लोकसभेनें इंग्लंडांत जें अधिकारक्षेत्र प्रधानमंडळाकडे आहे तें बरेंच आक्रमण केलेलें असून तेथील प्रधानमंडळाइतकें दुर्बल आणि अल्प-जीवि प्रधानमंडळ इतरत्र कोठेंही नाहीं असें म्हणण्यास हरकत नाहीं. इंग्लंडाप्रमाणें ज्या देशांत दोनच प्रबल राजकीय पक्ष असतात तेथेंच या पद्धतीनें प्रधानमंडळ चिरस्थायी आणि प्रबल बनूं शकतें. परंतु फ्रान्सप्रमाणें ज्या

जबाबदार व स्वतंत्र प्रधान-मंडळाची मीमांसा.

देशांत अनेक लहान लहान पक्ष असतात तेथें या पद्धतीमुळें प्रधानमंडळ दुर्बल आणि अल्पजीवि बनतें, यामुळें देशाच्या धोरणांत अस्थिरता उत्पन्न होते. या पद्धतीमुळें कायदे करणारी लोकसभा आणि राज्यकरणारें प्रधानमंडळ यांच्यांत मतभेद झाल्यानें राज्ययंत्रांना खीळ बसण्याचा संभव नसतो. परंतु या पद्धतींत कोणाकडून अधिकारातिक्रमण होऊन प्रधान-मंडळ लोकसभेचे खेळणें बनणें, किंवा लोकसभा प्रधानमंडळाची दासी बनणें अशा आपत्ति उद्भवूं शकतात.

अमेरिकेचे अनुभव.

अमेरिकेनें स्वतंत्र प्रधानमंडळाची व्यवस्था करून आणि राष्ट्राचें आधिपत्य स्वतंत्र रीतीनें निवडलेल्या राष्ट्राध्यक्षाकडे देऊन या आपत्ति टाळल्या आहेत. तेथील प्रधानमंडळाला आणि राष्ट्राध्यक्षाला लोकसभेची भीति नाहीं; कारण त्यापैकीं कोणालाही बडतर्फ करण्याचा अधिकार लोकसभेला नाहीं. तसेंच लोकसभा कायद्यांचें जाळें मर्यादेबाहेर पसरून राष्ट्रध्यक्षाची पायबंदी करूं लागेल तर त्या कायद्यांना नामंजूरी (veto) देण्याचा अधिकार त्यास उपभोगण्याची संधि असते. लोकसभेचे दोनतृतीयांश बहुमत असेल तर या नामंजुरीला धाब्यावर बसवितां येतें, हें खरें. परंतु असें बहुमत नेहमीं मिळणें फारच मुष्किलीचें असतें. शिवाय राज्यघटनेप्रमाणें जें अधिकारक्षेत्र राष्ट्राध्यक्षाकडे सोंपविलें आहे, त्याच्या मर्यादेचें अतिक्रमण लोकसभेला करतां येत नाहीं. याच्या उलट लोकसभेचें स्वातंत्र्यहि कायम राहावें म्हणून राष्ट्राध्यक्ष व त्याचे प्रधान यांनीं लोकसभेच्या कोणत्याही दळाचें सभासद असूं नये असा कायदा असून यांनीं त्या सभांत हजरही राहूं नये असा प्रघात पडलेला आहे. कोणते कायदे करावेत, कोणते कर बसवावेत आणि त्यांचा विनिमय कसा करावा, हें ठरवून देण्याचा सर्व अधिकार लोकसभेला दिलेला आहे.

परराष्ट्रीय धोरणासंबंधी आगाऊ कायदे करून तरतूद करतां येणें शक्य नाहीं, म्हणून युद्ध पुकारण्याचा अधिकार लोकसभेकडे आणि तहाला मंजुरी देण्याचा अधिकार लोकसभेपैकीं महाजनसभेकडे ठेऊन इतर सर्व अधिकार राष्ट्राध्यक्षाला दिलेला आहे. या पद्धतीमुळें कायदे करणें व राज्य करणें हीं राजसत्तेचीं दोन्हीं अंगें स्वतंत्र झालेलीं असून लोकसभेंतील राजकीय पक्षांच्या अस्थिरतेमुळें प्रधानमंडळ दुर्बल होण्याची किंवा राजकीय धोरण अस्थिर बनण्याचा संभव नसतो. परंतु अमेरिकेंत राजसत्तेच्या अंगांच्या पृथक्करणाचें हें तत्त्व अगदीं टोकाला गेल्यामुळें कांहीं आपत्ति उद्भवण्याचा संभव असतो. कित्येकवेळां राष्ट्राध्यक्ष आणि लोकसभा यांच्यांत तीव्र मतभेद होऊन राज्ययंत्राला खीळ बसण्याचा संभव असतो. तसेंच प्रधानमंडळ किंवा राष्ट्राध्यक्ष हे लोकसभेंत हजरही रहात नसल्यामुळें राज्यकारभाराच्या सोयीच्या दृष्टीनें कायदे कसे व कोणते असावेत याचें ज्ञान लोकसभेंतील सभासदांना करून देतां येत नाहीं. तसेंच प्रधानमंडळावर किंवा राष्ट्राध्यक्षावर अगर त्यांच्या हातांतील एखाद्या खात्याच्या कारभारावर लोकसभेंत टीका झाल्यास आपलें म्हणणें पुढें मांडण्यास त्यांस अवकाश किंवा संधि मिळत नाहीं. याच्या उलट जबाबदार प्रधानमंडळाच्या व्यवस्थेनें लोकसभेचें धुरीणत्व त्यांच्याकडे असल्यानें आपल्या कृत्यांचें समर्थन करण्याची त्यांना संधि मिळते. पण याचबरोबर जबाबदार प्रधानमंडळाच्या व्यवस्थेंत आणखी एक दोष उत्पन्न होण्याचा संभव असतो. तो म्हणजे, मुख्यप्रधान आपल्या सहकाऱ्यांची योजना करतांना त्यांच्या अंगीं आपणाकडे सोपविलेलें कार्य करण्याची कितपत पात्रता आहे इकडे पाहून न करतां ते आपल्या पक्षाचें समर्थन लोकसभेपुढें किती कौशल्यानें करूं शकतील इकडे पाहूनच त्यांची योजना करीत असतो आणि प्रधानमंडळाचें बरेंच बुद्धिवैभव लोकसभेंतील वादविवादाकडेच खर्च होत असल्यानें राज्यकारभाराची खरीं सूत्रें त्यांच्या हाताखालच्या अधिकारीवर्गाकडेच सोंपविलीं

जातात आणि या नोकरशाहीच्या कृत्यांचें समर्थन करणें एवढेंच कार्य प्रधानांकडे उरतें.

प्रो. सिज्विक यांनीं या दोन्ही राज्यपद्धतींतील दोष वगळून त्यांतील गुणांना स्थळ देण्याच्या उद्देशानें पुढील प्रकारची राज्यव्यवस्था सुचविली आहे.

प्रो. सिज्विक यांची सूचना.

राष्ट्राधिपत्य लोकनियुक्त मनुष्याकडे देऊन तो इंग्लंडच्या राजाप्रमाणें नामधारी न बनवितां अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षाप्रमाणें सत्ताधारी बनवावा. अमेरिकेप्रमाणें त्याची निवडणुक स्वतंत्रपणें न करतां ती फ्रान्सप्रमाणें लोकसभेकडून करवावी. असें केल्यानें लोकसभेंतील बहुमत व राष्ट्राध्यक्षाचें मत यांत तीव्र मतभेद होण्याचा संभव बराच कमी होईल. त्याची नेमणूक ठराविक मुदतीनें करून तत्पूर्वीं त्याला पदभ्रष्ट करण्याचा अधिकार लोकसभेला असूं नये. त्यानें आपल्या इच्छेप्रमाणें प्रधानमंडळ बनवावें व तें अमेरिकेप्रमाणें त्यालाच जबाबदार असावें. या प्रधानांस व राष्ट्राध्यक्षास लोकसभेंत हजर राहून आपल्या कृत्यांचें समर्थन करण्याची संधि असावी आणि कांहीं कायदे करण्याच्या कामींहि त्यांनीं भाग घ्यावा. मात्र लोकसभेचें धुरीणत्व त्यांच्याकडे असूं नये. लोकसभेनें आपल्या तिजोरीवरच्या ताब्यांचा अधिकार गाजवून राष्ट्राध्यक्षास किंवा त्याच्या प्रधानांस मुदतीपूर्वीं राजीनामे देण्यास भाग पाडूं नये; म्हणून दरसालच्या अंदाजपत्रकांतील रकमांच्या मंजुरीच्या त्यांच्या हक्कांस कांहीं मर्यादा घालावी. या प्रधानमंडळास किंवा राष्ट्राध्यक्षास लोकसभा बरखास्त करण्याचा अधिकार असूं नये. स्विट्झर्लंडांत कांहींशीं या सारखीच व्यवस्था आहे. तेथील संयुक्त राज्यांतील राष्ट्रीय प्रधान मंडळाची निवडणूक तीन वर्षांच्या मुदतीनें लोकसभेमार्फत होत असते; परंतु त्यांना पदभ्रष्ट करण्याचा अधिकार लोकसभेला नाहीं. तीन वर्षांनंतर लोकसभेची निवडणूक पुनः झाली म्हणजे जुनें प्रधानमंडळ अधिकारांचीं वस्त्रें खालीं ठेवतें व प्रधान-

मंडळाची फेरनिवडणुक होते. प्रो. सिज्विक यांच्या सूचनेंत प्रधानमंडळास स्विट्झर्लंडपेक्षां अधिक स्वतंत्र करण्याची तजवीज केलेली आहे आणि प्रधानमंडळ नेमण्याचा अधिकार लोकसभेला न देतां तो तिनें निवडलेल्या राष्ट्राध्यक्षांस दिलेला आहे. स्विट्झर्लंडांत राष्ट्राधिपति अशी कोणतीहि व्यक्ति नसून लोकसभेनें निवडलेले प्रधानमंडळाचे सर्वच सभासद सारख्या दर्जाचे असतात. राष्ट्राधिपत्य कोणातरी एकाच व्यक्तीकडे असावें या प्राचीन व अर्वाचीन राजनीतिला स्विट्झर्लंड हा एक अपवाद आहे.

राज्यकारभाराचें कार्य निरनिराळ्या प्रधानांकडे सोंपविलेलें असतें. प्रत्येक प्रधानाच्या हाताखालीं त्या त्या खात्यांतील एकावर एक अधिकार गाजविणारे अनेक अधिकारी असतात. या अधिकारी वर्गाची नेमणुक कशी करावी, ती किती मुदतीनें करावी व त्यांना काढून टाकण्याचा अधिकार कोणाला किती मर्यादेंत द्यावा याच्या तपशिलांत फारसें शिरण्याचें कारण नाहीं. तथापि या संबंधीची दोनतीन मूलभूत तत्त्वें सांगून ठेवण्यास हरकत नाहीं. या अधिकारी वर्गाच्या व्यवस्थेसंबंधीं इंग्लंडची पद्धतिच अनुकरणीय आहे, असें बहुतेक राजनीतिज्ञांचें मत आहे. या पद्धतीप्रमाणें कोणत्याहि व्यक्तीस चढाओढीच्या परीक्षेंत वर नंबर पटकावून अधिकारी वर्गांत प्रवेश करतां येतो. पुढें त्याचा पगार, बढती, पेन्शन वगैरे गोष्टी ठराविक नियमानुसार होत जातात. विशेष अपराधाशिवाय या वर्गांतील कोणाही इसमास बडतर्फ केलें जात नसून त्यांची नेमणूक कायमची असते. राजकीय पक्षाच्या प्रचलीत राजकारणापासून त्यांनीं अलिप्त राहावयाचें असून कोणत्याही पक्षाचें प्रधानमंडळ अधिकारावर असलें तरी त्यांनीं आपलें काम योग्यप्रकारें बजावल्यास अधिकारभ्रष्ट होण्याची भीति असत नाहीं. अमेरिकेंत अशी स्थिति नव्हती व अद्यापही पूर्णत्वानें अस्तित्वांत आलेली नाहीं. अधिकाऱ्यांच्या नेमणुका चारचार वर्षांच्याच मुदतीनें करून नवा राष्ट्राध्यक्ष

अधिकारीवर्ग.

आला म्हणजे त्यानें महत्त्वाच्या सर्व जागा जुन्या लोकांकडून काढून आपल्या पक्षांतील लोकांस द्याव्या असा प्रघात होता व अद्यापहि कांहीं अंशीं आहे. यामुळें राज्यकारभाराचें काम चोख होत नाहीं व अधिकारी वर्गांत लायक लोक येत नाहींत असा अमेरिकन लोकांना अनुभव आला असून ते या बाबतींत हळूं हळूं इंग्लंडचें अनुकरण करूं लागले आहेत.

धर्मनिर्णय अथवा न्यायदान.

राजसत्तेचीं धर्मशासन आणि धर्मनिर्णय हीं जीं दोन अंगें त्यांपैकीं पहिल्याचेंच विवेचन येथपर्यंत झालें. आतां धर्मनिर्णयाच्या दुसऱ्या अंगाचें विवेचन करावयाचें आहे. धर्मशासनाच्या म्हणजे अंमलबजावणीच्या कामीं ज्याप्रमाणें भारतीय राजनीतीनें राजाला नामधारी बनवून अमात्यांना किंवा मंत्रिपरिषदेला सत्ताधारी बनविलें होतें, त्याचप्रमाणें धर्मनिर्णयाच्या कामीं तिनें राजाला नामधारी बनवून न्ययाधीशांना व न्यायसभांना सत्ताधारी बनविलें होतें. भारतीयांच्या मंत्रिपरिषदेचा उगम राजापासून झालेला नसून तो वैदिक काळच्या 'समिति' नांवाच्या लोकसभेंतून झालेला होता, त्याचप्रमाणें न्यायसभेचा उगमही राजाच्या दरबारांतून झाला नसून वैदिककाळच्या "सभा"नांवाच्या दुसऱ्या लोकसभेंतून झालेला होता. अर्थात् या संस्था राजाप्रमाणेंच राज्ययंत्राची पृथक व स्वतंत्र अंगें होतीं, तीं राजानें निर्माण केलेलीं बाहुली नव्हतीं. मंत्र्यांना तर राजकृत (kingmakers) असें म्हणण्याची चाल होती. ज्याप्रमाणें अँग्लों सॅक्सन राष्ट्रांत (इंग्लंड-त्याच्या वसाहती व अमेरिका) कायद्यांना व न्यायासनांना राज्यघटनेंत अत्यंत महत्त्व आहे, त्याचप्रमाणें प्राचीन भारतीय राजनीतींत धर्माला आणि धर्म,

स्वामी, समिति
व
सभा

निर्णयांचीं स्थानें जीं न्यायासनें त्यांना अत्यंत महत्त्व होतें. न्यायाधीशांचें स्वातंत्र्य आणि न्यायासनांचें पावित्र्य कायम ठेवणें हें राजाचें आद्य कर्तव्य गणलें जात असे. राजा झाला तरी सामान्य नागरिकांप्रमाणें दंडाला पात्र आहे,ही कल्पना भारतीयांच्या पूर्ण परिचयाची आहे आणि म्हणूनच पेशवाईंत प्राचीन लोकसत्ताक विचारांचा अवशेषही राहिला नसतांनाही राघोबांस देहान्तप्रायश्चित्ताशिवाय दुसरें प्रायश्चित्त नाहीं असें स्पष्ट सांगण्याचें धाष्टर्य किंवा मनोधैर्य रामशास्त्रयांनीं दाखविलें, न्यायाधीशांचें कार्य प्राय: ब्राह्मण मनुष्याकडेच दिलें जात असे व ब्राह्मणवर्ग हा नेहमींच तितकासा राजसत्तेचा अंकित असत नसल्यामुळें भारतीय राज्यघटनेंत न्यायासनांचें स्वातंत्र्य साहजिकपणें कायम राहात असे. असो.

न्यायासनांचें कार्य प्रस्थापित कायद्याप्रमाणें न्याय देण्याचें आहे, नवे कायदे करण्याचें नाहीं. कायद्यांत फेरफार करण्याचें स्वातंत्र्य न्यायाधिशांना देण्यापासून न्यायदानाच्या कामीं अस्थिरता व अनिश्चितता निर्माण होण्याचा जो संभव असतो त्याचा विचार केला असतां वाईट कायद्यांप्रमाणें न्यायदान करण्यानें कांहीं व्यक्तिगत अन्याय झाले तरी पुरवतील, परंतु कायद्यांत फेरफार करण्याचें स्वातंत्र्य न्यायाधीशांना असूं नये, हें राजनीतीचें तत्त्व मनाला बरोबर पटतें. तथापि व्यवहारांत जेथें कायदा मुग्ध किंवा संदिग्ध असेल तेथें तो व्यक्त किंवा असंदिग्ध करण्याचें स्वातंत्र्य न्यायाधीशांना देणें भाग पडतें. अशा रीतीनें प्रचलित कायद्यांना जोड देऊन त्यांत भर घालण्याचें कार्य न्यायधीश करीत असतात. इंग्लंड व अमेरिका या देशांत न्यायाधीशांनीं दिलेल्या निकालांना बऱ्याच अंशीं बंधनकारक समजण्याचा प्रघात असल्यामुळें तेथें त्यांना बरेंच महत्त्व प्राप्त झालेलें असून अशा निकालांना "न्यायाधीशकृत" कायदे असेंही म्हणण्याचा प्रघात आहे.

न्यायासनांचें कार्य व कायदे.

न्यायाधीशाच्या कार्याला विशेष विद्वत्तेची व पात्रतेची आवश्यकता लागत असल्यामुळें आणि न्यायाचा काटा पक्षाभिमानानें किंवा राजकीय धोरणासंबंधींच्या विचारांनीं एका बाजूस न झुकतां नेहेमीं समतोल राहणें अवश्य असल्यानें न्यायाधीशांच्या जागा सार्वजनिक निवडणुकींनीं भरणें हें अत्यन्त विघातक आहे. तथापि अमेरिकेंतील संस्थानी सरकारांतील बऱ्याच न्यायाधिशांच्या जागा या तत्त्वावर भरल्या जातात, ही गोष्ट वाईट आहे हें आतां अमेरिकन ग्रंथकारांनाही पटूं लागलेलें आहे. लोकप्रियता संपादन करणें किंवा लोक राजी राखणें हें न्यायाधीशाचें काम नसून न्यायनिष्ठुर बनणें हें त्याचें कर्तव्य आहे. तें पार पाडण्यास थोडया मुदतीनें पुनः पुनः निवडून येण्याची आवश्यकता असून उपयोगी नाहीं. त्याचप्रमाणें अंमलबजावणी खात्यांतील अधिकाऱ्यांचें वर्चस्वही न्यायाधीशांवर असतां कामा नये. त्यांची नोकरी किंवा बढती अंमलबजावणी खात्याच्या हातांत असल्यास लोकांस खरा न्याय मिळूं शकत नाहीं.

न्यायाधीशांची योजना.

अमेरिका व इंग्लंड या देशांत कोणताही सरकारी अधिकारी आपल्या अधिकारी या नात्यानें केलेल्या कृत्याबद्दलही सामान्य न्यायासनापुढें जबाबदार धरला जातो आणि त्याच्या हांतून गुन्हा झाला असल्यास वरिष्ठ अधिकाऱ्याच्या हुकमाच्या सबबीनेंही तो कायद्याच्या कचाटींतून सुटूं शकत नाहीं. ही अँग्लोसॅक्सन लोकांची राजनीति भारतीय राजनीतीला धरूनच आहे. परंतु इंग्लंडखेरीज इतर युरोपीयन देशांत सरकारी अधिकाऱ्यांनीं अधिकारी या नात्यानें केलेल्या कृत्यांची चौकशी सामान्य न्यायासनांपुढें होऊं शकत नाहीं. असे खटले चालविण्यासाठीं स्वतंत्र न्यायासनें असून त्यांत अंमलबजावणी खात्यां-

न्यायासनें व राजाधिकारी.

तील अधिकाऱ्यांची योजना केलेली असते. या प्रघाताचें समर्थन राजसत्तेच्या तीन अंगांच्या पृथक्करणाच्या तत्त्वांवर केलें जातें. परंतु त्यामुळें विशेष फायदा न होतां लोकांच्या स्वातंत्र्याला धक्का बसण्याचा संभव असतो, असेंच बहुतेक राजनीतिज्ञांचें मत आहे. सरकारकडे सक्तीच्या शिक्षणासारखीं लोकोपयोगीं कार्यें अधिकाधिक सोंपविलीं जाऊं लागलीं व त्यांचा अंमल करतांना लोकांना दंड करण्याचा अधिकार राजाधिकाऱ्यांस मिळत गेला म्हणजे अंमलबजावणीच्या अधिकाऱ्यांना एक प्रकारचें न्यायाधीशाचेंच काम करावें लागतें. अशा कार्यांचीं संख्या अलीकडे बरीच वाढूं लागल्यामुळें इतर युरोपीयन देशांतील राज्यकारभारविषयक कायद्यांचें तत्त्व हळूंहळूं इंग्लंडांतही डोकावूं लागलें आहे असें प्रो. डायसी यांचें मत आहे. तसेंच अधिकारी वर्गानें केलेल्या सरकारी कृत्यांची चौकशी करण्यास सामान्य न्यायासनें नेहमींच लायख असतात, हें म्हणणेंही सर्वस्वी खरें नाहीं असें त्यांनीं लिहिलें आहे. फ्रान्स वगैरे इतर युरोपीयन देशांतही राज्यकारभारविषयक न्यायासनांत लोकांना योग्य न्याय मिळावा अशी योजना करण्यांत येत असून व्यक्तिस्वातंत्र्याचें रक्षण व्हावें याबद्दल तजविजी होत आहेत.

प्रकरण ७ वें.

संयुक्तराज्य, साम्राज्य व सार्वभौम राज्य.

" The republic of the Vajjians was a united states of ancient India. It was a federation formed by the union of eight nations, that had formerly been distinct and independent of one another. "

" B. K. Sarkar

" The doctrine of *sarra-bhauma*, as the concept, of federal nationalism, imperial federation, or the universe state is thus the kay-stone in the arch of the Hindu thecry of sovereignty. The message of *paz-sarva bhahmica* in other words, the doctrine of and concord, is the final contribution of *Nitishatras* to the philosophy of the states " 1 B, K. Sarkar-

राज्यांचें शासनक्षेत्र वाढवून निरनिराळीं राष्ट्रें एका राज्याखालीं आण ण्याचें संयुक्तराज्य, साम्राज्य व सार्वभौम राज्य, हे निरनिराळे मार्ग आहेत.

अतिराष्ट्रीय राज्यें.

यापैकीं सार्वभोम राज्य म्हणजे पृथ्वीवरील सर्व देशांवर व सर्व लोकांवर प्रभुत्व गाजविणारें राज्य, हें अद्यापि तत्त्ववेत्त्यांच्या किंवा विजिगीषूंच्या कल्पनासृष्टींतच असल्यामुळें प्रथमतः संयुक्तराज्य व साम्राज्य, या संस्थांचेंच विवेचन करावयाचें आहे. संयुक्त राज्यें व साम्राज्यें, हीं दोन्हींहि

---

1. See the political institutions and theories of the Hindus by Benoy kumar Sarkar p 147 and 229

आतिराष्ट्रीय राज्यें असतात, असें म्हणण्यास हरकत नाहीं. राष्ट्रीय राज्यां- इतकें एकजीवित्व या दोन्हींहि राज्यांत असत नाहीं, त्यांतून साम्राज्यांत तर तें मुळींच नसतें. संयुक्तराज्याची उभारणी संयुक्तराष्ट्रीय भावनेवर झालेली असून त्याला एकजीवित्व व अनेकजीवित्व हीं दोन्हीं लक्षणें अंशतः लागू पड- तात.अशा प्रकारच्या कोणत्याही राष्ट्रीय भावनेवर साम्राज्याची उभारणी झालेली नसते. संयुक्तराज्यांतील पोटविभागाचा एकमेकांशीं संबंध प्रेमाचा व समतेचा असतो, तर साम्राज्यांतील पोट विभागापैकीं एकाचेंच राज्य किंवा कायदेशीर प्रभुत्व इतरांवर चालत असल्यानें त्यांतील संबंध सक्तीचे व विष- मतेचे असतात. संयुक्त राज्याची उत्पत्तीहि स्वयंनिर्णयानें होत असली, तर साम्राज्याची उत्पत्ति सक्तीनें होत असते. संयुक्तराज्याची प्रवृत्ति एक- राष्ट्रीयत्वाकडे होत असली तर, साम्राज्याची अखेर विनाशांत होत असते, असा आजपर्यंतचा अनुभव आहे.

कोणत्याही राज्यांतील पोटविभागांना बरीच मोठी सत्ता दिली, म्हणून त्यास संयुक्तराज्याचें स्वरूप प्राप्त होतें, असें नाहीं. आर्वाचीन राजनितिज्ञांनीं संयुक्त राज्याचीं मुख्य तीन लक्षणें ठरविलेलीं आहेत.तीं अशीं—

संयुक्त राज्याचीं लक्षणें.

(१) पोट राज्यांतील सरकारांचे अधिकार राज्यघटनेनें निश्चित ठरविलेलें असले पाहिजेत (२) या राज्यघटनेचें बंधन पोट राज्यां- तील सरकारें व संयुक्त सरकार, यांना सारखेंच लागू असून राज्यघटनेचीं कलमें बदलण्याची व्यवस्था सामान्य कायदे करण्याच्या व्यवस्थेहून भिन्न असली पाहिजे; आणि (३) संयुक्त सरकार किंवा पोटराज्यांतील सरकारें यांनीं आपल्या अधिकारांचें अतिक्रमण केव्हां केलें, याचा निर्णय देण्याची सत्ता असणारीं स्वतंत्र न्यायासनें राज्यांत असलीं पाहिजेत. जेथें हीं लक्षणें दृष्टीस पडत नाहींत. त्या राज्यांतील पोटविभागांतील शासनसंस्था बरीच सत्ता उपभोगितात. एवढ्याच कारणानें त्यांस कायदेशीररीत्या संयुक्तराज्य ही

संज्ञा देतां येत नाहीं. राज्यघटनेनें अधिकारांना घातलेली मर्यादा पोटराज्या-प्रमाणेंच संयुक्त मध्यवर्ति सरकारांस ही बंधनकारक असावी, हें संयुक्त राज्याचें आद्य लक्षण आहे. या लक्षणामुळें संयुक्तराज्याचें स्वरूप एकरूप राज्याच्या स्वरूपाहून भिन्न बनतें आणि त्याचे गुणदोषही निरनिराळे होतात. त्याची चर्चा करण्यापूर्वीं वरील तीन लक्षणें सध्याच्या कोणकोणत्या संयुक्त राज्यांत कितपत दृष्टीस पडतात तें पाहिलें पाहिजे. तसेंच प्राचीन भारतवर्षांत किंवा युरोपांत अशीं राज्यें होतीं किंवा नाहीं, याचाही थोडा विचार केला पाहिजे.

अधिकारविभागणीचीं दोन तत्त्वें.

अमेरिका, स्विट्झर्लंड, जर्मनी, ऑस्ट्रेलिया, कानडा हीं अर्वाचीन संयुक्तराज्यांचीं उदाहरणें आहेत. संयुक्त सरकार आणि पोटराज्यांतील सरकारें यांच्यांतलि अधिकारविभागणीच्या दृष्टीनें संयुक्त राज्यांचे दोन वर्ग पडतात. कोठें अमेरिकेप्रमाणें कांहीं ठराविक अधिकार संयुक्त सरकारला तोडून देऊन बाकीचे सर्व अधिकार पोटराज्यांनीं आपणांकडे ठेवलेले असतात, तर कोठें कानडा-प्रमाणें पोटराज्यांना ठराविक अधिकार तोडून देऊन उरलेले सर्व अधिकार संयुक्त सरकारकडे ठेवलेले असतात. संयुक्तराज्याची घटना बनवितांना संरक्षणाचें परराष्ट्रीय धोरणाचें कार्य संयुक्त सरकारकडे देण्याची आवश्यकता सर्वांसच भासते. तसेंच ज्या गोष्टींचा सर्व पोटराज्यांतील लोकांशीं सारखाच संबंध येत असेल अशीं रेलवे, पोस्ट, नाणीं फौजदारी कायदे वगैरेंसारखीं कामें संयुक्त सरकारकडे देणेंही अवश्य व राष्ट्रहिताचें असतें. याच्या उलट जीं कामें स्थानिक परिस्थितीवर अवलंबून असतात व ज्यांचा संबंध पोट-राज्यांतील लोकांशींच विशेष येण्याचा संभव असतो, त्यांची व्यवस्था पोट राज्यांतील सरकाराकडे देणें सोयीचें असतें. या संबंधीं सामान्य नियम असा सांगतां येणार नाहीं. तथापि हल्लींच्या काळीं संयुक्त सरकाराकडेच

विशेष अधिकार देण्याकडे एकंदर राज्यांचा कल आहे, असें अनुभवानें दिसून येतें. पोट राज्याच्या किंवा संयुक्तराज्यांच्या अधिकारातिक्रमाचा निर्णय देण्याच्या दृष्टीनें पाहिलें असतां अमेरिकेंत आणि ब्रिटिश वसाहतींत संयुक्त सरकारच्या स्वतंत्र न्यायधिशांना हे निर्णय देण्याची सत्ता दिलेली असल्यामुळें तेथें कोणत्याही सरकारनें अधिकारातिक्रमण करून केलेल्या कायद्यांना मान्यता दिली जात नाहीं. तसेंच कानडामध्यें एखादा कायद्याचा मसुदा राज्यघटनेनें घातलेल्या मर्यादेचें उल्लंघन करीत असल्यास त्याला मंजुरी न देण्याचा अधिकार गव्हर्नर जनरलला दिलेला आहे. परंतु स्विट्झर्लंड व जर्मनी या राज्यांत असले निर्णय देणाऱ्या स्वतंत्र न्यायासनाची व्यवस्था असावी तशी नाहीं असें दिसून येतें. तेथें संयुक्त सरकारनें केलेले कायदे राज्यघटनेला धरून आहेत किंवा नाहींत याचा निर्णय देण्याचा अधिकार कोणत्याही न्यायासनांना नाहीं. संयुक्त सरकारचे कायदे राज्यघटनेला धरून असोत किंवा नसोत, ते पसार झाले कीं ते मान्य केलेच पाहिजेत अशी तेथें स्थिति आहे.

प्राचीन संयुक्त-राज्यें.

ज्यावेळीं कांहीं कारणामुळें अनेक स्वतंत्र्य राष्ट्रीय राज्यांना एकी करण्याची इच्छा असते, परंतु एक होण्याची किंवा आपलें अनेकत्व व वैशिष्टय नष्ट करण्याची इच्छा नसते तेव्हां संयुक्त राज्यव्यवस्था अस्तित्वांत येते. अशी संकीर्ण संयुक्त भावना जागृत होण्यास प्रायः स्वसंरक्षणाची इच्छा कारण होत असते. प्राचीन भारतवर्षांत अशीं कांहीं संयुक्त राज्यें असावींत असें दिसतें. संवज्जींचें लोकशाहीचें राज्य अशाच संयुक्त स्वरूपांचें असावें व त्यांत पूर्वीं स्वतंत्र असलेलीं निरनिराळीं आठ राज्यें पोटराज्यें म्हणून नांदत असावींत असें विद्वानांचें मत आहे. तथापि मागें दिलेलीं सध्याच्या राजनीतिज्ञांनीं ठरविलेलीं संयुक्त राज्यांचीं लक्षणें त्यांस कितपत लागू पडत असत हें समजण्यास आज फारसें साधन नाहीं.

तथापि लहान आकारांच्या छोटया राष्ट्रांचा मोठया साम्राज्यापुढें निभाव लागत नाहीं, या भावनेनेंच त्यांची उत्पत्ति झाली होती असें दिसतें. जीं लोकशाहीचीं राज्यें अशाप्रकारें संयुक्त बनलीं तींच पुढें मौर्य साम्राज्याशीं टक्कर देऊन जगूं शकलीं असें बॅ० जयस्वल यांनीं " हिंदु पोलिटी " या पुस्तकांत दाखवून दिलें आहे. ग्रीक नगरराष्ट्रांनाही अशा तऱ्हेचे संघ करण्याची आवश्यकता भासत असे व त्यांच्यांतही स्वसंरक्षणाकरितां बोशियन, डेलियन, लिसियन, एचियन, एटोलियन असे अनेक संघ अस्तित्त्वांत आले होते. त्यांपैकीं एचियन लीग बरीच वैभवास व नांवारूपास चढली होती. पण अशा राष्ट्रांच्या संघांना संयुक्त राज्य ही संज्ञा देतां येईल किंवा नाहीं याबद्दल शंका आहे. जेव्हां अशा संघांतील घटक राज्यें आपलें स्वतंत्र प्रभुत्व सोडून देऊन नव्या संयुक्त राज्यांतील पोट राज्याचा दर्जा स्वीकारण्यास तयार होतील, तेव्हांच संयुक्तराज्य अस्तित्वांत येईल. तोपर्यंत असल्या संघांस राष्ट्रसंघ किंवा राज्यसंघ असें म्हणणें युक्त होईल. संघांतील घटक राष्ट्रांना वाटेल तेव्हां संघ सोडून जाण्याची मुभा असते तशी संयुक्तराज्यांतील पोटराज्यांना कायदेशीर दृष्टीनें असूं शकत नाहीं.

संयुक्त राज्यव्यवस्थेमुळें आपलें स्वातंत्र्य मर्यादित स्वरूपांत कायम ठेऊन छोटया राज्यांना मोठें राज्य बनवितां येतें व मोठया राज्यामुळें लाभणारे सर्व फायदे उपभोगितां येतात.

संयुक्तराज्यव्यवस्थेचे फायदे.

स्वसंरक्षणाची शस्त्रास्त्रादि साधनें मोठया प्रमाणावर बाळगण्याची संधि मिळून त्यामानानें संरक्षणाचा खर्च जास्त लागत नाहीं. शिवाय त्यामानानें आगगाडया, मोठमोठे कारखाने, तारायंत्र इत्यादि लोकांच्या सुखसोयींची खातीं ही कमी खर्चांत उभारतां येतात. बऱ्याच मोठया लोकसमुदायांत राजकीय व आर्थिक दृष्टया सहकार्याला अवकाश मिळणें शक्य झाल्यामुळें राष्ट्राचें वैभव आणि इभ्रत वाढण्यास

मदत होते. या सर्व गोष्टी साध्य होऊन कोणत्याही लोकांचें वैशिष्ट्य नष्ट होत नाहीं. अधिकारविभागणीच्या तत्त्वामुळे राजसत्तेचें केंद्रीकरण होत नाहीं. सरकारच्या जुलमाला तितकासा अवकाश सांपडत नाहीं. व्यक्तिस्वातंत्र्याच्या आणि संघस्वातंत्र्याच्या परिपोषास संयुक्त राज्यव्यवस्थेमुळें उत्पन्न होणाऱ्या प्रजेंतील भावना साहाय्यक होतात. यामुळें लोकसत्तेच्या तत्त्वांचा प्रवेश समाजाच्या सर्व संस्थांत होण्यासही बरीच मदत होते. इत्यादि अनेक फायदे या व्यवस्थमुळें लोकांस लाभण्याचा संभव असल्यामुळें संयुक्त राज्यव्यवस्थेचा यापुढें जगांत सर्वत्र प्रसार होईल आणि सध्याच्या अनेक एकरूप राज्यांसही कालांतरानें संयुक्त स्वरूप प्राप्त होईल अशी कांहीं राजनीतिज्ञांची कल्पना आहे. असे कांहीं लोक सध्याच्या ब्रिटिश साम्राज्याला संयुक्त साम्राज्याचें स्वरूप द्यावें, युनायटेड किंगडमलाही संयुक्तराज्य बनवावें व हिंदुस्थानांतहि संयुक्त राज्यव्यवस्था स्थापावी अशा सूचना करीत असतात. याकरितां संयुक्त राज्यव्यवस्था स्थापन करण्यास कोणती परिस्थिति असावी लागते, त्या व्यवस्थेंत दोष कोणते आहेत आणि कोणत्या परिस्थितींत ती राज्यव्यवस्था सुफलदायक होणार नाहीं याची थोडी चर्चा केली पाहिजे.

संयुक्त राज्याची उभारणी संयुक्त राष्ट्रीय भावनेवर व्हावी लागते हें मागें सांगितलेंच आहे. या संयुक्त राष्ट्रीय भावनेचें अनेकत्वविशिष्ट ऐक्यभावना हें लक्षण आहे; म्हणजे आपलें ऐक्य तर व्हावें आणि वैशिष्ट्य व अनेकत्व तर नामशेष होऊं नये, अशी भावना जेथें असेल तेथेंच संयुक्तराज्यव्यवस्था अवश्य व हितावह असते. जेथें राष्ट्रीय ऐकजीवित्वाचा पूर्ण उदय झालेला असतो आणि कांहीं कारणामुळें राष्ट्रीय ऐक्याच्या स्थापनेलाच विशेष महत्त्व प्राप्त झाल्यामुळें आपल्या भिन्नते-

संयुक्त राज्यव्यवस्था केव्हां फायदेशीर होते ? व केव्हां नाहीं ?

कडे लोकांचें विशेष लक्ष नसतें, तेथें एकरूप राज्याची व्यवस्था अस्तित्वांत येण्यास हरकत नाहीं. तसेंच ज्या राज्यांचें किंवा प्रदेशांचें संयुक्त राज्य बनावयाचें असेल ते भूगोलिकदृष्ट्या सलग असणें, हें तें संयुक्तराज्य चिरंजीव होण्याच्या दृष्टीनें इष्ट असतें. शेजारधर्मामुळें जितकी ऐक्यभावना टिकूं शकते किंवा सलग भूप्रदेशावर राहणाऱ्या लोकांचे भौतिक संपत्तीच्या दृष्टीनें हितसंबंध निगडित होण्याचा जितका संभव असतो, तितका मोठ-मोठ्या समुद्रांनीं अगर भूप्रदेशांनीं विलग झालेल्या प्रदेशांत राहणाऱ्या लोकांचे हितसंबंध निगडित होण्याचा संभव असत नाहीं.त्याचप्रमाणें संयुक्त राज्याचे सर्व घटक लोकसंख्या व भौतिक संपत्ति या दृष्टींनीं शक्य तितके समान दर्जाचे असावेत, हेंही अगदीं अवश्य असतें. संयुक्त राज्यांच्या घटनेंत त्यांतील पोट राज्यांच्या समान दर्जाचें प्रतिबिंब पडावें लागतें, त्या-शिवाय दुही व वैमनस्य माजल्याशिवाय राहणार नाहींत. अर्थात् प्रत्यक्ष सृष्टींत सर्व पोटराज्यें सारखींच सापडणें शक्य नाहीं, परंतु तीं सामान्यतः स्थूलमानानें तरी सारखी असणें इष्ट असतें. पूर्वीच्या जर्मन साम्राज्यांत प्रशियाचें पोटराज्य इतर सर्व पोटराज्यांच्या दृष्टीनें मोठा दर्जा बळकावून बसलें असल्यामुळें त्या संयुक्त राज्याची स्थिति जवळ जवळ प्रशियन साम्राज्यासारखींच झाली होती, असें म्हटल्यास फारशी अतिशयोक्ति होणार नाहीं. अमेरिकेंतील संयुक्त सरकारच्या घटनेंत सर्व पोटराज्यांच्या दर्जाचें समानत्व आणि संयुक्त राज्याचें राष्ट्रैक्य हीं दोन्हीही प्रतिबिंबित झालेलीं उत्कृष्ट रीतीनें निदर्शनास येतात. प्रतिनिधिसभेंतील सभासदांची वांटणी पोटराज्यांतील लोकसंख्येच्या प्रमाणांत केली असल्यामुळें सर्व पोट-राज्यांतील प्रजाजनांना सारखाच अधिकार मिळतो व त्यामुळें सर्व पोट-राज्यांतील प्रजाजनांत राष्ट्रैक्याची भावना जागृत राहाते. तसेंच महाजनसभेंत प्रत्येक पोटराज्यांतील सरकारचे दोनदोनच सभासद येत असल्यामुळें सर्व घटकराज्यांना आपला दर्जा समान आहे याची जाणीव असते. प्राचीन

भारतवर्षांतील " संवज्जीच्या " संयुक्त राज्यांतहि पोटराज्याच्या समान दर्जाचें हें तत्त्व मान्य करण्यांत आलें होतें. व त्यांतील राज्यकारभार करणाऱ्या मंडळांत लहानमोठया सर्व पोट राज्याचा एकएकच प्रतिनिधि असे, असें बॅ० जयस्वल हे लिहितात. या प्रतिनिधींना " गणराजे " अशीं संज्ञा होती. अशा गणराजांच्या हातीं हा संयुक्त राज्याचा कारभार असे, असें ते म्हणतात. असो. सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं, संयुक्तराज्याचें सर्व घटक सर्व समान असतील तितकें त्यांच्या घटनेच्या दृष्टीनें इष्ट असतें. अखेरीस आणखी एक गोष्ट ध्यानांत घेतली पाहिजे. ती म्हणजे संयुक्त राज्यव्यवस्था विशेष संकीर्ण स्वरूपाची असल्यामुळें आणि निरनिराळया सरकारांनीं आपणांस राज्यघटनेनें घालून दिलेल्या मर्यादांचें उल्लंघन न करण्यावरच तिचें सर्वस्व अवलंबून असल्यानें हें राज्ययंत्र चालविणाऱ्या लोकांत आणि त्या खालच्या प्रजाजनांत नियमपालनाची वृत्ति किंवा कायद्यांविषयींचा व न्यायासनांच्या निर्णयासंबंधींचा आदर विशेषत्वानें वास करीत असला पाहिजे. ही परिस्थिति जेथें नसेल तेथें संयुक्तराज्ययंत्र सुरळीतपणें चालणें फार दुरापास्त आहे. संयुक्तराज्ययंत्र हें नेहेमींच एकरूप राज्ययंत्रापेक्षां दुर्बल असतें व तडजोड म्हणूनच त्याची स्थापना केलेली असते' संयुक्त राज्यव्यवस्था बराच काळ यशस्वी झाली असतां तिची एकरूप राज्यव्यवस्थेंत रूपान्तर होण्याकडे स्वाभाविकच प्रवृत्ति होऊं लागते, असें कांहीं लोकांचें मत आहे. तसेंच संयुक्त राष्ट्रीयभावनेंतील अनेकत्वाची वृद्धि होत जाऊन प्रजाजनांना संयुक्त राज्यांशीं एकनिष्ठ राहण्याची आवश्यकता कमी वाटूं लागली आणि पोटराज्यांत परस्पर वैमनस्य उत्पन्न झालें तर संयुक्तराज्य मोडून जाण्याचाही संभव असतो. संयुक्तराज्याची घटना सहजरीत्या बदलतां येणारी नसल्यामुळें परिस्थितीप्रमाणें तींत सुधारणा होऊं शकत नाहींत. असे अनेक दोष कायदेशीर संयुक्तराज्यांत उत्पन्न होत असल्यामुळें कायदेशीरदृष्टया शक्य तितकें करून राज्याची घटना एकरूप ठेऊन

त्याच्यांतील पोटविभागांना व्यवहारांत पुष्कळ सत्ता उपभोगूं देणें हेंच अधिक इष्ट आहे. कोणत्याही राज्यांतील मध्यवर्ति सरकारच्या अधिकाराला कायद्यांच्या कठीण बंधनांनीं मर्यादित करण्यापेक्षां रूढीच्या व परंपरेच्या लवचिक बंधनांनीं मर्यादित करणें हेंच इष्ट असतें. निरुपाय व तडजोड म्हणून पहिला मार्ग ही अवलंबावा लागतो आणि जेथें दुसरा मार्ग अवलंबणें शक्य नसतें तेथें व्यवहाराच्या दृष्टीनें पहिल्या मार्गानें जाणें हेंच योग्य व परिणामीं हितकर ठरतें.

संयुक्त राज्य शद्बाचा अशास्त्रीय उपयोग.

पुष्कळ वेळां संयुक्त राज्यव्यवस्थेचा कायदेशीर अर्थ मनांत न आणतां राज्यांतील प्रादेशिक, औद्योगिक व इतर समूहांना राजसत्तेचा बराच भाग उपभोगूं देणें, यासच संयुक्तराज्यव्यवस्था म्हणत असतात व अशाच दृष्टीनें हळूंहळूं सर्व राज्यांना शक्य तितकें संयुक्त स्वरूप प्राप्त करून देणें हेंच राष्ट्रीय जीवनाच्या आणि लोकसत्तेच्या वाढीच्या दृष्टीनें हिताचें आहे असें सांगण्यांत येतें. सध्यांच्या राजकीय विचारांची प्रवृत्ति याच दिशेनें होत आहे, हें आम्ही मागें दाखविलेंच आहे. तथापि कायदेशीर दृष्टीनें जोंपर्यंत मध्यवर्ति सरकारास राज्यघटनेनें बंधन घातलेलें नाहीं, तोंपर्यंत असल्या अधिकार विभागणीमुळें राज्याला संयुक्त स्वरूप प्राप्त होऊं शकत नाहीं. म्हणून वरील प्रकारची अधिकारविभागणी आम्हाला पसंत असली तरी कायदेशीर संयुक्तराज्यव्यवस्था आम्हाला तितकीशी पसंत नाहीं व ती शक्य तेथें टाळावी असेंच आम्हास वाटतें. जेथें निरुपायच असेल तेथें "अर्धं त्यजति पंडितः" या न्यायानें तिचा आदर व गौरव करण्यास हरकत नाहीं.

— · · —

साम्राज्य.

प्राचीन भारतवर्षांत साम्राज्य शब्दानें एका प्रकारच्या संयुक्त राज्याचा बोध होत असे, असें कांहीं लोकांचें मत आहे. अनेक स्वतंत्र राजे एक होऊन आपल्यापैकींच एकाला सम्राट निवडित असत अशीं वर्णनें पुराणग्रंथांत सापडतात. विदेहाचा राजा जनक हा अशाच प्रकारें सम्राट झाला होता. जरासंध हाही अशाच प्रकारें अनेक राजांनीं निवडलेला सम्राट होता, परंतु त्यानें पुढें आपणांस निवडणाऱ्या राजांना आपले अंकित बनविलें. या वेळेपासून साम्राज्याला सक्तीचें स्वरूप प्राप्त होऊं लागलें. सार्वभौमत्व मिळविण्याची विजिगीषा उत्पन्न होऊन अश्वमेधासारखे यज्ञ होऊं लागले आणि पृथ्वीच्या अंतापर्यंतची सर्व राज्यें काबीज करावीं, दिगंत विजय मिळवावा, इत्यादि ध्येयें पुढें येऊं लागलीं आणि "आसमुद्रक्षितीशानां" "आनाकरथवर्त्मनां" अशीं त्यांचीं वर्णनें कवि करूं लागले. आपल्या इकडें जीं जीं मोठीं साम्राज्यें होऊन गेलीं त्यांची त्रोटक हकीगत व प्राचीन रोमन साम्राज्याचीही माहिती या पुस्तकाच्या पहिल्या ऐतिहासिक विभागांत दिलीच आहे.

प्राचीन साम्राज्यें.

दुसरे देश जिंकून त्यांना आपले अंकित बनविणें किंवा एका राज्यांतील लोकांनीं पूर्वीं रानटी लोकांनीं व्यापिलेल्या प्रदेशांत जाऊन वसाहती करून नवीं राज्यें निर्माण करणें, हे साम्राज्य वृद्धीचे दोन्हीही प्रकार फार प्राचीन काळापासून चालू आहेत. प्राचीन काळीं दळणवळणाची साधनें फारशीं नसल्यामुळें वसाहतींनीं बनलेल्या नव्या राज्यांचा मूळच्या राज्यांशीं संबंध टिकत नसे. परंतु असेही प्रकार पूर्वीं अगदींच माहित नव्हते असें नाहीं. तसेंच दक्षिण हिंदुस्थानांत एका लोकांनीं येऊन वसाहती कराव्यात व दुसऱ्या एखाद्या बलाढ्य

साम्राज्य स्थापनेचे दोन प्रकार.

साम्राज्यानें त्या सर्व गिळंकृत कराव्यात, असेही अनेक प्रकार महाराष्ट्राच्या व इतर दाक्षिण हिंदुस्थानच्या इतिहासांत दिसून येतात.

आर्वाचीन काळीं युरोपीयन राष्ट्रांनीं साम्राज्यवृद्धीच्या कामीं फारच प्रगति केलेली आहे. युरोपीयन लोकांनीं अमेरिकेचा व वेस्ट इंडिज बेटांचा शोध लावल्यापासून आर्वाचीन साम्राज्यवृद्धीला प्रारंभ झाला म्हणण्यास हरकत नाहीं. स्पॅनिश लोकांनीं अमेरिकेंतून सोनें व चांदी आणण्याकडे आणि पोर्तुगीज लोकांनीं केप ऑफ गुडहोपकडून हिंदुस्थान, चीन, जपान, ईस्ट इंडीज, वगैरे देशांशीं व्यापार करण्याला व साम्राज्य वाढविण्याला सुरवात केली. पुढें यांतच डच, फ्रेंच व इंग्लिश यांनींही भाग घ्यावयास सुरवात केली. जर्मनीनें अगदीं उशीरा इकडे लक्ष दिलें. तथापि एकोणिसाव्या शतकांत बेल्जियन लोकांनीं व त्यांनीं आफ्रिकेंतील साम्राज्यवृद्धीच्या कार्यांत बराच भाग घेतला. या सर्वांत आज इंग्लंडचेंच साम्राज्य मोठें असून त्याचा विस्तार आशिया, आफ्रिका, अमेरिका, युरोप व आस्ट्रेलिया या पांचही खंडांत झालेला असून गेल्या महायुद्धांतही या साम्राज्याची बरीच वाढ झाली. महायुद्धापूर्वी या साम्राज्यांत एकंदर १,१५,००,००० चौरस मैल प्रदेश आणि सुमारें ४० कोट लोकसंख्या होती. महायुद्धानंतर साम्राज्याचें क्षेत्रफळ १,३९,०९,७८५ झालें व लोकसंख्या ४६ कोट ७४ हजार झाली आहे. जर्मनीच्या आफ्रिकेंतील सर्व वसाहती काढून घेण्यांत आल्या आहेत. जर्मन नैऋत्येकडील आफ्रिका (German South-west Africa) ही ब्रि. साम्राज्यांतील दक्षिण आफ्रिकेच्या मॅंडेटखालीं देण्यांत आली. जर्मन पूर्व आफ्रिका इंग्लंड व बेल्जियम या देशांनीं वाटून घेतली. पश्चिम आफ्रिकेपैकीं टोगोलँड व कॅमेरून हा प्रदेश इंग्लंड व फ्रान्स यांनीं वाटून घेतला. आशियांतील पॅले-

आर्वाचीन युरोपीयन साम्राज्यें व ब्रि. साम्राज्य.

स्टाइन व मेसापोटेमिया या प्रदेशांचेंही मँडेट इंग्लंडलाच मिळालेलें आहेत. पॅसिफिक महासागरांतील जर्मन साम्राज्याचाही आज अंत झालेला आहे. भूमध्यरेषेच्या उत्तरेच्या भागांत असणारीं त्यांचीं बेटें जपानला दिलीं असून भूमध्यरेषेच्या दक्षिणेचीं जर्मन लोकांचीं बेटें ग्रेटब्रिटन व त्याच्या वसाहती यांना देण्यांत आलीं. बिस्मार्क आर्चिपेलेगो, जर्मन न्यूगाएनिया व जर्मन सॉलोमन बेटें हीं आस्ट्रेलियाला मँडेट म्हणून मिळालीं आहेत. जर्मन सामोआ हें न्यूझीलंडला मिळालें व नॉरू हें ग्रेटब्रिटनला मिळालें. आज इंग्लिश साम्राज्याच्या खालोखाल नांव घेण्यासारखें साम्राज्य फ्रेंचांचें आहे. स्पेन, पोर्तुगीज, डच, व जर्मन हे इंग्लिशांचे एकेकाळचे प्रतिस्पर्धी आज अगदीं हतबल झालेले आहेत. अठराव्या शतकांत इंग्लिश लोकांनीं अमेरिका व हिंदुस्थान या दोन्ही देशांत फ्रेंचांचा पाडाव केला असल्यामुळे नेपोलियनच्या मृत्यूनंतर इंग्लिशांना आपलें साम्राज्य करण्याला कोणाची फारशी भीति उरली नव्हती. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून त्यांना जर्मनी हा मोठाच प्रतिस्पर्धी वाटूं लागला होता. त्याचा त्यांनीं फ्रान्स, इटली, टर्की व प्रथम कांहीं वेळ रशिया इत्यादि राष्ट्रांशीं सख्य करून गेल्या महा-युद्धांत पूर्ण पाडाव केला. आज त्यांना फ्रान्स हा पुनः थोडा प्रतिस्पर्धी भासूं लागला असून टर्की व रशिया हे दोन बलाढ्य शत्रू आशियाकडच्या बाजूला त्यांना निर्माण झाले आहेत. असो.

इतर सर्व युरोपीयन राष्ट्रांना मागें सारून इंग्लिशांनींच आपलें साम्राज्य टिकविलें व वाढविलें यावरून त्यांचें व्यावहारिक राजनीतिकौशल्य व्यक्त होतें. त्यांची साम्राज्यविषयक राजनीति प्रारंभापासून आतांपर्यंत एकसारखी बदलत आलेली असून अनुभवानें शहाणें होण्याची वृत्ति त्यांनीं दाखविली आहे असें म्हणण्यास फारशी हरकत नाहीं. सतराव्या व अठराव्या शतकांत साम्राज्यां-

ब्रिटिशांची साम्राज्यनीति.

तील इतर भागासंबंधींचें त्यांचें धोरण संकुचित स्वार्थाचें होतें असें दिसून येतें. साम्राज्यांतील इतर भागांनीं इंग्लंडला लागणारा कच्चा माल पुरवावा, पक्का माल बनविण्याच्या उद्योगांत पडूं नये, त्यांचा व्यापार आपल्याच जहाजांतून व्हावा, इतर राष्ट्रांशीं त्यांनीं व्यापार करूं नये अशीं अनेक बंधनें इंग्लंड त्यांच्यावर लादीत असे. त्याचप्रमाणें त्यांच्यावर म्हणजे वसाहतींवर वाटेल तो कर बसविण्याचा अधिकार आपणांस आहे. कारण आपण त्यांचें संरक्षण करीत असतों असाही हक्क इंग्लिश राजे व मुत्सद्दी सांगत असत. अखेर या हक्कांबद्दलच तंटे होऊन अमेरिकेंतील कांहीं वसाहती तिसऱ्या जॉर्जच्या व लार्ड नॉर्थच्या हट्टामुळें इंग्लडशीं युद्ध करून " अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें " या नांवाचें स्वतंत्र राज्य स्थापून स्वतंत्र झाल्या. या युद्धाचा तात्कालिक परिणाम कांहीं काल इतर वसाहतींवरील बंधनें अधिकच घट्ट करण्यांत व त्यांचें स्वातंत्र्य कमी करण्यांत झाला; परंतु अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धाप्रमाणें दुसरें युद्ध कानडांत सुरूं होण्याचीं प्रत्यक्ष चिन्हें कानडांत बंडाच्या रूपानें दिसूं लागलीं. तेव्हां लॉर्ड डरहॅमला तेथील परिस्थितिसंबंधीं रिपोर्ट करण्यास साम्राज्य सरकारनें पाठविलें आणि त्यानें १८३९ मध्यें केलेल्या रिपोर्टांत कानडाला जबाबदार राज्यपद्धति देणें, हा एकच मार्ग अमेरिकन युद्धासारखें दुसरें संकट न उद्भवण्यास उरलेला आहे अशी शिफारस केली. या वेळेपासून आपल्या वसाहतीसंबंधींच्या इंग्लंडच्या धोरणांत बदल होऊन त्यांना अंतर्गत स्वराज्य देऊन आपल्या साम्राज्यांत ठेवण्याचें दूरदर्शी स्वार्थाचें धोरण इंग्लिश मुत्सद्यांनीं स्वीकारलें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. पुढें हळूं हळूं कानडा, न्यूझीलंड, आस्ट्रेलिया व द. आफ्रिका यांना वसाहतींचें स्वराज्य ऊर्फ जबाबदार राज्यपद्धति देण्यांत आली. तो सर्व इतिहास येथें देण्याचें कारण नाहीं. वसाहतींना स्वराज्य मिळून त्या आपल्या देशांत उद्योगधंदे स्थापूं लागल्या, हें पाहून त्यांच्यापासून आपणास कांहींच फायदा होत नाहीं, उलट त्यांचें संरक्षण मात्र करावें लागतें अशा भावनेनें

त्या स्वतंत्र होऊन आपलें साम्राज्य सोडून गेल्या तरी कांहीं हरकत नाहीं अशी भावना इंग्लंडांत एकोणिसाव्या शतकांत कोठें कोठें दिसूं लागली. परंतु फ्रँकोजर्मन युद्धापासून जर्मनी बलाढ्य होऊन इंग्लंडच्या तोडीचें दुसरें साम्राज्य बनविण्याची महत्त्वाकांक्षा व्यक्त करूं लागल्यापासून इंग्लंडांतील ही वृत्ति मावळून साम्राज्यवादाचें तत्त्व जोरांत प्रसार पावूं लागलें. साम्राज्यवादाची लाट इतकी पसरली कीं, गेल्या महायुद्धाच्या वेळेपर्यंत इंग्लंडांतील कॉन्झर्व्हेटिव्ह, लिबरल व लेबर या तीन्ही पक्षांचे पुढारी पक्के साम्राज्यवादी बनले. तसेंच १९०३ मध्यें मि. चेंबर्लेन यांनीं साम्राज्यांतील निरनिराळ्या देशांनीं परस्परांस जकातींच्या सवलती द्याव्यात हें तत्त्व लोकांपुढें मांडलें व तेंही आज बहुतेक सर्वांना मान्य झालेलें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. आज इंग्लिश मुत्सद्यांपुढें मुख्यतः दोन प्रश्न आहेत. एक साम्राज्यांतील निरनिराळ्या विभागांना अंतर्गत स्वराज्य देऊन बाह्य जगाच्या दृष्टीनें साम्राज्याचें ऐक्य कसें राखावयाचें आणि दुसरा आर्थिकदृष्ट्या साम्राज्य हा एक जगाचा स्वयंपूर्ण घटक बनवून इतरत्र होणारीं युद्धें किंवा क्रान्त्या यांचा साम्राज्यावर होणारा अनिष्ट परिणाम कसा टाळावा. पहिला हेतु साध्य होण्यासाठीं साम्राज्याला संयुक्त राज्याचें स्वरूप द्यावें आणि दुसरा हेतु साधण्यासाठीं साम्राज्यांतील सर्व घटकांनीं सवलतीच्या जकातींचें धोरण स्वीकारावें, अशा सूचना करण्यांत येत आहेत.

साम्राज्याला संयुक्त राज्याचें स्वरूप देण्याची भाषा महायुद्धापूर्वीं जितकी ऐकूं येत होती, तितकी ती आतां ऐकूं येत नाहीं. महायुद्धानंतर स्वयंशासित वसाहतींनीं तहावर स्वतंत्र राज्यांप्रमाणें स्वतः सह्या केल्या आणि राष्ट्रसंघांत त्यांना स्वतंत्र राज्यांच्या बरोबरीचें स्थान मिळालें. या वेळपासून त्यांच्यांत स्वतंत्र राष्ट्रीय भावना जागृत होऊं लागली असून साम्राज्या-

साम्राज्याचें संयुक्तराज्य. व भवितव्य.

ऱ्या संयुक्तराज्यांतील पोटराज्यें म्हणून राहाण्यास त्या तयार होणार नाहींत. दुसरी गोष्ट साम्राज्यांतील निरनिराळे भाग लोकसंख्या, देशविस्तार, भौतिक-संपत्ति, राजकीय परिस्थिति, मानवी संकृति या सर्व दृष्टींनीं इतके असमान आणि विसदृश आहेत कीं, त्यांतील बऱ्याच मोठया वर्गावर अन्याय केल्या-शिवाय संयुक्तराज्यव्यवस्था स्थापन करणें शक्य नाहीं. महायुद्धापूर्वी फक्त स्वयंशासित वसाहती आणि ग्रेट ब्रिटन यांचेंच संयुक्त राज्य बनवावें आणि त्या सर्वांनीं मिळून जित राष्ट्रांवर राज्य करावें ही कल्पना शक्य वाटत होती. परंतु ती आतां शक्य भासत नाहीं. हिंदुस्थानास राष्ट्रसंघांत स्थान दिलें यावरून हें सिद्ध होतें. संयुक्तराज्य करावें तर हिंदुस्थानाला वगळतां येत नाहीं व हिंदुस्थानाला घेऊन तें बनवावें तर तेंहि शक्य नाहीं. कारण हिंदुस्थान हा एकटाच एवढा मोठा भाग आहे कीं, त्याच्या मोठेपणाच्या, भौतिक संपत्तीच्या किंवा प्राचीन संस्कृतीच्या मानानें त्याला जे अधिकार द्यावे लागतील ते दिल्यास साम्राज्य ब्रिटिशांचें नसून हिंदुस्थानाचेंच बनेल. तात्पर्य, स्वयंशासित वसाहतींतील आणि हिंदुस्थानांतील राष्ट्रीय भावनेची आज इतकी वाढ झालेली आहे कीं, हिंदुस्थानाला वगळून किंवा त्याला आंत घेऊन साम्राज्याला संयुक्तराज्याचें स्वरूप देणें मुळींच शक्य दिसत नाहीं. फक्त साम्राज्यांतील सर्व राज्यें एक प्रकारच्या राष्ट्रसंघाच्या स्वरूपांत तरी एकत्र राहतील किंवा नाहीं, हाच काय तो प्रश्न आहे. आज इंग्रजांतील साम्राज्यवादी मुत्सद्दी संयुक्त साम्राज्याची (Imperial Federation) ची भाषा बोलत नसून ब्रिटिश राष्ट्रसंघ (British Commonwealth of Nations) व क. वेजवुडसारखे तर कांहीं लोक इंडोब्रिटिश राष्ट्रसंघ (Indo British Commonwealth of Nations) असे शब्द योजून साम्राज्याचें भवितव्य व्यक्त करूं लागले आहेत. हें ध्येय सुद्धा प्रत्यक्ष सृष्टींत अवतरेल किंवा नाहीं याबद्दल जबरदस्त शंका आहे. परराष्ट्रीय धोरणाच्या कामीं इंग्लंडचें नेतृत्व स्वीकारण्यास स्वयंशासित वसाहती आज तयार नाहींत,

इतकेंच नाहीं तर इंग्लंडनें पुकारलेल्या युद्धांत भाग घेणें किंवा न घेणें ही आमच्या खुषीची गोष्ट आहे असें तेथील मुत्सद्दी बोलूं लागले आहेत. लोकानोंला युरोपीन राष्ट्रांनीं केलेल्या तहनाम्यांत इंग्लंडनें पाश्चिम युरोपांत फ्रान्स, जर्मनी, अगर बेल्जियम यांनीं एकमेकांवर स्वारी केल्यास स्वारी करणाऱ्या राष्ट्राविरुद्ध लढण्याचें बंधन मान्य केलें. परंतु हा तह वसाहतींनीं मान्य न केल्यास त्यांच्यावर तो बंधनकारक नाहीं असेंही ठरविण्यांत आलें होतें. अर्थात् इंग्लंडनें सुरू केलेल्या प्रत्येक युद्धांत साम्राज्यांतील इतर राष्ट्रांनीं भाग घेतलाच पाहिजे या तत्त्वाला या वेळेपासून हरताळ फासला गेला असें म्हणण्यास हरकत नाहीं. पण अशी स्थिति जर प्रत्यक्ष एखाद्या युद्धाच्या वेळीं झाली तर ब्रि. साम्राज्य मोडलें असेंच होणार नाहीं काय ? इंग्लंडच्या युरोपियन संबंधामुळें उत्पन्न होणाऱ्या युध्दांत आपण कां भाग घ्यावा, आपल्या हिताच्या दृष्टीनें, भूगोलिक व आर्थिक दृष्टीनें, व संस्कृतीच्या दृष्टीनें आपलें परराष्ट्रीय धोरण इंग्लंडशीं जुळत नाहीं, ही भावना वसाहतींत वाढली नाहीं असें धरलें तरी हिंदुस्थानांत वाढण्याचा फार संभव आहे.ही वाढली कीं परस्पर प्रेमाच्या भावनेवर सध्याचे साम्राज्यांतील घटक एकत्र राहावेत हें ध्येय नाहींसें होतें. सध्याच्या सत्तेच्या व शस्त्रबलाच्या सामर्थ्यावर साम्राज्यांतील सर्व घटक किती काळ एकत्र राहतील हें सांगणें अशक्य आहे.

सार्वभौम राज्य.

सार्वभौम राज्याचें ध्येय.

या प्रकरणाच्या मथळ्यावर दिलेल्या उताऱ्यांत म्हटल्याप्रमाणें पृथ्वीच्या पाठीवरील सर्व प्रदेशांवर व लोकांवर राज्य करणारी एकच संस्था असावी ही सार्वभौम राज्याची कल्पना ध्येय या दृष्टीनें भारतीय राजनीतीला फार प्राचीन काळापासून परिचित आहे व ती पुष्कळ राजनीतिज्ञांच्या अंतःकरणांत अद्यापि

महत्त्वाचें स्थान पटकावून बसलेली आहे. प्राचीन भारतीयांच्या काळापेक्षां आज राजनैतिक राज्ययंत्रांच्या घटनेंत व भौतिक शास्त्रांत जगाची पुष्कळ प्रगति झालेली आहे आणि भौतिक व यांत्रिक सुधारणेमुळें जगांतील निरनिराळे देश व लोक एकमेकांच्या अगदीं निकट आलेले आहेत, हेंही आम्हांस मान्य आहे. तथापि सर्व राष्ट्रांतील, सर्व धर्मांचे, सर्व जातींचे व वर्णांचे लोक एकाराज्यांत सुखानें स्वातंत्र्यानें व सलोख्यानें नांदावेत इतकीं त्यांचीं अंतः-करणें एकमेकांजवळ आलेलीं नाहींत. त्यांच्यांत सांस्कृतिक व सांपत्तिक भेद अद्यापि इतके आहेत कीं, त्यांचा सर्वांचा एका राज्यांत समावेश करणें म्हणजे जगांतील बऱ्याच मोठया लोकसमुदायाला गुलामगिरींत लोटल्यासारखें होणार आहे. तसें होण्यापेक्षां सध्याची अशांततेची अस्थिर राजकीय परिस्थिति कांहीं वाईट नाहीं. तात्पर्य सध्याच्या जगाच्या प्रस्तुत संस्कृतीच्या दृष्टीनें निरनिराळ्या राष्ट्रांना स्वयंनिर्णयाच्या तत्त्वानुसार स्वातंत्र्यानें आपली उन्नति करण्याची व आपल्या राष्ट्रांतील सर्व वर्गांच्या लोकांना समान दर्जाला आण-ण्याची संधि देणें हेंच धोरण जगाच्या हिताचें आहे असें म्हणणें भाग आहे. जगाच्या सध्याच्या परिस्थितींत कोणत्याही राष्ट्राला इतरांशीं संबंध न ठेवतां किंवा परस्पर बंधनें न घालून घेतां अगदीं अलग राहाणें हेंही शक्य दिसत नाहीं. सध्याचा काळ निरनिराळ्या राष्ट्रांनीं संघ करून राहाण्याचा दिसतो. पण या कामीं प्रत्येकाला पूर्ण स्वातंत्र्य असलें पाहिजे. असे राष्ट्रांचे संघ होतां होतां पुढें कधीं काळीं सार्वभौम राज्य स्थापन होऊन जगांतील युद्धें नष्ट होणार असलीं तरी तो काळ अद्यापि फार दूर आहे. शिवाय जगांतील सर्वच द्वंद्वें नष्ट होण्याचा काळ जेव्हां येईल तेव्हां राज्य या संस्थेचीच गरज राहाणार नाहीं असे म्हणणारे अराजक तत्त्ववेत्तेही बरेच आहेत. व्यावहारिक दृष्टीनें हे अराजक तत्त्ववेत्ते व सार्वभौम राज्याचे पुरस्कर्ते हे दोघेही एकाच वर्गांत पडतात !

प्रकरण ८ वें.

उपसंहार.

" The democracies of the west know it to their cost how hard it is to get laws made which would secure them justice and protection against blood-sucking and soul-killing devices of the Capitalist. They have yet to discover that the legislators of a nation should be men who have no interest in pro— perty, in business, in trade, in capitalism or in industries. No comparison can be instituted between the Brahmin legislators of ancient India and the capitalist legislators of the modern world. " Lala Lajpatrai

सध्यां पाश्चात्य देशांतील राज्ययंत्र बहुतेक ठिकाणीं अगदीं मोडकळीला आलेलें दिसत आहे. रशियांमध्यें बोल्शेव्हिक लोकांनीं भांडवलशा-

---

१ " रक्तशोषक आणि आत्मघातक भांडवलशाहीच्या जुलमांतून सोडविणारे न्यायी कायदे करवून घेणें, ही गोष्ट किती अवघड आहे, याचा कटु अनुभव पाश्चात्य लोकसत्ताक राज्यांना आलेला आहे. ज्यांना संपत्ति, उद्योगधंदे, व्यापार, कारखाने किंवा भांडवलशाही, यांपासून कोणताही स्वार्थ साधावयाचा नाहीं अशा लोकांच्या हातींच राज्यांतील कायदे करण्याची सत्ता असली पाहिजे, हा शोध त्यांना अद्यापि लागावयाचा आहे. सध्याच्या जगांतील भांडवलवाले कायदेकार आणि प्राचीन भारतांतील ब्राह्मण शास्त्रकार यांची तुलना देखील होऊं शकत नाहीं. " The United states of America p. 398.

पाश्चात्य राज्ययंत्राची शोचनीय स्थिति.

हीला उन्मूलित करून सर्व राज्यसूत्रें कामकरी वर्गाच्या हातीं दिलीं आहेत व भांडवलशाहीचा कायमचा नायनाट करण्याचा प्रयत्न चालविला आहे, तर इटाली व स्पेन या देशांत अनियंत्रित राज्यव्यवस्था स्थापन करून बोल्शव्हिझमचें किंवा कम्यूनिझमचें तत्त्व आपल्या देशांत प्रसृत होऊं नये याबद्दल आटोकाट प्रयत्न चालू आहेत. फ्रान्स,जर्मनी,इंग्लंड किंवा अमेरिका या देशांतही एका बाजूला रशियांत प्रस्थापित झालेला बोल्शेव्हिझम आणि इटालींत प्रस्थापित झालेला फॅसिसिझम, यांच्या सारख्या तत्त्वांवर उभारलेले दोन दोन पक्ष थोडया निराळ्या स्वरूपांत राज्य यंत्राचा ताबा आपल्या हातीं यावा याबद्दल खटपट करीत असलेले दिसत आहेत व या दोन जबरदस्त पक्षांच्या टकरींत पाश्चात्य राज्ययंत्राचा चुराडा होण्याचीं स्पष्ट चिन्हें दिसत आहेत. सांपत्तिक सत्ता हा लोकसत्तेचा खरा शत्रु आहे असे उद्गार लॉर्ड ब्राइस यांनीं आपल्या "अमेरिकन कॉमनवेल्थ" या

---

१ या विषयांवर मि. जेम्स कॉर्बेट यांनीं "नाईन्टीन्थ सेन्चरी अँड आफटर" या मासिकाच्या फेब्रुवारी १९२६ च्या अंकांत एक "The return to authority" या मथळ्याचा लेख लिहिला होता. ते म्हणतात "In a nutshell, Liberal democracy seems destined to perish between illiberal Communism and illiberal Facism and this fact alone is gravely significant today." या लेखांत त्यांनीं इंग्लंड,फ्रान्स व अमेरिका या देशांतही हळूं हळूं एकप्रकारची अनियंत्रित सत्ता प्रस्थापित होण्याचीं कशी चिन्हें दिसत आहेत तें दाखवून दिलें आहे.याच लेखकानें 'फॉर्टनाइटली रिव्ह्यू'च्या मार्च १९२६ च्या अंकांत एक लेख लिहून मजूर पक्षांतील नेमस्त लोक व लिबरल पक्षांतील उदार लोक यांनीं एकी करून कम्यूनिझमचें भूत आपल्या देशांतून कायमचें गाडून टाकावें अशीहि सूचना केली आहे.

ग्रंथांत काढले आहेत, त्याची प्रतीति आज पाश्चात्य राज्यांना पूर्णत्वानें येत आहे. आर्थिक व सामाजिक विषमता आणि राजकीय लोकसत्ता यांची एकत्र स्थिति संभवत नाहीं ही गोष्ट पाश्चात्यांच्या आजच्या स्थितीवरून उत्तम प्रकारें सिध्द होत आहे.

सध्यांच्या राज्ययंत्राची ही दुःस्थिति पाहून त्याची सुधारणा करण्याच्या अनेक कल्पना पाश्चात्य देशांत आज उदय पावत आहेत. त्यांत प्रत्यक्ष लोकसत्तावाद, समाजसत्तावाद व राष्ट्रकुटुंबवाद (Communism) हे मुख्य आहेत. पैकीं दुसऱ्या दोन वादांची सविस्तर चर्चा अर्थशास्त्रावरील ग्रंथांतच करावी लागते. हे दोन्हीही वाद संपत्त्युत्पादनाचीं साधनें खासगी मालकीची असूं नयेत व त्यावर समाजाची मालकी असावी असें म्हणतात. सामाजिक संपत्तीची वाटणी करतांना ज्याला त्याला आपापल्या श्रमाच्या प्रमाणांत तिचा भाग मला मिळावा असें समाजसत्तावाद म्हणतो; तर ज्यानें त्यानें आपल्या मगदुराप्रमाणें श्रम करावेत व गरजेप्रमाणें सामाजिक संपत्तीचा उपभोग घ्यावा असें राष्ट्रकुटुंबवाद म्हणतो. समाजसत्तावादाचें सरकारनिष्ठ व संघनिष्ठ असे दोन पोटभेद मागे वर्णिले आहेतच. याशिवाय अराजक संघवादाच्या अराजक मताचीही माहिती मागें दिलीच आहे. या सर्वांत संघनिष्ठ समाजसत्तावादाचीं बरींच मतें आम्हांला ग्राह्य वाटतात.

तथापि पाश्चात्य राष्ट्रांची पुनर्घटना करतांना आणखी एका महत्त्वाच्या मुद्याकडे लक्ष देणें अवश्य आहे; पण तिकडील समाजसत्तावादी लोक अद्यापि त्या मुद्याचा करावा तितका विचार करीत नाहींत. या मुद्याचा विचार करतांना आपणांस थोडें अर्थशास्त्राच्या प्रदेशांत शिरणें भाग आहे. एकोणिसाव्या शतकाच्या आरंभीं नेपोलियनचा पराभव झाल्यापासून इंग्लंडांत औद्योगिक क्रांति होऊन व्यापाराची फार

आर्थिक स्वयंपूर्णता स्थापून सांपत्तिक सत्तेचें केंद्रीकरण नष्ट करणें.

वाढ झाली आणि मोठया प्रमाणांवर संपत्त्युत्पादन करून सर्व जगाला कापड, कोळसा व लोखंड आपण पुरवावें आणि आपणास लागणारें अन्न व कच्चा माल परदेशांतून आणावा अशी महत्त्वाकांक्षा तेथील लोकांत प्रादुर्भूत झाली. पुढें यंत्रसाहाय्यानें संपत्युत्पादन करण्याची कला इतर युरोपियन देशांनींहि उचलली आणि प्रत्येक देशांत मोठया प्रमाणावर संपत्युत्पादन होऊं लागलें. सर्व राष्ट्रांनीं आपणास लागणारे सर्व पदार्थ निर्माण करण्याचा पूर्वींचा काळ निघून गेला व आतां प्रत्येक राष्ट्रानें दोन चार पदार्थांचीच प्रचंड प्रमाणांत निर्मिति करून त्या बाबतींत जगाची बाजारपेठ काबीज करावी असा आंतरराष्ट्रीय श्रमविभागाचा काळ आला असें पाश्चात्य अर्थशास्त्रज्ञ म्हणूं लागले. पण यांत आतां बऱ्याच अडचणी भासूं लागल्या आहेत. इंग्लंडप्रमाणें सर्वच युरोपीयन राष्ट्रांना कच्चा माल पुरविणाऱ्या वसाहती आणि हिंदुस्थानाप्रमाणें मोठी बाजारपेठ कशी लाभणार ? यामुळें प्रत्येक युरोपीयन राष्ट्राची वसाहती मिळविण्याकडे व साम्राज्यवृद्धीकडे प्रवृत्ति होऊं लागली व या प्रवृत्तीच्या मुळाशीं यंत्रसाहाय्यानें प्रचण्ड प्रमाणावर संपत्युत्पादन करण्याची शक्यता हें एकच कारण होतें. या प्रवृत्तीचा सर्वत्र प्रसार होऊन आज बहुतेक युरोपीयन राष्ट्रांत लष्करशाही व भांडवलशाही (Militarism and Capitalism) यांची मनस्वी वाढ झाली. याचाच परिणाम कोठें अनियंत्रित नोकरशाही तर कोठें बोल्शेव्हिझम स्थापन होण्यांत होत आहे, आणि देशांत भांडवलवाल्यांची किंवा कामकरी वर्गाची सुलतानशाही प्रस्थापित होऊन व्यक्तिस्वातंत्र्याचा आणि लोकसत्तेचा उच्छेद होत आहे. या आपत्तींचा नायनाट होण्याचा एक मुख्य उपाय म्हणजे आंतरराष्ट्रीय श्रमविभागाचें तत्त्व बरेंच संकुचित होऊन त्या जागीं राष्ट्रीय स्वयंपूर्णतेचें तत्त्व प्रस्थापित झालें पाहिजे. प्रत्येक राष्ट्रानें दोनचार उद्योगधंद्यांतच प्राविण्य मिळवून आपला तो माल जगांतील इतर देशांवर लादण्याचा प्रयत्न

न करतां आपल्या सर्व नित्याच्या व अवश्य गरजा आपणच भागविण्याचें ध्येय पुढें ठेविलें पाहिजे. हें ध्येय स्वीकारिलें म्हणजे शेती किंवा उद्योगधंदे या दोहोंचीही योग्य प्रमाणांत वाढ करण्यापलीकडे लक्ष दिलें पाहिजे. प्रत्येक राष्ट्रांनीं शेती करून हरतऱ्हेचे उद्योगधंदे करावयाचे म्हणजे प्रचंड औद्योगिक शहरें मोडून लहान लहान गांवांत व खेड्यांत उद्योगधंदे स्थापन केले पाहिजेत आणि मोठया प्रमाणावरील संपत्त्युपादनाच्या तत्त्वाला मर्यादित केलें पाहिजे. याप्रमाणें वागल्यास राष्ट्रांप्रमाणेंच राष्ट्रांतील लहान लहान विभागही आर्थिक दृष्टया बहुतेक स्वयंपूर्ण बनतील आणि सांपत्तिक सत्तेचें केंद्रीकरण साहाजिकच कमी होईल. आर्थिक विषमता नष्ट व्हावी,सांपत्तिक व त्याचबरोबर राजकीय सत्तेचें केंद्रीकरण कमी होऊन लोकसत्तेचा परिपोष व्हावा, स्थानिक स्वराज्याचा पूर्ण अनुभव घेतां यावा, औद्योगिक स्वराज्याची स्थापना व्हावी आणि राष्ट्रांतील सर्व घटकांची सर्वांगीण उन्नति व्हावी व आंतरराष्ट्रीय तंटे मिटून जगांत शांतता राहावी अशी इच्छा असल्यास आंतरराष्ट्रीय श्रमविभागाच्या तत्त्वाला आणि मोठया कारखान्यांना मर्यादित करून राष्ट्रीय व प्रादेशिक स्वयंपूर्णतेच्या व श्रमसंयोगाच्या तत्त्वांचा आश्रय केला पाहिजे. राष्ट्रांतील मोठया शहरांत गोळा झालेले कारखाने सर्व देशभर पसरलेल्या छोटया गांवांत व खेडयांत नेले पाहिजेत व अन्नवस्त्रासारख्या हरएक नित्यगरजांच्या बाबींत तरी प्रत्येक राष्ट्र व राष्ट्रविभाग स्वयंपूर्ण बनविला पाहिजे. ही गोष्ट करणें हें केवळ नैतिक कर्तव्य आहे एवढेंच नसून ज्या मानानें सर्व राष्ट्र व राष्ट्रविभाग यंत्रसहाय्यानें आपल्या गरजा थोडया श्रमानें व द्रव्यानें भागवूं शकतील, त्या मानानें हें धोरण स्वीकारणें प्रत्येक राष्ट्राला व्यावहारिक स्वार्थ दृष्टीनेंही अवश्य होईल असें म्हणणारें समाजतत्त्ववेत्ते पाश्चात्य देशांत निघत आहेत. त्यांमध्यें अग्रेसरत्वाचा मान प्रिन्स क्रोपोटकीन या रशियन अराजक पंथाच्या पुरस्कर्त्यास दिला पाहिजे. यानें १८९८ सालीं या विषयांवर " Fields, Factories and Workshops "

या नांवाचा एक स्वतंत्र ग्रंथ लिहिला असून त्यांत प्रत्येक राष्ट्रानें व राष्ट्रांतील मोठ्या प्रदेशानें आपणास लागणारे सर्व पदार्थ स्वतः निर्माण करावेत, देशांतील कारखाने मोठमोठ्या शहरांतच गोळा करून न ठेवतां ते सर्व देशभर छोट्या गांवांतून व खेड्यांतून पसरावेत, सांपत्तिक व राजकीय सत्तेचें केंद्रीकरण होऊं देऊं नये, हें खेड्यांतील कारखाने समाजाच्या मालकीचें असावेत, तेथील लोकांनीं वर्षांतून कांहीं काळ शेतांत काम करावें व कांहीं काळ या छोट्या कारखान्यांत काम करावें, हे छोटे कारखाने व घरगुती उद्योगधंदे नैसर्गिक शक्तीच्या साहाय्यानें चालवावेत, प्रत्येक मनुष्यानें कांहीं काळ शरीरकष्टाचें व कांहीं काळ मानसिक श्रमाचें काम करावें आणि देशांतील नागरिकांना भौतिक शास्त्रांचें तात्त्विक ज्ञान देतांना हस्तकौशल्याचेंही शिक्षण द्यावें अशीं आपलीं मतें त्यांनीं व्यवस्थित रीतीनें मांडलेलीं आहेत.[१] सुमारें तीस वर्षांपूर्वीं लिहिलेलीं हीं मतें इंग्लंड-

---

१ या पुस्तकांतील पुढील उतारे वाचकांकरितां खालीं दिले आहेत:—

" Each nation—her own agriculturist and manufacturer; each individual working in the field and in some industrial art; each individual combining scientific knowledge with the knowledge of a handicraft, such is, we affirm, the present tendency of civilized nations" p 24. " But the question arises, why should not hundreds of domestic industries, now carried on entirely by hand, resort to labour saving machines, as they already do in the knitting trade and many others. There is no reason why the small motor should not be of a much more general use than it is now, wherever there is no need of a factory; and there is no reason why the village should not have its small factory, wherever factory work is preferrable

सारख्या भांडवलशाहीच्या व साम्राज्यवादाच्या आगरांतील लोकांनाही हळूं-हळूं पटूं लागलीं आहेत व इंग्लंडनेंही आर्थिक स्वयंपूर्णतेचें ध्येय आपणापुढें ठेवावें असें तेथील विद्वान व दूरदर्शी लोक उघडपणें प्रतिपादूं लागले आहेत. सध्या कारखाने व यंत्रें चालविण्याच्या कामीं विजेच्या शक्तीचा उपयोग करण्याचा प्रघात पडूं-लागल्यापासून खेडयांत व छोटया गांवांत असणाऱ्या कारखान्यांतील यंत्रें

---

as we already see it occaisonly in certain villages in France... ... There is no reason why the factory, with its motive force and machinery should not belong to the Community ...... ' p. 321. " The scattring of industries over the country–so as to bring the factory amidst the fields, to make agriculture derive all those profits which it always finds in being combined with industry and to produce a combination of industrial with agricultural work–is surely the next step to be made, as soon as a reorganisation of our present conditions is possible. It is being already made, here and there as we saw in the preceding pages. The step is imposed by the very necessity of of *producing for the producers themselves*, it is imposed by the necesity for each healthy man and woman to spend a part of their lives in manual work in the free air; and it will be rendered the more necessary when the great social movements which have become now unavoidable, come to disturb the international trade, and compel each nation to revert to her own resources for her own maitenace. ' p, 361.

चालविण्यास ही शक्ति वाटेल तेथून नेतां येण्याची सोय झाल्यामुळें तर हे विचार पुष्कळांना संभाव्य भासूं लागले आहेत. आतां उद्योगधंद्यांत बाष्पयुगाच्या ऐवजी विद्युत्युगाची स्थापना होणार असून त्यामुळें कोंदट हवेची व रोगट लोकांनीं भरलेली विद्रूप शहरें नष्ट होतील, मोकळ्या हवेच्या व निरोगी लोकांच्या खेडयांत उद्योगधंदे व शेती याचा संयोग दृष्टीस पडेल आणि सांपत्तिक सत्तेचें केंद्रीकरण नष्ट होईल, अशीं भविष्यें पुष्कळ लोक वर्तवूं लागले आहेत.असो.

राजकीय व सांपातिक सत्तेचें केंद्रीकरण कमी करून राष्ट्रांतील प्रत्येक प्रादेशिक घटक स्वयंशासित व स्वयंपूर्ण करणें आणि अशा लहान लहान घटकांत लोकसत्तेची स्थापना करणें, हें ध्येय स्वीकारल्याशिवाय राष्ट्राची सर्वांगीण उन्नति होणार नाहीं, या विचाराबरोबरच औद्योगिक किंवा व्यावसायिक स्वराज्याची, भारतीयांच्या जातिसंस्थांत किंवा प्राचीन श्रेणीसंस्थांत आढळून येणारी कल्पना युरोपियन राजनीतिज्ञांत संघनिष्ठ समाजसत्तावादाच्या रूपानें प्रादुर्भूत होऊं लागली आहे.

भारतीयांची मान्यता पावूं लागलेलीं कांहीं तत्त्वें.

---

१ या विद्युत् युगाचें वर्णन मि. लॅन्सेलॉट लॉटन यांनीं फॉर्टनाइटली रिव्ह्यूच्या मार्च १९२६ च्या अंकांत पुढील शद्बांनीं केलें आहे.

" From all these facts it is evident, I think, that we are in the presence of a worldwide transition, rendered possible by the amazing technical achivements of recent times , the ultimate effect of which will be completely to change the whole charaacter of town and country life and bring the one into closer relationship with the other; to render all the nations selfsupporting in essential Commodities

अशाप्रकारें भारतीयांच्या ग्रामसंस्था व जातीसंस्था यांना आज एका निराळ्या स्वरूपांत जगांत मान्यता मिळूं लागली आहे. भारतीयांच्या बऱ्याचशा जाती या मध्युगीन युरोपांतील "गिल्ड" संस्थांचींच रूपान्तरें आहेत, असें म्हणण्यास हरकत नाहीं. प्राचीन भारतवर्षातील औद्योगिक श्रेणींना आनुवंशिक स्वरूप प्राप्त होऊन आजच्या अनेक धंदेवाईक जाति झालेल्या आहेत. भारतीयांच्या वर्णाश्रम धर्माच्या कल्पनेंतही बराच ग्राह्यांश आहे, ही गोष्ट युरोपीयन ग्रंथकारांना आज पटूं लागल्याचीं चिन्हें कोठें कोठें दिसतात. एच्. जी. वेल्स हे एक प्रतिभावान कादंबरीकार असून सामाजिक सुधारकही आहेत. त्यांनीं " मॉडर्न युटोपिया " या नांवाचा एक ग्रंथ लिहून भावी सत्ययुगाचें एक कल्पना-चित्र रेखाटलें आहे व त्यांत त्यांनीं सर्वोत्कृष्ट समाजरचना व राजकीय स्थिति कशी असावी, हें विशद रीतीनें वर्णिलें आहे. त्यांत एकंदर मानवी समाजाचे त्यांच्या मानसिक व बौद्धिक रचनेच्या दृष्टीनें चार स्थूल विभाग केलेले आहेत. या सामाजिक वर्गांना ते " Poetic " " Kinetic " " Dull " व " Base " अशीं नांवें देतात. मानवी समाजाचें हें वर्गीकरण लक्षांत न घेतां केलेली समाजरचना किंवा राज्यघटना न्यायदृष्टीनें व व्यवहारदृष्टीनें योग्य होणार नाहीं, असें त्यांचें

---

particularly food stuffs; and this sooner than most people believe to be possible at present; to increase production and wealth to an extent hitherto undreamt of; to diminish the need of human drudgery and to spread light, heat, hygiene, and the means of communications to the darkest and remotest corners of the earth. No longer must we say the electric age is dawning but rather it has dawned." Farms and Factories by Lancelot Lawton

मत त्यांनीं या पुस्तकांत व्यक्त केलें आहे. हें वर्गीकरण प्राचीन भारतीयांच्या चातुर्वर्ण्याच्या कल्पनेशीं अगदीं जुळतें आहे, हें कोणाच्याही सहज लक्षांत येईल. ग्रीक तत्त्ववेत्ता प्लेटो, आर्वाचीन समाजशास्त्रप्रस्थापक ऑगस्टस कौंट आणि जर्मन जडवादी तत्त्ववेत्ता नीत्शे, यांनींही भारतीयांचें हें चतुर्विध वर्गीकरण मान्य केलेलें आहे. तसेंच समाजसंघटनेचा आधार व्यक्तीच्या कर्तव्यबुद्धीवर ठेवला गेला पाहिजे, हें भारतीय वर्णाश्रम धर्माचें मूलभूत तत्त्वही आज पाश्चात्य देशांतील समाजसत्तावादी लोक आपल्या देशबांधवांच्या नजरेस आणून देत आहेत. प्रत्यक्ष राजनीतिशास्त्राचा विचार केला तरी राजनीतीला अधिकाधिक धार्मिक किंवा नैतिक स्वरूप प्राप्त होत असलेलें पाश्चात्य विद्वानांचे ग्रंथ वाचल्यास सहज ध्यानांत येतें. युरोपांत आधुनिक काळीं जेव्हां लोकसत्तेचा उदय झाला त्याचवेळीं भांडवलशाहीचाही उदय झाला ही गोष्ट नेहेमीं ध्यानांत ठेविली पाहिजे. भांडवलशाहीच्या उदयामुळें व्यक्तिस्वातंत्र्याच्या तत्त्वाला विकृत व विपर्यस्त स्वरूप प्राप्त झालें आणि मनुष्यांच्या कर्तव्यबुद्धीपेक्षां स्वार्थबुद्धीला अधिक चालन मिळालें. अर्थात् समाजाचा नैतिक पाया ढासळत गेला, तेव्हां राष्ट्राची पुनर्घटना करतांना हा नैतिक किंवा धार्मिक पाया शाबूत व भरभक्कम केला पाहिजे, याची जाणीवही पाश्चात्य विद्वानांस आतां होऊं लागली आहे. धर्माचा पाया असेल तरच लोकसत्ता यशस्वी होईल, नाहीं तर अनर्थ ओढवतील असे उद्गार तिकडील विचारी लोक काढू लागले आहेत.[१]

---

१ मि. वेलॉक यांनीं "The Spiritual Basis of Democracy" या नांवाचा या विषयावर एक स्वतंत्र ग्रंथ लिहिलेला आहे. एच. जी वेल्स व बर्नार्ड शॉ यांच्या ग्रंथांतही समाजाचा नैतिक पाया व त्यांतील धर्मबुद्धि शाबूद ठेविली पाहिजे हा विचार वारंवार व्यक्त होत असतो. "Shaw, Wells and Creative Evolution" या मथळ्याच्या

गेल्या चाळीसपन्नास वर्षांत युरोपांत अध्यात्मवाद वाढत असून अर्थशास्त्र, राजनीति, समाजशास्त्र वगैरे सामाजिक शास्त्रांना नैतिक स्वरूप प्राप्त होऊं लागलें आहे. प्रथम जॉन स्टयूअर्ट मिल्ल व त्यानंतर टी. एच्. ग्रीन या ग्रंथकारांनीं राजनैतिक व अर्थशास्त्रीय प्रश्नांत नैतिक विचारांना स्थळ करून दिलें. कार्लाईल व रस्किन यांनीं विध्वंसक टीका करून हेंच कार्य केलें. सामाजिक शास्त्रांना नैतिक स्वरूप प्राप्त होत आहे हें सिद्ध करण्यास अनेक आधार देतां येतील. तथापि राजनीतिशास्त्राशीं विशेष संबंध असणाऱ्या अशा एकाच ठळक उदाहरणाचा येथें उल्लेख करून दुसऱ्या मुद्याकडे वळूं. राजनीतिशास्त्र व कायदेशास्त्र ऊर्फ न्यायमीमांसा(jurisprudence)यांत कायद्यांची व्याख्या करण्याचा प्रसंग येतो. हॉब्स, बेंथॅम, ऑस्टिन वगैरे आजपर्यंत जे पाश्चात्य राजनीतिज्ञ किंवा कायदेशास्त्रज्ञ होऊन गेले ते कायद्याची व्याख्या शासनकर्त्यांनीं घालून दिलेला किंवा मान्य केलेला वर्तनाचा नियम किंवा वर्तनाचें बंधन, अशा अर्थाच्या शद्बांनीं करीत असत. परंतु न्यूझीलंडमधील सॉलिसिटर जनरल सरजॉन सॉलॉल्मंड यांनीं कायदेशास्त्रावर जो एक नवा ग्रंथ लिहिला आहे त्यांत " कायद्या " च्या या व्याख्येवर आक्षेप घेतला आहे. त्यांचें असें म्हणणें आहे कीं, कायद्याचा पाया नैतिक आहे व त्यांच्य[1]

राजनीतिशास्त्राचें धार्मिक स्वरूप व कायद्याची व्याख्या.

एका लेखांत फार्टनाहटली रिव्ह्यूच्या मार्च महिन्यांत १९२६ च्या अंकांत बर्नार्ड शॉ व एच. जी. वेल्स यांचीं मतें देणारा एक लेख आला आहे. त्या लेखाच्या अखेरीस या दोन्ही ग्रंथकारांच्या मतांचा सारांश काढतांना लेखक लिहितो." Withoutr eligion,democracy is unfocussed, is a danger, without religion, the world remains inexplicable chaos. "

कल्पनेंत न्यायाची कल्पना अंतर्भूत होत असते, ही गोष्ट वरील व्याख्येनें बरोबर व्यक्त होत नाहीं. कायद्याची व्याख्या करतांना तो मोडला असतां सरकार दंड करील या गोष्टीबरोबरच त्याची निर्मिति असद्व्यवहार बंद पडून सद्व्यवहार सुरू व्हावेत, या करितां झालेली आहे ही गोष्ट ही व्यक्त झाली पाहिजे; आणि म्हणून कायदे म्हणजे न्यायदान करतांना न्यायासनांनीं मान्य केलेले न्यायाचे नियम, अशी व्याख्या त्यांनीं केलेली आहे. यामुळेंच आम्हीही न्यायदानाच्या कार्याला धर्मनिर्णय असें नांव दिलेलें आहे. अर्थात् न्यायासनांत होणारा धर्मनिर्णय हा त्या देशांतील प्रचलित कायद्यांप्रमाणेंच होणार हें उघड आहे, आणि हे प्रचलित कायदे हे कित्येक वेळां खऱ्या धर्माला धरून असत नाहींत हेंही खरें आहे. परंतु न्यायासनें हीं धर्मनिर्णयाची पवित्र स्थानें आहेत, हा मूलभूत सिद्धांत विसरून चालणार नाहीं. राजदंड हा धर्मप्रस्थापनेसाठीं आहे आणि आर्तत्राण हें त्याचें कार्य आहे ही आपली कल्पना पाश्चात्यांना आज कशी मान्य होऊं लागली आहे आणि राजनीति शास्त्राला धार्मिक स्वरूप कसें प्राप्त होऊं लागलें आहे, हें वरील विवेचनावरून वाचकांच्या ध्यानांत येईल.

त्याचप्रमाणें राजधर्माचा अहिंसावादाशीं जो विरोध येतो, तो काढून टाकण्याच्या कामीं भारतीय राजनीतिज्ञांनीं व भगवद्गीतेसारख्या धर्मग्रंथांनीं निष्काम कर्मयोगाची कल्पना काढून जें कौशल्य दाखविलें आहे, तें तर पाश्चात्य तत्त्वज्ञानांवरील ग्रंथांत फारच थोडया ठिकाणीं वाचावयास सांपडतें. त्यांच्यांतील नित्शेसारखे कांहीं तत्त्वज्ञानी अहिंसावाद, प्रेम, दया वगैरे उच्च मनोभावनांची टर उडवून सत्ता व सुख यांच्या प्राप्तीकरितां दुर्बलांना चिरडणें हाच धर्म आहे असें म्हणतात, तर टॉलस्टॉय सारखे कांहीं खिस्तभक्त निरपवाद अहिंसावादाचा आश्रय करून दंडप्रधान राज्य-

अहिंसावाद व राजनीति.

संस्थेंत भाग घेणें हें पाप आहे असें समजून ती संस्थाच मोडून टाकावी असा उपदेश करतात. भगवद्गीतेनें व आर्यतत्त्वज्ञानानें हा विरोध काढून टाकून निष्कामबुद्धीनें लोकसंग्रहार्थ हिंसा करावयास हरकत नाहीं, एवढेंच नाहीं तर तसें करणें हाच खरा धर्म होय असा निर्णय दिलेला आहे.

याहून आणखीही एक गोष्ट प्राचीन भारतीय राजनीतीपासून आधुनिक राजनीतिज्ञांना शिकावयास हवी. तिचा उल्लेख आम्हीं या प्रकरणाच्या शिरोभागीं दिलेल्या लाला लजपतराय यांच्य पुस्तकांतील उताऱ्यांत केलेला आहे. देशाची राज्यघटना कशीही असली तरी समाजांत ज्या वर्गाला अधिक मान मिळत असतो व ज्याचें वजन इतर वर्गांवर पडत असतें, त्या वर्गाच्या हातींच बहुधा राजकीय धोरण असतें. लोकसत्तेचा कितीही विकास झाला तरी खरी राज्यसत्ता कांहीं थोडया वर्गाच्या हातींच वस्तुतः जात असते. हें वजन संपत्ति, बुद्धि व नीति या तीन कारणांमुळें कोणत्याही वर्गाला प्राप्त होतें. यांपैकीं संपत्ति व बुद्धि किंवा विद्वत्ता यांची सामान्यतः एकत्र वसति असते असें पाश्चात्य राजनीतिज्ञांच्या ग्रंथांतून गृहीत धरलेलें आढळून येतें. सिज्विकसारखे पूर्वसांप्रदायी ग्रंथकार लोकसभांत समाजांतील सुस्थितींतील लोक आले तरच त्यांच्या अंगीं सार्वजनिक कार्यास लागणारी विद्वत्ता आढळून येते असें समजून लोकसभेच्या सभासदांना पगार देऊं नये असें प्रतिपादितात, तर सिडने वेब सारखे समाजसत्तावादी आधुनिक राजकीय सुधारक लोकसभांतील सभासदांना विद्वत्तेची अट ठेवणें अवश्य आहे असें वाटत असून ही विद्वत्तेची अट ठेवल्यास त्यांत संपत्तिमान लोकांचाच भरणा होईल अशा भीतीनें त्या गोष्टीस मान्यता देत नाहींत. तात्पर्य श्री आणि सरस्वति या निसर्गभिन्नास्पद आहेत, असें म्हणण्याजोगी आज पाश्चात्य समाजाची रचना नाहीं. प्राचीन भारतवर्षांतील ब्राह्मणवर्गासारखा निष्कांचन परंतु ज्ञान

प्रधान व विद्वान तपोधनांचा वर्ग त्या देशांत सध्यां तरी अस्तित्वांत नाहीं. " शमप्रधानेषु तपोधनेषु गूढं हि दाहात्मकमास्ति तेजः " असें म्हणून ज्या वर्गाला राजांनीं व राजाधिकाऱ्यांनींहीं भ्यावें असा वर्ग समाजांत नेहेमीं अस्तित्वांत ठेवणें आणि अशा वर्गानें राजकीय व सार्वजनिक कार्यांत पुढारी-पणा स्वीकारण्यांस सदैव तत्पर असणें याची सामाजिक स्वास्थ्याला व प्रगतीला अत्यंत जरूरी आहे. भारतीय राजनीति व समाजरचना इतर देशांना जर काय शिकवीत असेल व शिकविणार असेल तर तें हेंच तत्त्व होय. समाजांतील निरनिराळया वर्गांच्या हितसंबंधांशीं ज्यांचे हितसंबंध आर्थिकदृष्ट्या निगडित झाले आहेत, असे अनेक प्रतिनिधि एकत्र जमा केल्यानें कोणाच्या काय गाऱ्हाणीं आहेत तीं कळतात आणि म्हणून तीं गाऱ्हाणीं दूर करण्याच्या कामीं अशा प्रातिनिधिक संस्थांचा उपयोग होतो; परंतु मानवी संस्कृतींत भर टाकणारीं नवीं ध्येयें शोधून काढणें आणि तत्प्रस्थापक नवीं तत्त्वें राज्यशासनांत व समाजशासनांत प्रविष्ट करणें, हें कार्य अशा संस्थांकडून होऊं शकत नाहीं. मि. डायसी यांनीं सध्याच्या प्रातिनिधिक संस्थांचा हा दोष दाखवून दिला आहेच. तसेंच समाजांत लोकहिताकरितां स्वार्थत्याग करण्याची कर्तव्यबुद्धि जागृत ठेव-ण्यासही या संस्थांचा विशेष उपयोग होत नाहीं. उलट निरनिराळ्या हित-संबंधांच्या लोकांचे गट किंवा राजकीय पक्ष उत्पन्न होऊन ते राजसत्ता व राज्ययंत्र आपल्या एकट्याच्याच हातीं बळकावून बसण्याच्या उद्योगास लागतात. ही गोष्ट टाळण्यास शुद्ध राजकीय स्वरूपाच्या अनेक सुधारणा करतां येतील व त्यांचें दिग्दर्शन पूर्वीच्या प्रकरणांत ठिकठिकाणीं केलेलेंच आहे, पण त्या सर्व सुधारणा अमलांत आणिल्या तरी निष्काम बुद्धीनें सार्वजनिक प्रश्नांचा अभ्यास करून धर्मभावनेनें लोकसेवा करणारा ब्राह्मण वर्गासारखा किंवा आश्रमवासी ऋषीवर्गा-सारखा वर्ग समाजांत निर्माण होऊन त्याला योग्य तो मान मिळूं लागल्या-

खेरीज राज्यव्यवस्था सुरळित चालणें शक्य नाहीं. लालाजपतराय यांच्याप्रमाणें गेल्या पांचपन्नास वर्षांत आपल्याइकडे जे जे मोठे पुढारी होऊन गेले त्यांना ही गरज भासलेली आहे. " The public life in India must be spiritualised. " म्हणजे हिंदुस्थानांतील सार्वजनिक आयुष्याला आध्यात्मिक स्वरूप प्राप्त झालें पाहिजे असे उद्गार गोखल्यांनीं आपल्या भारतसेवकसमाजाच्या उद्देशपत्रिकेंत काढले आहेत. त्याचाहि तोच अर्थ आहे. म. गांधी हिंदी राष्ट्राला गोखल्यांचा हाच संदेश आहे असें समजतात. असो.

एक शंका.

येथपर्यंत आज पाश्चात्य राज्यतंत्राची शोचनीय स्थिति कशी झालेली आहे, त्याच्या पुर्नघटनेचें प्रयत्न कोणत्या तत्त्वावर होत आहेत, त्यांत किती पंथ आहेत, या पुनर्घटनेच्या प्रयत्नांचें भारतीय प्राचीन राजनीतीशीं कसें साम्य आहे, पाश्चात्य राज्यनीतिज्ञांत भारतीयांच्या कल्पनेप्रमाणें धार्मिक किंवा नैतिक स्वरूप देण्याची प्रवृत्ति कशी व्यक्त होत आहे आणि प्राचीन भारतीय राजनीतीपासून पाश्चात्य राजकीय सुधारकांनाही काय शिकलें पाहिजे याचें विवेचन केलें.पण आजच्या राजयंत्राची व समाजयंत्राची पुनर्घटना करतानांहि ज्यापासून बोध घ्यावा अशीं कांहीं तत्त्वें जर आमच्या समाजरचनेंत व राजनीतींत होती, व कांहीं बाबींत सर्व जगाचें जर तिकडे आज लक्ष लागत आहे, तर आमचीं राज्ययंत्रें मोडून कां गेलीं आणि आम्हांला पारतंत्र्य कां आलें या प्रश्नाचें उत्तर दिलें पाहिजे. तसेंच प्राचीनकाळीं युरोपप्रमाणेंच भरतखंडांतहि लोकसत्ता आणि राष्ट्रीय भावना या जर होत्या, तर त्या आर्वाचीन काळीं युरोपाप्रमाणें इकडेही पुनः कां उद्भुत झाल्या नाहींत, या शंकाचेंही समाधान झालें पाहिजे. अर्थात् आमच्या राजनीतिशास्त्रांत व समाजशास्त्रांत कांहीं तरी हीन तत्त्वांचा शिरकाव झाला असल्याखेरीज अशी गोष्ट घडणें शक्य नव्हतें व हीं हीन तत्त्वें काढून टाकून

त्याच्या जागीं इतर देशांच्या भरभराटीस कारणीभूत झालेलीं नवीं तत्त्वें प्रस्थापित केल्याखेरीज आमचा निभाव लागणें शक्य नाहीं. आमच्या पूर्वजा-प्रमाणें परकीयापासूनही आम्हास शिकण्यासारखें पुष्कळ आहे व तें शिकल्या-खेरीज आमची प्रगति होणार नाहीं. मात्र पूर्वजांचे किंवा परकीयांचें अंध अनुकरण करून ते पडलेल्या खड्यांत आपण पडणें शहाणपणाचें नाहीं.

प्राचीन भारतीय लोकसत्तेचें संक्षिप्त समालोचन.

प्राचीन काळीं भरतखंडांत उद्भुत झालेलीं लोकशाहीचीं राज्यें व इतर लोकसत्ताक संस्था इसवी सनाच्या पांचव्या व सहाव्या शतकापर्यंत कोठें कोठें तरी जीव धरून असाव्यात, पण येथून पुढें त्यांचा मागमूसही लागत नसून येथील सर्व राजकारण व्यक्तिनिष्ठ आणि व्यक्तिगत असें होऊन बसलें. मौर्यसाम्राज्य, सुंगसाम्राज्य व गुप्तसाम्राज्य हीं झालीं तरी कोठें कोठें लोकशाहीचीं राज्यें प्राण धरून होतीं. पण गुप्त साम्राज्याच्या नंतर लोकसत्तेचें तत्त्व भारतवर्षांत फार काळ टिकलें नाहीं असें बॅ.जयस्वल हे लिहितात.श्री.विनयकुमार सरकार यांनीं भारतवर्षाच्या इतिहासांत लोकशाहीच्या राज्यांचे स्थूल मानानें तीन काळ ठरविलेले आहेत. पहिला काळ इ० स० पू. ६०० पासून ३५० पर्यंतचा, यानंतर दुसरा काळ इ. स.पू. ३३० पासून ३०० पर्यंतचा व तिसरा काळ इ० स० पू. १५० ते इ० स० ३५० पर्यंतचा होय. त्यांच्या मतानें भारतवर्षातील लोकशाहीच्या राज्यांच्या खऱ्या वैभवाचा व भरभराटीचा काळ इ० स० पू. सहाव्या शतकापासून चौथ्या शतकापर्यंत होऊन गेला. हीं लोकशाहीचीं राज्यें ग्रीक नगर राज्यांशीं समकालीन असून पुढें मॅसिडो-नियाच्या साम्राज्यांत ग्रीक राष्ट्रें जशीं विलीन झालीं तशींच भारतीय लोक-शाहींचीं राज्यें मौर्य साम्राज्यांत विलीन झालीं. या तडाख्यांतून जीं वाचलीं त्यांनीं इ० स० पू. १५० पासून इ० स० ३५० पर्यंतच्या काळांत वर डोकें काढलें; पण पुढें गुप्त साम्राज्याशीं टक्कर देऊन तीं मरून गेलीं. या

लोकशाहीच्या राज्यांखेरीज राजशाहीच्या राज्यांतहि वैदिक काळांतील समिति सारखीच " पौरजानपद " नांवाची लोकसभा असून तिच्या हातीं बरीच सत्ता असे व इंग्लंडच्या जबाबदार मित्रमंडळाच्या पद्धतीप्रमाणें राजाचे मंत्रीहि तिला जबाबदार असत अशी बॅ. जयस्वल यांची कल्पना आहे. ती मागें दिली आहेच. परंतु श्री. विनयकुमार सरकार यांना ही कल्पना साधार आहे, असें वाटत नाहीं. त्यांचें म्हणणें एका तामिल प्रांतांतील चेर, चोळ व पांडय या राज्यांखेरीज राष्ट्रीय लोकसभा असल्याचा फारसा आधार अद्यापि उपलब्ध नाहीं.या लोकसभा मात्र प्रतिनिधीतत्त्वावर निवडलेल्या असत. भारतीयांच्या स्थानिक व जातीय लोकसभांतही प्रातिनिधिकतत्त्वें व लोकनियुक्ततेचीं तत्त्वें दृष्टीस पडतात हें त्यांना मान्य आहे. इतर ठिकाणीं राज्यसूत्रें राजा, मंत्रिपरिषद व मंत्रि यांच्याच हातीं असत असें त्यांचें मत आहे.मात्र मंत्र्यांना व मंत्रिपरिषदेला बरेच अधिकार असून लोकरक्षणाची आपली जबाबदारी जाणून ते लोकांच्या हितासाठीं राजांना व सम्राटांनाहि विरोध करीत असत हें त्यांना मान्य आहे. तसेंच हिंदूराज्यांतील बहुतेक कारभार ग्रामपंचायती व औद्योगिक श्रेणी या सारख्या स्थानिक, धार्मिक, औद्योगिक, किंवा व्यावसायिक समूहांनीं उचललेला होता. या समूहांतील लोकसभांना कायदे करणें व त्यांची अंमलबजावणी करणें व न्याय देणें या संबंधीं बरेच अधिकार असत हेंहि बहुतेक विद्वानांस आज मान्य आहे. तात्पर्य लोकशाहीचीं राज्यें सोडून दिलीं तर राजशाहीच्या राज्यांत राष्ट्रीय लोकसभा किती काळ अस्तित्वांत होत्या,त्या वैदिक काळच्या समति व सभा यांच्या नंतर अन्यरूपानें आस्तित्वात होत्या किंवा नाहीं, याबद्दल अद्यापि विद्वानांत मतभेद असला तरी स्थानिक, औद्योगिक व व्यावसायिक स्वराज्याच्या स्वरूपानें राजशाहीच्या राज्यांतहि लोकसत्ता हिंदुस्थानांत बराच काळ नांदत होती याबद्दल आज विद्वानांत मतभेद नाहीं. तसेंच आमची धर्मराज्याची कल्पना पाश्चात्यांच्या विशेषतः इंग्लिशांच्या ' कायद्यांच्या राज्या"च्या कल्पनेशीं

तुल्य किंबहुना तात्त्विक दृष्ट्या अधिक सरस आहे, असें आम्हांस वाटतें. त्याचप्रमाणें ब्राह्मणवर्गासारख्या दारिद्र्यांत राहून लोकसेवा व विद्याव्यासंग करणाऱ्या वर्गाकडे समाजाचें नेतृत्व असावें, राजसत्तेनें ब्रह्मसत्तेपुढें वाकावें व तिला भ्यावें, राजांनीं आपणांस वाटेल तसें प्रजेचें शासन करूं नये, राजा तसें करूं लागल्यास अशा आसुरी राजास पिसाळलेल्या कुत्र्याप्रमाणें ठार करावें वगैरे आमचे राजधर्मासंबंधीचे विचार, अभिषेक प्रसंगीं राजानें करावयाची प्रतिज्ञा, त्यांत व्यक्त होणारी कराराची उपपत्ति वगैरे गोष्टींचा विचार करूं लागलें म्हणजे प्राचीन भारतीयांनीं राजनीतिशास्त्राचा पाया खरोखरच तत्त्वशुद्ध घातला होता अशी खात्री होते. परंतु या पायावरची इमारत अखेरीस ढासळली यांत शंका नाहीं. ती कां ढासळली ?

आमच्या अधःपातांचीं कारणें:-विद्वानांचीं मतें.

हिंदुस्थानांतील लोकसत्तेचीं बीजें आणि राष्ट्रीयभावना यांची वृद्धि न होतां तीं हळूं हळूं लोप पावत गेलीं आणि युरोपांत अलीकडे दोन तीनशें वर्षांत त्यांनीं पुनः डोकें वर काढलें. असा फरक पडण्याचीं काय कारणें झालीं याबद्दल चर्चा करण्यापूर्वीं प्राचीन काळची लोकसत्ता नष्ट होण्याचीं कारणें इतिहासज्ञांनीं कोणती ठरवलीं आहेत तें पाहूं. भारताचार्य चिं. वि. वैद्य हे लिहितात—" हिंदुस्थानांत पश्चिमेकडील व विशेषतः डोंगराळ मुलखांतील लोक एका वंशाचे मुख्यतः आर्य जातीचें असल्यामुळें त्यांच्यांतील राज्यव्यवस्था निराळी म्हणजे प्रमुख लोकांच्या हातांत स्वतंत्र तऱ्हेचीं होती, आणि पूर्वेकडील मगधादि देशांत राज्यें मोठालीं असून त्यांतील प्रजा विशेषतः शूद्रवर्णाची किंवा मिश्रवर्णाची असून तेथील राजव्यवस्था निराळ्या प्रकारचीं म्हणजे राजसत्ताक होती....किंबहुना एकतंत्री राज्यपद्धति पूर्वेकडील देशांत प्रथम सुरू झाली असली पाहिजे. म्लेंच्छ अथवा मिश्र आर्य या देशांत जास्त होते....पूर्वेकडील राजांस सम्राट अशी पदवी असे हें प्रसिद्ध आहे." तात्पर्य अनार्य

लोकांशीं संबंध आणि साम्राज्यवृद्धि हीं लोकसत्तेच्या विनाशाचीं कारणें त्यांनीं दिलीं आहेत.[१] प्रो. प्रमथनाथ बानर्जी हे पुढील तीन कारणें देतात-(१) लोकसत्ताक राज्यांचा छोटेपणा (२) प्रातिनिधिक पद्धतीचें अज्ञान असल्यामुळें मोठ्या प्रमाणावर लोकसत्तेची स्थापना करण्याची अशक्यता (३) जातिभेदाचें दृढीकरण व त्यामुळें राष्ट्रीय भावनेपेक्षां जातीय भावनेला अधिक महत्त्व प्राप्त होणें; व राष्ट्रीय लोकसभेपेक्षां जातिसंस्थांना महत्त्व येणें.[२] डॅ. जयस्वल यांनीं पुढील कारणें दिलीं आहेत. (१) लोकसत्ताक राज्यांचा छोटेपणा व त्यांची विभक्त होण्याची प्रवृत्ति (२) राजकीय पक्षभेद व त्यांच्यातील द्वेष (३) भाषणस्वातंत्र्याची फाजील वाढ व त्यामुळें वाढणारीं भांडणें.[३] असो. आतां आमच्या लोकांत राष्ट्रीय भावना व लोकसत्ता यांचें पुनरुज्जीवन कां झालें नाहीं, याच्या कारणांची थोड्या विस्तारानें चर्चा करूं.

हिंदुस्थास्थानांत राष्ट्रीय संघटना होऊन तेथें लोकसत्तेची वृद्धि होण्यास पहिली अडचण त्याच्या भूगोलिक रचनेची होती. प्राचीन काळची

भूगोलिक कारण.

प्राथमिक लोकसभा निरनिराळया रूपानें कायम ठेऊन तिजकडूनच आर्वाचीन लोकसत्तेचें कार्य एकटया इंग्लंडनेंच केलेलें आहे. याचें कारण तो देश युरोपापासून तुटलेला आहे व युरोपीयन राज्यांच्या यादवींत त्याला तितकासा भाग घ्यावा लागत नाहीं हें एक आहे. देशाला दुर्लंघ्य अशा नैसर्गिक मर्यादा असल्याखेरीज देशांत शांतता राहात नाहीं व बाहेरचें दडपण व युद्धें कमी झाल्याखेरीज लोकस्वातंत्र्याची व लोकसत्तेची वाढ होत नाहीं. सर्व हिंदुस्थान एकछत्री अमलाखालीं आल्याखेरीज त्यांतील कोणत्याही राज्याला दुर्लंध्य नैसर्गिक मर्यादांचें संरक्षण मिळणें शक्य नव्हतें.

---

१ महाभारताचा उपसंहार पान २८३. 2 Public Administration in Ancient India p. 97. 3 Hindu Polity part I p, 177.

यामुळें येथें साम्राज्यवादाची वृद्धि होऊन दिग्विजय करण्याकडेंच बरें राजकीय प्रयत्न होत असत व त्यामुळें अनियंत्रित राजसत्ता अस्तित्वांत येणें साहजिक होतें. इंग्लंड देश लहान असून तुटक आहे म्हणून तेथें लोकसत्तेचा परिपोष लवकर झाला व त्याचा परिणाम इतर युरोपावरहि झाला. लोकसत्तामूलक छोटीं राष्ट्रीय राज्यें बनवावीं, साम्राज्यवृद्धि करावयाची झाली तर आशिया, अमेरिका व आफ्रिका अशा भौतिक विद्येंत मागसलेल्या लोकांत करावी व युरोपांत दिग्विजय मिळवून साम्राज्य स्थापन करण्याचे प्रयत्न करूं नयेत, हा बोध इंग्लंडापासून इतर यूरोपीयन देशांनीं घेतला.

हिंदुस्थानांत एकराष्ट्रीयत्वाची भावना न रुजण्यास आणि राजकीय औदासिन्य वाढण्यास एक आर्थिक कारणहि आहे. तें म्हणजे येथील अन्नवैपुल्य हें होय. या कारणामुळें येथील सामान्य लोकांत राजकीय औदासिन्य, एकराष्ट्रीयत्वाचा अभाव व संन्यस्त व तुटकवृत्ति यांची कशी वाढ होते व देशांत सुबत्ता असली म्हणजे लोक आपल्या जातीपलीकडे व गावांपलीकडे कसें पाहात नाहींत, याचें वर्णन इतिहाससंशोधक रा. वि. का. राजवाडे यांनीं आपल्या महिकावतीच्या बखरीच्या प्रस्तावनेंत उत्तम तऱ्हेनें केलें आहे. त्यांतील दोन मोठे उतारे आम्ही मागें या भागाच्या पहिल्या भागांत दिलेच आहेत. ते एकदां वाचकांनीं पुनः वाचावेत म्हणजे आमच्या राजकीय औदासिन्याचीं आर्थिक कारणें त्यांच्या ध्यानांत येतील.

आर्थिक कारण.

आतां सामाजिक कारणांचा विचार करूं. सामाजिक कारणांत जातिभेदाच्या अमर्याद वाढीस अग्रेसरत्व दिलें पाहिजे. आर्यांची वर्णव्यवस्था गुणकर्मभेदावर उभारली आहे अशी उपपत्ति सांगण्यांत येत असे. परंतु आपल्या समाजांत शूद्रवर्ण निर्माण केल्यापासून आमचा

सामाजिक प्रमुख कारण.

व्यवहार या उपपत्तीच्या अगदीं विरुद्ध होत असलेला दिसतो. मनुष्यांच्या गुणांपेक्षा त्यांच्या जन्माला किंवा कुलाला अधिक महत्त्व देणें, ही वृत्ति आमच्या समाजांत सर्वत्र दृष्टीस पडते. आमच्या जातिभेदामुळें इकडे राष्ट्रीयत्वाची व लोकसत्तेची वृद्धि कशी झाली नाहीं यासंबंधीं आपल्या हिंदु भारताचा अंत भाग ३ रा, या पुस्तकांत चिं. वि. वैद्य लिहितातः– " या कालविभागांत जातिशुद्धतेच्या वाढलेल्या कल्पना, त्याचप्रमाणें अहिंसा तत्त्वाचें वाढलेलें प्राबल्य व त्यामुळें अनेक जातींनीं स्वीकारलेला शाकाहार इत्यादि कारणांनीं प्रत्येक जात किंबहुना पोटजात रोटीबेटी व्यवहारांत अलग पडली. यामुळें हिंदूसमाजाचे लहान लहान स्वसंकुचित शेंकडो तुकडे पडून त्यांची एकी नष्ट झाली; आणि आपलें राज्य स्वतंत्र असावें याबद्दलची सामुदायिक शुद्ध स्वहिताची कल्पना नष्ट झाली. पूर्वींच्या कालविभागांत आपसांतील विवाहसंबंधानें निरनिराळ्या वर्णांत एकीची कल्पना जागृत असे; आणि सर्वांत रोटीव्यवहार असल्यानेंही एकीच्या कल्पनेंत आणखी भर पडे. दुसरें, हिंदूधर्माच्या पुराणमताच्या पुनरुज्जीवनानें आतां असें मान्य झालें कीं, राज्य करण्याचें कर्तव्य क्षत्रियांचें आहे....या स्थितींत देशाविषयींचें लोकांचें राजकीय औदासिन्य बरेंच वाढलें...याप्रमाणें राष्ट्रीयत्वाची भावना नष्ट झाली. " (हिंदु भारताचा अंत. भाग ३ रा. पान ३५३।५४।.) चातुर्वर्ण्य रोटीबेटी बंद बनलें, निरनिराळ्या औद्योगिक श्रेणींच्या आनुवंशिक धंदेवाईक जाती बनल्या, ग्रामसंस्थांत वतनदारी शिरून लोकसत्तेचा अंत झाला आणि राजे अनियंत्रित बनले, या सर्वांवरून एकच गोष्ट सिद्ध होते कीं, आमच्या सामाजिक व राजकीय सर्व व्यवहारांत आम्ही आनुवंशिक तत्त्वाला अग्रेसरत्व दिलें. आज पाश्चात्य देशांतील दंगलींचे एकच कारण द्यावयाचें झाल्यास आर्थिक विषमता हें देतां येईल त्याचप्रमाणें आमच्या अधःपाताचें मुख्य कारण जात्यभिमान देतां येईल. आर्य व अनार्य या भिन्न वर्णीय व भिन्न संस्कृतीच्या लोकांच्या

संयोगापासून हें बीज रुजत गेलें, तें पुढें उत्तरोत्तर फोफावून त्यापासून झालेल्या विषवृक्षानें आमचा अखेरीस नाश केला म्हटल्यास हरकत नाहीं. भावी राज्ययंत्राच्या घटनेचा विचार ठरवितांना पाश्चात्यांना जर्जर करणाऱ्या भांडवलशाहीप्रमाणेंच आमच्यांतील या जात्यभिमानाचा उच्छेद करणें अवश्य आहे.

धार्मिक कारणें.

या शिवाय आमचा निवृत्तिमार्गाकडे झालेला कल, आमच्यांत वाढलेला दैववाद व जगांला मिथ्या समजून त्यांतील व्यवहारांकडे दुर्लक्ष करावयास लावणारा मायावाद हींही आमच्या अधःपाताचीं धार्मिक कारणें देतां येतील. आमचें सर्वच राजनीतिशास्त्र धर्माच्या पायावर उभारलेलें असल्यामुळें धर्मसंबंधीच्या भावना विकृत झाल्याबरोबर राजनीतिशास्त्रालाही विकृत स्वरूप प्राप्त झालें यांत नवल नाहीं. या जगांतील कर्में करीत पूर्ण शंभर वर्षें आनंदानें इहलोकीं वास करावा, आध्यात्मिक उन्नतिबरोबरच आधिभौतिक अभ्युदयाचे प्रयत्न करणें हा धर्म समजावा, दृश्यविश्वाला परमात्म्याचें व्यक्त स्वरूप मानून त्याची ज्ञानमूलक उपासना करावी, तदंतर्गत विविध भौतिक शक्तींना देवता कल्पून त्यांच्या प्रसादानें अनेक सुखें प्राप्त करून घ्यावींत, मात्र त्यांच्यापासून प्राप्त होणाऱ्या आधिभौतिक सुखांपेक्षा आध्यात्मिक निश्रेयसाची किंमत अधिक आहे, हें विसरूं नये, हा प्राचीन आर्यांचा अभ्युदयनिश्रेयसदायक धर्म आम्ही विसरून गेलों. आधिभौतिक ज्ञानाची " अविद्या " या नांवानें आम्ही हेटाळणी सुरूं केली पण केवळ "अविद्ये"ची उपासना करणाऱ्या लोकांपेक्षाही केवळ "विद्येंत"च म्हणजे आत्मज्ञानांतच रममाण होणाऱ्या लोकांचा अधिक अधःपात होत असतो, हा प्राचीन औपनिषदिक ऋषींचा उपदेश आम्ही ध्यानांत ठेवला नाहीं. ईशावस्य उपनिषद सांगतेंः

अंधं तमः प्रविशंति येऽविद्यामुपासत ।
ततो भूय इव ते तमो ये उ विद्यायां रताः ।
विद्यांचाविद्यांच यस्तद्वेदोभयं सह ।
अविद्यया मृत्युं तीर्त्वा विद्ययाऽमृतमश्नुते ॥[१]

राजनीतिशास्त्राचा सर्व पाया धर्मावर व नीतिवर उभारल्यामुळें आमची आणखी एक चुक झाली. प्राचीन भारतीयांनीं राजनीतिशास्त्राचा पाया धर्मावर उभारला होता तरी इतर धर्म व राजधर्म यांच्यांतील भेद ते विसरले नव्हते. राजधर्माला दण्डाचा आश्रय करावा लागतो, त्याचप्रमाणें राजा ही व्यक्तीही दण्डय आहे, या कल्पना प्राचीन भारतीयांच्या पूर्ण परिचयाच्या होत्या. परंतु पुढें पुढें या गोष्टींचें आम्हांस विस्मरण होत गेलें. राजाला व प्रजेला दोघांनाही प्राचीन आर्यांनीं धर्मांचें बंधन ठेवलें होतें, परंतु राजानें आपल्या धर्मांचें उल्लंघन केल्यास त्याला शासन केलें पाहिजे ही प्राचीन कल्पना हळूं हळूं नष्ट झाली. पाश्चात्यांनीं आम्हास जर कोणत्या गोष्टीची स्मृति करून दिली असेल तर ती हीच कीं शासनकर्त्यांना केवळ धर्म घालून देऊन कार्यभाग होत नाहीं, तर तो धर्म त्यांच्याकडून दण्डाच्या भीतीनें आचरून घेतला पाहिजे.

येथून पुढें पुनः राजनीतिशास्त्रांतही आपली कर्तबगारी दाखविण्यास अवकाश आहे. तें कार्य करतांना पाश्चात्यांनीं केलेल्या त्या शास्त्रांतील प्रगतीकडे किंवा आपल्या पूर्वजांच्या विचारांत जीं चांगलीं

---

१ " जे अविद्येची (भौतिक ज्ञानाचीच) उपासना करतात ते अंधकारांत प्रवेश करतात व जे केवळ विद्येंतच (आत्मज्ञानांतच) रममाण होतात ते त्याहूनही घोर अंधकारांत जाऊन पडतात. जो विद्या व अविद्या या दोहोंतही एकाच वेळीं प्राविण्य मिळवितो तो मृत्युलोकाची यात्रा सुखानें करतो व शिवाय अमृत अशा आध्यात्मिक शांतीचाही उपभोग घेतो."

पुढील मार्ग.

तत्त्वें आढळतात तिकडे दुर्लक्ष करणें युक्त होणार नाहीं. आमचीं राज्ययंत्रें मोडून गेलीं व राजनीतिशास्त्राची व्हावी तशी वाढ झाली नाहीं, म्हणून त्यांतील सत्तत्त्वांकडे दुर्लक्ष करणें हें जितकें चुकीचें आहे तितकेंच आज कांहीं कारणानें त्यांचीं राज्ययंत्रें मोडकळीस आलीं आहेत म्हणून त्यांच्यांतील चांगल्या गोष्टींकडे लक्ष न देणें आत्मघातक आहे. या दोन्ही दृष्टींनीं या पुस्तकाची रचना आम्ही केलेली आहे. पाश्चात्यांनीं सामाजिक, आर्थिक व राजकीय स्वातंत्र्याच्या ध्येयांचा अलीकडे फार जोरांत प्रसार केला आहे. परंतु त्यांच्या समाजांत आध्यात्मिक स्वातंत्र्याला मिळावें तितकें महत्त्वाचें स्थान मिळालेलें नाहीं. व्यक्ति किंवा समाज यांच्यांत आध्यात्मिक स्वातंत्र्याचें वारें संचार करीत असल्याखेरीज त्याला सामाजिक, आर्थिक व राजकीय स्वातंत्र्याचा खरा उपभोग घेतां येणार नाहीं. तसेंच आध्यात्मिक स्वातंत्र्याच्याच नादीं लागून सामाजिक, आर्थिक किंवा राजकीय स्वातंत्र्याकडे दुर्लक्ष करणें हेंही परिणामीं विघातक झाल्याखेरीज राहात नाहीं, ही गोष्ट आमच्या सध्याच्या शोचनीय स्थितीवरून स्पष्टच होत आहे. या बाह्य व आभ्यंतर स्वातंत्र्याचा समन्वय करणें हेंच खरें मानवी ध्येय आहे व तें प्राचीन आर्यांनीं जाणिलें होतें.

समाप्त.



शुद्धिपत्र.

पान	ओळ	अशुद्ध	शुद्ध
२३	११	स्वातंत्र किंवा स्वतंत्र्यप्रभुत्व,	स्वातंत्र्य किंवा स्वतंत्वप्रभुत्व
७१-७२		७१ पानाच्या पायथ्याला व ७२ पानाच्या डोक्यावर दिलेले संस्कृत श्लोक मूळचे टीपेंतील आहेत.	
७५	टीप २ री ओळ	दण्डो दण्डिकः	दण्डो न दाण्डिकः
,,	,, ३ री ओळ	परस्पत्	परस्परम्
८३	,, २ री ओळ	accony table	accountable
,,	,, ६ वी ,,	(Bharma)	(Dharma)
,,	७ वी ,,	Brahmas	Brahmans
१२८	१ (श्लोक)	तें	तं
,,	१६	(तैवं राजकालिं दन्यात्)	(तं वै राजकालिं हन्युः)
,,	,,	'गुणनींनिबलद्वेषी'	'गुणनीतिबलद्वेषी'
३१७	टीप ३ री ओळ	Chattee-slavery	chattel-slavery
३७१	,, ११ वी ,,	hat	that
३७६	९ वी ,,	तीन दोष	दोन दोष
३७८	३	तिसरा दोष	दुसरा दोष
,,	मार्जिन	,,	,,
३८०	१६	Elementers	element enters
३८६	१४	hotent	potent
४१६	७	वर्गाच्या निवडणुकींत	वर्गाच्या लोकांना निवडणुकींत
४२८	३	असतें,	नसतें,
४३६	टीप १ ली ओळ	enjoye	enjoys